# श्री साहित्यादर्श


स. ग्रं. म. ग्रां

विषय

ग्रं. नं.





REFBK-0005860



श्री सयाजी साहित्यमाला, पुष्प २६ वे.

हें पुस्तक / नियतकालिक नवें असल्याकारणानें प्रत्येकास लवकर मिळावे अशी उत्कंठा असते; तरी तें घेतल्यापासून निदान ७/८ दिवसांत परत करण्याची कृपा करावी.

श्री.

# विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी श्रीमंत सरकार महाराजसाहेब सर सयाजीराव गायकवाड तिसरे, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी., आय. इ., एल्एल्. डी., यांनी कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्रीसयाजी साहित्यमालें"त विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार "शीघ्र साहित्यादर्श" या नांवाचा ग्रंथ श्री. वासुदेव कृष्ण भावे, बी. ए. यांजकडून तयार करविला, तो उक्त मालेंतून २६३ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा, प्राच्यविद्यामंदिर, बडोदें, १८।९।३९

भा. प्र. कोठारी, भाषांतर मदतनीस.

ज्यो. मा. महेता, विद्याधिकारी वडोदरा राज्य.

## कांहीं संदर्भ ग्रंथ


1 Journalism as a career; by W. I. Cranfield

2 Essentials in Journalism; by Harrington and Fronkenberg

3 Sub-editing; by J. Mansfield

4 Magazine—Article writing; by Earnest Brennecke J. R. and Donald Lemen Clerk

5 A nation in making; by Sir Surendranath Banerji

6 Journalism in India; by Pat Lovett

श्रीसयाजी साहित्यमाला, पुष्प २६२ वें

# शीघ्र साहित्यादर्श

REFBK-0005860

लेखक

वासुदेव कृष्ण भावे, बी. ए., पुणें

भाद्रपद शके १८६१ | सप्टेंबर सन १९३९

किंमत २ रुपय

प्रकाशक :

माधव वासुदेव भावे, बी. कॉम्.

२२६ सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक :

धोंडो वासुदेव विद्वांस,

केसरी मुद्रणालय,

५६८ नारायण पेठ, गायकवाडवाडा, पुणें २.

नि. ८२

# ग्रंथाविषयीं

मराठींत वर्तमानपत्रें व मासिकें यांचा प्रचार बराच झाला आहे व होत आहे. जुन्या वृत्तपत्रांत व नियतकालिकांत नवीनांची भरहि पडत आहे. नवीन पदवीधरांना व शिक्षितांना या व्यवसायांत शिरण्याची उमेद वाटत असून इतर व्यवसायांच्या अभावीं त्यांपैकीं कित्येकांना याशिवाय गत्यंतरहि राहिलेलें नाहीं. परंतु त्या संबंधानें माहिती देणारा ग्रंथ मराठींत अद्यापि झालेला नाहीं. रा. श्रीपाद रामचंद्र टिकेकर यांनीं 'बातमीदार' हें पुस्तक लिहिलें आहे, पण त्याचा मर्यादितपणा नांवावरूनच कळून येतो. 'मराठी नियतकालिकांचा इतिहास' 'ज्ञानप्रकाश'-पत्राचे उपसंपादक रा. रामचंद्र गोविंद कानडे यांनीं लिहून एतद्विषयक वाङ्मयांत भर घातली आहे. तथापि तो इतिहास आहे, नियतकालिकावरील विवरणात्मक ग्रंथ नव्हे हें उघड आहे.

मी वृत्तपत्रव्यवसायांत गेलीं २० वर्षें घालविलीं आहेत. आरंभीं तीन वर्षें 'लोकसंग्रह' या पुण्यांतील दैनिक पत्रांत उपसंपादक या नात्यानें काम केलें आहे. त्यानंतरचीं १७ वर्षें "केसरी" पत्रांत गेलीं असून या दीर्घकालांत दीड पावणेदोन वर्षें मुख्य संपादकाच्या जबाबदारीच्या कामाचाहि अनुभव मला मिळाला आहे. खेरीज केसरी—मराठा संस्थेतर्फें चार पांच वर्षांत 'सह्याद्रि' मासिक निघूं लागल्यापासून त्याच्याशींहि थोडाफार संबंध आलेला आहे. या आपल्या अनुभवाचा लाभ नवीन होतकरू तरुणांना द्यावा अशा हेतूनें प्रस्तुत ग्रंथ लिहिला आहे.

'जरनॅलिझम' या इंग्रजी शब्दाला मराठींत प्रतिशब्द अद्यापि निघालेला नाहीं. जर्नल या शब्दापासून जरनॅलिझम हा शब्द बनून त्याला

सध्याचा रूढार्थ लाभला आहे. त्यांत वृत्तपत्रें, मासिकें व इतर नियतकालिकें व जुजबी लहान पुस्तकें यांचाहि समावेश होतो. वास्तविक या प्रकारच्या वाङ्मयाला कालमर्यादा आहे व त्यामुळें ग्रंथलेखनासारखें हें लेखन सावकाशानें करावयाचें नसून जलदीनें लवकर हाताशीं येईल तेवढ्या सामुग्रीवर उरकावें लागतें. म्हणून त्या व्यापाराचा व अवस्थेचा द्योतक असा 'शीघ्र साहित्य' हा नवा शब्द मी जरनॅलिझमच्या जागीं वापरला आहे. नियतकालिकांत वृत्तपत्रांनाहि घेण्यास हरकत नाहीं. पण त्या शब्दाच्या माथीं वृत्तपत्रेतर साहित्य आधींच लादलें गेलें असल्यामुळें शीघ्र साहित्य या नव्या शब्दाची गरज अधिक भासली. 'जरनॅलिझम्' याला 'शीघ्र साहित्य' व त्यापासून उद्भवलेल्या 'जरनॅलिस्ट' या शब्दाला 'शीघ्र साहित्यिक' हा प्रतिशब्द सहाजिकच घडवावा लागला. या दोन शब्दांचा वापर प्रस्तुत ग्रंथांत मी बऱ्याच ठिकाणीं केला आहे.

प्रस्तुत ग्रंथ लिहितांना मी अनेक इंग्रजी ग्रंथांचें साहाय्य घेतलें आहेच; पण त्यापेक्षांहि स्वानुभवावर अधिक भर दिला आहे. कारण स्वानुभवाच्या बोलाशिवाय कोणत्याहि कृतीला जिवंतपणा यावयाचा नाहीं. रा. नरसिंह चिंतामण केळकर हे महाराष्ट्रांतील वृत्तपत्रसृष्टींत सर्वांत ज्ञानवृद्ध व अनुभववृद्ध असल्यानें त्यांजकडे चालू पिढींतील जुन्या-नव्या संपादकांचें गुरुत्व हक्कानेंच येतें. ग्रंथरचना करतांना त्यांचाहि सल्ला वेळोवेळीं घेतला आहे. ग्रंथ लिहावयासच घेतल्यानंतर तो केवळ तांत्रिक न रहावा यासाठीं त्यांत युरोप, अमेरिका यांतील, तसाच हिंदुस्थानांतील व महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांचा इतिहास समाविष्ट केला आहे. वृत्तपत्रांचीं व नियतकालिकांचीं जेवढीं अंगें आहेत त्या सर्वांचा परामर्ष घेऊन ग्रंथ शक्य तितका परिपूर्ण करण्यांत कसूर राहूं दिली नाहीं हें प्रकरणांची अनुक्रमणिका चाळली असतां कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. लोकसंग्रह कारखान्याचे कल्पक व तरतरीत व्यवस्थापक रा. शंकर रामचंद्र

दाते बी. ए. यांनीं छपाईसंबंधाचे प्रकरण स्वतःच लिहून दिल्यामुळें त्या महत्त्वाच्या अंगाची उणीवहि आतां उरलेली नाहीं.

हा ग्रंथ छापतांना सूचि तयार करण्याचें काम रा. लक्ष्मण दत्तात्रय दीक्षित बी. ए. यांनीं हौसेनें अंगावर घेऊन पार पाडलें याबद्दल त्यांचे, रा. शंकरराव दाते यांचे, तसेंच केसरी मुद्रणालयाचे सहव्यवस्थापक रा. आत्माराम रावजी भट, एम्. कॉम्. यांनीं छपाईचें काम त्वरित व सुबक उरकेल अशी व्यवस्था केली याबद्दल आणि रा. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांनीं वेळोवेळीं सल्ला दिला व रा. गोविंद मोरेश्वर सोमण यांनीं 'खेड्यांतील वाचकवर्ग' हें प्रकरण घेण्यास परवानगी दिली याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

शेवटीं ज्यांच्या उदार आश्रयामुळें हा ग्रंथ लिहिण्याचें कार्य माझ्या हातून घडलें त्या श्रीमंत गायकवाड सरकारांचा मी अत्यंत ऋणी आहें.

केसरी कचेरी, पुणें<br>
सोमवार, भाद्रपद वद्य १२ शके १८६१

वासुदेव कृष्ण भावे<br>
ग्रंथकर्ता

# अनुक्रमणिका

१ वर्तमानपत्र ... ... ... ... १
२ पाश्चिमात्य वृत्तपत्रांचा प्रारंभ व विकास ... ... १७
३ हिंदुस्थानांतील वृत्तपत्रांचें पूर्ववृत्त ... ... २८
४ हिंदुस्थानांतील प्रसिद्ध संपादक ... ... ... ३८
५ महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें ... ... ... ६९
६ महाराष्ट्रांतील प्रसिद्ध संपादक ... ... ... ९९
७ संपादकीय व्यवसाय ... ... ... १२७
८ संपादकाची कचेरी ... ... ... १४९
९ संपादकीय तयारी ... ... ... ... १७२
१० वृत्तपत्रांतील मजकूर ... ... ... १८२
११ संपादकाचे अनुभव ... ... ... ... २१४
१२ वृत्तपत्रांचा प्रभाव ... ... ... ... २४३
१३ दोन संस्मरणीय खटले ... ... ... २६८
१४ वर्तमानपत्राची छपाई ... ... ... २७७
१५ वृत्तपत्रांतील जाहिराती ... ... ... २८४
१६ खेडयांतील वाचकवर्ग ... ... ... २९१
१७ नियतकालिकें ... ... ... ... ३००
१८ नियतकालिकांचें संपादकत्व ... ... ... ३१२
१९ कायद्यांचीं बंधनें ... ... ... ... ३२७
सूचि ... ... ... ... ... १
शुद्धिपत्र ... ... ... ... ८

७८८८१ 1795

# शीघ्र साहित्यादर्श

## प्रकरण पहिलें

५८६०

### वर्तमानपत्र

वर्तमानपत्र म्हणजे वर्तमान सांगणारें पत्र. वर्तमानपत्र प्रथम निघालें तेव्हां त्यांतील मजकूर या अर्थाला शोभण्यासारखाच होता. जाहीर बातमी, खबर, वृत्त किंवा तत्संबंधीं कांहीं मतप्रदर्शन किंवा टीका; विक्री करितां छापून तयार केलेलें नियतकालिक किंवा २६ दिवसांहून अधिक नाहीं इतक्या अवधीनें भागशः अथवा अंकशः प्रसिद्ध केलेला कोणताहि कागद याला वर्तमानपत्र म्हणतात. वास्तविक चार चोहोंकडील बातम्या एकत्र छापलेल्या वाचणें यासारखें मनोरंजक काय आहे ? आजहि वर्तमानपत्र न वाचतां किती तरी आश्चर्यकारक व दुःखदायक बातम्या कानीं येतात. असें असतांहि वर्तमानपत्रावर वाचकांची उडी पडावयाची ती पडतेच. मग ज्या काळांत शेकडों मैलांवरील माणसास एका दिवसाच्या अवकाशांत जवळ आणून सोडणाऱ्या आगगाड्या अगर मोटारगाड्या नव्हत्या, टेलिफोनवरून शेंदीडशें मैलांवरील गृहस्थाशीं एकाच मेजाभोंवतीं बसल्याप्रमाणें कानगोष्टी करावयास सांपडत नव्हत्या, एक हजार मैलांवरची वार्ता डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच हातात देणारें तारायंत्र अगर बिनतारी संदेशहि नव्हता, त्या काळांत जुन्या नव्या बातम्या

पुरविणारें वर्तमानपत्र हा वाचकाला अलभ्य लाभच वाटावा यांत नवल कसलें ? म्हणून प्रारंभीं वर्तमानपत्रांनीं आपल्या नांवाप्रमाणें नुसत्या बातम्या जरी छापल्या तरी ती एक उपयुक्त देशसेवाच समजली जात असल्यास तत्कालीन जनतेस कोणीहि हंसणार नाहीं.

महाराष्ट्रांत प्रथम निघालेलीं वृत्तपत्रें प्रायः सर्वसाधारण बातम्याच देत असत. पण त्यानंतर वृत्तपत्रांचा विकास झपाट्यानें होऊन राजकीय वृत्तान्तांना महत्त्व प्राप्त झालें व त्या वृत्तान्ताच्या आधारें राजकीय विषयांचें उद्घाटन वृत्तपत्रकार व राजकारणी पुरुष करूं लागले. अशा पत्रांचे संपादक राजकारणाचा ऊहापोह करण्यांत आपण असाधारण देशसेवा बजावीत आहों असें समजत व त्या पवित्र कार्याचें महत्त्व ओळखून देहदंडहि सोसण्यास तयार होत. परंतु जें एखादें कार्य पवित्र म्हणून आरंभावें, तेंच मागाहून कांहीं काळ लोटल्यावर चरितार्थाचें साधन समजलें जावें ही जगाची रीतच दिसते. या प्रकारचा अनुभव वर्तमानपत्राच्या क्षेत्रांत नव्यानें येत आहे इतकेंच. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, वर्तमानपत्रें एक प्रद-क्षिणा संपवून पुनः बातम्यांनाच महत्त्व देण्याचा प्रयोग करून पहात आहेत. अशा दृष्टीनें पाहिल्यास महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांत साप्ताहिक, अर्धसाप्ताहिक व दैनिक असे तीन वर्ग स्पष्टपणें आढळतील. साप्ताहिक व अर्धसाप्ताहिक पत्रें राजकारणाची पूर्वपरंपरा चिकाटीनें चालवीत आहेत. तरीपण वाढता शिक्षित वर्ग, बदलती लोकाभिरुचि, फिरती परिस्थिति व चढती चढाओढ यांच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें त्यांनाहि विषयवैचित्र्याकडे लक्ष पुरविणें भाग पडलें आहे. साप्ताहिक अगर अर्धसाप्ताहिक पत्रें जीं मोठ्या मध्यवर्ती शहरांत छापलीं जातात त्यांनीं आपली पृष्टसंख्या पुष्कळच वाढविली आहे. या कारणानें त्यांना वैचित्र्य साधतां आलें आहे. अशा वृत्तपत्रांना अमूक एक विषय वावडा आहे असें राहिलेंच नाहीं. जितक्या अभिरुचींचे वाचक संभवतात

तितक्या अभिरुचींच्या विषयांस पत्रकार जागा करून देतात. कविता, संवाद, कथा,नाटक, कादंबरी या ललित-वाङ्मयाला हटकून स्थान मिळतेंच. पण त्याशिवाय इतिहास, उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण, विवाह, अर्थशास्त्र, स्त्रियांचा प्रश्न, खेळ, व्यायाम, सामने, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादि विषयांचाहि त्यांत समावेश होतो. सारांश साप्ताहिक अगर अर्धसाप्ताहिक वर्तमानपत्रांत त्यांच्या मगदुराप्रमाणें मोटार कलंडून घडलेल्या प्राणहानीच्या वर्तमानापासून तों थेट धर्म व नीति यांसारख्या विशाल व खोल विषयांपर्यंत सर्वांची विचारपूस होत असल्यामुळें या वर्तमान-पत्रांनीं मासिकांचेंहि क्षेत्र आक्रमीत आणिलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात् हे विषय फार असतात, ते तीनचार किंवा सात दिवसांच्या अवधींत सर्व वाचकांकडून सर्वच्या सर्व वाचले जात नाहींत व ते वाचले जावे अशी संपादकाची इच्छा असली तरी अपेक्षाहि नसते. व्यापारी आपल्या दुकानांत सगळे वाण ठेवतो; याचा हेतु एखादेंहि गिऱ्हाइक चुकूनसुद्धां आपल्या दुकानीं येऊन विन्मुख जाऊं नये एवढाच असतो. सध्याच्या तीव्र जीवनसंग्रामांत वर्तमानपत्रेंहि आपले ग्राहक टिकविण्याकरितां व नवीन ग्राहक मिळविण्याकरितां धापा टाकीत आहेत. एखाद्या पत्रानें नवी टूम काढली व ती लोकप्रिय झाल्यासारखी वाटली कीं, मागें पडण्याच्या भीतीनें इतर पत्रें ती टूम तावडतोब उचलून त्या पत्रांच्या रांगेंत उभीं रहातात. एकानें वर्गणी कमी केली कीं, बाकीच्यांना ती कमी करावी लागते व एकानें मुखवटा घालण्याचा प्रघात पाडला कीं, सर्व वर्तमानपत्रांतून मुखवटे अल्पावधींत झळकूं लागतात.

वर्तमानपत्रांचे अन्नदाते दोन—एक वर्गणीदार व दुसरा जाहिरात-दार. आंतील पानांत वर्गणीदारांकरितां मजकूर घालावयाचा व बाहेरील पानें जाहिरातींनीं सजवून काढावयाचीं असा वर्तमानपत्रांचा शिरस्ता. जाहिराती ठळक व सुंदर अक्षरांत व चित्रविचित्र कमानींत बसविल्या

असल्यानें वर्तमानपत्र हातीं पडतांच प्रथम वाचकाचें लक्ष त्यांजकडे जाऊन जाहिरातदारांनीं दिलेल्या पैशाचें चीज व्हावें हा जाहिराती मुखपृष्ठावर व शेवटच्या पानावर देण्यांत उद्देश असतोच. पण त्याशिवाय वर्तमानपत्राला शोभा येते ती निराळीच. सुबक करंडकांत घालून मूल्यवान जिन्नस मातबर मनुष्यास नजर करावा त्यांतलाच हा प्रकार आहे. बाहेरचीं पानें जाहिरातींनीं झांकावयाचीं या प्रघातास मधील तीसचाळीस वर्षांत इतका रेखीवपणा आला होता कीं, त्या पानावरील तीनचार इंचहि जागा जाहिरातीवांचून रहाते असें वर्तमानपत्रकर्त्यास वाटलें तर तो एक कमीपणाच समजला जाऊं लागला. अंगावरील कपड्याला पडलेल्या भोकशांतून जसें दारिद्र्यानें डोकें बाहेर काढण्याचें दुःख मनुष्यास व्हावें त्याप्रमाणेंच हाहि एक हीनपणाच मानण्यांत येई. कारण भरपूर जाहिराती हें पत्राच्या सुस्थितीचें साहजिकच चिन्ह मानण्यांत येत असल्यानें पत्रकार जाहिरातीची जागा तंतोतंत भरून काढण्यास झटत. या चालीचे पत्रकार इतके गुलाम बनले कीं, पैसे मिळालेल्या जाहिराती छापून कांहीं जागा रिकामी राहते असें आढळल्यास वरच्या किंवा स्नेह्याच्या फोकळ जाहिराती देण्यास ते तयार होत. अशा रीतीनें जाहिरातींची खोगीरभरती करण्यांत पत्रकर्त्यांचा एक हेतु हा साधे कीं, नवा मजकूर लिहिण्याचे श्रम व तो जोडण्याचा खर्च वांचावा. कारण जाहिरात एकदां जोडून ठेवली म्हणजे ती पुनः मोडावी न लागतां पाहिजे तेव्हां जशीच्या तशी घालण्यास तयार राहते. पण मजकूर मात्र दर खेपेला नवाच लिहावा व जोडावा लागतो. ही प्रथा साप्ताहिक व अर्धसाप्ताहिक पत्रांनीं अद्यापि बरीचशी राखली आहे. परंतु दैनिक पत्रांतून तिचें बहुतेक उच्चाटनच झालें आहे. पूर्वी जाहिरातींचीं पानें वेगळीं व मजकुराचीं वेगळीं असा पंक्तिप्रपंच शिष्टसंमत होता. तो पत्राची पृष्ठसंख्या चारापर्यंत होती तोंपर्यंत टिकला. परंतु चारावरून आठ, बारा, सोळा, येथपर्यंत

पृष्ठसंख्या गेल्यावर आपोआपच तो सुटला. जाहिरातदारांना आपल्या जाहिराती वाचल्या जावयास हव्या असतात व पत्रकारांना वाढता खर्च भागवून वर कांहीं फायदाहि मिळाल्यास पाहिजे असतो. बाहेरच्या जाहिरातीकडे वाचकांची जशी नजर जाते तशी आंतील जाहिरातीकडे जात नाहीं, पण मजकूर मात्र कोठेंहि छापला तरी वाचक दृष्टीखालून घातल्याशिवाय रहात नाहींत; हा मनुष्यस्वभाव ओळखून अलीकडे पत्रकर्त्यांनीं आंतील पानावर जाहिराती व मजकूर सरमिसळ छापण्यास सुरुवात केली आहे.

उलटपक्षीं दैनिक पत्रांनीं मात्र बराच निराळा शिरस्ता पाडला आहे. साप्ताहिक व अर्धसाप्ताहिक यांजपेक्षां दैनिक पत्रांची मदार ताज्या बातम्यांवर विशेष. जो ताजी बातमी अधिक देईल त्याची चलती जास्ती. वाचकहि दैनिक पत्रें बातम्यांकरितां घेतात, विषयप्रतिपादनाकरितां अगर ज्ञानप्राप्तीकरितां घेत नाहींत. म्हणून बातमी, ताजी बातमी, क्षोभकारक बातमी, वाचकाच्या डोळ्याजवळ धरण्याची पत्रकर्ता आपल्याकडून शिकस्त करतो. यासाठीं त्याला ती बाहेरच्या पानावर छापण्याशिवाय गत्यंतरच नसतें. बातम्यांचे मथळेहि तसेच भपकेदार असतात. ‘दरभंग्यांत घरें हादरलीं’, ‘घर कोसळून चार ठार’, ‘जमखंडी संस्थानांत दंगा’, ‘विवाहांत तरवार मिरवली’, ‘आजारानें कंटाळल्यामुळें आत्महत्या’ अशाप्रकारचे मोठमोठे मथळे व त्याखालीं एकएक लहान मोठी बातमी देण्याचा प्रघात दैनिक पत्रांनीं पाडला आहे. दैनिक पत्र हातांत घेतलें व उलगडलें कीं, जिकडे तिकडे मथळ्यांची गर्दी दृष्टीस पडते. कित्येक बातम्यांत मनुष्यांचे मुखवटे उठवून त्यांना सजीव व श्रेष्ठ बनविण्यांत येते. यापुढें जाहिराती अर्थातच फिक्या दिसतात. बातम्यांना दैनिकांनीं इतकें चढवून ठेवलें असलें तरी त्यांनाहि जाहिरातदारांची मर्जी संभाळल्यावांचून त्यांच्या तुणतुण्याची तार वाजत नाहीं. दैनिक पत्रें

बहुधा सिनेमाकंपन्यांची तळी उचलतात. याचें कारण असें कीं, त्यांचे रोजचे कार्यक्रम रोजच्यारोज लोकांना कळण्यास दैनिक पत्रेंच सोयींचीं. खेरीज त्यांना जाहिराती सचित्र व मोठ्या द्यावयाच्या असतात व त्याला ऐसपैस जागा दैनिकापाशींच मिळते. या मोठाल्या जाहिरातीपासून दैनिकांना प्राप्तीहि मोठी असल्यामुळें तो त्यांचा मुख्य खुराकच समजण्यास हरकत नाहीं.

मराठींतील दैनिक पत्रें वाचकांचीं मतें बनविणारीं किंवा ज्ञान देणारीं बहुधा समजलीं जात नाहींत. तीं फक्त खुपरखबर आणणारीं व मनुष्याला आजतागायत माहितगार ठेवणारीं होत. त्यांतील अग्रलेख व स्फुट सूचना या केवळ फुगवून लिहिलेल्या बातम्या होत. एका स्तंभांत त्यांचे कित्येकदां तीन तीन संपादकीय विषयहि असतात. त्यांत विषयाचा ऊहापोह व वाचकांची खात्री पटविण्याचा प्रयत्न नसतो. उद्योग, कला, इतिहास, काव्य-शास्त्र-विनोद यासारखीं सदरें येतात; पण तीं त्या त्या विषयाची माहिती सांगण्यापेक्षां त्यांतील मजकूर वाचला कसा जाईल या चिंतेनेंच भारावलेलीं असतात. म्हणून दैनिक पत्राचें थोडक्यांत वर्णन करावयाचें तर तोंड खवळवणारें व वाचकांना अतृप्त ठेवणारें पत्र असेंच करावें लागेल. ज्यांना गप्पाष्टकाची संवय आहे त्यांची तलफ दैनिकावर भागेल. पण ज्यांना कोणताहि विषय नव्या माहितीच्या बळावर समजून घ्यावयाचा असेल त्यानें साप्ताहिक अगर अर्धसाप्ताहिक पत्राकडेच वळलें पाहिजे.

महाराष्ट्रांत ‘ केसरी ’ व ‘ महाराष्ट्र ’ हीं दोनच प्रमुख साप्ताहिक पत्रें होतीं. पण अलीकडे तीं साप्ताहिकावरून अर्धसाप्ताहिकाच्या जवळच्या टप्प्यावर आल्यामुळें प्रमुख अशीं साप्ताहिकें पत्रें महाराष्ट्रांत सांप्रत उरलींच नाहींत. बहुधा प्रत्येक दैनिक पत्रानें आपलें साप्ताहिक भावंड आणिलें आहे. पण त्याला स्वतंत्र जीवित नाहीं.

दैनिकांतील बराचसा मजकूर निवडून घेऊन साप्ताहिकाच्या साच्यांत घातलेला असतो. ही निवड कोणतें उद्दिष्ट डोळ्यापुढें ठेवून केली जाते याचा अंदाज विषयांची पुढील जंत्री वाचून बांधतां येईल. एका साप्ताहिकाचा अंक पाहिला, त्यांत विषय आढळले ते असे—'कायदेभंगाच्या चळवळीनंतर', 'बुवाबाजीची दुसरी बाजू', 'विधवेची प्रशंसनीय कामगिरी', 'एकांकी नाटकाची प्रथा कां सुरू करूं नये', 'गेल्या सालचे चार प्रसिद्ध वैमानिक', 'पैसेवसुलीच्या वेळचे अनुभव', 'नाटकाचा कारखाना निघाला तर', 'साप्ताहिक भविष्य', 'व्यापारी घडामोडी', 'आत्मचरित्र.' या यादींतील बहुतेक विषय गप्पागोष्टी, थट्टामस्करी, चुटके–चटके, यांपैकीं असून त्यांत क्वचित् स्थळीं सामाजिक व राजकीय स्थितीचें अंग किंचित् उघडें करून दाखविलें आहे. असे विषय जुळवून अंकाच्या मुखपृष्ठावर सुंदर युवतीचें रंगेल चित्र मारून ठेवलें कीं, साप्ताहिकाचा थाटमाट पुरा झाला. इंग्रजींत दैनिक पत्रांनीं रविवारचा साप्ताहिक अंक काढण्याची जी टूम सुरू केली आहे तिचेंच हें अनुकरण असल्यामुळें पूर्वीच्या भारदस्त साप्ताहिकांचीं उणीव यांनीं भरून निघत नाहीं. सारांश दैनिकांनीं आठवड्यांपैकीं सहा दिवस अडवून उरलेला सातवा दिवसहि साप्ताहिकाच्या नांवाखालीं ताब्यांत घेतला आहे इतकेंच.

पुणें, मुंबई यासारख्या मध्यवर्ती शहरांत या जातीच्या पत्रांचा सुळसुळाट आहे. तेथें केवळ साप्ताहिक अशीं पत्रें आहेत, पण तीं फारच थोडीं आहेत व त्यांचाहि भर बोधापेक्षां मोदावर व विनोदावरच असतो. 'तिला सवत कां आली', 'बायकांशीं लघळपणा करणारे पुरुष' असलीं युवतिजनविषयक कौतुकावह कथानकें त्यांत असावयाचींच. या दैनिक पत्रांच्या रविवारीं निघणाऱ्या केवळ रंगावृत्त्याहि नव्हेत किंवा ही पूर्वपद्धतीचीं गंभीर व सन्मार्गदर्शक साप्ताहिकेंहि नव्हेत. त्या दोहोंमधील मार्ग काढून उभयविध वाचकांना प्रिय व स्वीकार्य होण्याचा त्यांचा प्रयत्न

असतो. एकाची टाळी तर दुसऱ्याची टवाळी एखाद्या अंकांत करावयास न सांपडल्यास त्याविषयीं संपादकाची रुखरुख दुसऱ्या अंकापर्यंत कायम राहील.

रंगेल व छाकट्या साप्ताहिकांचा आजार अद्यापि लहान शहरें व गांवें यांत फैलावलेला नाहीं. किंबहुना जिल्ह्याच्या व तालुक्याच्या शहरांतील वर्तमानपत्रें पूर्वीपेक्षां पुष्कळच सुधारलीं आहेत. याला कारण बऱ्याच अंशीं चढाओढ हेंहि असेल. चढाओढींत जगण्यासाठीं जशी सुधारणा करावी लागते त्याप्रमाणेंच पुरेसे वर्गणीदार न मिळाल्यानें उपाशी मरण्याचीहि पाळी येते हें विसरतां कामा नये. मात्र तूर्त सदर पत्रें अशा अवस्थेस पोंचलीं आहेत कीं, त्या अवस्थेंत त्यांच्यानें टिकाव धरवल्यास त्यांजकडून समाधान-कारक लोकसेवा झाल्यावांचून राहणार नाहीं. जिल्हा–पत्रांनीं आपलें कार्यक्षेत्र जिल्हा हेंच समजावें व त्यांतील विषय घेऊन त्यांचीच चर्चा निस्पृहपणानें व निर्भय वृत्तीनें करावी. या पद्धतीनें कार्यक्षेत्रांची वांटणी योग्य रीतीनें होऊन वाचकांना पाहिजे तोच मजकूर वर्तमानपत्रें पुरवतील. नाहींपेक्षां वाचकांची मागणी एका प्रकारची व त्यांजवर लादला जाणारा मजकूर निराळ्याच प्रकारचा अशी अनवस्था ओढवून ग्राहक जिल्हापत्रें वाचणार नाहींत व त्यांच्या अभावीं तीं मृत्युपंथास लागतील. महाराष्ट्रांत जीं नांवाजण्याजोगीं जिल्हापत्रें आहेत त्यांपैकीं 'कुलाबा समाचार' हें एक पत्र होय. त्यांतील सगळाच्या सगळा मजकूर बहुधा कुलाबा जिल्ह्या-संबंधाचाच असतो. बातमीपत्रें त्याच जिल्ह्यांतील; सभावृत्तान्त त्याच जिल्ह्याचा व अग्रलेखहि त्या जिल्ह्याच्या राज्यकारभारावरचे. जिल्हा-पत्रांना स्थानिक अधिकाऱ्यांच्या भयानें त्यांजवर सत्य टीका करणें जड जातें. असें असतांहि 'कुलाबा समाचारां'त जिल्हाधिकाऱ्यांची भीड न धरतां सडेतोड लेख लिहिले जातात. त्याचा ता. १७ माहे जून सन १९३९ चा अंक आम्ही सहज पहावयास घेतला; त्यांत कांहीं विषय पुढील-

प्रमाणें आढळले. 'फितुरीला यश आलें नाहीं, स्वातंत्र्यवीर हुतात्मा वासुदेव बळवंत फडके, रायगडची राष्ट्रीय यात्रा, जंगलच्या तक्रारी, जंगल सल्लागार कमिटीची दुसरी सभा, आमदार फडके यांची नऊ गांवांच्या सभेस भेट, डि. लो. बोर्डाच्या नव्या सभासदांची पहिली सभा, उरणची खबर बात.' 'कुलाबा समाचार' हें पत्र अलीकडे कुलाबा व ठाणें या दोन जिल्ह्यांतील राष्ट्रीय पक्षाचें मुखपत्र झालें असल्यामुळें त्यांत दोन्ही जिल्ह्यांचा मजकूर येऊं लागला आहे. त्या दृष्टीनें वरील सर्व विषय त्या जिल्ह्यांना अनुलक्षूनच आहेत. 'फितुरीला यश आलें नाहीं' हा लेख कुलाबा जिल्ह्यांतील राजकीय वादाचा आहे आणि कै. फडके यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यांत झाला असल्यामुळें त्याजवर अग्रलेख आला आहे. हे सर्व विषय कुलाबा व ठाणें जिल्ह्यांचे आहेत व त्यांचा परिणाम त्या जिल्ह्यांतील जनतेच्या जीवितावर प्रत्यक्ष होणारा आहे. सदर जिल्ह्यांत राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व ऐतिहासिक इत्यादि जेवढ्या म्हणून हालचाली एका आठवड्यांत आगें मागें झाल्या व व्हावयाच्या त्यांचें पूर्ण प्रतिबिंब वरील अंकांत उतरलें आहे. जिल्ह्यांतील कारभाराच्या दृष्टीनें जिल्ह्यांतील लोकांस शिक्षित करण्यास असलीं पत्रें फार उपयुक्त होत. असल्या पत्राचा कित्ता इतर जिल्हापत्रांनीं आपल्या समोर ठेवल्यास त्यांना खरी देशसेवा केल्याचें समाधान निःसंशय लाभेल.

पण मुख्य अडचण ही कीं, जिल्ह्यापत्रांच्या वांट्याला योग्य संपादकच येत नाहीं. योग्य संपादकाची कसोटी अशी—'१ तो चांगला शिक्षित असावा. २ त्यानें आपलें सारें लक्ष आणि वेळ पत्राला द्यावा. ३ त्याला राजकारणाची व सार्वजनिक कार्याची हौस असावी. ४ तो आपली जबाबदारी ओळखणारा असावा. ५ वर्तमानपत्रावर प्राप्ति कमी झाली तरी त्यानें आपलें कर्तव्य पवित्र समजून तें संतोषानें करावें.' हा गुणसमुच्चय जिल्हापत्राच्या संपादकापाशीं सहसा नसतो. तो वकील अस-

त्यास फावल्या वेळांत कसेंबसें आपलें पत्र भरून काढतो. शिक्षण पुरेसें नसल्यास त्याचें वजन स्थानिक अधिकाऱ्यांवर पडत नाहीं. जाहिरातीकरितां लांगूलचालन करावें लागल्यास निस्पृहपणांत तो कमी पडतो व सार्वजनिक कार्यांची आवड नसल्यास त्याच्या पत्रांत सर्व सार्वजनिक विषयांचा योग्य प्रमाणांत परामर्ष घेतला जात नाहीं. पण हे सर्व गुण 'आखूड शिंगी व बहुदुधी' गायीच्या वर्णनाप्रमाणेंच दुर्मिळ असल्यानें ज्यांस वजनदार म्हणतां येईल अशीं पत्रें जिल्ह्यांतून अद्यापि थोडींच आहेत. तथापि सुशिक्षितांची संख्या वाढत आहे, जिल्हा शहरांतूनहि सार्वजनिक हालचाली व कार्यें अधिक प्रमाणांत होऊं लागलीं आहेत व प्रांतिक स्वायत्ततेंत प्रांतिक व प्रभावी राजकारणाचा वांटा प्रत्येक जिल्ह्याकडे आला आहे, हें लक्षांत ठेवल्यास जिल्हा-पत्रांनाहि आतांपर्यंत न आलेली वजनदारी येत जाईल अशी आशा बाळगण्यास जागा आहे.

लहान शहरांतील वर्तमानपत्रकर्त्यांच्या ठिकाणीं पाश्चिमात्य देशांतील लोकांच्या दृष्टीनें कित्येक गुण आवश्यक मानले जातात. त्यांची आवश्यकता इकडील पत्रांनाहि कांहींशी पटेल. "लहान शहरचा वर्तमान-पत्रकार हाच पुढारी. त्याचें वजन त्या शहरीं साहजिक बरेंच पडतें. तो बहुगुणी असावा. त्याला तारतम्य, धंद्याची माहिती, मनमिळाऊ स्वभाव हे गुण पाहिजेत. भोंवतालीं घडणाऱ्या गोष्टींकडे त्यानें काळजी-पूर्वक लक्ष द्यावें. पत्राचा खर्च अगदीं बेतशीर ठेवावा. प्रसंग पडल्यास एका हातानें ठसे जोडणें व दुसऱ्या हातानें मजकूर लिहिणें येथपर्यंत त्याची तयारी असावी. उत्साह, चिकाटी व हिकमतीपणा ही पत्रकर्त्यांच्या यशाची गुरुकिल्ली होय. त्यानें पहिल्या पानावर जाहिराती घालूं नयेत; मजकूर घालावा व निरनिराळ्या प्रकारचे ठसे वापरून तें पान चित्ता-कर्षक करावें; त्यांत गोष्टीच्या धर्तीवर रचलेल्या सुदीर्घ वार्ता छापाव्या;

खेड्यांपाड्यांतून बातमीदार ठेवावे पण त्यांना पगार देऊं नये. त्या ऐवजीं थोडी लालूच दाखवून त्यांना खूष राखावें. आपण परभारें वर्गणी भरून बातमीदाराच्या नांवावर त्याच्या आवडीचें एखादें मासिक सुरू करावें. त्या योगानें खर्च कमी येऊन पत्रकर्त्याचें कार्य साधतें. बातमीदार कारणपरत्वें वृत्तपत्राच्या गांवीं येतो, त्या वेळीं त्यास उपहाराला बोलावून संतोषवावें. विनोद उत्पन्न करणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवून त्या पत्रांत नटवून घालाव्या. समाजास अनुलक्षून असणाऱ्या चूषी (Features) मधून मधून छापाव्या. शेतकरी वर्गास उपयुक्त अशा सत्यकथा द्याव्या. सगळ्या वर्गांना खूष राखावें. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांजपासून जाहिराती मिळविण्याचा प्रयत्न करावा. कारण त्या फार फायदेशीर असतात. जाहिराती मिळाल्या म्हणजे त्यांजवर पत्राचा खर्च बराच भागतो. भलत्याच जाहिराती छापूं नयेत. त्या छापल्यानें पत्राचें नांव बद्दू होतें; शिवाय अधिक उपयुक्त मजकुराची जागा वांया जाते. पत्राच्या प्रकाशकास पत्राची सांपत्तिक स्थिति नेहमीं माहीत असावी. संपादक प्रकाशकांहून वेगळा असल्यास त्यानें फक्त मजकुरावर लक्ष ठेवावें. कारण पत्राचें वजन मजकुरावर अवलंबून असतें. संपादकानें नीतिमत्ता, लोकहिततत्परता, इभ्रत व धैर्य यांची कांस धरली तरच तो लोकप्रिय होतो. आपल्या जिल्ह्यांतील सामाजिक गरजांची चर्चा जिल्हापत्रानें करावी. आपल्या शहराचें रेल्वे स्टेशन अधिक सुंदर केलें पाहिजे काय? आपल्या गांवाला आणखी दवाखाने पाहिजेत काय? असले प्रश्न त्यानें हातीं घ्यावे. कांहीं तरी खूळ (Boom) माजवावें. संपादक कोणत्या ना कोणत्या निमित्तानें नेहमीं लोकांच्या डोळ्यापुढें रहावा. त्याच्या लिहिण्यानें चिडून कांहीं त्याचे शत्रू बनतील, कांहीं बदमाष त्याला मारावयासहि टपतील; पण बहुजनसमाजास तो प्रिय होऊन समाज त्यास हजारों मार्गांनीं मदतच करील."

वरील ध्येय स्वतंत्र अशा पाश्चिमात्य देशांतील वर्तमानपत्रांकरितां सांगण्यात येतें. परंतु आपला देश परतंत्र असल्यामुळें इकडील वर्तमानपत्रांचीं कर्तव्यें तिकडील वर्तमानपत्रांहून कांहींशीं भिन्न आहेत. देशाचें स्वातंत्र्य हेंच आमच्या वर्तमानपत्रांचें साध्य असून त्याच्या संपादनास अनुकूल जीं जीं साधनें त्या सर्वांचा पुरस्कार वर्तमानपत्रांनीं केला पाहिजे. हें करीत असतां त्यांना सर्व पक्षांच्या लोकांना नेहमींच खूष ठेवतां येणार नाहीं. जो पक्ष देशहितविघातक प्रयत्न करीत असेल त्याचा खरपूस समाचार घेणें हें कर्तव्य ठरून त्या पायीं त्यास विशिष्ट पक्षाचा व व्यक्तीचा रोषहि संपादावा लागेल. अर्थात् हा मार्ग स्वार्थत्यागाचा व कष्टाचा आहे. त्यापासून कांहीं पत्रें परावृत्त होऊन वर वर्णिलेल्या पाश्चिमात्य धर्तीवर सर्वांस प्रिय होण्यासाठीं धडपडत आहेत. यांत त्यांचा थोडासा स्वार्थ साधत असला तरी सार्वजनिक कार्यांत त्यामुळें पत्रांचें वजन जात आहे हें त्यांनीं विसरतां कामा नये.

वर्तमानपत्रांत मजकूर व जाहिराती यांची मांडणी यांना महत्त्व फार आहे. पाश्चिमात्य वर्तमानपत्रें त्यास विशेष जपतात. मांडणी करतांना कला व उपयुक्तता या दोहोंवर नजर द्यावी लागते. बातम्यांची उपयुक्तता व महत्त्व समजून त्यांना कोणतें व किती स्थान द्यावयाचें हें ती व्यवस्था पाहणारा ठरवितो. पाश्चिमात्य देशांतील वर्तमानपत्रांत पुराणवादी व क्षोभवादी असे दोन वर्ग पडले असून ती धर्ती इकडेहि येत चालली आहे. पुराणवादी पत्रांची मांडणी रोजच्या रोज बहुधा सारखीच असते. पण क्षोभवादी पत्रें ती जरुरीप्रमाणें प्रत्यहीं बदलतात. पहिल्या पानावर तिकडील पत्रें बहुतकरून व्यंग्यचित्रें घालतात. एखादें दुसरें इतर चित्र ( Illustration ) हि असतें. क्षोभवादी पत्रें भडक मथळे ( Flaming headings ) फडकवितात. ते सुसंस्कृत व संभावित लोकांना अवास्तव वाटतात. मात्र कमी सुसंस्कृत व अल्पशिक्षित

वाचक त्यांनीं भुलून जातात. मोठाले मथळे देण्याचें कारण असें कीं, मोठमोठ्या शहरांतील लोकांना सगळें पत्र वाचण्यास फुरसत नसल्यामुळें ते आगगाडीमध्यें किंवा ट्राममध्यें बसल्या बसल्या त्या मथळ्यांतील मजकूर प्रथम वाचतात, इतर मजकूर जरा बारीक नजरेनें पाहतात व पत्र टाकून देतात. मथळा पाहिला कीं, त्याच्या खालचा मजकूर वाचनीय आहे किंवा नाहीं हें ग्राहक ठरवितो. पुराणप्रिय पत्रांत असले भडक मथळे नसतात. पण त्यांचा वाचकवर्ग ज्या प्रकारचा असतो त्याला त्याची गरज नसते. ते मथळ्याला न भुलतां पत्र बारकाईनें वाचतात तेव्हांच त्यांचें समाधान होतें. तें पत्र नुसतें चाळून फेंकून देत नाहींत.

मथळे देण्यांतहि तऱ्हा आहेत. कांहीं मथळे दोन तीन शब्दाचे असतात, पण त्याहून अधिक शब्दांचेहि पुष्कळदां आढळतात. 'राजीनामा कीं बडतर्फी' हा मथळा तीन शब्दांचा झाला. अग्रलेखाला असे छोटे मथळेच शोभतात. कांहीं मथळे ओळींचे असतात. म्हणजे त्यांनीं वर्तमानपत्राची सबंध ओळ व्यापून जाते. 'शिमगा गेला पण कवित्व राहिलें' हा मथळा जवळ जवळ एका ओळीचा असून वाक्यरूप आहे. एका ओळींचे मथळे अग्रलेखापेक्षां इतर मजकुरांना अधिक योग्य होत. मजकूर तीन किंवा चार स्तंभी किंवा त्यांहूनहि मोठा असेल तेव्हां त्या सर्व मजकुराला व्यापून टाकणारा पहिला प्रमुख मथळा देतात व त्याच्याखालीं छोटे छोटे आणखी एकदोन मथळे घालून मजकूर सुशोभित व मनोवेधक करतात. सगळ्या मजकुराचें मर्म मथळ्यांत यावें अशी त्याची योजना असावी. मजकूर एका स्तंभापेक्षां अधिक लांब असतो तेव्हां त्यास मुख्य मथळ्याशिवाय पोटमथळेहि देतात. एका स्तंभांत ते दोन अगर तीन बसावे अशी योजना असते. हे मथळे छोटे पण चमत्कृतिजनक, ठसकेदार व जोरदार असावे. ते वाक्यरूपाचे नसावे. मथळ्यानें कांहींतरी सूचित झालें पाहिजे, म्हणजे वाचक मजकूर वाचावयास प्रवृत्त होतो.

बहुधा प्रत्येक मराठी दैनिक पत्राचा साप्ताहिक अंक निघतो, हें वर आलेंच आहे. त्यांत दैनिक पत्रांतील लेख निवडून त्यांचा संग्रह करण्यांत येतो. अग्रलेख व कांहीं स्फुट सूचना सबंध आठवड्यांत जे विषय महत्त्वाचे वाटतात त्यांजवर लिहिलेल्या असतात. ही जुनी पद्धत. दैनिक पत्रास कायम वर्गणीदार कमी, त्याचा खप गुमास्त्यामार्फत (एजंट) काय होईल तोच मुख्य. हे गुमास्ते आतां लहान पण नाक्याच्या गांवीं किंवा ७।८ हजार वस्तीच्या गांवाहून अधिक मोठ्या गांवीं आढळतात. पण त्या एकंदर व्यवस्थेस खर्च इतका मोठा येतो कीं, तो जाऊन पत्रकर्त्यास कूस थोडी उरते. त्या मानानें खेड्यापाड्यांचें क्षेत्र फारच विस्तृत. तेथील लोकांचें ताज्या बातमीवांचून तितकेसें अडत नाहीं. त्यांना वाचावयास बातमी मिळाली म्हणजे झालें, मग दोनतीन दिवस आगेंमागें मिळाली तरी फिकीर नाहीं. भरपूर बातम्या व संपादकीय मजकूर रोजच्या पत्रांतून निवडून काढून वाचकास पुरविण्यास पत्रकर्त्याला खर्चेहि विशेष येत नसल्यानें आठवड्याचें पत्र वाचकास अगदीं स्वल्प किंमतींत पडून वर्गणीदारांचा वर्ग दैनिकापेक्षां साप्ताहिकास बराच मोठा लाभतो. दैनिक पत्राला द्रव्यप्राप्तीचें मोठें साधन असेल तर साप्ताहिक पत्रच होय.

मराठी दैनिकांच्या साप्ताहिक आवृत्तीचा जन्म अशा रीतीनें झाला आहे. अर्थात् ही आवृत्ति प्रथम बाळबोध वळणाची असे. तिच्यांत रंग-ढंग, झोकनोक, नखरा-नटणें नसे. पण अलीकडे या बाबतींत पाश्चिमात्यांचें वळण गिरविण्यांत येऊं लागल्यामुळें असल्या साप्ताहिक पत्रांचें बाह्यांग व अंतरंग यांत फारच सुधारणा झाली आहे. वर म्हटल्याप्रमाणें पत्राच्या मुखपृष्ठावर एखादें सुंदर चित्र, आंत लहानशी गोष्ट, चुटके, चिमटे, विनोद इत्यादि मालमसाल्याकडे नजर देऊन तो अंक मनोहर बनविण्यांत येतो. हे साप्ताहिक अंक बहुधा रविवारीं निघतात. त्यांची

सर्व आठवडाभर थोडथोडी रंगरंगोटी सुरू ठेवावी लागत असल्यानें त्याजकरितां स्वतंत्र संपादक नेमावा लागतो.

इंग्रजी पत्रांत 'टाइम्स ऑफ इंडिया', 'बॉंबे क्रॉनिकल' आदिकरून दैनिक पत्रें आपला रविवारचा अंक काढतात. इंग्लंड व अमेरिका या देशांतील वर्तमानपत्रांनीं या बाबतींत सुधारणेचें शिखर गांठलें आहे. सदर अंकांत नव्या, ताज्या, हंगामशीर व चमत्कारिक कथा येतात. त्यांचे विषय मजेदार, भाषाशैली चटकदार व सर्व अंकांत चित्रैंहि भरपूर असतात. विषय विविध व विषयानुरूप भाषाशैलीहि वैचित्र्यपूर्ण असते. सगळे विषय मनोरंजक नसतात. कांहीं विषय भारदस्त व माहितीनें भरलेले असतात. विषयांची निवड अशी करण्यांत येते कीं, ते विशिष्ट ऋतुमानास लागू पडावें. बहुतेक पत्रांत चूषकथा (Feature Story) ठेवलेली. (The story depends upon its timeliness and seasonability.) ऋतु वसंत असला तर त्याला साजेशी गोष्ट असावयाची व ती अगदीं वक्तशीर यावयाची. तिच्यांत मनुष्याच्या सुखदुःखादि भावनांना प्राधान्य असतें (human interest stories) म्हणून वाचकांना त्या आवडतात. हें भारदस्त पत्रांचें झालें. पण छचोर किंवा क्षोभकारक पत्रांचीं (Yellow Journalism) त्याजवरहि कडी. त्यांतील गोष्टी भावनावर विशेष जोर देतात. गोष्टींच्या विश्लेषणानें वाचकांच्या नेत्रांत अश्रुबिंदूच उभे राहिले पाहिजेत. (Yellow Journalism delights in the delineation of an emotion that brings tears and heart-throbs by striking a common chord.)

रविवारचे अंक गंभीर असोत कीं छचोर असोत, त्या बाबतींत पाश्चिमात्य वृत्तपत्रांची बरोबरी मराठी वृत्तपत्रांकडून होण्यास बराच अवधि आहे. हिंदुस्थानांतील 'टाइम्स ऑफ इंडिया'चा रविवारचा अंक घेतला तरी तो मराठी सचित्र साप्ताहिक अंकापेक्षां किती तरी चित्ताकर्षक वाटतो.

त्यांतील चित्रें सुंदर व अगदीं हुबेहुब असतात. बहुधा एकहि लेख चित्रावांचून नसतो. सैन्य व आरमार, प्रसिद्ध व्यक्ति व पुढारी यांचीं चरित्रें व चित्रें, खेळांचे सामने, स्त्रियांना उपयुक्त असे विषय, तुफान व भूकंप यांनीं उडविलेला हाहाःकार, शिकार व तिचा देखावा, हिंदी राजपुत्राचा विवाहसमारंभ, युद्ध-प्रसंग इत्यादिकांनीं साप्ताहिक 'टाइम्स' अत्यंत मनोवेधक बनलेला असतो. तो इतका कीं, 'टाइम्स'चा सुंदर अंक वाचला व पाहिला म्हणजे शहरापासून दूर गांवीं राहणारांना सिनेमा, नाटक, परदेशाचा प्रवास व थोर व्यक्तींचा सहवास यांचीं सुखें घरबसल्या चारसहा आण्यांत लाभतात. खरें हा अंकहि पाहून टाकून देण्यासारखा नसून वाचून जतन करण्याच्या योग्यतेचा ठरतो. इतक्या योग्यतेस मराठी पत्रें चढण्यास किती तरी साधनसामग्रीची तशीच वाचकांच्या संपन्नतेची आवश्यकता आहे.

---

# प्रकरण दुसरें

## पाश्चिमात्य वृत्तपत्रांचा प्रारंभ व विकास

मुद्रणकला व शीघ्र साहित्य यांचा अन्योन्य संबंध आई व मुलें यासारखा आहे. या दोन्हींचा प्रसार हिंदुस्थानांत आतां इतका झाला आहे कीं, छापखाना व वर्तमानपत्र यांची घोषणा ज्याच्या कानावरून गेली नाहीं असा मनुष्य विरळा. जगांतील अनेक सुधारणांप्रमाणें याहि सुधारणेचा उगम आशिया खंडांतच सांपडतो. एखादी सुधारणा प्रथम आशिया खंडांत निघावी पण युरोप खंडानें आपल्या उद्योगशीलतेनें व कल्पकपणानें तिला उत्कर्षास चढविल्यावर तिचा प्रवेश वाजत गाजत फिरून आशियांत व्हावा असा ईश्वरी संकेत दिसतो. या दृष्टीनें आशिया खंड हें सुधारणेचें माहेर व युरोप खंड सासर ठरत असून सासरीं लेकुरवाळी झालेली मुलगी बरोबर मुलेंबाळें घेऊन माहेरीं यावी अशा प्रकारचा अनुभव छापखाने व वृत्तपत्रें या बाबतींतहि येत आहे.

फार प्राचीन काळीं मुद्रणकलेचा शोध कागदाप्रमाणेंच चीन देशांत लागून पहिलें पुस्तक ता. ११ मे सन ८६८ रोजीं तेथें छापण्यात आलें असें म्हणतात. मात्र त्यावरून चीनमध्यें हल्लीइतके जय्यत छापखाने होते व त्यांतून वृत्तपत्राच्या दरताशीं सात आठ हजार प्रती बाहेर पडत होत्या अशी कल्पना करणें चुकीची होय. याचा अर्थ इतकाच कीं, एखाद्या मजकुराची पुनः नक्कल लिहीत न बसतां सदर मजकूर इतर उपायांनीं कागदावर उठविण्याची युक्ति चिनी लोकांना अवगत होती.

च्चिनात ही ज्ञानगंगा उगम पावल्यावर तिचा पुढचा ओघ युरोपांत पंधराव्या शतकांत प्रकटलेला पहावयास सांपडतो. इसवी सन १४४० मध्यें जॉन गाटेनबर्ग यानें जर्मनींत मेंझ येथें आपला छोटा छापखाना सुरू केला. म्हणजे मुद्रणकलेच्या बाबतींत जर्मनी हा देश युरोप खंडाच्या गुरुस्थानीं होय. इंग्रज लोक स्वतः कल्पनाप्रवर्तक नसले तरी एखादी उपयुक्त कल्पना कोठें आढळल्यास ती आपलीशी करून तिजकडून आपलें कार्य साधून घेण्याची व्यवहारकुशलता इंग्रजांच्या अंगीं आहे. तिला अनुसरून विल्यम कॅक्स्टन जर्मनींतून ही कला शिकून इंग्लंडांत आला व त्यानें सन १४७६ त तेथें छापखाना काढला. अर्थात् या छापखान्याचें महत्त्व कौतुक करण्यापलीकडे नव्हतें. हा किंवा त्यानंतरचे सर्व छापखाने हातांनीं चालवावयाचे लांकडी छापखाने होते. त्यांत कालेंकरून सुधारणा होऊन शिळेचे छापखाने निघाले व तेच एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत युरोपांत वापरण्यांत होते. सन १८०० मध्यें स्टॅनहोप यानें लोखंडी छापखाना तयार केला व तेव्हांपासून वाङ्मयप्रसारास खरा जोर चढला. वाफेच्या शक्तीनें चालणारा छापखाना १८११ सालीं इंग्लंडांत तयार होऊन १८१४मध्यें जगप्रसिद्ध 'लंडन टाइम्स' पत्र वाफेच्या यंत्रावर निघूं लागलें. तें यंत्र 'टाइम्स'च्या प्रती दर ताशीं ११०० देत असे. मुद्रणकलेंतील हा टप्पा अगदीं शेवटचा न म्हटला तरी बराच पुढचा समजण्यास हरकत नाहीं.

मुद्रणकला ही वाङ्मयप्रसाराच्या जन्मस्थानीं असल्यामुळें तिच्या बाल्यावस्थेंत वाङ्मयप्रसारहि अगदींच तुटपुंजा असावा हें स्वाभाविक होय. म्हणूनच विल्यम कॅक्स्टन यानें १४७६ त इंग्लंडांत छापखान्यास सुरुवात केली असतांहि वर्तमानपत्रें व पुस्तकें छापलेलीं बहुजनसमाजाच्या हातीं हर्वीं तितकीं पडण्यास तीनशें-साडेतीनशें वर्षांचा काळ सहज लागला. खुद्द जर्मनींतहि पहिलें वर्तमानपत्र इ. सन

१६०९ त प्रसिद्ध झालें. त्याचें नांव 'अविसा रिलेशन ओडर झेटंग' (Avisa Relation oder Zeitung). जर्मनीनंतर बारा वर्षांनीं म्हणजे सन १६२१ सालीं इंग्लंडांत पहिलें वर्तमानपत्र निघालें. हें पत्र निघालें खरें, पण त्याला नांवच नव्हतें. कारण वर्तमानपत्राला नांव पाहिजे अशी जरुरी वाटण्यास आणखी चार वर्षें लागलीं. त्याचें मागून ठेवलेलें नांव 'मर्क्यूरियस ब्रिटानिकस'. प्रारंभीं वृत्तपत्रें आठवड्यातून एकदांच प्रसिद्ध होत, पण लवकरच साप्ताहिक पत्रापेक्षां त्वरित बातम्या देणाऱ्या साधनाची आवश्यकता वाटल्यावरून 'दि लंडन गॅझेट' या अर्धसाप्ताहिकाचा जन्म १६६५मध्यें झाला. आतांपर्यंतचीं सारीं पत्रें बहुधा धाडसी पण अप्रसिद्ध व्यक्तींनीं चालविलीं होतीं. कलमबहाद्दर लेखक व त्यांचीं पत्रें अजून क्षितिजावर दिसूं लागलीं नव्हतीं. त्याला आरंभ अठराव्या शतकाच्या सुरुवातीपासून झाला. त्या वेळीं इंग्लंडवर ॲन राणी राज्य करीत होती. तिची कारकीर्द वाङ्मयात निबंधकारांची होती. या कारकिर्दीत जे निबंधकार उदयास आले त्यांचीं नांवें इंग्रजी वाङ्मयांत आतांपर्यंत अमर राहिलीं आहेत. हे निबंधकार राजकारणी असल्यामुळें नुसते ग्रंथ लिहून त्यांचें समाधान होऊं शकलें नाहीं. राजकारणी पुरुषाला समाजांत खळबळ उडविण्यास वर्तमानपत्र हेंच उत्कृष्ट साधन होय. म्हणून तेव्हांच्या बहुतेक निबंधकारांनीं स्वतःचीं वर्तमानपत्रें काढलीं किंवा इतरांच्या वर्तमानपत्रांतून लेख प्रसिद्ध करून आपल्या विचारांचा अंमल समाजावर चालविला. जोनाथन स्विफ्ट हा अशाच निबंधकारांपैकीं नामांकित निबंधकार होय. त्याचा जन्म सन १६६७ त आयर्लंडमध्यें डब्लिन येथें झाला. तो १६८६ सालीं मोठ्या मुष्किलीनें बी. ए. ची परीक्षा उतरला. राजकारणाच्या ओढ्यानें तो टोरी पक्षाचे पुढारी हार्ले व सेंट जॉन यांस १७१० त मिळाला. तो बहुधा डब्लिनमध्येंच रहात असे. त्यानें आपल्या 'एक्झॉमिनर' पत्रांतून लेखणी चालवून व्हिग पक्षावर हल्ले चढविले. लेखांना हवा तसा

आकार देण्यांत तो पटाईत होता. त्याच्या लिहिण्यात पांडित्य नसून सर्वांना समजण्याजोगी सुबोध भाषा प्रकटविण्यांत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. प्रसन्नता, उपरोध व वक्रोक्ति हे त्याचे मुख्य गुण. या गुणांनीं शोभणाऱ्या आपल्या लेखणीची नजर त्यानें राजकारण, तत्वज्ञान, समाजरीती व सामाजिक सुखदुःखें यांवर चालविली. 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' हा त्याच्या उपरोधिक लेखनशैलीचा उत्कृष्ट नमुनाच समजला जातो. हें पुस्तक त्यांतील विलक्षण कथांसाठीं आजहि वाचण्यांत येतें. त्यांत ठेंगू लोकांच्या व राक्षसांच्या देशांचें वर्णन असून घोड्यासारखे प्राणीहि बोलतात व बुद्धिवाद करतात असें दाखविलें आहे. हें वर्णन इतक्या साधेपणानें व तपशीलवार केलें आहे कीं, वाचणारांना तें खरें वाटतें. पहिल्या जॉर्जच्या कारकीर्दीतील युरोपचें राजकारण, मनुष्याचें दुराचरण, व तत्त्वज्ञांचा मूर्खपणा यांवर स्विफ्टनें 'गलिव्हरचा प्रवास' या पुस्तकामार्फत उपहासपद्धतीनें जालीम कोरडे ओढले आहेत.

जोनाथन स्विफ्टच्या मागून रिचर्ड स्टील हा पांच वर्षांनीं जन्मास आला. त्यानें 'टॅटलर' पत्र सुरू केलें व त्यांत लेख लिहून तो प्रसिद्धी पावला. टॅटलरशिवाय 'स्पेक्टेटर' पत्रहि त्यानें काढलें. त्याशिवाय गार्डियन, इंग्लिश-मन, लव्हर इत्यादि नियतकालिकांतहि त्याचे लेख येत. त्याच्या निबंधांतील विनोद हा प्रधान गुण. स्टीलचा विनोद ॲडिसनसारखा आहे. ॲडिसन व स्टील या दोघांचें वय सारखें, लेखनशैली सारखी व लिहिण्याचें स्थानहि एकच. ॲडिसननें आपल्या निबंधांना 'स्पेक्टेटर' मधूनच सुरुवात केली. स्टील व स्विफ्ट या उभयतांच्या गुणांचा मिलाफ ॲडिसनमध्यें दिसून येतो. त्याचीं राजकीय मतें व्हिग पक्षाची होती. तो आपल्या निबंधांनीं वाचकांत कुत्सित हास्य उत्पन्न करी. धर्म, नाटकगृह, पति-पत्नी, मित्रवर्ग यांपैकीं कोणताहि विषय त्यानें आपल्या नजरेंतून सुटूं दिला नाहीं. त्यानें हलक्या हातानें पण कडक रीतीनें सामाजिक रीतरिवाजावर शिस्त धरावी,

व जें लिहावयाचें तें माहिती मिळवून लिहावें पण त्यांत पांडित्य असूं नये. पुस्तकें कोणतीं व कशीं वाचावीं यावरहि त्याचा उपदेश आहे; पण तो डोळ्यात खुपणारा नाहीं. जोसेफ ॲडिसन यानें आपल्या नवीन धर्तीवरील निबंधांनीं इंग्रजी वाङ्मयाला निराळें वळण लावलें यांत शंका नाहीं.

स्विफ्ट, स्टील, ॲडिसन हे सर्व निबंधकार असून त्याचीं पत्रें विनोदी, उपरोधिक, खुसखुशीत व झणझणीत लेखांनींच योग्यतेस चढलीं. वर्तमानपत्राचा आत्मा जें वर्तमान त्यास त्यांच्या पत्रांतून थारा नव्हता म्हटलें तरी चालेल. या काळांतील बडें धेंड डॉ. जॉन्सन. तो जाडा विद्वान ग्रंथकार समजला जात असतांहि वृत्तपत्र काढण्याचा मोह न आवरून त्यानें 'रॅम्ब्लर' नामक पत्रास सन १७५० त सुरुवात केली. यापासून लेखक वर्गाला जगांत नांवलौकिक मिळविण्याचें साधन वृत्तपत्र होय हें इंगित त्या काळांतहि कसें पटलें होतें हें लक्षांत येतें.

डॉ. जॉन्सनपर्यंत जे वृत्तपत्रकार होऊन गेले त्यांची सारी भिस्त निबंधलेखनावर असून ते आपल्या निबंधांतून सामाजिक व राजकीय विषयांचाच ऊहापोह करीत असत. निवळ राजकारणावर त्यांचा भर नव्हता. पण अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत ही स्थिति पालटून जाऊन नवीन धर्तीवर सन १७६९त विल्यम वुडफॉल यानें 'मॉर्निंग क्रॉनिकल' पत्र काढलें.सदर पत्र दैनिक झाल्यावर त्याचा खप १८१९ सालीं चार हजारांपर्यंत वाढला. 'मॉर्निंग क्रॉनिकल' पत्रास सुरू होऊन सोळा वर्षें झालीं नाहींत तोंच ता. १ जानेवारी १७८५ पासून 'लंडन टाइम्स'चा मेघनाद जनतेच्या कानावर आदळूं लागला. त्याचें पहिलें नांव 'डेली युनिव्हर्सल राजिस्टर !' हें बदलून बरोबर तीन वर्षांनीं त्याला सध्यांचें नामाभिधान प्राप्त झालें. 'लंडन टाइम्स'चा पहिला संपादक जॉन वॉल्टर.

अमेरिका ही इंग्लंडची कन्या. इंग्लंडांत जी टूम निघेल तिची नक्कल अमेरिकेनें वठवावयाचीच. अमेरिकेंत पाहिलें पत्र ता. ४ एप्रिल

१७०४ रोजीं अवतरलें. त्याचें नांव 'बोस्टन न्यूज.' तेव्हां शिळा छाप-खान्यापर्यंतहि मजल गेली नसल्यामुळें तें एका लांकडी यंत्रातून छापून निघालें. त्याचा संपादक बोस्टनचा मुळीं पोस्टमास्तरच होता. त्यांत युरोप खंडांतील थोड्याशा बातम्या येत व लंडनमधील पत्रांचा उतारा छापला जात असे. जाहिराती हा वृत्तपत्राचा पौष्टिक खुराक असून तो 'बोस्टन न्यूज' पत्रास मिळूं लागला होता. तेथील एका किताबखान्याचा मालक कँबेल त्यास आपल्या पुस्तकांची जाहिरात देत असे. 'बोस्टन न्यूज' या पत्रा-मागून दुसरें एखादें पत्र काढण्याची हांव अमेरिकेंत सुमारें पंधरा वर्षांपर्यंत कोणाहि धाडसी मनुष्यास झाली नाहीं. यावरून वृत्तपत्राचा धंदा त्या वेळेपर्यंत अमेरिकेंत किफायतशीर होऊं लागला नव्हता असेंच अनुमान निघतें. पण त्यानंतर मात्र अमेरिकेच्या निरनिराळ्या संस्थानांतून नवीं नवीं पत्रें झळकण्यास सुरुवात झाली. खुद्द बोस्टन येथेंच पांच पत्रें वाचकांची तृष्णा पुरवीत असून, व्हर्जीनिया, न्यूयॉर्क व सौथ कॅरोलिना यांतून प्रत्येकीं एक पत्र व पेन्सिलव्हॅनियांत पांच पत्रें फडकलीं. इ. सन १७७६ त ही संख्या वाढत वाढत ३७ पर्यंत गेली व त्यांपैकीं एक पत्र अर्धसाप्ताहिकहि होतें.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें संस्कृतिदृष्ट्या अल्लड व उच्छृंखल समजलीं जातात. वयानें तीं कोवळीं असल्यामुळें त्यांच्याविषयीं असा समज व्हावा यांत नवल नाहीं. इतकेंच नव्हे तर, प्रत्यक्ष अनुभवहि तसाच आहे. इंग्लंडांत डानियल डेफो, स्विफ्ट, स्टील, ॲडिसन यांसारख्या नामांकित निबंधलेखकांचें युग अठराव्या शतकांत येऊन गेलें. पण अमेरिकेंत त्या काळीं निबंधकारांची चलती न होतां बातम्या पुरविण्याचीच प्रथा वर्तमानपत्रांनीं प्रारंभापासून पाडली; तीच वाढत जाऊन अलीकडे तर त्या देशांत बातम्यांना अगदीं ऊतच आला आहे. म्हणून अमेरिकें-तील पत्रें हीं खरीखुरीं वर्तमानपत्रें असून त्यांचे संपादक हे खरेखुरे

वर्तमानपत्रकार आहेत. उलटपक्षीं इंग्लंड व युरोपांतील इतर देश यांतील पत्रें मतपत्रें ( जर्नल्स ) व त्यांचे संपादक मतप्रसारक अशी ख्याति आहे. पण हीं दोन्ही विधानें अतिशयोक्तीचीं वाटून सदर पत्रांचे टीकाकार त्यांचें वेगळ्या रीतीनें वर्णन करतात. त्यांच्या मतें इंग्लंडची वृत्तपत्रें सर्वश्रेष्ठ, कारण तीं बोधप्रद; फ्रेंच पत्रें छचोर व अमेरिकन पत्रें दोन्ही प्रकारच्या गुणांनीं युक्त असतात. आत्मस्तुति कोणालाहि प्रियच असल्यामुळें इंग्रज लोकांना अभिप्राय द्यावयास सांगितल्यास ते स्वतःचीं पत्रें अत्यंत शुद्ध म्हणून डौलानें सांगून अमेरिकेंतील पत्रांची हलकट, ग्राम्य व भ्रष्ट या शिव्यांनीं संभावना करतील. उलट अमेरिकन लोक इंग्लंडच्या पत्रांवर उसळून त्यांना मूर्खांत ( Stupid ) काढतील व अशा रीतीनें उसनें फेडतील.

वर्तमानपत्रांच्या प्रसारास पहिली अनुकूलता यंत्रसामग्रीची. जोंपर्यंत यंत्रें ओबडधोबड व मागासलेलीं होतीं. तोंपर्यंत वर्तमानपत्रांची छपाई भिकार व प्रकाशन मंदगतीचें असे. इ. स. १८३२ पर्यंत त्या देशांतील सर्व पत्रें हातानें फिरवावयाच्या यंत्रावर ( हँडप्रेस ) छापून निघत असत. पण त्यानंतर थोड्याच दिवसांत इंग्लंडप्रमाणें तेथील छापखाने शक्तीवर चालूं लागले. त्याबरोबर पत्रांच्या प्रती झपाझप छापून निघण्यास सुरुवात झाली. या सुमारास रिचर्ड एम हो यानें रिव्हॉलव्हिंग सिलेंडरवर ठसे कसे चढवितां येतात व अशा फिरत्या यंत्राला कागद कसा पुरवितां येतो हें दाखविलें. त्या योगानें पत्रांचा प्रसार अधिक वाढला. मुद्रणकलेनें या पुढचा टप्पा, कायम ठशाची युक्ति ( स्टीरियो टायपिंग ) निघाली तेव्हां गांठला. ही सारी प्रगति बाष्पयंत्रानें घडवून आणिली तेवढीच. पण पुढील काळांत वाफेला वीज ही नवी सवत भेटली व तिनें जुन्या सवतीला मागें टाकतांच सहस्रावधींनीं मोजल्या जाणाऱ्या पत्रांचा खप लाख, अर्ध्या लाखावर पोंचला. आतां नवीन यंत्रांचा

संच असा जय्यत बनला आहे कीं, त्या योगानें वृत्तपत्रसृष्टींत अजब चमत्कार दृष्टीस पडत आहेत. पत्र छापणें, त्याचीं पानें कापणें, त्याच्या घड्या घालणें, त्याच्या प्रती मोजणें व त्यांना पत्त्याची चिठी चिकटविणें हीं सगळीं कामें यंत्रावर होऊन दर ताशीं ९६ हजार प्रती या वेगानें पत्रें झपाटा मारताल. ठशांतील अलीकडील महत्त्वाची सुधारणा म्हटली म्हणजे एका ओळीच्या अखंड ठशाची. त्यामुळें एक ठसेदार (कंपॉझिटर) पांच माणसांचें काम एकटाच उरकतो. या सर्व साधनांनीं वर्तमानपत्रें स्वस्त होऊन अमेरिकेंत त्यांची संख्या पंचवीस हजारांवर गेली आहे. त्यांत दैनिक पत्रें २३०० आहेत. वर्तमानपत्रांच्या मदतीस इतर आनुषंगिक साधनें धांवून आलीं नसतीं तर तीं देशभर न पसरतां आपआपल्या शहरींच कोंडून बसलीं असतीं व त्यांना जगांतील ताजी खबरहि न मिळती. पण मुद्रणकलेंतील प्रगतीच्या बरोबरीनें आगगाड्या, टपाल-खातें व तारायंत्र यांचाहि उदय झाल्यामुळें आज एका शहरीं छापलेलें पत्र उद्यां चारपांचशें कोसांपलीकडील वाचकांच्या हातीं पडणें शक्य कोटींत आलें आहे.

वृत्तपत्रकार हा गुरु व वाचकवर्ग हा शिष्य असें नातें आतां अमेरिकेंत उरलें नाहीं. तितक्या थोर उद्देशानें तिकडील वर्तमानपत्रें हल्लीं चालविलींच जात नाहींत. आपल्या गुरुस्थानाचा त्याग करून सांप्रत तिकडील वर्तमानपत्रकार हा भाट व खुषमस्कऱ्या बनत चालला आहे. 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' या पोटभरूपणाचा स्वीकार करून अमेरिकन वर्तमानपत्रें पैसा चारणारांच्या बातम्या वाचकांना देतात व ते सांगतील तीं मतें प्रतिपादतात. इंग्लंडमधील वर्तमानपत्रांची इतकी दुर्दशा उडाली नसली तरी त्यांचा स्वतंत्र बाणा व इभ्रत नष्ट होण्याच्याच मार्गास लागली आहे. कारण तेथील वृत्तपत्र-कारहि आतां मनाचा मुखत्यार राहिलेला नाहीं. त्या देशांत मोठमोठ्या

भांडवलवाल्या धेंडांनीं वर्तमानपत्रें विकत घेऊन आपल्या मालकीचीं केलीं आहेत. भांडवलवाल्यांचे वेगवेगळे संघ असून त्यांतील प्रत्येक संघाच्या मालकीचीं अनेक पत्रें आहेत. लॉर्ड नॉर्थक्लिफ हें एक यांपैकींच दांडगें धेंड असून, त्यानें विसाव्या शतकाच्या प्रारंभीं प्रसिद्ध 'लंडन टाइम्स' पत्र गळाठलें असतां त्याचा १९०८ सालीं ताबा घेऊन त्याची घडी बसविली. एवढें मोठें 'लंडन टाइम्स' पण त्याची किंमत अवघी दोन पेन्स आहे. टाइम्सच्या खालोखाल लंडनचें दुसरें वजनदार दैनिक पत्र डेली 'टेलिग्राफ.' त्याची स्थापना सन १८५५ त झाली. 'दि मॉर्निंग पोस्ट' हें लंडनमधील तिसरें मोठें व फार जुनें पत्र. तें सन १७७२ मध्यें सुरू करण्यांत आलें. हीं सारीं मोठमोठालीं पत्रें कंपन्यांच्या मालकीचीं बनलीं आहेत. त्यांना कंपन्यांचे डायरेक्टर पैसा पुरवितात व धोरणहि तेच ठरवितात. लॉर्ड नॉर्थ-क्लिफ या पद्धतीचा जनक असला तरी त्यानें स्थापन केलेल्या संघाहूनहि अतिशय प्रबळ संघ लॉर्ड रॉदरमियर याचा आहे. रॉदरमियर ग्रुप प्रमाणेंच बेरी ग्रूप, डेली क्रानिकल ग्रूप या नांवांचे संघ भागीदारीच्या पद्धतीवर चालले आहेत. संघांतील वृत्तपत्रांना एका माळेचे मणि (Chain papers) अशीहि संज्ञा देतात. इंग्लंडप्रमाणें अमेरिकेंतहि संघ आहेत, पण एका संघांतलि सर्व वर्तमानपत्रांचें धोरण एकच नसतें. अमेरिका देश इंग्लंडपेक्षां अतिशय मोठा व त्यांत संस्थानेंहि अनेक. यामुळें पत्राचें धोरण स्थानिक राज्यकारभारास अनुसरून भिन्न रहातें. हे संघ भांडवलाच्या व जुटीच्या जोरावर लोकमत आपल्या पक्षांस मिळवून देशाच्या अगर प्रांताच्या राजकारणावर आपला प्रभाव पाडतात व इतर पक्षांना बलहीन बनविण्याचा प्रयत्न करतात. यांत्रिक युगामुळें अमेरिकेंतील आयुष्यक्रम सर्वत्र सारखा झाला आहे. तीच स्थिति संपादकीय धोरण वगळल्यास कांहीं बाबतींत तिकडील वर्तमान-पत्रांना आली आहे. न्यूयॉर्क टाइम्स, बाल्टिमोर सन, ख्रिश्चन सायन्स

मॉनिटर इत्यादि फार थोड्या पत्रांनीं नव्याजुन्याचा मेळ घालून आपलें संपादकीय वैशिष्ट्य ठेवलें आहे. पण बाकीचीं पत्रें, मजकूर पुरविणाऱ्या संस्था ( सिंडिकेट्स ) आहेत, त्यावर आपलें काम भागवितात. अशा प्रकारची एक संस्था ॲसोसिएटेड प्रेस ऑफ अमेरिका ही होय. ती २०४० पत्रांना मजकूर पुरविते. तिचे प्रतिनिधि जगभर आहेत. दुसरी संस्था युनायटेड प्रेस. ती बहुधा संध्याकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या एक हजार पत्रांना मजकूर देते. त्या योगानें एकाच दिवशीं संध्याकाळीं साऱ्या अमेरिकेंत एक हजार वर्तमानपत्रांचे वाचक एकच मजकूर अनेक ठिकाणीं वाचीत असतात. जी कथा एका वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली तीच एक हजार पत्रांत. बातम्या देणाऱ्या दोन मंडळ्या आहेत. एकीचें नांव इंटरनॅशनल व दुसरीचें स्क्रिप्स् हावर्ड. या दोन संस्थांमार्फत वर्तमानपत्राना केवळ बातम्याच मिळतात असें नव्हे, तर विनोदी चुटके व आरोग्यविषयक माहितीहि देण्यात येते. ‘ स्क्रिप्स् हावर्ड ’ या सिंडिकेटच्या मालकीचीं पत्रें अमेरिकेच्या ३० शहरीं आहेत. ‘इंटरनॅशनल हिअर्स्ट’ या संस्थेचीं पत्रें वीस शहरांत आहेत. एकेका शहरांत त्यांचीं दोनदोनहि पत्रें आहेत. या सर्व पत्रांचें संपादकीय धोरण मिस्टर हिअर्स्ट हा ठरवितो.

या चार संस्था झाल्या; त्याशिवाय विनोदी लेख, गमतीदार चुटके, गप्पागोष्टी, धार्मिक प्रवचनें, हींहि पुरविणाऱ्या संस्था अमेरिकेमध्यें आहेत. न्यूयॉर्क शहरांत स्वतंत्र रीतीनें चालणारीं कांहीं पत्रें आहेत. पण तेथेंहि शहरांतल्या शहरांत बातम्या गोळा करून त्या पुरविणाऱ्या संस्था आहेत. ‘सिटी न्यूज ॲसोसिएशन’ ही या प्रकारची संस्था होय. ही संस्था वर्तमानपत्रांना न्यूयॉर्कमध्यें घडलेल्या प्रत्येक हकीकतीची बातमी थोडक्यात जशीच्या तशी पुरविते. ती बातमी आल्यानंतर ज्या त्या वर्तमानपत्रानीं आपल्या धोरणाप्रमाणें रंगवून छापावी. ‘सिटी न्यूज ॲसोसिएशन’च्या बातम्या विश्वसनीय असतात. अशी सोय झाल्यामुळें अमेरिकें-

तील बातमीदारांचें महत्त्व कमी कमी होत चाललें आहे व त्यांना पगारहि अतिशय थोडा मिळतो. अमेरिकेंत वर्तमानपत्र हा निवळ धंदा झाला आहे. त्याला उच्च ध्येय नाहीं. अमेरिकन वर्तमानपत्र यंत्राप्रमाणें ठराविक, निर्दोष व विश्वसनीय असतें. तीं पत्रें व्यक्तींची हकीकत, गमतीदार चुटके, खेळाची माहिती देऊन पैसे मिळवितात. अमेरिकन लोक संपादकीय मजकूर फारसा वाचीत नाहींत. वर्तमानपत्रें राजकीय पुरुषांचीं व्यंग्यचित्रें ( कार्टून्स ) घालतात व त्यांचेंच वजन वाचकांवर पडतें. बहुतेक वर्तमानपत्रांचे संपादकीय लेखक चांगले बुद्धिवान असतात. पण या यांत्रिकपणाची मृतवत् छाया त्यांजवरहि पडली असून त्यांचे लेख बेचव, स्फूर्तिशून्य व सामान्य विषयांवर असतात. त्याशिवाय अमेरिकेच्या शीघ्र साहित्यांत चित्रमय पत्रांची भर पडत आहे. हीं पत्रें म्हणजे रोजचीं मासिकेंच. त्यांचा दर्जाहि अगदीं कनिष्ठ प्रतीचा. त्यांची नीतिमत्ताहि अगदींच हलकी. वर्तमानपत्र अगर मासिक म्हणण्या-इतकीहि त्यांची योग्यता नसते. पण त्यांची लोकप्रियता दांडगी असते. कारण अमेरिकेंत पुष्कळसे वाचक वाचीत नसून फक्त पहात असतात. त्यांनीं एकदां हा रोजचा कपटा विकत घेतला व त्यांत चमत्कारिक व मसालेदार असें त्यांस पहावयास मिळालें म्हणजे त्यांच्या दिवसाचें जगांतील घडामोडी कळण्याच्या दृष्टीनें सार्थक झालें. असल्या कपट्याला अमेरिकेंत टॅब्लॉइड् (Tabloid) म्हणतात.

अमेरिकेंतील पत्रें बातमी देण्यांत लबाड्या किंवा विपर्यास करीत नाहींत. एकंदरींत तेथील पत्रें प्रामाणिक पण स्फूर्तिशून्य आहेत. तीं माहिती देतात, पण स्फूर्ति देत नाहींत आणि त्यांच्या माहितींतहिं विलक्षणपणाशिवाय फारसें कांहीं नसतें.

---

# प्रकरण तिसरें

# हिंदुस्थानांतील वृत्तपत्रांचें पूर्ववृत्त

वृत्तपत्राची पाश्चिमात्य टूम पाश्चिमात्यांबरोबरच हिंदुस्थानांत आली. प्लासीची लढाई सन १७५७ त झाली. तेव्हांपासून इंग्रजी राजसत्ता बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतांतून आपले पाय पसरीत गेली. अशा-रीतीनें साऱ्या हिंदुस्थानांत बंगाल व त्याच्या लगत्याचा मुलूख इंग्र-जांच्या ताब्यांत सर्वांच्या आधीं सांपडल्यामुळें वर्तमानपत्रांचेंहि निशाण त्याच प्रदेशांत प्रथम फडकलें. बंगालची राजधानी कलकत्ता येथें 'बेंगाल गॅझेट' हें पहिलें वृत्तपत्र ता. २९ जानेवारी सन १७८० रोजीं छापून निघालें. सदर पत्र इंग्रजी व त्याचा संपादक इंग्रज आणि प्रसारहि कलकत्त्यास व फार तर कलकत्याच्या आसपास, म्हणून त्याची खबर हिंदुस्थानांतील महाराष्ट्र, मद्रास, पंजाब यासारख्या दूरच्या प्रांतांना तर राहोच, पण खुद्द बंगाल्यांतील किती लोकांना असेल याची वानवाच आहे. 'बेंगाल गॅझेट'चा संपादक मि. हिकी नामक इंग्रज गृहस्थ होता. त्यानें प्रसिद्धि मिळविण्याकरितां आपल्या पत्रांतून स्वदेशबांधवांचीच निंदा आरंभल्या-मुळें त्याजवर कारागृहवासाची पाळी आली. 'बेंगाल गॅझेट' मागून 'दि इंडियन गॅझेट ऊर्फ कलकत्ता पब्लिक ॲडव्हर्टायझर' पत्र प्रकटलें व पुढें ५० वर्षांनंतर सन १८३३ सालीं 'बंगाल सरकार' या पत्रांत सामील झालें. सन १८६६ पासून हीं दोनहि पत्रें 'इंडियन डेली न्यूज' या नांवानें निघूं लागलीं. १८२१ सालीं एका युरोपियन व्यापाऱ्यानें सिंडिकेट बनवून त्या मार्फत 'जॉन बुल इन दि ईस्ट' हें वर्तमानपत्र चालविलें व त्याचेंच

परिणत स्वरूप सन १८३६ सालीं प्रसिद्ध झालेलें कलकत्त्याचें हिंदद्वेष्टें 'इंग्लिशमन' स्टेट्स्मन पत्र होय. अलीकडे 'इंग्लिशमन' बंद पडलें आहे. सध्यां कलकत्त्यांतील जुनें पण वजनदार पत्र 'स्टेट्स्मन' होय. अँग्लो-इंडियन पत्रांत मुंबई इलाख्याचा क्रम नंतरचा लागतो. मुंबईस १७९० मध्यें 'दि बाँबे हेरल्ड' पत्र निघालें. त्याच्याच पुढच्या काळांत 'दि बाँबे कुरियर' या दुसऱ्या इंग्रजी पत्राचा जन्म झाला. 'टाइम्स ऑफ इंडिया' हें अत्यंत नाणावलेलें पत्र त्याचेंच रूपांतर. सन १७९१ त 'बाँबे गॅझेट' मुंबईंत निघूं लागलें तें १९१४ पर्यंत म्हणजे २२३ वर्षें सुरू होतें.

शक्य तर इलाख्याच्या शहरीं एखादें दुसरें अँग्लो-इंडियन पत्र असलेंच पाहिजे असा तीसचाळीस वर्षांपूर्वी इंग्रजांचा कटाक्ष होता. त्याप्रमाणें मद्रासेस 'मद्रास टाइम्स', लाहोरास 'सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट' व अलाहाबादेस 'पायोनियर' हीं पत्रें स्थापन झालीं. 'पायोनियर' पत्र अलीकडे अँग्लो-इंडियन मालकीचें न रहातां संयुक्त-प्रांतांतील जमीनदारांनीं आपल्या मालकीचें केलें आहे.

बंगाल्यांत १७५७ सालीं इंग्रजी अंमल बसल्यावर तो उत्तर हिंदुस्थानांत पसरत सारा हिंदुस्थान इंग्रजांच्या धशाखालीं उतरणार याचीं दुःस्वप्नें दूरदर्शी व विचारी हिंदी लोकांना पडूं लागलीं होतीं. पण जेव्हां अठरावें शतक संपून एकोणिसाव्या शतकास सुरुवात झाली व इंग्रजांचा मराठ्यांशीं वसईस तह होऊन मराठी साम्राज्य इंग्रजांनीं गिळंकृत करीत आणलें, तेव्हां इंग्रजांशीं लढून गेलेलें राज्य परत मिळविण्याचें दिवस संपले व त्यांच्यांशीं कायद्यानें भांडण्याचे दिवस आले अशी बंगाली लोकांची खात्री पटल्यामुळेंच कीं काय त्यांनींहि तोफखान्याच्या ऐवजीं छापखान्याकडेच लक्ष वळविलें. या समजुतीनें बंगाली लोकांनीं काढलेलें पहिलें पत्र 'बांगाला गॅझेट' ( 'बेंगाल गॅझेट'हून हें पत्र वेगळें दिसतें ). सदर पत्र सन १८१६ सालीं म्हणजे पेशवाई बुडण्याच्या पूर्वीं अवघीं दोनच वर्षें सुरू झालें.

त्याचा संपादक गंगाधर भट्टाचार्य या नांवाचा बंगाली ब्राह्मण होता. सर्व हिंदी लोकांत ब्राह्मण वर्ग अधिक सुसंस्कृत व सुशिक्षित असल्यामुळें जनतेला जागें करण्याची जरुरी त्याच्या लक्षांत सर्वांच्या आधीं आली. उलटपक्षीं इंग्रज राज्यकर्त्यांचे पहिले पाठीराखे इंग्रज मिशनरी त्यांनीं पाश्चिमात्य विद्या, पाश्चिमात्यांचा ख्रिस्ती धर्म यांचा पुरस्कार करतांना मोफत दवाखाने व शाळा घातल्या, त्याप्रमाणेंच छापखाने व वर्तमानपत्रें त्यांनींच काढून हिंदी जनतेच्या वशीकरणास सुरुवात केली. त्यांचे हिंदी लोकांच्या वतीचे पहिले प्रतिस्पर्धी ब्राह्मणच ठरून त्यांच्या व मिशनऱ्यांच्या झटापटींनीं एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध व्यापून टाकला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पेशवाई बुडाली त्याच वर्षी म्हणजे सन १८१८ च्या एप्रिल महिन्यांत 'समाचार दर्पण' या पत्राचा प्रारंभ बंगाल्यांत श्रीरामपूर येथील मिशनऱ्यांच्या हस्तें झाला. राजा राममोहन राय हे बंगाल प्रांतांतील हिंदूंचे आधारस्तंभ होत. बंगाली लोकांस नवीन परिस्थितीची ओळख करून देण्याची कामगिरी राजा राममोहन राय यांनींच बजावली. त्या बाबतींत वर्तमानपत्रासारखें जालीम शस्त्र दुसरें नाहीं हें राममोहन राय यांनीं पक्कें जाणून 'संवाद कौमुदी' नांवाचें साप्ताहिक ता. ४ एप्रिल १८२१ रोजीं सुरू केलें. त्याच सुमारास 'कलकत्ता जर्नल' नांवाचें पत्र बकिंगहॅम हा इंग्रज गृहस्थ चालवीत होता. पण सदर पत्रांत बंगाल सरकारावर आलेली क्षुल्लक टीकाहि तेथील गव्हर्नर जॉन ॲडाम याला खपली नाहीं. त्या वेळीं डॉ.ब्राइस हा न्यूस्कॉच चर्चचा मुख्य असून त्यानें कंपनीसरकारांत स्टेशनरीकर्डाल कारकुनीची जागा पत्करली होती. ब्राइससारख्या उच्च प्रतीच्या विद्वानानें असलें हलकें काम पत्करलेलें 'कलकत्ता जर्नल'चा संपादक मि.बकिंगहॅम याला गैर वाटून त्यानें आपल्या पत्रांत या कृत्यावर टीका केली. ती टीका बंगालचा गव्हर्नर जॉन ॲडाम याच्या डोळ्यावर येऊन त्यानें बकिंगहॅमला दोन महिन्यांच्या आंत कल-

कत्ता सोडून इंग्लंडला जाण्यास फर्माविलें व त्याचें पत्र बंद पाडलें. बकिंगहॅम गेला तरी त्याचा उपसंपादक मि. अरनॉट हा कलकत्यास मागें राहिलाच होता. त्यालाहि सन १८२३ च्या अखेरीस पकडून इंग्लंडला जाणाऱ्या जहाजावर चढविण्यांत आलें. इंग्रज पत्रकर्त्यांची अशी उचल-बांगडी केल्याचें हें उदाहरण पहिलें दिसतें. यावरून त्या काळीं वर्तमान-पत्रांना सरकाराविरुद्ध लिहिण्याची कशी मोकळीक नव्हती याची कल्पना येते.

राजा राममोहन राय यांचें 'संवाद कौमुदी' हें देशी भाषेंतील पत्र होय. तशीं चार साप्ताहिक देशी पत्रें तेव्हा कलकत्त्यांत होतीं. राममोहन यांच्या नंतरचा मोठा पत्रकार शंभुचंद्र चतर्जी. याचा जन्म बारनागोर गांवीं सन १८३९ मध्यें झाला. कलकत्त्यास हिंदू मेट्रापॉलिटन कॉलेजांत शिकत असतांच त्यानें क्रिस्तोदास पाल याच्या साहाय्यानें 'कलकत्ता मंथली मॅगझीन' हें मासिक सुरू केलें. तें कांहीं म्हटलें तरी मुलांचें मासिक. त्याचा उपयोग शंभुचंद्र यांस केवळ शीघ्र साहित्यांतील धुळाक्षरें घटविण्यापुरताच वाटला. म्हणून सदर मासिक बंद पडल्यावर शंभूचंद्र 'मॉर्निंग क्रॉनिकल' या दैनिक इंग्रजी पत्राच्या लेखक वर्गास मिळाला. हें पत्र मि. लव्ह या इंग्रजाच्या मालकीचें होतें. या सुमारास लॉर्ड डलहौसी गव्हर्नर जनरल असून त्यानें देशी संस्थानें खालसा करण्याचा धोशा लावला होता. त्या तडाक्यांत त्याची अयोध्या प्रांतावर संक्रांत वळली असतां मि. लव्ह व शंभूचंद्र यांचें धोरण न जमल्यामुळें शंभुचंद्राची नोकरी सुटली. नोकरी सुटल्यावर शंभूचंद्रानें सन १८५७ सालच्या शिपायांच्या बंडासंबंधानें पुस्तक लिहिलें. इंग्रज सरकाराचीं कृष्णकारस्थानें बाहेर काढणाऱ्या या पुस्तकाच्या प्रसिद्धीस कोणी प्रकाशकच भेटेना. शेवटीं सदर पुस्तक मद्रास सदर कोर्टाचा माजी न्यायाधीश मि. माल्कन लेव्हीन हा छापण्यास धैर्यानें पुढें सरसावला. पुस्तकप्रकाशन इतकें बिकट होण्याचें कारण असें कीं, त्या वेळीं लॉर्ड

कॅनिंग यानें मुस्कटदाबीचा कायदा केला होता. मध्यंतरीं शंभुचंद्राचे कांहीं दिवस रिकामेच गेल्यावर तो कलकत्त्यांतील क्रिस्तोदास पाल याच्या 'हिंदु पेट्रियट' पत्रांत सामील झाला. त्यांत कांहीं वर्षें घालविल्यानंतर शंभूचंद्रानें लखनौस 'समाचार हिंदुस्थानी' हें पत्र चालवावयास घेतलें.

शंभुचंद्र हा विलक्षण मनुष्य होता. त्याचा जीवनक्रमहि तसाच विलक्षण ठरला. लखनौस मुसलमान अमीरउमरावांच्या संगतींत त्याला गायनाचा षोक लागला व त्या षोकांतच त्यानें 'समाचार हिंदुस्थानी'चा त्याग करून तेथील मुसलमान नबाबापाशीं नोकरी पत्करली. सन १८६८ सालीं तो काशीपूरचा राजा शिवराजसिंग याचा चिटणीस बनला. राजा शिवराजसिंग याच्याच शिफारशीवरून रामपूरच्या नबाबानें त्याला आपल्या मदतनिसाचे(पर्सनल असिस्टंट)जागीं नेमून घेतलें. तीहि नोकरी पुढें सुटून तो टिपरा संस्थानाच्या दिवाणगिरीवर विराजमान झाला.अशा रीतीनें संस्थानांतील सुखोपभोग, विलास व लहरी कारभार यांचा यथेच्छ अनुभव घेतल्यावर शंभुचंद्राची स्वारी पुनः पूर्वस्थळीं येऊन वर्तमानपत्राच्या कचेरींत फर्डेशाही करूं लागली. त्यानें सन १८८२ सालीं कलकत्त्यांत 'रईस व रयत' (Reis and Rayyat) या नांवाचें स्वतःच्या मालकीचें पत्र सुरू केलें. क्रिस्तोदास पाल यानें काढलेलें 'हिंदु पेट्रियट' या वेळीं चालूच असून त्याचा लौकिकहि चांगला होता. क्रिस्तोदास व शंभुचंद्र यांनीं पूर्वीं या पत्रांत एकत्र कामहि केलेलें. पण क्रिस्तोदासाच्या जुन्या पत्राशीं शंभुचंद्राच्या नव्या पत्रानें स्पर्धा सुरू केली. पण त्याच्या पत्राची चहा हिंदी लोकांपेक्षां युरोपियनांत विशेष. त्यांत लेख लिहिणारांत व्हाईसरॉय लॉर्ड डफरिन यासारखे बडे सरकारी अधिकारी असत. अर्थात् पत्राचें धोरण नेमस्तपणाचें होतें हें सांगावयास नकोच. सदर पत्र चालवीत असतां शंभुचंद्रानें 'पूर्वबंगाल्यांतील प्रवास' या विषयावर एक इंग्रजी पुस्तकहि लिहिलें.

वरील हकीकत वाचून शंभुचंद्राच्या स्वभावाची, कर्तृत्वाची व दांडग्या उद्योगाची कल्पना येईल. त्याचा शिक्षणक्रम पुरा झाला नव्हता तरी केवळ बुद्धिमत्ता व उद्योगप्रियता या गुणांच्या बळावर तो उदयास आला. त्या काळीं इंग्रजांच्या मोहनींत जे सुशिक्षित बंगाली लोक सांपडले त्यांपैकींचि शंभुचंद्र असल्यानें तो इंग्रजी राज्यावर निष्ठा ठेवणारा निपजला. मुसलमानांच्या नोकरींत बरींच वर्षे घालविल्यानें मुसलमान समाजांत त्याचे मित्र पुष्कळ होते. त्यावेळीं नुकत्याच स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेस त्याचा विरोध असल्याचें वाचून पुष्कळांस आश्चर्य वाटेल. राष्ट्रीय सभा स्थापन करण्यांत घाई झाली असून तिची उभारणी मनुष्यस्वभावाच्या अज्ञानावर करण्यांत आली आहे अशी त्याची समजूत होती. शंभुचंद्र ता. ७ फेब्रुवारी सन १८९४ रोजीं मरण पावला.

इंग्रज लोकांच्या गुणांनीं व पद्धतशीर राज्यकारभारानें मोहून हिंदी पुढाऱ्यांनीं त्यांचे चहाते बनावें असाच काळ प्रारंभीं एकट्या बंगाल्यांतच काय पण साऱ्या हिंदुस्थानभर होता. या दृष्टीनें शंभुचंद्रासारख्या वर्तमानपत्रकारानें राष्ट्रीय सभेच्या स्थापनेस दोष द्यावा हें तत्कालीन मनोवृत्तीस धरूनच होतें. परंतु त्याकाळींहि इंग्रजांच्या राज्यकारभाराचें स्वरूप व भावी परिणाम ओळखून सावध झालेले धूर्त लोक सर्वत्र तुरळकपणानें आढळून येत. त्यांपैकींच क्रिस्तोदास पाल हे बंगाली गृहस्थ होत. क्रिस्तोदास व शंभुचंद्र समकालीन असतांहि क्रिस्तोदासाचा देशाभिमान व धर्माभिमान शंभुचंद्रांत नसल्यामुळें क्रिस्तोदासाइतकी मान्यता व वजन शंभुचंद्रास कधींच लाभलें नाहीं. क्रिस्तोदासाचा हा अभिमान त्यानें चालविलेल्या 'हिंदू पेट्रियट' या पत्राच्या नांवांतच झळकत आहे. त्याचें 'हिंदू पेट्रियट' पत्र सन १८७० च्या सुमारास, बंगाल्यांत चांगलें भरभराटीस येऊन त्यानें

अखिल हिंदुस्थानांतील हिंदी पत्रांत पहिला नंबर पटकावला होता.

'हिंदू पेट्रियट' हें पत्र वैभवगिरीवर तळपत असतां एक नवा तेजस्वी तारा उदयाचलावर येऊं पहात होता. क्रिस्तोदास पाल यांच्या पत्राला जनतेंत व सरकार-दरबारीं आलेल्या वजनानें महत्त्वाकांक्षी बंगाली तरुणांचें वृत्तपत्रव्यवसायाकडे लक्ष वेधून थोर व्यक्ति त्या व्यवसायांत शिरूं लागल्या. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी अशांपैकींच होत. सुरेंद्रनाथ यांचा जन्म सन १८४८ मध्यें झाला. इंग्रजी शिक्षणाच्या त्या चलतीच्या काळांत जो चार इंग्रजी पुस्तकें शिकला त्याला बऱ्यापैकीं रोजगार मिळण्यास पंचाईत नव्हती. मग बी.ए., एम्.ए. इत्यादि परीक्षा दिलेले, त्यांजविषयीं बोलावयासच नको. त्यांना मामलेदार, मुन्सफ, हायस्कूलचे हेडमास्तर असल्या मोठ्या हुद्याच्या व पगाराच्या जागांवर आवर्जून नेमण्यांत येत असे. या कारणानें सरकारी नोकऱ्या सोडून सार्वजानिक कार्याची, विशेषतः राजकारणाची वाट धरणारीं हुशार व सुशिक्षित माणसें विरळा. बाबू सुरेंद्रनाथ इतरांप्रमाणें बडे सरकारी कामदार होऊन रहावयाचे. खेरीज त्यांनीं आपल्याकडूनहि तोच मार्ग स्वीकारला होता. ते बी. ए.ची परीक्षा उतरल्यावर इंग्लंडांत आय. सी. एस्.च्या परीक्षेस गेले व तिच्यांत त्यांनीं यशहि मिळविलें. बंगाल्यांतील सुरेंद्रनाथ, रमेशचंद्र दत्त, व महाराष्ट्रांतील श्रीपाद बाबाजी ठाकूर इत्यादि तरुणांची विलायतेस सनदी नोकरीच्या परीक्षेसाठीं जाणारी पहिली हिंदी टोळी. पण त्या टोळींपैकीं बानर्जी यांचें दैव असें कीं, त्यांना परीक्षा पास होण्यापूर्वीं व झाल्यानंतरहि अनपेक्षित संकटें यावींत, अखेर मिळालेली नोकरी हातची जावी आणि ती गेल्यावरहि बॅरिस्टरीकरितां केलेला शेवटचा यत्न अपेशी ठरून त्यांना अंगची कर्तबगारी व बुद्धिवैभव दाखविण्यास सार्वजनिक कार्याशिवाय क्षेत्रच राहूं नये. ते वयाच्या २१ व्या वर्षी आय. सी. एस्. परीक्षा उतरले व सिलहट येथें पहिला वर्ग मॅजिस्ट्रेटच्या हुद्यावर

दाखलहि झाले. पण वरिष्ठांशीं त्यांचा बेबनाव होऊन त्यानें वड्याचें तेल वांग्यावर काढण्याप्रमाणें ज्ञानजींच्या एका क्षुल्लक चुकीबद्दल त्यांस धारेवर धरून त्यांच्या बडतर्फीनें आपल्या नेत्रांचें पारणें फेडलें. सरकारी नोकरींत नाहीं तर नाहीं, निदान वकिली करून पैसा ओढावा अशी आकांक्षा धरून ते विलायतेस गेले, बॅरिस्टरीकरितां ठराविक मुदतहि त्यांनीं भरली, पण पूर्व-पातक उभें राहून त्यांना बॅरिस्टरीसहि मुकावें लागलें. तेव्हां त्यानीं लोकसेवेचा मार्ग स्वीकारून बाबू ब्रजाराम चतर्जी यांचें बंगाली पत्र चालवावयास घेतलें व तें फारच योग्यतेस चढविलें.

बंगाली पत्राइतकाच किंबहुना त्याहूनहि अधिक लौकिक 'अमृत-बझार पत्रिकेनें' मिळविला. सदर पत्राची स्थापना सन १८६८ त झाली. तिचे संपादक हेमंत कुमार घोष, शिशिर कुमार घोष व मोतीलाल घोष. घोषबाबूंचें इंग्रजी फारच सोपें. त्यांची लेखनपद्धति उपरोधिक व कथारूप असल्यामुळें त्या पत्राचे वाचक बंगाल प्रांतांबाहेरील इतर प्रदेशांतहि बरेच आढळून येत. बंगाल्यांतील आणखी एक जुनें पत्र वंगदर्शन. त्याचे संपादक बंकिमचंद्र हे आपल्या कादंबऱ्यांमुळें बंगाल्यांत फार लोकप्रिय झाले होते. त्यांनीं रचलेलें 'वंदे मातरम्' हें गीत आतां राष्ट्रीय गीत म्हणून गाजल्यानें तर बंकिमचंद्राचें नांव अखिल हिंदुस्थानांत दुमदुमून राहिलें आहे. बंगाल्यांतील वृत्तपत्रें वंगभंगाच्या चळवळींत अधिकच ख्याति पावलीं. त्यांपैकीं एका वर्तमानपत्रानें सरकारास चीड येणारें 'वंदे मातरम्' हें नांव मुद्दाम धारण केलें. त्या दैनिक पत्राच्या संपादकांत बाबू अरविंद घोष, बाबू बिपिनचंद्र पाल, यासारखे नामांकित लेखक असल्यानें सदर पत्रानें अल्पावकाशांत विलक्षण कीर्ति संपादिली. त्यांतील स्फूर्तिदायक व मोहक इंग्रजी भाषाशैली सर्वत्र इतकी पसंत पडली कीं, त्या पत्राचीं भाषांतरें आपापल्या प्रांतांतून पत्ररूपानें छापण्यास त्या त्या प्रांतांतील तरुणांना भूषण वाटलें. बिपिनचंद्र पाल यांनीं 'न्यू इंडिया' नांवाचें स्वतःचें स्वतंत्र

पत्रहि काढलें. त्याखेरीज 'युगांतर', 'संध्या', इत्यादि पत्रेंहि बंगाल्यांत प्रसिद्धि पावून त्यांनीं टीकेचे प्रहार करून सरकारास अगदीं भंडावून सोडलें. त्या पत्रांच्या संपादकांवर अनेकवार खटले होऊन शिक्षाहि झाल्या. पण त्या शिक्षांनींहि त्यांचा नायनाट होत नाहीं असें पाहिल्यावर हिंदुस्थान सरकारानें प्रेस ॲक्टामध्येंच फरक करून जामिनासारखे नवे खोडे पत्रांच्या पायांत अडकविण्याकरितां तयार ठेवल्यानें त्यांचा जोर ओसरला.

वंगभंगानंतरची हिंदुस्थानांतील प्रचंड चळवळ म. गांधींनीं सुरू केलेल्या असहकारितेची. या चळवळीच्या स्फूर्तीनें बंगाल्यांत ॲडव्हान्स, व्हॅनगार्ड, फॉरवर्ड, लिबर्टी, हिंदुस्थान स्टँडर्ड इत्यादि नवीं पत्रें जुन्यांच्या भरीस निघालीं. त्यांपैकीं बहुतेक बुडालीं व थोडींच जिवंत राहिलीं. एकंदरींत बंगाल प्रांत हा वर्तमानपत्रांच्या दृष्टीनें हिंदुस्थानांत अग्रेसर प्रांत होय. त्यांत बंगाली व इंग्रजी या दोनहि भाषांत रगड पत्रें असून तीं बंगाली लोक लीलेनें चालवितात. बंगाली लोकांच्या खालोखाल वृत्तपत्रव्यवसायांत पुढें आलेले लोक मद्रास इलाख्यांतील. त्या इलाख्यांत 'हिंदू' हें पत्र अत्यंत योग्यतेचें आहे. हिंदी लोकांनीं चालविलेल्या पत्रांत त्याच्या तोडीचें पत्र दुसरें नाहीं असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. इंग्रज लोकांचीं पत्रें प्रांतोप्रांतीं आहेत. पण त्यांत मुंबईचें 'टाइम्स ऑफ इंडिया' हें एकच पत्र 'हिंदू'ला मागें टाकणारें म्हणतां येईल. पण त्याशिवाय बाकीच्या इंग्रज लोकांच्या पत्रांत 'हिंदू'ची बरोबरी करणारें एकहि पत्र नाहीं. मद्रासच्या या 'हिंदू' पत्राची स्थापना सन १८७८ सालीं संपादक सुब्रम्हण्य अय्यर यांनीं केली. सुब्रम्हण्य अय्यर यांच्या मागून 'हिंदू'चें श्रेष्ठत्व कायम ठेवण्यास टी. रंगाचारियर व कस्तुरीरंग आयंगार यांसारखे समर्थ संपादक त्याला लाभले. हें पत्र प्रथम साप्ताहिक होतें, नंतर दैनिक बनलें. 'हिंदू' हें मद्रासेकडील इंग्रजी पत्रांत व 'स्वदेशमित्रम्' हें तद्देशीय भाषांत अव्वल दर्जाचें ठरतें. 'स्वदेशमित्रम्' तामिळ भाषेंत निघतें.

पंजाबातील 'ट्रिब्यून' पत्र बरेंच लोकप्रिय आहे. तें आजहि व्यवस्थितपणें चाललें आहे. संयुक्त प्रांत व दिल्ली या भागांत 'लीडर', 'हिंदुस्थान टाइम्स' इत्यादि तत्प्रांतीयांचीं इंग्रजी पत्रें आहेत. हिंदुस्थानांतील सगळ्या प्रांतांत बंगाली व मद्रासी लोक वृत्तपत्रव्यवसायाच्या दृष्टीनें पुढें आहेत. बंगाली लोकांनीं स्वतःचीं पत्रें स्वतःच्या हातीं ठेवून इतर प्रांतांवरहि आक्रमण केलें आहे. लाहोरच्या 'ट्रिब्यून' पत्राचे संपादक बाबू कालीनाथ रॉय हे बंगाली आहेत. उलटपक्षीं अलाहाबाद येथील 'लीडर' पत्राचे उत्पादक व संपादक रा. चिंतामणी हे मद्रासी गृहस्थ आहेत. त्याचप्रमाणें मुंबईतील 'फ्री प्रेस' पत्राचे संपादक रा. सदानंद हेहि मद्रासीच आहेत. सारांश, धाडस, सामर्थ्य व आंग्लभाषानैपुण्य या गुणांच्या जोरावर परप्रांतांत वर्तमानपत्रकार या नात्यानें आपलें बस्तान बसविण्यांत बंगाली लोकांपेक्षांहि मद्रासी लोकांचा हातखंडा असल्याचें दिसून येतें. महाराष्ट्रीयांनीं महाराष्ट्रांत चालविलेलीं इंग्रजीं पत्रें एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच. मग महाराष्ट्राबाहेर जाऊन चालविलेलीं त्यांहूनहि थोडीं. पंजाबात सुमारें अठ्ठावीस वर्षांपूर्वी 'पंजाबी' नांवाचें इंग्रजी पत्र सुरू असून त्याच्या संपादकांत रा. आठवले या नांवाचे महाराष्ट्रीय गृहस्थ कांहीं दिवस होते. त्यानंतरचें दुसरें इंग्रजी पत्र 'न्यू इंडिया'. त्याची स्थापना मद्रासेंत सुप्रसिद्ध विदुषी व विख्यात थिऑसफिस्ट ॲनी बेझंट यांनीं केली होती. सदर पत्राच्या संपादकवर्गांत कै. विष्णु रघुनाथ करंदीकर असून रा. पंढरीनाथ काशीनाथ तेलंग यांच्या नांवानें तें पत्र बेझंटबाईस १९१७ सालीं अटक झाल्यावर कांहीं दिवस चालत होतें. मुंबई शहरांतहि इंग्रजी 'बॉंबे क्रॉनिकल' पत्रांतहि कांहीं महाराष्ट्रीय होते. त्यांपैकीं रा. लक्ष्मण गणेश खरे हे कायम संपादक. रा. अबदुल्ला ब्रेलवी यांच्या कारागृहवासांत थोडे दिवस स्वतःच्या नांवानें तें पत्र काढीत असत. गुजराथेंत म. गांधी यांनीं हातीं घेतलेल्या पण आतां विराम पावलेल्या, 'यंग इंडिया' पत्राचें नांव अजरामर झालें आहे.

---

# प्रकरण चौथें

# हिंदुस्थानांतील प्रसिद्ध संपादक

**मोतीलाल घोष व त्यांचे बंधू**

हिंदुस्थानांत बंगाल प्रांत राजकारणांत अग्रेसर, वर्तमानपत्राच्या व्यवसायातहि याच प्रांताचा नंबर पहिला व बंगाली पत्रांत 'अमृत बझार पत्रिके'चा मान पहिला. 'अमृत बझार पत्रिके'चे संपादक त्रिवर्ग बंधू होते. त्यांचीं नांवें हेमंत कुमार, शिशिर कुमार व मोतीलाल. त्रिवर्गांत मोतीलाल यांनींच लौकिक अधिक मिळविला. मोतीलाल खेड्यांत जन्मले व त्यांचें बालपणहि खेड्यांतच गेलें. त्यांचा जन्म जेसोर जिल्ह्यांत पालूआ मागूरा या गांवीं सन १८४५ त झाला. त्यांचे वडिल जेसोर येथील जिल्हा कोर्टांत वकिली करीत. आईचें नांव अमृत माई. तिचेहि बंधू फार मायाळू व मातृभक्त. त्यांनीं आपल्या पत्राचें नांव 'अमृत बझार पत्रिका' असें मातुश्रीच्या स्मरणार्थच ठेवलें.

मोतीलाल व त्यांचे बंधू यांचें शिक्षण त्या काळास अनुसरून बेताचेंच झालें होतें. खुद्द मोतीलाल यांनीं मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उतरल्यावर कॉलेजांत एकच वर्ष घालविलें. हिंदुस्थानांतील बहुतेक पुढाऱ्यांना व संपादकांना प्रथम शिक्षकाच्या पवित्र आयुष्यक्रमाचा अनुभव घेऊन मनाचा निर्मळपणा स्वतःशीं पटवून घ्यावाच लागतो. त्याप्रमाणें मोतीलाल प्रभृति बंधूंनीं आपल्याच गांवीं एक हायस्कूल, मुलींची शाळा व प्रौढ स्त्रियांकरितां शाळा अशा संस्था सुरू केल्या. स्त्रीशिक्षणाचे बाबतींत त्याकाळीं लोकमत अनुकूल नसल्यानें घोष बंधूंची गणना लोकांकडून

सहजच समाज सुधारकांत झाली. मोतीलाल घोष याचे एक बंधु वसंत कुमार या नांवाचे होते. त्यांनीं 'अमृत प्रवाहिनी' ही पाक्षिक पत्रिका काढली होती. वसंत कुमार यांच्या मृत्यूनें ती लवकरच बंद पडल्यावर हेमंत कुमार, शिशिर कुमार व मोतीलाल यांनीं सन १८६८ मध्यें 'अमृत बझार पत्रिके'स जन्म दिला.

तो ७१ वर्षांपूर्वींचा काळ. त्या काळीं सर्व लोकांची राहणी साधी, गरिबीची व कष्टाळूपणाची होती. तिला अनुसरून पत्रांत द्यावयाचा मजकूर आपला आपण लिहिणें, तो जोडणें व छापण्याकरितां शाई तयार करणें हीं कामें घोष बंधू स्वतःच करीत. त्यांचा छापखाना लाकडी होता व तो उभारलाहि गांवठी सुतारानेंच. पत्राला 'अमृत बझार पत्रिका' हें नांव देण्यांतहि खुबी होती. अमृत म्हणजे सरळ अर्थानें अमृत. त्याचा दुसरा अर्थ विष. म्हणून पत्रिका ही सरळ माणसाला अमृतासारखी व वांकड्याला विषासारखी वाटणारी. पत्रिका निघूं लागल्यावर थोड्याच महिन्यांत तिचा खप पांचशेंपर्यंत वाढला. सरकारी अधिकाऱ्यांच्या चुका बाहेर काढून त्यांजवर धाक बसविणें हें पत्रिकेचें ब्रीद असल्यामुळें तिजवर सरकारी अधिकाऱ्यांचा लवकरच रोष झाला. बंगाली पत्रांत व महाराष्ट्रीय पत्रांत फरक हा कीं बंगाली पत्रांच्या संपादकांचीं नांवें बहुधा गुप्त असत व महाराष्ट्रीय पत्रांचे संपादक आपलीं नांवें पत्रावर घालून आपलीं डोकीं तलवारीच्या धारेखालीं देत. पत्रिका ज्या गांवीं निघत होती तो गांव मि. राइट नामक सब-डिव्हिजनल ऑफिसराच्या ( प्रांत साहेब ) हद्दींत होता. त्याजवर पत्रिकेंत टीका येतांच त्यानें पत्रिकेवर अब्रूनुकसानीची फिर्याद केली. मोतीलाल घोष यांचे बंधू शिशिरकुमार पत्रिकेचे संपादक होते, पण त्यांचें नांव पत्रिकेवर नव्हतें. मि. राइट याच्या मनांत शिशिरकुमार यांनाच नाकधुऱ्या काढावयास लावण्याचें असल्यामुळें त्यांनीं मोतीलाल घोष यांची साक्ष काढून त्यांच्या तोंडून तसें वदविण्याचा डाव टाकला,

पण तो फसला. खटला आठ महिने चालून पत्रिकेचे मुद्रक यास सहा महिने व त्या लेखाचा लेखक राजकृष्ण मित्रा यास एक वर्ष याप्रमाणें शिक्षा झाल्या. अशा रीतीनें पत्रिकेंत सरकारी अधिकाऱ्यांवर निर्भीडपणें टीका येऊं लागल्यामुळें तिजवर सरकाराची अवकृपा झाली. सरकारची अवकृपा हीच पुष्कळदां पत्रांच्या लोकप्रियतेस कारण होत असते; हाच अनुभव पत्रिकेच्या बाबतींत येऊन तिचा लौकिक वाढत चालला.

पालूआ मागूरा या गांवीं पत्रिकेचीं सहा वर्षें गेल्यावर ती १८७४ सालापासून कलकत्यास निघू लागली. कलकत्त्यास आल्यावर कांहीं वर्षें पत्रिकेंतील निम्मा मजकूर बंगालींत व निम्मा इंग्रजींत येत असे. इंग्रजी मजकूर मूळ स्वरूपांत सरकारी अधिकाऱ्यास वाचावयास मिळाल्यामुळें त्यांतील टीका त्यांच्या अंगाला थेट जाऊन झोंबे. कलकत्त्यासारख्या शहरांत आल्यावर तेथील अनुकूल साधनांनीं पत्रिकेला पूर्वीपेक्षांहि जोमदार स्वरूप आलें. पत्रिकेंतील इंग्रजी मजकूर पाहून सरकारानें असा समज करून घेतला कीं, देशी भाषांतील पत्रें इंग्रजी पत्रापेक्षां अधिक जहाल लेख लिहितात व त्यांचा परिणाम अर्धवट शिकलेल्या वाचकांवर अनिष्ट घडून त्यांचीं मनें सरकारासंबंधानें प्रतिकूल होतात. त्यावेळीं बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर सर ॲश्ले ईडन हे होते. त्यांनीं पत्रिकेचे संपादक बाबू शिशिर कुमार यांना द्रव्याची लालूच दाखवून त्यांस सरकाराकडे वळवून घेण्याचा प्रयत्न केला. पत्रिकेसारखेंच बंगाल्यांतील दुसरें वजनदार पत्र 'हिंदू पेट्रियट.' त्या पत्राचे संपादक क्रिस्तोदास यांस त्यांनीं आगाऊ मथविलेंच होतें. फक्त पत्रिकेला तेवढेंच ओढावयाचें राहिलें होतें. ॲश्ले मोठा कावेबाज अधिकारी. त्याला वाटलें, शिशिरकुमार हा गरीब माणूस आहे; पैशाचें नांव काढलें कीं, त्याच्या तोंडाला पाणी सुटेल. म्हणून त्यानें शिशिर कुमारास भेटावयास बोलावलें. भेटींत ॲश्ले म्हणाले 'पत्रिकेकरितां तुम्ही लेख लिहाल ते छापण्यापूर्वीं मजकडे पहाण्यास पाठवीत जा. त्याच्या मोबद-

ल्यात सरकार तुम्हांला पैशाची मोठी मदत करील आणि मी प्रांताचा कारभार चालवितांना क्रिस्तोदास यांचा जसा सल्ला घेतों तसा तुमचा घेत जाईन.' बाबू शिशिरकुमार यांनीं ॲश्ले यांचा कावा ओळखला व द्रव्यप्राप्तीला भाळून न जातां आपल्या ब्रीदास जागून उत्तर दिलें 'महाराज! मलाहि वश करून घेतलेंत तर बंगाल प्रांतांत काय उरेल? म्हणून प्रांतांत एक तरी माझ्यासारखा प्रामाणिक माणूस राहूं द्या.' हें उत्तर ऐकतांच ॲश्ले पिसाळले व म्हणाले 'तुम्ही हें उत्तर कोणाला देतां माहीत आहे? तुमचें उत्तर प्रांताच्या मुख्य अधिकाऱ्याला आहे हें लक्षांत ठेवा. तुमचे लेख राजद्रोही ठरवून मी तुम्हांला तुरुंगांत घालीन आणि सहा महिन्यांच्या आंत जेसोर जिल्ह्यांत बाडबिछाड घेऊन परत जावयास लावीन!'

हिंदुस्थानाचे गव्हर्नर जनरल त्याकाळीं कलकत्त्यास रहात असत. त्यांची राजधानी दिल्लीस बदलली नव्हती. त्यांचे कान ॲश्ले यांनीं भरले व देशी भाषांतील वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य हरण करणारा कायदा त्यांजकडून पास करविला. तो कायदा इतका तडकाफडकीं झाला कीं त्याचीं तिन्ही वाचनें एकाच दिवसांत मंजूर करून घेण्यांत आलीं. पत्रिकेचे संपादक डोळ्यांत तेल घालून होतेच. पत्रिकेला कायदा ताबड-तोब लागू होणार हें त्यांना पक्कें माहीत. म्हणून कायदा होतांच लागलीच ता. २१ मार्च १८७८ रोजीं पत्रिकेचा अंक निघाला तो सारा इंग्रजींत. अशा रीतीनें हातची शिकार सुटल्यावर ॲश्ले यांना चुरमुरे खातच बसावें लागलें असेल! शुद्ध इंग्रजींत निघणाऱ्या पत्रिकेनें तर तिची इंग्रज सर-काराच्या राज्यकारभारावरील टीकाकार ही ख्याति परदेशांत सुद्धां झाली. इंग्रजी राज्यकारभाराविषयीं प्रमाणभूत मत म्हणूनहि इंग्रजांचे शत्रू तिचा उपयोग करूं लागले. इंग्रज व रशियन सरकार हे एकमेकांचे पूर्वीपासूनच प्रतिस्पर्धी आहेत. रशियन सरकारच्या कलकत्त्याच्या वकिलानें पत्रिकेचे

अंक विकत घेऊन त्यांचें भाषातर रशियांत पाठवावें व रशियन सरकारानें 'हा पहा इंग्रजांचा हिंदुस्थानांतील राज्यकारभार' असें म्हणून ते सर्व रशियाभर वांटून इंग्रजी राज्याची नाचक्की रशियांत करावी !

बाबू शिशिर कुमार यांच्या मृत्यूनंतर पत्रिकेचें संपादकत्व मोतीलाल यांजकडे सर्वस्वीं आलें. शिशिर कुमार हयात असतांनाहि मोतीलाल पत्रिकेंत लिहीत असल्यामुळें शिशिर कुमारांच्या मृत्यूनंतरहि पत्रिकेचें धोरण पूर्वीसारखेंच कडक राहिलें. ता. १० फेब्रुवारी सन १८९१ सालीं पत्रिका रोजची झाली. मोतीलालांचें संपादकत्वहि त्यांच्या बंधूप्रमाणें गुप्तच होतें. यामुळें त्यांना ठेंचण्यासाठीं सरकाराचे हात वळ-वळूनहि कांहीं उपयोग नव्हता; म्हणून मोतीलाल यांजवर एकदां आलेली तोहमत मोठ्या मजेनें निघून गेली. तिची हकीकत अशी—परदेशांत इकडून मजूर पाठविण्याकरितां सरकारानें कानपुरास मि. जी. ई. हॉफ या अधिकाऱ्यास नेमलें होतें. त्यानें व त्याच्या साथीदारांनीं रामप्यारी नामक स्त्रीला सात आठ दिवसपर्यंत कानपुरास आपल्या कोंडवाड्यांत (डेपो) अडकवून ठेवून तिचे दागिने काढून घेतले. या बाबतींत हॉफ यांजवर सन १९०१ सालीं अलाहाबादेस खटला सुरू झाला. खटल्याची हकीकत पत्रिकेकडे तारेनें आली. तारेची स्वाभाविकच त्रोटक बातमी छापतांना पत्रिकेची चूक झाली आणि रामप्यारीला अन्यायानें अटक करणें, तिचे दागिने चोरणें व तिजवर हल्ला करणें असे आरोप हॉफवर रामप्यारीनें केल्याचें पत्रिकेंत प्रसिद्ध झाले. यांपैकीं हल्ल्याचा (outrage) आरोप खोटा असल्याचें पत्रिकेच्या बातमीदाराच्या नजरेस येतांच त्यानें आरोपीची माफी मागून पांचशें रुपये दंड भरला.

हॉफ यास वरील निकालानें दुप्पट जोर चढून तो पत्रिकेच्या मागें लागला. त्यानें पत्रिकेचे संपादक मोतीलाल व मुद्रक आशुतोष दे यांजवर अब्रुनुकसानीचा दावा आणिला. दावा कानपुरास चालला. मोती-

लाल यांनीं लेखी कैफियत दिली. तिच्यांत म्हटलें 'मी पत्रिकेचा संपादक आहें. तिच्यांत अग्रलेख व उपलेख लिहितों. पण इतर प्रसिद्ध होणाऱ्या मजकुराशीं माझा संबंध नाहीं,' तरी त्यांस मॅजिस्ट्रेटानें एक हजार रुपये दंड ठोठावला. पण अपिलांत ते निर्दोषी ठरले. कारण पत्रिकेंत वरील मजकूर आला तेव्हां मोतीलाल कलकत्त्यास नसल्याचें सिद्ध झालें.

हिंदी लोकमत दर्शविणारें पत्र म्हणून बड्या सरकारी अधिकाऱ्यांनीं पत्रिका वाचावीच; पण प्रिन्स ऑफ वेल्स या सारख्यांनींहि ती वाचल्याशिवाय राहूं नये. माजी बादशहा पंचम जार्ज युवराज असतां हिंदुस्थानांत १९०६ सालीं आले होते. पत्रिका त्यांच्या वाचण्यांत येत असल्यानें कलकत्त्यांतील मुक्कामांत त्यांना मोतीलाल यांची समक्ष भेट घेण्याची इच्छा झाली. बंगाली लोक भाविक, हिंदी लोकांत राजभक्ति खिळलेली, मोतीलाल यांस युवराजासमोर येतांच भक्तीचें भरतें येऊन त्यांनी इंग्रजी रिवाजाप्रमाणें हस्तांदोलन न करतां युवराजापुढें गुडघे टेकले व म्हटलें 'हिंदुस्थान फार गरीब आहे. त्याची स्थिति अतिशय वाईट आहे. आपण हिंदुस्थानाचे युवराज, तेव्हां त्याचें रक्षण खाविंदांनींच केलें पाहिजे. येथून गेल्यावर हिंदी लोकांना विसरूं नका. चार कोट इंग्रज जसे तुमचे, तसे हेहि तुमचे. त्यांना खाविंदांची सहानुभूति पाहिजे.'

युवराजांनीं त्यांस उत्तरहि तसेंच दिलें. ते म्हणाले 'मी हिंदी लोकांना विसरणार नाहीं व विसरूं शकणार नाहीं. तुम्हांला अधिक सहानुभूतीची गरज आहे हें मी पित्याला सांगेन.'

मोतीलाल भाविक तसे विनोदीहि असत. त्यांच्या लिहिण्यांत उपरोध व विनोद असे. सन १९१० सालीं इंडियन प्रेस ॲक्टाखालीं पत्रिकेस पांच हजारांचा जामीन भरावा लागला. म. गांधीच्या काळांत पत्रिकेंत 'हिंदुस्थान कोणाचा', व 'म. गांधींना अटक' असे दोन

लेख आले. ते आक्षेपार्ह ठरवून सरकारानें पहिला पांच हजारांचा जामीन जप्त केला व नवा दहा हजारांचा मागितला. मोतीलाल मूळचे अशक्त, त्यांत वार्धक्यानें जर्जर झालेले, अशा स्थितींत त्यांचें देहावसान ५ सप्टेंबर १९२२ रोजीं कलकत्त्यास झालें. तेव्हां त्यांचें वय ७५ वर्षांचें होतें.

'अमृत बझार पत्रिके'चें नांव जितकें मोठें तितकें तिचे संपादक बाबू शिशिर कुमार व मोतीलाल यांचें नव्हतें. त्यांचें शिक्षण व कर्तृत्व बेताचें असल्यामुळें त्यांना समाजांत मान फारसा मिळाला नाहीं. तशी स्थिति 'बंगाली' पत्राचे संपादक बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांची नव्हती. सुरेंद्रनाथांच्या लौकिकाचा संपादकत्व हा एक पैलू झाला. त्यांहूनहि विशेष गुण त्यांच्या अंगीं किती तरी होते. रिपन कॉलेजचे प्रिन्सिपाल, राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष, बंगाल प्रांताचे पुढारी, बृहस्पतितुल्य वक्ते व फर्डे इंग्रजी लेखक इत्यादि अनेक दिशांनीं त्यांना लोकसेवा करतां आली. आयुष्याच्या अखेरीस ते बंगाल कौन्सिलांत दिवाणपदावर चढले व सरकारानें त्यांना सर ही पदवी देऊन भूषविलें. दिवाणपदावर असतां त्यांना द्रव्यप्राप्तीहि चांगली झाल्यामुळें त्यांची इहलोकांतील यात्रा सर्व दृष्टींनीं यशस्वी ठरली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सुरेंद्रनाथ बानर्जी व मोतीलाल घोष हे दोघे समकालीन आणि समान संपादकीय व्यवसायामुळें परस्परांचे प्रतिस्पर्धीहि. दोघांच्या वयांत फक्त एकाच वर्षाचें अंतर. मोतीलाल यांचा जन्म

**सुरेंद्रनाथ बानर्जी**

सन १८४७ सालचा तर सुरेंद्रनाथांचा १८४८ मधला. उभयतांच्या वयात जें अंतर नव्हतें तें त्यांच्या परिस्थितींत पडलें. मोतीलालप्रमाणें सुरेंद्रनाथांचें शिक्षण न खुरटतां त्याची शक्य तितकी अभिवृद्धि झाली. त्या काळांत बी. ए. पर्यंतचें शिक्षणहि पुष्कळांस भरपूर वाटण्यासारखें होतें.

सुरेंद्रनाथ बी. ए. तर झालेच, पण इंग्लंडांत जाऊन आय्. सी. एस्. परीक्षाहि देऊन आले. तथापि त्यांचें नशीब असें कीं त्यांस सरकारी नोकरीहि अंगीं लागूं नये व बॅरिस्टरीवरहि पैसे मिळवावयास सांपडूं नये. वयाच्या एकवीसाव्या वर्षी आय्. सी. एस्. होऊन सिलहट येथें पहिला वर्ग मॅजिस्ट्रेटाच्या हुद्यावर असतां त्यांचें वरिष्ठाशीं भांडण झालें व त्यांतच त्यांस बडतर्फ व्हावें लागलें. एवढी वाढती व बडी नोकरी गमावल्यानें हिंमत खचूं न देतां बॅरिस्टरीकरितां ते फिरून इंग्लंडला गेले. पण त्यांचें पूर्व पातक आडवें येऊन नोकरींत बडतर्फ झालेला बॅरिस्टरी-लाहि अपात्र ठरला व त्यामुळें सुरेंद्रनाथांना हात हालवीत स्वदेशाचा मार्ग सुधारावा लागला !

सुरेंद्रनाथ द्रव्यार्जनाच्या उद्योगास मुकून देशसेवेस लाभले हें भरतभूमीचें सुदैव समजलें पाहिजे. त्यांची बौद्धिक व मानसिक शक्ति प्रचंड होती, वक्तृत्व अलौकिक व आंग्लभाषाप्रभुत्व असाधारण. अशा अचाट सामर्थ्याच्या व्यक्तीस करावें तें काम थोडेंच वाटून तिनें अनेक कामें स्वतःवर आपखुषीनें लादून घेतलीं. कलकत्यास रिपंन कॉलेज सुरेंद्रनाथांनीं काढलेंच. पण तेवढ्यानें दमचक्की पुरी होणारी नसल्यानें त्यांनीं ज्या कित्येक कार्यांना हात घातला त्यांपैकींच वृत्तपत्रव्यवसाय हा होय. क्रिस्तोदास पाल यांच्या 'हिंदू पेट्रियट' पत्राप्रमाणेंच बाबू बच्चाराम चतर्जी या गृहस्थानें 'बंगाली' नामक पत्र चालविलें होतें. सुरेंद्रनाथांना स्वतःचें एक पत्र असावेंसें वाटलें, तेव्हां 'बंगाली' पत्र अगदींच खालावून त्याचे वर्गणीदार अवघे २०० च शिल्लक राहिले होते. सुरेंद्रनाथांच्या मनांत हेंच पत्र खरेदी करण्याचें आलें. पण सुरेंद्र स्वतः पडले अगदींच कफल्लक. त्यांच्यापाशीं पत्राच्या व छापखान्याच्या खरेदीस लागणारा पैसा नव्हता. पण बच्चारामजीहि तसे द्रव्यलोभी नव्हते. त्यांना पत्र चांगल्या रीतीनें चालू रहावें एवढीच इच्छा असल्यानें त्यांनीं स्वामित्वाबद्दल अवघे

दहाच रुपये घेऊन त्याचा मालकी हक्क सुरेंद्रनाथांस दिला. पण छाप-खान्यासाठीं मात्र १६०० रु. भरावे लागले, ते सुरेंद्रांनीं लोकांपासून उसनवार पैसे काढून भरले.

सुरेंद्रनाथासारख्या सामर्थ्यवान व पराक्रमी नरपुंगवाच्या हातीं हें शस्त्र पडतांच त्याच्या अंगीं एक प्रकारची वीरश्री उत्पन्न होऊन त्यांनीं आपल्या गोलंदाजीस धडाक्यानें सुरुवात केली. सुरेंद्रनाथ स्वतः कलकत्ता विद्यापीठाचे पदवीधर, कलेक्टर, कमिशनर यांच्या तोडीचे आय्. सी. एस्. व त्या काळांत दुर्लभ अशा बॅरिस्टरीपर्यंत गेलेले. त्यामुळें सहाजिकच त्यांस आपल्यासमोर पसरलेल्या देशांत स्वतःपेक्षां अधिक योग्यतेचा माणूस अधिकारीवर्गांत व हिंदी समाजांतहि नाहीं असा आत्मविश्वास वाटून त्यांनीं निर्भयपणानें साप्ताहिक बंगाली पत्रांतून आठवड्याच्या आठवड्याला वाग्बाण सोडून प्रतिपक्षाला जर्जर करण्याचा क्रम चालविला.

वृत्तपत्राचें संपादकत्व ही सुळावरची पोळी आहे. त्यांत मानाची पोळी असली तरी सुळावरची होळीहि आहे. किंबहुना त्या होळीस वगळून खाल्लेली पोळी गोडहि लागावयाची नाहीं. पत्र हातीं घेतलें तेव्हांच सुरेंद्रनाथ तें दत्त जाणून होते. त्यांनीं आपल्या कलमबहादुरीनें पत्राचा प्रसार वाढवून कर्ज चुटकीसरसें अल्पावधींत वारलेंच. पण जो जनतेच्या जिवाचा कलिजा बनला तो लोकनायक, सरकारी अधिकाऱ्यास वैऱ्यासारखा असह्य व्हावा हा हिंदुस्थानांत तरी सिद्धान्तच होऊन बसला आहे. 'बंगाली' पत्र अधिकारी वर्गाच्या डोळ्यावर येण्यास तसेंच निमित्त घडलें. बंगाल्यांत त्यावेळीं सर ॲशले ईडन हे लेफ्टनंट गव्हर्नर असल्याचें मागें सांगितलेंच आहे. ते स्नेहसंबंधास फार सरळ. हा गोरा, हा काळा असा भेद त्यांजपाशीं नव्हता. पण राजकीयदृष्ट्या ते पक्के (ब्यूरोक्रॅट) सरकारचे हितवादी व हिंदी लोकांचे हितशत्रु होते. असें असतांहि त्यांच्या हिंदी समाजांतील चहात्यांनीं व मित्रांनीं नोकरी

संपून स्वदेशीं प्रयाण करण्याच्या समयीं जाहीर सभा भरवून त्यांस मानपत्र देण्याचें योजिलें. याची कुणकुण सुरेंद्रनाथास लागतांच त्यांचा देशाभिमान खवळला व त्यांनीं आपल्या 'बंगाली' पत्रांतून लेखमाला लिहून मानपत्राच्या चळवळीविरुद्ध लोकमत क्षुब्ध करून सोडलें. त्यामुळें तात्काळ शुद्धीवर येऊन गव्हर्नरांच्या चहात्यांनीं कलकत्त्याच्या टाऊन हॉलांतील सार्वजनिक सभेचें स्वरूप बदललें व तिला खाजगी रूप दिलें.

सुरेंद्रबाबूंच्या या चळवळीनें अधिकारी वर्गाचा रोष त्यांजवर होऊन त्याबद्दलचा वचपा संधि साधून काढावयाचाच असा त्यांनीं संकल्प केला. त्यानंतर ता. २ एप्रिल सन १८८३ रोजीं 'बंगाली' पत्रांत एक स्फुटलेख आला. कलकत्ता हायकोर्टांत मि. मॉरिस नांवाचा एक तरुण मनुष्य न्यायाधीश म्हणून नेमला गेला होता. त्यानें एका खटल्यांत हिंदु पक्षकारास आपल्या देवघरांतील शाळिग्राम कोर्टांत आणण्यास भाग पाडलें, अशी बातमी 'ब्रम्हो पब्लिक ओपीनियन' या पत्रांत प्रसिद्ध झालेली बानर्जींनीं वाचली. ती वाचतांच या तरुण व जाज्वल्य संपादकाचा त्वेष अनावर होऊन त्यानें त्याच्या आधारें आपल्या 'बंगाली' पत्रांत न्यायाधीशावर खरमरीत टीका केली व हिंदूंना त्यांच्या नेभळेपणाबद्दल दोष दिला. इंग्लंडांत दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दींत इ. स. १६७७ च्या सुमारास जॉर्ज जेफ्रेस या नांवाचा एक न्यायाधीश होता. त्यानें राजाच्या दुर्वर्तनामुळें सरकार व लोकपक्ष यांजमध्यें वितुष्ट आलें तेव्हां सरकारची बाजू घेऊन लोकपक्षीय पुढाऱ्यांना कडक शिक्षा ठोठावल्या. त्याज-बरोबर सुरेंद्रनाथांनीं या लेखांत न्यायाधीश मि. मॉरिस यांची तुलना केली होती. ती झोंबून हायकोर्टानें बेअदबीच्या आरोपावरून सुरेंद्रबाबूंस आपल्या समोर खेंचलें. या प्रका-रचा हा पहिलाच खटला असल्यामुळें त्यानें बंगाली लोकांचीं मनें क्षुब्ध व अस्वस्थ करून सोडलीं. खटला कलकत्ता हायकोर्टाच्या फुलबेंचापुढें

निघाला, तेव्हां हायकोर्टांत अतिशय गर्दी लोटली. फुलबेंचांतील न्यायमूर्तींत बाबू रमेशचंद्र दत्त हेहि होते. ते सुरेंद्रबाबूंचे परमस्नेही. दोघेहि विलायतेस आय्. सी. एस्. करितां बरोबर गेलेले व ती परीक्षा उतरून बरोबरच परत आलेले. त्यामुळें रमेशचंद्रांचा ओढा सहजच सुरेंद्रांकडे. शिवाय न्यायाचा कांटा लावला तरी सुरेंद्रनाथ निर्दोषी आहेत असाच त्यांचा अभिप्राय; म्हणून रमेशचंद्र व इतर न्यायमूर्ती यांचा खाजगी वाटाघाटींत मतभेद झाला व तोच शेवटीं जाहीरपणेंहि उघड होऊन फुलबेंचानें बहुमतानें सुरेंद्रनाथांस दोषी ठरविलें व दोन महिन्यांची सजा सुनावली. शिक्षा ऐकून बंगाल्यांत त्वेषाची अधिकच लाट उसळली व निषेधाच्या सभा सर्व बंगालभर भरल्या. नवीन सुधारणा कायद्याप्रमाणें दिवाणपदाचा व संपत्तीचा यथास्थित उपभोग घेतल्यावर सर सुरेंद्रनाथ ता. ९ ऑगस्ट सन १९२५ रोजीं मरण पावले.

त्यांच्या शिक्षेचा अनुकूल परिणाम असा झाला कीं, त्यामुळें वर्तमानपत्रांविषयीं जनतेस सहानुभूति वाटून त्यांचें वजन वाढलें व नवीन वृत्तपत्रें काढण्यास धाडसी व देशाभिमानी लोकांना उत्तेजन मिळालें. त्या उत्साहाच्या भरांत सुप्रसिद्ध 'वंगवासी' या नव्या पत्राचा जन्म झाला. त्याचे संपादक बाबू जोगेंद्रनाथ बोस. त्यांनीं 'वंगवासी'ची किंमत एका अंकाला फक्त एक पैसा ठेवली. 'वंगवासी'चा कित्ता बाबू किस्तो कुमार मितर यांनीं गिरवून 'संजीवनी' नामक पत्र काढलें व त्यानें कालान्तरानें मोठी कीर्ति संपादिली.

वर्तमानपत्रास त्या काळीं मिळकत फार थोडी असे. संपादकाचा व मालकाचा संसार नीट चालला म्हणजे डोक्यावरून पाणी गेलें. त्यांच्यापाशीं गंडांतरांतून निभावून बाहेर पडण्यास शिलकी पुंजी नसावयाची. पण अशीं गंडांतरें वारंवार येणार असें 'बंगाली' पत्रावरील खटल्यानें तर सिद्धच केलें, म्हणून बंगाल्यांतील देशभक्तांनीं

त्याच्या मदतीकरितां एक निधि जमविण्याचें ठरविलें. कृष्णनगरचे बाबू तारापद बानर्जी या कल्पनेचे उत्पादक. त्यांच्या प्रयत्नानें वीस हजारांपर्यंत निधि जमून तो राष्ट्रकार्याप्रीत्यर्थ कलकत्ता येथील 'इंडियन असोसिएशन' या संस्थेच्या स्वाधीन करण्यांत आला.

सुरेंद्रनाथ बानर्जी यांस शिक्षा ता. ५ मे १८८३ रोजीं होऊन ते ता. ४ जुलै रोजीं सुटले. सुटकेनंतर त्यांची कीर्ति साऱ्या हिंदुस्थानभर पसरून त्यांची गणना हिंदुस्थानांतील पहिल्या प्रतीच्या पुढाऱ्यांत करण्यांत आली. सुरेंद्रबाबूंचें उदाहरण पाहून खुद्द बंगाल्यांत राष्ट्रीय बाण्याचीं नवीं नवीं जोमदार पत्रें निघालींच, पण त्यांनीं स्वतःच्या प्रेरणेनें पंजाबांतहि नवीं पत्रें काढण्यास प्रोत्साहन दिलें. लाहोरचें 'ट्रिब्यून' पत्र त्यांपैकींच. सरदार दयाळसिंग यांनीं सन १८८०त 'ट्रिब्यून'ची प्राणप्रतिष्ठा केली. त्या पत्राकरितां छापखाना व शीतलचंद्र चतर्जी हे संपादक सुरेंद्रांनींच मिळवून दिले.

सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं 'बंगाली' पत्र सन १८७९ सालीं ताब्यात घेतलें. तें त्यांनीं प्रथम साप्ताहिक स्वरूपांतच जोमानें चालवून फारच उदयास आणिलें. पण सन १९०० सालाच्या सुमारास इंग्रजी साप्ताहिकांचा काळ संपून दैनिकांचा काळ आला असल्याचें त्यांना जाणवूं लागलें. कारण त्यांचें पत्र इतर पत्रांच्या मागें पडत चाललें. म्हणून त्यांनीं सन १९०० मध्यें साप्ताहिकाचें दैनिक बनविलें. त्यांनीं बंगालीशीं आपला संबंध १९१९ नंतर सोडला. म्हणजे सदर पत्राचे संपादक असे ते सतत ४० वर्षें राहिले. अशा प्रकारचीं उदाहरणें हिंदुस्थानांत फारच विरळा. आधीं दीर्घायुष्य कमी व कामाची धमक त्याहूनहि कमी. या दृष्टीनें त्यांचा संपादकीय अनुभव अमोलिक समजला पाहिजे. त्या अनुभवांत वृत्तपत्रीय व्यवसायाची गुरुकिल्लीहि सांपडते. ते आपल्या आत्मचरित्रांत लिहितात, 'पत्राचें यश संपादक व व्यवस्थापक या जोडीवर अवलंबून आहे.

संपादकाचें व्यक्तिमाहात्म्य पत्राला वजनदारी व ग्राहक मिळवून देतें व व्यवस्थापक जमाखर्चाची बाजू संभाळून पत्राला अन्न पुरवितो. संपादकाचें कर्तव्य पुढाकार घेऊन लोकमतास वळण लावण्याचें आहे. त्यानें लोकमताचा कल संभाळून वागलें पाहिजे. जर का तो लोकमताविरुद्ध गेला तर पत्राचे वर्गणीदार तुटतात व वर्गणीदार तुटतांच जाहिरातींची चंदीहि कमी पडते. मी आपल्या पत्रांत राजद्रोह, बेअदबी व वैयक्तिक टीका शक्य तितकी टाळली. माझे लेख कडक असत; जवळजवळ राजद्रोहीहि असत. पण ते राजद्रोही असे कधीं ठरले नाहींत. मी विशिष्ट परिस्थितींतील जरुरी व लोकांची अपेक्षा ओळखून कधीं कधीं फार जहालहि लिहीत असे. बंगालच्या फाळणींत असले कडक लेख मी लिहिले. वर्तमानपत्राला अब्रूनुकसानीचा गुन्हा टाळून चालत नाहीं. लोकहिताकरितां तो धोका सोसावाच लागतो. मजवर वैयक्तिक हल्ले झाले, पण तिकडे लक्ष देऊं नये असा माझा नियम होता. संपादकाने इतकें धोरण सार्वजनिक बाबतींत संभाळलें पाहिजे. पण तेवढ्यानेंहि भागत नसून त्याचा व्यवस्थापकाशींहि एकजीव असावा. तसे ते उभयतां वागले तरच पत्र भरभराटींत रहातें.' सुरेंद्रनाथांनंतर १८९१ सालीं 'बंगवासी' पत्रावर राजद्रोहाचा खटला झाला. पण संपादकानें माफी मागितल्यामुळें तो काढून घेण्यांत आला.

**बिपिनचंद्र पाल**

बाबू बिपिनचंद्र पाल हे एक तत्त्वनिष्ठ संपादक बंगाल्यांतील वृत्तपत्रव्यवसायास लाभले. त्यांची तत्त्वनिष्ठा अगदीं लहानपणींच कसास लागली. तत्त्वनिष्ठेच्या नादीं इतके लवकर ते गुंतले नसते, तर आय्. सी. एस्. होऊन बंगाल्यांत कमिशनराच्या दर्जापर्यंत सर रमेशचंद्र दत्त यांजप्रमाणें पोंचावें इतक्या श्रेष्ठ दर्जाची बुद्धिमत्ता त्यांच्या ठिकाणीं होती. बिपिनबाबूंच्या विद्यार्थिदशेंत बंगाल्यावर बाबू केशवचंद्र सेन या ब्रह्मोसमाजिष्ट विद्वान् वक्त्याच्या मताची छाप बसली होती. बिपिनचंद्र पाल

१८५८ सालीं जन्मले. त्यांचे पिते रामचंद्र पाल हे वकील असून त्यांस बिपन हाच एकुलता एक पुत्र होता. मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर तो कलकत्त्यास पुढील शिक्षणांकरिता आला असतां केशवचंद्र सेन यांच्या ब्रह्मोसमाजी मताचा त्याजवर विलक्षण परिणाम झाला. तो इतका कीं त्यानें तींच मतें स्वीकारलीं. बापानें त्यास धाक घालून पाहिला, त्याचा उपयोग मुळींच झाला नाहीं. शेवटीं बापानें रागावून त्याचा शिक्षणक्रम चालविण्यास द्रव्यसाहाय्य करण्याचें थांबविलें. तेव्हां बिपिन पाल यांनीं न डगमगतां शिक्षण बंद ठेवून कटक येथील हायस्कुलांत हेडमास्तराची जागा पत्करली. कटकहून ते बंगलोरास आले व तेथील हायस्कुलांत हेडमास्तर झाले. पण बंगलोर दूर पडल्यामुळें तिकडची नोकरी, त्यांनीं कलकत्त्यांतील नगरग्रंथालयांत व्यवस्थापकाची ( लायब्रेरीयन ) शंभर रुपये दरमहा पगाराची जागा मिळाल्यावर सोडली.

मद्रासेस पहिली राष्ट्रीय सभा भरली, तिच्यांत हत्याराच्या कायद्याविरुद्ध आलेल्या ठरावावर बिपिनचंद्र यांनींच भाषण केलें. बिपिनचंद्रांचा आवाज खणखणीत व तीक्ष्ण, वक्तृत्व अस्खलित व इंग्रजी भाषा जिव्हाग्रीं नाचणारी, या गुणांनीं त्यांची अखिल भारतीय वक्त्यांतील श्रेष्ठ वक्त्यांत गणना होण्यास विलंब लागला नाहीं. सन १९०० सालीं ते ऑक्सफोर्ड येथें धर्माचा अभ्यास करण्यास गेले. तेथें असतांना इंग्लंडांत इतरत्र व परत येतांना फ्रान्स व अमेरिका यांत त्यांनीं हिंदुधर्मावर व्याख्यानें दिलीं आणि आपल्या प्रवासाचा खर्च तिकडील मासिकांत लेख लिहून भागविला. ते धार्मिक व सामाजिक बाबींप्रमाणें राजकारणांतहि सुधारक होते. परदेशांतून हिंदुस्थानात आल्यावर आपल्या विचाराच्या प्रसाराकरितां त्यांना वर्तमानपत्र काढण्याची जरुरी भासली. त्याप्रमाणें त्यांनीं 'न्यू इंडिया' हें इंग्रजी साप्ताहिक पत्र

काढून सात वर्षें चालविलें. बंगाल्यांत वंगभंगाविरुद्ध चळवळ सुरू झाली त्या वेळीं 'वंदे मातरम्' या शब्दाचा व राष्ट्रगीताचा इंग्रज लोक द्वेष करूं लागले. बिपिनचंद्र यांनीं तेंच नांव देऊन 'वंदे मातरम्' या नांवाचें इंग्रजी दैनिक पत्र सुरू केलें. या पत्रानें बंगाली लोकांना संजीवनीच दिली. पत्राची भाषा रसाळ, भावनाप्रधान, सोपी, सुबोध व प्रासादिक असल्यामुळें त्याचा प्रसार साऱ्या हिंदुस्थानभर अल्पावधींत झाला. तरुण शिक्षितांच्या त्याजवर उड्या पडून स्वदेशाभिमानाच्या दिव्य भावनेनें त्यांच्या विकास पावणाऱ्या मनांत पेट घेतला. वंगभंगाच्या चळवळींत बिपिनबाबूंनीं बजावलेली देशसेवा, सोसलेले कष्ट व भोगलेले हाल संस्मरणीय होत. बंगाल्यांतून मद्रासेस जाऊन त्यांनीं स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या विषयांवर जीं भाषणें केलीं त्यांनीं मद्रास इलाखा जागृत झाला. पुढें कांहीं कारणानें त्यांचा 'वंदे मातरम्' पत्राशीं संबंध तुटला. सदर पत्राचे मूर्धाभिषिक्त संपादक बाबू अरविंद घोष यांजवर सरकारानें राजद्रोहाचा खटला भरला. त्या खटल्यांत अरविंदबाबूंचें संपादकत्व शाबीत करण्याकरितां बिपिनचंद्रांची सरकारपक्षानें साक्ष काढली. पण अरविंदबाबूंस वांचविण्यासाठीं त्यांनीं कोर्टांत आल्यावर साक्ष देण्याचेंच नाकारलें व त्याबद्दल त्यांस सहा महिन्यांची शिक्षा झाली. आधीं वंगभंगासारखी राष्ट्रीय क्षोभकारक प्रचंड चळवळ, तींत असल्या गुन्ह्याबद्दल ही पहिलीच शिक्षा, यामुळें पालबाबूंची देशभक्त म्हणून सर्वत्र वाहावा होऊन 'लाल बाल पाल' या राष्ट्रीय त्रैमूर्तींपैकीं ती एक मूर्ति बनली. १९०८ सालीं सर्वत्र दडपशाही सुरू झाल्यावर सन १९०९ सालीं पालबाबू इंग्लंडांत गेले. तेथें त्यांनीं 'स्वराज्य' हें मासिक पुस्तक चालविलें. इंग्लंडांतून १९११ मध्यें परत मुंबईस आल्यानंतर त्यांतील एका लेखाबद्दल पाल यांजवर खटला झाला. त्या खटल्यांत त्यांनीं माफी मागितली, तरी त्यांना शिक्षा व्हावयाची ती झालीच. तेव्हां-

यासून राजकारणांतून पालबाबूंची पिछेहाट दिसूं लागली. लो. टिळक १९१४ सालीं मंडालेहून सुटून आल्यावर त्यांनीं राष्ट्रीय पक्षाच्या राजकारणाची मोडलेली घडी बसवितांना पालबाबूंना आपल्या मदतीस घेतलें व विलायतेच्या शिष्टमंडळांतहि त्यांना नेलें. त्या काळांत राजकारणात ते पुनः झळकूं लागले. पण टिळकांच्या मृत्यूनंतर म. गांधी राजकीय नेते बनले; त्यांच्या राजकारणाशीं बिपिनचंद्र पाल यांचें जमेनासें झाल्यामुळें त्यांचा अस्तच झाला व तो कायमचाच ठरला. या प्रतिकूल परिस्थितींत एक तप काढून त्यांनीं वार्धक्यानें जर्जर झालेला देह, वयाच्या ७७व्या वर्षी म्हणजे ता. २० मे १९३५ रोजीं, कलकत्ता येथें ठेवला.

**अरविंद घोष**

वंगभंगाच्या चळवळीकरितांच ज्याचा जन्म असें बंगाल्यांतील वर्तमानपत्र 'वंदे मातरम्'. वंदे मातरम् पत्राचा पहिला अंक ता. ७ ऑगष्ट १९०६ रोजीं प्रसिद्ध झाला. त्या पत्राबरोबरच हिंदी राजकारणांत ज्यांनीं प्रवेश केला ते प्रसिद्ध बंगाली पुढारी बाबू अरविंद घोष. अरविंदबाबू चळवळीबरोबरच उदयास आले व चळवळीबरोबरच अस्तास गेले. 'वंदे मातरम्' पत्रावर संपादक म्हणून अरविंद घोष यांचें नांव कधींच नव्हतें. याचें कारण कदाचित् प्रसिद्धीचा कंटाळा हेंहि असूं शकेल. अरविंदांसारख्या धार्मिक वृत्तीच्या गृहस्थास प्रसिद्धीची पर्वा वाटूं नये हें स्वाभाविक होय. वंगभंगाची चळवळ सुरू झाल्यावरच ते बंगाल्यांत प्रथम रहावयास आले. त्यांचें सारें आयुष्यच लोकविलक्षण व अद्भुतरम्य. अरविंदांचा जन्म कलकत्त्यास सन १८७२ सालीं कायस्थ घराण्यांत झाला. पण पाश्चिमात्य संस्कृतीनें मोहून गेलेल्या त्यांच्या पित्यानें त्यांना वयाच्या सहाव्या वर्षींच विलायतेस शिक्षणाकरितां पाठविलें. स्वभाषेचा संस्कार बालवयांतहि न होता इंग्रजांचे संस्कार रक्ताच्या प्रत्येक थेंबांत भिनून आपला पुत्र प्रतिइंग्रज बनून हिंदुस्थानांत यावा हा पित्याचा निश्चय. अरविंदांनीं इंग्लंडच्या हवेंत बारा वर्षें श्वासोच्छ्वास केला. हिंदी मुलानें

जन्मास येऊन कृतकृत्य समजावयाचें तर त्याची आय्. सी. एस्. परीक्षा झालीच पाहिजे! त्याप्रमाणें १८९० सालीं अरविंदानीं आय्. सी. एस्. परीक्षा दिलीहि. पण शारीरिक परीक्षेंत ते अपात्र ठरल्यामुळें बड्या सरकारी नोकरीस मुकले. शेवटीं इंग्लंडांतून रिकामे हात हालवीत हिंदुस्थानांत येण्यापेक्षां बी. ए.ची परीक्षा द्यावी असें योजून ते १८९२ मध्यें बी. ए. स बसले व पहिल्या वर्गांत उतरले.

बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव गायकवाड मोठे गुणज्ञ. त्यांची व बाबू अरविंद घोष यांची गांठ पडून महाराजांनीं त्यांना आपल्या राज्यांतील नोकरींत घेतलें. बडोद्यांत त्यांनीं चौदा वर्षें काढलीं. हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ. त्या काळांत त्यांनीं पुढील आयुष्याची पूर्वतयारी केली. त्यांच्यासारख्या विद्वानाला अध्यापकाचा पवित्र व्यवसायच योग्य. तो व्यवसाय कांहीं काळ लाभून ते बडोदा कॉलेजाचे व्हाईस प्रिन्सिपाल झाले. बडोद्याच्या शांत व पवित्र वातावरणांत गंभीर व उदात्त वृत्तीच्या अरविंदांचें लक्ष संस्कृत विद्या, योगशास्त्र व अध्यात्म यांकडे वळून त्यांत त्यांची पुष्कळच प्रगति झाली. ऐहिक सुखाविषयीं ते बेपर्वा बनले. चौदा वर्षांच्या धार्मिक व्यासंगानें त्यांना आत्मविश्वास उत्पन्न झाला असल्यामुळें बंगाल्यांत राष्ट्रीय चळवळीची लाट उसळतांच नोकरी सोडून ते स्वदेशाची सेवा करण्याच्या उद्देशानें कलकत्त्यास आले. कलकत्त्यांत बंगाल्यांतील चळवळीला पद्धतशीर स्वरूप आणण्याकरितां वर्तमानपत्र काढण्याचा निश्चय ज्या मंडळीनें केला त्यांत बाबू अरविंद घोष होते हें सांगावयास नकोच. त्या हेतूनें एक जॉइंट स्टॉक कंपनी स्थापण्यांत येऊन तिनें दैनिक इंग्रजी 'वंदे मातरम्' पत्र काढण्याचें योजलें. 'वंदे मातरम्' पत्राचे पहिले संपादक बाबू बिपिनचंद्र पाल; पण तात्त्विक मतभेदामुळें पालबाबूंनीं 'वंदे मातरम्' पत्राचा संबंध सोडला व अरविंदांनीं जबाबदारी पत्करली. अरविंदबाबूंच्या राष्ट्रीयत्वाचा

धर्म हा पाया असल्यानें त्यांनीं आपल्या पत्रांतून हिंदु संस्कृति, वैदिक धर्म व अध्यात्म विद्या यांची थोरवी गाऊन त्याजपुढें पाश्चिमात्य सुधारणा, पाश्चिमात्य विचार हीं तुच्छ होत असें प्रतिपादण्यास सुरुवात केली. 'वंदे मातरम्' पत्राची भाषा हायस्कुलाच्या वरच्या वर्गांतील मुलांना सहज समजेल इतकी सोपी होती. त्यामुळें 'वंदे मातरम्' पत्राचा प्रसार साऱ्या हिंदुस्थानभर हां हां म्हणतां झाला. स्वराज्यासाठीं आत्मत्याग करावा, क्लेश सोसावे याची शिकवण त्यांतून इतक्या स्फूर्तिदायक रीतीनें करण्यांत येऊं लागली कीं, बंगाल्यांतील व बंगाल्याबाहेरील हजारों तरुण त्या संजीवनीनें बेभान होऊन संसारावर लाथ मारण्यास सिद्ध झाले. 'वंदे मातरम्'नें देशांत अल्पकालपर्यंत स्वर्गीय वातावरण उत्पन्न केलें व त्या वातावरणांत राष्ट्रीय भावना पतंगाप्रमाणें झोके खात डौलानें स्वराज्य-सोपान चढावयास लागली.

'वंदे मातरम्' हें इंग्रजी पत्र. पण त्याहूनहि आवेशयुक्त लेख लिहिणारीं बंगाली पत्रें त्यावेळीं बरींच निघालीं होतीं. त्यांपैकींच 'युगांतर' पत्र होतें. युगांतरांत 'काबुली दवाई' या नांवाचा एक लेख आला. त्याचा अर्थ काबुली दवा. काबुली म्हणजे पठाण लोक ज्याप्रमाणें ठोशास ठोसा लगावून व्यवहारांत यशस्वी होतात त्याप्रमाणें हिंदी लोकांनीं वागावें असा त्या लेखाचा आशय होता. या लेखाचें इंग्रजी भाषांतर 'वंदे मातरम्' पत्रानें छापलें. त्यावरून 'वंदे मातरम्'वर १२४ अ कलमाखालीं राजद्रोहाचा खटला झाला. पत्राचे संपादक अरविंदबाबू होते, पण पत्रावर त्यांचें नांव नव्हतें. म्हणून तसें सिद्ध करण्यासाठीं सरकारानें सत्यनिष्ठ व माहितगार असे पूर्वसंपादक बाबू बिपिनचंद्र पाल यांची साक्ष काढली. खटला मॅजिस्ट्रेट मि. किंग्जफोर्ड यांजपुढें चालू होता. पालबाबूंनीं कोर्टांत आल्यावर साक्ष देण्याचेंच नाकारल्यामुळें पाल यांना शिक्षा झाली व ज्यांना शिक्षा व्हावयाची ते अरविंद घोष आयतेच सुटले. परंतु सरकाराचा अरविंदांवर पक्का वहीम

होता. त्यांनी त्यास आणखी दोन वर्षांनीं अलीपूर कटाच्या खटल्यांत पकडलें. त्यांचे बंधू बिरेंद्रकुमार हे बॉम्बगोळा प्रकरणांतील पुढारी, त्यांजवरून वहीम घेऊन अरविंदांना कटांत गोंवण्यांत आलें. त्या खटल्यांत त्यांनीं एक वर्षाची कच्ची कैद भोगली. त्यांची बाजू कलकत्त्याचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर देशबंधू चित्तरंजन दास यांनीं मोठ्या कुशलतेनें मांडून त्यांस निर्दोषी ठरविलें. अशा रीतीनें सरकारचा हा दुसरा डाव फसला. त्या एक वर्षाच्या तुरुंगांतील एकांतवास त्यांनीं ब्रह्मचिंतनात घालविला. त्यांत त्यांची वृत्ति पूर्णपणें अध्यात्मिक बनून त्यांस सर्वत्र श्रीकृष्णाचा भास होऊं लागला.

अरविंदबाबूंत गीतेची शिकवण पक्की बिंबली असल्याचें ते तुरुंगातून बाहेर पडल्यावर जगाच्या प्रत्ययास आलें. कारण बाहेर पडल्यावर ' कर्मयोगिन् ' नांवाचें नवें इंग्रजी साप्ताहिक त्यानीं प्रगट केलें. त्यांतून धार्मिक व राजकीय या दोनहि प्रकारांचे विचार ते मांडीत. ता. २५ डिसेंबर १९०९ रोजीं 'कर्मयोगिन्'मध्यें एक लेख प्रसिद्ध झाला, त्यावरून १९१० च्या मार्च महिन्यांत अरविंदबाबूंवर वॉरंट निघालें. तेव्हां तुरुंगवास टाळण्याकरितां वॉरंटाची बजावणी होण्यापूर्वीच त्यांनीं पांदेचरीची वाट धरली. त्या सालापासून आजतागायत सुमारें एकोणतीस वर्षें ते पांदेचरींतच राहत असून योगाभ्यासांत रत आहेत.

बंगाल्यांत जो मान 'अमृतबझार पत्रिका' व 'बंगाली' या पत्रांना एक वेळ होता तो मान मद्रास इलाख्यांत आजहि 'हिंदु' पत्राला आहे असें मानण्यास हरकत नाहीं. किंबहुना हिंदी लोकांनीं चालविलेल्या इंग्रजी दैनिक पत्रांत 'हिंदू'च्या दर्जाचें दुसरें पत्र आज नाहीं म्हटलें तरी चालेल. त्यानें मुंबईचा 'टाईम्स', कलकत्त्याचा 'स्टेट्समन' या सारख्या इंग्रज लोकांच्या पत्रांची बरोबरी केली आहे. 'टाईम्स' व 'स्टेट्समन' हीं पत्रें आपल्या वाचकांचे, जितक्या प्रकाराचा मजकूर व बातम्या देऊन, लाड पुरवितात ते सर्व

'हिंदु' करीत असून त्याशिवाय हिंदी लोकांची बाजू निर्भीडपणानें मांडीत असल्यामुळें त्या दृष्टीनें त्यानें अँग्लो-इंडियन पत्रांनाहि मागें टाकून अखिल हिंदुस्थानांत एक प्रकारचें अद्वितीयत्व संपादिलें आहे.

'हिंदू'चे पहिले उत्पादक व संपादक जी. सुब्रम्हण्य अय्यर. यांचा जन्म तंजावर जिल्ह्यांत कावेरीच्या कांठीं तिरुवडी या गांवीं झाला.

**जी. सुब्रम्हण्य अय्यर**

त्यांचे वडील गणपति दीक्षित हे तिरुवडी येथील मुन्सफ कोर्टांत वकिली करीत असत. सुब्रम्हण्य तंजावराच्या शाळेंतून सन १८७१ मध्यें मॅट्रिक झाले. त्यानंतर कोठें तरी इंग्रजी शाळेंत शिक्षक व्हावयाचें असें ठरवून ते मद्रास येथील नॉर्मल स्कुलांत शिक्षकाच्या धंद्याचें शिक्षण घेण्याकरितां राहिले. तेथील शिक्षण आटोपल्यावर त्यांना मद्रासेमध्येंच स्कॉटिश मिशन हायस्कुलांत दरमहा चाळीस रुपये पगारावर नोकरी लागली. ती नोकरी दोन वर्षांनीं सोडून पाच्छाप्पा हायस्कुलांत ते शिक्षक झाले. त्याच हायस्कुलांत वीर राघवाचार्य या नांवाचे दुसरे शिक्षक होते. त्यांच्याशीं सुब्रह्मण्य अय्यर यांचा स्नेह जमला. सुब्रह्मण्य यावेळेपर्यंत बी. ए. झाले नव्हते. तो कमीपणा शाळेंत असतां त्यांच्या मनाला जांचून त्यांनीं शिक्षकाचें काम करतांनाच खासगी रीतीनें अभ्यास करून तीहि परीक्षा १८७७ मध्यें दिली. त्या परीक्षेमुळें त्यांचा दर्जा वाढल्यानें त्याना ट्रिप्लिकेन येथील अँग्लो व्हर्नाक्युलर शाळेंत हेडमास्तराची जागा मिळाली. यावेळीं मद्रासेंत लोकपक्षाची बाजू मांडणाऱ्या देशी वर्तमानपत्राची जरुरी भासत होती. जी. सुब्रह्मण्य उद्योगी व महत्त्वाकांक्षी होते. त्यांना वर्तमानपत्र काढण्याची कल्पना सुचून वीर राघवाचार्य व इत्तर कांहीं गृहस्थ यांच्या सहकारितेनें त्यांनीं 'हिंदु' नांवाचे इंग्रजी साप्ताहिक पत्र सन १८७८ मध्येंच सुरू केलें. साप्ताहिकाचा जम नीट बसल्यावर तें आठवड्यांतून तीनदां

निघूं लागलें व शेवटीं दैनिक झालें. 'हिंदू'शीं सुब्रह्मण्य यांचा संबंध वीस वर्षें टिकून १८९८ सालीं सुटला. त्या वीस वर्षांच्या काळांत 'हिंदु' पत्राची फारच भरभराट झाली. त्यांतून लोकमत स्वतंत्र रीतीनें मांडलें जाऊं लागलें. निर्भयता, सार्वजनिक कर्तव्याची जाणीव व पात्रता या गुणांनीं तें प्रसिद्धीला आलें. लोकांतल्याप्रमाणें सरकार-दरबारींहि त्याचें वजन इतकें वाढलें कीं, लॉर्ड रिपन हिंदुस्थानाचे व्हाइसरॉय असतां ते लोकमत अजमावयाच्या वेळीं 'हिंदू'वर भिस्त ठेवीत.

'हिंदु' चालवीत असतांनाच सुब्रह्मण्य यांनीं इ. सन १८८२ मध्यें 'स्वदेश मित्रम्' या नांवाचें तामिळ साप्ताहिक सुरू केलें. तें पुढें दैनिक करण्यांत आलें. दक्षिण हिंदुस्थानांतील सामान्य जनतेंत या पत्राचा प्रसार फार आहे. इंग्रजी व तामिळ अशीं दोनहि पत्रें चालवून त्यांनीं केलेली देशसेवा मोठीच समजली पाहिजे. पण वर्तमानपत्राबाहेरहि त्यांनीं आपला व्याप वाढविला. राष्ट्रीय सभेच्या कार्यांत ते प्रारंभापासून असून मुंबईस भरलेल्या तिच्या पहिल्या बैठकींत त्यांनीं एक ठरावहि मांडला होता. इ. सन १९०२ सालीं कोकोनाडा येथें मद्रास प्रांतिक परिषद झाली, तिचे ते अध्यक्ष होते. इंग्रजी व तामिळ या दोनहि भाषांतून त्यांचीं भाषणें जोरदार व परिणामकारक होत. १८९८ सालीं विलायतेंत बसलेल्या रॉयल कमिशनापुढें मद्रास इलाख्यातर्फे ते साक्ष देण्यास गेले होते. मद्रास इलाख्यांतील स्वदेशी चळवळीच्या प्रसाराचें श्रेय सुब्रम्हण्य यांनाच आहे. यःकश्चित् शिक्षकाच्या धंद्यापासून वाढत वाढत वर्तमानपत्र-कार, सार्वजनिक कार्यकर्ता व पुढारी अशा पायऱ्यांनीं त्यांना प्राप्त झालेला मोठेपणा प्रशंसनीय होय यांत शंका नाहीं. सुब्रम्हण्य अय्यर यांच्या पश्चात् 'हिंदु' पत्राला टी. रंगाचारियर व कस्तुरीरंग आयंगार व के. रंगस्वामी आयंगार हे समर्थ संपादक एकामागून एक लाभून 'हिंदू'चा नांवलौकिक व दर्जा आजतागायत कायम राहिला आहे.

पंजाबांत हिंदी लोकांनी चालविलेलें बरेंच जुनें व प्रसिद्ध इंग्रजी वर्तमानपत्र 'ट्रिब्यून' हें असून त्याचें संपादकत्व बाबू कालीनाथ राय या बंगाली गृहस्थाकडे पुष्कळ वर्षांपासून आहे. परंतु सर्व देशांत ज्यांचें नांव संपादक व शीघ्र साहित्यिक या नात्यानें गाजलें आहे असे लाला लजपतराय हेच पंजाबी गृहस्थ होत.

**लाला लजपतराय**

लजपतराय यांनीं पंजाबांत व अमेरिकेंत वर्तमानपत्रें व मासिकें स्थापन केलीं व चालविलींहि. त्यांचें नांव राजकीय पुढारी म्हणून सर्वत्र जितकें महशूर आहे, तितकें संपादक म्हणून नसलें तरी त्यांच्या कारकिर्दींत पुढारीपणाच्या खालोखाल संपादकत्वाचाहि वांटा आहे हें राजकारणांत वावरणारांना सांगण्याची जरुरी नाहीं. लजपतराय यांचा जन्म १८६५ सालीं लुधियाना जिल्ह्यांत जगरान या गांवीं एका गरीब पण प्रतिष्ठित अशा वैश्यकुलांत झाला. सन १८८३ सालीं वकिलीची परीक्षा दिल्यावर त्यांनीं प्रथम हिसार येथें वकिलीस सुरुवात केली. पण त्यांच्या कर्तृत्वास सदर गांव कोता पडूं लागल्यावर ते १८९२ सालीं लाहोरास तेथलि चीफ कोर्टांत वकिली करण्यासाठीं आले. त्या काळीं हिंदु समाज अगदींच मागासलेला व अडाणी होता. त्याजवर मुसलमानी धर्माचीं इतकीं पुटें चढलीं होती कीं खुद्द लजपतरायांचे वडील नमाज पढत असत. पण इंग्रजी शिक्षणाबरोबर पंजाबांतील हिंदु समाजांत जी जागृति झाली तिनें त्यांचा धर्माभिमान जागृत केला. या जागृतीस स्वामी दयानंद यांच्या आर्यसमाजी चळवळीचाहि पुष्कळ हातभार लागला यांत शंका नाहीं. लजपतराय प्रथम आर्यसमाजी मताचेच असल्यामुळें त्यांनीं लाहोरास दयानंद वैदिक कॉलेजाची स्थापना केली. सन १८९७ ते १९०० पर्यंत पंजाबांत भयंकर दुष्काळ पडला होता. त्यांत हिंदु अनाथ मुलांच्या रक्षणाची चळवळ हातीं घेऊन त्यांनीं दोन हजार मुलें वांचविलीं. त्यांचें

लक्ष देशोन्नतीच्या प्रत्येक चळवळींत असल्यानें पंजाब नॅशनल बँकेच्या स्थापनेस त्यांनीं केलेले परिश्रम बऱ्याच अंशीं कारणीभूत झाले. ते त्या बँकेचे डायरेक्टरहि होते. सन १८८८ सालीं ते राष्ट्रीय सभेस मिळाले. सन १९०५ मध्यें राष्ट्रीय सभेनें हिंदी लोकांची बाजू इंग्रज लोकांना समजून देण्याकरिता एक शिष्टमंडळ इंग्लंडास पाठविलें. त्यांत नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांजबरोबर त्याचीहि योजना करण्यांत आली होती. इंग्लंडात त्यांनीं आपल्या वक्तृत्वानें इंग्रज लोकांवर चांगलीच छाप बसविली.

आपल्या मतांचा प्रसार स्वतःचें पत्र असल्याशिवाय होणार नाहीं असें वाटून त्यांनीं 'पंजाबी' नांवाचें साप्ताहिक पत्र लाहोरास सुरू केलें. त्याचा पहिला अंक १९०४ च्या आक्टोबर महिन्यांत प्रसिद्ध झाला. पत्राचे संपादक लाला जसवंतराय असले तरी त्याचें धोरण लजपतरायांकडेच होतें. ते त्यांत लेख लिहीत इतकेंच नव्हे तर मुद्रितें-सुद्धां (प्रुफें) तपाशीत. वकिलीच्या धंद्यांत सगळा वेळ पत्राला द्यावयास मिळणारा नसल्यामुळेंच जसवंतरायांस त्यांनीं संपादक नेमलें होतें हें उघड आहे. पत्रांत नुकसानी आल्यास तिची जोखीम आर्यसमाजाच्या दहा पुढाऱ्यांनीं प्रत्येकीं एक हजार रुपयापर्यंत सोसण्याचें पत्करलें. 'पंजाबी'च्या पहिल्या अंकानेंच त्याची सर्वत्र ख्याति झाली. जसवंत-रायांच्या जोडीस महाराष्ट्रांतील रा. आठवले हेहि एक संपादक होते. पुढें 'पंजाबी'वर खटला झाला. पण ज्या लेखावरून खटला करण्यांत आला त्याचीं मुद्रितें लजपतरायांनीं पाहिलीं नव्हतीं. तीं त्यांनीं पाहिलीं असतीं तर वकिली दृष्टीनें जरूर तो फेरफार करून खटल्याचें निमित्तहि त्यांनीं कदाचित् टाळलें असतें. खटल्यांत जसवंत-राय व आठवले पकडले गेले. खटला चालू असतांहि 'पंजाबीं'तील लेख पूर्ववत् जोरदार येत असल्यानें वाचक पत्रावर खूष राहिले. पुढें खटल्याचा

निकाल लागून जसवंतराय यांना दोन वर्षें सक्तमजुरी व आठवले यांना सहा महिने अशा शिक्षा झाल्या.

ज्यामुळें हा खटला भरला गेला तो लेख एका मुसलमान शिपा-याच्या मृत्यूवर लिहिला असल्यानें व 'पंजाबी'च्या धोरणांत हिंदु व मुसलमान हा भेद नसल्यानें मुसलमान समाजांतहि 'पंजाबी'विषयीं आपले-पणा उत्पन्न झाला होता. खटला ऐकण्यास हजारों लोक जमले होते. खट-ल्याचा निकाल होतांच पोलिसांनीं जसवंतराय व आठवले यांना गाडींत घातलें. गाडी चालूं लागतांच गाडीमागें लोक धांवत गेले व त्या उभय-तांवर पुष्पवृष्टीहि करण्यांत आली. थोडाबहुत दंगाधोपाहि झाला. या व नंतरच्या एकंदर चळवळीचे व दंग्याधोप्याचे सूत्रधार लजपतरायच आहेत असा पंजाब सरकाराला जबर संशय येऊन त्यांच्या शिफारशी-वरून हिंदुस्थान सरकारानें त्यांना हद्दपार केलें. हद्दपारीचा काळ त्यांनीं ब्रह्मदेशांतील मंडालेच्या तुरुंगांत काढला. हद्दपारीवरून ता. १८ नोव्हेंबर १९०७ रोजीं ते लाहोरास परत आले. सुरतेस भरावयाच्या राष्ट्रीय सभेचे लालाजींस अध्यक्ष करण्यासाठीं टिळकांनीं मोठी चळवळ केली, पण तिला यश आलें नाहीं.

हिंदुस्थानांत दडपशाहीच्या अमदानींत चळवळ करणें अशक्य झालेलें पाहून सन १९०८सालीं लजपतराय विश्रांतीसाठीं इंग्लंडांत गेले व इंग्लंडांतून त्यांनीं अमेरिकेंत प्रयाण केलें. अमेरिकेंतील निरनिराळ्या हालचालींचें अवलोकन व अभ्यास करून त्यांनीं 'युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका' व 'दि प्रॉब्लेम ऑफ नॅशनल एज्युकेशन इन इंडिया' हे ग्रंथ लिहिले. तसेंच 'इंडियन होमरूल लीग ऑफ अमेरिका' ही संस्था स्थापून त्यांनीं तिच्या कार्याच्या प्रसारासाठीं 'यंग इंडिया' नांवाचें मासिक सुरू केलें. त्याचा पहिला अंक १९१७ च्या जानेवारींत प्रसिद्ध झाला. हिंदुस्थानांत त्याच वेळीं डॉ. ॲनी बेझंट व लो. टिळक यांनीं होमरूलची चळवळ

सुरू केली होती, तिला पोषक असेच हे लजपतरायांचे प्रयत्न होते. त्यांनीं 'यंग इंडिया' नांवाचें एक पुस्तकंहि लिहिलें. त्याचा अमेरिकेंत विलक्षण खप झाला. त्याचें पुनर्मुद्रण आठ महिन्यांच्या आंत करावें लागलें. त्याशिवाय 'इंग्लंड्स डेट टू इंडिया', 'ए कॉल टू यंग इंडिया', 'दि पोलिटिकल फ्यूचर ऑफ इंडिया' हीं पुस्तकेंहि त्यांनीं लिहिलीं. 'इंडिया ए ग्रेव्ह यार्ड' हा निबंध लिहून त्याच्या एक लाख प्रती त्यांनीं अमेरिकेंत वांटल्या व त्याचें भाषांतर फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश, जर्मन, रशियन व पर्शियन या भाषांत करून हिंदुस्थानाच्या सद्यःस्थितीची ओळख त्या त्या देशांना देण्यांत आली. इतका प्रचंड उद्योग करून सन १९२० मध्यें ते परत हिंदुस्थानास आले.

म. गांधींची असहकारिता मान्य करून घेण्यासाठीं कलकत्त्यास १९२०सालीं राष्ट्रीय सभेचें जादा अधिवेशन झालें, त्याचे अध्यक्ष लालाजी होते. पद्धतशीर राजकीय चळवळ करण्याच्या हेतूनें 'टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स' या नांवाची लाहोरास त्यांनीं शाळा स्थापन केली. 'अमेरिकन नेशन' या पत्राच्या धर्तीवर त्यांनीं 'पीपल' हें इंग्रजी साप्ताहिक पत्र, व 'वंदे मातरम्' हें दैनिक पत्र पंजाबी भाषेंत सुरू केलें. स्वराज्य पक्ष स्थापन झाल्यावर ते १९२६ सालीं ले. असेंब्लींत निवडून आले. १९२८ च्या आक्टोबर महिन्यांत सायमन कमिशन लाहोरास आलें असतां लालाजींच्या नेतृत्वानें निषेधाची जंगी मिरवणूक निघाली. तिच्यांत लालाजींना पोलिसांचा लाठीमार बसून त्या दुखापतींनीं ते ता. १७ नोव्हेंबर १९२८ रोजीं परलोकवासी झाले.

स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं कोणीहि देशभक्त झगडेलच. परंतु जो आपला नव्हे अशा देशासाठीं झगडणाऱ्या व्यक्ति अलौकिक कोटींतीलच समजल्या पाहिजेत. डॉ. ॲनी बेझंट याची गणना या कोटींत होते. त्यांचें सगळें आयुष्यच विचित्र घटनांनीं भरलेलें. त्या जन्मानें इंग्रज. लंडन

शहरीं ता. १ ऑक्टोबर १८४७ रोजीं त्यांचा जन्म झाला. वयाच्या सोळाव्या वर्षीं एका पाद्रीबुवाशीं त्यांचें पत्नित्वाचें

**डॉ. ॲनी बेझंट**

नातें जोडलें गेलें. त्यांजपासून त्यांना दोन अपत्येंहि लाभलीं. पण बाई पडल्या स्वतंत्र बाण्याच्या. आपल्या विचारस्वातंत्र्यास नवऱ्याकडून अडथळा होत असल्याचें अनुभवास येतांच त्यांनीं त्याजबरोबर घटस्फोट केला. बाईंचीं मतांतरेंहि पुष्कळच झालीं. प्रथम त्या नास्तिक होत्या. नंतर सन १८८५ सालीं त्यांनीं समाजसत्तावाद स्वीकारला. पुढें ईश्वरवादी बनून थिऑसफी पंथाच्या त्या अध्वर्यू बनल्या. सन १८९३ मध्यें थिऑसफीच्या कामासाठीं त्यांचें हिंदुस्थानांत आगमन झालें. हिंदुस्थानांत आल्यावर हिंदु धर्मावर त्यांची भक्ति बसली. सन १९०७ सालीं थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्ष कर्नल अल्काट मृत्यु पावले. त्यांच्या रिकाम्या झालेल्या अध्यक्षपदावर बेझंटबाई निवडून आल्या व मरेपर्यंत अध्यक्षच राहिल्या. सन १९१४ मध्यें युरोपांत महायुद्ध सुरू झालें. त्या सुमारास राजकारणांत शिरण्याचा त्यांनीं निश्चय केला. कारण हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्याशिवाय त्याची धार्मिक काय पण कोणतीहि उन्नति होणार नाहीं अशी अनुभवानें त्यांची खात्री पटली होती. स्वतःचा मतप्रचार म्हटला कीं त्याला वर्तमानपत्र पाहिजेच असा जणूं काय नियमच आहे. म्हणून बाईंनीं मद्रासेस ' न्यू इंडिया ' पत्र काढलें. तें दैनिक व साप्ताहिकहि होतें. इंग्रज सरकार महायुद्धांत सांपडलें असल्यानें सर्व इंग्रज लोकांना साम्राज्यसंरक्षणास हिंदुस्थानाची किती मदत होत आहे हें सारखें जाणवत होतें. असा देश इंग्लंडचा कायमचा मित्र रहावयास पाहिजे असेल तर त्यास 'वसाहतीचें स्वराज्य' देऊन त्याचा स्नेहसंबंध जोडणें अगत्याचें असल्याविषयीं बेझंटबाईंची पक्की समजूत झाली होती. यास्तव त्यांनीं होमरूल लीगची स्थापना केली. लोकमान्य टिळकांनींहि महाराष्ट्रांत अशीच संस्था उभारली. होमरूलच्या चळवळींत बाईंच्या

सुरू केली होती, तिला पोषक असेच हे लजपतरायांचे प्रयत्न होते. त्यांनीं 'यंग इंडिया' नांवाचें एक पुस्तकहि लिहिलें. त्याचा अमेरिकेंत विलक्षण खप झाला. त्याचें पुनर्मुद्रण आठ महिन्यांच्या आंत करावें लागलें. त्याशिवाय 'इंग्लंड्स डेट टू इंडिया', 'ए कॉल टू यंग इंडिया', 'दि पोलिटिकल फ्यूचर ऑफ इंडिया' हीं पुस्तकेंहि त्यांनीं लिहिलीं. 'इंडिया ए ग्रेव्ह यार्ड' हा निबंध लिहून त्याच्या एक लाख प्रती त्यांनीं अमेरिकेंत वांटल्या व त्याचें भाषांतर फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश, जर्मन, रशियन व पर्शियन या भाषांत करून हिंदुस्थानाच्या सद्य:स्थितीची ओळख त्या त्या देशांना देण्यांत आली. इतका प्रचंड उद्योग करून सन १९२० मध्यें ते परत हिंदुस्थानास आले.

म. गांधींची असहकारिता मान्य करून घेण्यासाठीं कलकत्त्यास १९२०सालीं राष्ट्रीय सभेचें जादा अधिवेशन झालें, त्याचे अध्यक्ष लालाजी होते. पद्धतशीर राजकीय चळवळ करण्याच्या हेतूनें 'टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स' या नांवाची लाहोरास त्यांनीं शाळा स्थापन केली. 'अमेरिकन नेशन' या पत्राच्या धर्तीवर त्यांनीं 'पीपल' हें इंग्रजी साप्ताहिक पत्र, व 'वंदे मातरम्' हें दैनिक पत्र पंजाबी भाषेंत सुरू केलें. स्वराज्य पक्ष स्थापन झाल्यावर ते १९२६ सालीं ले. असेंब्लींत निवडून आले. १९२८ च्या आक्टोबर महिन्यांत सायमन कमिशन लाहोरास आलें असतां लालाजींच्या नेतृत्वानें निषेधाची जंगी मिरवणूक निघाली. तिच्यांत लालाजींना पोलिसांचा लाठीमार बसून त्या दुखापतींनीं ते ता. १७ नोव्हेंबर १९२८ रोजीं परलोकवासी झाले.

स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं कोणीहि देशभक्त झगडेलच. परंतु जो आपला नव्हे अशा देशासाठीं झगडणाऱ्या व्यक्ति अलौकिक कोटींतीलच समजल्या पाहिजेत. डॉ. ॲनी बेझंट याची गणना या कोटींत होते. त्यांचें सगळें आयुष्यच विचित्र घटनांनीं भरलेलें. त्या जन्मानें इंग्रज. लंडन

शहरीं ता. १ ऑक्टोबर १८४७ रोजीं त्यांचा जन्म झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी एका पाद्रीबुवाशीं त्यांचें पत्नित्वाचें नातें जोडलें गेलें. त्यांजपासून त्यांना दोन अपत्येंहि लाभलीं. पण बाई पडल्या स्वतंत्र बाण्याच्या. आपल्या

**डॉ. ॲनी बेझंट**

विचारस्वातंत्र्यास नवऱ्याकडून अडथळा होत असल्याचें अनुभवास येतांच त्यांनीं त्याजबरोबर घटस्फोट केला. बाईचीं मतांतरेंहि पुष्कळच झालीं. प्रथम त्या नास्तिक होत्या. नंतर सन १८८५सालीं त्यांनीं समाज-सत्तावाद स्वीकारला. पुढें ईश्वरवादी बनून थिऑसफी पंथाच्या त्या अध्वर्यू बनल्या. सन १८९३ मध्यें थिऑसफीच्या कामासाठीं त्यांचें हिंदुस्थानांत आगमन झालें. हिंदुस्थानांत आल्यावर हिंदु धर्मावर त्यांची भक्ति बसली. सन १९०७ सालीं थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्ष कर्नल अल्काट मृत्यु पावले. त्यांच्या रिकाम्या झालेल्या अध्यक्षपदावर बेझंटबाई निवडून आल्या व मरेपर्यंत अध्यक्षच राहिल्या. सन १९१४ मध्यें युरोपांत महायुद्ध सुरू झालें. त्या सुमारास राजकारणांत शिरण्याचा त्यांनीं निश्चय केला. कारण हिंदु-स्थानाला स्वराज्य मिळाल्याशिवाय त्याची धार्मिक काय पण कोणतीहि उन्नति होणार नाहीं अशी अनुभवानें त्यांची खात्री पटली होती. स्वतःचा मत-प्रचार म्हटला कीं त्याला वर्तमानपत्र पाहिजेच असा जणूं काय नियमच आहे. म्हणून बाईनीं मद्रासेस ' न्यू इंडिया ' पत्र काढलें. तें दैनिक व साप्ताहिकहि होतें. इंग्रज सरकार महायुद्धांत सांपडलें असल्यानें सर्व इंग्रज लोकांना साम्राज्यसंरक्षणास हिंदुस्थानाची किती मदत होत आहे हें सारखें जाणवत होतें. असा देश इंग्लंडचा कायमचा मित्र रहावयास पाहिजे असेल तर त्यास 'वसाहतीचें स्वराज्य' देऊन त्याचा स्नेहसंबंध जोडणें अगत्याचें असल्याविषयीं बेझंटबाईची पक्की समजूत झाली होती. यास्तव त्यांनीं होमरूल लीगची स्थापना केली. लोकमान्य टिळकांनींहि महाराष्ट्रांत अशीच संस्था उभारली. होमरूलच्या चळवळींत बाईच्या

'न्यू इंडिया' पत्रानें बहुमोल कामगिरी बजावली. अखिल हिंदुस्थानाचें लक्ष त्यांनीं आपल्या चळवळीकडे पत्रद्वारें ओढलें. त्या वेळीं मद्रास इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड पेटलंड होते. त्यांनीं बाईंना १९१७ सालीं त्यांच्या चळवळीबद्दल सरकाराकडून जें बक्षिस मिळावयाचें तेंच दिलें. त्यांनीं बाईंची भेट मुद्दाम उटकमंडहून मद्रासला येऊन घेतली. बाईंचें मन चळवळीपासून परावृत्त करण्यासाठींच पेटलंड आले होते. ते बाईंना म्हणाले, 'मिसेस् बेझंट! मी उटीहून तुम्हांला भेटण्याकरितां व तुमच्याविषयीं मला जो आदर वाटतो तो दाखविण्याकरितां आलों आहें. मी स्वतः तुमच्याशीं बोलून तुम्हांला विचार करण्यास संधि देत आहें.' बराच वेळ बोलणें झाल्यावर बाईंनीं उत्तर दिलें, 'तुम्ही सर्व सत्ताधीश आहां आणि मी असहाय्य आहें. तेव्हां तुम्हांला जें वाटेल तें करा. मला तुम्हांस एकच गोष्ट सांगावयाची आहे ती ही कीं तुम्ही आपल्या कृतीनें हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याला जबरदस्त धक्का देत आहां'. पेटलंड यांना हा युक्तिवाद कसला पटणार? त्यांनीं बाईंना पकडून उटकमंड येथें नजरकैदेंत ठेवलें.

बाईंची कांहीं दिवसांनीं सुटका झाली व जनतेनें त्यांना राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान देऊन कृतज्ञता व्यक्त केली. मांटेग्यू-चेल्म्सफर्ड सुधारणा हिंदी लोकांस नापसंत असल्याचें पाहून त्यांनीं 'कॉमनवेल्थ ऑफ इंडिया बिल'हि तयार केलें होतें. सदर बिल मजूर पक्षाकडून ब्रिटिश पार्लमेंटांत मांडण्याचा त्यांचा विचार होता; पण तो जागच्या जागीं जिरला. त्यांच्या अंगीं अनेक बहुमोल गुण होते. त्यांची बुद्धि कुशाग्र, कर्तृत्वशक्ति अचाट, विद्वत्ता असाधारण, निग्रह निस्सीम, वक्तृत्व बृहस्पतितुल्य व उत्साह अवर्णनीय होता. हे सर्व गुण स्वदेश मानलेल्या हिंदुस्थानास वाहून त्यांनीं मद्रास येथें ता. २० सप्टेंबर १९३३ रोजीं इहलोकची यात्रा संपविली. त्या वेळीं त्यांचें वय ८६ वर्षांचें होतें.

हिंदुस्थानांतील सर्व पत्रकारांत महात्मा गांधी यांचें स्थान फार उच्च आहे. जसे पुढाऱ्यांत असामान्य तसे पत्रकारांतहि ते असामान्यच आहेत. मोहनदास गांधी यांचा जन्म २ आक्टोबर सन १८६९ रोजीं झाला. त्यांचे वडील पोरबंदरचे दिवाण होते. मोहनदासांचें गुजराथी व इंग्रजी शिक्षण पोरबंदर व राजकोट येथें झालें. वयाच्या दहाव्या वर्षी ते राजकोटच्या काठियावाड हायस्कुलांत इंग्रजी शिक्षण घेऊं लागले. सतराव्या वर्षी ते मॅट्रिक झाले. मॅट्रिक झाल्यावर भावनगर येथील सामळदास कॉलेजांत त्यांनीं वरिष्ठ शिक्षणास सुरुवात केली. पण तें शिक्षण पुरें होण्याच्या आधींच ते इंग्लंडांत बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यास १८८८ सालीं गेले व १८९२ सालीं बॅरिस्टरीची परीक्षा देऊन स्वदेशीं परत आले. विलायतेंत असतांच त्यांनीं ख्रिस्ती व हिंदु धर्मग्रंथांचा अभ्यास सुरू केला होता, तो हिंदुस्थानांत आल्यावरहि कायम राहिला. ते कधीं मुंबईला तर कधीं राजकोटाला राहून वकिली करीत. वकिलींत त्यांच्या लाजाळू स्वभावामुळें त्यांचें बस्तान बसेना. या सुमारास त्यांचें नशीब उघडण्याची संधि एकाएकीं आली. पोरबंदरचे एक मेमन रहिवासी दादा अबदुल्ला यांनीं त्यांना 'ट्रान्सव्हालांत याल तर तुम्हाला वकिलीवर चांगली प्राप्ति होण्यास मदत करीन' असें आश्वासन दिल्यावरून गांधीजी आफ्रिकेंत धंदा करण्यास गेले.

**महात्मा गांधी**

म. गांधींना दक्षिण आफ्रिकेंत गेल्यावर अपमानकारक प्रसंग वारंवार आल्यानें त्यांचा स्वाभिमान डिंवचल्याप्रमाणें जागा झाला. जोहान्सबर्ग येथील हॉटेलांत केवळ काळा अदमी म्हणून त्यांस उतरण्यासहि जागा मिळेना. त्यांच्यासारख्या सुशिक्षित व श्रेष्ठ प्रतीच्या हिंदूची जर ही दुर्दशा तर बाकीच्या तेथील हिंदी लोकांच्या स्थितीविषयीं बोलायासच नको. हिंदी लोकांचा सामाजिक दर्जा वाढवून त्यांना युरोपियनांच्या

बरोबरीस आणावयास पुढारीपण घेणारा गांधीजींशिवाय दुसरा कोणीहि हिंदी माणूस आफ्रिकेंत नव्हता. म्हणून गांधीजी कर्तव्यबुद्धीनें त्यांचे पुढारी झाले. पुढारीपण पत्करल्यावर तिकडील हिंदी लोकांना स्वतःच्या हक्कांची ओळख देऊन त्यांची जूट करण्यासाठीं व त्यांचीं गाऱ्हाणीं तेथील, हिंदुस्थानांतील व इंग्लंडांतील लोकांच्या नजरेस आणण्यासाठीं त्यांनीं ' इंडियन ओपीनियन ' नांवाचें साप्ताहिक सुरू केलें. त्यांत इंग्रजी हिंदी, गुजराथी व तामीळ अशा चार भाषांत मजकूर येत असे. परंतु पत्राचा खर्च व उत्पन्न यांचा मेळ न बसून पहिल्याच वर्षी त्यांना दोनशें पौंड नुकसान आलें. ट्रान्सव्हाल सरकारानें हिंदी लोकांचा छळ आरंभून त्यांना आपलीं नांवें आंगठे देऊन रजिस्टर करण्याचा हुकूम काढला, त्या वेळीं सत्याग्रहानें तो हुकूम तोडण्याचा गांधींनीं निश्चय केला व त्याचे अटकेसारखे परिणामहि भोगले. सत्य, अहिंसा, इत्यादि तत्त्वांचें बीजारोपण कौंट टॉलस्टॉय, थोरो इत्यादिकांचे ग्रंथ वाचून त्यांच्या ठिकाणीं झालें होतें, त्याचाच हा प्रभाव होय.

दक्षिण आफ्रिकेंत आपल्या प्रयत्नांना यश येत नसल्याचें पाहून गांधीजी १९१४ सालीं हिंदुस्थानांत आले. येथील स्वराज्याच्या चळवळींत त्यांनीं स्वतः निर्माण केलेल्या तत्त्वज्ञानास अनुसरून सत्याग्रह, असहकारिता, कायदेभंग इत्यादि उपाय अमलांत आणिले. गांधी हे दांडगे मतप्रचारक आहेत. सत्यनिष्ठा, धैर्य, स्वार्थत्याग या गुणांनीं त्यांच्या लिहिण्याचा व बोलण्याचा बहुजनसमाजांवर विलक्षण पगडा बसतो. त्यांची मतें नवीन असल्यामुळें त्यांच्या प्रसारार्थ गांधीजींनीं वर्तमानपत्रें हातीं घेण्याचें ठरविलें. अहमदाबादेस इंदुलाल याज्ञिक हे 'नवजीवन आणि सत्य' या नांवाचें मासिक काढीत असत. तें गांधींनीं आपल्याकडे घेऊन त्याचें गुजराथी साप्ताहिक बनविलें. या साप्ताहिकानें गुजराथी भाषा जाणणारा समाज त्यांनीं आपल्या काबूंत आणिला. आतां गुजराथे-

बाहेरील हिंदी जनतेंत मतप्रसार करावयाचा उरला. तें कार्य रा. जम्नादास द्वारकादास यांचें ‘ यंग इंडिया ’ पत्र स्वतःकडे घेऊन त्यांनीं उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें. त्यांनीं ‘यंग इंडिया’ पत्र अगदींच निराळ्या थाटानें चालविलें. त्यांत जाहिरातीला रजा देण्यांत आली. वर्तमानसार इत्यादि मामुली प्रकारांनाहि थारा मिळाला नाहीं. प्रतिपक्षाविषयीं निष्ठुर शब्द त्यांनीं कधीं लिहावयाचा नाहीं. प्रेम, आदरबुद्धि व तत्त्वनिष्ठा यांचा आदर्श असेंच ‘यंग इंडिया ’पत्र होतें. त्यांतून ते आपले सामर्थ्यवान् विचार प्रकट करीत. त्यांनीं हिंदु सुशिक्षित वर्ग अगदीं मोहून गेला. त्यांचे जे विचार तेच जनतेचे विचार अशी एकतानता उत्पन्न झाली, लोकात प्रतिकाराचें सामर्थ्य आलें, उच्च भावना उदय पावल्या व देशाकरितां पडेल तो स्वार्थत्याग थोडाच मानण्याच्या उच्च कोटीला हिंदी समाज पोंचला. सुशिक्षित व अशिक्षित या सर्वांना आपण गांधींपुढें फार ठेंगणें आहोंत असें वाटूं लागून ‘यंग इंडियां’तील वाक्य तें वेदवाक्य अशी पुष्कळांची भावना झाली. हिंदी राजकारणास अध्यात्माचें अवगुंठन पाहिजे असें गांधी हिंदुस्थानांत आल्यापासून म्हणत असत. तो प्रकार ब-याच प्रमाणांत त्यांच्या ‘यंग इंडियां’तील लेखांनीं व सभांतील भाषणांनीं घडून आला. त्यांचे ‘यंग इंडियां’त प्रसिद्ध होणारे अग्रलेख इतर इंग्रजी पत्रें जसेच्या तसे ताबडतोब छापीत व त्यांचीं भाषातरें देशी पत्रांतूनहि येत, या कारणानें त्यांच्या मतांचा प्रचार हिंदुस्थानाच्या कोनाकोपऱ्यांतूनहि झाला.

गांधी गुजराथी व इंग्रजी या दोनहि भाषांतून फार सफाईनें व सुबोध लेख लिहितात. इंग्रजी भाषा त्यांच्याइतकी आत्मसात् केलेला लेखक हिंदी लोकांतच काय, पण इंग्रज लोकांतहि विरळा. प्रतिपक्षाविषयीं आदर, सर्वांवर प्रेम, उच्च तत्त्वज्ञान यांचा संग्रह पण लोकरंजनार्थ द्यावयाच्या ताज्या बातम्या व किरकोळ मजकूर यांना आणि जाहिरातींना फांटा यामुळें वृत्तपत्रव्यवसायांत गांधींनीं क्रान्ति घडवून आणिली असें म्हणण्यास

हरकत नाहीं. ऐन वैभवशिखरावर असतांना 'यंग इंडिया'च्या प्रती चाळीस हजारापर्यंत खपत होत्या. कायदेभंगाच्या चळवळींत ते तुरुंगांत गेले व त्यांचें पत्र बंद पडलें; 'यंग इंडिया'वर असहकारितेच्या चळवळींत १९२२ सालीं खटला झाला होता. तो खटला त्यांनीं स्वतःच्या अपूर्व पद्धतीनें चालविला. इतर पत्रकार आपण राजद्रोही नाहीं असें ठरविण्याचा अट्टाहास करीत,तर गांधींनीं आपण प्रचलित सरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न करणें आपलें कर्तव्य समजत असून, तो गुन्हा वाटत असल्यास शक्य तेवढी जास्ती शिक्षा द्यावी असें न्यायाधीशापुढील भाषणांत सांगितलें. वृत्तपत्राची शक्ति त्यांच्याइतकी फारच थोड्यांनीं ओळखली असेल. लहानशी बाब-सुद्धा, स्वतःच्या पतप्रसारासाठीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केली जाण्यास ते सहसा विसरत नाहींत. त्यांनीं हल्लीं 'हरिजन' पत्र चालविलें असून त्याचें धोरण 'अस्पृश्योन्नति' आहे. तथापि त्यांत इतर विषयावरहि लेख येतात. हें मर्यादित कार्य घेऊन त्याकरितां पत्र काढण्याची त्यांची पद्धति विशिष्ट आहे.

---

fi. 803

# प्रकरण पांचवें

# महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें

इतर प्रांतांप्रमाणें महाराष्ट्रांतहि छापखाने व वृत्तपत्रें सुरू करण्याचें श्रेय पाश्चिमात्यांनाच आहे. त्याचा प्रारंभ गोमंतकांत होऊन तेथें इ. स. १५५७ सालीं 'ख्रिस्तीमत' हें पुस्तक कोंकणी मराठींत पोर्तुगिजांनीं छापलें. त्यानंतर बऱ्याच वर्षांनीं म्हणजे इ. स. १८१० पासून मुंबईस इंग्रज मिशनऱ्यांनीं छापखाना आणून त्यांतून मराठी पुस्तकें प्रकाशिलीं. पेशवाई संपल्यावर मुंबई इलाख्यावरील इंग्रजांचा पहिला गव्हर्नर मौंट स्टुअर्ट एलफिन्स्टन झाला. गव्हर्नरीचें पद मिळण्यापूर्वी तो पुण्यास पेशव्यांच्या दरबारीं रेसिडेंट होता. रेसिडेंटाच्या जागेवरून गव्हर्नराच्या जागीं गेल्यानंतर एलफिन्स्टन यानें सन १८२२ सालीं मुंबईस 'बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' या नांवाची संस्था निर्माण केली. तिला सरकारांतून मिळालेल्या ५०. हजार रुपयांच्या रकमेंतून देशी भाषांत ग्रंथप्रकाशनाचें काम चालू झालें. हे ग्रंथ प्रायः शालोपयोगी असत. मिशनरी लोकांच्या प्रयत्नानें 'सिंहासनबत्तिशी'सारखीं इतर मराठी पुस्तकेंहि प्रसिद्ध झालीं. मिशनरी लोकांनीं पेरलेल्या बीजांतूनच महाराष्ट्रीय छापखान्यांचा व वृत्तपत्रांचा अंकुर फुटला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पहिले महाराष्ट्रीय छापखानदार गणपत कृष्णाजी होत. हे भंडारी जातीचे गृहस्थ टॉमस ग्रॅहम नामक मिशनऱ्याच्या मुंबईतील छापखान्यांत नोकर होते. त्यांनीं नोकरीवर असतां छापखान्याच्या धंद्याचें समग्र ज्ञान संपादून सन १८२२सालीं मुंबईस स्वतंत्रपणें आपल्या छापखान्याची स्थापना केली. त्यांच्या छापखान्याचें

यंत्र लांकडी असून छापण्याचें काम शिळेवर चाले. या छापखान्यांतून पहिलें छापील पंचांग सन १८३१ सालीं बाहेर पडलें. पुढें सात वर्षांनीं त्यांनीं ठसे पाडण्याचें यंत्र बनविलें व मुद्रणपद्धतीहि सुधारली. हा छापखाना १९१४ पर्यंत चालू होता. गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्याची उत्कृष्ट छपाईबद्दल फार प्रसिद्धी होती. त्यांत बनविलेले ठसे महाराष्ट्रांत छापखान्यांचा प्रसार होत चालला त्याबरोबर नवीन छापखान्यांत वापरण्यास घेतले गेले. गणपत कृष्णाजी यांच्या मागून जावजी दादाजी यांच्या निर्णयसागर छापखान्याचा उदय मुंबईस झाला असला तरी त्यांतील सुंदर छपाईनें गणपत कृष्णाजींच्या छापखान्यासहि मागें टाकलें.

पेशवाईंत संस्कृत विद्येच्या प्रसारार्थ दरसाल लाखों रुपये खर्चण्यांत येत असत. पेशवाई बुडाल्यावर इंग्रज सरकारानें पेशवाईंतल्यासारखी लक्षावधि रुपयांची विद्वानांस मिळणारी दक्षिणा बंद करून संस्कृत पाठशाळेचा खर्च तेवढा चालू ठेवला. इंग्रजांचा संस्कृतापेक्षां इंग्रजीकडे ओढा विशेष असल्यामुळें त्यांनीं सन १८४२ सालीं पुण्यास संस्कृत पाठशाळेला जोडूनच इंग्रजी वर्ग काढला. या सरकारी प्रयत्नाशिवाय पुण्यास व मुंबईस मिशनरी लोकांच्या शिक्षणसंस्था होत्याच व त्यांतून इंग्रजी शिकलेले थोडथोडे लोक बाहेर पडतच होते. हिंदुस्थानांतील बहुधा प्रत्येक इलाख्याच्या प्रमुख शहरीं एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं इंग्रज सरकारच्या जातभाईंनीं आपलीं इंग्रजी पत्रें स्थापून सरकारच्या बाजूनें प्रचारकार्य सुरू ठेवलेंच होतें. त्यांत लोकहिताविरुद्ध वारंवार जो मजकूर छापला जाई तो खोडून काढण्याकरितां लोकपक्षाचीं पत्रें काढण्याची प्रेरणा बंगाल इलाख्याप्रमाणें मुंबई इलाख्यांतील लोकांना सहाजिकच झाली. इंग्रज लोकांनीं मुंबईंत चालविलेलीं पत्रें 'टाइम्स ऑफ इंडिया' व 'गॅझीट ऑफ इंडिया' हीं होत.

इंग्रजी पत्रांतल्या इंग्रज लोकांच्या टीकेला हिंदी लोकपक्षाच्या बाजूनें दिलेलें उत्तर इंग्रज लोकांना समजावयास पाहिजे असेल तर हिंदी लोकांचींहि इंग्रजी पत्रेंच आवश्यक होत असें वाटून मुंबईंत पार्शी वगैरे जमातींच्या प्रयत्नानें 'जामे जमशेट' व 'दि बाँबे समाचार' हीं पत्रें काढण्यांत आलीं. पार्शी लोकांप्रमाणेंच या कार्याकडे महाराष्ट्रीयांचें लक्ष गेल्यावर मुंबईस बाळशास्त्री जांभेकर यांच्या संपादकत्वानें सन १८३२ मध्यें 'दर्पण' नामक पाक्षिक पत्र सुरू झालें. त्याच्यामागून आठ वर्षांनीं भाऊ महाजन यांचा 'प्रभाकर' आपले किरण फेंकूं लागला. ख्रिस्ती मिशनऱ्यांचें प्रसिद्ध 'ज्ञानोदय' पत्र 'प्रभाकरा'नंतर एकाच वर्षानें सुरू झालें. या दोन पत्रांना बरींच वर्षें झाल्यावर सन १८६४ सालीं 'इंदुप्रकाशा'चा शीतल प्रकाश मुंबईंत फांकला. इंदुप्रकाशाचे पहिले संपादक विष्णु परशुराम पंडित. मुंबईच्या पाठोपाठ पुणेंहि जागें होऊन तेथें सन १८४९ त 'ज्ञानप्रकाशा'ची प्राणप्रतिष्ठा झाली. हें पत्र त्या सालच्या फेब्रुवारी महिन्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं शुक्रवार पेठेंतील बारामतीकरांच्या वाड्यांत सुरू केलें. तत्कालीन रिवाजाप्रमाणें मराठी मजकुराच्या जोडीस 'ज्ञानप्रकाश' व 'इंदुप्रकाश' या दोनहि पत्रांतून, दोन-तीन रकाने कां होईना, इंग्रजी मजकूर येत असे. मराठी मजकूर मराठी वाचकांकरितां आणि इंग्रजी मजकूर इंग्रज अधिकारी व सरकार यांच्याकरितां. किंबहुना मराठी मजकूर वाचून त्याची दाद सरकार दरबारीं लागणार नाहीं अशी समजूत असल्यामुळेंच इंग्रजी मजकुरानें मराठी पत्रांची जागा आडविण्याची जरुरी त्यांच्या चालकांना भासली. अथवा असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं कीं, इंग्रजी मजकुराशिवाय आपल्या पत्रांना प्रतिष्ठितपणा नाहीं याहि समजाचा पगडा शिक्षित लोकांवर बसला होता. ज्ञानप्रकाशाची इंग्रजी बाजू बाबा गोखले, महादेव गोविंद रानडे इत्यादि पुण्यांतील विद्वान् व सार्वजनिक कार्यांत लक्ष

घालणारे गृहस्थ सजवीत असत. अर्थात् ते मोबदल्याची अपेक्षा न धरतां हौसेनें लिहीत.

ज्ञानप्रकाशामागून पुण्यांत 'ज्ञानचक्षू' पत्र सापकरांनीं सुरू केलें. त्यांतहि अग्रलेखाशेजारचे एक-दोन स्तंभ इंग्रजी मजकुराकरितां मुद्दाम राखून ठेवण्यांत येत. हीं सर्व पत्रें साप्ताहिक असून त्यांची वर्गणीहि जबर होती. ज्ञानप्रकाशाची वर्गणी दहा रुपये होती. म्हणजे ती जवळ जवळ हल्लींच्या मराठी दैनिक पत्राइतकी झाली. वर्गणीचे दर भारी असण्याचें कारण हें कीं टपालहंशिलाबद्दल प्रत्येक अंकाला एक आणा पडावा. या एक आण्याचा अर्धा आणा सन १८७१त झाला व आतां तर पाव आणाच आहे. तत्कालीन वर्तमानपत्रांची स्थिति खालील वर्णनावरून लक्षांत येईल. 'इंदुप्रकाशाची भाषा पोक्त व संभावित. त्यांत राजकीय विषयांची भरती. लेख लांब व कंटाळवाणे. 'नेटिव्ह ओपीनियन' पत्रांतील इंग्रजी लेख कडक व निष्पक्षपाती पण हेळसांडीमुळें पत्राचें महत्त्व कमी. त्यांतील मराठी भाषा पहिल्यापासून सामान्य. 'हिंदु रिफॉर्मर' हें नांव इंग्रजी, पण इंग्रजी मजकूर थोडा व त्रुटित. चुका फार. मराठी मजकूर बरा, पण तब्बेती कारखाना. 'ज्ञानोदय' पत्रात वर्तमानसार बरें, पण लेख केवळ धार्मिक. कोंकणांत 'अरुणोदय' (ठाणें), 'जगन्मित्र' हीं पत्रें बरीं. 'सूर्योदयां'तील लेख विशेष चांगले. 'अरुणोदया'ची व्यवस्था चांगली. 'बेळगांव समाचार' व साताऱ्याचें 'महाराष्ट्रमित्र' हीं कांहीं बरीं.'

मुंबई व पुणें येथें वृत्तपत्रांचें ठाणें पडल्यावर पुढील पंचवीस तीस वर्षांत महाराष्ट्रांतील प्रत्येक जिल्ह्याच्या शहरीं वृत्तपत्रें प्रकटूं लागलीं. साताऱ्यास 'शुभसूचक' (१८५९), बेळगांवांत 'बेळगांव समाचार', (१८६४), अकोल्यास 'वऱ्हाड समाचार' (१८६६) इत्यादि. त्यांपैकीं कांहीं पत्रें इंग्रजी पत्रांचें अनुकरण म्हणूनच काढलेलीं. मजकूर मराठी

पण पत्रांचीं नांवें इंग्रजींत लिहिलेलीं. यांत स्वभाषेची हेळसाड स्पष्ट दिसते. जिल्हानिहाय जीं पत्रें होतीं तीं केवळ सार्वजनिक कार्याच्या हौसेनें निघालीं नसून धंदा म्हणूनहि सुरू केलेलीं होतीं. ज्याचें पत्र त्याचाच छापखाना असल्यामुळें त्या दोघांच्या अन्योन्य सहाय्यानें मालकाचें बस्तान नीट बसावें. छापखाना म्युनिसिपालिटी व लोकलबोर्ड यांजकडील व अन्य कामावर चालावा आणि छापखान्यांतील नित्याच्या उद्योगाबरोबर वर्तमानपत्राची छपाई सहज पदरांत पडून नोटिशीची अवांतर प्राप्ति मालकाला मिळावी. अशा वृत्तपत्रामार्फत सार्वजनिक कार्य जेमतेमच व्हावयाचें. नवराबायकोसंबंधीं सोडचिठीच्या नोटिसा आपणास खेड्यापाड्यापासूनहि मिळविण्याच्या उद्देशानें कित्येक वर्तमानपत्रकार आपलीं पत्रें खेड्यांतील शाळामास्तरांना मोफत पाठवून राजी राखीत.

वरील विवेचनावरून महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांचें सामान्य धोरण व उद्देश लक्षांत येण्यासारखे आहेत. परंतु येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, सन १८८० सालापर्यंत महाराष्ट्रांत ज्यांना सुशिक्षित म्हणतां येईल, अशा नवीन लोकांनीं वृत्तपत्रव्यवसायांत विशेष पुढाकार घेतला नव्हता. जे कोणी सुशिक्षित म्हणजे पदवीधर वृत्तपत्रांत लिहींत ते वर्तमानपत्रांचे मालक अगर संपादक नसत. ते बाहेरून लेख पाठवीत. मुंबई इलाख्याचें विद्यापीठ सन १८५६ सालीं स्थापन होऊन त्याच्या नियंत्रणाखालीं इलाख्यांतील प्रमुख शहरीं महाविद्यालयें सुरू झालीं व त्यांतून दरसाल शिकून तयार झालेले पदवीधर राष्ट्रीय जीवनक्रमांत आपलें स्थान हुडकूं लागले. अर्थात् पदवीधर ही चीज नवीन असल्यामुळें जेवढे पदवीधर बाहेर पडले त्यांच्याकरितां सरकारी नोकरींत एतद्देशीयांच्या हिश्शाच्या जागा राखून ठेवलेल्या होत्या त्यांवर ते अनायासें जाऊन बसले व ज्यास सार्वजनिक कार्य म्हणतां येईल, अशा जीवनक्रमाला स्वाभाविकरीत्या फारच थोडे लोक शिल्लक राहिले.

तथापि इंग्रजी अमदानींतील त्या नव्या काळांत हिंदी लोकांस मिळूं लागलेलें शिक्षण नवें होतें, त्या शिक्षणानें उत्पन्न केलेल्या आकांक्षा नव्या होत्या व कार्यक्षेत्रहि अपूर्व होतें. या कारणानें नवीन प्राप्त झालेल्या शिक्षणाच्या जोरावर आपण नवीन कार्यक्षेत्रांत भूषणावह कामगिरी बजावून देशाला वर आणूं अशी उमेद वाटून थोड्या देशाभिमानी पदवीधर तरुणांनीं शीघ्र साहित्य व्यवसायाकडे नजर फेंकली; त्यांपैकीं कैलासवासी विष्णु कृष्ण चिपळूणकर हे होत.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं सरकारी हायस्कुलात शिक्षकाचें काम करीत असतांच 'निबंधमाला' या नांवाच्या प्रसिद्ध मासिक पुस्तकास जन्म दिला. या मासिकानें त्यांतील तेजस्वी व देशाभिमानी निबंधांनीं अल्पावधींत थोर यश मिळविलें. नवीन पदवीधरानें मराठींतून चालविलेलें हें पहिलेंच मासिक असून त्याचा फैलाव महाराष्ट्रांतील खेड्यापाड्यांतूनहि शीघ्र झाला. सदर प्रसार खेड्यामधील शिक्षक, कुलकर्णी व कांहीं सुखवस्तू लोक यांत विशेष दिसून आला. त्या आधारावर पुढील मनोरथांची उभारणी करून विष्णुशास्त्र्यांनीं पुढें सात वर्षांनीं आपल्याहूनहि तरुण अशा सहकाऱ्यांच्या सहाय्यानें नवीन छापखाना व वृत्तपत्रें हातीं घेण्याचें योजिलें. 'आर्यभूषण' हा तो छापखाना आणि केसरी व मराठा हीं तीं वर्तमानपत्रें. आर्यभूषण हें नांव स्वाभिमान व देशाभिमान यांचें द्योतक आहे. केसरी या नांवांत पराक्रम सांठविला आहे व मराठा या नांवानें प्रांताभिमान व्यक्त होत आहे. शास्त्रीबुवांनीं निबंधमालेच्या ६६ व्या अंकांत केसरीचें उद्देशपत्र छापलें आहे, त्यांत छापखाना व वृत्तपत्रें यांची महती ते पुढीलप्रमाणें गातात: 'छापखान्याचा उद्योग अविद्वान् व अडाणी लोक प्रायः करीत आले आहेत. मुद्रणयंत्र हें अज्ञानविध्वंसनाविषयीं केवळ वज्रच आहे.'

वरील उद्गारांतून तत्कालीन स्थितीचें चित्र सत्यार्थानें रेखाटलें

गेलें, तशीच या उदयोन्मुख लेखकाची जबर सदाशाहि त्यायोगें कळून आली. हा काळ सन १८८० मधील. त्यावेळेपर्यंत पदवीधरांच्या दोन-तीन पिढ्या बाहेर पडल्या असल्यानें पारतंत्र्याच्या प्राप्त परिस्थितींतील सुशिक्षितांना आपल्या कर्तव्याची ओळख सर्व देशभर पटूं लागून, बंगाल, मद्रास, संयुक्तप्रांत, पंजाब इत्यादि इतर प्रांतांतूनहि देशाभिमानानें प्रेरित झालेल्या नवीन सुशिक्षितांनीं देशी व इंग्रजी भाषांतून पत्रें छापण्याचा उपक्रम याच सुमारास उत्साहपूर्वक सुरू केला होता. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं 'बंगाली' पत्र आपल्या ताब्यांत सन १८७९ सालीं घेतलें. मद्रासचा 'हिंदु' सुब्रम्हण्य अय्यर यांनीं १८७८ मध्यें सुरू केला व पुण्यांतील 'केसरी-मराठा' हीं जुळीं भावंडें १८८१ सालीं निघालीं. अशा रीतीनें हिंदुस्थानाच्या तीन दिशांना तीन-चार पत्रांनीं भावी काळाची सूचना आपल्या देशबांधवांना केवळ दोनतीन वर्षांच्या अंतरानेंच दिली. केसरी व मराठा या पत्रांनंतर पांच वर्षांनीं म्हणजे सन १८८५ मध्यें राष्ट्रीय सभेची मुहूर्तमेढ रोंवण्यांत आली. तें तर काल बदलल्याचें अगदीं ठळक लक्षण होतें. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनें राष्ट्रीयत्वाची एक प्रचंड लाट उसळून तिनें राष्ट्रीयत्वाच्या समान भूमिकेवर सारा देश उभा केला. त्यामुळें साऱ्या देशभर देशी वर्तमानपत्रांचा एकाच वेळीं जोर वाढून इंग्रजांनीं चालविलेल्या पत्रांना तोंड देण्याचे प्रयत्न सर्वत्र सुरू झाले. मुंबईस राष्ट्रीय सभेची बाजू मांडण्याकरितां फेरोजशहा यांच्या प्रयत्नानें 'ॲडव्होकेट ऑफ इंडिया' हें दररोज संध्याकाळीं प्रसिद्ध होणारें पत्र निघालें. या उपक्रमास आणखी एक अनुकूलता लाभली ती मुद्रणयंत्रांतील सुधारणेची. सन १८८० पर्यंत हिंदुस्थानास रोटरी यंत्र माहीत नव्हतें तें आतां माहीत होऊन वर्तमानपत्र त्वरित छापून काढणें सोपें झालें.

महाराष्ट्रांत केसरी व मराठा या दोन पत्रांनीं शीघ्र साहित्य व्यवसा-

त्यांत एक क्रांतीच घडवून आणली असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजी व मराठी असा दोन भाषांतील मजकूर एकाच पत्रांत छापण्याची प्रथा या दोन पत्रांनीं बंद पाडून मराठी वाचकांकरितां केसरी हें स्वतंत्र पत्र व केवळ इंग्रजी वाचकाकरितां मराठा हें स्वतंत्र पत्र अशी महाराष्ट्रांत तरी ही पहिलीच योजना होती. हीं दोन पत्रें सुरू करण्यांत देशसेवा हा एकच हेतु होता. तथापि देशसेवा म्हटली तरी ती करण्याचीं सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय अशीं विविध अंगें आहेत. परंतु या अनेक अंगांपैकीं एक अंग प्रामुख्यानें निवडून त्यावरच भर द्यावयाच्या पद्धतीस धोरण म्हणतात. तें धोरण केसरी-मराठा या दुकलीचें अद्यापि ठरावयाचें असल्यानें सदर पत्रांतून सर्व विषयांवर संपादकीय लेख येत असत. पत्राचें धोरण ठरलें नव्हतें हें जसें एक कारण, त्याचप्रमाणें संपादकीय मजकूर लिहिणारा मनुष्य एक नव्हता हेंहि त्याचें दुसरें कारण होतेंच. कै. विष्णुशास्त्री यांनीं स्थापन केलेली प्रमुख संस्था न्यू इंग्लिश स्कूल. सदर संस्थेच्या निमित्तानें सुशिक्षित व विद्वान् तरुणांचा जो मेळा त्यांच्या भोंवतीं जमला त्यांतील हौशी तरुण आपल्या आवडीच्या विषयांवर लेख लिहीत. या कारणानेंहि धोरणाला निश्चितपणा आला नव्हता. केसरीची संपादकीय जोखीम कै. गो. ग. आगरकर यांजवर व मराठ्याची कै. बा. गं. टिळक यांजवर होती. तरी ते ठरवितील तेंच त्यांच्या पत्राचें धोरण असा अधिकार त्यांजकडून गाजविला जात नसे. परंतु प्रगतिप्रियता हें धोरण सर्वांचेंच असल्यासुळें हीं दोनहि पत्रें लवकरच सर्वत्र गाजूं लागलीं. विशेषतः केसरी पत्र अधिकच लोकप्रिय झालें.

केसरी पत्राचा बोलबाला इतर पत्रांपेक्षां त्याच्या माफक वर्गणीनेंहि वाढला. केसरीपूर्वी मराठी पत्रांच्या वर्गण्या फार जबर होत्या. वर्षाच्या कांठीं दहा रुपये भरून वर्तमानपत्र घेण्याची हौस व ऐपत फार थोड्यांना. अशा स्थितींत केसरी पत्र एक रुपया तेरा आण्यांस मिळूं लागल्यानेंहि

त्याचे ग्राहक वाढले. केसरी पत्राचें संपादकत्व हा एकच व्यवसाय समजून त्याच्या संपादकांनीं तें चालविलें नव्हतें. केसरी व मराठा हा दोहोंचे संपादक हे शाळेंत शिक्षक असून शिक्षकाचें काम संभाळून उरलेल्या वेळांत आपल्या पत्राकारितां मजकूर लिहीत. म्हणजे वर्तमानपत्रकार हा त्यांचा स्वतंत्र धंदा झाला नव्हता. ही केवळ या दोन पत्रांचीच स्थिति होती असें नव्हे. महाराष्ट्रांतील इतर पत्रेंहि सामान्यतः याच धर्तीवर त्या काळीं चालविलीं जात असत. केसरी व मराठा हीं पत्रें केवळ देशसेवेला वाहिलेलीं व त्याच बाण्यानें काढलेलीं असल्यामुळें त्यांतील टीका निर्भीड असे. लेखक अगदीं तरुण व अननुभवी, पत्र ही एक नवी शक्ति त्यांना प्राप्त झालेली आणि जेथें म्हणून अन्याय दिसेल त्यावर कुऱ्हाड घालावयाची असा त्यांनीं जणूं काय पण केलेला; यामुळें तीं लवकर पेंचांत न आलीं तरच नवल.

हीं पत्रें सन १८८१ सालाच्या प्रारंभीं निघालीं व त्या सालाच्या अखेरी अखेरीस त्या दोनहि पत्रांत कोल्हापुरांतील राजकारणावर लेख येऊं लागले. त्या वेळीं माधवराव बर्वे हे हुषार व वाकबगार दिवाण कोल्हापूरचा राज्यकारभार इंग्रज सरकारच्या वतीनें पहात असून तेथील शिवाजी महाराज वेडे ठरले होते. दिवाण महाराजांना निर्दयपणानें वागवितात, असा या दोन्ही पत्रांतील टीकेचा रोख होता. लेखक तरुण, ज्यांचा छळ त्यांच्या कानावर आला ते महाराज छत्रपति शिवाजी महाराजांचे वंशज व छळ करणारा दिवाण महाराष्ट्रीय यामुळेंहि लेख अधिकच त्वेषपूर्वक लिहिले गेले व त्यांचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. दोन्ही पत्रांवर दिवाणांनीं अब्रूनुकसानीची फिर्याद लावली व न्यायाधीशांनीं आगरकर व टिळक यांना प्रत्येकीं चार महिन्यांची शिक्षा ठोठावली. वर्तमानपत्रावरील खटल्यांत संपादकाला क्लेश होतात हें खरें. पण त्यापासून पत्राची कीर्ति, वजन व लोकप्रियता

वाढत असल्यानें खटला ही एक इष्टापत्तीच समजण्यांत येते. मात्र हे खटले ज्या पक्षास अन्याय झाला आहे अशी जनतेची भावना असते त्याचा पत्रकारानें कैवार घेतल्यावरून झालेले असावे लागतात. सरकार व लोकपक्ष या झगड्यांत लोकपक्षास तीव्र अन्याय घडला असतां लोकपक्षाची कड घेतल्याबद्दल शिक्षा भोगावी लागल्यास अशा पत्राच्या संपादकाला जनता देवतुल्य मान देते व त्याच्या पत्राचे ग्राहक होऊन पत्राची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास मदत करणें हा व्यक्तिशः एकच सहानुभूतीचा मार्ग जनतेस उपलब्ध असल्यानें पत्राचे वर्गणीदार भराभर वाढतात.

कोल्हापूर प्रकरणांतील केसरीवरील खटल्याचा फायदा केसरीस याच स्वरूपानें मिळाला. महाराष्ट्रांत तरी वर्तमानपत्रावरील हा खटला पहिलाच. साऱ्या हिंदुस्थानांतहि एतद्देशीय पत्रांवर या प्रकारचे खटले पूर्वी थोडेच झालेले असतील. खटल्याची ही अपूर्वाई, तो शिवाजी महाराजांच्या वंशजांचा कैवार घेतला म्हणून झालेला, यामुळें केसरीवरील जनतेच्या भक्तीस भरती येऊन केसरीच्या प्रती ३५०० पर्यंत खपूं लागल्या. तो काळ लक्षांत घेतां केसरीची ही प्रगति लहान नव्हे. सारांश जन्मापासून एक-दोन वर्षांच्या अवधींत केसरी हा महाराष्ट्रीय पत्रांचा राजा झाला व केसरी दाखवील तीच दिशा इतर पत्रांनीं पत्करावी असा मान त्याजकडे आल्यासारखा झाला. तथापि केसरीचें स्वतःचें धोरण अद्यापि स्पष्टपणें ठरलें नव्हतें. राष्ट्रीय सभा अद्यापि स्थापन व्हावयाची असल्यामुळें तिच्याकडून जें राजकीय धोरण आयतें तयार होऊन मिळावयाचें त्यालाहि अवकाश होता. खेरीज केसरींतील लेखक वर्गांत इतकें वैचित्र्य दिसून येत होतें कीं पत्राला एकतंत्रीपणा आल्याखेरीज धोरण निश्चित ठरणें शक्य नव्हतें. पण एकतंत्रानें पत्र चालवावयाचें झाल्यास केसरीच्या संपादकानें शिक्षणव्यवसाय सोडून देऊन केसरी तेवढाच

शिरावर घेण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. केसरीच्या लेखक वर्गांत सामाजिक व धार्मिक विषयांवर मतभेद असून तो कांहीं वर्षें मुद्दाम दाबून धरला असला तरी अखेर ज्या कित्येक बाबतींत फूट पडली त्यांपैकीं हे मतभेद होत. न्यू. इं. स्कूल चालविणारी जी मंडळी तीच केसरी चालविणारी असल्या-मुळें केसरी पत्राच्या संपादकाला एकंदर मंडळींचा रंग पाहून आपल्या मतांना मुरड घालावी लागत होती. पण या मंडळींतील प्रमुख गृहस्थ आगरकर व टिळक हे होत. आगरकरांचा अधिक ओढा सामाजिक सुधारणेकडे व टिळकांचा ओढा राजकीय सुधारणेकडे. म्हणून या उभ-यतांत लवकरच 'आधीं सामाजिक कीं राजकीय' हा लढा सुरू झाला. त्याचा परिणाम म्हणून ता. २५ ऑक्टोबर १८८७ रोजीं टिळक हे आगरकरांऐवजीं केसरीचे संपादक झाले आणि त्यांनीं केसरी व मराठा हीं दोनहि पत्रें त्यावरील सात हजार रुपये कर्जासुद्धां मालकी हक्कानें ताब्यांत घेतलीं. केसरीच्या जबाबदारींतून यानंतर आगरकर मोकळे झाले तरी आपलीं स्वतःचीं मतें प्रतिपादन करण्याकरितां 'सुधारक' या नांवाचें सामाजिक विषयांस वाहिलेलें वेगळें पत्र त्यांनीं सुरू केलेंच.

सुधारक व केसरी या दोन पत्रांचीं दोन स्वतंत्र अधिष्ठानें ही शीघ्र साहित्यविकासांतील एक महत्त्वाची पायरी होय. आधीं दोनच वर्षें राष्ट्रीय सभेची स्थापना झाली असल्यामुळें महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांना जें विशिष्ट वळण पाहिजे त्याचें साधन मिळालेंच होतें. पण त्यांतच केसरी पत्राच्या एकतंत्री राजकारणाची भर पडून महाराष्ट्रीय वर्तमानपत्रांना एक विश्वसनीय वाटाड्या लाभला. आतांपासून केसरीनें सरकाराच्या राज्यकार-भारावर टीका करून त्याचे गुणदोष वाचकांपुढें मांडण्याचें व्रत धोरण म्हणून चालविलें. सामाजिक विषयांवरहि केसरींत लेख येत, पण ते सुधारकांतून सामाजिक मतें मांडताना आगरकरांकडून जो अतिरेक होत असे त्याज-वर हल्ला चढविण्याकरितांच असत. टिळक मोठे करारी, कायदेबाज, धीट,

निर्भय, बुद्धिमान, स्वाभिमानी, मर्मज्ञ, लढाऊ वृत्तीचे व तापट स्वभावाचे असल्यामुळें त्यांच्या या सर्व गुणांचें सहाय्य केसरीमार्फत महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनास मिळून महाराष्ट्र देश इंग्रजी राजनीति ओळखण्यांत इतर प्रांतांच्या पुढें गेला. केसरीचें वळण इतर पत्रांनीं गिरविलें व केसरी-चींच राजकीय मतें आपल्या वाचकांना पटविण्यास सुरुवात केली. इतर प्रांतांतून विद्वान् व बुद्धिमान् संपादकांनीं आपल्या ज्ञानाचा व गुणांचा फायदा इंग्रजी भाषेमार्फत इंग्रजी वाचकांना दिला. टिळक बुद्धिमत्तेंत व विद्वत्तेंत कोणाहि इंग्रजी संपादकापेक्षां कमी नसून कांकणभर अधिकच होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतक्या योग्यतेचा वर्तमानपत्रकार कोणत्याहि प्रांतांतल्या देशी भाषेला लाभला नसेल. टिळक प्रथम मराठा या इंग्रजी पत्राचेच संपादक होते. पण मराठ्याचे संपादक असतांना त्यांना जी कीर्ति लाभली नाहीं ती केसरी या मराठी पत्राचे संपादक झाल्यावर त्यांस लाभूं लागली याचीं कारणेंहि तशींच आहेत. बहुजनसमाज जी भाषा जाणणारा त्या भाषेंतूनच टिळक आपलें मनोगत त्यांच्याशीं समरस होऊन सांगूं लागल्यामुळें त्यांचें महाराष्ट्रांत स्वाभाविकच वजन वाढलें. महाराष्ट्र त्यांस अधिक ओळखूं लागला व तेहि महाराष्ट्राला अधिक ओळखूं लागल्यामुळें ते महाराष्ट्राशीं एकरूप झाले. मराठी ही कांहीं झाली तरी टिळकांची स्वभाषा असल्यानें त्यांना आपले विचार व भावना जशा उत्पन्न होत तशाच तिच्यांतून व्यक्त करणें सहज साधलें. त्यांतून त्यांचा निर्भयपणा व परकीय सत्तेविषयीं तिटकारा असाधारण असल्या-कारणानेंहि त्यांचे लेख वाचकांच्या मेंदूवर व मनावर इतके ठांसून बसत कीं महाराष्ट्रांतील बहुजनसमाजास इंग्रजांची राजनीति तंतोतंत कळून तो जागृत व सावध झाला. टिळकांचें तेज व स्वतंत्र वृत्ति सरकारास सन १८८७ सालापासूनच असह्य होत चालली व त्यामुळें सरकारास टिळकाविषयीं वाटणारी अप्रियता पुढील दहा

वर्षांत म्हणजे १८९७ सालापर्यंत कळसास पोंचली. तेवढ्या दहा वर्षांच्या काळांत महाराष्ट्राशीं व महाराष्ट्राच्या इतिहासाशीं तन्मय होऊन त्यांनीं श्रीगणेशोत्सव व श्रीशिवजयंत्युत्सव यांची प्राणप्रतिष्ठा केल्यानें महाराष्ट्र देश पूर्णपणें त्यांच्या मुठींत आला; व त्याचें बक्षिस टिळकांना सन १८९७ सालीं मिळालें. त्यांनीं पुण्यांतील प्लेगच्या साथींत व्यवस्थेच्या नांवाखालीं सरकारी अधिकाऱ्यांनीं चालविलेल्या जुलुमावर कडक कोरडे ओढले. त्या त्यांच्या कडक लिहिण्यानें डोकें फिरून जाऊन चाफेकरबंधूंनीं रँड व आयर्स्ट यांचे खून केले असा ग्रह सरकारानें करून घेऊन त्यांना इं. पि. को. च्या १२४ अ कलमाखालीं राजद्रोहाच्या आरोपावरून १॥ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.

कोल्हापूर प्रकरणांत टिळकांना चार महिन्यांची साधी शिक्षा भोगावी लागल्यानें त्यांजविषयीं लोकांत आदर व सहानुभूति उद्भवली होतीच. त्यानंतर २५ वर्षांनीं टिळक इंग्रज सरकाराविरुद्ध केलेल्या राजकीय गुन्ह्याबद्दल तुरुंगांत गेले. या वेळीं त्यांना दीड वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यांत आली होती तरी सदर शिक्षा त्यांनीं एक वर्षच भोगली. टिळक तुरुंगांतून १८९८ सालीं सुटून आल्यावर त्यांचें जनतेवरील वजन वाढलें व त्यांनीं वर्तमानपत्रांचा दर्जाहि वाढविला आणि वर्तमानपत्रकार हा गुरु व समाज हा शिष्य असें उभयतांचें नातें शाबीद झालें. टिळकांच्या खटल्यांत त्यांच्या बचावाकरितां मोठा फंड जमला व जनतेनें त्यांजविषयीं शक्य तितका आपलेपणा व्यक्त केला. त्यावरूनहि सरकार टिळकांना समाजाचे पुढारी समजूं लागलें. टिळकांना जे पुढारीपण मिळालें त्याला कारण त्यांचें वर्तमानपत्र हेंच प्रामुख्यानें असलेलें पाहून वर्तमानपत्रकार व पुढारी यांची जनतेनें आपल्या मनांत समव्याप्ति केली. १८९७ सालानंतर महाराष्ट्रांत ठळक फरक हा पडला कीं सामाजिक विषयांचें महत्त्व कमी होऊन राज-

निर्भय, बुद्धिमान, स्वाभिमानी, मर्मज्ञ, लढाऊ वृत्तीचे व तापट स्वभावाचे असल्यामुळें त्यांच्या या सर्व गुणांचें सहाय्य केसरीमार्फत महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनास मिळून महाराष्ट्र देश इंग्रजी राजनीति ओळखण्यांत इतर प्रांतांच्या पुढें गेला. केसरीचें वळण इतर पत्रांनीं गिरविलें व केसरी-चींच राजकीय मतें आपल्या वाचकांना पटविण्यास सुरुवात केली. इतर प्रांतांतून विद्वान् व बुद्धिमान् संपादकांनीं आपल्या ज्ञानाचा व गुणांचा फायदा इंग्रजी भाषेमार्फत इंग्रजी वाचकांना दिला. टिळक बुद्धिमत्तेंत व विद्वत्तेंत कोणाहि इंग्रजी संपादकापेक्षां कमी नसून कांकणभर अधिकच होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतक्या योग्यतेचा वर्तमानपत्रकार कोणत्याहि प्रांतांतल्या देशी भाषेला लाभला नसेल. टिळक प्रथम मराठा या इंग्रजी पत्राचेच संपादक होते. पण मराठ्याचे संपादक असतांना त्यांना जी कीर्ति लाभली नाहीं ती केसरी या मराठी पत्राचे संपादक झाल्यावर त्यांस लाभूं लागली याचीं कारणेंहि तशींच आहेत. बहुजनसमाज जी भाषा जाणणारा त्या भाषेंतूनच टिळक आपलें मनोगत त्यांच्याशीं सम-रस होऊन सांगूं लागल्यामुळें त्यांचें महाराष्ट्रांत स्वाभाविकच वजन वाढलें. महाराष्ट्र त्यांस अधिक ओळखूं लागला व तेहि महाराष्ट्राला अधिक ओळखूं लागल्यामुळें ते महाराष्ट्राशीं एकरूप झाले. मराठी ही कांहीं झाली तरी टिळकांची स्वभाषा असल्यानें त्यांना आपले विचार व भावना जशा उत्पन्न होत तशाच तिच्यांतून व्यक्त करणें सहज साधलें. त्यांतून त्यांचा निर्भयपणा व परकीय सत्तेविषयीं तिटकारा असाधारण असल्या-कारणानेंहि त्यांचे लेख वाचकांच्या मेंदूवर व मनावर इतके ठांसून बसत कीं महाराष्ट्रांतिल बहुजनसमाजास इंग्रजांची राजनीति तंतोतंत कळून तो जागृत व सावध झाला. टिळकांचें तेज व स्वतंत्र वृत्ति सरकारास सन १८८७ सालापासूनच असह्य होत चालली व त्यामुळें सरकारास टिळकाविषयीं वाटणारी अप्रियता पुढील दहा

वर्षांत म्हणजे १८९७ सालापर्यंत कळसास पोंचली. तेवढ्या दहा वर्षांच्या काळांत महाराष्ट्राशीं व महाराष्ट्राच्या इतिहासाशीं तन्मय होऊन, त्यांनीं श्रीगणेशोत्सव व श्रीशिवजयंत्युत्सव यांची प्राणप्रतिष्ठा केल्यानें महाराष्ट्र देश पूर्णपणें त्यांच्या मुठींत आला; व त्याचें बक्षिस टिळकांना सन १८९७ सालीं मिळालें. त्यांनीं पुण्यांतील प्लेगच्या साथींत व्यवस्थेच्या नांवाखालीं सरकारी अधिकाऱ्यांनीं चालविलेल्या जुलुमावर कडक कोरडे ओढले. त्या त्यांच्या कडक लिहिण्यानें डोकें फिरून जाऊन चाफेकरबंधूंनीं रँड व आयर्स्ट यांचे खून केले असा ग्रह सरकारानें करून घेऊन त्यांना इं. पि. को. च्या १२४ अ कलमाखालीं राजद्रोहाच्या आरोपावरून १॥ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.

कोल्हापूर प्रकरणांत टिळकांना चार महिन्यांची साधी शिक्षा भोगावी लागल्यानें त्यांजविषयीं लोकांत आदर व सहानुभूति उद्भवली होतीच. त्यानंतर २५ वर्षांनीं टिळक इंग्रज सरकाराविरुद्ध केलेल्या राजकीय गुन्ह्याबद्दल तुरुंगांत गेले. या वेळीं त्यांना दीड वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यांत आली होती तरी सदर शिक्षा त्यांनीं एक वर्षच भोगली. टिळक तुरुंगांतून १८९८ सालीं सुटून आल्यावर त्यांचें जनतेवरील वजन वाढलें व त्यांनीं वर्तमानपत्रांचा दर्जाहि वाढविला आणि वर्तमानपत्रकार हा गुरु व समाज हा शिष्य असें उभयतांचें नातें शाबीद झालें. टिळकांच्या खटल्यांत त्यांच्या बचावाकरितां मोठा फंड जमला व जनतेनें त्यांजविषयीं शक्य तितका आपलेपणा व्यक्त केला. त्यावरूनहि सरकार टिळकांना समाजाचे पुढारी समजूं लागलें. टिळकांना जे पुढारीपण मिळालें त्याला कारण त्यांचें वर्तमानपत्र हेंच प्रामुख्यानें असलेलें पाहून वर्तमानपत्रकार व पुढारी यांची जनतेनें आपल्या मनांत समव्याप्ति केली. १८९७ सालानंतर महाराष्ट्रांत ठळक फरक हा पडला कीं सामाजिक विषयांचें महत्त्व कमी होऊन राज-

कारणाची कमान चढली. १८९७ पर्यंत समाजांत सुधारक व बिनसुधारक असे पक्ष आढळून येत असत, त्याऐवजीं आतां जहाल व मवाळ अशीं प्रकृतिवैशिष्ट्य दर्शविणारीं पक्षनिष्ठ नांवें राजकारणांत प्रकटलीं. जहाल व मवाळ हीं प्रवृत्तिसूचक नांवें कांहींशीं निंदाव्यंजक आहेत; त्यापेक्षां राष्ट्रीय व नेमस्त हीं अधिक भारदस्त होत. जे पूर्वी सामाजिक बाबतींत सुधारक पक्षांत मोडत असत त्यांना आतां राजकारणांत नेमस्त अगर मवाळ हें नांव मिळून त्यांचें पुढारीपण न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व गोपाळ कृष्ण गोखले यांजकडे आलें. पण रानडे पडले सरकारी अधिकारी; तेव्हां नेमस्त पक्षाचे जबाबदार पुढारी गोखलेच समजले गेले. त्यांनीं ज्ञानप्रकाश पत्र आपल्या मालकीचें करून ते दैनिक बनविलें. पुण्याप्रमाणें मुंबईंतहि नेमस्त पक्षाचा जमाव होताच. मुंबईंतील नेमस्तांनीं इंदुप्रकाश पत्र रोजचें केलें. पुण्याचा ज्ञानप्रकाश सकाळीं व मुंबईचा इंदुप्रकाश सायंकाळीं, अशा या सकाळसंध्याकाळ प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक पत्रांनीं राष्ट्रीय पक्षावर एक प्रकारें ताण केली. नेमस्त पक्ष धनिकांचा व राष्ट्रीय पक्ष गरिबांचा. दोघांच्या सांपत्तिक स्थितींत हें महत्त्वाचें अंतर असल्यामुळें दैनिकांच्या बाबतींत नेमस्तांनीं राष्ट्रीय पक्षास मागें टाकलें तरी राष्ट्रीय पक्षाचीं साप्ताहिक पत्रें ठिकठिकाणीं निघून ही उणीव भरून आली.

सन १८४९ सालीं ज्ञानप्रकाश पत्र निघालें तेव्हांपासून १८८१ सालीं केसरी पत्र सुरू झालें तोंपर्यंत ३२ वर्षें लोटलीं. हा बत्तीस वर्षांचा पहिला कालखंड होय. त्यांत वृत्तपत्रांनीं बोध व मनोरंजन या पलीकडे विशेष कार्य केलें नाहीं. १८८१ पासून १८९७ पर्यंतचा कालखंड १६ वर्षांचा छोटा असला तरी महत्त्वाचा होता. त्यांत वर्तमानपत्रांनीं प्रगतीची वाट बरीच चालून राजकारणाशीं गांठ घातली. १८९७ ते १९०८ हा तिसरा कालखंड. हा टप्पा दुसऱ्या टप्प्यापेक्षां लहान असूनहि केसरीच्या पुढारी-

पणाखालीं राष्ट्रीय पक्षाचीं नवीं पत्रें महाराष्ट्राच्या प्रमुख शहरांतून स्थापन झालीं. सदर पत्रांत पुण्याचा 'काळ' व 'भाला', सोलापूरचें 'स्वराज्य', मुंबईचा 'विहारी', इस्लामपूरचा 'प्रतोद', यवतमाळचा 'हरिकिशोर', नागपूरचा ( पूर्वीपासून सुरू असलेला ) 'देशसेवक' या पत्रांची गणना विशेषत्वानें करावी लागेल. बंगालची फाळणी याच मुदतींत झाली व फाळणीमुळें बंगाल प्रांतांत लोकक्षोभाच्या ज्वाळा उसळल्या. त्या ज्वाळा महाराष्ट्रभर पसरविण्याचें श्रेय केसरीनें घेतलें. बंगालच्या लोकक्षोभांतून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही चतुःसूत्री बाहेर पडली. तिनें बंगाल, महाराष्ट्र, पंजाब इत्यादि प्रांतांना नवचैतन्य पाजलें. लोकांच्या राजकीय आकांक्षा स्वराज्य व स्वातंत्र्य येथपर्यंत पोंचल्या. काळ पत्रानें स्वातंत्र्याचा संदेश देऊन तरुणांचीं अंतःकरणें चेतविलीं. त्या प्रेरणेचें अधिष्ठान शिवाजीनें स्थापन केलेल्या स्वराज्यांत असल्यामुळें हा स्वातंत्र्याचा संदेश महाराष्ट्रीय मनाला विशेषच मानवला. महाराष्ट्रांत नवा उत्साह, नव्या आशा, नव्या उमेदी जोमानें मोहोरल्या. राष्ट्रीय सभेनें वसाहतीचें स्वराज्य हें आपलें ध्येय ठरविलें; आणि स्वराज्य संपादण्याच्या उद्देशानें बंगाल्यांत राजकीय कट उत्पन्न होऊन कटवाल्यांनीं बॉंब, रिव्हॉल्व्हर, पिस्तुलें यांच्या सहाय्यानें सरकारी अधिकाऱ्यांचे खून पाडणें हें स्वराज्याचें साधन मानलें.

बंगाल्यांतील कटाप्रमाणें महाराष्ट्रांतहि कटाचा आरंभ झाला आणि त्याचीं साधनें व उद्देश बंगाल्यांतल्याहून वेगळे नव्हते. सारांश, हा अकरा वर्षांचा काळ स्वावलंबनाचा असून वर्तमानपत्रांच्या दृष्टीनें भक्तिमार्गाचा होता. केसरीचें धोरण निवळ भक्तियुक्त नसून भक्ति-ज्ञानयुक्त होतें. केसरीच्या अनुयायी वर्गांत राजकीय विचाराचीं गंभीर पत्रें होतीं; पण त्याशिवाय विनोदी लेखनाचीहि टूम निघाली होती. ठाण्याचें 'हिंदू पंच' पत्र विनोदी लेख लिहून व व्यंग्यचित्रें काढून वाचकांना राजकीय शिक्षण देत होतें. या विशिष्ट

गुणामुळें तें बरेच लोकप्रियहि झालें. काळ पत्र गंभीर स्वभावाचें पण इतर पत्राहून निराळ्या धर्तीचें होतें. त्यांतील कित्येक लेख उपरोधिक व उपहासात्मक असत. सदर पत्रानें अल्पावधींत पुष्कळच लोकप्रियता संपादन करून केसरीच्या खालोखाल स्थान पटकावलें. अशा रीतीनें महाराष्ट्रांतील बहुतेक जुनीं नवीं पत्रें टिळक पक्षाचीं अर्थात् राष्ट्रीय पक्षाचीं झालीं, तरी दैनिक पत्राची उणीव शिल्लक होतीच. म्हणून टिळकांनीं १९०८ सालाच्या प्रारंभीं मुंबईत भागीदारीच्या पद्धतीवर एक कंपनी निर्माण करून तिच्या मालकीचें 'राष्ट्रमत' हें नवीन दैनिक पत्र मुंबईस सुरू केलें. एकंदरींत महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांना हा अकरा वर्षांचा काळ अत्यंत भरभराटीचा व वैभवाचा लाभला असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु ही झुळूक अनुभवावयास सांपडते न सांपडते तोंच बंगाल्यांत १९०८ च्या मे महिन्यांत मुझफरपुरास बॉंबगोळा उडाला. त्याबरोबर धरपकड, खटले व शिक्षा यांचें सत्र सर्व देशभर सुरू होऊन त्यांत केसरी व काळ या दोन पत्रांच्या आहुती पडल्या. केसरीचे संपादक टिळक यांना सहा वर्षें काळेंपाण्याची व काळाचे संपादक शिवराम महादेव परांजपे यांना १९ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्याशिवाय विहारी, स्वराज्य, वंदेमातरम्, हिंदू पंच या पत्रांच्या संपादकांना तुरुंगाच्या वगैरे शिक्षा मिळून तीं पत्रें बंद पडलीं. नवीन निघालेलें राष्ट्रमतहि त्याच काळांत थोड्या दिवसांनीं नष्ट झालें व काळ पत्राचीहि कांहीं काळानें तीच गति झाली. वर्तमानपत्रांची ही उतरती कळा टिळक मंडालेहून सुटून येईपर्यंत टिकली. टिळक १९१४ सालीं सुटले व वर्तमानपत्रांचें नष्टचर्य संपलें.

यावरून १९०८ ते १९१४ पर्यंतचा सहा वर्षांचा काळ ऱ्हासाचा होय. त्यांत वृत्तपत्रांची पिछेहाटच झाली. सरकारी कारभारावर टीका करण्याचें व्रत वृत्तपत्रांना भिऊन चालवावें लागलें; कारण वर्तमान-

पत्राच्या कायद्याचा कांटेरी लगाम जामिनकीच्या नवीन विधानें सरकारानें अधिक जांचक केल्यामुळें वर्तमानपत्रांना हूं कीं चूं करतां येईना. केसरीच्याहि गळ्याला तांत लावून त्याचेंहि जीवित अशाश्वत करण्यांत आलें. सरकारी रोषानें केसरीलाहि बरेंच घेरलें; त्यानें आपलीं नखें व पंजे कालावर नजर देऊन थोडे मिटवून धरले. त्याचा खप सन १९०२ सालीं तेरा हजारावर आला होता व पुढें एकसारखा आस्ते आस्ते वाढतहि गेला होता; तो सन १९०८ ते १९१४ पर्यंतच्या सहा वर्षांत सरकारच्या दहशतीनें वर्गणीदार कमी होऊन उतरला; पण १९१४ सालीं टिळक सुटून आल्यावर सरकार प्रतिकूल होतें तरी काल अनुकूल आल्यामुळें स्थित्यंतरास सुरुवात झाली. नागपूरच्या देशसेवक पत्राचे माजी संपादक रा. अच्युत बळवंत कोल्हटकर यांनीं स्वतःच्या जबाबदारीवर मुंबईस 'संदेश' नांवाचें दैनिक पत्र सुरू केलें. त्याची धाटणी अगदींच नवी. सरकारावरील हल्ले थांबवून त्यानें समाज व त्यांतील व्यक्ति यांच्या गुणदोषांची बरीचशी खाजगी स्वरूपाची चर्चा सुरू केली. कोल्हटकरांनीं आपल्या पत्राचें हें प्रमुख अंगच बनविलें. पूर्वीचा हिंदू पंच व काळ यांच्या गुणांचें मिश्रण त्यांच्या लेखनपद्धतींत दिसून आले. म्हणजे हिंदू पंचाचा कुचेष्ट-पणा व काळाच्या कल्पित कथा यांचा अवलंब करून त्यांची योजना समाजांतील ठळक व्यक्तींचीं खाजगी चरित्रें चव्हाट्यावर आणण्यांत होऊं लागल्यानें संदेश पत्राला मनोरंजक स्वरूप आलें व तें पत्र विकत घेऊन लोक आवडीनें वाचूं लागले. यामुळें संदेशाचा खप त्वरित वाढून त्याचें बस्तान चांगलें बसलें

टिळक सुटून आल्यावर कांहीं महिन्यांनीं युरोपांतील महायुद्धानें एकाएकीं पेट घेतला. हिंदुस्थान सरकाराला या युद्धांत इंग्लंडच्या पक्षास जय मिळणें इष्ट असल्यानें हिंदी लोकांच्या सहानुभूतीची, सलोख्याची

व सहाय्याची गरज भासली. टिळक मंडालेहून पुण्यास सुटून आले होते तरी सरकारानें त्यांस कैचींतच ठेवल्यामुळें त्यांना आपल्या सामर्थ्याचा उपयोग लोकसेवेकडे पूर्णपणानें करतां येत नव्हता. त्यांनींहि सरकारास परिस्थितीनें घातलेला पेंच पाहून स्वतःची सरकारी पेंचांतून सुटका करून घेण्यासाठीं आपलें धोरण बदललें व सरकाराशीं राजनिष्ठेनें वागण्याची जाहीर घोषणा केली. १९१४ते१९२०हा महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांच्या आयुष्यांतील चौथा कालखंड. या सहा वर्षांच्या काळांत टिळकांनीं केसरी पत्रावर संपादक या नात्यानें स्वतःचें नांव घालून केसरीचें सुकाणूं आपल्या हातीं न घेतां रा.नरसिंह चिंतामण केळकर व थोडे दिवस रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांजकडे ठेवलें आणि होमरूल लीगची चळवळ हातीं घेतली. तथापि त्यांची चळवळ केसरीच्या मुखानेंच चालू असल्यामुळें व महायुद्धाच्या चित्तवृत्ति थरारून सोडणाऱ्या बातम्या केसरींतून नीट सजवून, खुलवून विवेचनपूर्वक वाचकांस मिळूं लागल्यामुळें केसरीचा खप १९२० सालापर्यंत अतोनात वाढला. त्याचे कायम वर्गणीदार पंचवीस सत्तावीस हजारापर्यंत गेले व एकंदर खप पसतीस हजारांच्या घरांत राहिला. या दृष्टीनें १९२० सालापावेतों केसरीनें भाग्याचें परमोच्च शिखर गांठून १९१४ पर्यंतच्या सहा वर्षांच्या काळांतील संकटांचें उट्टें १९१४ पासून पुढील सहा वर्षांच्या काळांत यथास्थित काढलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वरील सहा वर्षांच्या काळांत पुण्यांतील साप्ताहिक पत्रांची संख्या कमी झाली. शिवराम महादेव परांजपे या अव्वल दर्जाच्या संपादकानें काळ पत्राची उणीव भरून काढण्याकरितां 'स्वराज्य' नांवाचें नवीन साप्ताहिक पत्र सुरू केलें असतांहि त्याला योग्य प्रमाणांत वर्गणीदार मिळाले नाहींत. सुधारक, जगद्धितेच्छू, ज्ञानचक्षू, व्यापारी, करमणूक इत्यादि जुनीं पत्रें जीव धरून होतीं, त्यांपैकीं बहुतेक बंद पडलीं

किंवा मरणाच्या दारीं बसलीं. याचें कारण, जिल्हानिहाय नवीं भारदस्त साप्ताहिक पत्रें निघाल्यामुळें त्यांची गरज पुण्यांतील मध्यवर्ती पत्रांवर विसंबून न रहातां परभारें भागूं लागली हें होय. मध्यवर्ती शहराकडे वर्तमानपत्रांच्या व्यवसायाचें धुरीणत्व त्यांनीं साप्ताहिकाऐवजीं दैनिक पत्रें चालविलीं तरच राहील याचीं पूर्वचिन्हें किंचित् प्रमाणांत याच काळांत नजरेंत आलीं. राजकारणाचा जोर बराच वाढून वेगवेगळे राजकीय पक्ष निर्माण झाले. पूर्वीं नेमस्त व राष्ट्रीय.हे दोनच पक्ष होते. आतां त्या पक्षांची वांटणी पोटपक्षांत झाली. होमरूलची चळवळ महाराष्ट्र व मद्रास या प्रांतांत टिळक व बेझंटबाई यांनीं सुरू केली. तेव्हां त्यांना व त्यांच्या पक्षांना पक्षसंघटनेकरितां स्वतःचीं दैनिक पत्रें असण्याची जरुरी प्रतीत झाली. बेझंटबाईचें न्यू इंडिया हें दैनिक पत्र बाईच्या मताचें प्रचारकार्य चालविण्यास पुढें आलें. मुंबईस सर फेरोजशहाप्रभृति नेमस्त पुढाऱ्यांना त्यांच्या मताचें दैनिक पत्र टाईम्स आदि करून अँग्लो इंडियन पत्रांना तोंड देण्याकरितां हवें होतें. फेरोजशहांचा मूळ बेत बॉंबे गॅझेट पत्र विकत घेऊन टाईम्स ऑफ इंडिया पत्राचें वजन कमी करण्याचा होता. पण तो घाट फसल्यावर मेहता यांनीं सन १९१३ सालीं 'बॉंबे क्रॉनिकल' या दैनिक पत्राची स्थापना केली. कलकत्त्यांतील प्रसिद्ध स्टेट्समन पत्राचे माजी संपादक मि. बेंजामिन हॉर्निमन यांस त्यांनीं क्रॉनिकल पत्राचे संपादक नेमलें.

हिंदी लोकांनीं चालविलेल्या इंग्रजी दैनिकांचा जोर एकट्या मुंबईतच वाढला असें नव्हे, तर हिंदुस्थानाच्या बहुतेक भागांतून वाढला. कारण इंग्रजी शिक्षण घेतलेल्या हिंदी लोकांची संख्या इतकी अभिवृद्धि पावली कीं त्यांना मताकरितां व माहितीकरतां युरोपियनांच्या पत्रांवर विसंबण्यांत कमीपणा वाटला. किंबहुना युरोपियनांच्या देशहितविघातक मतांचा प्रसार देशांत अप्रतिहत होण्यांत देशाची हानि असल्या-

विषयीं त्यांची खात्री पटली. या जागृतीचा परिणाम युरोपियनांच्या पत्रांना जाणवून मुंबईस टाइम्स ऑफ इंडिया एकटें व मद्रासेंत 'मद्रास मेल' हें एकटेंच इंग्रजांचें पत्र राहिलें. कलकत्त्यांत युरोपियनांचीं चार पत्रें होतीं त्यांपैकीं आतां दोनच शिल्लक राहिलीं.

हिंदुस्थानांत राजकीय चळवळ फोंफावत चालली. त्या चळवळी-बरोबर व्याख्यानें, धरपकड, फंड या स्वरूपाच्या घडामोडी अधिक प्रमा-णांत होऊं लागल्या. शिवाय महायुद्ध सुरू झालें तें तर बातम्यांचें पेंवच. परदेशच्या युद्धविषयक बातम्या पूर्वीपासून जगप्रसिद्ध रूटर कंपनीच्या द्वारें रोजच्या रोज हिंदुस्थानांत धडकत. त्या वाचण्याकरिता वर्तमान-पत्रावर वाचकांच्या उड्या पडत. पण अशी सोय देशी बातम्यांची नव्हती. देशी बातम्या व्यक्तिशः ज्या त्या पत्रानें मिळवाव्या व वाच-कांना पुरवाव्या. इंग्रज पत्रकार इंग्रज सरकाराचे पित्त्येच. त्यांचा शिरकाव सरकारच्या अंतःपुरांत. अगदीं गुलदस्तांतील बातमीहि त्यांनीं काढावी. जिल्ह्याच्या बहुतेक शहरांतून कलेक्टर, पोलीस सुपरिंटेंडेंट यांसारखे सर-कारी अधिकारीच त्यांचे गुप्त बातमीदार. सन १९१२ सालीं दिल्ली दर-बार भरेपर्यंत कलकत्ता हीच हिंदुस्थानाची राजधानी होती. म्हणून सरकारी गुप्त बातम्या सर्वांच्या आधीं कलकत्त्यांतील पत्रांनाच मिळावयाच्या या दृष्टीनें कलकत्त्याचा इंग्लिशमन, स्टेट्समन व इंडियन डेली न्यूज या पत्रांना मान पहिल्या प्रतीचा. हिंदुस्थान सरकारचा मुक्काम कलकत्त्यास असतां तेथील बातम्या त्यांना अनायासें मिळत. अडचण काय ती सरकारचा मुक्काम सिमल्यास असेल तेव्हां पडावयाची. त्यासाठीं सदर पत्रें आपले खास बातमीदार सिमल्यास ठेवीत. याचें कारण असें कीं अलाहाबादेचें पायोनियर पत्र त्यावेळीं निवळ सरकारी समजलें जाणारें व कलकत्त्यांतील पत्रांपेक्षां सिमल्याला जवळ असणारें, त्यामुळें त्याला तेथील बातम्या ताबडतोब लागत. त्या पत्राचा संपादक हावर्ड

हेन्समन याचें वजनहि सरकारच्या मुलकी व लष्करी खात्यांत दांडगें. धंदा म्हटला कीं युरोपियन पत्रांतहि चुरस असावयाचीच. याच चुरशीनें पायोनियरची ऐट चालूं न देण्याकरितांहि कलकत्त्याच्या पत्रांना वरीलप्रमाणें व्यवस्था करणें भाग होतें.

सिमल्यास इंग्लिशमनचा बातमीदार मि. ए. जे. बक, स्टेट्समनचा मि. एव्हेरर्ड कोट्स व इंडियन डेली न्यूजचा मि.डलास होता. डलासचा मदतगार मि. के. सी. राय. त्यांना रूटरप्रमाणेंच हिंदुस्थानाकरितां एखादी बातम्या पुरविणारी मंडळी स्थापण्याची कल्पना सुचली. त्यांनीं पायोनियरचा संपादक हावर्ड हेन्समन यालाहि आपल्या मसलतींत घेतलें. अशा रीतीनें ॲसोसिएटेड प्रेस नामक वार्ताहर मंडळी निघाली. हेन्समनला के. सी. राय हा काळा अदमी डायरेक्टरांत सहन न झाल्यामुळें त्याला प्रथम खड्यासारखा वगळण्यांत आला. पण मागाहून रायच्या हुषारीमुळें त्याचाहि समावेश अखेर झालाच. कारण राय बातम्या काढण्यांत फार पटाईत. त्याच्या-वांचून नवीन मंडळीचें काम नडलेंच असतें. राय मिळाला म्हणूनच ॲसोसिएटेड प्रेसची कल्पना यशस्वी झाली.

दैनिक पत्रांचें जीवन बातम्यांवर. बातम्या ताज्या देण्याची सोय नव्हती तोंपर्यंत हिंदी वर्तमानपत्रकारांना व राजकीय पुढाऱ्यांना आपलीं पत्रें दैनिक बनविण्यांत फायदा दिसला नाहीं. परंतु देशांतल्या देशांत काल घडलेलें वृत्त आज वाचकांना सांगावयास सांपडतें हें शक्य झाल्या-वर व त्या योगानें पत्राचा खपहि होईल अशी खात्री पटल्यावर दैनिक पत्रें काढणारे धाडसी लोक पुढें आले व ॲसोसिएटेड प्रेसच्या स्थापनेनंतर दैनिकांची लाटच उसळली. पण अॅ. प्रे. झाला तरी त्याच्या कचेऱ्या इलाख्याच्या मुख्य शहरीं असल्यामुळें मुंबई, मद्रास, कलकत्ता, अलाहाबाद यांसारख्या शहरांत दैनिक पत्रें सोयीचीं ठरलीं आणि तेथें देशी व इंग्रजी भाषांतून तीं निघालींहि. परंतु त्या बाहेर-

च्या शहरांत दैनिक पत्रें काढण्याचा हिय्या फारसा कोणी केला नाहीं. तथापि या सुमारास टेलिफोनवरून बातम्या मिळण्याची सोय पुण्यास झाल्यानें तिचा कांहींसा फायदा घेऊन पुण्यास टिळक पक्षाच्या लोकांनीं १९१९ सालच्या जून महिन्यांत 'लोकसंग्रह' नामक दैनिक पत्राची जुळवाजुळव करून मुंबईतील दैनिक राष्ट्रमत बंद पडल्यानें जाणवणारी उणीव दूर करण्याचा प्रयत्न केला.

सन १९१३ ते १९२० या कल्पिलेल्या कालखंडापैकीं १९२० साल खरोखरच फार महत्त्वाचें. त्या सालीं परिणामकारक गोष्टी घडून आल्या. मांटेग्यू व चेम्सफर्ड या जोडीनें हिंदुस्थानाकरितां राजकीय हक्क अधिक प्रमाणांत देण्याची योजना लिहून काढली होती. त्या योजनेच्या आधारें ब्रिटिश पार्लमेंटानें बनविलेला कायदा याच सालीं अमलांत येऊन प्रांतिक कायदेमंडळें, मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व कौंसिल ऑफ स्टेट या संस्थांतून लोकप्रतिनिधी अधिक विस्तृत प्रमाणांत निवडून देण्याचे अधिकार जनतेस लाभले. सत्याग्रह व असहकारिता या चळवळींचीं वाद्यें वाजूं लागलीं आणि लो. टिळक निवर्तून म. गांधींकडे देशाचें राजकीय पुढारीपण आलें. टिळकांच्या मृत्यूमुळें त्यांनीं महाराष्ट्रांत रचलेला राष्ट्रीय पक्ष ढांसळण्यास सुरुवात झाली आणि महाराष्ट्रावर गांधींचें अनुयायी बनावें, किंवा उदासीन रहावें या पैकीं कोणतें तरी धोरण स्वीकारण्याची पाळी आली. राजकीय चळवळीचीं सूत्रें महाराष्ट्राच्या हातीं न राहिल्या-मुळें महाराष्ट्राचें राजकारणांतील प्रमुख स्थान हललें.

या दृष्टीनें सन १९२० सालापासून नव्याच कालखंडाला सुरुवात होते. या कालखंडांत महाराष्ट्रांत जिल्हानिहाय निघणाऱ्या साप्ताहिक पत्रांची संख्या अधिकच वाढली. मुंबई व पुणें या मध्यवर्ती शहरांकडे साप्ताहिक पत्रांचें पुढारीपण होतें, तें जिल्ह्यांच्या पत्रांनीं न राहूं दिल्यामुळें सदर शहरीं दैनिक पत्रांचा हंगाम आला. नवीन कालखंडाच्या पहिल्या कांडांत पुण्यांत

राष्ट्रीय पक्षानें काढलेलें लोकसंग्रह हें दैनिक पत्र द्रव्याभावीं बंद पडलें. पण मुंबईंत मात्र राष्ट्रीय पक्षाचीं दैनिक पत्रें फिरून सुरू करण्याचे नेटाचे प्रयत्न झाले. त्यांपैकीं 'लोकमान्य' हें पत्र विशेष संघटित होय. त्याकरितां एक कंपनी उभारण्यांत आली व त्याचें संपादकत्वहि तेजस्वी मराठी लेखक व नाटककार रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांस देण्यांत आलें. परंतु कंपनीच्या मालकीचीं पत्रें नीट चालत नाहींत असें यावेळीं विशेषत्वानें प्रतीत झालें. खाडिलकर संपादक व कंपनी मालक या दुहेरी कारभारांत कंपनीचें धोरण खाडिलकरांच्या धोरणाशीं विसंवादी होऊं लागल्यामुळें त्यांनीं लोकमान्य पत्राचें संपादकत्व सोडून स्वतःच्या माल-कीचें 'नवाकाळ' हें नवीन पत्र उभें केलें. खाडिलकरांनीं आपल्या व्यवहार-चातुर्यानें नव्या पत्राची घडी चांगली बसविली. खाडिलकरांनीं सोड-लेल्या लोकमान्य पत्रास उतरती कळा लागली. नवाकाळ व लोकमान्य हीं दोन पत्रें सुरू असतांच 'प्रभात' नांवाचें तिसरें मराठी दैनिक मुंबईकरांच्या सेवेला हजर झालें. इंदुप्रकाश या जुन्या दैनिक पत्राचा चढाओढींत टिकाव न लागल्यामुळें अगर इतर आर्थिक भानगडीमुळें त्यानें राम म्हटला.

नवाकाळ, लोकमान्य व प्रभात हीं तीन मराठी दैनिक पत्रें मुंबईस चालू असतां 'फ्री प्रेस जर्नल' पत्राचे धाडसी संपादक रा. सदानंद यांनीं 'नवशक्ति' हें चौथे मराठी दैनिक तिघांच्या पंक्तीस आणून बसविलें. सदानंद हे मद्रासी गृहस्थ आहेत. त्यांना मराठी भाषेचें ज्ञान नाहीं. अशा स्थितींत मराठी लेखकांच्या सहाय्यानें त्यांनीं नवशक्तीस सुरुवात केली या घटनेचें कोणीहि नवलच करील. पण मागील सरकारच्या रोषापुढें सदानंदांचे तेव्हांचे उद्योग जमीनदोस्त झाले, त्यांत नवशक्तीहि गेली.

दैनिक वृत्तपत्रें चालावयाचीं एकट्या मुंबईत व पुणें दैनिकांना वावडें अशी सर्वसामान्य समजूत झाली होती व तिला थोडा अनुभवाचाहि

आधार होता. ज्ञानप्रकाश हें दैनिक स्वरूपांत बरींच वर्षें चालू होतें याचें कारण स्थानिक अनुकूलता हें नसून सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी व आर्यभूषणासारखा समृद्ध छापखाना यांनीं पुरविलेली सांपत्तिक मदत हें होय यांत शंका नाहीं. ज्ञानप्रकाश पत्र एकंदरीनें बुडींत आहे अशी माहिती असूनहि आठ वर्षांपूर्वीं 'सकाळ' या नवीन पत्राची मुहूर्तमेढ डॉ. परुळेकर यांनीं रोंवली. डॉ. नारायण भिकाजी परुळेकर हे अगदीं तरुण गृहस्थ आहेत. त्यांनीं अमेरिकेंत कांहीं वर्षें राहून शीघ्र साहित्याचा अभ्यास केला होता. मनांत आलें असतें तर एखादें इंग्रजी साप्ताहिक अगर मासिक त्यांनीं सहज चांगलें चालविलें असतें. परंतु आपल्या अभ्यासाचा उपयोग त्या दिशेनें न करतां परुळेकर यांनीं पुण्यांत मराठी दैनिकाचा मांड मांडण्याचें ठरविलें हा विशेष होय. लोकसंग्रह पत्रानंतर हें पत्र सात-आठ वर्षांनीं निघालें. त्या काळांत परिस्थिति बरीच बदलली होती. मुंबईहून असोसिएटेड प्रेसच्या व रूटर-च्या तारा पुण्यास टेलिफोनद्वारां मिळणें अधिक सोपें झाले होतें. शिवाय सकाळानें नवीन उपक्रम केला तो असा कीं तिनें वर्तमानपत्रांतील मजकुरा-ची घडीच बदलली. त्यापूर्वींचीं दैनिक अगर साप्ताहिक पत्रें एकाच धर्तीचीं होतीं. साप्ताहिक पत्रें गंभीर राजकीय मजकुरानें भरलेलीं असत. दैनिक पत्रांचा गाभा तोच असे. त्यास संभाळून उरलेल्या भागांत ताज्या तारा, बातम्या व बातमीपत्रें देण्यांत येत. मुंबई शहर अफाट. त्यांत मराठी जाणणारा लोकसमूह मोठा. या कारणानें तेथें दोन-तीन हजार प्रति खपल्यास दैनिक पत्र सहज जिवंत राहूं शकतें. पण पुण्याची परिस्थिति वेगळी आहे. पुणें शहर मुंबईच्या चतुर्थांशाइतकेंहि नाहीं. संपत्तीनेंहि पुष्कळच गरीब आहे. शिक्षितांत इंग्रजी शिकलेल्यांचा वर्ग मोठा आहे. टाइम्ससारखें धूड त्यास चार पैशांत रोजच्या रोज मुंबईप्रमाणें ताजें वाचावयास मिळतें. मग त्यांना मराठी दैनिकाची गरज काय? तेव्हां मराठी दैनिकाचा विशेष खप पुण्यांतील मागसलेल्या वाचकांतच व्हाव-

याचा. अर्थात् तेथील दैनिक त्यांच्या गरजा भागविणारेंच असलें पाहिजे. त्या गरजांवर नजर देऊनच परुळेकरांनीं सकाळ पत्रांतील विषयांचा संग्रह केला आहे.

वाचक वर्गाला राजकीय, आर्थिक, धार्मिक, सामाजिक विषय समजावून सांगणें हें सकाळ पत्राचें ध्येय नाहीं. त्यानें संपादक व वाचक यांजमध्यें गुरु-शिष्याचें नातें ठेवलेलें नाहीं. वाचकांचें मन रमविणारा तो एक खेळगडी किंवा खुषमस्कऱ्या आहे. त्यांत स्थानिक बातम्या बऱ्याच, इतर हकीकती आश्चर्यकारक, मनोरंजक व दुकानदार, बागवान, टांगेवाले, बाजारकरी व स्त्रिया यांना समजण्या-जोग्या येतात. पदवीधर, डॉक्टर, वकील, कारकून, शाळामास्तर यांनीं वाचावें असें सदर पत्रांत थोडें असतें. आजपर्यंतच्या कोणत्याहि वर्तमानपत्रानें जें टोंक गांठलें नाहीं तेंच टोंक या पत्रानें नेमकें गांठलें आहे. तो वर्गहि एकंदर लोकसमूहांत फार मोठा आहे व त्यांत साक्षरता-प्रसाराहि अलीकडे वाढत आहे. या कारणानें सकाळ पत्राला वाचकवृंदहि विस्तृत प्रमाणांत हस्तगत करतां आला आहे. या गुणामुळें त्याचा खपहि पुण्यांत व दक्षिण महाराष्ट्रांत बराच आहे. सकाळ पत्राची ही तऱ्हा अर्थातच अमेरिकेची असून तिच्या यशाची गुरुकिल्ली ओळखून त्याच धर्तीचीं मराठी दैनिकें पुणें व कोल्हापूर येथें निघालीं आहेत. इतकेंच नव्हे तर सकाळ पत्राच्या या ढंगांनीं ज्ञानप्रकाश या जुन्या भारदस्त पत्रासहि आपला जुना बाणा कांहींसा सोडावा लागला आहे. सारांश मुंबई व पुणें हीं आतां दैनिक पत्रांचीं आगरें बनलीं असून तेथील साप्ताहिक पत्रें नष्टप्राय झालीं आहेत. ताज्या बातम्यांची वाचकांना लागलेली चटक पाहून केसरी पत्रासहि आपलें सात दिवसांनीं वाचकास घडणारें दर्शन तीन दिवसांवर आणावें लागलें आहे. तथापि त्यानें आपला साप्ता-हिकांतील भारदस्तपणा अर्धसाप्ताहिकांतहि कायम राखला आहे. केस-

रीच्या या परिवर्तनाचा परिणाम नागपूरचा महाराष्ट्र, उमरावतीचा उदय इत्यादि महाराष्ट्रीय पत्रांवरहि झाला असून तींहि पत्रें आठवड्यांतून दोनदां वाचकांस दर्शन देत आहेत. भारदस्तपणांतहि त्यांनीं केसरीचेंच वळण गिरविलें आहे. तथापि मागणीपेक्षां पुरवठा अधिक, हें सध्यांच्या यांत्रिक युगांतील संकट वृत्तपत्र व्यवसायाच्याहि नशिबीं आल्यामुळें त्यांनीं इतरांस मारून आपणास जिवंत राखण्याच्या धडपडींत वाचकांच्या मनोरंजनाचें महत्त्व आपला बोज कायम ठेवून तारतम्य भावानें ओळखलेलें दिसतें. बहुतेक सर्व पत्रें सचित्र झालीं आहेत. तीं कथा, लघुकथा, आख्यानें, उपाख्यानें व इतर मालमसाला भरून खुसखुशीत व लज्जतदार बनविण्यांत येत आहेत. तीं चालविण्याचा खर्चहि फार वाढला असल्यामुळें कांहीं पत्रांची जीवितयात्रा कष्टमय झाली आहे व कांहींना ती लवकर संपवावी लागत आहे.

जीवनसंग्रामाचा एक सुपरिणाम असा झाला आहे की, वर्तमानपत्रांच्या कचेऱ्यांना आतां व्यवस्थितपणा आला आहे. वृत्तपत्रांच्या पहिल्या अमदानींत मध्यवर्ती अशा पुणें शहरींहि पत्राचा संपादक एकच व तो अग्राधिकारी असावयाचा. अग्रलेख त्यानेंच लिहावा, स्फुट सूचना त्यानेंच खरडाव्या व वर्तमानसारहि त्यानेंच भरावें. अगदींच अडलें म्हणजे एखादा लहानसा लेखक हाताखालीं घ्यावा. पण आपणांस दुसऱ्यांशीं झगडून जिवंत रहावयाचें आहे याचा साक्षात्कार प्रत्येक पत्रकर्त्यास झाला असल्यामुळें पंचहत्यारीपणा टाकून आपल्यापाशीं उपसंपादकांचा लहान मोठा संच बऱ्याच पत्रांनीं ठेविला आहे. दैनिक पत्र एकच संपादक चालवूं म्हणेल तर त्याची दैनाच उडेल. दैनिक पत्रकर्त्यांत कै. अच्युतराव कोल्हटकर यांची गणना खंद्या लेखकांत होते. ते एकटेच पाचसांत रकान्यांचा लेख बसल्या बैठकीला लिहून मोकळे व्हावयाचे. पण दैनिक पत्रांचा खाक्याच असा आहे कीं

त्यांत मी मी म्हणणाऱ्या कलमबहाद्दराचाहि टाका ढिला झाल्याशिवाय राहावयाचा नाहीं. म्हणून अच्युतरावांसारख्यांनाहि आपल्यापाशीं चार-दोन उपसंपादक बाळगावे लागलेच होते. कोल्हटकरांची जर ही कथा तर इतरांची पुसावयासच नको. बहुतेक सर्व दैनिकांनीं पांचपासून सात-आठपर्यंत उपसंपादक ठेविले आहेत; त्यांजकडे अग्रलेखापासून बातमी-दारापर्यंतचीं विविध कामें वांटून दिलीं आहेत व अशा रीतीनें दररोज रात्रंदिवस हा कारखाना अविरत चालू आहे.

दैनिक पत्रांच्या खालोखाल सरंजाम अर्धसाप्ताहिकांचा. अर्ध-साप्ताहिकांत पुण्याचा केसरी व नागपूरचा महाराष्ट्र अग्रगण्य. अर्ध-साप्ताहिकाची टूम महाराष्ट्रांत तरी केसरीनेंच काढली व त्याचें अनुकरण 'महाराष्ट्रा'नें केलें. हीं दोन्ही पत्रें, विशेषतः केसरी पत्र फारच व्यवस्थित-पणें व कसोशीनें चालविलें जातें. केसरीचें संपादकमंडळ मोठें आहे. इमारती भव्य व सोयीस्कर आहेत. मुद्रणयंत्र दर तासाला सात आठ हजार प्रतींचा ढीग घालणारें आहे. केसरीपाशीं स्वतःची ठशांची टांक-साळ आहे. त्याच्या खालोखाल जय्यत तयारी महाराष्ट्र पत्राची आहे. महाराष्ट्र पत्राची स्वतःच्या मालकीची इमारत, छापखाना वगैरे सर्व सिद्धता आहे. म्हणून महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांचें मार्गदर्शन त्यांजकडेच आहे.

अर्धसाप्ताहिकापेक्षां कमी साहित्य साप्ताहिक पत्रांना लागतें. अशीं साप्ताहिक पत्रें प्रत्येक जिल्ह्यांत एक ते तीन चारपर्यंत असून एकं-दरीनें समाधानकारक चाललीं आहेत. त्यांत धुळ्याचा 'प्रबोध', रत्नागिरीचा 'बलवंत', पेणचा 'कुलाबा समाचार', साताऱ्याचें 'ऐक्य' व 'समर्थ', सांगलीचा 'दक्षिण महाराष्ट्र' इत्यादि पत्रांची गणना करतां येते. याशिवाय मुंबईस 'विविधवृत्त', 'चित्रा', 'मौज', 'धनुर्धारी' इ. निवळ साप्ताहिक पत्रें आहेत. परंतु त्यांचें धोरण वाचकांना राजकीय अगर सामाजिक विषयांचें ज्ञान देण्यापेक्षां खाजगी व्यक्ती व संस्था यांचें छिद्रान्वेषण करून वाचकांच्या

हीन मनोवृत्तीला आळविण्याचेंच आहे. महाराष्ट्राबाहेर जेथें म्हणून महाराष्ट्रीयांची वस्ती आहे त्यांपैकीं कांहीं ठिकाणीं महाराष्ट्रीयांनीं वृत्तपत्रें चालविलीं होतीं व आहेत. बडोदें येथील 'जागृति' व 'कमान' हीं पत्रें अशापैकींच होत. गोमंतक हा प्रांत इंग्रजांहून भिन्न अशा परकीय राजसत्तेखालीं असला तरी तो खास मराठी भाषा बोलणारा महाराष्ट्राचाच एक भाग असल्यामुळें तेथेंहि मराठी पत्रें आहेत व त्यांचा दर्जाहि वरिष्ठ प्रतीचा आहे.

सर्वसामान्य राजकारण व समाजसुधारणा यापेक्षां विशिष्ट जातींचें राजकारण व समाजसुधारणा यांस वाहिलेलीं वर्तमानपत्रें महाराष्ट्रांत निघालीं; त्यांतील कांहीं बंद पडलीं व बाकीचीं चालू आहेत. त्यांत 'दीनबंधू', 'विजयी मराठा', 'जागरूक', 'राष्ट्रवीर', 'जनता' यांची गणना होते. पहिलीं तीन ब्राम्हणेतरांच्या उन्नतीस वाहिलेलीं व चौथें अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीकरितां निघालेलें. विशिष्ट विषयांस वाहिलेलींहि कांहीं पत्रें आहेत. त्यांपैकीं 'अर्थ', 'गोरक्षण', 'क्रान्ति', 'संस्थानी स्वराज्य' हीं होत. अर्थ हें पत्र आर्थिक प्रश्नांचा खल करतें, गोग्रास व गोरक्षण गाई व दूधदुभतें यांविषयीं लिहितात. क्रान्ति पत्रांत समाजसत्तावादी व कम्यूनिस्ट मतांचा प्रचार असतो आणि संस्थानी स्वराज्यांत देशी संस्थानांच्या प्रगतीसंबंधीं लेख येतात.

सामाजिक व राजकीय उन्नतीशिवाय राष्ट्राच्या इतर अंगांच्या जोपासनेची गरज आहेच. ती ओळखून वांईस काशिनाथशास्त्री लेले यांनीं 'धर्म' नांवाचें पत्र सुरू केलें व तें त्यांच्या मृत्यूबरोबर बंद पडलें. विष्णुशास्त्री बापट यांचें मासिक पत्र 'आचार्य' होतें, त्याचाहि अस्त झाला. 'व्यापारी' पत्र व्यापारी वर्गाच्या उपयोगाकरितां पुण्यांत बरींच वर्षे चालून विराम पावलें. केवळ कादंबऱ्या व कथा यांच्या मिषानें समाजसुधारणा करूं इच्छिणारें 'करमणूक' पत्र रा. हरि नारायण आपटे यांनीं सन १८९०

सालीं पुण्यास सुरू केलें. त्यांतूनच त्यांच्या बहुतेक प्रसिद्ध कादंबऱ्या बाहेर पडल्या. तें फार चांगल्या रीतीनें चालून त्यांना १९१७ त बंद ठेवावें लागलें.

दर दहा वर्षांतील शिक्षणाचा आढावा घेतल्यास उच्च शिक्षण प्रसार कसा झपाट्यानें होत आहे याची कल्पना येते. उच्च शिक्षणक्रमांत मराठीचा प्रवेश झाल्यामुळें मराठी भाषेचा अभिमान व प्रेम सुशिक्षित समाजांत किती तरी वाढलें आहे. त्याबरोबर संस्कृत भाषेचा अभ्यास कमी होऊन नवी पिढी मराठी व इंग्रजी या दोन भाषांतील वाङ्मयावरच अधिक पोसली जात आहे. याचा स्वाभाविक परिणाम हिंदु संस्कृतीचें ज्ञान व अभिमान कमी आणि पाश्चिमात्य संस्कृतीवरील प्रेम जास्ती असा होऊन त्या प्रेमानें भारलेले तरुण समाजांत अधिक प्रमाणांत पैदा झाले आहेत. स्त्री-वर्गांतहि शिक्षण वीस-पंचवीस वर्षांपेक्षां पुष्कळच फैलावलें आहे. त्या वर्गांतील तरुणीहि पाश्चिमात्य संस्कृतीवरच फिदा आहेत अशा तरुण-तरुणींच्या आकांक्षा वेगळ्या व ध्येयेंहि वेगळीं. त्यांस प्रचलित राज-कारणांत त्यांच्या मनाजोगें क्षेत्र राहिलेलें नाहीं. राष्ट्रीय सभेचें राजकारण हेंच देशाचें राजकारण. तें स्वातंत्र्य, कायदेभंग, सत्याग्रह, समाजसत्ता, कम्यूनिझम यावर कमी अधिक मानानें अधिष्ठित झालेलें, सामान्य सुशिक्षित वर्गाच्या आटोक्याबाहेर गेलें आहे. या सर्वांचा परिणाम असा झाला आहे कीं, महाराष्ट्रांतील सुशिक्षित तरुणतरुणींची नजर समाजसेवा, समाजसुधारणा, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रियांचे हक्क, घटस्फोट, सहवासोत्तर विवाह व वाङ्मयोपासना यांजकडे वळली असून त्या प्रकारच्या वाङ्मयोत्पत्तीसाठीं मुंबई-पुण्यांत, विशेषतः मुंबईंत कित्येक साप्ताहिकें व पाक्षिकें जन्मास आलीं आहेत. नवीन वाङ्मयोपास-कांस चटकदार व सफाईदार भाषापद्धती साधली असून गंभीर प्रति-पादनापेक्षां मनोरंजनावर त्यांची आसक्ति जबर आहे. चालत्या व

बोलत्या चित्रपटांतून इंग्लंड, अमेरिका व युरोपांतील कित्येक देश यांतील चालचालणुकींचे, स्त्री-पुरुष संबंधांचे व झाकीबाजीचे देखावे प्रत्यहीं पहात राहिल्यानें वरील प्रकारच्या साप्ताहिक व पाक्षिक पत्रांतील लेखकांना मोहक व लज्जतदार विषय मिळत आहेत. अशा प्रकारचीं पत्रें म्हटलीं म्हणजे 'वसुंधरा', 'चित्रा', 'प्रेक्षक', 'विहार', 'प्रमोद', 'संजीवनी', 'प्रतिभा', 'किरण' इत्यादि होत. त्यांचे वाचक मुंबई, पुणें, बडोदें, नागपूर, सोलापूर अशा मोठ्या शहरांतून छानछोक समाजांतच आढळावयाचे. हा समाज लहान व पत्रांची संख्या मोठी या कारणानें या पत्रांचें जननमरण सतत चालू असतें. त्यांना आयुष्य फारच थोडें लाभतें.

---

# प्रकरण सहावें

## महाराष्ट्रांतील प्रसिद्ध संपादक

कै. विष्णु कृष्ण चिपळूणकर हे महाराष्ट्रांतील आधुनिक द्रष्टे होत. त्यांनीं अनेक राष्ट्रीय विचारांचें व कार्यांचें प्रवर्तन महाराष्ट्रांत केलें. नवीन महाराष्ट्रास कालानुरूप योग्य वळण लावण्याची पात्रता त्यांच्या अंगीं येण्यास त्यांस अनुकूलताहि तशीच लाभली होती. संस्कृत भाषा ही मन व बुद्धि यांजवर थोर व सात्विक संस्कार करणारी भाषा आहे. तिचें अध्ययन त्यांस शाळा-कॉलेजांतील अध्ययनाशिवाय खासगी रीतीनें कृष्णशास्त्री वैजापूरकर या विद्वानापाशीं करावयास सांपडल्यामुळें तिच्याशीं त्यांना पूर्ण एकांत लाभला. ब्रह्मकर्म ते बचंभट मामाजवळ शिकले; त्याचा पवित्रपणा बालवयांतच त्यांच्या वृत्तींत भिनून गेला. अशा सुसंस्कृत व पवित्र मनाला इंग्रजी शिक्षणानें आधुनिक विचारांची व ध्येयांची दिशा दाखविली. विष्णुशास्त्र्यांचा काळ हा पेशवाईच्या अस्त-मानाचा काळ. त्यांच्या लहानपणीं पेशवाईचें वैभव पाहिलेलें व त्यांतील स्वतंत्र वातावरणांत श्वासोच्छ्वास केलेले वृद्ध लोक होते. त्यांच्या तोंडून पेशवाईंतील वैभवाच्या व पराक्रमाच्या कथा त्यांनीं ऐकाव्या आणि गोंधळ्यांच्या तोंडून वीरश्रीयुक्त पोवाडे श्रवण करावे. विष्णुशास्त्र्यांचा देशाभिमान त्या कथांमधून व पोवाड्यांमधून जन्म पावला व त्याची वाढ इंग्रजी इतिहासानें केली. पिंड महाराष्ट्रीय व साज पाश्चिमात्य असें त्यांच्या देशाभिमानाचें स्वरूप बनलें.

शास्त्रीबुवांस शाळेंत काय किंवा कॉलेजांत काय विद्या हेंच व्यसन

होतें. त्यांची इंग्रजी, संस्कृत व इतिहास यांवर अतोनात प्रीति. डेक्कन कॉलेजींच्या ग्रंथालयांत त्यांनीं संस्कृत व इंग्रजी पुस्तकें फार वाचलीं. काव्यें व नाटकें यांच्या अवलोकनानें रसिकतेला पाझर फुटले. संस्कृत व इंग्रजी या भाषांच्या श्रीमंतीनें दिपून जाऊन त्यांनीं मराठी भाषेची हेळसांड मुळींच केली नाहीं. मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत या श्रेष्ठ मराठी कवींचा दृढ परिचय त्यांनीं कॉलेजांतच करून घेतला. असा विद्वान्, गुणी, रसिक, देशभक्त, स्वार्थत्यागी व दूरदृष्टीचा पुरुष महाराष्ट्रास सन १८७४ सालाच्या सुमारास भेटला हें महाराष्ट्राचें सुदैवच समजलें पाहिजे. विष्णुशास्त्र्यांनीं स्वतः संपादक होऊन वर्तमानपत्र असें चालविलें नाहीं. खरें पहातां ते वर्तमानपत्रें वाचीतहि नसत. मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्राची तत्कालीन आंग्लविद्याविभूषितांत काय चहा; पण त्या पत्रास बहुधा त्यांनीं शिवूंहि नये. तथापि वर्तमानपत्रांचें नवीन काळांतील सामर्थ्य ते पूर्णपणें जाणून असल्यामुळेंच केसरी व मराठा या दोन प्रसिद्ध वर्तमानपत्रांची त्यांनीं स्थापना केली. तीं पत्रें रा. आगरकर व टिळक या त्यांच्या शिष्यांनीं चालविलीं. ते स्वतः या दोन पत्रांच्या गुरुस्थानीं राहिले; इतकेंच नव्हे तर पुढील काळांत जे वर्तमान-पत्रकार, मासिककार, निबंधकार व ग्रंथकार महाराष्ट्रांत निपजले त्यांपैकीं बहुतेकजण त्यांजकडे गुरु म्हणूनच पाहूं लागले.

निबंधमाला मासिक हेंच त्यांचें लेखनसर्वस्व. तिच्या मार्फत त्यांनीं आपलें सारें हितगुज महाराष्ट्रास सांगून टाकलें. निबंधमालेस सुरुवात १८७४त झाली व ती १८८१ साली संपली. निबंधमाला म्हणजे निबंधांची माला. तो उत्कृष्ट निबंधांचा मासलाच आहे. तिच्या नांवावरूनच निबंध लिहिण्याची त्यांची हौस व तिच्या अन्तरंगावरून त्यांची पात्रता सिद्ध होते. निबंधमालेनें उत्कृष्ट निबंधलेखनाची कला महाराष्ट्रास शिकविलीच, पण ग्रंथलेखनाची दिशाहि दर्शविली. त्यामुळें निबंधमालेनंतर सर्व मराठी

प्रा. श्री.

वाङ्मयास अभिनव व उच्च दर्जाचें वळण लागलें. शास्त्रीबुवा स्वतः मासिककार होते व ग्रंथकार होण्याचीहि त्यांना उमेद होती, परंतु अकालमृत्यूनें त्यांना ती संधीच दिली नाहीं. निबंधमालेनें महाराष्ट्रीयांची दृष्टि अन्तर्मुख बनविली. ते आपल्या भोंवतालीं व जगांत घडणाऱ्या हालचालींकडे महाराष्ट्रीय दृष्टीनें पाहूं लागले. आपला इतिहास, धर्म, संस्कृति व परंपरा सर्वस्वीं टाकाऊ नसून त्यांत स्पृहणीय व अभिमानास्पद अंश पुष्कळ आहे, त्यांतील जें ग्राह्य असेल तें जतन करून त्याज्य असेल तें टाकावें व पाश्चिमात्यांचें अनुकरणीय असेल तें अंगिकारावें या विचारसरणीचा ओघ महाराष्ट्रांत तेव्हांपासून वाहूं लागला व नवीन वाङ्मयांत सर्वत्र उसळून वर आला.

शास्त्रीबुवांनीं निबंधमालेंत डॉक्टर जॉन्सन याचें कौतुक केलें आहे, त्यावरून जॉन्सनचें जें स्थान इंग्रजी वाङ्मयांत होतें तें मराठी वाङ्मयांत आपण संपादावें अशी त्यांची आकांक्षा स्पष्टपणें दिसून येते; व लाभलेल्या अल्पवयांत त्यांना तें अंशतः मिळालेंहि. डॉ. जॉन्सन याच्या भोंवतीं जशी विद्वान्, रसिक व देशाभिमानी मंडळी जमली तशी विष्णुशास्त्री यांजभोंवतींहि जमली. आणि त्यांनीं त्यांचें ऊर्वरित कार्य त्यांच्या पश्चात् जोमानें चालविलें. त्या दृष्टीनें शास्त्रीबुवांचे अगदीं निकटवर्ती म्हणजे गोपाळ गणेश आगरकर व बाळ गंगाधर टिळक हे होत. केसरी पत्र सन १८८१ सालीं सुरू झालें. त्याचे पहिले संपादक रा. आगरकर असले तरी धोरण ठरविणारे रा. चिपळूणकरच. केसरींत पहिला लेख 'वर्तमानपत्रें' हा प्रसिद्ध झाला. सदर लेख वाचला असतां केसरीपूर्वी महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांची स्थिति कशी होती याची कल्पना येते. त्यांत म्हटलें आहे 'वर्तमानपत्रकर्त्यांना आपणावरील जबाबदारी कळावी तशी कळत नाहीं. चार दोन नामांकित पत्रें सोडल्यास वर्तमानपत्र म्हणजे जागोजागच्या बातम्या प्रसिद्ध करणारें साधन. अलीकडे लहान गांवांतूनहि

पत्रें निघूं लागलीं आहेत. छापखाना घालणें व वर्तमानपत्र काढणें हा एक व्यापारच बनल्यानें ज्यांस विद्येचा विशेष संस्कार नाहीं अशांच्या हातीं तीं साधनें पडलीं आहेत. निदानपक्षीं लोकांत वाचण्याचा प्रवात तरी होण्यास वरील साधनांचा उपयोग आहे.'

केसरी निघण्यापूर्वी मराठी वर्तमानपत्रें आपलें कर्तव्य बजावण्यास समर्थ झालीं नसून तो एक कांहीं लोकांचा पोट भरण्याचा धंदा होऊन बसला होता व त्याचें कारण अल्पशिक्षितांच्या हातीं वर्तमानपत्रें पडलीं होतीं असा केसरीचा अभिप्राय आहे. त्यापुढें केसरीनें वर्तमानपत्रांचा उपयोग सांगितला आहे तो असा— 'वर्तमानपत्रांचा उपयोग मुख्यतः दोन प्रकारचा आहे. ( १ ) आपलें काम निःपक्षपातानें व निर्भीडपणानें बजावलें असतां सरकारी अधिकाऱ्यांवर मोठा दबदबा राहतो. ती एक पोलिसांच्यासारखी गस्त आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या कामाचा चोखपणा राहण्यास त्यांचा सर्व कारभार लोकांच्या नजरेसमोर वारंवार यावयास पाहिजे. ( २ ) लोकस्थितीची सुधारणा. जुन्या टाकून देण्यासारख्या चाली कोणत्या व नव्या घेण्यासारख्या कोणत्या, लोकांचे वास्तविक हक्क काय आहेत, ते संपादण्यासाठीं काय केलें पाहिजे, लोककल्याणार्थ उभारलेल्या कामाची काय वाट लागली व लोकांत कोणते गुण येणें आवश्यक आहे याचाहि ऊहापोह वर्तमानपत्रांनीं केला पाहिजे.' वरील उताऱ्यांत केसरीनें वर्तमानपत्रांचें जें कर्तव्य सांगितलें आहे तें कोणासहि पटण्यासारखेंच आहे. केसरीचे पहिले संपादक आगरकर व दुसरे टिळक. त्या उभयतांच्या मतानेंच कर्तव्याची रूपरेषा काढण्यांत आली आहे व तिला धरूनच केसरी चालविण्यांतहि आला. या रूपरेषेंत राजकीय व सामाजिक या दोन कर्तव्यांचा समावेश झाला असून तीं टिळक व आगरकर यांच्या भावी चरित्रांचीं निदर्शक ठरतात. आगरकर व टिळक एकत्र काम करीत होते तोंपर्यंत दोघांच्या दोन प्रवृत्तींचा मेळ

घालण्याचा प्रयत्न झाला असला तरी आगरकरांची व्यक्तिविशिष्ट छाप केसरीवर ठळकपणानें उमटल्याशिवाय राहिली नाहीं. त्या दोघांशिवाय त्यांच्या शिरोभागीं चिपळूणकरहि असल्यामुळें त्यांच्याहि प्रवृत्तीला पत्रांत स्थान द्यावेंच लागलें. पहिल्या वर्षी केसरींत जे लेख प्रसिद्ध झाले त्यांत सामाजिक विषयांचेंच बाहुल्य दिसतें. (१) अर्थशास्त्रदृष्ट्या बाल-विवाहाचा विचार (२) नाटकें करावीं कीं करूं नये ? (३) बहिष्कार (४) कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे (५) ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष (६) बालविवाहापेक्षां सतीच बरी; ही लेखांची निवड आगरकरांची. (१) परभाषेंतील शब्दांची योजना (२) देशी भाषेंतील ग्रंथसंग्रहाची आव-श्यकता (३) भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन; ही निवड चिपळूणकरांची दिसते. टिळकांकडे मराठ्याची जबाबदारी असल्यामुळें त्यांना केसरींत लिहिण्यास आगरकर व चिपळूणकर यांच्याइतकी सवड होत नसावी.

**प्रिन्सिपॉल आगरकर**

आगरकर केसरीचे संपादक १८८१ सालीं झाले व १८८७ सालीं त्यांनीं केसरी सोडला. केसरीच्या पहिल्या अंकांत जें ध्येय जाहीर करण्यांत आलें होतें, त्याला धरूनच त्यांनीं केसरी निर्भयपणें व निर्भीडपणें चालविला. कोल्हापूर प्रकरणांत त्यांना शिक्षा भोगावी लागली यापेक्षां वरील गुणांचें वेगळें प्रत्यंतर कोणतें पाहिजे ? आगरकर अगदींच जन्मदरिद्री. पण दारिद्र्यानें त्यांच्या अंगचा पीळ न जातां अधिकच वाढला. परिस्थितीपुढें ते मुळींच नमले नाहींत; किंबहुना चिडलेहि. बालपण खेड्यांत गेलेलें व तेंहि खडतर स्थितींत, यामुळें जगाची उलट बाजू त्यांना पूर्णपणें थोड्याच अवधींत कळून चुकली. त्याचा ठसा त्यांच्या लेखनावर उमटल्यावांचून राहिला नाहीं. लहानपणच्या प्रतिकूल अवस्थेंतहि विद्येची अभिरुचि जबर असल्यामुळेंच एम. ए. पर्यंतचा अभ्यास

स्वावलंबनानें व चिकाटीनें ते करूं शकले. आपल्या देशबांधवांचें जिणें अनुकंपनीय झालें आहे, त्यांस ज्ञानामृत पाजून व सुविचार सांगून त्यांच्या उद्धारार्थ आपलें आयुष्य खर्चण्यांतच जीविताचें सार्थक आहे, अशा श्रद्धेनेंच त्यांनीं इतर उद्योगाबरोबर वर्तमानपत्राचा उद्योग अंगिकारला असला तरी वर्तमानपत्राच्या लोकाप्रियतेस आवश्यक तें लेखनकौशल्यहि आगरकरांच्या अंगीं निसर्गसिद्ध होतें हें विसरून चालणार नाहीं. विद्या संपादन करतांना त्यांच्या मनाची व शरीराची फार फरपट निघाली. टेंबू हें सातारा जिल्ह्यांतील कृष्णातीरचें टुमदार पण हूड खेडेगांव. टेंबूहून कोंकणांत रत्नागिरीस ते शिकावयास गेले व रत्नागिरीहून निराशेनें निघून त्यांनीं वऱ्हाडांतील अकोलें पाहिलें. अकोल्याच्या हायस्कुलांत ते इंग्रजी शिकूं लागले तेव्हां ( सन १८७२ ) त्यांचें वय अवघें सोळा वर्षांचें होतें. इतक्या कोंवळ्या वयांत त्यांना जगाचा अनुभव विस्तृत येऊन त्याचें अन्तरंग त्यांत बुडी मारून पहावयास मिळालें. सन १८७५ सालीं अकोलें हायस्कुलांतून त्यांची प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते परत पुण्यास डेक्कन कॉलेजांत शिकण्याकरितां आले. त्यांच्या वयाच्या इतर विद्यार्थ्यांपेक्षां आगरकरांना जग कितीतरी पटींनीं अधिक कळलें होतें. विद्येची उपासना इतक्या काबाडकष्टानें करीत असतां त्यांना कॉलेजांतील खर्च भागविण्याकरितां निबंध लिहावा लागला व त्यांत त्यांनीं बक्षिसहि मिळविलें, इतकेंच नव्हे तर एक नाटकहि त्यांनीं रचण्याकरितां घेतलें होते. यावरून वर्तमानपत्राचें संपादकत्व पत्करलें म्हणून निबंधांनीं त्यांजवर लिहिण्याची जबरदस्ती केली नसून निबंधलेखनाची व ग्रंथकर्तृत्वाची प्रवृत्ति त्यांच्यांत निसर्गसिद्ध असल्याचेंच समजून येते. किंबहुना त्या प्रवृत्तीनेंच त्यांना वर्तमानपत्राच्या कष्टप्रद व्यवसायांत लोटलें असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. विष्णुशास्त्री चिपळूणकराप्रमाणेंच त्यांचे प्रिय विषय संस्कृत, काव्यें, नाटकें व इतिहास हेच होते. त्यामुळेंच त्यांनीं

केसरींतून कालिदास, शेक्सपियर व भवभूति या विषयांवर लेखमाला लिहून आपली रसिकता प्रकट केली. शिवाय शेक्सपियरच्या प्रसिद्ध 'हॅम्लेट' नाटकाचें 'विकारविलसित' या नांवानें मराठींत रूपांतर केल्यामुळें तर खुद्द नाटककारांच्या पंक्तींतच ते जाऊन बसले. 'विकारविलसित' हें नाटकहि असें नव्हे कीं जें लिहिलें व लगेच कोपऱ्यांत पडलें. तें नाटक प्रसिद्ध शाहू नगरवासी नाटक मंडळीनें कित्येक वर्षें रंगभूमीवर दाखवून महाराष्ट्रांत अतिशय लोकप्रिय करून सोडलें. शेक्सपिअरचें हें अत्यंत कठीण पण उत्कृष्ट नाटक निवळ मराठी जाणणाऱ्या महाराष्ट्रीयांना मुळांतल्याइतकें आगरकरांनीं प्रभावशाली दाखविलें इतकें सांगितलें म्हणजे त्यांच्या करामतीसंबंधानें अधिक सांगण्याचें उरतच नाहीं. कोल्हापूर प्रकरणांत केसरीवर झालेल्या खटल्यांत आगरकर १०१ दिवसच डोंगरीच्या तुरुंगांत कैदी होते. पण त्या तुरुंगवासांतील क्लेशप्रद अनुभव नमूद करण्याकरितां 'डोंगरीवरील १०१ दिवस' हें पुस्तक लिहिल्यावांचून त्यांच्या रसिकतेस चैन पडलें नाहीं.

आगरकर केसरींत होते तोंपर्यंत त्यांच्या एकट्याच्या मालकीचें तें पत्र नसल्यामुळें पत्राच्या विशिष्ट धोरणांत त्यांची बुद्धि कोंडल्यासारखी झाली होती. परंतु १८८७ सालीं 'केसरी' सोडून स्वतःचें 'सुधारक' पत्र त्यांनीं सुरू केलें तेव्हां त्यांच्या बुद्धिमत्तेस सैराट धांवावयास मोकळें रान सांपडलें. आगरकरांचा आवेश, जोर, जाज्वल्यपणा, धिटाई, स्वतंत्रपणा, लढाऊबाणा व कडकडाट सुधारकांतून सतत सात वर्षें उसळून अप्रतिहत चालू राहिला. सुधारकाच्या आत्यंतिक भूमिकेवर उभे राहून ते लिहीत तेव्हां त्यांचें डोकें देशबंधूंच्या कळवळ्यानें फिरून जाई व वाचकांचें डोकेंहि फिरवून टाकी. 'सुधारक' पत्र काढण्यांतील आपला उद्देश त्यांनीं पुढील शब्दांनीं सांगितला आहे. 'समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य

आहेत तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास ( पुरुषास व स्त्रीस ) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका द्यावयाचा हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे व हें ज्यांच्या अंतः-करणांत बिंबलें असेल त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंत अनेक दोष-स्थलें दिसणार आहेत हें उघड आहे. हीं दोषस्थलें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुचवावे आणि युरोपीय सुधा-रणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे तें पुनः पुन्हा दाखवावें यास्तव हें 'सुधारक' पत्र काढलें आहे.'

केसरी व त्यानंतर महाराष्ट्रांत कांहीं पत्रें निघालीं त्यांचे संपादक हे पुढारीहि असत. पत्रांत विशिष्ट मतें प्रतिपादावीं, त्यांनीं जनतेस जागृत करावें व त्या मतांसाठीं येतील तीं संकटें सोसावीं हेंच पुढारी या नात्यानें तत्कालीन संपादकांचें कर्तव्य असे. आगरकर पाश्चिमात्य सुधारणेचे निस्सीम चहाते होते. त्यांना त्या सुधारणेंतील प्रत्येक आवश्यक बाब घ्यावयाची होती. युरोपीय समाजावरून हिंदु समाजाकडे दृष्टि वळविली कीं त्यांना हिंदु समाजांत जेथें तेथें दोषच दिसून येत व तो हरएक दोष काढून टाकण्यासाठीं त्यांच्या अन्तःकरणाची तळमळ होत असे. स्वतःच्या दारिद्र्यांत समाजाची अन्त-र्बाह्य स्थिति त्यांनीं अल्पावधींत पाहिल्यामुळें तिचें एकहि अंग शर-संधानानें, आपल्या समजुतीप्रमाणें, त्यांनीं विच्छिन्न केल्याशिवाय सोडलें नाहीं. तें करीत असतां निबंधलेखनपटुत्व त्यांनीं फारच उत्कृष्ट रीतीनें वाचकांच्या अनुभवास आणिलें. न्हाव्यानें करावयाच्या हजामतीपासून तों स्मशानांत जाळावयाच्या प्रेतापर्यंत आगरकरांना समाजाला कांहींना कांहीं नवीन म्हणून सुचविण्यासारखे होतेंच. न्हाव्याचें मळकट फडकें व कोणाहि माणसाची खरडपट्टी केलेला वस्तारा, स्त्रियांचें अंग उघडें टाकणारी चोळी व पुरुषांचें कोकीदार चक्री पागोटें यांवर टीकास्त्र चाल-

वितांना उपहास, विनोद, व्यंजना, आवेश, जोर व चढत्या वाक्यांची फेर आगरकरांच्या लेखनपटुत्वाची खात्री पटवून देण्यास पुरेशी आहे. त्या दृष्टीनें 'सोंवळ्याची मीमांसा', 'होऊंच द्या तर दोन हात', 'वल्लभोपासना', 'आमचे प्रेतसंस्कार' इत्यादि लेख वाचनीय होत.

'सुधारक' झाला तरी 'केसरी'चीच ती जोमदार शाखा व आगरकर झाले तरी चिपळूणकरांच्याच तालमींत कसलेले वीर होत. केसरीनें राजकीय बाबतींत विचारांची जशी सीमा गांठली तशी सुधारकानेंहि सामाजिक विचारांची सीमा गांठली. चिपळूणकर व टिळक यांजप्रमाणें आगरकरांचेंहि सामर्थ्य प्रचंड होतें. एकावन्न वर्षांपूर्वींच्या काळांत त्यांनीं सामाजिक बाबतींत जीं आत्यंतिक मतें प्रतिपादलीं त्यांचा पाठलाग आजच्या अतिशय पुढारलेल्या व्यक्तींनाहि झेंपणार नाहीं हें लक्षांत आल्यावर आगरकरांच्या निर्भयतेचें व स्वतंत्रपणाचें आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं. म्हणून आगरकर ही महाराष्ट्रांत एक लोकोत्तर विभूति होऊन गेली असें कबूल करावें लागतें. हिंदु समाजाचें आगरकरांनीं पुढील शब्दांनीं वर्णन केलें आहे. 'आमची गृहपद्धति, आमची राज्यपद्धति, आमचीं शास्त्रें, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या चाली, आमच्या रीती, सारांश इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें, निबिडशृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें कठिण झालेल्या लांकडासारखें किंवा हडकासारखें शेकडों वर्षें होऊन राहिलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही आमची शिलावस्था आम्हास पाश्चिमात्त्य शिक्षण मिळूं लागल्यापासून बदलूं लागली आहे.' इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानावर झालें ही आगरकरांना हिंदु समाज हवातसा सुधारून घेण्यास अपूर्व पर्वणी आल्याचा आनंद वाटत होता. आगरकरांची मराठी भाषा सोपी, प्रसादयुक्त व कित्येक ठिकाणीं डौलदार असून आपल्या इच्छेस येईल तशी ती वांकविण्याइतकें प्रभुत्व त्यांनीं तिजवर

मिळविलें होतें. हिंदु समाजाच्या पुराणप्रियतेपासून दूर धांवण्यास त्यांना ज्ञॉन स्टुअर्ट मिल्ल, हर्बर्ट स्पेन्सर व कोम्ट या ग्रंथकारांनींच शिकविलें.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व प्रि. गोपाळ गणेश आगरकर हे दोघेहि वयानें सारखेच. त्या उभयतांचा जन्म सन १८५६ सालीं झाला.

**लोकमान्य टिळक**

ही बाळगोपाळांची जोडी विष्णुशास्त्री चिपळूणकरां-पेक्षां सहा वर्षांनीं लहान. आगरकर टेंबू या सातारा जिल्ह्यांतील खेड्यांत जन्मले व टिळक कोंकणांत खुद्द रत्नागिरींत जन्मास आले. त्यांचे वडील गंगाधरपंत जुन्या पद्धतीनें शिकलेले शिक्षक व नंतर शाळाखात्यांत असिस्टंट डेप्यूटी एज्यू-केशनल इन्स्पेक्टर होते. त्यांचे संस्कृत व गणित हे दोनहि विषय तयार असत. खुद्द वडीलच मुलाच्या शिक्षणाची स्वतः काळजी वाहणारे व शिकविण्याजोगे असल्यामुळें बळवंतराव टिळकांच्या पहिल्या अभ्यासाची घडी तर उत्तमच बसली. इतकेंच नव्हे पण सामान्य मुलापेक्षां त्यांनीं प्राथमिक शिक्षण आटोपण्यांत फारच आघाडी मारली. वयाच्या दहाव्या वर्षी सामान्य मुलगा मराठी तिसरी चौथी इयत्ता शिकत असतां मराठी कवितांचे अर्थ लावीत असावयाचा. पण या वयांत टिळक संस्कृत श्लोकांचेहि अर्थ लावीत असत. रूपावली, समासचक्र, निम्मा अमरकोश व ब्रम्हकर्माचा बहुतेक भाग मुंजीपूर्वींच म्हणजे सातव्या आठव्या वर्षींच त्यांनीं संपविला होता. संस्कृत हा विषय विद्यार्थ्यांना एकंदरीनें अवघड जातो. तो टिळ-कांना पूर्वतयारीनें सोपा झाला. संस्कृतशिवाय दुसरा कठिण विषय गणित. त्यांतील अंकगणित, समीकरणापर्यंत बीजगणित, युक्लिडच्या भूमितीचीं दोन पुस्तकें त्यांनीं इंग्रजी शाळेंत शिकावयास जाण्यापूर्वींच संपविलीं होतीं. संस्कृत व गणित या दोन विषयांत वडिलांनीं त्यांचा प्रवेश करून दिला; त्यामुळें व स्वाभाविक गतीमुळें टिळक हायस्कुलांत व कॉलेजांत त्या विषयांत इतके तरबेज झाले कीं ते त्यांचे आमरण व्यासंगाचे विषय बनले

व त्यांच्या आधारें त्यांनीं दोन जगद्विख्यात ग्रंथहि रचले. वर्तमानपत्रासारख्या धंद्यांत संस्कृत व गणित या दोनहि विषयांतील पंडित टिळकाशिवाय दुसरा कोणी आलाच नाहीं. विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून रा. न. चिं. केळकरांपर्यंतचे बहुतेक सगळे संपादक गणितांत कच्चेच होते. संशोधनात्मक ग्रंथ लिहिण्याची ज्याची योग्यता त्याला वर्तमानपत्रांतील लेख म्हणजे हातचा मळ. साहित्यसेवकापेक्षां तत्त्ववेत्ता हा केव्हांहि अतिशय श्रेष्ठ. टिळकांची बुद्धि जगाच्या मुळाशीं असलेलें गूढ तत्त्व शोधून काढण्यांत सतत गुंतली होती याची साक्ष त्यांनीं वृद्धापकाळीं लिहिलेला गीतारहस्य हा ग्रंथच देत आहे.

जगाच्या मुळाशीं असलेलें गूढ तत्त्व शोधून काढावें व जगांतील विषय नाशवंत आहेत हें ओळखून प्राप्तकर्म आचरावें या प्रकारचा निष्काम कर्मयोग बाणवून घेण्याचा प्रयत्न जन्मभर चालवून बुद्धीनें व आचरणानें सुखदुःखातीत होण्याचा मार्ग ते चोखाळत होते. 'अकुतोभयता' हेंच त्याचें फळ होय. अशा उच्च भूमिकेवरून जगाच्या व्यवहाराकडे पहाणारास सर्वसत्ताधीश इंग्रज सरकार व त्यांचे अधिकारी आणि सामान्य लोक एकाच पातळीवरचे व एकाच उंचीचे दिसावे यांत नवल कसलें ? टिळकांची अध्यात्मिक योग्यता मूळचीच श्रेष्ठ होती, म्हणूनच त्यांस आयुष्याच्या परिणतीबरोबर स्थितप्रज्ञता प्राप्त झाली. इतक्या श्रेष्ठ पदावरील टिळकांसारख्या पुरुषाच्या हातीं 'केसरी' पत्र पडलें हें महाराष्ट्राचेंच काय पण साऱ्या भारतवर्षाचें महद्भाग्य समजलें पाहिजे. आगरकरांनीं सात वर्षें 'केसरी' चालविल्यावर टिळकांकडे त्याचें संपादकत्व आल्यापासून सहा-सात वर्षांच्या आंत टिळकांनीं केसरीला वृत्तपत्रांच्या सृष्टींत पहिल्या प्रतीचा मान मिळवून दिला. कोणत्याहि विषयाचें मर्म अचूक हस्तगत करणें हें तैलबुद्धीचें द्योतक होय. टिळकांची बुद्धि तैल, वृत्ति तेजस्वी व स्वभाव निर्भय. या तिन्हींचा प्रभाव केसरींत दिसूं लागून केसरीनें पेशवाई गेल्यापासून

पाऊणशें वर्षेंपर्यंत निद्रिस्त पडलेली महाराष्ट्राची वीरवृत्ति हलवून जागृत केली आणि तैलबुद्धीचा शूर मराठा कसा असतो, याचा चक्क प्रकाश राजकर्त्यांच्या डोक्यांत पाडला. इंग्रज राज्यकर्त्यांपुढें नम्रतेनें वागण्याचा जुन्या वर्तमानपत्रांचा सांप्रदाय टिळकांनीं मोडून सडेतोड व रोखठोक लिहिण्यानें अधिकारी वर्गाची धुंदीच उतरली. अधिकारी जिल्ह्याचा कलेक्टर असो, इलाख्याचा गव्हर्नर असो कीं देशाचा व्हाइसरॉय असो, त्या सर्वांची संभावना टिळकांकडून सारखीच व्हावी. जसा कांहीं बरोबरीचा किंबहुना कांकणभर भारी सामर्थ्याचा वीर प्रतिपक्षाशीं झुंजण्यास शस्त्रास्त्रांनिशीं उभा रहावा असे टिळक अधिकाऱ्यांशीं लढण्यास उभे राहत व आपल्या वाग्बाणांनीं त्यांच्यांत अपमान, पाणउतारा, त्वेष, चीड इत्यादि भावनांचा कल्लोळ उडवीत. राज्यकर्त्यांविषयीं लिहितांना त्यांच्या लेखणीला मऊपणा व नम्रता माहीतच असूं नये. उद्दामपणा, शिरजोरपणा, वेडेपणा, घातुकपणा या भाववाचक नामांची आणि अन्याय, जुलूम, जबरदस्ती या सामान्य नामांची केसरींतून अशी फैर झडावी कीं, त्या योगानें शत्रुसैन्यांवर तोफेचे गोळे पडल्याप्रमाणें अधिकारी वर्गाची दाणादाण व्हावी.

अधिकारी वर्गाची जर ही स्थिति तर समाजांतील अवांतर प्रतिपक्षीय लोकांची कथा काय? केसरींतील कडक व कठोर लिहिण्यानें त्याचा सर्वत्र दरारा बसला, आणि जनतेंत नवा आवेश, नवी आशा व नवें कर्तृत्व उत्पन्न होऊन महाराष्ट्रांत जिकडे तिकडे नवें चैतन्य दिसूं लागलें. सरकार व लोक वर्तमानपत्रांकडे आतां निराळ्या दृष्टीनें पहावयास शिकले. सरकारावर त्यांचा वचक बसला व जनतेस तीं गुरुस्थानींच झालीं. वर्तमानपत्रकार म्हणजे पुढारी हें समीकरण टिळकांनींच स्वतःवर अनेक राजकीय संकटें व कारागृहवासादि क्लेश ओढवून घेऊन घालून दिलें.

महाराष्ट्रांतील विचारवंत, विद्वान् व होतकरू तरुणांना वर्तमानपत्राच्या

व्यवसायास श्रेष्ठपदावर चढविण्याची दिशा प्रथम केसरीनें दाखविली.

**कादंबरीकार आपटे**

त्याच केसरीला 'सुधारक' हें अपत्य होऊन त्यानें सामाजिक क्षेत्रांत उलथापालथ चालविली. आगरकर हे चिपळूणकरांचे, सुधारकी विचारांत नसले तरी, संपादकीय व्यवसायांत अनुयायी होते. आगरकरांनींहि स्वतःच्या विचारांचे नवे अनुयायी मिळविले; त्यांत हरि नारायण आपटे यांची गणना करावी लागेल. आगरकरांचा तापटपणा व एककल्लीपणा आपट्यांत नव्हता. चिपळूणकर व आगरकर यांनीं काढलेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें व त्यांच्याच हाताखालीं हरिभाऊंचें इंग्रजी शिक्षण झालें. मराठी ही ग्रंथ लिहिण्याच्या योग्यतेची भाषा आहे असें ज्या आंग्लविद्याविभूषित विद्वानांना चिपळूणकरांच्या निबंधमालेनें पटवून दिलें त्यांपैकींच हरिभाऊ हे होत. बालवयांत भावनेचा फार जोर असतो. त्या वयांत ज्या व्यक्तीवर तिच्या गुणामुळें एखाद्याची भक्ति जडते ती बहुधा आमरण टिकते. पुढील वयांत त्या व्यक्तीहून कितीहि थोर व्यक्ती नजरेसमोरून गेल्या तरी बालवयांतील व्यक्तीपुढें त्या फिक्क्याच वाटतात. हरिभाऊंचें हृदय हें कादंबरीकाराचें हृदय. तें सामान्य लोकांच्या हृदयांहून सहजच अधिक भाविक असल्यामुळें त्यांजवर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या अलौकिक लेखनशैलीची इतकी छाप बसली कीं, त्यांनाहि चिपळूणकरांप्रमाणें उत्तम लेखक निपजण्याची उमेद आली. लेखनपटुत्वांत ते चिपळूणकरांचे अनुयायी व सुधारकी विचारांत आगरकरांचे अनुयायी. थोर लेखकाचे गुण वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच त्याच्या ठिकाणीं दिसूं लागले. त्यांनीं त्याच वयांत गोष्टी व कविता लिहिण्यास सुरुवात केली. ज्यांचा साहित्याकडे ओढा त्यांची गणित विषयाकडे पाठ फिरावी हा नैसर्गिक धर्मच दिसतो. चिपळूणकरांना जसा गणित विषय अप्रिय तसा आपट्यांनाहि अप्रिय. मॅट्रिक झाल्यावर डेक्कन कॉलेजांत ते पुढील विद्याभ्यासाकरितां

राहिले. तरी गणितानें सतत हट्टानें अडविल्यामुळें त्यांना बी. ए.चा नाद अर्ध्या वाटेंतच सोडावा लागला. पण गणिताची ही उणीव त्यांनीं संस्कृत व इंग्रजी भाषांतील काव्य, नाटकें व इतर ग्रंथ वाचून इतकी भरून काढली कीं, त्यायोगें शेकडों पदवीधरांना मागें टाकण्याइतकी त्यांची विद्वत्ता वाढली. परंतु हरिभाऊ हे विद्वान् लेखकांपेक्षां कलावान लेखक होत. त्यांनीं कोरड्या विद्वत्तेपेक्षां जन्मभर कलेचीच उपासना केली. सत्यसृष्टि पाहून त्यांना कल्पनासृष्टि सुचावी व तिच्यांत त्यांनीं मनोरम व नमुनेदार चित्रें काढावीं. आगरकरांनीं 'सुधारक' पत्र काढून जें कार्य आरंभिलें त्यानें हिंदु समाजांतील हजारों लोकांच्या हृदयाला घरें पाडले. आपट्यांना लोकांच्या हृदयाला डागण्या देण्याची पद्धति पसंत नव्हती. त्याऐवजीं त्यांनीं कादंबऱ्यांचा नवा रमणीय मार्ग बांधून काढला. रेनॉल्ड व सर वॉल्टर स्कॉट यांच्या कादंबऱ्या वाचून मराठी कादंबऱ्या लिहिण्याची त्यांना स्फूर्ति झाली व त्याप्रमाणें वयाच्या २६ व्या वर्षी (सन १८९०) त्यांनीं 'करमणूक' नांवाचें साप्ताहिक पत्र सुरू केलें. कादंबऱ्या व गोष्टी यांस वाहिलेलें मराठींतील पहिलें साप्ताहिक 'करमणूक' पत्रच होय. 'केसरी'मागून मराठी वृत्तपत्रविकासाची 'सुधारक' ही दुसरी व 'करमणूक' ही तिसरी पायरी अवघ्या दहा वर्षांत गांठण्यांत आली. हरिभाऊ आपटे यांनीं 'करमणूक' पत्राचें धोरणहि असें आंखलें कीं तें पत्र 'पुढच्या माडीपासून चुलीपर्यंत व दिवाणखान्यांतील टेबलापासून फणीकरंड्याच्या पेटीपर्यंत कोणाच्या हातीं पडेल त्यानें वाचावें.' 'केसरी' पत्र हायकोर्टजज्जापासून शेतकऱ्यापर्यंत पुरुष वर्गानें वाचण्याकरितां निघालें होतें. त्यानें वाढत चाललेल्या साक्षर स्त्रीवर्गाची सोय झाली नव्हती. तें क्षेत्र 'करमणुकी'नें आपल्या दीर्घ व लघु कथांनीं व्यापून टाकण्याचें योजिलें. 'करमणुकीं'त पुढील विषयांचें आश्वासन आपटे यांनीं दिलें होतें. ( १ ) आळीपाळीनें दोन मोठाल्या गोष्टी ( २ ) दोन-

चारच अंकांत संपणाऱ्या लहान चटकदार गोष्टी ( ३ ) शास्त्रीय ज्ञान ( ४ ) नाटकें ( ५ ) वर्तमानसार ( ६ ) चटकदार चुटके व नकला ( ७ ) थोर पुरुषांचीं चरित्रें ( ८ ) रम्य स्थळांसंबंधीं प्रवासवर्णनें ( ९ ) खेळांची माहिती ( १० ) कविता ( ११ ) चुलीपासल्या गोष्टी. हीं सर्वच सदरें चित्तवेधक आहेत. त्यांची नुसती यादी वाचून देखील कोणाच्याहि तोंडाला पाणी सुटावें. तें एक कलाकौशल्याचें किंवा शौकीन मालाचें प्रदर्शनच होय. ज्ञान व मनोरंजन या दोन्हींचा सुंदर मेळ यांत घातला गेला आहे. म्हणूनच मुलगे, मुली व तरुण ही 'करमणूक' वाचण्याकरितां हापापलेलीं असत. त्यामुळेंच आपट्यांना अभिप्रेत अशा सामाजिक सुधारणेच्या विचारांचा प्रसार स्वयंपाकघरांतील स्त्रियांत व मुलींतसुद्धां झाला 'भयंकर दिव्य' व 'पण लक्षांत कोण घेतो' या त्यांच्या नांवाजलेल्या कादंबऱ्या होत. 'पण लक्षांत कोण घेतो' या कादंबरींत यांनीं विधवा-केशवपनाचें भयंकर चित्र रेखाटलें आहे. 'उषःकाल' या ऐतिहासिक कादंबरींत शिवाजीमहाराजांनीं स्थापन केलेल्या स्वराज्याचा प्रारंभ आल्हाददायक वर्णिला आहे. ही कादंबरी वाचून महाराष्ट्रीय तरुणांना भावी स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नाचीं गोड स्वप्नें पडूं लागलीं.

हरिभाऊ आपटे यांचें 'करमणूक' पत्र २७ वर्षें चालून १९१७ सालीं म्हणजे त्यांच्या मरणापूर्वी दोन वर्षें बंद पडलें. 'करमणूक' पत्र चालवीत असतांच 'ज्ञानप्रकाश' पत्राचा इंग्रजी संपादकीय मजकूर १८८८ पासून १८९४ पर्यंत आपटे लिहीत असत. 'सुधारक' पत्राचेंहि संपादकत्व त्यांनीं शेवटच्या काळांत आपल्याकडे घेतलें होतें, पण तें त्यांस लोकप्रिय करतां आलें नाहीं. याचें कारण असें कीं कथा-लघुकथा यांच्या बाहेरचे राजकीय व सामाजिक विषयांवरील लेख लिहिण्यास जे पौरुष गुण लागतात त्यांचा अभाव आपट्यांच्या लेखणींत होता. कादंबऱ्यांप्रमाणेंच नाटकांत आपणांस यश मिळेल या अपेक्षेनें त्यांनीं 'संत सखू-

बाई ' व ' सती पिंगला ' हीं नाटकें रचलीं, पण तीं फारशीं लोकप्रिय झालीं नाहींत. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या मृत्यूवर 'शिष्यजन-विलाप ' हें काव्य व ' दि साम ऑफ लाइफ 'चें ' जीवितसार ' हें मराठी भाषांतर त्यांनीं केलें. पण गद्यांत रंगलेल्या त्यांच्या मनाला काव्यरचना तितकीशी आनंददायक न वाटल्यामुळें तो प्रयत्न थोडक्या-वरच राहिला. हरि नारायण आपटे यांचें निधन ता. ३ मार्च १९१९ रोजीं झालें. त्या वेळीं त्यांचें वय ५५ वर्षांचें होतें. त्यांचे गुरु चिप-ळूणकर व आगरकर यांजपेक्षां त्यांना अधिक आयुष्य लाभलें इतकेंच फार तर म्हणावें. त्यांची लेखनशैली सुबोध, चटकदार, रसाळ व कादं-बरीकारास अनुरूप होती. इंग्रजी धर्तीवर नवीन शब्द बनविण्याचा व नामांना क्रियापदाचें रूप देण्याचा प्रयत्न त्यांनीं केला व तो बराचसा साधलाहि. अर्थपूर्ण, उत्तरणें हीं रूपें त्यांचींच होत.

साहित्यांत ज्यांची गति त्याला गणिताविषयीं अप्रीति, हा सृष्टिनियमच असेल तर त्याला प्रमाणें मात्र हवीं तितकीं सांपडतील.

**न. चिं. केळकर** विष्णु कृष्ण चिपळूणकर व हरि नारायण आपटे यांचीं दोन उदाहरणें यापूर्वीं दिलींच आहेत. तिसरें उदाहरण रा. नरसिंह चिंतामण केळकर यांचें. केळकरांनाहि गणित विषय वावडाच होता. ते १८८९ सालाचे सुमारास प्रीव्हियसच्या वर्गांत होते. त्या परीक्षेंत व फर्स्ट बी. ए.च्या परीक्षेंत गणित विषय असून त्यांतील कच्चेपणा त्यांना फार भोंवला. या दोनहि परीक्षांत गणित विषयांतून जेमतेम उतरण्यापुरते मार्क मिळून ते सुटले. साहित्याचें निसर्गसौंदर्यप्रीति हें अधिष्ठानच आहे. कारण साहित्यांतील काव्य, नाटक, कादंबरी या सर्वांची उठावणी निसर्गसौंदर्यावरच अवलंबून आहे. ज्यांचा जन्म खेड्यांत झाला व ज्यांचीं आयुष्यांतील कांहीं वर्षें खेड्यात गेलीं त्यांची नजर सतत नद्या, डोंगर, शेतातील पिकें, कुरणां-

तील हिरवळ व अरण्यामधील रमणीयता यावर खेळत असल्यामुळें त्यांचें प्रेम निसर्गावर सहाजिकच जडतें. केळकर हे कोंकणांत वानिवडें गांवीं लहानपणीं स्वतःच्या जामिनींत आजोबाबरोबर लडिवाळपणानें नांगरावर बसले आहेत व त्यांनीं आपल्या हातांनीं वायंगणाचें शिंपणेंहि केलेलें आहे.

मिरजेस शाळेंत शिकत असतां गणितांत कमी पडणाऱ्या गुणांची भरती वाङ्मय विभाग, इतिहास, निबंधलेखन व भाषांतर यांनीं करून ते वर्गांतील मुलांत वरची जागा पटकावीत. तेथील हायस्कुलांत त्यांना संस्कृताचे शिक्षक वासुदेव वामनशास्त्री खरे हे होते. त्यांच्यापाशीं वाङ्मयप्रेम व रसिकता यांचे धडे त्यांनीं घेतले. १८९२ सालीं बी. ए. झाल्यावर चार वर्षें त्यांनीं साताऱ्यांत घालविलीं. सातारा शहराचें हवा-पाणी, सृष्टिसौंदर्य, युनियन क्लबांतील आनंदी व उल्हासी मंडळी यांचा त्यांच्या तरुणपणांतील तरतरीत बुद्धीवर अनुकूल परिणाम होऊन त्यांनीं स्वतः लिहिलेले निबंध सभांतून वाचले, 'करमणूक' पत्रांत कविता प्रसिद्ध केल्या, पारसनिसांच्या 'महाराष्ट्रकोकिळ' मासिकांत लेख लिहिले व नाट्य-लेखनासहि सुरुवात केली. लेखनव्यवसायाकडे इतका ओढा असलेल्या तरुणास प्रसिद्ध लोकनायकाच्या हाताखालीं वर्तमानपत्राच्या संपादकीय व्यवसायांत शिरण्याची संधि मिळाली तर तो ती कशी दवडील? १८९६ सालीं केळकर पुण्यास आले आणि प्रथम 'मराठा' व नंतर 'केसरी' पत्राचे संपादक झाले. 'मराठ्यां'त इंग्रजी लिहिण्याची कामगिरीच पत्करली म्हणून इंग्रजींत व 'केसरीं'त मराठी लिहिण्याची जातीची हौस म्हणून मराठींत त्यांनीं प्राविण्य मिळाविलें.

'मराठ्या'चें संपादकत्व व राजकारणी व्यवसाय यासाठीं इंग्रजींत जेवढें त्यांना लिहावें लागलें तेवढेंच त्यांनीं लिहिलें. त्याखेरीज उरलेलें बुद्धिबळ व शक्तिसर्वस्व त्यांनीं मराठी भाषेच्या सेवेंतच वेंचलें. कांहीं तरी

मजकूर रचून तो वाचकाच्या हवालीं करावयाचा अशा अरसिकपणानें ते पत्र चालवीत नसत. विषय कोणताहि असला तरी त्याचा निबंधरूपीं दागिना घडविणारे ते कलाभिज्ञ कारागीर आहेत. संपादक म्हटला कीं त्याला अभिप्राय, पुस्तकपरीक्षण, मुलाखती, स्फुट सूचना, अग्रलेख, स्वतंत्र लेख हे लिहिण्याचे प्रसंग येतातच. टिळक, आगरकर, चिपळूणकर या संपादकांना विशिष्ट मतांचा व तत्त्वांचा समाजांत प्रचार करून कांहीं विधायक अगर विनाशक कार्य घडवून आणण्यास अन्तःकरणाची व बुद्धीची टोंचणी होती. केळकर स्वतंत्रपणें स्वतःच्या मालकीच्या पत्राचे संपादक प्रारंभापासून नसल्यामुळें त्यांजवर या प्रकारची जबाबदारी पडली नाहीं व त्यास अनुकूल अशी निसर्गप्रवृत्तिहि त्यांना लाभली नाहीं. ज्ञान व विचार यांचा प्रसार हेंच त्यांच्या जीविताचें कार्य आहे. त्यांची बुद्धीहि बहिर्मुखापेक्षां अन्तर्मुखच अधिक आहे. लेखक या नात्यानें देश-सेवा करावी व कीर्ति मिळवावी या हेतूनेंच ते स्वार्थत्यागपूर्वक वर्त-मानपत्राच्या व्यवसायास मिळाले. शीघ्र साहित्यिकास बुद्धीची चपलता, वाचनाचा हव्यास, मर्यादित वेळांत विषयाची तयारी करण्याची तत्परता, लिहिण्याची खुमखुमी, सुंदर व नवीन कल्पना व विचार, तसेंच सुलभ प्रसूति व जलद कलम हे गुण अवश्य लागतात. केळकरांच्या बुद्धींत यांचा निसर्गतःच मोड उगवला असून लेखन ही एकलीच कामगिरी व जबाबदारी त्यांजवर पडतांच त्या मोडाची वाढ सर्वांगांनीं होऊन त्यानें सुंदर व झुबकेदार आम्रवृक्षाप्रमाणें वर्तमानपत्राचें सारें क्षेत्र क्रमाक्रमानें व्यापून टाकून आदर्श वर्तमानपत्रकाराचें पहिलें उदाहरण महाराष्ट्रापुढें ठेवलें. केळकरांचे लेख चुरचुरीत, खुसखुशीत, विनोदी, रसभरित, ठाक-ठिकीत, बहुश्रुत, प्रसन्न, भारदस्त पण गुळगुळीत, दुसऱ्यास न दुखवितां त्याचा दोष दाखविणारे व त्यास न चढवितां त्याचे गुण घेणारे अस-तात. त्यांच्या लेखांत अतिरेक हा नसावयाचा. जसा कांहीं बर्गीत

असून पुण्याहून महाबळेश्वराकडे केलेला प्रवास. यामुळें त्यांच्या लेखांचें वाचन आल्हादजनक होतें. ग्रंथपरीक्षण असो, प्रवासवर्णन असो, थोरांची मुलाखत असो, लघुकथा असो, अन्योक्ति असो, रूपक असो किंवा विविध-विचारतरंग, स्फुट सूचना व अग्रलेख यांपैकींहि कांहीं असो, त्यांत हे गुण आढळावयाचेच.

इतिहास, नाटक, कविता यांतील कर्तृत्वाचे अंकुर त्यांच्या अंगीं विद्यार्थिदशेंत अगर ती संपण्याच्या सुमारासच फुटले होते. 'शेरिडन'च्या 'रायव्हल्स'चें रूपांतरित नाटक 'नवरदेवाची जोडगोळी' या नांवानें त्यांनीं सन १८९४ सालीं म्हणजे वयाच्या बावीसाव्या वर्षींच लिहिलें होतें. या निसर्गप्रवृत्तीच्या विकासास वर्तमानपत्राचें क्षेत्र फारच मानवलें. कुशल माळी दरसाल हंगामशीर पेरणी करून पावसावरचें पीक निरलसपणें काढतोच, पण त्याशिवाय बाकीच्या वेळांत आपल्या उद्योगशीलतेनें आंबा, नारिंग, संत्रा, अंजीर यांचीं रोपें लावून जोपासना करीत त्यांना लागाला आणतो. तोच न्याय केळकरांच्या प्रयत्नास लावल्यास ते वर्तमानपत्रांतील मजकुराची नित्याची लावणी उघडपणें करतां करतां आडोशाला बसून 'तोतयाकडून बंड' करवीत, 'मराठे व इंग्रज' यांना लढवीत, 'आयर्लंडाचा इतिहास' लिहीत, 'लोकमान्य टिळकांचें चरित्र' गात किंवा 'नवलपूरच्या संस्थानिकास' प्रजेचा सेवक बनवून त्याजकडून तिचें पालन करवीत. इतिहास, नाटक, चारित्र व कादंबरी या चारहि क्षेत्रांत त्यांनीं आपली लेखणी नाचविली. वर्तमानपत्रावरून ग्रंथाकडे व ग्रंथावरून वर्तमानपत्राकडे लेखणी सारखी वळत गेल्यामुळें तिचें सामर्थ्य त्यांना पूर्णपणें वाढवितां आलें. त्यांनीं कविताहि रचल्या आहेत. पण कवितेचें अधिष्ठान जी भावना तिचा त्यांच्या ठिकाणीं बहुतेक अभाव असल्यानें विनोद व अवलोकन या योगानेंच त्या वाचनीय झाल्या आहेत.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या परंपरेंत रा. शिवराम महादेव

परांजपे हे प्रख्यात संपादक व निबंधकार होऊन गेले. कुलाबा जिल्ह्यांतील महाड ही त्यांची जन्मभूमि. तेथें त्यांचा जन्म सन १८६४ सालीं झाला. महाडाची गणना मोठ्याशा खेड्यांत केली तरी चालेल.

**शिवरामपंत परांजपे**

महाडापासून रायगड अगदीं जवळ. महाडांतून हिंडतांना त्याचें स्फूर्ति-दायक दर्शन नित्य घडतें. शिवरामपंतांचे वडील वकील असल्यामुळें त्यांना लहानपणीं गृहस्वास्थ्य चांगलें लाभून शरीर, बुद्धि व मन यांचें पोषण व्हावें तसें झालें. महाडच्या शाळेंत मराठी शिक्षणांतून इतिहासाची ओळख होतांच शिवाजी महाराजांच्या राजधानीचा रायगड किल्ला शिवरामपंतांना स्वराज्याच्या काळांत घेऊन जाऊं लागला व स्वातंत्र्याच्या झऱ्यावर पाणी प्यावयास नेऊं लागला. महाडाहून रत्नागिरीस इंग्रजी शिक्षणा-साठीं ते गेले. तेथील हायस्कुलांत स्वातंत्र्याचे पाठ निबंधमालेंतून तरुण महाराष्ट्रास देणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर त्यांस गुरु भेटले. विष्णुशास्त्री सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन पुण्यास आले व तेथें त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. त्या शाळेंत शिकण्याच्या लालसेनें जे विद्यार्थी रत्नागिरीहून पुण्याकडे वळले त्यांत शिवरामपंतहि होते.

शिवरामपंतांनीं रत्नागिरीहून पुण्यापर्यंतचा प्रवास केला; त्यांत स्वातंत्र्यमणि सह्याद्रि, त्याच्या दऱ्या, खोरीं व किल्ले त्यांना निरखून पहा-वयास मिळाले. सह्याद्रि ओलांडून ते पुण्यांत आले तें पुणें स्वराज्याचें माहेरच. त्या पुण्यांतील शास्त्रीबुवांचें न्यू इंग्लिश स्कूल ही उच्च भावनांची देदीप्यमान ज्योत. न्यू इंग्लिश स्कूलमधून शिवरामपंतांनीं मॅट्रिकची परीक्षा १८८४मध्यें उतरून जगन्नाथ शंकरशेटची शिष्यवृत्ति जिंकली. सन १८९० सालीं म्हणजे वयाच्या २६व्या वर्षीं ते डेक्कन कॉलेजांतून बी. ए. झाले. बी. ए. होऊन डेक्कन कॉलेजांत दोन वर्षें फेलो राहिल्यावर त्यांनीं पुढें तीन वर्षांनीं १८९५ सालीं एम्. ए.ची परीक्षा दिली. संस्कृत, इतिहास

व तर्कशास्त्र हे त्यांचे आवडीचे विषय. एम्. ए. नंतर दोन वर्षें अल्पजीवी महाराष्ट्र कॉलेजांत त्यांनीं संस्कृत-प्राध्यापकाचें काम केलें व १८९८ मध्यें काळ नांवाचें साप्ताहिक पत्र काढलें. १८९८ पासून १९०८ पर्यंत काळ पत्राचा ऐन भर होता. महाडांत, रत्नागिरींत व सह्यांद्रींत नाचतां बागडतांना जीं रत्नें त्यांनीं आपल्या हृदयसंपुटांत सांठविलीं तीं काळ पत्राद्वारें बाहेर काढून त्या वाग्रत्नांचा हार महाराष्ट्रभूमीच्या कंठीं त्यांनीं वाहिला. शिवरामपंत हे जातिवंत निबंधकार होते. त्यांचे निबंध प्रसिद्ध इंग्रज लेखक जोनाथन स्विफ्ट याच्या धर्तीवर असत. उपरोध व व्याजोक्ति हे त्यांचे मुख्य गुण. त्याशिवाय सृष्टिवर्णनावरहि ते आपली लेखणी लीलेनें चालवीत. प्रचलित राजकारणासंबंधीं थोडें लिहून राजनीति, इतिहास, समाजरीति यांपैकीं विषय निबंधाकरितां त्यांनीं निवडून घ्यावे व ते खुलवून समाजांत स्वाभिमान, स्वधर्माभिमान, स्वराज्याभिमान व स्वातंत्र्याभिमान वाढवावा. व्याजोक्ति व उपरोध या दोन गुणांत त्यांच्या योग्यतेचा निबंधकार विष्णुशास्त्री चिपळूणकरांनंतर महाराष्ट्रांत कोणी झाला नाहीं. पाश्चिमात्य इतिहास व काव्य यांतील तत्त्वें व कल्पना इतक्या सफाईनें व रसिकतेनें मराठी भाषेंत त्यांनीं आणिल्या आहेत कीं, महाराष्ट्रांतील तरुण वर्ग त्यांजवर फिदा होऊन त्यांस गुरुस्थानीं मानूं लागला. त्यांच्यानंतरच्या बऱ्याच होतकरू लेखकांनीं त्यांचीच लेखनशैली उचलली. वक्तृत्वकलाहि लेखनकलेइतकीच त्यांना अवगत असल्यामुळें त्यांना आपली छाप समाजावर दुहेरी पाडतां आली.

वर्तमानपत्राच्या व्यवसायांतून उरलेला वेळ त्याहूनहि वरिष्ठ प्रतीच्या साहित्यसेवेंत खर्च करण्याची त्यांना विलक्षण हौस होती. 'मानाजीराव', 'भीमराव', 'रामदेवराव' इत्यादि गद्य नाटकें आणि 'गोविंदाची गोष्ट' ही कादंबरीवजा कथा व 'विंध्याचल' ही कादंबरी त्यांनीं लिहिली असून, भावनाप्राधान्य हा त्यांचा विशेष समजण्यांत येतो.

त्यांचीं नाटकें रंगभूमीवर थोडीं आलीं व 'मानाजीराव' हें एकच नाटक कांहीं काळ लोकापुढें टिकलें. सन १९१० सालीं काळ पत्र बंद पडलें. त्यानंतर दहा वर्षांनीं त्यांनीं 'स्वराज्य' पत्र काढलें; पण तें काळासारखें लोकप्रिय झालें नाहीं. मरणसमयीं त्यांचें वय ६५ वर्षांचें होतें.

लेखकाच्या बुद्धीचा कल कित्येकदां लहान वयांतच ओळखूं येतो. विष्णु कृष्ण चिपळूणकर, नरसिंह चिंतामण केळकर, हरि नारायण आपटे यांच्या बाबतींत हा नियम जसा लागू

**कृष्णाजीपंत खाडिलकर**

पडला तसा रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या बाबतींतहि त्याचा ठोकताळा आला. खाडिलकरांचा जन्म १८७२ त कृष्णातीरीं सांगलीस झाला. तेजस्विता हा कृष्णेच्या पाण्याचा धर्म आहे. त्या पाण्यावर खाडिलकरांचा पिंड पोसला गेला. वयाच्या पंधराव्या वर्षीं इंग्रजी पांचव्या इयत्तेंत शिकत असतां त्यांनीं कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण कादंबरीची सजावट साधेनाशी वाटल्यावरूनच कीं काय पुढच्याच वर्षीं नाटकाकडे त्यांची लेखणी वळली व त्याच रंगणांत ती जन्मभर नाचावी असा ईश्वरी संकेत होता. 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' हा ग्रंथ रा. महादेव शिवराम गोळे, प्रिन्सिपाल फर्ग्यूसन कॉलेज पुणें, यांनीं लिहिला. तो ग्रंथ महाराष्ट्रांत चांगलाच गाजून त्यावर अनुकूल प्रतिकूल टीकाहि वर्तमानपत्रांतून व इतरत्र आली. खाडिलकरांवरहि त्या ग्रंथाचा परिणाम तरुणपणीं इतका झाला कीं त्यांनीं त्यासंबंधीं एक चर्चात्मक निबंध 'विविधज्ञानविस्तार' या भारदस्त व प्रसिद्ध मासिकांत प्रकटविला. लोकमान्य टिळक यांच्या नजरेस तो येऊन खाडिलकरांची लेखनशैली टिळकांना पसंत पडली व त्यांनीं खाडिलकरांना केसरीस मिळण्यास लिहिलें. तरुण वयांत ज्याचा त्यालाहि स्वतःच्या गुणांचा व पात्रतेचा पुरा ठाव लागलेला नसतो. सरकारी किंवा संस्थानी

नोकरींत स्वतःस कोंडून न घेतां स्वतंत्र रीतीनें व मान्यतेनें आयुष्य घालवावयास सांपडले तर तें कोणा बाणेदार तरुणास नकोसें वाटेल ? त्यांतून टिळकासारख्या लोकमान्य धुरीणानें आपल्या मदतीस म्हणून बोलाविल्यावर खाडिलकर स्वतःला धन्यच समजले असतील. त्यांनीं अशा रीतीनें टिळकांचें अनुयायित्व पत्करलें यावरून टिळकांचीं धार्मिक, सामाजिक व राजकीय मतें त्यांना मान्य होतीं हें सामान्यतः सिद्धच झालें. जातिवंत लेखकास लेखन हाच चरितार्थाचा व्यवसाय लाभल्याचा आनंद काय थोडा असतो ? खाडिलकर त्याच आनंदानें केसरी संस्थेंत आले, वर्तमापत्राच्या संपादकत्वाचे दूरवरचे बरे वाईट परिणाम पाहून आले नसतील. ते केसरी संस्थेंत यऊन वर्तमानपत्रकार झाले असले तरी त्यांची बुद्धि खऱ्या अर्थानें त्यांत रमली नाहीं. ती रमण्याचें स्थळ नाटक हेंच होतें. ज्याचा अंकुर विद्यार्थिदशेंत त्यांच्या बुद्धींत उमटला त्याचीच वाढ पुढें एकसारखी होत राहून तिनें त्यांचा सारा जीवनक्रम व्यापून टाकला. वर्तमानपत्राच्या धंद्यांत ते शिरले म्हणूनच नाइलाजानेंहि वृद्धापकाळा-पर्यंत वर्तमानपत्रकार राहिले. नाहींतर कदाचित् केवळ नाटककार हा एकच त्यांचा पेशा सिद्ध झाला असता.

नाटककाराला विविध भाव व रस प्रकट करतांना भाषानैपुण्य पराकोटीला न्यावें लागतें. खाडिलकरांनीं तितकी मेहनत केली असल्या-मुळें ती लेखणी त्यांनीं जेव्हां जेव्हां रंगून जाऊन वर्तमानपत्रावर चाल-विली तेव्हां तेव्हां वाचकांकडून वहावाच मिळविली. परराष्ट्रीय राजकारण व युद्ध हे त्यांचे प्रिय विषय. त्या विषयांवर केसरींत व इतरत्र त्यांनीं लिहिलेले लेख उच्च प्रतीचे आहेत. भावनाप्रधान लेखकाला हिंदुस्थाना-सारख्या परतंत्र देशांत हृदयाविष्करणाला हें एकच स्थळ शिल्लक राहिलें आहे. खाडिलकरांनीं त्या दोनच विषयांचा अभ्यास केल्यामुळें त्यांचा वृत्तपत्रीय विषयांच्या वाचनाचा व्याप अगदीं कोता राहिला.

तेवढ्या मर्यादित क्षेत्रांतच त्यांनीं आपल्या बुद्धीचा खोलपणा, वृत्तीची तेजस्विता व पीळ यांचा प्रभाव पाडला. केसरींत ते सतत असे कधींच राहिले नाहींत. टिळकांवर त्यांची भक्ति होती म्हणूनच ते केसरी संस्थेंत होते. तेवढ्या काळांत त्यांचा दिल खरा खुलला. परराष्ट्रीय राजकारणाचें केसरींतील महत्त्व त्यांच्याच व्यासंगामुळें फार वाढलें. दृढनिश्चय हा खाडिलकरांतील जिवंतपणा समजावा. त्या निश्चयाच्या बळावर १९२१ सालीं त्यांनीं मुंबईस दैनिक लोकमान्य पत्र सुरू केलें. पण परतंत्रानें वागण्याची खंती वाटणाऱ्या त्यांच्या स्वभावानें सदर पत्राचा त्याग अवघ्या दोनच वर्षांत करून १९२३ सालीं स्वतःच्या मालकीचें दैनिक नवाकाळ पत्र काढलें तेव्हांच त्यांच्या मनाला खरी शांति मिळाली. त्या पत्राचे संपादक असतां १९२९ सालीं त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली, त्यामुळें संपादक या नात्याचा त्यांचा संबंध तुटला तो कायमचा तुटला. तुरुंगांतून मुक्त होतांना त्यांची मूळची पारमार्थिक वृत्ति अधिकच बळावल्यानें ते सार्वजनिक व्यापांतून कायमचेच मुक्त झाले.

वर्तमानपत्राचा धंदा हेंहि एक व्यसनच आहे. त्या धंद्यांत जो एकदां सांपडला त्याला दुसरा कोणताहि धंदा पसंत पडावयाचा नाहीं. कितीहि संकटें व अडचणी आल्या तरी तो त्याच धंद्यांत आनंद मानावयाचा. संदेश पत्राचे संपादक रा. अच्युतराव

**अच्युतराव कोल्हटकर**

कोल्हटकर यांचें असेंच झालें. त्यांचे वडील बळवंतराव हे सातान्यास 'बोधसुधाकर' पत्राचे संपादक असल्यामुळें वर्तमानपत्राचा धंदा त्यांना घरचाच होता. लहानपणापासून वर्तमानपत्राचा समोर दिसणारा व्याप पाहून याच धंद्यांत मोठेपणीं शिरण्याचा त्यांच्या मनानें नकळत संकल्प केला. घरीं टिळकांचें प्रसिद्ध केसरी पत्र येत होतेंच. तें सहजच वाचलें जाऊं लागून राजकीय विषय त्यांच्या

मनांत भिनत चालला. पारतंत्र्याचा तिटकारा व स्वराज्याविषयीं प्रेम बळावून डोक्यांत तेच विचार सारखे सुरू राहिले. त्यांचा जन्म सन १८७९ सालीं वांईत झाला असला तरी पुढचें शिक्षण साताऱ्यासच करण्यास ते आले. सातारा ही मराठ्यांची राजधानी. त्यानें शाहूमहाराजांचें वैभव पाहिलेलें. त्या साताऱ्यांत राहून महाराजांचे गतवैभवाचीं लेणीं वागविणारे वाडे पहाणाऱ्या त्यांच्या बाल अंतःकरणाला भावी स्वराज्याचीं सुखद स्वप्नें पडल्यावांचून कशी रहातील ?

अच्युतराव हे बळवंतराव कोल्हटकरांचे दत्तक पुत्र. त्यांचे वडील प्रसिद्ध समाजसुधारक वामनराव कोल्हटकर नागपुरास स्मॉलकॉज कोर्टाचे जज्ज होते. त्यामुळें शिक्षण संपल्यावर नागपुराकडे मोठी नोकरी लागण्याची, निदान वकिलींत चांगलें बस्तान बसण्यास मदत मिळण्याची अच्युतरावांना खात्री होती. परंतु अच्युतराव मनानें टिळकांचे शिष्य बनले. त्यांनीं टिळकांप्रमाणेंच स्वदेशसेवेंत आयुष्य घालविण्याचें ठरविलें. ते बुद्धीनें मंद असले तरी पठणशक्ति चांगली असल्यानें ठेंचाळत ठेंचाळत त्यांनीं एल्‌एल्. बी. ची मजल मारली व पित्याच्या आग्रहावरून नागपुरास वकिलीची सनदहि काढली. पण एकीकडे वकिली करीत असतांच तेथील 'देशसेवक' पत्र चालविण्याकरितां त्यांनीं हातीं घेतलें. पण १९०८ सालीं राजद्रोहाच्या आरोपावरून त्यांस सहा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. शिक्षा भोगून सुटून आल्यावर त्यांनीं कांहीं महिने पांदेचरी, मद्रास या बाजूस अज्ञात स्थितींत घालविले. गोवें प्रांतांतहि ते कित्येक दिवस गुप्तपणें वावरत होते म्हणतात. गोव्याहून परत मुंबईस ते बूटसुटांत आले. त्यावरून व गोव्याहून आले म्हणूनहि त्यांना मुंबईतील आजूबाजूचे लोक थट्टेनें 'साहेब' म्हणूं लागले. मुंबईस आल्यावर प्रथम ज्यांत वेदांचें भाषांतर आहे असें 'श्रुतिबोध' मासिक व त्या मागून 'संदेश' पत्र त्यांनीं सुरू केलें.

अच्युतराव हे हाडाचे खरे वर्तमानपत्रकार होते. त्यांनीं संदेश पत्र फार हौसेनें काढलें व चालविलें. त्यांच्या संदेशाचा अंक कधीं काळ्या शाईचा, कधीं तांबड्या शाईचा तर कधीं हिरव्या शाईचाहि निघावा. त्याची किंमत कधीं अर्धा आणा तर कधीं स्पेशल अंक म्हणून एक आणाहि असावी. मजकूर लिहिण्यापासून तो ठशांत जुळण्यापर्यंत सर्व कष्टाचीं कामें पैशाच्या हलाखींत केव्हां केव्हां त्यांनीं स्वतः करावीं. आपलें पत्र नित्य नवें दिसलें पाहिजे, तें ठराविक सांच्याचें वाटतां कामा नये याकरितां त्यांनीं नेहमीं डोकें चालवावें. संदेश पत्र एकदां बंद करतांना 'अमुचा रामराम घ्यावा' हा लेख लिहून त्यांनीं आपल्या पत्राचा उद्देश सांगितला तो असा : 'बातम्या देण्याची पद्धति, आर्टिकलची ढब, झगझगीत पूर्वनिर्देश हें सर्व संदेशाचें लेणें आहे. कारण पूर्वकालीन दैनिक पत्रांतील मिळमिळीतपणा, बावळेपणा, बुद्धिहीनपणा, विचारांतील परावलंबित्व हें सर्व जाऊन त्यांच्या जागीं नाविन्य, चटकदारपणा व आकर्षणत्व हीं यावींत हा संदेशाचा हेतु होता.'

या दृष्टीनें अच्युतरावांनीं दैनिक वर्तमानपत्रांना नवें वळण लावलें हे निर्विवाद. वत्सला वहिनीचीं पत्रें, किट्टी मामाचें गॅझेट, बेटा गुलाबच्या कानगोष्टी, सोमवारची कहाणी या चमत्कृतिजनक मथळ्याखालीं सामाजिक व वैयक्तिक आचरणावर चटकदार चटके संदेशांत येऊं लागले. चुटके-वजा वर्तमान देण्याची त्यांनीं नवीनच टूम काढली. त्याला मथळेहि 'मोतीचुराचे लाडू' 'दिवाळीचीं कडबोळीं' या सारखे लोभनीय असत. अच्युतराव स्वभावानें भाविक. लहानपणीं बखरी, पोथ्या त्यांनीं वाचाव्या. साताऱ्याच्या बालबोध व सीध्या वातावरणांत कहाण्या व कीर्तन-पुराणांतील कथा त्यांना ऐकावयास व पाठ करावयासहि मिळाव्या. या विविध संस्कारांचा प्रभाव संदेश पत्र त्यांनीं स्वतःच्या मुखत्यारीनें स्वतंत्रपणें काढण्यास सुरुवात केली तेव्हां त्यावर पडला. लेखक जबरा, शरीरसामर्थ्य

अचाट, कल्पकता दांडगी व उत्साह अवर्णनीय या कारणानें संदेशाकरितां कोणताहि विषय त्यांनीं लिहावयास घेतला तरी त्यानें संदेशाचे रकानेच्या रकाने भरून निघावे. त्यांच्या लेखनशैलींत आधुनिक व पौरा-णिक अशा दोन्ही पद्धतींचें मिश्रण झालें होतें. आधुनिक पद्धतींत त्यांना काळकर्ते शिवरामपंत परांजपे यांची शैली आवडत असावी. कारण त्या धर्तीवर पाल्हाळीक, वक्तृत्वपूर्ण पण एकच मुद्दा अनेक रीतींनीं पुनः पुन्हा मांडण्याची ढब त्यांनीं उचलली होती. पद्धति परांजप्यांची असली तरी त्यांचा भारदस्त व उदात्तपणा अच्युतरावांत नसल्यामुळें त्यांचें साहित्य बरेंच हलक्या दर्जाचें निपजलें. श्रीधर अगर महिपती यांच्या थाटाच्या ओव्या देखील रचून त्यांनीं एक दोन दिवसांत दहाबारा रकान्यांचीं पुराणें लिहून काढावीं. संदेशाच्या २ सप्टेंबर १९१९ च्या अंकांत त्यांचें गणेशपुराण आलें, त्याचा थोडासा नमुना येथें देतों. तो वर्गणी-दारांस उद्देशून आहे.

आतां परिसा परमेश्वर । संदेश-वार्षिक-वर्गणीदार ।
विसरूं कैसा मुख्याधार । तुमचा कवनीं आजि ह्या ।
प्रेमें सहामाही तिमाही । वर्गणी भरती आणोनि गेहीं ।
अथवा व्ही. पी. घेती त्यांहि । वंदन माझें अनुरागें ॥

या कवनांत कोल्हटकर यांचा मराठी जुन्या कवींच्या काव्याशीं दृढ परिचय कसा झाला होता हें कळतें.

ता. १५ ऑगष्ट १९२० च्या लोकमान्य स्पेशल अंकांत त्यांनीं टिळकांचें समग्र चरित्र लिहिलें असून तो लेख क्राऊन साइजचीं ५६ पानें भरतील इतका मोठा आहे. याचें नांव बहाद्दर लेखक. लो. बाळ गंगाधर टिळक, रा. नरसिंह चिंतामण केळकर यांसारख्या थोर व्यक्तींची अवहेलना करणारा मजकूर संदेशांत येऊं लागल्यामुळें कोल्हटकरांविषयीं जनतेंत तिरस्कार

उत्पन्न होऊन त्यांच्या आयुष्याचा उत्तरार्ध अत्यंत कष्टमय झाला. त्यामुळेंच त्यांना मरणहि अकालीं म्हणजे वयाच्या ५२ व्या वर्षी आलें. इतक्या विपत्तींत ते शेवटचे दिवस ढकलीत होते तरी वर्तमानपत्राचें व्यसन मरेपर्यंत त्यांनीं सोडलें नाहीं. कोल्हटकर यांनीं नारिंगी निशाण नांवाची नाटक मंडळी काढून तिच्याकरितां स्वतः नारिंगी निशाण, विवेकानंद, ताई तेलीण, बट्ट्याबोळ इत्यादि नाटकें लिहिलीं आणि तीं स्वतः उपसंपादकासुद्धां रंगून नाटकभूमीवर आणिलीं.

# प्रकरण सातवें

# संपादकीय व्यवसाय

केसरी संस्थेची पायाशुद्ध उभारणी करून व अंगोपांगें जोडून तिच्या चालकांनीं तिला शक्य तितकें पूर्णत्व आणिलें आहे. आज महाराष्ट्रांत आदर्श संस्था या नात्यानें जर एखाद्या पत्राकडे बोट दाखवावयाचें झालें तर तें केसरीकडेच दाखवावें लागेल. महाराष्ट्रांतील बहुतेक संपादकांनीं व पत्रांनीं केसरीचाच कित्ता डोळ्यापुढें ठेवला असल्यामुळें इतर अनेक संपादक व पत्रकार यांजबरोबर केसरी संस्थाहि मनांत धरून संपादकाच्या कार्याचा विचार प्रकृत स्थळीं केला आहे.

हिंदुस्थानाच्या सद्यःस्थितींत वर्तमानपत्राच्या संपादकाची सत्ता अतुलनीय होय. हिंदुस्थानावर राज्य परकीय इंग्रज लोकांचें आहे. देशाची सर्व राजकीय सत्ता त्यांच्या हातीं अजूनहि एकवटली असल्या-मुळें इंग्रज व त्यांच्या हाताखालचे हिंदी अधिकारी यांचें प्राबल्य नवीन प्रांतिक स्वायत्ततेंतहि कमी व्हावयाचेंच आहे. इंग्रजी सत्तेच्या खालोखाल सत्ता संस्थानिकांना आहे. ते आपल्या हद्दींत कर्तुम-कर्तुम् आहेत. पण ब्रिटिश हिंदुस्थानांत संस्थानिक व खालसांतील सामान्य प्रजाजन यांच्यांत व्यावहारिकदृष्ट्या कांहीं फरक नाहीं. इतकेंच काय पण इंग्रजांच्या कायदेबंद राज्यांत इंग्रजी अधिकाऱ्यांचीहि सत्ता मर्यादित झालेली आहे. केवढाहि बडा इंग्रज अधिकारी असो, तो गव्हर्नर असो कीं, गव्हर्नर जनरल असो, त्याच्याशीं कोणाहि व्यक्तीचा कायदेशीर संबंध आला नाहीं तोंपर्यंत जगांतील दैनं-

दिन आयुष्यक्रमांत गव्हर्नर, गव्हर्नर जनरल व गरीब हिंदी माणूस हे एकमेकाची पर्वा न करतां वागूं शकतात. गरीब हिंदी मनुष्यास कोणाहि समोर छाती काढून चालण्यास कसलीहि आडकाठी नाहीं. त्यानें अमक्या बड्या लोकांपुढें आपली मान कां वाकविली नाहीं असें त्याला हटकण्याची कोणाचीहि प्राज्ञा नाहीं. इंग्रजी राज्यांतला हा विशेष होय. यालाच व्यक्तिस्वातंत्र्य म्हणतात. पण तें स्वातंत्र्य एका अर्थी मनुष्याला ताठर व बेगुमान बनविणारें असलें तरी त्यापासून मानसिक समाधानाहून अधिक महत्त्वाचा फायदा अद्यापि झालेला नाहीं. तो जसा दुसऱ्याची पर्वा बाळगीत नाहीं तशी दुसरेहि त्याची पर्वा बाळगीत नाहींत.

मराठी राज्यांत सरदार, दरकदार, इनामदार, वतनदार या प्रकारचे सामाजिक वर्ग असून त्यांना पालखी, घोडा, अब्दागीर यासारखा मान व लवाजमा असे; आणि राज्य कायदेबंद नसल्यामुळें ते इतरांवर पचेल तितका अधिकार गाजवूं शकत व जुलूमहि करूं शकत. परंतु इंग्रजी राज्यांत या प्रकारचा मानहि आतां नव्यानें कोणाला मिळत नाहीं; तसाच जन्मसिद्ध, पिढीजाद व तहाहयात असा अधिकारहि कोणाकडे येत नाहीं. उभ्यानें जावें व आडव्यानें यावें अशी गत सर्वांचीच झाली आहे. शिष्टाचार, भलेपणा, व्यवहार म्हणून एकमेकांनीं एकमेकांना मानावयाचें इतकेंच. एरवीं समाधानकारक वाटणाऱ्या या स्थितीनें मनुष्यास एकंदरीनें दुर्बलत्वच आणिलें आहे. राज्य कायद्याचें व परकीयांचें असल्यामुळें परावलंबन वाढलें आहे, देशांतील सर्व संपत्ति धुपून गेल्यामुळें लोक निस्सत्त्व झाले आहेत व एखाद्या अन्यायाची दाद पूर्वकालीं जशी ज्याची त्याला स्वसामर्थ्यानें बऱ्याच अंशीं लावून घेतां येत होती तशी आतां घेतां येत नाहीं व हरएक बाबतींत कोर्ट-कचेऱ्यांचें तोंड पहावें लागतें. या कारणानें जनतेचा व्यवहार जागजागीं अडून पडत आहे.

अशा रीतीनें सर्व बाजूंनीं दुर्बल, ह [illegible]श, निस्सत्त्व व पराधीन बन-

लेल्या हिंदी समाजांत ऐटीनें वागणारा कोणी असेल तर तो वर्तमानपत्राचा संपादक होय. त्याला लेखनस्वातंत्र्य ही अजब शक्ति प्राप्त झाली आहे. त्या दृष्टीनें संपादक हा राजा व वाचक वर्ग हें त्याचें राज्य. जेथें त्याचा वाचक असेल तेथें त्याचें राज्य आहेच. त्याचें राज्य काशीपासून रामेश्वरापर्यंत व कराचीपासून कलकत्त्यापर्यंत पसरलेलें आहे. इंग्रजी राज्यावर सूर्य मावळत नाहीं असें गौरवपूर्वक म्हणण्यांत येतें तें संपादकाच्या राज्यालाहि सारखेंच लागू आहे. कारण त्याचे वाचक अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, जपान, अरबस्तान, रशिया, ॲबिसीनिया यासारख्या ब्रिटिश साम्राज्याबाहेरील देशांतूनहि पसरले असल्यास संपादकाचें राज्य जगद्व्यापी आहे हेंहि तितकेंच खरें आहे. संपादकाच्या विस्तीर्ण राज्याचा न्याय, सत्य, दया, कर्तव्य व मानवी हक्क हा पाया होय. त्या विस्तृत पायावर तो आपल्या लेखनाची टोलेजंग इमारत उभारतो. म्हणून ज्यांना अन्याय घडला, सत्याचा भंग झाला, कर्तव्य लाथाडलें गेलें व हक्क पायाखालीं तुडविण्यांत आले ते सर्व आपली अर्जी घेऊन वृत्तपत्रांच्या दरबारांत प्रवेश करतात. या दरबारांत अर्जाला तिकिट नाहीं, वकिलाची फी नाहीं व स्टांपाचा कागदहि नाहीं. फार तर टपालाला काय हंशी ๑ पडेल तें भरावें व बेलाशक संपादकाकडे अर्ज गुदरावा. इंग्रजी राज्यांत कोर्टाचा खर्च फार माजला आहे, पण संपादकाचें कोर्ट अगदीं फुकट आहे. तें नादारांप्रमाणें दारांनाहि अगदीं मोफत आहे.

संपादक आपल्या प्रजाजनाचें संरक्षण करण्यास सरसावतो तेव्हां त्याचे अधिकारहि अमर्याद असतात. कलम ही त्याची समशेर. ती राजे, महाराजे, गव्हर्नर, गव्हर्नर जनरल, प्रांतांचीं मंत्रिमंडळें, कलेक्टर, कमिशनर, तालुक्याचा मामलेदार व गांवचा पाटील या सर्वांवर सारखी चालविण्यास तो समर्थ असतो. त्याच्यापुढें सैन्याचा अधिपति व पोलिसांवरचा इन्स्पेक्टर एकाच योग्यतेचे. लहानमोठ्या सत्ताधारी अशा सरकारी अंमलदारांची

दिन आयुष्यक्रमांत गव्हर्नर, गव्हर्नर जनरल व गरीब हिंदी माणूस हे एकमेकाची पर्वा न करतां वागूं शकतात. गरीब हिंदी मनुष्यास कोणाहि समोर छाती काढून चालण्यास कसलीहि आडकाठी नाहीं. त्यानें अमक्या बड्या लोकांपुढें आपली मान कां वाकविली नाहीं असें त्याला हटकण्याची कोणाचीहि प्राज्ञा नाहीं. इंग्रजी राज्यांतला हा विशेष होय. यालाच व्यक्तिस्वातंत्र्य म्हणतात. पण तें स्वातंत्र्य एका अर्थी मनुष्याला ताठर व बेगुमान बनविणारें असलें तरी त्यापासून मानसिक समाधानाहून अधिक महत्त्वाचा फायदा अद्यापि झालेला नाहीं. तो जसा दुसऱ्याची पर्वा बाळगीत नाहीं तशी दुसरेहि त्याची पर्वा बाळगीत नाहींत.

मराठी राज्यांत सरदार, दरकदार, इनामदार, वतनदार या प्रकारचे सामाजिक वर्ग असून त्यांना पालखी, घोडा, अबदागीर यासारखा मान व लवाजमा असे; आणि राज्य कायदेबंद नसल्यामुळें ते इतरांवर पचेल तितका अधिकार गाजवूं शकत व जुलूमहि करूं शकत. परंतु इंग्रजी राज्यांत या प्रकारचा मानहि आतां नव्यानें कोणाला मिळत नाहीं; तसाच जन्मसिद्ध, पिढीजात व तहाहयात असा अधिकारहि कोणाकडे येत नाहीं. उभ्यानें जावें व आडव्यानें यावें अशी गत सर्वांचीच झाली आहे. शिष्टाचार, भलेपणा, व्यवहार म्हणून एकमेकांनीं एकमेकांना मानावयाचें इतकेंच. एरवीं समाधानकारक वाटणाऱ्या या स्थितीनें मनुष्यास एकंदरीनें दुर्बलत्वच आणिलें आहे. राज्य कायद्याचें व परकीयांचें असल्यामुळें परावलंबन वाढलें आहे, देशांतील सर्व संपत्ति धुपून गेल्यामुळें लोक निस्सत्त्व झाले आहेत व एखाद्या अन्यायाची दाद पूर्वकालीं जशी ज्याची त्याला स्वसामर्थ्यानें बऱ्याच अंशीं लावून घेतां येत होती तशी आतां घेतां येत नाहीं व हरएक बाबतींत कोर्ट-कचेऱ्यांचें तोंड पहावें लागतें. या कारणानें जनतेचा व्यवहार जागजागीं अडून पडत आहे.

अशा रीतीनें सर्व बाजूंनीं दुर्बल, ह ाश, निस्सत्त्व व पराधीन बन-

लेल्या हिंदी समाजांत ऐटीनें वागणारा कोणी असेल तर तो वर्तमानपत्राचा संपादक होय. त्याला लेखनस्वातंत्र्य ही अजब शक्ति प्राप्त झाली आहे. त्या दृष्टीनें संपादक हा राजा व वाचक वर्ग हें त्याचें राज्य. जेथें त्याचा वाचक असेल तेथें त्याचें राज्य आहेच. त्याचें राज्य काशीपासून रामेश्वरापर्यंत व कराचीपासून कलकत्त्यापर्यंत पसरलेलें आहे. इंग्रजी राज्यावर सूर्य मावळत नाहीं असें गौरवपूर्वक म्हणण्यांत येतें तें संपादकाच्या राज्यालाहि सारखेंच लागू आहे. कारण त्याचे वाचक अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, जपान, अरबस्तान, रशिया, ॲबिसीनिया यासारख्या ब्रिटिश साम्राज्याबाहेरील देशांतूनहि पसरले असल्यास संपादकाचें राज्य जगद्व्यापी आहे हेंहि तितकेंच खरें आहे. संपादकाच्या विस्तीर्ण राज्याचा न्याय, सत्य, दया, कर्तव्य व मानवी हक्क हा पाया होय. त्या विस्तृत पायावर तो आपल्या लेखनाची टोलेजंग इमारत उभारतो. म्हणून ज्यांना अन्याय घडला, सत्याचा भंग झाला, कर्तव्य लाथाडलें गेलें व हक्क पायाखालीं तुडविण्यांत आले ते सर्व आपली अर्जी घेऊन वृत्तपत्रांच्या दरबारांत प्रवेश करतात. या दरबारांत अर्जाला तिकिट नाहीं, वकिलाची फी नाहीं व स्टांपाचा कागदहि नाहीं. फार तर टपालाला काय हंशी ) पडेल तें भरावें व बेलाशक संपादकाकडे अर्ज गुदरावा. इंग्रजी राज्यांत कोर्टाचा खर्च फार माजला आहे, पण संपादकाचें कोर्ट अगदीं फुकट आहे. तें नादारांप्रमाणें दारांनाहि अगदीं मोफत आहे.

संपादक आपल्या प्रजाजनाचें संरक्षण करण्यास सरसावतो तेव्हां त्याचे अधिकारहि अमर्याद असतात. कलम ही त्याची समशेर. ती राजे, महाराजे, गव्हर्नर, गव्हर्नर जनरल, प्रांतांचीं मंत्रिमंडळें, कलेक्टर, कमिशनर, तालुक्याचा मामलेदार व गांवचा पाटील या सर्वांवर सारखी चालविण्यास तो समर्थ असतो. त्याच्यापुढें सैन्याचा अधिपति व पोलिसांवरचा इन्स्पेक्टर एकाच योग्यतेचे. लहानमोठ्या सत्ताधारी अशा सरकारी अंमलदारांची

व सिंहासनाधिष्ठित राजांची जर ही स्थिति तर समाजांतील प्रतिष्ठित, अप्रतिष्ठित, विद्वान, अविद्वान, श्रीमंत, गरीब आणि साळसूद व शिरजोर यांजविषयीं बोलावयासच नको. हें झालें स्वदेशांतील मानवांचें. पण जे देश त्यानें पाहिले नाहींत व ज्यांतील घडामोडीशीं त्याचा व्यक्तिशः काडीमात्रहि संबंध पोंचत नाहीं, त्या देशांची व तेथील भान-गडींची उठाठेव संपादक आपल्या खोलींत बसून बेलाशक करतो आणि त्यावरील आपलीं बरींवाईट मतें झोकून देतो. असा हा स्वतंत्र सत्ताधीश सध्यांच्या सुधारलेल्या काळानें निर्मिला असल्यानें त्याची दहशत सर्वच बाळगतात व त्याची मर्जी खप्पा न होऊं देण्यास झटतात. कोणाला तो सुलतान तर कोणाला त्राता वाटतो. हें त्याचें सामर्थ्य स्वराज्याच्या नव्या काळांत कमी न होतां वाढणारच आहे.

संपादकाच्या लेखणीचा फटकारा प्रत्येकाला बसण्याचा संभव असल्यामुळें ती चालविणारा मनुष्य आपली जबाबदारी ओळखणारा पाहिजे. सुशिक्षण, समंजसपणा, प्रामाणिकपणा, सचोटी, न्यायप्रियता व लोककल्याणाची इच्छा हे संपादकाचे किमान गुण होत. या गुणांची आवश्यकता सर्वत्र सारखीच आहे. पण हिंदुस्थानाच्या विशिष्ट परिस्थि-तींत त्याशिवाय इतरहि गुण अपेक्षित असत व अद्यापिहि अजिबात नाहींत असें नाहीं. हिंदी संपादकास परकीय सत्तेखालीं वागत असतांना स्वदेशाचें व स्वदेशबांधवांचें हितसंरक्षण करावयाचें असल्यामुळें परकीय सत्तेवर व सत्ताधाऱ्यावर टीकास्त्र चालविण्याची पाळी वारंवार येत असे; किंबहुना त्याचें तें आद्य कर्तव्यच समजलें जात होतें. अर्थात् तें अधिकाऱ्यांना रुचणारें नव्हतें. म्हणून संपादकास कायद्याच्या पेंचांत धरून तुरुंगांत अडकविण्यास अगर जामिनाची जबर रकम मागून बेजार कर-ण्यास अधिकाऱ्यांना सोपें जाई. हिंदी संपादकावरील ही आपत्ति मागें फार मोठी होती. ती विशिष्ट परिस्थितींतच ओढवत असली तरी एखादा अविचारी

संपादक वेळींअवेळीं बेतालपणें लिहून सरकारी अधिकाऱ्यांना चिडवीत राहिला तर त्याची गुडाखू वळविण्यास सरकाराला विलंब लागत नव्हता. उलटपक्षीं जनतेकडूनहि अशा संपादकास सहानुभूतीचा व गौरवाचा मोबदला मिळूं नये किंबहुना त्याची मनांतून तरी तिजकडून हेटाळणीच व्हावी. लो. टिळक सरकारावर कडक अथवा तसेंच म्हणावयाचें झाल्यास असह्य वाटणारी, झोंबणारी टीका करीत. असें असूनहि टिळकांच्या एक-वीस वर्षांच्या संपादकीय कारकिर्दींत त्याजवर राजद्रोहाचे खटले दोनदाच झाले. याचें कारण हें कीं त्यांची टीका कडक पण कायदेशीर व वाजवी असे. त्याजवरील दोन खटले अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं करण्यांत आले. हेच प्रसंग संपादकाच्या कसोटीचे असतात. त्या कसोटीस संपादक उतरला तर लोक त्याला डोक्यावर घेऊन देवाप्रमाणें मान देतात.

त्यामुळें संपादकाला असाधारण कीर्ति लाभतेच, पण देशांतील जनतेंतहि एक प्रकारचें धैर्य उत्पन्न होऊन देशाचें पाऊल राजकीयदृष्ट्या पुढें पडतें. टिळकांवरील पहिला खटला, त्यांनीं पुण्यांतल्या प्लेगच्या बंदोबस्तांतील सरकारी अधिकाऱ्यांच्या चुका व जुलूम तडफडून दाखविण्याचें व्रत सतत चालविलें म्हणून, सरकारानें वड्याचें तेल वांग्यावर काढून भरला; पण दुसरा खटला नाहक भरण्यांत आला. पहिल्या खटल्याचे वेळीं रँड व आयर्स्ट यांचे खून चाफेकरबंधूंकडून घडले होते हें जवळचें तरी निमित्त होतें; पण दुसऱ्या खटल्याच्या वेळीं बाँब बंगाल्यांत उडाला व त्याचा बादरायण संबंध जोडून सरकारानें टिळकांचा रुतणारा महाराष्ट्रांतील कांटा काढला. तथापि पहिल्या खटल्यासारखे प्रसंग हिंदी संपादकांवर त्यांच्या आयुष्यांत ओढवणारे असतात. ते ओढवतील असें दिसत असतांहि सरकारास सावध करण्याकरितां व रयतेवर होणाऱ्या जुलुमांची दाद लावून घेण्याकरितां संपादकाला खाल्ल्या मिठास जागून उघड्या डोळ्यांनीं आपलें कर्तव्य बजवावें लागतेंच. तें त्यानें बजावलें व त्याप्रीत्यर्थ खटला होऊन

तुरुंगवासाची पाळी आली तरी ती त्यानें समाधानपूर्वक दिलीच पाहिजे. हिंदु-मुसलमानांचे दंगे व सरकारी अधिकाऱ्यांनीं केलेले अत्याचार आणि व्यक्तींची बदनामी हींच जबाबदार वर्तमानपत्रकर्त्यांवर येणारीं मुख्य गंडांतरें असून त्याच बाबतींत, खटला झालेल्या संपादकांपैकीं बहुतेकांना तुरुंगाची हवा खावी लागली आहे. अशा गंडांतरास तोंड देऊन संपादकानें लोखंडाचे चणे खाल्ले व तो जिवंत परत येऊन आपलें काम पूर्ववत् पाहूं लागला म्हणजे जनतेंतील असंख्य माणसें त्याचीं अनुयायी बनतात. तीं त्याजपासून अधिकाधिक महत्त्वाच्या कामांची अपेक्षा करतात व त्यामुळें संपादकावरील जबाबदारी अधिकाधिक वाढून त्याला ती पार पाडण्याकरितां विविध विषयांचा अभ्यास करणें भाग होतें.

संपादकानें अभ्यासावयाच्या विषयांना अंतच नाहीं. जितक्या विषयांवर जगाचा दैनंदिन व्यवहार चालतो तितके सगळे त्यानें अभ्यासावयाचे विषयच. वर्तमानपत्र उघडलें कीं त्याच्या अंगावर जिकडे तिकडे बातम्याच व त्या बातम्यांचे घडवून चढविलेले अलंकार असतात. वाचक आपलीं सांसारिक कामें संभाळून फावल्या वेळांत उत्सुकतेनें वर्तमानपत्रावर नजर टाकतो. त्यांत बरी दिसेल त्या बातमीभोंवतीं किंचित् घोंटाळून तो मधुकरवृत्तीनें दुसऱ्या बातमीवर उडून बसतो. कांहीं बातम्या तो लक्षांत ठेवतो व कांहीं लागलीच विसरूनहि जातो. कांहीं बातम्यांची मुंगळ्याप्रमाणें उत्क्रांति होते. मुंगळा एके दिवशीं चालणारा किडा आढळावा तर दुसऱ्या दिवशीं तें उडणारें पांखरू दिसावें. तसेंच कित्येक बातम्यांचें होतें. एक बातमी थांबून थांबून फरकाफरकानें वर्तमानपत्रांत येते. वाचकानें ती कळत न कळत वाचलेली व विसरलेली असते. कांहीं काळ लोटल्यावर तिच्यांत नव्या भानगडी घुसून तिला अकल्पितपणें महत्त्व प्राप्त होतें. सर्वांचें लक्ष तिजकडे वेधून लोकांची चर्चा तिजवर चालते. वाचकाला तिचें समग्र कथानक गुंतागुंतीसुद्धां समजून घ्यावेंसें

वाटतें व त्या एकंदर प्रकरणांत दोष कोणाचा तो समजून घेण्याकरितां त्याचें मन चुटपुटतें. अशा मनःस्थितींत वाचक वर्ग असतांना सदर वृत्तान्त अथपासून इतिपर्यंत वाचण्यास, तो सुसंगत मांडण्यास, उकलून दाखविण्यास व वाचकापुढें त्यांतील रहस्य निवडून ठेवण्यास संपादकानें करावयाचा प्रयत्न हाहि एक अभ्यासच आहे. असा अभ्यासपूर्वक उलगडून मांडलेला विषय मिळाल्यानें वाचकांचें चित्त समाधान पावतें.

वरील प्रकारची खेंकटीं वारंवार पुढें येतात व तीं संपादक एक संपलें कीं दुसरें व दुसरें संपलें कीं तिसरें या पद्धतीनें चित्रपटांतील आख्यानाप्रमाणें वाचकाच्या डोळ्यासमोर नाचवीत ठेवतो. याशिवाय देशाच्या हिताहितावर ज्यांचा परिणाम व्हावा अशीं किती तरी कारस्थानें देशांत व देशाबाहेर चालतात. त्यांपैकीं बऱ्याच कारस्थानांचें सूत्रधार सरकार असून कांहीं कारस्थानें देशांतील विशिष्ट वर्ग व त्यांचे पुढारी करीत असतात. सरकारी कायदेमंडळें हीं मोठमोठ्या मसलतींचीं उगमस्थानें होत. त्यांतून देशाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक हितसंबंधांच्या अनेक युक्त्याप्रयुक्त्या व योजना पुढें येऊन त्यांवर उलट सुलट पक्षांचे प्रतिनिधी डावपेंच लढवीत असतात. लष्करी शिक्षण, वर्तमानपत्रांचा कायदा, युरोपियन व्यापाऱ्यांचें हितसंरक्षण, देशी-परदेशी मालावरील कर, हुंडणावळ, खुला व्यापार, परदेशाशीं व्यापारी करार, विवाहाची वयोमर्यादा, अस्पृश्य वर्गाचा देवालयांत प्रवेश, घटस्फोट हे सर्व विषय आपआपल्या परीनें भानगडीचे, किच्चकट, उरस्फोडीचे, वादग्रस्त, कावेबाजीचे असून फार दक्षतेनें उकलावयाचे व समजून घ्यावयाचे असतात. त्यांतील कांहीं विषय आर्थिक स्वरूपाचे असल्यानें ज्यानें अर्थशास्त्राचा अभ्यास सतत चालू ठेवला आहे त्यालाच ग्रहण होतात आणि कांहीं समाजशास्त्र, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र याच्या कक्षेंत पडतात. या सर्व विषयात पारंगतता मिळविणें संपादकास शक्य नसलें तरी एखादा दुसरा विषय तयार ठेवणें व बाकी-

ज्यांची कामचलाऊ ओळख करणें त्याला प्राप्त असतें. या दृष्टीनें पाहिल्यास संपादक व्यासंगी पाहिजे, ऐदी असतां कामा नये याविषयीं कोणाचीहि खात्री होईल व त्यास संपादकाच्या परिश्रमांची कल्पनाहि येईल.

संपादकानें ज्यांची सेवा करावयाची त्या विषयांची परिगणना वरील प्रकारची आहे. ती अवलोकिल्यास त्यांपैकीं बहुतेक विषय नीरस, रुक्ष, राकट, कुरूप व खडतर असल्याचें प्रत्येकजण कबूल करील. त्यांजबरोबर काळ कंठणाऱ्या संपादकाचा त्या सर्वांवर लोभ जडणें मनुष्यस्वभावास धरून नाहीं. तरीपण देशहिताशीं ते निगडित असल्यामुळें जनतेला त्यांचा परिचय करून देणें संपादकाला आपलें कर्तव्य वाटतें. संपादक हा लोकांचा वकील आहे, शिक्षक आहे व हितचिंतकहि आहे. त्याला प्रत्येक विषयावर लोकमत बनवावयाचें असतें व त्याचा जोर लावून आपलें इच्छित कार्य सरकाराकडून साधावयाचें असल्याकारणानें कोणताहि विषय कितीहि तब्बेतखोर, खट्याळ किंवा हट्टी असला तरी त्यास कधीं चुचकारून, कधीं खणपटीस बसून तर कधीं त्याची भक्तिपूर्वक आराधना करून संपादक, तोंडांत लगाम घालून, खोडिल घोड्यावर आसन ठेवणाऱ्या पटाईत चाबूकस्वाराप्रमाणें, त्याजवर स्वारी भरतो व त्याला हवा तसा वांकवितो. अर्थात् हें काम अति प्रयासाचें आहे. एखादा विषय कोणीहि स्वतःकरितां समजून घेईल व त्यास थोड्या वेळांत समजेलहि. परंतु संपादकास तो नुसता समजून घ्यावयाचा नसून वाचकांना समजावूनहि द्यावयाचा असतो. त्याच्या कामगिरीपैकीं हा दुसरा भाग फार अवघड आहे. वर्तमानपत्राचा वाचक हा शाळेंतील विद्यार्थी नव्हे. विद्यार्थ्याला परीक्षा द्यावयाची असल्यामुळें तो त्यास अभ्यासावयास सांगितलेल्या विषयावरील पुस्तकांतील प्रतिपादन कितीहि दुर्बोध, किचकट व दडस असलें तरी त्यांत शिरून सदर विषय डोक्यांत भरून घेण्यावांचून गत्यंतर नसतें.

पण वर्तमानपत्राचा वाचक त्या कोटींतील नव्हे. तो तब्बेतखोर व सुखासीन असतो. त्याच्या अभ्यासाच्या संवयी सुटलेल्या असतात. तो डोक्याचा शीण शक्य तितका टाळूं पहातो. थोडे अभ्यासी लोक सोडल्यास सामान्य वाचकवर्गाची ही तऱ्हा. ती लक्षांत घेऊन संपादकास चालावयाचें असतें. म्हणून विषय मनोवेधक व सुबोध करून मांडण्याची आवश्यकता उत्पन्न होते. ही हातोटी उत्कृष्ट निबंधकाराशिवाय इतरांना साधणार नाहीं. यास्तव वृत्तपत्राच्या संपादकाचा पहिला गुण निबंधपटुत्व. त्याला सुग्रण गृहिणीप्रमाणें कोंड्याचा मांडा करतां आला पाहिजे. त्याला कुशल शिंप्याप्रमाणें शोभेसे कपडे शिवून कुरूपता झांकण्याचें साधलें पाहिजे. शाडूपासून गणपति थापणें चितान्यास व संगमरवरी दगडापासून सुंदर प्रतिमा घडविणें शिल्पकारास सोपें आहे, पण काळा पाषाण कापून व घोट्न त्यांतून सुरेख मूर्ति निर्माण करणें तितकेंच कठिण आहे. हें कठिण कर्म ज्या संपादकाच्या लेखणीस साधलें तो संपादक यशस्वी होय. संपादक हा हाडाचा कलावंत असला तरच आपला लेख मनोवेधक करण्याची हातोटी त्याला साधेल. कलावंताची दृष्टि रसावर विसांवणारी असल्यामुळें नीरस विषयांतूनहि रसोत्पादन केल्यावांचून त्यास चैन पडणार नाहीं. पण त्या रसोत्पत्तीचे क्लेश त्याचे तोच जाणे. गुलाबाच्या पाकळ्या किती मोहक व सुवासिक असतात. पण त्यांपासून गहिरा गुलकंद चुटकीसरसा बनत नाहीं. गुलकंदांत गंध्यानें खडीसाखर घातली म्हणून लगेच जिभेवर ठेवल्याबरोबर तो तोंडात विरघळणार नाहीं. खडीसाखर घाळून गुलाबकळ्या जितके दिवस बरणींत मुरूं द्याव्या तितकी गुलकंदाची लज्जत वाढते; कारण त्या वेळीं गुलाबकळीच्या कोरड्या पाकळ्या खडीसाखरेंत घोळून इतक्या एकजीव होतात कीं गुलकंदांतील साखर कोणती व कळ्या कोणत्या हें चोखंदळालाहि कळत नाहीं. संपादकास सामना द्यावयाच्या विषयांचेंहि हुबेहुब असेंच आहे.

च्यांची कामचलाऊ ओळख करणें त्याला प्राप्त असतें. या दृष्टीनें पाहिल्यास संपादक व्यासंगी पाहिजे, ऐदी असतां कामा नये याविषयीं कोणाचीहि खात्री होईल व त्यास संपादकाच्या परिश्रमांची कल्पनाहि येईल.

संपादकानें ज्यांची सेवा करावयाची त्या विषयांची परिगणना वरील प्रकारची आहे. ती अवलोकिल्यास त्यांपैकीं बहुतेक विषय नीरस, रुक्ष, राकट, कुरूप व खडतर असल्याचें प्रत्येकजण कबूल करील. त्यांजबरोबर काळ कंठणाऱ्या संपादकाचा त्या सर्वांवर लोभ जडणें मनुष्यस्वभावास धरून नाहीं. तरीपण देशहिताशीं ते निगडित असल्यामुळें जनतेला त्यांचा परिचय करून देणें संपादकाला आपलें कर्तव्य वाटतें. संपादक हा लोकांचा वकील आहे, शिक्षक आहे व हितचिंतकहि आहे. त्याला प्रत्येक विषयावर लोकमत बनवावयाचें असतें व त्याचा जोर लावून आपलें इच्छित कार्य सरकाराकडून साधावयाचें असल्याकारणानें कोणताहि विषय कितीहि तव्हेतरखोर, खट्याळ किंवा हट्टी असला तरी त्यास कधीं चुचकारून, कधीं खणपटीस बसून तर कधीं त्याची भक्तिपूर्वक आराधना करून संपादक, तोंडांत लगाम घालून, खोडिल घोड्यावर आसन ठेवणाऱ्या पटाईत चाबूकस्वाराप्रमाणें, त्याजवर स्वारी भरतो व त्याला हवा तसा वांकवितो. अर्थात् हें काम अति प्रयासाचें आहे. एखादा विषय कोणीहि स्वतःकरितां समजून घेईल व त्यास थोड्या वेळांत समजेलहि. परंतु संपादकास तो नुसता समजून घ्यावयाचा नसून वाचकांना समजावूनहि द्यावयाचा असतो. त्याच्या कामगिरीपैकीं हा दुसरा भाग फार अवघड आहे. वर्तमानपत्राचा वाचक हा शाळेंतील विद्यार्थी नव्हे. विद्यार्थ्याला परीक्षा द्यावयाची असल्यामुळें तो त्यास अभ्यासावयास सांगितलेल्या विषयावरील पुस्तकांतील प्रतिपादन कितीहि दुर्बोध, किचकट व दडस असलें तरी त्यांत शिरून सदर विषय डोक्यांत भरून घेण्यावांचून गत्यंतर नसतें.

पण वर्तमानपत्राचा वाचक त्या कोटींतील नव्हे. तो तब्बेतखोर व सुखासीन असतो. त्याच्या अभ्यासाच्या संवयी सुटलेल्या असतात. तो डोक्याचा शीण शक्य तितका टाळूं पहातो. थोडे अभ्यासी लोक सोडल्यास सामान्य वाचकवर्गाची ही तऱ्हा. ती लक्षांत घेऊन संपादकास चालावयाचें असतें. म्हणून विषय मनोवेधक व सुबोध करून मांडण्याची आवश्यकता उत्पन्न होते. ही हातोटी उत्कृष्ट निबंधकाराशिवाय इतरांना साधणार नाहीं. यास्तव वृत्तपत्राच्या संपादकाचा पहिला गुण निबंधपटुत्व. त्याला सुग्रण गृहिणीप्रमाणें कोंड्याचा मांडा करतां आला पाहिजे. त्याला कुशल शिंप्याप्रमाणें शोभेसे कपडे शिवून कुरूपता झांकण्याचें साधलें पाहिजे. शाडूपासून गणपति थापणें चितान्यास व संगमरवरी दगडापासून सुंदर प्रतिमा घडविणें शिल्पकारास सोपें आहे, पण काळा पाषाण कापून व घोटून त्यांतून सुरेख मूर्ति निर्माण करणें तितकेंच कठिण आहे. हें कठिण कर्म ज्या संपादकाच्या लेखणीस साधलें तो संपादक यशस्वी होय. संपादक हा हाडाचा कलावंत असला तरच आपला लेख मनोवेधक करण्याची हातोटी त्याला साधेल. कलावंताची दृष्टि रसावर विसांवणारी असल्यामुळें नीरस विषयांतूनहि रसोत्पादन केल्यावांचून त्यास चैन पडणार नाहीं. पण त्या रसोत्पत्तीचे क्लेश त्याचे तोच जाणें. गुलाबाच्या पाकळ्या किती मोहक व सुवासिक असतात. पण त्यांपासून गहिरा गुलकंद चुटकीसरसा बनत नाहीं. गुलकंदांत गंध्यानें खडीसाखर घातली म्हणून लगेच जिभेवर ठेवल्याबरोबर तो तोंडात विरघळणार नाहीं. खडीसाखर घाळून गुलाबकळ्या जितके दिवस बरणींत मुरूं द्याव्या तितकी गुलकंदाची लज्जत वाढते; कारण त्या वेळीं गुलाबकळीच्या कोरड्या पाकळ्या खडीसाखरेंत घोळून इतक्या एकजीव होतात कीं गुलकंदांतील साखर कोणती व कळ्या कोणत्या हें चोखंदळालाहि कळत नाहीं. संपादकास सामना द्यावयाच्या विषयांचेंहि हुबेहुब असेंच आहे.

काष्टौषधीच्या दुकानांत काडेचीराइत, सराटे, गुळवेल इत्यादिकांचे ओले, वाळले वेल अव्यवस्थित पडलेले असतात. संपादकाच्या मेजावरील साहित्यांत असलाच गळाठा आढळतो. विविध वृत्तपत्रें, रिपोर्ट व पुस्तकें यांतील आपणास जरूर ते आंकडे, मुद्दे व उतारे तो निवडून घेतो; प्रतिपक्षाचे सोयीचे तेवढेच आक्षेप एकत्र आणतो आणि ते बारकाईनें वाचून झाल्यावर मननाकरितां डोक्यांत भरून ठेवतो. हा चाराचुरा व चवळ चोथा मेंदूकडून सारखा पचविला जात असतां गाईच्या कांसेंत उतरणाऱ्या दुग्धबिंदूप्रमाणें एक एक रसबिंदु मनांत निथळून मन तुडुंब भरलें म्हणजे संपादक लिहावयास बसल्यावर त्याच्या लेखणींतून गोरसासारख्या मधुर धारा स्रवतात. या प्रयत्नांत संपादकाचें सर्व चातुर्य, बुद्धिवैभव व कल्पनासौष्ठव एकवटतें कलावान् संपादकाच्या डोक्यांत असला विषय मुरत असतां त्याला तो विषय हवा तितका विरघळेपर्यंत दुसरें तिसरें कांहीं सुचत नाहीं व गोडहि लागत नाहीं. पण त्याला मनपसंत असा लेख कागदावर उतरतांना जसजसा झळकत जातो तसतशा त्याच्या हृदयात आनंदाच्या लहरीवर लहरी उसळतात. संपादकाच्या या परिश्रमांचें पारितोषिक सदर निबंध अग्रलेखाच्या सिंहासनावर विराजमान होऊन दुसऱ्या दिवशीं झक्क ठशांत नवप्रसूत बालकाप्रमाणें स्वतःच्या हातीं पडल्यानें पोंचतेंच; पण इतरांनीं त्यास बरें म्हटल्यावांचून त्याचें श्रमसाफल्य होत नाहीं. तेंहि सुख अल्पावधींत वाचकांकडून प्रशंसापर पत्रें येऊन केव्हां केव्हां त्यास लाभतेंच.

संपादक स्वतः रसपूर्ण असला तरी नीरस विषयांत सतत घोळणारी त्याची लेखणी कोरडी पडण्याची भीति त्यास नेहमीं त्रास देते. कारण रोजच्या धंद्याच्या दुष्परिणामांतून संपादकाची मनोघटना झिजल्यावांचून सुटत नाहीं. आरकसदारांची करवत व शिपायाची तलवार यांची धार अशीच बोथट होत नाहीं काय? कांहीं काळ आपलें हत्यार सतत

वापरल्यावर हे लोक त्याना धार पाजून कार्यक्षमता आणितात. संपादकाला आपली लेखनशैली टवटवीत, ताजीतवानी व प्रसन्न राखावयाची असल्यास तो असलाच इलाज स्वानुभवानें कायम करतो. नाटक, कादंबरी, काव्य, इतिहास, प्रवासवर्णनें यापैकीं कोणतें ना कोणतें पुस्तक त्यानें रिकामपणीं वाचीत असावें. हिरव्या पानाच्या पोटीं किंवा पुष्पाच्या सुवासिक शेजेंत विसांवण्याकरितां त्यानें आपल्या बुद्धीस असली पळवाट काढून दिली तरच तिची नैसर्गिक प्रसन्नता टिकून रहाते. याहिपेक्षां चांगला इलाज आहे. तो असा कीं संपादकानें रिकामपणचें काम म्हणून कादंबरी, नाटक, काव्य, इतिहास यांतून बनेल ती वस्तू लिहावयास घेऊन आंतरीच्या नाना रसांना पान्हवावें. त्या योगानें निसर्गदत्त गुणांची कळी अधिकाधिक उमलल्यामुळें होणारा कलोत्कर्ष आश्चर्यकारक होय. समाधिसुखानें ज्या प्रकारची सिद्धि योगी पावतात त्याच प्रकारची हीहि एक सिद्धि समजण्यास हरकत नाहीं.

वर सांगितलेला हा कृत्रिम उपाय. पण संपादकास पुरून उरणाऱ्या व्यवसायांतून डोकें काढून बाह्योपायाकडे ढुंकून पहावयासहि उसंत मिळत नाहीं. अशा प्रतिकूलतेंतहि संपादकाला त्याच्या रोजच्या लेखनांत केव्हा केव्हा गोड झुळूक स्पर्शून जाते. तिचा परिपूर्ण लाभ करून घेतल्यानेंहि संपादकाला स्वत्वसंरक्षणाला आधार सांपडतो. सरकारच्या राज्यकारभारावरील टीका हें संपादकाचें प्रमुख कर्तव्य. तें बजावीत असतांहि बड्या सरकारी लाटावर हल्ले चढविणें, आपल्या प्रतिपक्षीय व्यवसायबंधूंशीं दोन हात करणें, हृदयद्रावक अत्याचाराचें चित्र रेखाटणें, युद्धप्रसंगावर वीररस उभारणें किंवा राष्ट्रीय विभूतीचे स्फूर्तिदायक रीतीनें गुण गाणें अशा प्रकारचे सणवार संपादकाला नित्यक्रमाच्या भाजी-भाकरीस रजा देऊन पोळी पिकविणारे असतात. त्या

सणासुदीला कुशल बल्लवाचार्यांची करामत कलावंत संपादक आवर्जून प्रकट करतो. इतकेंच नव्हे तर ती हौस भागविण्याकरितां तो थोडीशी वांकडी वाट करूनहि निवतो. या सणासुदीला नटून सजून व ठेवणीचीं वस्त्रेंभूषणें चढवून संपादकास मिरवण्यांत जसें सुख वाटतें तसें वाचकांनाहि तो सुखसोहळा मानवून तेहि हरखतात. वाङ्मयांतील उच्च शिखर गांठावयाचा हाच मोका संपादकानें बिनचूक साधल्यास वाचकांना त्याचें स्मरण दीर्घकाल राहून वाचकवर्ग पत्राचा भजक व अभिमानी बनतो.

महाराष्ट्राचा शीघ्र साहित्येतिहास अगदीं अर्वाचीन असतांहि त्याची परंपरा त्या मानानें फार उज्ज्वल आहे. त्यांत लो. टिळक सूर्याप्रमाणें स्वतेजानें प्रकाशत असून त्यांजभोंवतालची ग्रहमालाहि त्यांना शोभणारीच आहे. गोपाळ गणेश आगरकर, शिवराम महादेव परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर, नरसिंह चिंतामग केळकर व कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे त्या ग्रहमालेंतील तेजोगोल होत. ते सर्व आपआपल्या परीनें प्रतिभावान् होते व आहेत. त्यांनीं वर्तमानपत्रकाराशिवाय साहित्यसेवक या नात्यानेंहि कीर्ति मिळविली आहे. टिळकांचा गीतारहस्य हा प्रसिद्ध ग्रंथ साहित्यगुणांतहि कमी योग्यतेचा नाहीं. त्यांनीं केसरींतील लेखांनीं राजकारणांतील गुरुस्थान काबीज केलें; यालाहि लेखनांतील तेजस्विता, उद्बोधशक्ति व भाषाप्रभुत्वच कारण झालें. प्रतिपक्षावर बेधडक तुटून पडणें, त्याची दाणादाण उडविणें, त्याला फजीत करणें आणि स्वकीयास गौरवपूर्वक उच्च पदावर चढविणें, त्याला पाठीशीं घालून सांवरणें व स्वपक्षाची पराक्रमांनीं हिंमत वाढवून त्याला बलिष्ठ करणें या सेनापतीच्या व मुत्सद्याच्या डावपेंचाचे धडे टिळकांनींच महाराष्ट्रीय वृत्तपत्रांना शिकविले. तथापि टिळकांचें लक्ष भाषा सजविण्यापेक्षां विषयनिरूपणावर अधिक होतें. या दृष्टीनें साहित्यसेवा हें त्यांचें कार्य दुय्यम ठरतें. पण त्यांचेच मित्र व

प्रतिस्पर्धी आगरकर यांचीं साहित्यसेवक व उपदेशक हीं दोनहि अंगें तुल्यबल होतीं. सृष्टिवर्णनपर लेख व हॅम्लेट नाटकाचें मराठी रूपांतर या स्वरूपानें त्यांची साहित्यप्रियता स्वतंत्रपणें सर्वांच्या परिचयाची झालीच आहे.

वर वर्णिले त्या प्रकारचे कित्येक संपादक आतांपर्यंत मराठी वृत्त-पत्रांच्या वांट्यास आले असल्यामुळें मराठी वृत्तपत्रांची परंपरा फार उज्ज्वल झाली आहे व त्या योगानें नवीन पिढींतील संपादकावरील जोखी-महि वाढली आहे. केसरीसारख्या मोठ्या पत्रांत संपादक व उपसंपादक मिळून अनेक लेखक असतात व त्यांना आपला व्यवसाय संभाळून आव-डीच्या विषयांचा व्यासंग वाढविण्यास फुरसत व साधनें सांपडतात. त्या सर्वांचा फायदा घेतलेले केसरीचे विद्यमान प्रमुख संपादक रा. जनार्दन सखा-राम करंदीकर होत. त्यांच्याइतका अर्थशास्त्र व अंकशास्त्र यांचा अभ्यास केलेला मनुष्य मराठी वर्तमानपत्रांत तर नाहींच, पण सर्व हिंदी पत्रांतहि विर-ळाच आढळेल. हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें यांचीं वार्षिक अंदाज-पत्रकें, चलन पद्धति, हुंडणावळीचे भाव, जकात पद्धति, कर पद्धति, जमीन-महसूल पद्धति इत्यादि विषय असे आहेत कीं त्यांचे सु-दुष्परिणाम शेतकरी, व्यापारी, कारखानदार, मजूर, नोकर, या सर्वांना अनुभवावे लागतात. म्हणून संपादकानें त्यांचा अभ्यास करून योग्य वेळीं जनतेस व सर-कारास सावध करणें व त्यावरील आपलें मत सांगणें निकडीचें असतें. वर्तमानपत्रास वजनदारी येण्याकरितां त्याला जी लोकसेवा करावयाची असते त्यापैकीं ही महत्त्वाची समजली जाते. जसा एखाद्या ग्रंथाचा अभ्यास करावा, तसा वर्तमानपत्राचाहि अभ्यास करणें सर्वांना साधत नाहीं व त्याची गरजहि वाटत नाहीं. तथापि वर्तमानपत्रांतून आलेलें सर्व कांहीं संपादकास माहित पाहिजे असें मानल्यास देशी, परदेशी बातम्या, राष्ट्राराष्ट्रांचे परस्परांशीं संबंध, प्रमुख राष्ट्रांतील राजकीय पक्षोपपक्ष, त्यांच्या

राज्यघटना, मंत्रिमंडळांतील व्यक्ती, त्यांचीं धोरणें व स्वभाव, स्वदेशांतील प्रांतनिहाय पक्षोपपक्ष, त्याचीं परस्पर नातीं, त्या पक्षांमधील प्रमुख व्यक्ती, त्याचे स्वभावविशेष व कारस्थानें, संस्थानिकांच्या मसलती, संस्थानांचे दिवाण, हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें यांचे प्रमुख अधिकारी, इत्यादि बाबी असंख्य व अमर्याद आहेत. पण त्यांची माहिती बारकाईनें वाचून मिळविणें व डोक्यांत सांठविणें म्हटलें तर अवश्यहि आहे. तथापि तें ज्यांना साधतें, आवडतें व उरकतें असे संपादक विरळा. या कार्यांत पुष्कळसें यश मिळविणारांपैकींच करंदीकर हे होत. केळकरांत साहित्य व वृत्तपत्रीय व्यासंग या दोन्ही गुणांचा संगम झाला आहे. त्याजपाशीं साहित्यिक परंपरा संपून वृत्तव्यासंगी परंपरा सुरू झाली असें मानल्यास करंदीकर हे पहिले व्यासंगी संपादक होत.

वर्तमानपत्रांच्या वेगेंत सर्व जग व त्यांतील घडामोडी सांपडत असल्यामुळें भूत, वर्तमान व भविष्य यांची सांगड लक्षांत घेतां माहितगार संपादकांची जोड वर्तमानपत्राच्या कारभाराला अपरिहार्य मानावयास पाहिजे. ती माहिती वर्तमानपत्र चालवितांना पत्राला लागून शिवाय चौकस व जिज्ञासू माणूस विचारावयास आला व त्याला हवी ती माहिती स्मरणपूर्वक संपादकाकडून मिळाली म्हणजे तो मनांतून धन्यवाद देत जातो. या दृश्यापासून संपादकास लाभणारें समाधान और होय. हें काम विशेष प्रकारच्या स्मरणशक्तीवांचून साधत नाहींच, पण त्या चिल्लर, विलग व बयादवार माहित्या, त्याविषयीं विशिष्ट संपादकाला प्रेम व आवड वाटते म्हणूनच वाचल्या व लक्षांत ठेवल्या जातात यांत शंका नाहीं. केवळ कर्तव्य म्हणून तें कोणी करूं म्हणेल तर तो कंटाळेलच. यासाठीं आवड व पात्रता पाहून विषयांची वाटणी हा एकच व्यावहारिक मार्ग शिल्लक रहात असून त्याचाच अवलंब मोठीं पत्रें करतात. वृत्तपत्रवाचन ही चटक आहे. सामान्य वाचकाना ती आंवरत नाहीं व

त्यांचे कित्येक तास वृत्तपत्रांतील बातम्या व मजकूर धुंडाळण्यांत जातात यांत आश्चर्यकारक कांहींच नाहीं. त्यांना त्याहिपासून फायदा होतो. तो असा कीं त्यांचें मनोरंजन होऊन त्यांस बहुश्रुतताहि मिळते. पण संपादकाचें कर्तव्य त्याहून वेगळें असतें. वृत्तपत्रवाचन हा त्याच्या धंद्यांतला प्रमुख भाग आहे. मनोरंजनाकरितां तो वर्तमानपत्रें वाचीत नाहीं व बहुश्रुतपणा हेंहि त्याचें उद्दिष्ट नसतें. त्याला त्याच्या पत्राला उपयुक्त व आवश्यक असे विषय शोधून ते वाचावयाचे असतात. हा उद्देश मनांत बाळगून संपादकानें वृत्तपत्र वाचावयास घेतलें तर त्याचें वाचन मर्यादित वेळांत संपतें. पण त्याऐवजीं तो दिसेल ती बातमी व सांपडेल तो विषय वाचीत गेला तर मोठ्या शहरांत नवखा मनुष्य भटकावयाला निघावा त्याप्रमाणें अनवस्था प्रसंग ओढवेल. संपादकाच्या मेजावर दररोज वर्तमानपत्रांचे ढीग पडतात. तीं पत्रें वेगवेगळ्या भाषांतील व प्रांतांतील असतात, आकर्षक दिसतात व पहावें तें वाचावेंसेंच वाटतें. त्या वाचनांत वेळ हा हा म्हणतां निघून जातो व डोक्यांत स्वतःस उपयुक्त अशा ज्ञानाची पुंजी फारच कमी सांठते.

शिवाय असें कीं संपादकाचा काल परिमित आहे. त्याला तेवढ्या काळांत विविध कामें उरकावयाचीं असतात. स्वतःच्या पत्रात ज्यावर लिहावयाचें तो विषय शोधून घेण्याकरितां संपादक इतर वृत्तपत्रें मुख्यतः वाचतो. सदर विषय सांपडला कीं त्याचें बरेंचसें काम झालें. नंतर त्या विषयाच्या पूर्ततेसाठीं विशिष्ट रिपोर्ट, मासिकें व पुस्तकें वाचणें जरूर होतें. हें सर्व त्याला मोजक्या काळांत करावयाचें असल्यामुळें वर्तमानपत्रें वाचावयाच्या वेळीं तो विषयांची निवड करतो. चाणाक्ष संपादक या धोरणानें वागतात व त्यामुळें त्यांना कामाचा उरक जलद करतां येतो. ते जे विषय लिहिण्याकरितां घेतात त्यांवर इतर वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेली माहिती व विचार याहून अधिक खोल माहिती आणि नवीन

व भरीव विचार वाचकांना निवेदण्याची त्यांना महत्त्वाकांक्षा असली पाहिजे. म्हणून वृत्तपत्रवाचन आंवरतें घेऊन उद्दिष्ट विषयास परिपोषक अशा पुढील उद्योगास जे संपादक लागतात तेच यशस्वी होतात. त्यांचा लेख इतराच्या लेखाहून उठून दिसतो व मार्गदर्शक ठरतो; पण जे संपादक वृत्तपत्रवाचनांत गुरफटून जातात त्यांचा पाय त्यांतून निघत नाहीं. त्यांच्यापाशीं त्यावरील भरपूर ज्ञान सांठत नाहीं म्हणून त्यांचा लेखहि वाचकांच्या दृष्टीनें अखेरीस शिळा, कंटाळवाणा व रटाळ समजला जाण्याचा फार संभव राहतो.

संपादकाच्या भेटीस कामकाजानिमित्त विभिन्न पेशांचे अनेक लोक प्रत्यहीं येतात. त्यांच्या गरजा संकीर्ण व स्थळेंहि विचित्र असतात. संपादकाला बाह्य जगाचें ज्ञान व माहिती मिळविण्याच्या अनेकविध द्वारांपैकीं हें एक द्वार होय. जो संपादक आपले डोळे व कान उघडे ठेवून वागतो, त्याला मजेदार, विचित्र, नवलपूर्ण पण उपयुक्त ज्ञानकणांचा तोटा कधींच पडत नाहीं. त्यानें आपले कान, डोळे तारतम्यानें उघडले मिटले तर त्याचें डोके फर्माइषी, नवलपूर्ण पण मूल्यवान ज्ञानाचें शोभिवंत दुकान बनल्यावांचून खचीत राहणार नाहीं. यांत तारतम्ययुक्त उघडझांप हें मुख्य सूत्र जाणावें. नाहींपेक्षां त्याचें डोकें दुकानाप्रमाणें न सजलें जातां धर्मशाळेप्रमाणें अव्यवस्थित, गलिच्छ व अस्ताव्यस्त होऊन बिघडेल. संपादकाला भेटावयास येणारे बहुतेक लोक स्वतःवरून संपादकाच्या वेळेची किंमत ठरवून तिची उधळपट्टी करण्याच्या विचारानें समोर खुर्चीवर बसतात. ते कामांत गप्पा व गप्पांत काम मिसळून तोंड हालवितात. हीच संपादकानें चाणाक्षपणा दाखविण्याची वेळ. त्यानें वहात्या झोतांतून काम तेवढेंच बाहेर पडतांच झोत खुबीनें थांबवावा व वर्तणुकीनें पण सभ्यतेनें आलेल्या गृहस्थास निरोप दर्शवावा. असें केलें तरच संपादकाचा वेळ वांचेल व तो स्वतः

वांचेल; नाहींपेक्षां संपादकाची खोली हा गप्पाष्टकांचा अड्डा ठरेल.

संपादकास नित्याच्या संवयीमुळें एखादे दिवशीं कोणी भेटावयास न आल्यास चुकल्यासारखें वाटतें. कारण तो आपल्या खोलींत एरव्हीं एकटा असतो. त्याच्यापुढें टेबल, टेबलावर वर्तमानपत्रें, पत्रव्यवहार व कपाटांत पुस्तकें. शाळामास्तरापुढें मुलें नेहमीं असतात. तो शिकविण्याचा कंटाळा आल्यास विशिष्ट मुलांची कुचेष्टा करून इतरांना हंसवील व स्वतः हंसेल. दुकानदार गिऱ्हाइकापाशीं अन्य विषय काढून मनाला तरतरी आणील किंवा रस्त्यानें जाणारायेणाराकडे पाहून त्यांतील एखाद्या सुंदर स्त्रीची किंवा वेडगळ मनुष्याची मूर्ती हृदयांत पकडून ठेवून तिच्याशीं खेळत राहील. पण संपादकाला असा विजेचा पंखा सुरू करून कृत्रिम वाऱ्याची झुळूक घ्यावयास केव्हां केव्हां सांपडत नाहीं. एकच एक विषय वाचून कंटाळा आल्यास तो टेबलावरचें किंवा टेबलाच्या आंतलें पुस्तक काढून अभिप्रायाकरितां तें वाचूं लागेल, किंवा परगांवाहून आलेलीं तक्रारींचीं पत्रें उघडून त्यांतील मजकुरानें परकायाप्रवेशाचें अथवा स्थानांतरांतील नावीन्य अनुभवील. पण कधीं कधीं एखादा दिवस असा उगवतो कीं बरेंचसें वाचून झाल्यावर आणखी कांहीं वाचूं नयेसेंच होतें. डोळे वाचण्याचें नाकारतात. अशा वेळीं कोणी माणूस संपादकास भेटावयास आला असतां त्याच्या वृत्तींतील उत्साह सुप्तावस्थेंतून एकदम उसळून वर चढतो व त्या परक्या गृहस्थाची हकीकत ऐकून घेतघेत तो त्याचें मन चातुर्यानें चांचपतो आणि त्यांतून उत्तेजक तेवढेंच द्रव्य बाहेर काढून आपली तलफ भागवितो. रोजच्या अभ्यासानें संपादक स्वतः इतका जगन्मित्र होऊं शकतो कीं त्याला कोणीहि नवखा माणूस पूर्वपरिचित मित्रासारखा आपलासा करून टाकतां येतो. कुशल गवळी अनोळखी गाई-म्हशींच्या कांसेंत हात घालून दुधाची धार चरवींत सोडतो त्यांतलेंच संपादकाचें हें कसब.

संपादकानें समाजापासून तुटक रहातां कामा नये. तो समाजाचा पुढारी असल्यामुळें समाजाचें अंतरंग त्याला अघळपघळ माहित पाहिजे. समाजहि संपादकास तसेंच समजतो व वागवितोहि. समाजाला आपलें मनोगत प्रकट करावयाचें असतें तेव्हां समाज त्याला बोलावतो व त्याच्या मुखानें तें वदवितो. अर्थात् या जाहीर भाषणांच्या प्रसंगाकरितां संपादकाला वक्तृत्व लागतें. वर्तमानपत्रांत लिहिणाऱ्या व जाहीर सभांत बोलणाऱ्या संपादकाची उपयुक्तता दुप्पट वाढते आणि त्याला बहुजन समाजाचा पाठिंबा मिळून त्याचें पुढारीपण प्रभावशाली व सामर्थ्यवान बनतें. वर्तमानपत्रांत लिहिणारा संपादक जनतेला दूरचा वाटतो, पण तोच त्यांजमध्यें बसून उठून म्हणजे दुःखें समजून घेऊन बोलला, हिंडला म्हणजे जनतेला त्याजविषयीं खरें ममत्व व अभिमान उत्पन्न होतो. हिंदी समाजहि आतां कालानुरूप वागण्यांत तरबेज होत चालला असून स्वहित साधण्याचे सर्व रस्ते तो चोखाळून पहाण्यास शिकत आहे. जाहीर सभा हें एकच स्थान संपादकास समाजांत मिसळण्यास पूर्वीं उपलब्ध असलें तर आतां त्याच्या भरीला अल्पोपहार, मेजवान्या, उद्‌घाटन समारंभ, चर्चामंडळें, व्यायामशाळा, जलसे, उत्सव, वाढदिवस इत्यादि कितीतरी नवीन स्थानें निर्माण झालीं आहेत. तीं सर्व समाजांत प्रवेश करण्याची द्वारें असून आपलें नियत काम संभाळून संपादक त्या द्वारांतून बाकीच्या वेळांत समाजांत शिरत राहिल्यास त्याच्या लेखनांत जिवंतपणाचे व सत्यतेचे नवे झरे मिसळूं लागतात.

संपादकाला सुट्या क्वचित्, व त्या असल्या तरी आपलें स्थळ सोडून बाहेर पडण्याइतक्या पुरेशा नसतात; व त्याचा लेखनव्यवसाय अगदींच एकलकोंडा. त्याची लेखणी दौतींतील शाई संपवितें तेव्हां त्याचा मेंदूहि क्षणाक्षणानें शरीरांतून जीवनांतील माधुरी आटवीत आणतो. तिचा रिता पडणारा संचय अबाधित राखण्याचा जर एखादा सीधा मार्ग असेल तर तो संपादकाच्या कचेरीबाहेरचा अफाट समाज. समाज हा रससिंधु आहे.

ज्याच्या जवळचा कलश रिकामा होत वारंवार कोरडा पडण्याची भीति असेल त्यानें वरीलप्रमाणें स्त्रीपुरुष, बालबालिका, वृद्धतरुण यांच्या संमर्दांत खुल्या दिलानें अवगाहन करून आपलें भांडें सांडेपर्यंत भरून घ्यावें. संपादक समाजांत निमज्जन करून आपल्या व्यवसायाकडे परत आला कीं होमांत तुपाची धार सोडावी त्याप्रमाणें ताज्या तरतरीनें व उल्हासानें त्याचें कार्य प्रज्वलित होतें. दुसरें असें कीं वाचन हें एकलेंच ज्ञानसाधन नव्हे. जग त्याहून कितीतरी अफाट व अपरंपार ज्ञानसाधन असून त्याला आळविणारा संपादक अधिक ज्ञानसंपन्न व त्याचे लेख अधिक वाचनीय ठरल्याशिवाय रहात नाहींत.

संपादकाला कष्ट फार. त्याच्या कामाच्या वेळा अनियमित. सरकारी कचेरींतील नोकराप्रमाणें त्याच्या कामाचे तास ठरलेले नसतात. आधीं काम उरकून उरेल त्या वेळांत विश्रांति. अशा स्थितीमुळें झोंप, भूक, रात्र, दिवस, सणवार याविषयीं फिकीर न बाळगतां त्याला कामाशीं गांठ घालावी लागते. कित्येक वेळां संपादक तासन् तास आपल्या मेजाशीं बसून रहातो. एकएका दिवशीं त्याला आठ, दहा तासहि काम पडतें. तो दिवसाचें काम आटोपून रात्रींहि कामावर येतो. त्याला कामाचा जसा कंटाळा असतां नये, तसा जाग्रणाचाहि असतां नये. त्याचीं सर्व कामेंहि मनोरंजक नसतात. लेखन हें त्याचें जीवन असल्यामुळें त्यावर त्याचें प्रेम पाहिजेच. गवयाला गायनाचें सुख वाटतें तितकें संपादकाला लेखनाचें सुख वाटलें पाहिजे. त्या सुखापुढें क्लेशांचा विसरच पडावा. पण लेखनांतहि कांहीं विषय त्रासदायक असतात. तरी त्यांतून त्याला पार पडावेंच लागतें. या लेखनकार्याबरोबरच इतर जीं कार्यें येतात त्यांपैकींच मुद्रितवाचन हें खडतर कार्य होय. आपल्या लेखाचें मुद्रितवाचन आपला चेहेरा आरशांत पहाण्याइतकेंच आकर्षक असलें तरी दुसऱ्यांच्या कसल्याहि मजकुरांचीं मुद्रितें वाचणें

म्हणजे मजूरदारी. पण तीहि पत्र कितीहि श्रेष्ठ व संपादक केवढाहि मोठा असला तरी त्यावर पडते व तें काम त्याला फार काळजीपूर्वक करावें लागतें. म्हणून संपादक कष्टाळू व सहनशील पाहिजे.

संपादकापुढें कित्येक प्रसंगीं प्रश्नहि बिकट उभे राहतात. ते आले असता त्याला आपला निर्णय आस्ति अगर नास्ति पक्षीं दिल्यावांचून चालत नाहीं. त्याच्या वाचक वर्गांत दोनहि मतांचे लोक संभवतात. विशिष्ट प्रश्नावर संपादकानें निर्णय दिल्यास एका वर्गाचें मन दुखावल्या-शिवाय रहावयाचें नाहीं. या अडचणी सामाजिक व धार्मिक विषयांत इकडे प्रामुख्यानें उद्भवतात. त्यावेळीं संपादक मुग्ध राहिला किंवा त्यानें दोनहि डगरीवर हात ठेवले तर मार्गदर्शनाचें खरें कर्तव्य त्यानें न बजा-वल्यामुळें त्याचें व त्याच्या पत्राचें वजन कमी होतें. ठाम मत दिलें तर विरुद्ध पक्षाच्या शिव्या मिळतात. पण मूग गिळण्यापेक्षां शिव्या खाणेंच अशा वेळीं परिणामाच्या दृष्टीनें श्रेयस्कर. कारण हा शिव्यांचा मार्ग धैर्याचा असल्यामुळें बाह्यतः शिव्या देणारे लोक शेवटीं मनांतून संपाद-काची तारीफच करतात. म्हणून मनोधैर्य हा संपादकाचा श्रेष्ठ गुण समजला जातो. शिव्या व स्तुति हीं संपादकाच्या पांचवीलाच पूजिलेलीं असतात. त्याच्याकडे येणाऱ्या टपालांत हे दोनहि प्रकारचे आहेर त्याला नित्य पोंचतात. संपादक मूळचा हळुवार मनाचा असला तरी ‘ सौभा-ग्यवती व गंगा भागीरथी ’ या रोजच्या आशीर्वादानें तो अंगावरच्या माशा वाराव्या त्याप्रमाणें तीं दोनहि अचल मनानें वारतो व रात्रीचा बिनघोरपणानें झोंपीं जातो.

‘ दुनिया झुकती है ’ हें संपादकाला जितकें जाणवतें तितकें इतरांना क्वचितच जाणवत असेल. म्हणून तो तत्त्वज्ञाप्रमाणें जगांत वावरावयास शिकतो. त्याच्यापुढें येणाऱ्या विषयावर लिहितांना हर्ष, शोक, भय, क्रोध, त्वेष, तिरस्कार इत्यादि मनोभावना त्याचे ठिकाणीं

उसळल्याच पाहिजेत. त्या न उसळल्या तर संपादक हृदयशून्य ठरेल व त्याचे लेख निर्जीव निघून कोणी हातींहि धरणार नाहीं. प्रसंगपरत्वें बहुजन समाजांत ज्या वृत्ति उचंबळतात त्या संपादकांत उचंबळाव्या, किंबहुना सामान्य लोकांहून त्याचें प्रमाण अधिकहि असावें. म्हणजे वाचकांना असाधारण आनंदाचा आस्वाद घ्यावयास मिळतो. पण एकदां एक विषय संपादकाच्या लेखणींतून निघून गेला कीं त्याचें डोकें व मन हीं आगगाडीच्या डब्याप्रमाणें रिकामीं होऊन नवीन विषयांना जागा करून देतात. नित्याच्या या संवयीमुळें तो कोणताहि प्रसंग मनाला लावून घेत नाहीं. विशिष्ट विषयावर लिहीत असतां त्याच्याशीं तन्मय व्हावें व तो लिहून झाला कीं मन निर्विकार बनावें. कांहीं अंशीं संपादक व नट हे उभयता सारखेच. नट एका नाटकांत शोकरसाचे पूर वाहवितो व दुसऱ्या नाटकांत हास्याच्या लहरी उठवितो. संपादकाची वृत्तीहि अशीच बनते.

संपादकाहून विद्वान् व देशाभिमानी माणसें समाजांत आढळतात. त्यांपैकीं कित्येक जण संपादकाला आपल्याहून मनांतून कमी लेखतात पण त्यांची कदर संपादकानें बाळगावयाची नसते. त्याचा व्यवसायच असा कीं तो स्वतःला सर्वज्ञ समजल्याशिवाय त्याच्या हातून धडपणानें पार पडावयाचा नाहीं. येईल त्या विषयावर त्यानें आपल्या समजुतीप्रमाणें लिहिलेंच पाहिजे; मग त्याचें ज्ञान इतरांहून कमी असो कीं कोणाचा त्याजवर राग होवो. नुसते विद्वान् व नुसते देशभक्त यांजपेक्षां संपादकाचा अधिकार श्रेष्ठ प्रतीचा; कारण विद्वान् मनुष्यांतील एकदेशियत्वाचा दोष संपादकाच्या अष्टपैलूपणांत टिकत नाहीं व देशभक्ताच्या ध्येयवादित्वांतील आंधळेपणास संपादकाच्या काटेकोरपणांत थारा मिळत नाहीं. या दृष्टीनें समाजास मार्ग दर्शविण्याची पात्रता केवळ विद्वान् व केवळ देशभक्त यांजपेक्षां संपादकाच्या अंगींच वसत असल्यामुळें संपादकास या दोघांपुढेंहि डरण्याचें कारण नसतें. तथापि केवळ विद्वत्ता व केवळ स्वार्थ-

त्याग यावर ज्यांची भिस्त ते आपणांस कसे हिणवितात याचा अनुभव संपादकास त्याच्या आयुष्यक्रमांत वारंवार आल्यावांचून रहात नाहीं. कित्येक लोक खऱ्या अर्थानें विद्वान् नसले तरी पुष्कळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यावरून स्वतःस फार विद्वान् समजतात व संपादकास तुच्छ लेखतात. अशांच्या मानसिक समाधानाच्या आड येण्याचें संपादकाला प्रयोजन नाहीं. मात्र ते आपल्या विद्वत्तेचा टेंभा वेळीं अवेळीं मिरवून संपादकास दाबांत ठेवूं पहातील तर ती जबरदस्ती संपादक चालू देणार नाहीं. इकडील संपादकांना आपलें आयुष्य एकंदरींत गरिबींतच काढावें लागतें. शेंकड्यांनीं ज्यांचा पगार मोजतां येईल असे संपादक अगदीं थोडे. बाकीच्यांची प्राप्ति शंभराच्या आंत. ही मुख्य संपादकांची स्थिति मग बातमीदार व बाहेरचे लेखक यांजविषयीं बोलावयासच नको. इंग्लंडच्या संपादक वर्गाशीं त्यांची तुलनाच शोभणार नाहीं. तिकडे बाहेरच्या लेखकानें ७००-७५० शब्दांची एक वृत्तकथा ( न्यूज स्टोरी ) सुंदर लिहून दिली कीं त्याला तीन गिनी म्हणजे ४०–४२ रुपये सहज मिळतात. टेलिफोनवरून चोरी, आग, यांच्या बातम्या दिल्यास त्यांची किंमत ७–७॥ रुपये. लंडनांत नॅशनल युनियन ऑफ जर्नॅलिस्ट नांवाची एक संस्था असून प्रत्येक बातमीदार तिचा बहुधा सभासद असतोच. तिच्या नियमाप्रमाणें लंडनमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्राच्या बातमीदाराला आठवड्याला ८ गिनी म्हणजे दरमहा ४५० रुपयापेक्षां कमी पगार देतांच येत नाहीं. वर्तमानपत्राचे संपादक वारंवार बदलतात. एकच मनुष्य एका पत्रावर पांच दहा वर्षांपेक्षां जास्ती दिवस रहात नाहीं मनुष्यें वारंवार बदलल्यामुळें पत्राचा जोम कायम रहातो. पण हिंदुस्थानाची आर्थिक स्थिति अत्यंत प्रतिकूल असल्यानें इकडील संपादकांना वरील नियम लागू पडण्यासारखा नाहीं. कारण आर्थिकदृष्ट्या समाधानकारक स्थितींतील वर्तमानपत्रेंच इकडे थोडीं आहेत.

---

# प्रकरण आठवें

# संपादकाची कचेरी

पाश्चिमात्य देशांत वर्तमानपत्रांच्या कचेरीचा जितका व्याप वाढला आहे तितका हिंदुस्थानांतील देशी वर्तमानपत्रांच्या कचेरीचा जरी वाढला नसला तरी पाश्चिमात्यांच्या धर्तीवरच हिंदी वर्तमानपत्रें चाललीं असल्यामुळें तिकडील वर्तमानपत्रांच्या संपादकीय व्यवस्थेचा प्रकृत स्थळीं प्रामुख्यानें विचार केला आहे व तदनुषंगानें इकडील व्यवस्थेची जरूर तितकी माहिती दिली आहे.

पाश्चिमात्य राष्ट्रांत सांप्रत साप्ताहिक किंवा अर्धसाप्ताहिक पत्रांपेक्षां दैनिक पत्रांचें माहात्म्य अधिक आहे. याचें कारण असें कीं मतप्रसाराचें काम दैनिक पत्रें इतर पत्रांपेक्षां फार त्वरित करतात. त्यांच्याकडील दैनिक पत्रांचा संपादक वर्ग फार मोठा असून प्रत्येक संपादक आपल्या कामांत निष्णात असतो. मात्र हें वर्णन लंडन, पॅरिस, बर्लिन, न्यूयॉर्क या शहरांनाच लागू पडतें. लहान शहरांतील पत्रें इतक्या दर्जाचीं नसतात व त्यांचा खपहि कमी असतो. या कारणानें त्यांच्या संपादक वर्गांत कमी माणसें आढळतात. अशीं प्रादेशिक ( प्रॉव्हिन्शियल ) पत्रें नवीन व होतकरू लेखकास वृत्तपत्रव्यवसायांत प्राविण्य मिळविण्याचीं सोयीस्कर क्षेत्रें समजलीं जातात. लेखकानें प्रथम तेथें नांव कमवावें व मग राजधानीच्या शहरीं येऊन मोठ्या पत्रांत काम करावें. या पद्धतीनें गेल्यामुळें ज्यांना मोठ्या पत्रांचें मुख्य संपादकत्व लाभलें अशांचीं उदाहरणें तिकडे अनेक आहेत. लंडनमधील प्रमुख दैनिक पत्र घेतलें तर त्याच्या संपादक

वर्गीत पुढील हुद्यांचीं माणसें आढळतात. १ मुख्य संपादक २ व्यवस्थापक संपादक (Managing Editor) किंवा उपसंपादक (Asstt. Editor) ३ रात्र संपादक ४ परराष्ट्रीय संपादक ५ साहित्य संपादक ६ कला संपादक ७ स्त्री विभाग संपादक (ही बहुधा स्त्री असते) ८ दिवस पाळीचा वार्ता संपादक ९ रात्र पाळीचा वार्ता संपादक १० क्रीडा संपादक ११ शर्यत संपादक १२ नगर संपादक १३ चित्रपट संपादक १४ कूट संपादक (Cross word puzzle Editor) १५ तार संपादक अित्यादि. दैनिक पत्रांच्या आवृत्त्या दोन किंवा तीनहि निघतात; पण निदान सकाळची व सायंकाळची आवृत्ति ठेवलेलीच. या दोन आवृत्त्या प्रत्येक दैनिक काढतेंच. त्याहून जास्ती आवृत्त्यांत कांहीं ताज्या बातम्यांशिवाय इतर फरक असत नाहीं. दैनिक पत्रांची कचेरी सकाळीं ११वाजतां उघडते. त्यावेळीं मुख्य संपादक कचेरीस येण्यापूर्वी त्यानें त्या दिवशीं प्रसिद्ध झालेला आपल्या पत्राचा अंक समग्र वाचलेला असतो. खेरीज आपल्या पत्राबरोबर निघालेलीं इतर पत्रेंहि वाचून त्यांतील मुख्य मजकुराच्या आणलेल्या चकत्या त्याच्यापाशीं असतात. मुख्य संपादकाच्या मेजावर पत्रव्यवहाराचा भारा त्याची वाट पहातो. आपल्या खोलींत खुर्चीवर बसल्यानंतर त्याचें पहिलें काम पत्रव्यवहार वाचण्याचें. तीं सर्व पत्रें वाचून झाल्यावर तो संपादकांची सभा बोलावतो. त्या सभेस व्यवस्थापक-संपादक अगर मदत संपादक, कला संपादक, परराष्ट्र संपादक, दिवस पाळीचा वार्ता संपादक व अग्रलेख लिहिणारे संपादक येतात. त्यांजबरोबर सकाळीं निघालेल्या अंकाच्या गुणदोषांची चर्चा व पत्राच्या धोरणाचा खल होतो आणि अग्रलेखाचा विषय निवडण्यांत येतो. पत्र म्हटलें कीं त्याच्यापाशीं कांहीं खूळ किंवा बंड (Stunt) म्हणून पाहिजेच. दररोज देशांत कोठेंना कोठें कांहीं विलक्षण वृत्त घडतेंच. त्याची चातुर्यानें गोष्ट रचली म्हणजे लोक तीं आ वासून वाचतात. घडलेले प्रसंग शब्दरूपानें देण्या-

पेक्षां चित्रांनींहि ते रेखाटले तर वाचकांना अधिक प्रिय होतात. व्यंग्यचित्रें हीं यांपैकींच एक तऱ्हा म्हणून त्या दोहोंची चर्चा याच सभेंत करतात.

मुख्य संपादकाचें लक्ष पत्राच्या खपावर अवश्य पाहिजे. त्यासंबंधीं कांहीं नवलविशेष समजून घ्यावयाचें असेल तर तो प्रकाशकास भेटतो व एकंदर रंग पाहून त्या दिवशीं पत्राच्या काढावयाच्या आवृत्त्यांचाहि अंदाज बांधतो. वर्तमानपत्राच्या कचेरीच्या मुख्य शाखा दोन. एक संपादकांची कचेरी व दुसरी व्यवस्थापकाची (मॅनेजर) कचेरी. अंक रवाना करणें, पत्ते बदलणें, अंक बंद अगर सुरू करणें, वर्गणी गोळा करणें, जाहिराती मिळविणें व जाहिरातींचे पैसे वसूल करणें हीं सर्व कामें व्यवस्थापकाच्या कचेरींतून होतात; म्हणून संपादकाला त्याजबरोबर संबंध राखावा लागतो. जाहिराती व मजकूर यांचा वर्तमानपत्राच्या कचेरींतील लढा नित्याचा. जाहिराती पत्राला भरपूर मिळण्याचा आनंद संपादक व व्यवस्थापक कचेरी यांना सारखाच. पण व्यवस्थापक कचेरीचें कार्य जाहिराती मिळविणें हेंच असल्यामुळें मजकुराकरितां तोडून दिलेली जागा एखादे वेळीं जाहिरातींनींहि बळकाविण्याचा संभव येतो. अशा बाबतींत मजकुराच्या हक्काकरितां संपादकाला जाहिरात-व्यवस्थापकाशींहि बोलावें लागतेंच. पत्राच्या मुद्रणखात्यांत मुद्रक ( Printer ) व यंत्रज्ञ हे जबाबदार अधिकारी असतात. पत्र वेळच्या वेळीं काढण्याची जबाबदारी मुद्रकावर व त्याकरितां मुद्रणयंत्र व इतर साहित्य तयार ठेवण्याची जबाबदारी यंत्रज्ञावर. यासाठीं पत्र वेळेवर निघण्यास कांहीं अडचणी येत असल्यास त्या संपादक हा मुद्रक व यंत्रज्ञ (Chief of the Mechanical Department) यांजपासून समजून घेतो.

वर्तमानपत्राच्या संपादकांत रात्र पाळीचे व दिवस पाळीचे अशा दोनहि प्रकारच्या जोड्या असतात. दिवस पाळीच्या संपादकांशीं अंकाची

चर्चा करण्याकरितां मुख्य संपादक त्यांची सभा सायंकाळीं ४ वाजतां बोलावितो. त्या सभेस मुख्य उपसंपादक, रात्र संपादक व रात्रपाळीचा वार्ता-संपादक हे येतात. त्यांना दोन प्रहरच्या सभेंत ठरलेली व्यवस्था तो सांगतो व मग रात्रीच्या कामाची व्यवस्था त्यांच्या विचारानें लावतो.

पत्राच्या या अन्तर्गत व्यवस्थेशिवाय मुख्य संपादकाला इतर अनेक हडदीं संभाळावयाचीं असतात. पत्रांत ज्यांना आपला मजकूर कोणत्याना कोणत्या रूपानें यावयाची गरज भासते असे लोक संपादकाच्या भेटीस येतात. त्यांच्या भेटी घेऊनसमाधान करणें व मुद्रितें पहाणें यांत त्याचा कांहीं वेळ जातो. मुख्य संपादक सगळीं मुद्रितें पहात नसला तरी त्यांतील सर्व मजकुरावरून डोळा फिरवितोच. पण संपादकीय लेख या सारख्या महत्त्वाच्या मजकुराची मुद्रितें तो काळजीपूर्वक वाचतो. इतकें जपत असतांहि वर्तमानपत्राच्या अवाढव्य कारभारांत कोठेंना कोठें चूक रहाते व अंगलट येणारा मजकूरहि छापून जातो. असला मजकूर छापून गेला म्हणजे ज्यास तो मजकूर आपली अब्रूनुकसानी करणारा वाटत असेल तो ओरडत उठतो व खटलाहि भरतो. एखादा दुसरा खटला प्रमुख समजल्या जाणाऱ्या पाश्चिमात्य देशांतील पत्राच्या डोक्यावर लटकत असतोच; किंबहुना त्यांत पत्राचा संपादक भूषणहि मानतो. अथवा पत्र लोकांच्या नजरेपुढें सतत राहून त्याचा खप वाढण्या-करितां असलें क्टिाळ पत्रकर्त्याला वारंवार उत्पन्न करावेंहि लागतें कारण तसें कांहीं प्रकरण चालत असलें तरच वाचकांना पत्रांत लज्जत वाटते. असो. असा खटला होणार असल्यास त्या बाबतींत कायदेपडिताचा सल्ला संपादक घेतो.

अशा रीतीनें सारा दिवस कामांत घालवून संपादक सकाळीं निजून उठला कीं त्याला चाळा उजाडत हातांत पडलेलें आपलें पत्र वाचण्याचा व त्यांतील मजकूर त्याच वेळीं प्रसिद्ध झालेल्या इतर पत्रांमधील मजकुराशीं

ताडून पहाण्याचा. मुख्य संपादक आपलें पत्र फक्कड निघालें असें तोंडानें कधींहि म्हणावयाचा नाहीं. त्याची आकांक्षा त्याहूनहि तें अधिक चांगलें निघावें अशीच असल्यानें, त्याची कुरकुर दररोज सुरूच. माझ्या पत्रांत अमूक गोष्ट चांगली असतां ती आली नाहीं, पण प्रतिस्पर्धी पत्रांत मात्र आली, असे दोष तो रोज दाखवावयाचाच. मुख्य संपादक स्वतः एक टांकहि ओढीत नाहीं. तो नसला तरी पत्र चालेल, कोणाचेंहि अडणार नाहीं. किंबहुना ज्याच्यावांचून अडत नाहीं असा तोच काय तो मनुष्य. पण त्याचा मुख्य गुण हा कीं तो म्हणजे पत्राची स्फूर्ति व पत्राचें वैशिष्ट्य. त्याच्या अभावीं पत्र रद्दड बनेल व त्याला महत्त्व रोजनिशींतील नोंदीहून अधिक रहाणार नाहीं आणि पत्राचा प्राण निघून जाईल. मुख्य संपादक स्वतः एक ओळहि लिहीत नसला तरी त्याच्या अंगीं लेखनकौशल्य नसतें असें मात्र कोणी समजूं नये. किंबहुना वर्तमानपत्ररूपी शिडीच्या पहिल्या पायरीपासून सुरुवात करूनच मुख्य संपादकाची शेवटची पायरी तो चढलेला असतो. अर्थात् इतर संपादकांहून तो श्रेष्ठ असल्यामुळेंच पत्रांतील मजकूर आपल्या नजरेखालीं लिहून घेण्याचें त्याला साधतें. यासाठीं लंडनमधील प्रसिद्ध वर्तमानपत्राच्या मुख्य संपादकाला पगार सालीना चार हजार ते पांच हजार पौंडापर्यंत देण्यांत येतो. लंडन शहराबाहेरील इतर शहरांतील मुख्य संपादकाची वार्षिक प्राप्ति एक हजार पौंड असते.

**व्यवस्थापक–संपादक**

मुख्य संपादकाच्या खालचा व्यवस्थापक-संपादक (Managing Editor). वर्तमानपत्राच्या मजकुराचीं वेगवेगळीं खातीं असून त्यावर हा संपादक देखरेख ठेवतो. प्रत्येक खात्यांतील संपादकानें आपल्या खात्यापुरतें पहावें; पण वेगवेगळ्या खात्यांची सांगड घालण्याचें काम व्यवस्थापक संपादकाचें. खात्याखात्यांत वाद उत्पन्न झाल्यास तो यानेंच मिट-

वावा. पत्राची सगळी अन्तर्गत जबाबदारी त्याच्यावर. प्रत्येक खात्यांतील संपादकाची नेमणूक त्यानेंच करावी. संपादक वर्गाकरितां करावयाच्या खर्चाचा आंकडा त्यानेंच ठरवावा, पत्राचें धोरण त्यानेंच मुक्रर करावें व इतर संपादकांना हवी असलेली माहिती त्यानेंच सांगावी. इतर संपादकांनाहि पत्राकरितां कांहीं मर्यादेपर्यंत खर्च करण्याचा अधिकार असतो. पण या गोष्टी अनुभवाशिवाय समजत नाहींत. व्यवस्थापक संपादकासहि मजकूर लिहावा लागत नाहीं.

**नगर संपादक**

नगर संपादक ( City Editor ) याचें दैनिक पत्रांत विशिष्ट स्थान आहे. दैनिक पत्रांकडे परगांवच्या बातम्या त्यासाठीं स्थापन झालेल्या मंडळ्यांमार्फत व पत्र-व्यवहारानें येतात. पण ज्या शहरांत तें निघतें त्यांतील बातम्या देणारी मंडळी नसते. ती व्यवस्था पत्रालाच करावी लागत असल्यानें सदर कामगिरी नगर संपादकाकडे येते. नगर संपादक स्वतः बातम्या धुंडाळण्याकरितां बाहेर पडत नाहीं. त्याला बातम्या दोन मार्गांनीं पोंचतात. पत्रानें स्वतःचे बातमीदार नेमलेले असून ते शहरांत त्यांच्या वासावर हिंडून बातम्या जमवितात. त्याशिवाय दुसरा वर्ग आपण होऊन बातम्या सांगणारांचा. अर्थात् हें काम करणारे ठराविक लोक नसतात. कोणती बातमी कोणाला कशी लागेल हें नक्की कसें समजावें ? यासाठीं नगर संपादक शहरांतील जितक्या भिन्नभिन्न अड्ड्यांवरील व क्षेत्रांमधील लोकांना आपलेसे करून ठेवील तितकें थोडेंच. म्हणून तो सर्व लोकांशीं संबंध जोडतो व ते बातम्या पुरवतील असें वळण पाडतो. हें कार्य मनमिळाऊपणा, दाक्षिण्य व उरक या गुणांच्या जोरावर तो करतो. कोणी बातमी दिली तरी ती टिपून घेतांना तो तारतम्य व बिनचूकपणा यांवर तोलून मापून व घांसून पुसूनच ती स्वीकारतो.

शहर म्हटलें कीं त्यांत नित्य नवें कांहींतरी घडावयाचेंच. आज

जो समारंभ किंवा वृत्त घडलें त्याची हकीकत दुसऱ्या दिवशीं पत्रांत झटकून आलीच पाहिजे. म्हणून नगर संपादक आपल्या वहींत (Assignment Book) पुढील चार आठ दिवसांतील किंबहुना महिना पंधरा दिवसांतीलहि कार्यांचीं टिपणें करून ठेवतो. त्यांत परिषदा, संमेलनें, सभा, वनभोजनें, खटले, कमिशनापुढील साक्षी, व्याख्यानें, बड्या लोकांचें आगमन इत्यादिकांचा समावेश होतो व तें सर्व संधान लक्षांत बाळगून त्या त्या कामावर माणसांची योजना तो आगाऊ करतो. उदाहरणार्थ एखादा प्रसिद्ध व्याख्याता शहरांत ठरलेल्या दिवशीं यावयाचा आहे तर तो येण्यापूर्वीं त्याचा फोटो मागविणें, त्याच्या मुलाखतीसाठीं स्टेशनावर आपला बातमीदार पाठविणें, जरुरीप्रमाणें शें-पन्नास मैल आगाऊच बातमीदाराची रवानगी करून मुलाखत घेवविणें याविषयीं तो दक्षता बाळगतो. हें सर्व झटपट उरकावयास पाहिजे असल्या-मुळें नगर संपादकाच्या हाताखालीं एखादा फोटोग्राफर, चित्रकार (artist) व व्यंग्यचित्रकारहि देण्यांत येतो. एकंदर पत्रांतील मजकुराच्या मांडणींत बातम्यांकरितां कमीअधिक राखून ठेवलेल्या जागेमध्यें आपल्या बातम्या बसवून दिल्या म्हणजे नगर संपादकाचें त्या दिवसाचें काम संपलें.

**तार संपादक**

नगर संपादकानें आपल्या शहरांतील बातम्यांची जुळवाजुळव केल्या-नंतर बाहेरून तारेनें आलेल्या बातम्या घेण्याचें काम उरतें. तें काम तार संपादक (Telegraph Editor) करतो. तारेनें आलेला मजकूर त्यानें घ्यावा. टपालानें येणाऱ्या बातम्याहि तोच काढतो. रूटर, असो-सिएटेड प्रेस या सारख्या मंडळ्यांचे गुमास्ते व प्रतिनिधी सर्व जगभर असतात. त्यांच्या कचेऱ्या लंडन, बर्लिन, पॅरिस, मुंबई, न्यूयॉर्क, टोकियो, कलकत्ता इत्यादि मुख्य शहरीं असून त्यांजकडे तारेनें ३०-४० स्तंभ इतका मजकूर येतो व तो आल्यावर कचेरींतील गुमास्ते

सदर मजकूर शहरांत त्यांजकडे नोंदविलेल्या सर्व पत्रांकडे पाठवितात. पाश्चिमात्य देशांतील पत्रें फार मोठीं असूनहि त्यांना वीस स्तंभां-पेक्षां अधिक जागा तारांकडे देतां येत नाहीं. यासाठीं तार संपाद-काला आलेल्या तीस चाळीस स्तंभ तारांतून २० स्तंभ भरतील इतक्याच तारांची निवड करावी लागते. ती करून बातम्यांना ठळक व चित्तवेधक मथळे घालणें, एखादी बातमी छोटी पण महत्त्वाची असल्यास ती फुलवून खुलवून देणें हें सगळें यानेंच करावयाचें. मंडळ्यांमार्फत यावयाच्या या बातम्या. त्याशिवाय प्रत्येक दैनिक पत्राची स्वतःची म्हणून तारा मागविण्याची विशेष तजवीज ( Special Service ) असते व गांवोगांवच्याहि बातमीदाराकडून तारा येतात; त्या सर्वांची जुळणी तार संपादकच करतो.

बाजार संपादक व अर्थ संपादक ( Finance Editor ) हेहि कित्येक वर्तमानपत्रांस लागतात. बाजार संपादकानें शहरांतील बाजारभाव दुकानदार व व्यापारी यांजपासून मिळवावा आणि अर्थ संपादकानें पेढ्या ( बँका ), कारखाने यांच्या चालकांशीं संबंध ठेवून त्यांची चालू स्थिति समजून घ्यावी. पत्राच्या ग्राहकांत गांवोगांवचे दुकानदार, सावकार, सराफ, व्यापारी, कारखानदार हे लोक असल्यामुळें त्यांना वर्तमानपत्रांत या विषयावर आलेल्या माहितीचा व लेखांचा उपयोग फार होतो.

**चित्रगुप्त संपादक**

वर्तमानपत्रकार हा कांहींसा भिक्षुकासारखाहि आहे. त्याला शुभा-शुभाचा विधिनिषेध नाहीं. मंगलकार्याच्या वेळीं टाळी वाजविण्यास त्याचे हात तयार असतात तसे अशुभप्रसंगीं इतरांबरोबर शोकहि करण्यास त्यानें सिद्ध असावें लागतें. किंबहुना अशुभप्रसंगाच्या शोकाची जुळवाजुळव तो कित्येक महिने आगाऊ करून ठेवतो. कोणता प्रसिद्ध मनुष्य केव्हां मरेल याचा नेम नसतो. म्हणून बहुतेक मोठ्या लोकांच्या आयुष्यांतलि

ठळक माहिती पत्रकर्त्यांच्या संग्रहीं असते. त्यांतल्या त्यांत वृद्धावस्थेस पोंचलेल्यांची कच्ची हकीकत फार दक्षतेनें टिपून ठेवण्यांत येते. हें काम करणारास चित्रगुप्त ( Morgue ) म्हणतात. त्याच्या संग्रहीं असल्या व्यक्तींसंबंधीं प्रसिद्ध झालेल्या मजकुराचे कातरे, पुस्तकें व मासिकें यांचे अंक असतात. खेरीज प्रसिद्ध व्यक्तींच्या ठळक वृत्तांतांचीं टांचणें ज्यांत आहेत अशीं ( " who's who " ) पुस्तकें छापण्यांत येतात, त्यांतूनहि कांहीं माहिती आयत्या वेळीं मिळूं शकते. चित्रगुप्त संपादक आपल्यापाशीं ठळक लोकांच्या चित्रांचे ठोकळे (फोटो ब्लॉक) बाळगतो. अशा रीतीनें प्रसंग प्राप्त झाला कीं चित्र व चरित्र छापून आज मेलेल्या मनुष्याच्या माहितीनें भरलेला अंक दुसऱ्या दिवशीं वाचकांच्या हातीं पडतो.

**साहित्य संपादक**

वर्तमानपत्राकडे छापलेलीं पुस्तकें अभिप्रायाकरितां पाठविण्याची चाल आहे. ही एक जाहिरात देण्याची प्रतिष्ठित तऱ्हाच समजण्यास हरकत नाहीं. जाहिरातीला हंशील पडतें आणि अभिप्रायाला तें मुळींच पडत नाहीं. इतकेंच नव्हे तर कधीं कधीं अभिप्राय अर्धा रकाना किंवा त्याहूनहि जास्ती लांबीचा येऊन पुस्तकांतील मजकुराची माहिती विस्तारानें व गुणज्ञतेनें दिली असल्यामुळें जाहिरातींपेक्षां अभिप्रायापासून ग्रंथलेखक अगर प्रकाशक यांना किती तरी अधिक फायदा मिळतो व पुस्तकाचें नांव सर्वत्र होऊन पुस्तक चांगलें असल्यास त्याचा खप वाढतो. वर्तमानपत्राच्या कचेरींत इकडे काय किंवा पाश्चिमात्य देशांत काय, अभिप्रायाचें काम नव्या मनुष्याकडे सोंपविण्यात येतें. मात्र त्याकरितां ललित वाङ्मय वाचण्याची ज्यास मनापासून आवड आहे असा पदवीधर तिकडे नेमतात. पुस्तकावरील अभिप्रायास मजकूर या नात्यानें वृत्तपत्र कार्यालयांत कमी समजतात. कारण वर्तमानपत्रांत राजकारण व तद्विषयक इतर बाबी यांचें माहात्म्य विशेष. फार काय पण

वर्तमानसाराचाहि दर्जा पुस्तकपरीक्षण व अभिप्राय यापेक्षां विशिष्ट कारणासाठीं वरचा. वर्तमानपत्रांत ताजेपणा हा मुख्य गुण समजला जात असून त्या दृष्टीनें जें जें वाचकांस उपयुक्त त्याला अग्रस्थान देण्यांत येतें. अभिप्राय केव्हांहि दिला तरी शिळा होणारा नसल्यामुळें त्याला सवडीप्रमाणें स्थळ मिळतें. वर्तमानपत्रांत येणाऱ्या विषयांत मुख्य विषय राजकारण. त्या विषयावर लेख लिहिणाराला इतरांहून आपण श्रेष्ठ आहों असा अहंकार सहजच उत्पन्न होतो. ते स्वतःस राजकारणविशारद व मुत्सद्दी समजत असल्यानें त्यांच्या दृष्टीनें साहित्य संपादक हलका गणला जातो. पत्राकडे अभिप्रायार्थ पुस्तकें इतकीं येतात कीं, त्यांचा परामर्श घेण्यास एकटा साहित्य संपादक पुरा पडत नाहीं. यासाठीं तो आलेलीं पुस्तकें इतर संपादकांची आवड व कल पाहून त्यांजमध्यें वांटून देतो आणि कांहीं स्वतःकडे ठेवितो. कित्येक पुस्तकें शिल्पशास्त्र, रसायन-शास्त्र, ज्योतिषशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र इत्यादिकांवरील असतात. त्यांवर अभिप्राय लिहिण्यास त्या त्या विषयाचा अभ्यास केलेले विद्वान् लोक केव्हांहि अधिक लायक असल्यामुळें साहित्य-संपादक त्यांजकडे पुस्तकें देतो व त्यांच्या सवडीप्रमाणें अभिप्राय घेतो. तसें महत्त्वाचें पुस्तक असल्यास अभिप्रायलेखकाला कांहीं मोबदलाहि मिळतो. पण पुस्तकावर वक्तशीर अभिप्राय लिहून पाठविण्याची विद्वा-नांनाहि संवय लागली नसल्यामुळें विशेष अडचणीशिवाय बाहेर पुस्तकें देण्यास साहित्य संपादक नाखूषच असतो. कादंबऱ्या, नाटकें, काव्य हें वाङ्मय पळपुटें. त्याला वर्तमानपत्राच्या कचेरींतूनहि पळून जाण्यास हव्या तितक्या वांटा फुटतात. म्हणून तीं पुस्तकें संपादकास फार काळजीपूर्वक संभाळावीं लागतात.

हा चोरीचा मामला हिंदुस्थानांतच आहे असें नाहीं. पाश्चिमात्य देशांतहि असलाच अंदाधुंदीचा कारभार चालतो. तिकडील कित्येक

वर्तमानपत्रांचे मालक अभिप्रायासाठीं आलेल्या पुस्तकांवर आपला हक्क सांगतात. ते नवीन पुस्तक दिसलें कीं आधींच लांबवितात किंवा अभिप्राय होईपर्यंत दम धरून मागाहून उचलतात. यास्तव पुस्तक टपालांतून आलें कीं प्रथम नोंदून ठेवावें लागतें. त्यानंतर ज्याकडे दिलें त्याचे नांवावर तें खर्ची टाकण्यांत येतें. इतकी कडक शिस्त राखली तरच पुस्तकें दहांतील नऊ तळावर शिल्लक रहातात. पण ग्रंथसंग्रहालयासारखें वेगळें अंग वर्तमानपत्रास जोडलें नसल्यास अभिप्रायानंतर बहुतेक पुस्तकें पळविलीं जातात. या कारणानें वर्तमानपत्राकडे शेंकडों पुस्तकें फुकट येऊन अखेर संग्रहाच्या नांवानें पूज्यच.

साहित्यसंपादकाकडे अभिप्राय हें एकच खातें नसतें. त्याला साहित्यविषयक लेख लिहून पत्राच्या सौंदर्यात व आकर्षकपणांत भर घालावयाची असते. इकडील साहित्य संपादकाच्या कर्तव्यांत साहित्यावरच काय पण राजकीय, सामाजिक, धार्मिक इत्यादि पडेल त्या विषयांवरहि लिहिण्याची पाळी येते. कारण प्रत्येक खात्याला पूर्णपणें वाहिलेला संपादक ठेवण्याइतकी ऐपत इकडील पत्रांना नसते व तितकें कामहि नसतें. पाश्चिमात्य देशांतील प्रसिद्ध पत्रें ज्या पानावर अग्रलेख यावयाचा त्या पानावरील ठळक स्थळ चांगल्या साहित्यविषयक लेखासाठीं राखून ठेवतात. मग तो लेख साहित्य संपादकानें स्वतः लिहावा, किंवा बाहेरून आलेल्या लेखांतून निवडून काढून पत्राकरितां तयार ठेवावा. सदर पत्रांतून गोष्टी-कथाहि येतात. त्या आलेल्या लेखांमधून पारखून काढण्याचें कामहि साहित्य संपादकाचेंच असतें. याशिवाय स्वतःचे असे मजेदार लेख तो लिहितोच. हें सर्व समाधानकारक रीतीनें साधण्यास साहित्य संपादकाला कादंबऱ्यांची माहिती चांगली पाहिजे. अशा संपादकाला पाश्चिमात्य देशांत आठवड्याला १२ ते २० गिनीपर्यंत पगार मिळतो.

साहित्य संपादकास राजकीयदृष्ट्या मान नसला तरी त्याच्या

साहित्यिकांशीं ओळखी होतात. आपल्या पुस्तकावर अनुकूल व सविस्तर अभिप्राय यावा असें इच्छिणारे साहित्यभक्त त्याच्याशीं स्नेह जोडतात. अभिप्राय अनुकूल आल्यावर त्यास पत्रें लिहून ते त्याच्या लेखन-कौशल्याविषयीं स्तुति करतात. या क्रमानें साहित्यसेवकांत त्याचें एक चहातें मित्रमंडळ बनलें असतां साहित्यसंपादकांत विशेष गुण असल्यास त्यास उत्तेजन व त्याच्या प्रगतीस मदत मिळते. हिंदुस्थानांत संपादकाचा अभिप्राय कशावर मागावा याला नियम नाहीं. पुस्तकेंच काय, पण कोणताहि जिन्नस त्याजकडे अभिप्रायासाठीं येतो. होजियरींत विणलेले स्वदेशी कपडे, नवीन सुरू केलेल्या कारखान्यांतील खण व लुगडीं, खादीच्या शालीं, टकळीवरचें सूत, पितळेचे बैठे दिवे, विळ्या, चाकू, कात्र्या, वस्तरे, शाईच्या पुड्या, दौती, कलमदान, बिस्किटांचे पुडे, सरबतें, सुगंधी तेलें, संगीत चिवडा, एरंडेल, नारूवरील औषध, प्लेगवरच्या गोळ्या, दंतमंजन अशा हरतऱ्हेच्या चिजा त्याजकड येतात व त्या प्रत्येकीवर त्यानें अभिप्राय द्यावा अशी पाठविणारांची अपेक्षा असते. बिस्किटाच्या पुड्यावरचा त्याचा अभिप्राय तात्बडतोब प्रसिद्ध होतो. पण एरंडेलावरील अभिप्रायाला वेळ लागतो. कारण एरंडेल त्यानें स्वतः प्यालें पाहिजे किंवा दुसऱ्या कोणास पाजलें पाहिजे! एकंदरींत साहित्य संपादक ही लोकप्रिय होण्याची जागा असल्यामुळें तिजवर नेमणूक झालेला नवीन संपादक आपणास दैववान् समजेल. कारण एरवीं जो सांदीकोपऱ्यांत पडला असता त्यास संपादकाच्या खुर्चीवर बसून मानमान्यता मिळूं लागली म्हणजे आपण कोणी मोठे गृहस्थ आहों असें त्यास सहजच अभिमानपूर्वक वाटतें.

हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांच्या कचेरींत नवीन दाखल झालेल्या मनुष्यास प्रथम काम, तो विद्यापीठाच्या परीक्षांतून पार पडला असेल त्याकडे कांहींसें पाहून देण्यांत येतें. वृत्तपत्र कचेरीकरितां

परीक्षा अशी ठरलेली नाहीं. तिच्यात कोणाहि मनुष्याचा शिरकाव होतो. पण तो शिरकाव झाल्यानंतर त्याची पुढील प्रगति कांहीं अंशीं त्याच्या गुणावर व कांहीं अंशीं त्यानें दिलेल्या परीक्षांवर अवलंबून रहाते. इतर इंग्रजी व मराठी पत्रांतील बातम्या काढणें, पत्रव्यवहार चाळून त्यांतील बातम्या निवडणें व तारांचीं भाषांतरें करणें हीं कामें नव्या मनुष्याकडे येतात. तसेंच त्याला सभांना हजर राहून त्यांचा वृत्तान्तहि द्यावा लागतो. ही एक प्रकारची उमेदवारीच होय. तिच्यांत त्यानें हुशारी दाखविली म्हणजे त्याला त्याच्या योग्यतेस अनुसरून वरच्या जागांवर नेमण्यांत येतें. तेव्हांच तो संपादकांत गणला जातो. त्यापूर्वी तो बातमीदार या वेगळ्या कोटींत पडतो.

**उपसंपादक**

पाश्चात्य देशांतील उपसंपादक व आपल्या देशांतील उपसंपादक यांच्या कार्यपद्धतींत ढळढळीत असा भेद फारसा नसतो. पण तिकडील उपसंपादकाचें काम विशेष रेखीव, पद्धतशीर व कसोशीचें असतें. उपसंपादक स्वतःचा मजकूर लिहितो व शिवाय खालून लिहून आलेला मजकूर तपासतो. त्याच्याकडे बातमीपत्रें येतात तीं बातमीदारानें स्वतःच्या समजुतीप्रमाणें लिहिलेलीं असतात. पण प्रत्येक पत्राचें धोरण विशिष्ट असल्यानें उपसंपादक त्या बातमीपत्राचें तोंड आपल्यास हवें तसें फिरवितो. त्यास किती जागा द्यावयाची हें ठरवून सदर वृत्तान्तांतील कांहीं भाग तो गाळतो व कांहीं नवीन घालतो. त्यास स्वतःच्या कल्पनांची भर देतो व वृत्तान्तास हेतु नसल्यास तोहि आणितो. हें त्यास बाहेरून आलेल्या मजकुरांतच करावें लागतें असें नाहीं; तर स्वतःच्या पत्राच्या खास बातमीदारांनीं लिहिलेल्या मजकुरांतहि फेरबदल करण्याची जबाबदारी त्याजवर असते. हें स्वरूप केव्हां केव्हां इतकें बदलून जातें कीं, मूळ लेखकाला सदर मजकूर आपला कीं लोकांचा अशी शंका

उत्पन्न होते. कांहीं मजकूर फार दिवस राहून न छापल्यामुळें शिळा वाटतो; पण त्यासाठीं तो गाळूनहि चालत नसेल तर त्यास मथळ्यांतील अदलाबदलीनें ताजा व टवटवीत करण्याचें काम उपसंपादकाच्याच कक्षेंत येतें. मजकूर जसा येईल तसा कधींच छापावयास जात नाहीं. त्यावरून उपसंपादकाचा हात व नजर फिरलीच पाहिजे. यासच संस्करण (editing) म्हणतात. हें कार्य समाधानकारक रीतीनें पार पाडण्यास उपसंपादकाच्या अंगीं कितीतरी गुणांची अपेक्षा असते. त्याला मजकूर व त्याचा लेखक यांजविषयीं सहानुभूति, अंतर्भेदी व उदार दृष्टि आणि सहृदयता असणें जरूर आहे. लेखकाच्या जागीं आपण आहों अशी कल्पना करून त्यानें मजकुरावर निळी पेन्सिल फिरवावी. असें केलें तरच मजकुराचें चीज होतें. त्याचें मन समतोल व व्यवस्थित आणि डोकें शांत असावें. वर्तमानपत्र, त्यांतून दैनिक वर्तमानपत्र म्हटलें कीं तेथें सदा घाई व गर्दी. तशा घाईगर्दींत शांत डोक्याशिवाय बिनचूक काम संभवत नाहीं. दुसऱ्यानें लिहिलेला मजकूर तपासण्यापेक्षां स्वतःचा मजकूर लिहिण्यास वरील गुणांची गरज अधिक. एखाद्या विषयावर लेख लिहिण्यापूर्वी उपसंपादकाला कित्येक प्रसंगीं विचार करण्यासहि फुरसत सांपडत नाहीं. अशा प्रसंगीं उपसंपादकाला प्रकृत विषय ताबडतोब ग्रहण करतां आला पाहिजे व त्यावर योग्य विचार लागलीच सुचले पाहिजेत.

उपसंपादक घाईत असो अगर नसो, तो जेव्हां कांहीं वाचील अगर लिहील तेव्हां कर्तव्यजागृति, न्यायप्रियता, तारतम्य, ग्राहकता, वाचकाशीं समरस होणारी व त्यांचा दृष्टिकोन ओळखणारी कल्पनाशक्ति आणि प्रसंगोपात्त मन निष्ठुर करण्याइतका निग्रह या गुणांनीं त्याला दगा देतां कामा नये. त्यास विस्तृत ज्ञान व उदार शिक्षण यांची साथ असेल तर सोन्याहून पिवळें.

उपसंपादकाचा सारा व्यापार चालू विषय व व्यक्ति याशीं

असल्यामुळें त्यांची बिनचूक माहिती व ओळख उपसंपादकास पाहिजे. त्या व्यक्तींचीं मतें, पक्ष, स्वभाव व पूर्वचरित्र हें माहीत असेल तरच उपसंपादकास त्यांच्या कृत्यासंबंधीं अनुमानें काढणें अगर अनुकूल प्रतिकूल लिहिणें साधेल. इंग्लंडांत लहान शहरांतील वर्तमानपत्राच्या उपसंपादकाकडे 'जातां जातां' ( By the way ), स्फुट सूचना( Notes of the week), स्थानिक चर्चा ( Local topics ), 'काय ऐकलें तें' ( What we hear ), 'लोक काय बोलतात' ( It is said that ), 'हें कळावयाला हवें' ( Wanted to know ) या सदराखालील मजकूर लिहावयाला येतो. खेरीज मुख्य संपादक सांगेल त्याप्रमाणें अग्रलेख व स्फुट विचार लिहिण्याचेंहि काम त्याजकडेच असतें.

उपसंपादकास आवश्यक अशा गुणांची मालिका खालीलप्रमाणें सांगतां येईल.

**आवश्यक गुण व साधनें**

१ तो लिहील तें बिनचूक व जसें घडलें तसें असावें.

२ त्यानें बातम्यांची योग्यायोग्यता व प्रामाण्य ओळखावें. बातम्या शेंकडों येतात; त्यांतली कोणती किती द्यावयाची याची निवड त्यानेंच आपल्या तारतम्यानें करावी.

३ सभेचा वृत्तान्त देतांना महत्त्वाचा भाग पहिल्या परिच्छेदांत घेऊन बाकीचा भाग खालीं असा क्रम ठेवावा.

४ मजकुरास योग्य ते मुख्य व पोट-मथळे देण्याचें चातुर्य त्यास असावें.

५ लिहिणें मोकळें असावें. वाक्यें गुरफटलेलीं नसावीं.

६ चिकित्सकपणा, विस्तृत वाचन व बातम्यावर कावळ्यासारखा डोळा असावा ( Nose for the news ).

७ कथारूप बातम्या विस्तारानें लिहावयाच्या तेव्हां प्रमाणबद्धता, अनुक्रम, ठाकठिकी (balance) व झोक (form) यांवर लक्ष रहावें.

८ निरलसता, चलाखी (alertness), निर्णयात्मकता पाहिजे.

९ लेखनांतील सारे ढंग, साऱ्या तऱ्हा, रंग पडेल तशी भाषा वठविण्याचा हातोटी (adaptability), भाषाप्रभुत्व, मोठा मजकूर लहान करतांना काय गाळावें व काय ठेवावें याचें ज्ञान, गमतीदारपणा (Saving grace of humour) व नाटकीपणा त्याच्यांत असावा.

१० वर्तमानपत्राच्या धंद्यांत विश्वास ही मुख्य चीज आहे. पत्राची जबाबदारी मुख्य संपादकावर असली तरी पत्रांतील सगळा मजकूर तो स्वतः लिहीत नाहीं अगर पाहूंहि शकत नाहीं; कित्येकदां मुख्य संपादक ठिकाणावरहि नसतो. अशा स्थितींत एकंदर काम सर्वांवर वांटलें असल्यानें कामाचा वांटा ज्याच्याकडे आला त्यानें त्याची जबाबदारी स्वतःवरच आहे असें समजून वागलें तरच पत्र चांगलें चालतें. म्हणून उपसंपादक विश्वासास पात्र असावा.

११ अब्रूनुकसानीचे प्रसंग टाळावे. लिहिण्यांत नजरचूक नसावी. केव्हां, काय व कसें लिहावयाचें याचें (Judgment) शहाणपण असावें. ताजी बातमी आल्यावर तिच्यापुढें शिळया बातमीचा आग्रह किती धरावयाचा याचा विचार असावा.

१२ देशांतील मुख्य वर्तमानपत्रें काळजीपूर्वक वाचावीं. संदर्भ-ग्रंथसंग्रहालयांत जाऊन लिहावयाच्या विषयावरील अपुरी माहिती पूर्ण करून घ्यावी. आपल्यास हवें त्यावर घारीसारखी नजर ठेवून व्यवहारांत वागावें.

१३ वाचकांना तात्त्विक ज्ञानाचा कंटाळा असतो. कनक, कांता व अन्न यासंबंधाचे विषय त्यांना फार प्रिय. वाचक ऐदी आहेत असें समजून, मुलांना बोंडल्यानें दूध पाजतात तसें जगाचें ज्ञान आकर्षक

बनवून त्यांना पाजावें. न्यायमंदिरांतील मनोरंजक बातम्या व परदेशाच्या उपयुक्त बातम्या द्याव्या.

१४ ज्यांच्या आधारें लेख तयार करावयाचा तीं साधनें काळजीपूर्वक वाचून आत्मसात् करावीं व त्यांतील मर्मस्थानें चिमटींत धरावीं (Get a grip of the essentials). मजकूर लिहितांना दैवावर हवाला टाकूं नये. जें एकदां पांढऱ्यावर काळें करावयाचें तें पुनः तपासावयास सांपडणार नाहीं असें समजून प्रथमच बिनचूक लिहावें. कारण त्यांत एकदां चूक राहून गेली कीं ती मागाहून दुरुस्त होईलच असा भरंवसा नसतो.

१५ पत्राचें धोरण हेंच प्रत्येक उपसंपादकाचें धोरण असलें पाहिजे. तसें नसेल तर पत्रांत परस्परविरुद्ध व विसंगत मतें प्रसिद्ध होऊन पत्राचें वजन कमी होईल. यासाठीं राजकारण, धर्म व इतर विषय यासंबंधीं स्वतःच्या मतांचा पगडा आपल्या लेखावर बसूं देऊं नये.

१६ मजकुरांत यावयाचीं नांवें व पदव्या लिहितांना पुस्तकांत पाहून व तपासून घ्याव्या. हस्ताक्षर वाईट असल्यास सुधारावें. कारण ठसे जोडणारांना तें बिनचूक लागलें पाहिजे. पत्रांत शिरल्यावर उपसंपादकानें सदर पत्राची पद्धति व लेखनशैली आत्मसात् करावी. तारखांच्या व आज-उद्यांच्या चुका लक्षपूर्वक टाळाव्या. एखादें भाषण कमी करतांना त्यांतील तुटणारे दुव्वे जोडून घ्यावे.

१७ Whitakar's Almanack, Who's Who, Who was Who, Statesman's year book, शब्दकोश हे संदर्भग्रंथ जवळ असावे. यांत राज्यकारभार, राजकारण, समाज व त्यांतील प्रसिद्ध व्यक्ती यांची माहिती असते. Dictionary of dates by Hydn, Books of quotations हीं पुस्तकेंहि त्यानें संग्रहाला ठेवावीं.

'लंडन टाईम्स' हें इंग्लंडमधील जगप्रसिद्ध पत्र होय. त्याचें वजन

दांडगें आहे. त्याच्या कचेरीचें वर्णन वाचलें असतां तेथील काम केवढें प्रचंड असेल याची कल्पना होईल.

टाइम्सच्या कचेरींत उपसंपादकांच्या चार खोल्या आहेत. त्यांचे हुद्दे स्वदेशी म्हणजे इंग्लंडचा ( Home ), परराष्ट्रीय ( Foreign ), फडणिशी व व्यापारी ( Financial and Commercial ), क्रीडाविषयक ( Sporting ). कचेरींत एकंदर उपसंपादक तीसपर्यंत असतात. परराष्ट्रीय खात्याचा एक प्रमुख उपसंपादक व स्वदेशी खात्याचा एक प्रमुख उपसंपादक ( Chief Sub Editor ) असतो. बातमीच्या खोल्यांना टेलिफोन जोडला असून बातमीदार लघुलेखन पद्धतीनें टेलिफोनच्या बातम्या घेतात. त्या बातम्या युरोपखंडांतील वेगवेगळ्या राजधान्यांतून येतात. बिनतारीनें अमेरिका व जगाचे इतर भाग यांशीं कचेरी जोडलेली आहे. एवढा मोठा संपादक वर्ग व इतकी साधनसामग्री लंडनमधील सर्व पत्रांना बाळगण्याचें सामर्थ्य नसतें. मात्र खेळ, व्यापार व अर्थ या विषयांवरील माहिती टाइम्सप्रमाणें इतर प्रमुख पत्रांतूनहि प्रसिद्ध होते. त्यावर लिहिणारे लेखक अधिकारी असतात. ते बाहेरून लिहितात. पण खुद्द वर्तमानपत्राचे उपसंपादकहि या बाबतींत हार जाणारे नसतात युरोप व अमेरिका या खंडांत वर्तमानपत्रांचें धुरीणत्व दैनिक पत्रांकडे आलें आहे व साप्ताहिक पत्रें मागें पडलीं आहेत. हिंदुस्थानांतहि इंग्रजी दैनिक पत्रांना तोच मान मिळाला आहे. पण मराठी दैनिक पत्रें मात्र त्या योग्यतेस अद्यापि चढावयाचीं आहेत. याचें कारण असें कीं त्या तऱ्हेनें पत्र चालविण्यास द्रव्यबळ व साधनसंपत्ति मराठी दैनिकांपाशीं नाहीं. इंग्रजी दैनिकांतील, विशेषतः इंग्रजांनीं चालविलेल्या दैनिकांतील संपादकीय मजकूर भारदस्त, वजनदार, विचारप्रवर्तक व मार्गदर्शक असतो. हें सर्व दैनिकास मोठा संपादक वर्ग लाभण्यावर अवलंबून आहे. संपादकीय मजकुराप्रमाणेंच बाहेरील लेखकांचे लेखहि त्यांत उच्च प्रतीचे

येतात. पण मराठी पत्रांना हीं दोनहि अंगें तितक्या प्रतीचीं राखण्याचें साधत नाहीं. त्यांचा संपादक वर्ग अगदींच तुटपुंजा. त्या मानानें त्याजवर पडणारा कामाचा बोजा डोईजड वाटण्याजोगा. त्यांना मिळणारें वेतनहि इतकें अल्प कीं मराठींतील एक दोन दैनिकें सोडल्यास त्यांत संपादकाचें काम करण्यास येणारे लोक अगदींच नडलेले असे असतात. ते कांहीं महिने तग धरतात व दुसरीकडे अधिक प्राप्तीचा रोजगार मिळाला कीं निघून जातात. त्यांना धंद्याची जेमतेम तोंडओळख होते. त्याचा मुख्य संपादक मालक असल्यामुळें तो कायमचा व बाकीचे सर्व फिरस्ते.

संपादक तींत बसतात सबब त्या जागेला कचेरी म्हणावयाचें इतकेंच. बाकी एरवीं कचेरी व झोपडी सारखीच.

**मराठी दैनिकें** दैनिकांतील चढाओढींत संपादकाचा कामाखालीं पिट्टाच पडतो. आपलें पत्र ताजेपणांत इतरांच्या पुढें कसें जाईल या काळजीनें मुख्य संपादक उपसंपादकाकडून काम अगदीं मानेवर खडा ठेवून घेतो म्हटलें तरी चालेल. सामान्यतः दैनिक पत्रांच्या कचेरीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणें आढळतो—मुख्य संपादक कचेरींत सकाळीं ८ वाजतां येतो. तो आला कीं सगळ्या कामांना गति मिळते. आठ वाजल्यापासून बारा वाजेपर्यंत तो कचेरींत सर्व कामें पहातो. त्याच्या हाताखालीं दोन उपसंपादक असतात. पत्राचे बातमीदार ठिकठिकाणीं असून ते दररोज एक पत्र पाठविनातच. तीं त्यांची पत्रें, त्याशिवाय ताजीं वर्तमानपत्रें व इतर पत्रव्यवहार त्याच्या किंवा एका उपसंपादकाच्या टेबलावर पडतो. तो पाहून त्या सर्वांची वांटणी करण्यांत येते. मराठी दैनिकांत संपादकीय मजकूर एक, दोन स्तंभापेक्षां अधिक नसतो. त्यांतील कांहीं मजकूर मुख्य संपादक स्वतः लिहितो व बाकीचा तो इतर संपादकांकडून लिहून घेतो. वार्तासंपादकाच्या हाताखालीं शहरांत वावरणारे दोन-तीन वार्ताहर असतात. ते शहरांत हिंडून बातम्या जमवितात. कोर्टें, कचेऱ्या, फरास-

खाना ( कोतवाली ), सभागृहें व सार्वजनिक अड्डे हीं त्यांची बातम्या काढण्याचीं स्थानें. त्यांनीं आणिलेल्या बातम्यांवरून वार्ताकथा रचणें, लहान बातम्या देणें, टेलिफोन व तारायंत्र यांजवरील बातम्या घेणें या सर्वांची व्यवस्था वार्ता-संपादक आपल्या वार्ताहरांच्या मदतीनें पार पाडतो.

मुख्य संपादक सकाळीं बारा वाजतां घरीं गेला म्हणजे दुपारीं दोन वाजतां पुनः कामावर येतो व सायंकाळीं सात वाजतां परत जातो. वार्ता संपादकाच्याहि वेळा याच. वार्ता संपादक ७ वाजतां निघून गेल्या-वर रात्रपाळीचा वार्ता-संपादक हजर होतो आणि रात्रभर टेलिफोन व तारा यावरून येणाऱ्या बातम्या घेतो व त्या ठसेदाराकडे देतो. नित्य कामा-शिवाय चूष-विषय म्हणून कांहीं असून ते ' साहित्य संचार ', ' कला-कौमुदी', 'स्त्रियांकरितां' इत्यादि सदराखालीं द्यावयाचे असतात. तें काम दोन वेगळे संपादक करतात.

पुण्यांतील दैनिकें साधारणपणें तीन आवृत्त्या रोज काढतात. त्या रेल्वेच्या सोईवर अवलंबून राहतात. सदर्न मराठा आवृत्ति, सोला-पूर, अहमदनगर आवृत्ति व शेवटची मुंबई, नागपूर व स्थानिक आवृत्ति. आवृत्यांत फरक फक्त ताज्या बातम्यांचा. बाकीचा मजकूर एकच.

**'केसरी' पत्र**

मराठी दैनिक पत्रांचा उपयोग मुख्यतः ताजी बातमी देण्या-पुरताच. संपादकीय व इतर लेखांनीं ज्या पत्रांनीं आपलें धुरीणत्व मराठी पत्रांत राखलें आहे अशीं केसरी व महाराष्ट्र ही दोनच अर्धसाप्ताहिक पत्रें होत. त्यांपैकीं केसरी पत्राचें संपादक मंडळ मोठें आहे. त्यांत सुमारें दहा संपादक व वार्ताहर आहेत. मुख्य संपादकावर कामाचा बोजा फार पडतो. संपादकीय मजकूर लिहिणें, इतरांचा संपादकीय मजकूर तपासणें, मुद्रितें पहाणें, बाहेरून आलेला मजकूर पाहून

निवडणें, आल्यागेल्याच्या भेटी घेणें हीं बहुतेक सर्व कामें मुख्य संपादकच करतो. त्याखेरीज व्याख्यानें देणें, अध्यक्ष होणें इत्यादि त्याच्या बाहेरच्या चळवळी असतातच. त्या अर्थात् स्वतःच्या आवडीकरितां व पत्राचा बोज संभाळण्याकरितां त्याला पत्करान्या लागतात. मुख्य संपादकाच्या हाताखालीं दोन उपसंपादक असतात. अर्धसाप्ताहिकाचे आठवड्यांतील दोन अंक दोघांकडे वांटून येतात. एका अंकाची व्यवस्था एकानें व दुसऱ्याची दुसऱ्यानें पहावी. साहित्य संपादकानें पुस्तकपरीक्षण व अभिप्राय यांचें खातें संभाळावें. वार्ता संपादक ( वर्तमानसार काढणारे ) चार असून त्यांनींहि दोन अंकांच्या बातम्या आळीपाळीनें द्याव्या. शहरांतील नवल-विशेष, सभासंमेलनें यांचे वृत्तान्त हजर राहून लिहिणारा एक वार्ताहर ( रिपोर्टर ) असतो. व्यापार, उद्योग व अर्थ या विषयांवर एक स्वतंत्र उपसंपादक लिहितो. मध्यवर्ती विधिमंडळें व मुंबई विधिमंडळें यांचीं बातमीपत्रें पाठविण्याकरितां एक उपसंपादक मुद्दाम त्या त्या ठिकाणीं महिना दोन महिने क्वचित् जाऊन राहतो. त्याशिवाय उरलेले इतर संपादक पत्रांतील बाकीचा संपादकीय व इतर मजकूर भरतात. त्यांत सरकारी खात्यांच्या रिपोर्टांचा सारांश देणें, पत्रांचा सारांश काढणें, विशिष्ट व्यक्तींच्या मुलाखती घेणें, सभांचे वृत्तान्त ( रिपोर्ट ) जरूर तेव्हां जाऊन घेणें, पुस्तकांवर अभिप्राय देणें, बाहेरगांवीं परिषद, सभा, समारंभ याकरितां जाऊन त्यांच्या सविस्तर बातम्या पाठविणें, बाहेरून आलेल्या लेखांचे सारांश काढणें इत्यादि कामें येतात.

सर्व संपादक आठवड्यांतून दोनदां म्हणजे रविवारीं व बुधवारीं मुख्य संपादकाच्या कचेरींत जमतात. तेथें येत्या अंकाकरितां लिहावयाच्या संपादकीय मजकुराची निवड व चर्चा होते. सर्वसामान्य राजकारणाचा ऊहापोह केला जातो. अग्रलेखाच्या विषयाची निवड झाल्यावर तो विषय मुख्य संपादक लिहिण्याकरितां आपल्याकडे घेतो किंवा उपसंपादकाकडे

खाना ( कोतवाली ), सभागृहें व सार्वजनिक अड्डे हीं त्यांची बातम्या काढण्याचीं स्थानें. त्यांनीं आणिलेल्या बातम्यांवरून वार्ताकथा रचणें, लहान बातम्या देणें, टेलिफोन व तारायंत्र यांजवरील बातम्या घेणें या सर्वांची व्यवस्था वार्ता-संपादक आपल्या वार्ताहरांच्या मदतीनें पार पाडतो.

मुख्य संपादक सकाळीं बारा वाजतां घरीं गेला म्हणजे दुपारीं दोन वाजतां पुनः कामावर येतो व सायंकाळीं सात वाजतां परत जातो. वार्ता संपादकाच्याहि वेळा याच. वार्ता संपादक ७ वाजतां निघून गेल्या-वर रात्रपाळीचा वार्ता-संपादक हजर होतो आणि रात्रभर टेलिफोन व तारा यावरून येणाऱ्या बातम्या घेतो व त्या ठसेदाराकडे देतो. नित्य कामा-शिवाय चूष-विषय म्हणून कांहीं असून ते ' साहित्य संचार ', ' कला-कौमुदी', 'स्त्रियांकरितां' इत्यादि सदराखालीं द्यावयाचे असतात. तें काम दोन वेगळे संपादक करतात.

पुण्यांतील दैनिकें साधारणपणें तीन आवृत्त्या रोज काढतात. त्या रेल्वेच्या सोईवर अवलंबून राहतात. सदर्न मराठा आवृत्ति, सोला-पूर, अहमदनगर आवृत्ति व शेवटची मुंबई, नागपूर व स्थानिक आवृत्ति. आवृत्यांत फरक फक्त ताज्या बातम्यांचा. बाकीचा मजकूर एकच.

**'केसरी' पत्र**

मराठी दैनिक पत्रांचा उपयोग मुख्यतः ताजी बातमी देण्या-पुरताच. संपादकीय व इतर लेखांनीं ज्या पत्रांनीं आपलें धुरीणत्व मराठी पत्रांत राखलें आहे अशीं केसरी व महाराष्ट्र ही दोनच अर्धसाप्ताहिक पत्रें होत. त्यांपैकीं केसरी पत्राचें संपादक मंडळ मोठें आहे. त्यांत सुमारें दहा संपादक व वार्ताहर आहेत. मुख्य संपादकावर कामाचा बोजा फार पडतो. संपादकीय मजकूर लिहिणें, इतरांचा संपादकीय मजकूर तपासणें, मुद्रितें पहाणें, बाहेरून आलेला मजकूर पाहून

निवडणें, आल्यागेल्याच्या भेटी घेणें हीं बहुतेक सर्व कामें मुख्य संपादकच करतो. त्याखेरीज व्याख्यानें देणें, अध्यक्ष होणें इत्यादि त्याच्या बाहेरच्या चळवळी असतातच. त्या अर्थात् स्वतःच्या आवडीकरितां व पत्राचा बोज संभाळण्याकरितां त्याला पत्कराव्या लागतात. मुख्य संपादकाच्या हाताखालीं दोन उपसंपादक असतात. अर्धसाप्ताहिकाचे आठवड्यांतील दोन अंक दोघांकडे वांटून येतात. एका अंकाची व्यवस्था एकानें व दुसऱ्याची दुसऱ्यानें पहावी. साहित्य संपादकानें पुस्तकपरीक्षण व अभिप्राय यांचें खातें संभाळावें. वार्ता संपादक ( वर्तमानसार काढणारे ) चार असून त्यांनींहि दोन अंकांच्या बातम्या आळीपाळीनें द्याव्या. शहरांतील नवलविशेष, सभासंमेलनें यांचे वृत्तान्त हजर राहून लिहिणारा एक वार्ताहर ( रिपोर्टर ) असतो. व्यापार, उद्योग व अर्थ या विषयांवर एक स्वतंत्र उपसंपादक लिहितो. मध्यवर्ती विधिमंडळें व मुंबई विधिमंडळें यांचीं बातमीपत्रें पाठविण्याकरितां एक उपसंपादक मुद्दाम त्या त्या ठिकाणीं महिना दोन महिने क्वचित् जाऊन राहतो. त्याशिवाय उरलेले इतर संपादक पत्रांतील बाकीचा संपादकीय व इतर मजकूर भरतात. त्यांत सरकारी खात्यांच्या रिपोर्टांचा सारांश देणें, पत्रांचा सारांश काढणें, विशिष्ट व्यक्तींच्या मुलाखती घेणें, सभांचे वृत्तान्त ( रिपोर्ट ) जरूर तेव्हां जाऊन घेणें, पुस्तकांवर अभिप्राय देणें, बाहेरगांवीं परिषद, सभा, समारंभ याकरितां जाऊन त्यांच्या सविस्तर बातम्या पाठविणें, बाहेरून आलेल्या लेखांचे सारांश काढणें इत्यादि कामें येतात.

सर्व संपादक आठवड्यांतून दोनदां म्हणजे रविवारीं व बुधवारीं मुख्य संपादकाच्या कचेरींत जमतात. तेथें येत्या अंकाकरितां लिहावयाच्या संपादकीय मजकुराची निवड व चर्चा होते. सर्वसामान्य राजकारणाचा ऊहापोह केला जातो. अग्रलेखाच्या विषयाची निवड झाल्यावर तो विषय मुख्य संपादक लिहिण्याकरितां आपल्याकडे घेतो किंवा उपसंपादकाकडे

सोंपवितो. अग्रलेख दोन असल्यास दोघांकडे जातात. त्यानंतर स्फुट सूचना, प्रासंगिक बोल व इतर मजकूर याची वांटणी होते. येथें जसें ठरलें असेल त्याप्रमाणें सारा संपादकीय मजकूर एक अगर दीड दिवसांत लिहिला जातो. केसरी पत्र मंगळवारीं व शुक्रवारीं निघतें. त्याच्या आदल्या दिवशीं म्हणजे सोमवारीं व गुरुवारीं संध्याकाळीं मुंबईहून टेलिफोनवरून बाजारभाव कळतो. शिवाय त्या दिवशीं गांवांत घडलेल्या महत्त्वाच्या बातम्या, सभावृत्तें, तारा व टेलिफोन यांजवरून येणाऱ्या वार्ता व परगावांहून आलेलीं ताजीं बातमीपत्रें यांची जुळणी रात्रीं एक उपसंपादक कचेरींत बसून करतो व त्या मजकुराचीं वेगळीं चार किंवा दोन पानें निराळ्या यंत्रावर छापून काढण्यांत येतात. या पानांच्या निरनिराळ्या प्रदेशांत जाण्याकरितां तीन आवृत्त्या निघतात. तीं पानें मुख्य पत्रांत घालून परगांवीं एजंटाकडे पार्सलांतून किंवा टपालांतून त्या त्या गांवीं रवाना होतात. हें काम उपसंपादकाला रात्रीं ८ वाजल्यापासून पहांटे तीन वाजेपर्यंत पुरतें.

पाश्चिमात्य देशांतील उपसंपादकांना समाजसुख लाभत नाहीं. चुलींत रात्रंदिवस तोंड खुपसून बसलेल्या विधवेप्रमाणें उपसंपादक आपल्या खोलींत एकसारखा बसून खपतो. तो कितीहि गुणी असला तरी त्याला कोणी ओळखत नाहीं व जगांत त्याला कसलीहि प्रसिद्धि मिळत नाहीं. त्यानें आपल्या पत्राकरितां काम करावें व इतर पत्रें वाचावीं. हिंदुस्थानांतील उपसंपादक असे पडदानशीन नाहींत. ते जाहीर सभांतून भाषणें करतात व प्रसिद्धीस येतात. खेरीज आपल्या पत्राचें काम संभाळून उरलेल्या वेळांत त्यांना मासिकाकरितां लेख लिहिण्यास आणि ते तितके महत्त्वाकांक्षी असले तर पुस्तकें रचण्यास फुरसत मिळते. निरनिराळ्या संस्थांचे चिटणीस होणें, राजकीय प्रचारकार्याकरितां देशांत हिंडणें, वक्तृत्वगुण वाढविणें, राजकारणांत पुढारी होण्यास ज्या पात्रतेची आवश्यकता आहे तिची जोपासना करणें याहि सार्वजनिक

कामातील हालचाली करण्यास त्याला सवड असते. कै. गोपाळ कृष्ण देवधर, कै. अनंत विनायक पटवर्धन, रा. न. चिं. केळकर, रा. दामोदर विश्वनाथ गोखले, माजी 'कर्मयोगी'चे संपादक रा. शंकर रामचंद्र राजवाडे, 'प्रभात'चे संपादक रा. वालचंद रामचंद कोठारी, विहारी व लोकमान्य या पत्रांचे माजी संपादक रा. रामचंद्र नारायण मंडलिक इत्यादि महाराष्ट्रांतील पुढारी व कार्यकर्ते यांनीं वर्तमानपत्रांतील आपलें काम संभाळूनच सार्वजनिक सेवा केली आहे. लो. टिळक तर वर्तमानपत्रावरच अखिल भारतवर्षाचे पुढारी झाले. याचें कारण कीं वर्तमानपत्रांच्या संपादकांना सगळ्या प्रचलित सार्वजनिक विषयांचें जुजबी ज्ञान असतें. लिहिण्याचा तर त्यांचा मुळीं धंदाच. वक्तृत्वाची त्यांना संवय नसली तरी विषयाच्या माहितीमुळें मनांत आणलें कीं परिणामकारक भाषण करणें त्यांना सोपें जातें. या दृष्टीनें सार्वजनिक कार्यकर्ते म्हणून पुढें येण्यास वर्तमानपत्रांच्या संपादकाप्रमाणें उपसंपादकांनाहि विपुल संधी मिळते.

# प्रकरण नववें

# संपादकीय तयारी

संपादकीय शिक्षण देणाऱ्या संस्था हिंदुस्थानांत नाहींतच पण महायुद्धाच्या अखेरीपर्यंत पाश्चिमात्य देशांतहि नव्हत्या. महायुद्ध संपल्यावर या शिक्षणाची आवश्यकता वृत्तपत्र

**संपादकीय शाळा**

व्यवसायांतील धुरीणांना भासूं लागली. इंग्लडांतील वृत्तपत्रांचे धुरीण लॉर्ड नॉर्थक्लिफ हे होत. त्यांच्या मालकीचीं कित्येक पत्रें इंग्लंडांत आहेत. त्यांनीं लंडन शहरीं स्कूल ऑफ जर्नॅलिझम स्थापन केलें. या शाळेंत जो अभ्यासक्रम सुरू आहे तोच अभ्यासक्रम ब्रिस्टल विद्यापीठानें अमलांत आणिला आहे. लंडन विद्यापीठानेंहि सन १९१९ सालीं आपला अभ्यासक्रम आंखला असून तो दोन वर्षें पुरेल इतका आहे. त्यांत शास्त्रीय ज्ञानाचा इतिहास व विकास, राजकीय कल्पनांचा इतिहास व विकास, टीकाशास्त्राचीं तत्त्वें, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान व मानसशास्त्र हे विषय आहेत.

इंग्लंडपेक्षां अमेरिकेंत संपादकीय शिक्षणाची सोय अधिक व्यवस्थित व मोठ्या प्रमाणावर आहे. सन १९०२ सालीं जोसेफ पुलिट्झर या धनाढ्य गृहस्थानें संपादकीय शाळेकरितां कोलंबिया विद्यापीठास ६० लक्ष रुपये दिले. त्या रकमेंतून सन १९१२ मध्यें सदर विषयाची शाळा निघाली. इतर ठिकाणीं त्याच सुमारास शाळा व वर्ग निघाले. अशा प्रकारचे वर्ग १९२६-२७ सालीं अमेरिकेंत एक हजार होते. अमेरिकेंत असोसिएशन ऑफ स्कूल्स अँड डिपार्टमेंट्स ऑफ

जर्नॅलिझम या संस्थेनें चालविलेल्या शाळा चांगल्या स्थितींत आहेत. या शिक्षणास हायस्कुलाचें पूर्ण शिक्षण व कॉलेजाचीं दोन वर्षें आवश्यक मानलीं जातात. वरील शाळांतून हस्तलिखितें वाचणें (Copy reading), संपादकीय मजकूर लिहिणें, शीघ्र साहित्याचा इतिहास (History of journalism), अब्रूनुकसानीचा कायदा हे विषय शिकविले जातात. त्याखेरीज मानसशास्त्र, समाजशास्त्र, राजनीतिशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, वाङ्मय, भाषा व इतरहि विषय कित्येक ठिकाणीं ठेविले आहेत.

संपादकीय शिक्षण देणाऱ्या शाळा हिंदुस्थानांत नाहींत व विद्यापीठांतून या विषयाला स्थान मिळेल त्याच वेळीं त्याचें पद्धतशीर शिक्षण अल्प प्रमाणावर तरी इकडे सुरू होईल. विद्यापीठाच्या बाहेरहि स्वतंत्र शाळा किंवा वर्ग निघतील; पण तसें होण्यापूर्वी इकडील वर्तमानपत्रांचा धंदा पाश्चिमात्य देशाप्रमाणें भरभराटीस येणें इष्ट आहे. ही गोष्ट अर्थातच शिक्षणाचा प्रसार, देशाची आर्थिक सुस्थिति व राजकीय स्वातंत्र्य यावर अवलंबून आहे. पुण्यांत केसरी-मराठा संस्थेनें टिळक विद्यापीठाच्या पदवीधरांकरितां सुमारें पंधरासोळा वर्षांपूर्वी संपादकीय वर्ग चालविला होता त्या वर्गांत टिळक विद्यापीठाच्या पदवीधरांनाच घेतलें असून त्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या होत्या. हा वर्ग एक वर्षभर सुरू राहिला. त्यांत शिकविणाऱ्या अध्यापकांत केसरी-मराठा संस्थेंतील सर्व संपादक व बाहेरचे एक दोन गृहस्थ एवढेच होते. सदर वर्गांत शिकलेल्या तरुणांनीं कोठें नवीन वर्तमानपत्रें सुरू केलीं किंवा आधीं सुरू होतीं त्यांनाच ते मिळाले. त्यांपैकीं कांहीं तरुण त्याच धंद्यास अद्यापिहि चिकटून आहेत. हा प्रयत्न वगळल्यास प्रत्यक्ष कामाच्या अनुभवानें जें ज्ञान मिळेल तेंच संपादकीय शिक्षण अशीच सध्यांची स्थिति आहे.

महाराष्ट्रांतील सर्व नामांकित संपादक अनुभवानेंच तयार झाले

आहेत. टिळक, आगरकर, परांजपे हे स्वयंभू संपादक होत. त्यानीं आधीं वर्तमानपत्रें सुरू केलीं व मागाहून ते संपादक बनले. अर्थात् धंद्यानेंच त्यांना धंदा शिकविला. हा प्रकार महाराष्ट्रांतील वृत्तपत्रेतिहासाच्या प्रारंभाचा. त्या काळापेक्षां सद्यःकालांत फरक पडला आहे तो एवढाच कीं, हल्लीं वर्तमानपत्रें बरींच निघालीं असल्यामुळें एखाद्याला नव्या पत्राची जबाबदारी एकदम शिरावर घेण्यापूर्वीं त्या धंद्याचा 'श्रीगणेशा' वर्तमानपत्राच्या कचेरींत उमेदवारी करून शिकावयास मिळण्याची सोय झाली आहे.

**नवीन उमेदवार**

नवा मनुष्य वर्तमानपत्राच्या कचेरींत लागल्यावर त्याला प्रथम इंग्रजी पत्रांतील तारांचें भाषांतर व वर्तमान काढण्यास सांगतात. त्या योगानें त्याला चालू राजकारणांतील घडामोडींची तोंडओळख होते. वर्तमान काढण्याचें काम करीत असतांच नव्या मनुष्यास जाहीर सभांना हजर राहून त्यांचे वृत्तान्त लिहून आणावयास सांगतात अगर त्या कामाकरितां स्वतंत्र मनुष्यहि कित्येक पत्रें नेमतात. सभांचे वृत्तान्त लिहिण्यापासूनहि त्याला फायदा होतो तो हा कीं, विविध विषयांचें जुजबी ज्ञान त्याच्या मनांत अनायासें सांचतें. सभा प्रचलित राजकारणाच्या चर्चेसाठीं भरविण्यांत येतातच; शिवाय सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक इत्यादि विषयांचा ऊहापोह करण्यासाठींहि सभा होत असल्यानें त्यांचीहि ओळख वार्ताहरास बरीच होते. वार्ताहर बहुधा भाषणांचीं टिपणें जागच्या जागीं करून घेतो व मागाहून स्वस्थपणानें आपला वृत्तान्त वेगळ्या कागदावर लिहून काढतो. त्यापासून त्यास मजकूर जुळवून लिहिण्याची संवय होते. हा निबंधलेखनाचा 'ओनामा'च समजण्यास हरकत नाहीं, म्हणून मनुष्य हुषार असल्यास त्याला वर्तमानपत्रास जरूर ती लेखनकला उचलण्यास फारसा विलंब लागत नाहीं.

वर्तमानसार काढण्याचा व सभांचे वृत्तांत लिहिण्याचा उद्योग सुरू असतांच नवीन उमेदवाराला इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रें वाचावयास मिळतात. त्यांतील महत्त्वाचीं वर्तमानपत्रें, विशेषतः टाइम्स ऑफ इंडियासारखीं इंग्रजी पत्रें त्यानें अभ्यासपूर्वक वाचावीं. असें केल्यानें डोक्यांत नवे नवे विषय भरून व लेखनकलेचे निरनिराळे मासलेहि नजरेखालून जाऊन विशिष्ट विषयांची व भाषाशैलींची आवड उत्पन्न होते. ती उत्पन्न झाल्यावर त्यासंबंधीं पुस्तकें वाचावयाचा व त्यांच्या आधारें विचार करून लिहिण्याचा त्यानें क्रम ठेवावा. उमेदवार हाहि वर्तमानपत्राचा एक घटक असल्यामुळें त्याच्या मजकुरास त्याच्या पत्रांत सहज स्थान मिळतें. अर्थात् त्यानें लिहिलेला मजकूर त्याच्याहून ज्येष्ठ अशा संपादकाकडून सहाजिकच तपासला जाऊन दुरुस्त होतो व त्याला योग्य ती दिशा समजते. हा उद्योग त्याला स्वतःचें काम संभाळून करावा लागतो. हौशी व महत्त्वाकांक्षी उमेदवार तो उद्योग केल्यावांचून रहात नाहीं. त्याच्या लिहिण्यांत कांहीं गुण किंवा चमक दिसल्यास त्याला संपादकाकडून उत्तेजन मिळतें व वर्तमानसारांत किंवा सभावृत्त देण्यांत त्याला रुतवून ठेवल्यानें पत्राचें नुकसान होत आहे असें वाटूं लागलें तर संपादक किंवा पत्राचा चालक त्याजवर संपादकीय मजकुराचा भाग आनंदानें सोंपवितो.

मोठ्या वर्तमानपत्रांत मजकुराचें क्षेत्र विस्तीर्ण असतें. त्यांत दर अंकाला विषय-विशेष (फीचर) म्हणून कांहीं रकाने त्यास देण्यांत येतात. त्यास 'संपादकीय' या नात्यानें महत्त्व कमी असलें तरी नवीनाला सरावण्यास तें क्षेत्र भरपूर असतें. त्याखेरीज प्रासंगिक बोल, विचारतरंग, 'विविध विषय विचार', 'चुटके चटके', रजःकण, 'शोध बोध विनोद' इत्यादि कितीतरी सदरें असतात. त्यांचाहि उपयोग नवीनानें यथास्थित करून घ्यावा. पुस्तकांवरील अभिप्राय, पत्रांचा सारांश, मुद्रितांचें वाचन हीं त्याच्या माहितींत, ज्ञानांत व व्यासंगांत आपआपल्या परीनें भर घालतातच.

अशा रीतीनें तयारी होत गेल्यावर 'स्फुट सूचना' लिहिण्याची त्यास संधी देण्यांत येते. स्फुट सूचना मार्मिक, मुद्देसूद, ठसठशीत व झणझणीत अशा प्रसंगानुसार लिहावयाच्या असतात. त्यांत लेखनकलेच्या विविध अंगांचा अधिक सराव होतो. तो झाला व स्फुट सूचना संपादकाच्या अगर चालकाच्या मनाजोग्या वठूं लागल्या म्हणजे अग्रलेख लिहावयास मिळण्याचा योग त्यास अधूनमधून येतो. अग्रलेख लिहावयास मिळाला कीं संपादकीय व्यवसायांतील शिखर गांठल्याप्रमाणें समजावें. ही गोष्ट जबाबदार वर्तमानपत्रांत संपादकीय खात्यांतील सर्वच घटकांना साध्य होणारी नाहीं. या ठिकाणीं विश्वविद्यालयीन शिक्षणाचा प्रश्न सहजच उद्भवतो. विश्वविद्यालयीन शिक्षण मिळून जो पदवीधर झाला आहे अशालाच संपादकाचें स्थान प्राप्त होतें काय, असें कोणी विचारील. त्यास निश्चित उत्तर कांहींच देतां यावयाचें नाहीं. परंतु एवढें खरें कीं पदवीधराला बिनपदवीधरापेक्षां संपादकत्व लाभण्याचा संभव अधिक. बिनपदवीधरानें संपादक होऊं नये असा नियम नाहीं. इतकेंच नव्हे तर पाश्चिमात्य देशांतील नामांकित संपादकांपैकीं कित्येक संपादक बिनपदवीधरच आढळतील. हिंदुस्थानांतहि 'लीडर' पत्राचे प्रख्यात संपादक रा. चिंतामणी, तसेंच 'अमृतबझार पत्रिके'चे माजी संपादक मोतीलाल घोष व त्यांचे बंधू हे बिनपदवधिरच होते. पण असलीं उदाहरणें विरळा. कित्येक चांगल्या मराठी पत्रांचे संपादकहि बिनपदवीधरच आहेत. याचें डोळ्यापुढचें उदाहरण नागपूरच्या महाराष्ट्र पत्राचें सदर पत्राचे संपादक रा. गोपाळरावजी ओगले हे पदवीधर नाहींत व त्यांच्या संपादक वर्गांतहि पदवीधर कोणी नाहींत. असें असूनहि त्यांनीं व त्यांच्या पत्रानें असंख्य मराठी पत्रांना योग्यतेंत मागें टाकलें आहे. हीं उदाहरणें बिनपदवीधरांना आशाजनक होत यांत शंका नाहीं. परंतु यापासून बोध घ्यावयाचा तो हा कीं वर्तमानपत्राचा संपादक

होण्यास पदवीधराइतकें शिक्षण झालेलें, निदान इंग्रजी भाषेचें भरपूर ज्ञान असलेल चांगलें; मग पदवी मिळालेली असो अगर नसो. कारण मराठी पत्रांना सर्वस्वीं इंग्रजी पत्रांवर व इंग्रजी पुस्तकांवर अवलंबून रहावें लागत असल्यामुळें संपादकाला इंग्रजीचें उत्कृष्ट ज्ञान आवश्यक होय. तितकी तयारी असल्यावर नवीन मनुष्याला प्रतिष्ठित पत्रांत अभिषिक्त संपादक होण्यास अगीं लेखनकौशल्य व अभ्यासाची हौस असेल तर बहुधा अडचण पडत नाहीं.

येथवर लिहिलें त्यावरून संपादकाला विशेष विद्वत्तेची गरज नाहीं अशी कोणाची समजूत झाल्यास ती अवास्तव नाहीं. अमूक विषयांत पारंगत तो विद्वान् या अर्थानें संपादकाची विद्वत्ता मोजतां यावयाची नाहीं. ज्यावर त्याला लिहावें लागतें त्या विषयांना अंत नाहीं हें लक्षांत ठेवलें असतां संपादकाला त्या सर्व विषयांत पारंगतता मिळणें मानवी शक्तीच्या आटोक्याबाहेरचें आहे. त्यांतून त्यानें एखाद्या विषयांत आवडीप्रमाणें व फुरसतीप्रमाणें खोल ज्ञान संपादन केलें तर संपादकाला स्वतःला मानसिक समाधान उपभोगावयास सांपडून जनतेंतहि त्याची विद्वत्तेविषयीं कीर्ति पसरल्यानें त्याचा सामाजिक दर्जा वाढतो यांत संदेह नाहीं. परंतु त्याला स्वतःच्या व्यवसायाच्या दृष्टीनें जें ज्ञान मिळवावयाचें तें पर्वतशिखराप्रमाणें उंच नसलें तरी चालेल. मात्र तें सामान्य सपाटीहून उंच पण पठाराप्रमाणें किंवा इमारतीच्या चबुतऱ्याप्रमाणें लांब रुंद असणें अत्यंत आवश्यक होय. प्रचलित विषयांचें ज्ञान त्याला सामान्य लोकापेक्षां, विशेषतः वाचक वर्गापेक्षां अधिक पाहिजे. सदर विषयावर नवीन लिहावयाचें तेव्हां त्यासंबंधीं नवीन उपलब्ध झालेली माहिती वाचून, आपल्या ठिकाणीं ती मुरवून व तिचें चिंतन करून त्यानें आपले विचार वाचकांपुढें मांडले म्हणजे त्यानें स्वकर्तव्य चोख रीतीनें बजावलें असें लोक समजतात. यासाठीं वर्तमानपत्राच्या कचेरीस जोडून ग्रंथसंग्रह

असला पाहिजे. केसरी-मराठा संस्थेस जोडलेला ग्रंथसंग्रह याच स्वरूपाचा आहे. ग्रंथसंग्रहांत राजकारण, इतिह स, अर्थशास्त्र इत्यादि विषयांवरील ग्रंथ, शिवाय सरकारी खात्यांचे रिपोर्ट, स्टेट्समन्स इयरबुक; टाइम्सचें इयर बुक, हूज हू यासारखें संदर्भग्रंथ, जगाच्या नकाशांचें पुस्तक, इंग्रजी, मराठी मासिक पुस्तकें, सरकारी गॅझेट, कौन्सिल ऑफ स्टेट, लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व प्रांतिक विधिमंडळें यांच्या बैठकींतील कामकाजांचीं छापील पुस्तकें, वर्तमानपत्रें, मासिकें यांत आलेल्या महत्त्वाच्या भाषणांचीं कात्रणें काढून त्यांचीं बांधलेलीं पुस्तकें व महत्त्वाच्या वर्तमानपत्रांचीं फाइलें असावीं. हा संग्रह पत्राच्या संपादकाला फार उपयोगी पडतो. जशी कारखानदाराला बँक तसा वर्तमानपत्राला ग्रंथसंग्रह. ग्रंथसंग्रहामुळें संपादकाचें काम फारच सोपें होऊन त्याच्या लेखांना भरीवपणा व वजनदारी येते. कारण कोणत्याहि विषयावरील आजतागायतची माहिती वृत्तपत्राच्या लेखांत आल्यावांचून त्याला वाचकांच्या दृष्टीनें ताजेपणा नसतो.

वर्तमानपत्राच्या संपादकाची तयारी तो धंद्यांत शिरल्यापासून त्यास रामराम ठोकीपर्यंत चालूच असते. हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रकारास सर्व अंगें व ढंग पाहिजेत. पडेल तें काम तो हौसेनें अंग मोडून करीत गेला म्हणजे त्याला स्वतःला एक प्रकारचा आनंद उपभोगावयास सांपडून यशःसिद्धिहि लाभते. वर्तमानपत्राचा धंदा तसा म्हटला तर मनोरंजकहि आहे. बातमीपत्रें व मुलाखती हीं जशीं त्याचीं कर्तव्याचीं तशीं करमणुकीचींहि साधनें होत. त्या निमित्तानें त्याला प्रवास घडून लहानमोठ्या लोकांच्या ओळखीदेखी करतां येतात. राष्ट्रीय सभा, इतर मोठाल्या परिषदा व विधिमंडळांच्या बैठकी, भूकंपाचीं क्षेत्रें, वेगवेगळ्या प्रांतांच्या आर्थिक व इतर परिस्थितीचें निरीक्षण इत्यादि कारणासाठीं हिंदुस्थानाचे निरनिराळे प्रांत व प्रमुख शहरें त्याच्या नजरेखालून गेल्यानें त्याची चौकसबुद्धि वाढते, नजर

विस्तृत होतें व ज्ञानांत भर पडतें. अशा रीतीनें देशांत फिरत असतां जे चमत्कारिक प्रसंग घडतात, सृष्टिसौंदर्याचे तऱ्हेतऱ्हेचे मासले दृष्टीसमोरून जातात व व्यक्तींचे स्वभाव समजतात, ते त्या त्या वेळीं आनंद देतातच पण त्यांचें स्मरणहि मागाहून सुखाचें साधन होतें. त्या सर्वांचा संपादकाच्या मनावर ठसा उमटतो; त्यामुळें त्याचें लेखन सुधारून त्याची लेखनशक्ति वाढीस लागते; इतकेंच नव्हे तर ग्रंथकर्तृत्वाचीं बीजें त्याच्या ठिकाणीं उपजत असल्यास त्यांतून मोड निघून तो कादंबरीकार, नाटककार, चरित्रकार, निबंधकार किंवा अर्थशास्त्र, राज्यघटनाशास्त्र, राज्यशासनशास्त्र इत्यादि विषयांवरचा ग्रंथकार म्हणूनहि उदयास येतो. अशा रीतीनें वर्तमानपत्रांतील लेखकानें नांव कमावल्यास त्याला मानसिक समाधान तर लाभतेंच, पण त्याच्या संपादकीय लेखनालाहि तजेला चढून लौकिकांत व दर्जांत भर पडते.

संपादकाला कायद्याचें ज्ञान असलेलें चांगलें. कारण कायद्याचे प्रश्न चर्चेकरितां संपादकापुढ नेहमीं येतात. पण त्यांतल्या त्यांत इंडियन पिनलकोडाचें १२४ अ व १५३ अ कलम यांची माहिती त्याला अवश्य असावी. १२४ अ हें राजद्रोहाचें कलम आहे व १५३ अ हें जातीजातींत द्वेष उत्पन्न करण्यासंबंधीं कलम आहे. वर्तमानपत्रावरील बहुतेक खटले या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका कलमान्वयें होत असतात. १२४ अ कलम इतकें व्यापक आहे कीं त्याखालीं, सरकाराविरुद्ध लिहिलेला कडक लेख सहसा सांपडल्याशिवाय रहाणार नाहीं. लो. टिळक यांजवरील दोन्ही सुप्रसिद्ध खटले याच गुन्ह्याबद्दल म्हणजे सरकाराविषयीं लोकांत अप्रीति उत्पन्न केल्याच्या आरोपावरून झाले. नवाकाळाचे माजी संपादक रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांजवरील खटला १५३ अ कलमाखालीं करण्यात आला. हिंदु-मुसलमानांमधील दंग्याच्या वेळीं दंग्याच्या जबाबदारीसंबंधीं चर्चा वर्तमानपत्रें करूं लागलीं म्हणजे तीं या कलमा-

च्या गोत्यांत सांपडण्याचा संभव असतो. या दोन गुन्ह्यांशिवाय आणखी एका गुन्ह्याचे बाबतींत वर्तमानपत्रांनीं काळजी घ्यावयास पाहिजे. तो गुन्हा म्हणजे अब्रूनुकसानीचा. याचें स्वरूप दिवाणी व फौजदारी असें दोन्ही प्रकारचें असूं शकतें. यापैकीं दिवाणी दावा पत्राविरुद्ध कोणालाहि करतां येईल. पण फौजदारी दाव्यास न्यायाधीशाची परवानगी लागते. अब्रूनुकसानी अनेक कारणांनीं होते.उदाहरणार्थ, पुतळा (Caricature, Effigy), चित्रें, लेख इत्यादि. मात्र तें कृत्य विवक्षित व्यक्तीला उद्देशून आहे असें सिद्ध झाल पाहिज. हे गुन्हे होऊं न देण्याची दक्षता स्वतः लेख लिहितांना संपादकानं बाळगणें जरूर आहे, तसेंच इतरांचे लेख छापतानांहि सावध रहाणें अवश्य आहे. कारण मजकूर दुसऱ्यानें लिहिला असला तरी तो प्रसिद्ध केल्याची जबाबदारी संपादकावर येतेच. केसरीचे संपादक रा. जनार्दन सखाराम करंदीकर यांजवर नागपूरचे डॉ. खरे यांनीं अब्रूनुकसानीचा खटला ज्या लेखाबद्दल केला तो लेख संपादकीय नसून नागपूरच्या बातमीदारानें पाठविलेलें तें पत्र होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

वर्तमानपत्राच्या धंद्यांत पाऊल टाकल्यापासून त्यांतून बाहेर पडेपर्यंत संपादकाला प्रत्यहीं काम करावें लागतें मुद्रितें (प्रुफें) तपासण्याचें. वर्तमानपत्रांत येणारा सगळा मजकूर शुद्धाशुद्धाच्या दृष्टीनें तपासण्यास मुद्रितें वाचणारे (प्रुफरीडर) वेगळे नेमलेले असले तरी तो मजकूर छापला जाण्यापूर्वी संपादकाला वाचावा, निदान बारकाईनें नजरेखालून घालावाच लागतो. हीं मुद्रितें तपासण्याचें व त्यासंबंधीं करावयाच्या चिन्हांचें एक तंत्र आहे. तें अवघड व भानगडीचें नसलें तरी त्याची माहिती प्रारंभींच करून घेणें इष्ट आहे.

मुद्रिताइतकेंच आवश्यक ज्ञान ठशांचें. वर्तमानपत्रांत निरनिराळ्या जातींचे ठसे कसे वापरावे लागतात हें वर्तमानपत्रांच्या वाचकांना माहीत असेलच. त्या ठशांची विशिष्ट मजकुराकरितां निवड कांहीं धोरणानेंच

करण्यांत येते. वर्तमानपत्रांत सरसकट वापरावयाच्या ठशास साधा पायका म्हणतात. तो सर्वांत लहान असतो. तो अधिक दाट उठणारा असला म्हणजे त्याला पायका ब्लॅक म्हणतात. त्याशिवाय लाँगप्रायमर साधा, लांगप्रायमर ब्लॅक इत्यादि पायक्याच्या जाती आहेत. पायक्याशिवाय इंग्लिश बॉडी, ग्रेट साधा, ग्रेट जबरा या जाती चढत्या ठशांच्या आहेत. त्याहून मोठे ठसे वन्हिक, पायका दोन ओळींचा, तीन ओळींचा, चार ओळींचा, पांच ओळींचा, सहा ओळींचा हे होत. या सर्वांचें ज्ञान संपादकास असल्यास त्याला कोणता मजकूर कोणत्या ठशात बसवावयाचा व कोणत्या मजकुरास किती मोठ्या अक्षरांचा मथळा द्यावयाचा, हें ठसे जोडणारांस आगाऊ सांगतां येऊन पत्राच्या सुबकपणांत स्वतःची नजर चालवावयास सांपडते. संदेश पत्राचे संपादक कै. अच्युत बळवंत कोल्हटकर हे नागपुरास 'देशसेवक' पत्र चालवीत असतां वर्तमानपत्रांतील ठसे जुळविण्यापासून यंत्र फिरविण्यापर्यंत अडेल तें काम करण्याची त्याजवर पाळी यावी. त्या त्या वेळीं तें तें काम त्यांनीं उत्साहपूर्वक केल्यामुळें त्यांना छापखान्यांतील प्रत्येक खात्याची मख्वी कळून संदेश पत्र काढल्यानंतर तऱ्हेतऱ्हेच्या ठशांनीं, मेहरपींनीं व रंगांनीं तें नटविलें कीं पत्रें विकणारांच्या हातांत अंक दिसतांच तो विकत घेण्याचा मोह वाचकांना व्हावा. इतकें मार्मिक ज्ञान फारच थोडे संपादक कमावतात. पण त्यांनीं तें कमावलें तर संपादकांना आपला धंदा अधिक यशस्वी करता येईल.

---

# प्रकरण दहावें

# वृत्तपत्रांतील मजकूर

अग्रलेख

वृत्तपत्राचे वाचक भिन्न परिस्थितींतले, भिन्न बुद्धिमत्तेचे, भिन्न दर्जाचे व कमीअधिक शिक्षण पावलेले असतात. खेड्यांतील वाचकाना फुरसत भरपूर मिळते तर शहरांतील वाचकांस स्वस्थपणा अगदीं थोडा सांपडतो. कोणी वाचक व्यापारधंद्यांत गढून जातो तर कोणी सरकारी जोखमीचीं कामें करतो. कोणी मुलांना शिकवितो तर कोणी हायकोर्टांत न्यायाधीशाच्या आसनावर बसून दिवाणी व फौजदारी दाव्यांचे निकाल सांगतो. अशा वैचित्र्यपूर्ण वाचक वर्गाच्या हातीं वर्तमानपत्र जावयाचें असतें हें लक्षांत घेऊनच वर्तमानपत्राची भाषासरणी ठरते. त्याची भाषा जोरदार, रसाळ व हृदय-स्पर्शी असावी. वाचकांची आवड सर्वकाळ सारखी राहत नाहीं. तिच्यांत पालट पडतो. तथापि वर सांगितलेले गुण अबाधित समजावे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर, बाळ गंगाधर टिळक यांच्या काळांत मराठीवर संस्कृत भाषेची छाया दाट पडली होती. त्या कारणानें अग्रलेखाच्या शिरोभागीं एखाद्या नामांकित ग्रंथकाराचें संस्कृत अवतरण घालण्याचा परिपाठ होता. त्या वचनानें लेख विद्वत्ताप्रचुर समजला जात असे. खेरीज लेखाचें अंतरंगहि उपमा, अलंकार यांनीं शृंगारण्यांत येत असे. संस्कृत भाषेच्या छायेमुळेंच मराठीला या रीतीनें डौलदार बनविण्याची चाल पडली होती असें नव्हे तर कॉलेजांत व हायस्कुलांत जे इंग्रजी ग्रंथ अल्पवयी विद्यार्थ्यांस अभ्यासावयास मिळत त्यांची भाषासरणी अशीच

डौलदार असल्यानें मराठी लेखकांनीं संस्कृत काय किंवा इंग्रजी काय कोणाहि ग्रंथकाराचें अनुकरण केलें तरी त्याचा परिणाम एकच व्हावा.

परंतु अलीकडे इंग्रजी भाषाशैलीहि बदलली आहे व मराठी लेखक वर्गाचाहि संस्कृताचा अभिमान व परिचय उतरत चालला आहे. वाचकांत ज्यांना संस्कृताचा गंध नाहीं असा बराच मोठा वर्ग उत्पन्न होत आहे. या सर्वांचा परिणाम वर्तमानपत्राच्या भाषाशैलीवर व्हावा हें स्वाभाविक होय. तथापि रमणीयत्वाची आवड मनुष्यमात्रास केव्हांहि असावयाचीच. म्हणून वाचकास हवी ती माहिती पुरवीत असतां लेखकानें आपला मजकूर उपमालंकरांनीं सजविल्यास वाचकास संतोष वाटलाच पाहिजे. असला लेखक लोकप्रिय बनतो व त्याचा फायदा वर्तमानपत्रास मिळाल्याशिवाय रहात नाहीं. भाषा भपकेदार न वापरतां साधी वापरणें हा इंग्र ी शीघ्र साहित्यांत गुण समजला जातो. परंतु मराठीला इतका साधेपणा देऊन भागणार नाहीं. कारण मराठी वाचक हे लेखकाच्या करामतीचें तें अद्यापि महत्त्वाचें अंग मानतात. लेखांतील वाक्यें लहान पण जोरदार असावीं. ज्यावेळीं वाचकाचें मन एखादें वृत्त सांगून क्षुब्ध करावयाचें असतें त्यावेळीं लहान वाक्यें तो परिणाम नेमका घडवून आणतात. लिहिण्यांत कोठेंहि मंदत्व येऊं नये. तें तरतरीत असावें.

प्रारंभीं वर्तमानपत्रांचे अग्रलेख दीन अडीच स्तंभांहून दीर्घ नसत. केसरी पत्र चार पानांचें होतें तेव्हां त्यांतील अग्रलेख दोन स्तंभांच्या आंतच असत. विशेष प्रसंगीं त्यांची लांबी चार पांच स्तंभांपर्यंतहि जावी. असे प्रसंग वर्षांतून फार तर पांच-सात येत. पण काळ पत्रानें अग्रलेखांची लांबी पुष्कळच वाढविली. त्याचे कित्येक अंक अग्रलेखाशिवायहि जात. तथापि अग्रलेख आला कीं तो पांच-सहा स्तंभ सहज भरावा अर्थात् हे लेख निबंधरूप, वर्णनात्मक व क्वचित् कथारूपहि असल्यामुळें त्यांचा विस्तार प्रियच समजला जात होता. पण

प्रचलित विषयावरील सुदीर्घ अग्रलेख वाचकांना कंटाळवाणेच व्हावयाचे. म्हणून तसल्या पत्रांतून ते इतके मोठे नसत. केसरीची पृष्ठसंख्या वाढल्यावर त्यांतील अग्रलेखांनींहि आपले पाय लांब पसरले. तेव्हां केसरीचा अग्रलेख तीन स्तंभ असावा हें बहुतेक ठरल्यासारखेंच झालें. केसरी जोंपर्यंत साप्ताहिक होता तोंपर्यंत इतकी लांबी कदाचित् आवश्यकहि असेल; पण तो आठवड्यांतून दोनदां वाचकांना भेट देऊ लागल्यावर त्याचे पाय आंखडणें अपरिहार्य होतें. तथापि जुनी वहिवाट न मोडण्याच्या मनुष्यस्वभावामुळें केसरीचा अग्रलेख आटोपशीर होईपर्यंत १९३४ साल उजाडलें. हल्लीं मात्र पहिला अग्रलेख अडीच-तीन स्तंभी व दुसरा एक स्तंभी असे ठेवण्यांत आले आहेत. अग्रलेख लहान असल्यास वाचून होतात व एकाऐवजीं तितक्याच जागेंत दोन अग्रलेखांना जागा मिळाल्यानें वाचकांना दोन विषयांचा लाभ होतो.

दैनिक पत्रांचे अग्रलेख दोन स्तंभीहि नसतात. बहुधा एकाच स्तंभांत ते आटोपण्यांत येतात. केव्हां केव्हां दोन किंवा तीन अग्रलेखांना एक स्तंभ असेंहि प्रमाण पडतें. इंग्लंडांत दैनिक पत्रांतील अग्रलेखांना मराठींतील अर्धसाप्ताहिक पत्रांइतकें महत्त्व असतें. पण मराठी दैनिक पत्रें व अमेरिकन दैनिक पत्रें यांच्या अग्रलेखांत महत्त्व जवळ जवळ मुळींच उरलें नाहीं म्हटलें तरी चालेल. पंचवीस वर्षांपूर्वी अमेरिकेंत लांब व विद्वत्ताप्रचुर लेख लिहिण्याची पद्धत होती. त्यांत ऐट, विद्वत्ता व माहिती असे आणि त्यांनीं लोकमतालाहि वळण लागत असे. पण आतां ते लेख तितके वजनदार नसतात व लहानहि असतात. कारण अमेरिकेंत हल्लीं बातम्यानांच माहात्म्य आलें आहे. बातम्या देणें, लबाड्या बाहेर आणणें, कृष्णकृत्यांवर उजेड पाडणें, दुष्कृत्यें करणारास दहशत बसविणें हें तिकडील वर्तमानपत्रें आपलें कर्तव्य समजतात. वर्तमानपत्र हा व्यापार बनला आहे. पूर्वींचा संपादक अल्प प्राप्तींत संतोष

मानणारा, आपलीं प्रामाणिक मतें सांगणारा आणि देशहित-विघातक कृत्यावर व व्यक्तीवर कोरडे ओढणारा होता. हल्लींचा संपादक प्राप्तीवर लक्ष देणारा असतो. तो श्रीमंतांना व आपला पुरस्कार करणारांना खूष ठेवूं पहातो. पूर्वीच्या संपादकांना लिहिण्याला भरपूर फुरसत असे. पण हल्लींच्या संपादकांना तितकी फुरसत नाहीं व त्यांनीं लिहिलें तें पाहून वाचकांनीं आपलीं मतें बनवावीं अशीहि स्थिति उरलेली नाहीं. कारण अमेरिकेंतील वाचक इतके सुशिक्षित झाले आहेत कीं त्यांना स्वतःचीं मतें स्वतःलाच बनवितां येतात. म्हणून तिकडील वर्तमानपत्रांचा अग्रलेख दोनशें शब्दांहून मोठा नसतो व कमी उपदेशपर असतो.

अमेरिकेच्या मानानें महाराष्ट्र देश या बाबतींत किती तरी मागासलेला आहे. तथापि दोन्ही देशांतील हें अंतर लक्षांत न घेतां अमेरिकेंतील दैनिक पत्रांचें अनुकरण अंधपणानें कांहीं मराठी दैनिक पत्रें करूं लागलीं आहेत. त्यांनीं आपले अग्रलेख आंखडले आहेतच; पण जे अग्रलेख कित्येक दैनिकें अद्यापि लिहीत आहेत, त्यांत वाचकवर्गाला विचाराची दिशा दाखविण्याची जबाबदारी फारच थोड्या दैनिक पत्रांकडून ओळखली जाते. ज्यांच्यापासून त्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें पोळी मिळेल किंवा पोळी मिळण्याची आशा असेल त्याची टाळी वाजविण्यास कित्येक दैनिकें टपलेलीं असतात. ज्यांना मतेंच नाहींत अशीं कांहीं दैनिकें आहेत व जीं स्वार्थबुद्धीनें हवीं तीं मतें हवीं तेव्हां झोकून देतात अशींहि कांहीं दैनिकें आहेत. अशा दोनहि प्रकारच्या दैनिकांकडून वाचकांना सन्मार्ग तर दर्शविला जातच नाहीं, उलट वाचक वर्गाची हानि मात्र करण्यांत येत आहे. या कारणानें हिंदुस्थानासारख्या परतंत्र देशांत जनतेच्या कल्याणाचें वर्तमानपत्र हें एक जबरदस्त साधन होतें तें महाराष्ट्रांत तरी दैनिक पत्रांपुरतें बऱ्याच अंशीं कुचकामाचें ठरूं पाहात आहे.

अग्रलेख हें वर्तमानपत्राचें नाक होय. भाषाशैली व विचारसरणी या दोनहि दृष्टींनीं अग्रलेख शक्य तितका उत्कृष्ट वठविण्याचा पूर्वींचे संपादक कसून प्रयत्न करीत असत. मराठी भाषेला हल्लीं जी उन्नतावस्था प्राप्त झाली आहे तिला वृत्तपत्रांच्या संपादकांचे परिश्रमच कारणीभूत आहेत. वृत्तपत्रांनींच शिकविलेली भाषा अखिल महाराष्ट्रभर एकजात बोलली व लिहिली जात आहे. त्यांच्यापुढें प्रादेशिक भेद मोडून शुद्ध व प्रौढ अशा मराठीचा प्रचार सर्व महाराष्ट्रभर झाला आहे. याचें कारण असें कीं वर्तमानपत्रांचे मागील पिढींतील प्रमुख संपादक देशसेवेप्रमाणेंच मराठी भाषेची सेवा करण्याच्या पवित्र उद्देशानें वृत्तपत्रव्यवसायांत शिरले होते. पण हल्लीं तें मान बदललें आहे. देशसेवेच्या पवित्र भावनेला पूर्वकालाशीं तुलना करतां हल्लींच्या संपादक वर्गांत बरीच ओहोटी लागलेली दिसत असली तरी ती भावना वृत्तपत्रसंपादकांची प्रेरक शक्ति अद्यापि आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. तथापि भाषासेवेच्या बाबतींत तितकेंहि श्रेय हल्लींच्या वृत्तपत्र-संपादकांना देतां यावयाचें नाहीं. ज्यांची गणना चांगल्या लेखकांत होईल असे फार थोडे संपादक वृत्तपत्रव्यवसायांत सांप्रत आढळतात. दैनिक वर्तमानपत्रांत तर ते त्याहूनहि थोडे. लिहिण्याची त्वरा या दोषामुळेंहि कलमबहाद्दर संपादक वरगळ्यास येत नाहींत. नवीन होतकरू लेखकाला मनपसंत लेख लिहिण्यास जितका जास्ती वेळ मिळेल तितका हवा. साप्ताहिक वर्तमानपत्रांना वेळेची घाई नसल्यानें त्यांतून होतकरू व वाङ्मयभक्त लेखक आपले लेख घांसून पुसून प्रसिद्ध करीत. इतकेंच नव्हे तर इंग्रजी शब्दांना प्रतिमराठी शब्द देण्याची जबाबदारी त्यांच्यावरच पडत असल्यानें ते नवीन शब्दांची घडणहि त्याच वेळांत संपवीत. पण आतां साप्ताहिक पत्रांना अर्धसाप्ताहिक पत्रांनीं व अर्धसाप्ताहिकांना दैनिक पत्रांनीं मागें टाकण्याची शर्यत लागली आहे. पूर्वींच्या साप्ताहिक पत्रांत येत होता त्याच्या चौपट

आठपट मजकूर अर्धसाप्ताहिकांत व दैनिकांत ठासला जातो. अशा रीतीनें लेखास वेळ कमी मिळून त्याची पैदास अधिक वाढल्यानें लेखाचीं आबाळ होते व संपादकाकडून लेखनकार्य कुशलतेनें पार पडत नाहीं. म्हणून संपादकाला लेख लिहिण्यास मिळालेल्या तास, दोन तासांच्या किंवा तीन तासांच्या अवधींत लाभेल ती माहिती, सुचतील ते विचार व सांपडतील ते शब्द यावर आपलें काम भागवून घ्यावें लागतें. या कारणानें अपक्व विचार, अपुरी माहिती, गांवढळ मराठी शब्द, हेंगाडी अशुद्ध भाषासरणी व इंग्रजी शब्दांचा सुळसुळाट इत्यादि दोष मराठी वर्तमानपत्रांत अलीकडे फार आढळून येतात.

एक अंक प्रसिद्ध होऊन दुसरा अंक प्रसिद्ध होण्याच्या दरम्यान जो काळ जातो त्या काळांत राजकीयदृष्ट्या पहिल्या प्रतीच्या ठरलेल्या विषयाची संपादक अग्रलेखाकरितां बहुधा निवड करतो. अग्रलेख परिणामकारक वठावयास पाहिजे असेल तर तो लिहिण्यास प्रारंभ करण्यापूर्वी लेखकाला त्याची माहिती जमविण्यास व त्या माहितीवर विचार करण्यास भरपूर वेळ मिळणें इष्ट आहे. अग्रलेखास अवश्य ती सारी माहिती वाचून तिच्यांतील महत्त्वाच्या मुद्यांचें टांचण प्रथम करावें, ते मुद्दे डोक्यांत टाकून विषय कांहीं वेळ घोळत ठेवावा, विषयाला काय नांव द्यावयाचें याचाहि विचार त्याच काळांत सुरू असावा, विषय डोक्यांत नीट पिंजून निघाला व त्याला योग्य तें नांवहि सुचलें म्हणजे त्या नांवाला मनांत अग्रस्थान देऊन त्याच्या सभोंवार शब्दांची जुळणी करावी. अग्रलेखाच्या प्रारंभीं, मध्यंतरीं, विशेषतः शेवटीं, त्या नांवाचा उच्चार झालाच पाहिजे. अग्रलेखाचा मथळा चटका लावणारा असावा. तो एका ओळीहून अधिक लांबीचा नसावा. मथळा पाहिला कीं वाचकांस अग्रलेख वाचावासा वाटावा. अग्रलेखांत यावयाच्या मुद्यांचा अनुक्रमहि होतकरू संपादकानें कागदावर लिहून काढावा. इतकी तयारी करून संपादक लिहावयास बसला म्हणजे त्याला माहितीचा तुटवडा पडत

नाहीं व विचारातहि घोंटाळा राहात नाहीं. फक्त शब्दयोजनेची तेवढीच फिकीर उरते. कापूस चांगला पिंजून व गांठी मोडून धनुकलीनें मोकळा केला असता तरब्रेज कातान्यानें चाती फिरविण्याचा अवकाश कीं कापसाचा बारीक धागा न तुटतां सरासर निघतो. तीच स्थिति संपादकाची लेखनाच्या बाबतींत होते. विषयानुकूल व रसानुकूल शब्द त्याच्या लेखणीच्या टोंकाशीं जणूं काय गर्दी करून येतात. लेखणीचा टांक शेलका शब्द घेऊनच कागदाला चिकटतो. प्रतिभावान् संपादक नियोजित विषयांत आधींच रंगलेला असल्यानें दहापांच ओळी लेखणींतून लिहून जातात न जातात तोंच तो तल्लीन होतो व लेखाची कमान सारखी चढूं लागते. बहुधा लेखनाचा वेग ताशीं एक स्तंभ इतका पडतो. लेख एका बैठकींत न संपवितां दोन बैठकींत संपविण्याइतकी फुरसत असली तर ती अधिक इष्ट. कारण लेखाला एकदां आरंभ केला, किंबहुना निमा अधिक लिहून ठेवला व त्याजवर कांहीं वेळानें मागाहून नजर फिरविली म्हणजे त्यांत थोड्या नवीन सुधारणा करावयास सुचतात व कलेच्या दृष्टीनें त्यांतील व्यंगें काढून टाकतां येतात.

कलावान् संपादकाचें परिच्छेदाकडे कधींहि दुर्लक्ष होत नाहीं. एका स्तंभांत तीन ते चार परिच्छेद झाले पाहिजेत. याहून मोठा परिच्छेद कलावान् लेखकाच्या डोळ्यांत खुपल्यावांचून रहात नाहीं. लेख वाचकास कंटाळवाणा होऊं द्यावयाचा नाहीं हें कुशल संपादक आपलें ब्रीद समजतो. त्याकरितां त्याला कितीतरी क्लृप्त्या लढवाव्या लागतात. वृत्तपत्रव्यवसायांत एक धोका असा आहे कीं वर्तमानपत्रांतील लेखांची भाषा ठराविक बनते. पण या ठराविकपणामुळें वाचकांना लेख रटाळ, व शिळे वाटतात. ती खोड आपल्या लेखनास जडूं न देण्याकरितां मनकवडा संपादक आपल्या अग्रलेखांत एखादा ताजा टवटवीत शब्दप्रयोग, चुणचुणीत वाक्यरचना आवर्जून करतो. असे चारदोन शब्द

व वाक्यें लेखांत चमकलीं कीं वाचक तेवढ्यावरच गुंगत रहातो. लेख सजीव भासविण्याची ही एक क्लृप्ति झाला. पण ती देखील अपुरीच होय. त्याशिवाय कोठें वक्तृत्व, कोठें विनोद, काठें उपरोध, कोठें त्वेष, कोठें आवेश यांचें सौंदर्य मधून मधून झळकत गेल्यानें वाचकांस तो उपवन-विहारच वाटतो. लेखकाच्या कसरतीचें बहुतेक चीज त्याच्या भाषा-शैलीवर अवलंबून आहे. त्याच्या लिहिण्यांत अवघड, लांब व वोंटाळ्याचीं वाक्यें व दुर्बोध शब्द येतां कामा नये. वाक्य वाचतां वाचतांच त्याचा अर्थ वाचकाच्या मनांत पयःपानाप्रमाणें उतरत गेला पाहिजे हें सर्व श्रमसाध्य असल्यानें असले श्रम सुंदर लेखनाचा ज्याला हव्यास आहे असाच मनुष्य सोसतो. म्हणूनच एकंदर संपादकांत उत्कृष्ट लेखक विरळा आढळतात. उत्कृष्ट लेखकाचा विशेष गुण हा कीं त्याला लिहिण्याचा कंटाळा वाटूं नये. रोज चर्चेकरितां नवे नवे विषय संपादकापुढें येत असल्यानें अभिजात संपादकास कंटाळण्याचें कारणहि नसतें. नवा विषय पहातांच त्याला तो वाचण्याचें, त्यावरील माहिती मिळविण्याचें व त्याचा विचार करण्याचें स्फुरण चढलें पाहिजे. एखाद्या विषयाची किती माहिती मिळवावी याला अंत नाहीं व विचारांनाहि सीमा नाहीं. पण सदर विषय वर्तमानपत्रांत येण्याला मात्र कालमर्यादा आहे. हें अवधान संभाळूनच त्यानें माहिती गोळा करावयाची असते. पूर्वतयारीचें हें झालें. पण खुद्द लेखनाचेंहि तसेंच आहे. लेखांतील विचार गहन व फार असून चालणार नाहीं. वाचकास ते सहज समजतील असे पाहिजेत. कारण वाचक हा अभ्यासू नसून जिज्ञासू असतो. त्याला जगांतील व्यवहार ठोकळ मानानें समजला तरच तो समजून घेतो. ती मर्यादा लेखानें ओलांडली कीं वाचक लेखा-खालीं दडपला जाण्याच्या भीतीनें लेख गुंडाळून ठेवतो व त्या योगें संपादकाच कष्ट निष्फल ठरतात. पण अनुभविक व व्यवहारचतुर संपाद-कास वाचकांची तब्बेत संभाळण्याची खुबी माहीत असल्यामुळें उथळ-

पणा व गहनता यामधून तो आपली पाऊलवाट बिनचूक हुडकून काढतो. अग्रलेखाविषयीं थोडक्यांत म्हणावयाचें झाल्यास असें म्हटलें पाहिजे कीं तो वेळच्यावेळीं लिहिलेला, मनोवेधक माहितीवर उभारलेला, अधिकारयुक्त, विश्वसनीय, समतोल,बुद्धिमत्तादर्शक व मतप्रदर्शक असावा. जोरदारपणा व भावप्रकर्ष हेहि गुण अग्रलेखांत पाहिजेत, पण ते प्रसंग-विशेषानें; नित्य नव्हेत.

**स्फुट सूचना**

स्फुट सूचनांचा विषय अग्रलेखापेक्षां लहान व कमी महत्त्वाचा असतो. जो वृत्तान्त बातमीच्या सदराखालीं देऊन वाटेस लावतां येण्यासारखा नसतो तो स्फुट सूचने-करितां राखून ठेवण्यांत येतो. स्फुट सूचनेंत पत्रक-र्त्याला घडलेल्या वृत्तावर टीका करावयाची असते, बरें, वाईट, अनुकूल, प्रति-कूल यांपैकीं कांहीं तरी म्हणावयाचें असतें. अर्थात् त्या टीकेपेक्षां स्फुटांतील वृत्तच अधिक जागा व्यापतें. सरकारी अधिकाऱ्याचें कृत्य, चेंबर ऑफ कॉमर्ससारख्या व्यापारी सभेच्या अध्यक्षाचें भाषण, उपयुक्त कार्याला उदार धनिकाची देणगी व ठळक मनुष्याचा मृत्यु यासारख्या बातींचा स्फुट सूचनांत समावेश होतो. स्फुट सूचना निषेधपर असेल, अभिनंदनपर असेल, खेद-प्रदर्शक असेल किंवा नुसती वर्णनात्मकहि असेल. हकीकतींतील मुद्दे प्रथम थोडक्यांत जसेच्या तसे द्यावे, त्यानंतर मुद्यांचें विवरण करावें व शेवटीं त्यापासून निघणारा निष्कर्ष सांगून पत्रकर्त्यानें त्यावर आपला मत-प्रदर्शक शेरा मारावा. स्फुट सूचना शक्य तितकी संक्षिप्त, खुसखुशीत, परि-णामकारक व टोलेबाज असावी. तिच्यांत उपरोध, हेटाळणी, आवेश, त्वेष, जोर व हृदयस्पर्शीपणा यांपैकीं जो गुण साधण्यासारखा असेल तो अवश्य साधावा. स्फुट सूचना लिहितांना टीका करण्याच्या भरांत ज्या मुद्यावर टीका करावयाची ते मुद्दे वाचकांना प्रारंभीं पूर्णपणें माहीत करून न देतां एकदम टीकेची झोड उठविल्यानें वाचकास विषय न सम-

जून लिहिलेली टीका वाया जाते. म्हणून मुद्दे अवश्य दिले पाहिजेत. नवीन लेखकाकडून स्फुट सूचनेंत आणखी एक चूक होण्याचा संभव असतो. तो स्वतंत्र लेखास शोभेल अशा तऱ्हेची अघळपघळ प्रस्तावना लिहिण्याचा डौल आणतो; पण तसा डौल स्फुट सूचनेंत अस्थानीं होय. ती अगदीं सुटसुटीत, मोजक्या शब्दांत व आटोपशीर पाहिजे. शेवटचा शेरा झणझणीत मारतां आला तर ती प्रतिपक्षास चपराक दिल्यासारखी बसते. लहानसा मृत्युलेख स्फुट सूचनेंतच येतो. सदर लेखांत दिवंगत व्यक्तीच्या चरित्रांतील ठळक तेवढींच कृत्यें गोंवावयाचीं असतात.

**बातमी**

जिच्याकडे बऱ्याच लोकांचें लक्ष जातें ती बातमी. तिच्यापासून उत्कंठा, गंमत, सहानुभूति, भीति, आश्चर्य यांपैकीं कोणताना कोणता विकार उत्पन्न झाला पाहिजे. 'गोविंदरावांच्या घरांत चोर शिरला' हें खरें असलें तरी त्यांत वाचण्याजोगें कांहीं नाहीं. पण त्यापेक्षां गोविंदरावांच्या घरांत चोरानें दिवसाढवळ्या शिरून दागिन्यांची पेटी फोडली, पेटींतील दागिने चोर घेऊन जात असतां त्यास पकडणारे गोविंदराव ठार झाले, अशा वर्णनानें बातमींत एक प्रकारचें (Human interest) औत्सुक्य येऊन ती गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांना सारखी वाचनीय वाटते. म्हणूनच वर्तमानपत्रांत दंगे, राजकीय खटले, अत्याचार, अपघात, शिक्षा, देणग्या, संमेलनें यांच्या बातम्या देण्यांत येतात व लोक त्या इतर मजकुराच्या आधीं वाचून टाकतात. कित्येक वेळां कांहीं माणसें जाहिरातींत शोभणारा मजकूर वर्तमानपत्रांत बातमी म्हणून छापावयास पाठवितात. त्यांना बातमी व जाहिरात यामधील फरक न कळल्यामुळेंच त्यांजकडून ही चूक घडते. जाहिरात व बातमी यांत मुख्य फरक असा कीं जिच्यांत व्यक्तीचा फायदा असतो ती जाहिरात व जिच्यांत समाजाचा फायदा किंवा हितसंबंध असतो ती बातमी.

एखाद्या दुकानदारानें आपला माल कमी किमतीस विकावयास काढला आहे ही जाहिरात, पण एखादा मनुष्य निवडणुकीस उमेदवार आहे ही बातमी होय. पहिलींत दुकानदाराचा फायदा अधिक व दुसरींत समाजाचा फायदा अधिक; कारण दुसरींतील उमेदवार निवडून आल्यानें त्याजकडून समाजसेवा पूर्वीपेक्षां अधिक घडणार आहे. वर्तमानपत्राकडे निरनिराळ्या मार्गांनीं अनेक बातम्या येतात. त्यांतून जी निवड व्हावयाची ती, निवड करणाराची अभिरुची व शील ( Ethics ) यावर अवलंबून असते. तथापि बातमीचे बाबतींत प्रत्येक वर्तमानपत्राचें विशिष्ट धोरण असल्यानें त्यांतील लेखक त्याच धोरणानें बातम्यांच्या राशींतून ती वेंचून घेतो. बातम्यांत अशिष्ट (Yellow), क्षोभकारक (Sensational) व शिष्ट ( Conservative ) असा भेद असून प्रत्येक पत्र या तिन्हींपैकीं ज्या कोटींतील आपणास समजत असेल त्या कोटींतील बातम्या देतें. बातम्या देणारास म्हणजे वर्तमानपत्रांचे भाषेंत बोलावयाचें तर वर्तमान किंवा वर्तमानसार काढणारास मनुष्यस्वभावाची माहिती, मामुली बातम्यांमधून विशेष बातम्यांची निवड करण्याची शक्ति आणि आवश्यक कोणतें व अनावश्यक कोणतें हें ठरविण्याची पात्रता असावी लागते. त्यानें लक्षांत बाळगावयाचें तें असें कीं बातमी म्हणजे गप्प नव्हे व तिची वाचकाला गरज असली पाहिजे.

महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांना बातम्या चार मार्गांनीं कळतात. ( १ ) इतर मराठी वर्तमानपत्रांवरून ( २ ) इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रांवरून ( ३ ) असोसिएटेड प्रेस, युनायटेड प्रेस, रूटर, यासारख्या वार्ताहर संस्थांकडून व ( ४ ) पत्रव्यवहारांतून. पत्राचा एकंदर मजकूर लक्षांत घेऊन विशिष्ट पत्रानें बातम्यांकरितां कांहीं स्तंभ जागा राखून ठेवलेली असते. यासाठीं बातम्यांच्या एकंदर समुद्रांतून आपल्या गरजेप्रमाणें मोजक्या बातम्याच निवडून घ्यावयाच्या असल्यामुळें लेखक

ठळक व आपणास हव्या त्याच बातम्या गोळा करतो. विशिष्ट पत्रांना स्वतःचा म्हणून मतप्रचार असतो. त्यांना आपल्या वर्गणीदारांनाहि नाखूष करावयाचें नसतें व त्याबरोबर पत्राचा बोजहि राखावयाचा असतो. केसरी पत्रानेंच गणेशोत्सव, शिवाजी उत्सव, गीताजयंत्युत्सव इत्यादि उत्सव सुरू केले आणि पैसाफंड, रायगड स्मारक फंड यासारख्या संस्थांस प्रोत्साहन दिलें, म्हणून त्यांच्या बातम्या व वृत्तान्त केसरी प्रसिद्ध करतो; तें समजण्याची गरज वाचकांना तीव्रपणानें वाटते म्हणून नव्हे. एखाद्या गांवास स्थानिक देवतेचा किंवा शाळेचा समारंभ महत्त्वाचा वाटतो. त्याची माहिती इतरांस कळण्यांत तेथील लोकांना एक प्रकारचें भूषण असल्यानें सदर बातमी तितकी सार्वजनिक हितसंबंधाशीं निगडित नसतांहि वर्तमानपत्रें छापतात; याचें कारण आपल्या वाचकांना प्रसन्न राखणें हेंच मुख्यतः संभवतें. मोठाल्या देणग्यांच्याहि बातम्या वर्तमानपत्रांत येतात; त्यांचा हेतु देणारांची प्रसिद्धि व्हावी व सार्वजनिक कार्याकडे जनतेच्या औदार्याचा ओघ वळावा याशिवाय वेगळा नसतो.

**बातमीपत्रें**

बातमीपत्रांचा विषय एकच नसतो. परिषद व सभा यांचा वृत्तान्त, एखाद्या तालुक्यांत अगर जिल्ह्यांत हिंडून त्यांतील परिस्थितीविषयीं लिहिलेली माहिती, भूकंप, अग्निप्रलय, ज्वालामुखीचा स्फोट, थंडीच्या कडाक्यानें झालेलें नुकसान, हिंदु-मुसलमानांचा दंगा यांचा समावेशहि बातमीपत्रांतच होतो. इंग्लंड, अमेरिका या पाश्चिमात्य देशांतील वर्तमानपत्रें आपले निरीक्षक इजिप्त, पॅलेस्टाईन, सीरिया, इराक, रशिया इत्यादि देशांत पाठवून तेथील राजकीय स्थितीचें पर्यालोचन लेखरूपानें त्यांजकडून करवितात. याहि लेखांना बातमीपत्रें या नांवानेंच संबोधण्यांत येतें. अर्थात् हीं सर्व बातमीपत्रें वेगवेगळ्या प्रकारचीं व त्यांचे लेखकहि वेगवेगळ्या दर्जाचे. लहान सहान वर्णनात्मक लेख लिहिणारापासून तों

मोठ्या मुत्सद्यापर्यंत भिन्न भिन्न गुणांचे लोक या व्यवसायांत असतात. त्यांपैकीं काहीं जण योग्यतेनें वर्तमानपत्राच्या मुख्य संपादकाच्या बरोबरीचे किंबहुना त्याहूनहि श्रेष्ठ आढळतात. तथापि बातमीदार कोणत्याहि दर्जाचा असला तरी कांहीं गुण सर्वांना समान असावे लागतात. बातमीदार बुद्धिवान्, सुशिक्षित, उद्योगशील, उत्साही, मनमिळाऊ, लोकांत मिसळणारा, जरूर त्याच्याबरोबर ओळख पाडणारा व त्याला आपण होऊन भेटणारा, धाडसी, बिनचूक व खुलवून लिहिणारा, आनंदी, आशावादी, हौशी, स्वतःचें डोकें चालविणारा व टापटिपीचा असला पाहिजे.

बातमीदारानें लक्षांत ठेवावयाचे नियम येणेंप्रमाणें—त्यानें ज्या विषयावर लिहावयाचें त्याची पूर्ण माहिती मिळवावी, एखाद्यापासून पैसे घेऊन त्याच्या फायद्याकरितां खोटा मजकूर प्रसिद्ध करूं नये, गरीब व प्रामाणिक लोकांवर हल्ला चढवूं नये, आपल्या पक्षाची बाजू संभाळावी पण सत्य काय आहे तें समजून घ्यावें, स्वपक्षाचें समर्थन करतांना त्यातील सगळींच माणसें प्रामाणिक व सत्प्रवृत्त असतात असें मानूं नये, कोणताहि मजकूर नीट समजून न घेतां घाईनें लिहूं नये आणि चूक झाल्यास ती कबूल करावी.

बातमीदारास सभेची हकीकत द्यावयाची असते तेव्हां अध्यक्ष व व्याख्याता यांचीं छापील भाषणें मिळालीं तर उत्तमच. तीं मिळाल्यानंतर सभागृह, त्याची व्यवस्था, त्यांतील वक्ते व इतर व्यक्ती यांची बारकाईनें पहाणी करून त्यासंबंधाचे उल्लेखनीय विशेष आपल्या स्मरणवहींत टिपावे व ते वर्तमानपत्राकरितां लिहावयाच्या हकीकतींत गोंवून तिला सजीवपणा आणावा. बहुतेक सभांतील वक्त्यांपाशीं छापील भाषणें नसल्यानें बातमीदारास तीं टिपून घ्यावीं लागतात. सदर टांचणांत वक्त्याच्या भाषणांतील मुख्य मुद्दे, त्यानें ज्यावर विशेष जोर दिला ते मुद्दे व ज्यांच्या योगानें त्याचें भाषण

इतरांतून ओळखूं येईल त्या लकबी व शब्दप्रयोग मुद्दाम उतरून घ्यावे. नंतर जबाबदार संपादकास भेटून सभेचा वृत्तान्त किती दीर्घ द्यावयाचा हें ठरवावें व तेवढ्या जागेंत सर्व हकीकत संक्षेपानें अशी बसवावी कीं ती पाहून वाचकांना आपण सभेस समक्ष हजर असल्याचा भास व्हावा. सभेंत एकाहून अधिक वक्त्यांचीं भाषणें होतात तेव्हा प्रसिद्ध व्यक्तींच्या भाषणांचा विस्तार करावा व इतरांच्या भाषणांचा संक्षेप करावा.

**निवेदन**

सभा व परिषदा याशिवाय ज्यांचें निवेदन ( रिपोर्ट ) करावयास पाहिजे असे महत्त्वपूर्ण प्रसंग पुष्कळ येतात. त्यांचें वर्णन लिहितांना निवेदकानें आरंभ कोठून करावा व शेवट कसा लावावा याचेंहि एक तंत्रच आहे. तो इतिहासाप्रमाणें कथा सांगून संपवील तर ती वाचकाचें चित्त वेधून घेणार नाहीं. यासाठीं त्यांतील चित्तवेधक भाग पहिल्या परिच्छेदांत घालावा व नंतर सदर कथा साद्यंत निवेदावी. त्यालाच पूर्वनिर्देश ( lead ) म्हणतात. हा पूर्वनिर्देश प्रत्येक मोठ्या वृत्तान्ताच्या अग्रभागीं घालण्याची वहिवाट पाश्चिमात्य देशांत असून ती हिंदुस्थानांतहि उचलण्यांत येत आहे. या पूर्वनिर्देशाचा उपयोग शिळ्या कथेला ताजेपणा आणण्याच्या कामीं जसा होतो, तसाच एखादी कथा ठशांनीं जोडून झाल्यावर आयत्या वेळीं ताजें वर्तमान आलें तर तेंहि त्यांत घालावयास सांपडतें. उदाहरणार्थ एखाद्या गांवीं हिंदु-मुसलमानांचा दंगा होऊन त्यांत कोणा हिंदूचें घर जळालें व त्या घरांतील माणसें अंथरुणांत निजलीं असतां गुदमरून मेलीं, हा भाग पहिल्या परिच्छेदांत वर्णावा आणि मग सदर दंग्याचीं कारणें, दंग्याच्या वेळची परिस्थिति, पूर्वेतिहास व इतर कच्ची माहिती मागाहून सविस्तर लिहावी. असें केल्यानें कथेवर वाचकाचें चित्त स्थिरावून सर्व कथा नजरेखालून घातल्यावांचून त्याच्यानें रहावत नाहीं व अशा रीतीनें कथा

छापल्याचें चीज होतें. कांहीं स्थळें क्षुल्लक व अपरिचित असतांहि तेथें विलक्षण प्रकार घडून तीं एकदम प्रसिद्धीला येतात व त्या संबंधाचें वर्तमान समजून घेण्याकरितां वाचक वर्ग उत्कंठित होतो. अशा प्रसंगीं जनतेच्या मनःस्थितीशीं तादात्म्य पावून तिला काय हवें तें ओळखण्यास कल्पनेची तीव्रता व मनुष्यस्वभावाचें ज्ञान आवश्यक असतें. कांहीं प्रमुख वर्तमानपत्रें आपल्या बातमीदाराला त्या स्थळीं पाठवून कच्ची हकीकत वर्णावयास सांगतात. त्या वेळीं बातमीदारानें हें लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं वाचकापुढें तेथील दृश्य उभे करण्याची जबाबदारी आपणावर आहे. दंग्यांत गोळीबार झाला असतां तो करण्याची पोलिसांना आवश्यकता होती काय, जितका गोळीबार करण्यांत आला तितक्याची गरज होती काय, गोळीबारांत पोलिसांची चूक किती व दंगेखोरांची चूक किती इत्यादि शंकास्थानें उद्भवतात व त्यांपैकीं कित्येक वादग्रस्तहि असतात. यावर बातमीदाराच्या दृष्टीनें एकच तोड व ती ही कीं त्यानें वाचकांची समजूत नीट पटेल अशा रीतिनें ती उकलून सांगावी व जरूर तेथें चित्रें व नकाशेहि द्याव. म्हणजे वाचकांची जिज्ञासा तृप्त होऊन त्यांना समाधान लाभतें. हें काम कष्टाचें, शोधक नजरेचें व चातुर्याचें आहे यांत शंका नाहीं. पण जातिवंत लेखकास त्यासाठीं सोसावे लागणार क्लेश हेंच सुख व वाचकांनीं केलेली वहावा हेंच बक्षीस होय.

**मुलाखती**

महत्त्वाच्या व्यक्तीची किंवा एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या प्रसंगासंबंधीं मुलाखत घेऊन ती वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्याची रीत आहे. परदेशांत सार्वजनिक कार्य करून, शिक्षण घेऊन किंवा प्रवास आटोपून परत आलेल्या मनुष्यानें जे अनुभव आणिले असतात त्यांपैकीं कांहीं अनुभव जनतेस समजण्यांत तिचें हित साधतें. त्याचप्रमाणें स्वदेशां-

तील राजकारणांत, विशेषतः राष्ट्रीय सभेंत कांहीं व्यक्ती पुढारी या नात्यानें वावरतात त्यांच्यापाशींहि राजकारणांतील भावी धोरणासंबंधानें किंवा हाल-चालीसंबंधानें जगाला समजावें असें कांहीं असतें; तें त्यांजपासून विचारून घेऊन वर्तमानपत्रांत छापल्यानें त्याचे ग्राहक सदर मजकूर उत्सुकतेनें वाचतात व त्यांचें समाधान पत्राचें वजन वाढण्यास कारणीभूत होतें.

मुलाखतींतहि तऱ्हा असतात कांहीं लोक आपण होऊन आपल्या मुलाखती तयार करून वर्तमानपत्राच्या बातमीदारापाशीं छापावयास देतात. त्यात आपली प्रसिद्धी व्हावी व आपलें नांव सर्वांच्या नजरेपुढें यावें हा मुलाखत देणाराचा हेतु संभवतो. पण असलीं माणसें पाश्चिमात्य देशांत जितकीं आढळतात तितकीं आपल्या देशांत आढळत नाहींत. आपल्या देशांत मुलाखत देऊं इच्छिणारे किंवा स्वतः होऊन देणारे सांपडतात. पण त्यांनीं आपली मुलाखत तयार करून ठेवलेली नसल्यानें ते वर्तमानपत्राच्या संपादकास भेटतात व सदर संपादक किंवा त्यांच्यातर्फे दुसरा कोणी अधिकृत लेखक त्यांजपासून संभाषणाच्या ओघांत आपणांस हवी ती माहिती काढतो व ती टिपून घेऊन मागाहून स्वस्थपणानें मुलाखत लिहून तयार करतो. अर्थात् ही मुलाखत ज्याची त्यास दाखवून मगच प्रसिद्ध होते. कांहीं पुढाऱ्यांना विशिष्ट गोष्टी त्यांच्या अटकळीप्रमाणें घडण्यापूर्वीं आपली मुलाखत देणें सोयीचें नसल्यामुळें ते बातमीदारास मुद्दाम टाळूं पाहतात. अशांची भेट खटपटीनें घेऊन त्यांच्यापासून ते लपवून ठेवीत असलेली माहिती बाहेर काढण्यांत बातमीदाराचें खरें चातुर्य दिसून येतें. यासाठीं मुलाखत घेणारा मनुष्य अनुभविक, कुशल, स्वभाव जाणणारा, हिकमती, चाणाक्ष व बुद्धिमान असावा लागतो. त्याचा पोषाख नीटनेटका, वागणूक मोहक, विनयशील व रुबाबदार असावी. ज्याची तो मुलाखत घेणार त्याला तो बरोबरीचा

दिसल्यास अधिक इष्ट. बातमीदार वाद घालणारा नसावा, ऐकून घेणारा असावा. त्यानें प्रश्न अशा झोकानें विचारावें कीं, त्याला ओघाओघांत हवें तें हातीं लागावें. ज्या विषयावर मुलाखत घ्यावयाची त्याची स्थूल माहिती बातमीदारानें आगाऊ मिळवून ठेवावी. किंबहुना सदर विषयावरील सर्व मार्मिक प्रश्न आयत्या वेळीं सुचण्याचा किंवा कांहीं विसरण्याचाहि संभव असल्यामुळें प्रश्नांचें टिपण त्यानें आपल्या हातांत तयार ठेवावें म्हणजे संभाषणाचा ओघ स्वतःच्या हातीं त्याला राखतां येईल.

जसा मुलाखतीच्या विषयाचा परिचय आगाऊ पाहिजे तसेंच ज्याची मुलाखत घ्यावयाची त्याचें पूर्ववृत्त, मतें, धोरण व कार्यपद्धतीहि आगाऊ समजून घेतलेली असावी; म्हणजे मुलाखतीचें कार्य सुकर होतें. बातमीदारास मुलाखतीच्या गृहस्थांत किती तरी वैचित्र्य आढळेल. कित्येकजण मुलाखत देण्यास उत्सुक असतात तर कित्येकांना मुलाखतीचा जुलूम वाटतो. त्यांना कांहीं गोष्टींचा थांग लागूं द्यावयाचा नसल्यामुळें ते उडवाउडवीचीं उत्तरें देतात. याकरितां असा मनुष्य जें कांहीं सांगेल त्यांतील प्रत्येक शब्द बातमीदारानें काळजीपूर्वक ऐकून व टिपून घ्यावा. म्हणजे सर्वांपासून कांहीं अनुमान निघून त्याच्या मताचा अगर माहितीचा छडा लावतां येतो. तो बोलत असतांना त्याच्या मुद्रेकडे मधून मधून नजर टाकावी म्हणजे त्याचे कित्येक मनोव्यापार हेरतां येतात. सरळ प्रश्न विचारून हवी ती माहिती मिळण्यासारखी नसल्यास वांकडे प्रश्न टाकून ती काढावी. कांहीं लोकांना पाहुणचारानें खूष केल्यावर ते प्रसन्न होतात व मग माहितीची चंगळ उडते. याकरितां बातमीदारानें त्यास आपल्या घरीं चहास बोलावणें फायदेशीर. कित्येकांना मुलाखत देण्यास फुरसत नसते. आगगाडींतून एखादा महत्त्वाचा माणूस खालीं उतरला व त्याला बोलण्यास दहा पांच मिनिटेंच अवकाश असला तर तेवढ्यांतहि जो बातमीदार हवी ती माहिती काढून घेईल त्याची

खरी बहादुरी. अशा घाईच्या वेळीं तो चहा पीत असल्यास तितक्यांत माहिती काढतांना अवांतर प्रश्न विचारण्याचें सोडून मुद्याचा प्रश्न एकदम टाकून उत्तर काढणेंच शहाणपणाचें. कांहीं बडे लोक हॉटेलांत उतरतात. तेथें त्यांजभोंवतीं सिगारेटच्या धुराबरोबर गप्पा छाटणारांचा घोळका असतो. त्या घोळक्यांत घुसून बातमीदारानें गप्पाष्टकांतून जें बाहेर पडेल त्याजकडे कान देऊन आपला खिसा भरावा.

**बाहेरचे लेख**

वर्तमानपत्रांतील संपादकांच्या लेखांना त्यांच्या पत्रांत केव्हांहि अग्र स्थान मिळावयाचेंच;परंतु वर्तमानपत्रांच्या संपादकांना प्रचलित विषयांच्या मागें धांवावें लागतें; स्थिर अशा विषयावरील वाङ्मय वाचून व त्याचा सांगोपांग विचार करून लिहिण्यास त्यांना फुरसत नसते. म्हणून त्या विषयावर कोणी घर-बसल्या लेख लिहून पाठविल्यास वर्तमानपत्रकर्ते ते लेख आनंदानें छापतात. कारण सदर लेखांनीं वर्तमानपत्रांच्या उपयुक्ततेंत व वजनदारींत भरच पडते. समाजसत्तावाद, सुवर्णनिर्गत, बेकारीची मीमांसा, संततिनियमन व नवमतवाद इत्यादि विषय या प्रकारचे होत. असल्या विषयांवरील लेख वाचणारे वर्तमानपत्राच्या वाचक वर्गांत दोन टक्के जरी असले तरी हे लेख येऊं शकतात. मात्र त्याला मुख्य अट ही अशी कीं ते मुद्देसूद व आटोपशीर असावे, त्यांची लेखनशैली ठसठशीत व आकर्षक असावी. असे स्वतंत्र लेखक महाराष्ट्रांत कांहीं आहेत, पण ते धंदेवाईक नाहींत. जे लेखक लोकप्रिय आहेत त्यांचे लेख त्यांस थोडाबहुत मोबदला देऊन घेणारीं वर्तमानपत्रें आहेत, तथापि त्यांनीं तो व्यवसाय म्हणून पत्करले-ला नाहीं. कांहीं लेखक हौसेनें किंवा प्रसिद्धीच्या लालसेनें वर्तमानपत्रा-कडे लेख पाठवितात व वर्तमानपत्रकार ते लेख पसंत पडल्यास छापतात, नाहीं तर परत करतात. पण अशा रीतीनें ज्यांचे लेख यदृच्छेनें प्रसिद्ध झाले तर त्यांना बहुधा मोबदला द्रव्यरूपानें मिळत नाहीं. कीर्ति हाच

मोबदला समजून त्यांनीं खूष रहावें व ते रहातातहि. मात्र हा एक गरजू पण लायक लोकांना फुरसतींतला धंदा होण्यासारखा आहे.

**स्वतंत्र लेखक**

पाश्चिमात्य देशांत हा धंदा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालतो. तिकडे हा धंदा शिकविणाऱ्या शाळा आहेत. लंडन विद्यापीठानें त्याची मुद्दाम व्यवस्था केली आहे. सदर विद्यापीठाचा एक अभ्यासक्रम असून तो 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मध्यें शिकावयास मिळतो. किंग्ज युनिव्हर्सिटी व बेडफर्ड कॉलेज येथेंहि तो शिकवितात. ब्रिस्टल विद्यापीठ पसंतीपत्रें देतें. नवीन कल्पना चटचट उचलणें व संपादकाची लहर ( Fancy ) संभाळणें यावर त्यांचें यश अवलंबून असतें. शाळांत हा अभ्यासक्रम न शिकतांहि तयारी करतां येते. कारण सदर विषयांवरील पुस्तकें ( Manuals and Literary Guide Books ) आयतीं छापील मिळतात. अशा लेखकांस स्वतंत्र लेखक ( Free Lance ) म्हणतात. त्यांना ज्ञानाचीं सर्व क्षेत्रें खुलीं आहेत. स्वतंत्र लेखक जितका विद्वान् व विश्वविद्यालयीन पदव्या घेतलेला असेल तितका इष्टच आहे. पण अभ्यासाचा नाद त्याला इतक्याच प्रमाणांत पाहिजे कीं तो अभ्यासजड व व्यावृत्तकौतूहल होतां कामा नये. त्याच्या ठिकाणीं चोखंदळपणाहि कामाचा नाहीं. तथापि सर्व विषयांत गुडघाभर पाणी या स्थितीपेक्षां एका विषयांत नैपुण्य व तरबेजपणा असल्यास यशाची आशा अधिक. त्यामुळें कीर्ति व पैसा मिळतो. गरजू लोक तज्ज्ञ म्हणून त्याचा सल्ला घेतात व त्याबद्दल त्यास फीहि देतात. आपल्या काळचा इतिहास, त्यांतील चळवळी व प्रसिद्ध व्यक्ती, चालू उद्योगधंद्यांच्या व व्यापाराच्या मुख्य अंगांची माहिती, भाषा, अर्थशास्त्र व शास्त्रीय विषय यांचें बरेंच ज्ञान हे गुण अष्टपैलूपणास आवश्यक होत. अशा प्रकारच्या स्वतंत्र लेखकाच्या कक्षेंत

कादंबऱ्या व लघुकथा येतात. कादंबऱ्या व लघुकथा यांची गरज वर्तमानपत्रें व मासिकें याना असते. लघुकथांची शब्दसंख्या १५०० ते ७००० इतकी व दीर्घ कथांची म्हणजे कादंबऱ्यांची शब्दसंख्या दहा हजार ते बारा हजार शब्द येथपर्यंत समजण्यांत येते. चांगल्या कथेचा बाजारभाव दर हजारीं एक गिनी इतका असतो. एखाद्याला हजारीं पांच गिनी मिळाल्यास त्याला चांगलीच बरकत झाली असें मानण्यास हरकत नाहीं. एडगर वालेस व गिलबर्ट फ्रँकन हे उत्तम लघुकथालेखक ठरले आहेत.

पाश्चिमात्य देशांत इतिहास, अर्थशास्त्र व वाङ्मयविषयक चर्चा असले गंभीर विषय फार थोडे वाचक वाचतात. यावरील लेखांना भारदस्त लेख ( High brow articles ) म्हणतात. असल्या विषयांवर लिहिण्याच्या व्यवसायांत पांच स्वतंत्र लेखकांत दोनच लेखक शिरतात व त्यांतला एखादाच तग धरतो. अशा विषयावर बर्नार्ड शॉ किंवा फेवर यांनीं लिहिलें तरच लोक वाचतात. अप्रसिद्ध लेखकांचे लेख कोणी वाचीत नसल्यामुळें ते लेख छापून वर्तमानपत्रें व मासिकें यांचा खप वाढत नाहीं. लोक काय लिहिलें असतां त्यावर झटून पडतील हें ओळखून त्या विषयांचा छंद लेखकांनीं घेतला पाहिजे. ( Before we can get the public to read what we are burning to write we must first learn to write what public is burning to read.) म्हणून सामान्य लेखकानें साप्ताहिकें व दैनिकें यांतील ( Feature ) चूष विषयाकरितां मजकूर लिहावा व तो ६०० ते ८०० शब्दांपर्यंत भरेल इतका असावा. तसेंच त्यानें वर्तमानपत्राकडे वार्ता पाठवाव्या व वार्ता मोठ्या असल्यास त्यांच्या कथा लिहून पाठवाव्या. अशा लेखकास वर्षाच्या कांठीं अडीचशें पौंड मिळण्यास हरकत नाहीं.

पाश्चिमात्य पद्धतीवर चूष विषय ( फीचर्स ) देण्यास मराठी पत्रांनींहि अलीकडे सुरुवात केली आहे. कांहीं दैनिक अर्धसाप्ताहिक व साप्ताहिक पत्रें नियमितपणानें चूष विषय प्रसिद्ध करतात. त्यांतील विषयांची विवेचन-पद्धति, अनुक्रम व मोजमाप लक्षांत ठेवून स्वतंत्र लेखकानें हवा तसा मजकूर वर्तमानपत्रांस पुरविल्यास त्यांचें काम आयतें भागून लेखकास थोडीबहुत प्राप्ति झाल्यावांचून रहाणार नाहीं. कित्येक पत्रांनीं आपले बातमीदार ठळक गांवांतून नेमले असून ते बातम्या व वार्तारूप कथा त्यांस पुरवितात व त्याबद्दल कांहीं प्राप्तीहि करून घेतात. दोन तीन पत्रांचा एकच बातमीदार असल्यास त्यास प्रपंचापुरती मिळकत होऊं शकते. तथापि अजून मराठी पत्रें या बाबतींत मागें आहेत. पत्रांचा खर्च चांगल्या रीतीनें भागून बाहेरच्या लेखकांना योग्य मोबदला देण्याचें सामर्थ्य मराठी पत्रांच्या चालकांना नाहीं. म्हणून येथें स्वतंत्र लेखक वर्ग ज्या दर्जाचा निपजावयास पाहिजे त्या दर्जाचा निपजत नाहीं.

वाचकांना नवीन नवीन विषयांची चटक लावून आपला ग्राहक-वर्ग वाढविणें हें वर्तमानपत्रकर्त्यांचें कर्तव्य होय.

**खेळ व सामने** केसरी पत्रांतून सुमारें तीस वर्षांपूर्वी बुद्धिबळाचे डाव देऊन पत्राची उपयुक्तता वाढविण्याचा प्रयत्न लो. टिळकांनीं केला होता. पण तो थोड्याच वर्षांत बंद पडला. अलीकडे पाश्चिमात्य खेळांचा प्रसार या देशांत झाला असून त्याची गोडी महाराष्ट्रांत वाढत्या प्रमाणांत आहे. क्रिकेटसारख्या खेळांचे सामने पाहण्यास हजारों लोक जमतात आणि त्यांची हकीगत ऐकण्यास व वाचण्यास त्याहूनहि अधिक लोक उत्सुक असतात. या परदेशी खेळांची माहिती आपल्या वाचकांस देण्याचें महत्त्व वर्तमानपत्रांना पटलें आहे; पण त्याबरोबरच देशी खेळांची माहिती दिल्यानें व उपयुक्तता पटविल्यानें वर्तमानपत्रांना देशसेवेचेंहि श्रेय मिळणार आहे. या दृष्टीनें खेळ व

सामने यांजकरितां कित्येक प्रमुख वर्तमानपत्रांनीं रकाने राखून ठेवण्याचा उपक्रम केला आहे तो अभिनंदनीय होय.

खेळांची माहिती देणारे लेखक वर्तमानपत्रांच्या संपादक वर्गांत असतात किंवा बाहेरचेंहि असतात. हे लेखक स्वतः खेळांत प्रवीण असले तर चांगलेंच, पण सर्वच खेळांत प्राविण्य मिळविणें एका व्यक्तीस शक्य नसल्यानें त्याला त्यांची ओळख असली तरी चालेल. मुख्य मर्म हें कीं लेखकाला आपला विषय वाचनीय करतां आला पाहिजे. म्हणून त्यावर वर्तमानपत्रांतून जे लेख प्रसिद्ध होतात ते नवीन लेखकानें बारकाईनें पहावें. त्या लेखांची ढब व खुबी त्यानें मनांत भरवून घ्यावी. इतरांनीं लिहिलेले लेख वाचणें हा पहिला धडा व नंतर स्वतः लेख लिहिणें हा दुसरा धडा. सर्वमान्य अशा इंग्रजी पत्रांतून या विषयांवर नमुनेदार लेख येत असल्यानें ते कित्ता म्हणून होतकरू मनुष्यानें आपल्यापुढें ठेवावे.

वरील बाबतींत अनुभव घेण्याकरितां इंग्लंडांतील होतकरू लेखक चार-पांच वर्षें लंडनबाहेरील शहरांमधील पत्रांत घालवितात. मग लंडनच्या पत्रांत त्याना जागा मिळणें शक्य होतें. त्यानें नुसतें खेळावर लिहूनच भागणार नाहीं; सर्व संपादकीय खात्यांतून त्यानें आपली लेखणी चालविली असल्यास त्याला संपादक वर्गांत घेण्यास पत्राच्या मालकास मुळींच हरकत वाटत नाहीं. कारण खेळांचा मजकूर एका लेखकास पुरेसा नसतो व दर अंकांत तो देण्यास सवडहि असत नाहीं. याकरितां त्याला संपादकीय इतर काम करतां येणें आवश्यक होय. लघुलेखन, टाईपरायटिंग हींहि त्यानें उचलावीं. लंडनमधील क्रीडालेखकास ( Sporting Journalist ) सालीना एक हजार पौंडांची प्राप्ति होण्यास हरकत नसते. हिंदुस्थानांत इतक्या प्राप्तीची आज तरी आशा करावयास नको; मग तो दिवस उगवेल तेव्हां उगवो. लहान शहरांतील पत्रांत कांहीं दिवस काम करून त्यानंतर पुणें व

मुंबई यासारख्या प्रमुख शहरीं पत्राच्या संपादक वर्गांत शिरण्यास कोणी होतकरू मनुष्य आल्याचीं उदाहरणें महाराष्ट्रांत तरी क्वचित आहेत. असें एखादें उदाहरण दाखवावयाचें झाल्यास तें वांईचे कै. बापूजी मार्तंड अंबेकर यांचें होय. अंबेकर कांहीं वर्षें वांईस 'मोदवृत्त'पत्र आंतून चालवीत असत. त्यांत त्यांचा गुण दिसून आल्यावर पुण्याच्या ज्ञानप्रकाश पत्रांत त्यांना वार्ताहर ( Reporter ) म्हणून घेण्यांत आलें व तेथें चढत चढत शेवटीं ते सहसंपादक झाले.

**नाटक परीक्षण**

वर्तमानपत्राकडे परीक्षणासाठीं नाटकें पाठविण्यांत येतात तीं सर्वच रंगभूमीवर प्रकट झालेलीं नसतात. कांहीं नाटकें कर्ता लिहून व छापून अभिप्रायाकरितां पाठवितो व मागाहून तीं रंगभूमीवर आलीं तर येतात. पण अशा नाटकांना रंगभूमीचा योग बहुधा थोडा. नेहमीं असें होतें कीं नाटककार व नाटक मंडळ्या यांचा मेळ आगाऊच बसून प्रयोगाकरितां योग्य ते फेरबदल आधींच झालेले असतात; फार काय पण नाटक रंगभूमीवर प्रकट झाल्यावरच वर्तमानपत्रकर्त्याकडे अभिप्रायास येतें. कारण असें कीं, टीकाकारास मूळ पुस्तक वाचावयास सापडून खेरीज नाटक रंगभूमीवर कसें वठतें हें पहावयास मिळावें.

नाटकाचे परीक्षणास परीक्षक स्वतः नाटककार असेल तर परीक्षण कसून होईल व नाटकाचे गुणदोष छानून बाहेर निघतील. अर्थात् त्यांतहि मत्सर, मैत्री, वशिला इत्यादि खाजगी पटलें सत्यप्रतिपादनाच्या आड येणारीं असतील; तरी पण तीं उपेक्षणीय होत. तथापि अशा प्रकारचा टीकाकार परीक्षक संपादक वर्गांत विरळा. बहुधा हें काम नाटकें लिहिणारापेक्षां नाटकें वाचणाराकडेच येतें व तो परीक्षकहि नवथर व फारसा न मुरलेलाच मिळतो. नाटकावरील अभिप्राय तें पाहूनच लिहिलेला बरा. सामान्य प्रेक्षक नाटक पाहून बाहेर पडल्यावर नाटक आनंददायक झालें

अगर नाहीं ह्या एकाच विचाराचा पगडा त्याच्या मनावर बसलेला असतो. पण टीकाकाराला तसें करून चालणार नाहीं. त्यानें नाटक पाहिल्यापासून आनंद कां झाला याची मीमांसा केली पाहिजे. सदरहू नाटक वास्तविकास धरून आहे काय? चांगलें आहे काय? समाजास अनिष्ट वळण लावणारें नाहीं ना? ही चिकित्सा त्याच्या तपासणींतून सुटतां कामा नये. टीकाकार हा नाटक व प्रेक्षक यांचा मध्यस्थ होय. म्हणून त्याला दोघांचीहि मनोघटना व अडचणी माहीत असणें जरूर आहे. नाटक लिहिण्यांतील इंगित (Spirit) टीकाकारास कळलें म्हणजे नाटकापासून भलती अपेक्षा करण्याची चूक त्याजकडून घडणार नाहीं. कांहीं नाटकें गंभीर व कांहीं प्रहसनवजा असतात. म्हणून गंभीर कृतींची नजर प्रहसनाकडे लावून टीकाकार अभिप्राय लिहील तर तो लेखकास अन्याय केल्यावांचून रहाणार नाहीं.

कित्येक नाटकें रंगभूमीवर येत नाहींत किंवा त्या हेतूनें न लिहितां श्राव्य किंवा वाच्य म्हणून लिहिलेलीं असतात. अशा नाटकांपैकीं पहिल्याचें परीक्षण एकांगी होण्याचा संभव राहतो; पण श्राव्य किंवा वाच्य नाटकांची योग्यता त्यांतील वाङ्मयीन गुणावर असल्यानें सदर नाटकाकडे त्याच दृष्टीनें पहावयाचें असतें. नाटकांच्या टीकाकाराचें काम एकंदरीनें कठिणच. तो विद्वान् असावा, अनुभविक व उदारमनस्क असावा, त्यानें आपलें मत जपून बनवावें व द्यावें. त्याला वाङ्मयात्मक, स्वभावजन्य व तांत्रिक गुणांची अनुकूलता असावी. इतर देशी, परदेशी भाषांचें ज्ञान असल्यास त्यास त्या त्या भाषांतील नाटकांशीं प्रकृत नाटकाची तुलना करावयास सांपडते.

पाश्चिमात्य देशांत हें परीक्षणकार्य इकडल्यापेक्षां बिकट असतें. नाटकाला जाऊन रोजच्या रोज रात्रीचीं जाग्रणें करण्यास टीकाकारांना शरीरप्रकृति सुदृढ असावी लागते. इंग्लंडांत पहिल्या प्रतीचीं नाटकें एकट्या

लंडन शहरींच होतात. लंडनाबाहेरील लहान शहरांतील टीकाकारास मधून मधून लंडनमध्यें जाऊन नाट्यकलेंतील प्रगतीचा व फेरफारांचा परिचय करून घेणें इष्ट असतें. वरिष्ठ प्रतीचा टीकाकार पदरचा पैसा खर्चून फ्रान्स, इटाली व स्पेन या देशांत नाटकें पहावयास जाणें आपलें कर्तव्य समजतो. त्याची नजर नाटकगृहांत रंगभूमीवरील पात्रांवर तशीच प्रेक्षकांचा षोक, झोक, रंगढंग (Triviality and Frivolity) यांजवरहि शोधक बुद्धीनें खेळती रहाते. हे टीकाकार बहुधा स्वतंत्र पेशाचे असून त्याना बाहेरून वर्तमानपत्रकर्त्यांकडे पाठविलेल्या परीक्षणात्मक लेखापासून वार्षिक प्राप्ति एक हजार पौंडांपर्यंत होते. तिकडे संगीत टीकाकारांचा एक वर्गच आहे. पण त्याला वाव फार थोडा. त्याच्यापासून वर्तमानपत्रांना आर्थिक लाभ मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. तो संपादक वर्गांत असलाच तर पत्राचा मालक त्याचा खर्च जुलमानें सोसतो. संपादकास त्याजपासून पत्राचा दर्जा वाढत नाहीं असें वाटतें. उपसंपादकांना तो नको असतो. कारण तो पत्राची जागा अडवितो. लंडनांत असल्या संपादकाला आठवड्याला ६ गिनीपर्यंत प्राप्ति होते. आतां नाटक व संगीत या दोन्हींचें आसन हलते व बोलते चित्रपट यांनीं भरून काढीत आणिलें आहे. यांचें परीक्षण नाटकाइतकें कसून करण्याची जरुरी नाहीं. कारण त्यांतील गुण अगदींच ढोबळ असतात व त्यांची टिमकी जाहिरातीवर पोसले जाणारे वर्तमानपत्रकार सतत वाजवितात. म्हणून परीक्षणाचें हें अंग लवकरच संपुष्टांत येणार असा रंग दिसतो.

**खास बातमीदाराचीं पत्रें**

बातम्या पाठविणारे ते बातमीदार व सभा-संमेलनांची सविस्तर हकीकत लिहिणारे तेहि मराठींत बातमीदार किंवा वार्ताहर. पण त्याशिवाय खास बातमीदार म्हणून एक वर्ग आहे. वस्तुतः यांना इंग्रजींतील 'कॉरस्पाँडंट' या शब्दास साजेसा शब्द बातमीदाराच्या ऐवजीं वापरा-

वयःचा तर पत्रलेखक किंवा लेखक हाच वापरला पाहिजे; असो. सामान्य रीतीनें ज्यास वर्तमानपत्रांतून 'आमच्या बातमीदाराकडून' असें प्रारंभीं कंसांत म्हणण्यात येतें ते बातमीदार त्या त्या स्थळीं राहून वर्तमानपत्राकरितां बातमीपत्रें लिहितात. पण खास बातमीदार हा वर्तमानपत्राच्या कचेरींतून किंवा वर्तमानपत्रातर्फे विशिष्ट स्थळीं व विशिष्ट प्रसंगीं मुद्दाम पाठविण्यांत येतो. व त्या दृष्टीनें त्याजवर बातमीपत्रांतील विधानाबद्दल जबाबदारी येते. रेल्वेवरील अपघात, एखाद्या गुन्ह्याचा छडा, राष्ट्रीय सभेची हकीकत, कायदे कौन्सिलें व असेंब्ली या सारख्या संस्थांतील चर्चा, दुष्काळांतील स्थिति हीं कामें खास बातमीदाराचीं होत. मराठी वर्तमानपत्रांतील परिभाषा या बाबतींत अद्यापि ठाम झाली नसल्यामुळें खास बातमीदाराऐवजीं 'आमच्या प्रतिनिधींकडून' असाहि शब्दप्रयोग करण्यांत येतो. याला गुण म्हटले म्हणजे विद्यापीठांतील थोडेंबहुत शिक्षण, त्याच्या आधारें उत्कृष्ट लेखन-कौशल्य, सूक्ष्म अवलोकन व बिनचूक टिपण हे होत. मराठी वर्तमान-पत्रांत लेखकांचे त्यांच्या गुणाप्रमाणें वर्ग पाडावे इतकी त्या धंद्याची प्रगतीच झालेली नाहीं. या कारणानें कोणीहि मनुष्य कोणत्याहि कामाला चालवून घेतला जातो. पण इंग्लंड, अमेरिका या सारख्या पाश्चिमात्य देशात अशी अंदाधुंदी खपत नाहीं. लंडन, न्यूयॉर्क इत्यादि प्रमुख शहरांत जीं बडीं पत्रें असतात तीं आपले खास बातमीदार नीट पारखून पाठवितात. त्या पत्रांच्या कक्षेंत शिरण्यापूर्वीं लेखकाला बाहेरगांवीं तपश्चर्या करून लायकी सिद्ध करावी लागते. त्यानें मोठ्या गांवांतील वर्तमानपत्रात दोन तीन वर्षें धंद्याचा अनुभव घ्यावा, त्यांत सगळ्या प्रकारचीं कामें त्याच्या हातून जावीं म्हणजे त्याला लंडनमधील श्रेष्ठ पत्रांत नोकरी मिळते. लंडनचीं वर्तमानपत्रें त्यास आठवड्याला ९ गिनी इतकें वेतन देतात. तेथें त्यानें आपला विशेष गुण दाखविल्यावर 'खास बातमीदार' म्हणून त्याची रवानगी होते. तिकडील खास बातमी-

दाराच्या जागेचा पगार चार आंकड्यांनीं (पौंडांच्या) मोजण्याइतका मोठा असतो. सर व्हॅलेंटाईन चिरोल, हे या योग्यतेचे खास बातमीदार होत. इंग्लंडांत हायस्कुलाचें शिक्षण पूर्ण झालेल्यांना हें काम लायकी पाहून अद्यापिहि देण्यांत येतें. परंतु त्यांजपेक्षां महाविद्यालयीन शिक्षण मिळालेला अधिक लायक समजला जातो. अलीकडे ऑक्सफर्ड, केंब्रिज वगैरे विद्यापीठांचे पदवीधरहि हा व्यवसाय पत्करतात. लॉर्डासारख्या बड्या लोकांचीं मुलेंहि या धंद्यांत आतां आढळूं लागलीं आहेत; याचें कारण असें कीं सदर धंदाच तसा आकर्षक आहे. तो करीत असतां सर्व धंद्यांचीं व स्वभावांचीं माणसें भेटतात, विचित्र व विविध प्रसंग डोळ्यासमोरून जातात, त्यांच्या परिचयांत व संगतींत मन रमतें आणि बुद्धीला विचार करण्यास नवें नवें खाद्य मिळतें. मोठमोठ्या माणसांचे स्वभावविशेष, लकबी व खोडी पहात असतां सुखद व मनोरंजक अनुभव येतात. रिकामपणीं या आठवणींचा खजिना आपल्यापाशींच उघडावा व त्यांतील हवी ती चीज मनांत आणून तिजबरोबर सुखानें यथेष्ट क्रीडावें. खास बातमीदार नाना प्रांतांत व देशांत हिंडतो, तेथील हवामान व लोकरीति पहातो व अनुभवतो आणि धीट, चतुर व बोलका बनून स्वतःला व इष्टमित्रांनाहि बैठकींत खूष करतो. असली संधी लॉर्डांच्या मुलांनाहि अपूर्वाईची व दुर्मिळ वाटून ते या धंद्यांत हौसेनें शिरतात. खास बातमीदार अशा रीतीनें बहुश्रुत व लिहिण्यांत तरबेज झाला म्हणजे त्याला चांगला वर्तमानपत्रकार होणेंहि अवघड नसतें. खास बातमीदाराचें कामहि तसें बिकटच असतें. तो बुद्धिमान, चौकस, माहितगार व सुशिक्षित असला तरच जरूर त्या विषयांतील तज्ज्ञांशीं चर्चा करण्याची व हवी ती माहिती काढण्याची त्याला पात्रता येते. विषय समजून घेतल्यावर त्याची मांडणी करण्याची कला त्याला अवगत पाहिजे. त्याला मनांतील विषय कागदावर उतरण्याचे बिलकूल

कष्ट वाटूं नयेत. जसा श्वासोच्छ्वास करणें तसें लिहिणें अगदीं सहज व्हावें. तो रात्रीं दिवसां केव्हांहि लिहावयास बसो, सगळ्या वेळा त्याला सारख्याच सोयीच्या वाटाव्या.

'आमच्या खास बातमीदाराकडून', 'आमच्या बातमीदाराकडून' या मथळ्यांप्रमाणेंच 'एका बातमीदाराकडून', 'आमच्या स्वतःच्या बातमीदाराकडून' या प्रकारचे मथळे वर्तमानपत्रांतून येतात. मराठी वर्तमानपत्रें या विविध मथळ्यांत विशेष श्लेष मानीत नाहींत. त्यांच्या दृष्टीनें 'आमच्या बातमीदाराकडून' याचा अर्थ वर दिलाच आहे. सदर बातमीदार वर्तमानपत्रकर्त्याच्या माहितीचा स्थानिक मनुष्य असतो व तो दैनिकाचा बातमीदार असल्यास त्याला वेतनहि सुरू असतें. 'एका बातमीदाराकडून' म्हणजे ज्याचें नांव माहीत आहे अशा मनुष्याकडून. 'आमच्या स्वतःच्या बातमीदाराकडून' म्हणजे जो बातमीदार वर्तमानपत्रकर्त्याच्या खात्रीचा, मग तो मोफत असो किंवा पगारी असो, त्याजकडून. पाश्चिमात्य देशांत यांतील श्लेष अधिक स्पष्ट असतात. तिकडील मताप्रमाणें 'एका बातमीदाराकडून' म्हणजे विवक्षित गांवांत वर्तमानपत्र आहे, त्याच्या लेखक वर्गापैकीं जो आहे त्या बातमीदाराकडून. 'आमच्या स्वतःच्या बातमीदाराकडून', म्हणजे एखाद्या गांवांत सदर पत्राचा बातमीदार रहात असतो त्याजकडून. हे बातमीदार ज्या त्या देशांतच नव्हे तर परदेशांतील मोठाल्या शहरांतहि असतात. लंडनचीं प्रमुख पत्रें आपले पगारी बातमीदार बर्लिन, पॅरिस, वॉशिंग्टन इत्यादि शहरांतहि ठेवतात. त्यांचे परराष्ट्रीय बातमीदार हेच. इंग्लंडमधील पत्रांच्या परराष्ट्रीय बातमीदारापेक्षां अमेरिकेंतील पत्रांचे बातमीदार अधिक शहरांतून असतात. याचें कारण असें कीं इंग्लंड हा देश युरोपांतला असल्यामुळें त्याला युरोपीय राजकारणाची बारीक माहिती जितकी सहज समजते तितकी दूरच्या अमेरिकेंत समजत नाहीं. शिवाय अमेरिकेंतील

पत्रांचा वाचक वर्ग मोठा असल्यानें बातमीदारांकरितां अधिक पैसा खर्च करणें त्यांना परवडतें. म्हणून इंग्लंडचे बातमीदार न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, पॅरिस, बर्लिन येथें असले तर अमेरिकेचे बातमीदार युरोपांतील सर्व राजधान्यांत ठेवण्यांत येतात. प्राग, वार्सा, स्टाकहोम यासारख्या लहान शहरींहि त्यांनीं आपले बातमीदार नेमिले आहेत. त्याना पगारहि लठ्ठ देतात. हे बातमीदार म्हणजे वृत्तपत्राच्या व्यवसायांतील शेलकीं माणसें होत. ते वजनदार असून, त्यांचा प्रवेश राजकारणाच्या अगदीं गुलदस्तांतहि झालेला असतो. त्यांना त्या त्या देशांतील राजकीय कारस्थानांची नाजूक बातमी कळते. त्यांचीं पत्रें म्हणजे प्रचलित राजकारणावरील महत्त्वाचे प्रबंध होत. त्यांची योग्यता वर्तमानपत्राच्या अग्रलेखाहूनहि मोठी असून त्या लेखकांचा दर्जा प्रमुख संपादकाइतका समजला जातो. त्यांचीं पत्रें वाचून त्यांच्या आधारें वर्तमानपत्रांचे संपादक परराष्ट्रीय राजकारणासंबंधीं आडाखे बांधतात व अनुमानें काढतात. सर व्हॅलेंटाईन चिरोल हे लंडन टाइम्सचे परराष्ट्रीय बातमीदार असतां त्यांनीं इजिप्त, हिंदुस्थान येथील राजकारणावर लिहिलेले ग्रंथ परराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासकास न टाळतां येणारे आहेत. 'डेली एक्सप्रेस'चे एच्. जे. ग्रीनवाल, 'डेली क्रॉनिकल'चे जॉर्ज रेनविक, 'डेली न्यूज'चे जॉन सीगर या बातमीदारांस चांगल्या राजकारणी पुरुषांच्या बरोबरीचें समजण्यांत येतें. सामान्य बातमीदारांचें ज्यांनीं काम केलें आहे अशांतून यांपैकीं बरींच माणसें वर चढलीं आहेत. त्यांना लागणारे गुण म्हणजे मूळचें सुशिक्षण, नंतरचें सर्वसामान्य वृत्तपत्रीय शिक्षण, पुढें परराष्ट्रीय विषयांचा अभ्यास, आपला मजकूर चांगल्या भाषेंत लिहिण्याची आवड व भाषाप्रभुत्व, प्राप्त विषयाचा पिच्छा पुरविणें, आपणच प्रश्न व विषय उकरून काढणें, कामाचा प्रचंड भार एकदम अंगावर पडला असतां जिवापाड कष्ट करून त्याचा फडशा पाडण्याची शक्ति व कंटकपणा अंगीं असणें हे होत.

न्यूयॉर्कमधील पत्रांचे अमेरिकेंतील बातमीदार फार कष्टाळू असतात. सगळीं संयुक्त संस्थानें, खेरीज मध्य व उत्तर अमेरिका यांतील राजकीय प्रश्नांचा अभ्यास केल्यावांचून त्यांना आपलीं पत्रें समाधानकारक लिहितांच येत नाहींत. त्यांचें वाचन व्यापक, चौकशी बारीक आणि माहिती विस्तृत व खोल असते. त्यांचा वार्षिक पगार चारदोन हजार डॉलर सहज असतो. खेरीज प्रवासाबद्दलची वाटखर्चीं व भत्ताहि त्यांच्या पदरांत पडतो. आपलें मुख्य काम उरकून बाकीच्या वेळांत ते इतर पत्रांना व मासिकांनाहि लेख पुरवितात आणि त्यावर पैसा मिळवितात. हे बातमीदार वर्तमानपत्राच्या मुख्य कचेरींतूनच नेमले असल्यामुळें ते परत येण्यास उत्सुक असतात. ते एक ते तीन वर्षांच्या करारानें बाहेर गेलेले असतात व ती मुदत संपली कीं आपल्या कचेरींत परत येतात.

मुंबईच्या टाइम्स पत्रांत लंडनचीं चर्चात्मक राजकीय पत्रें प्रसिद्ध होतात व हिंदी राजकारणावरील बाहेरील लेखकांचा मजकूर छापला जातो. त्यांत इंग्लंड व हिंदुस्थान येथील राजकारणाचें केलेलें समालोचन बरेंच उच्च दर्जाचें असतें. मराठी वर्तमानपत्रांच्या खास बातमीदाराचा प्रवेश सरकारच्या खोल दरबारांत स्वाभाविकच होऊं शकत नाहीं. कारण कोणीहि सरकारी अधिकारी त्याला 'अंदरकी बातमी' देऊं इच्छिणार नाहीं. कांहीं हिंदी लोक बड्या अधिकारावर आहेत, पण त्यांची छाती असलीं पत्रें लिहिण्यास होणार नाहीं. तेव्हां ले. असेंब्ली व प्रांतिक कौन्सिलें यांजविषयीं पत्रें लिहिण्याचें तेवढेंच राजकारण त्यांच्या वांट्यास येतें. त्यावर रा. न. चिं. केळकर यांनीं लिहिलेलीं असेंब्लींतील पत्रें वाचनीय व राजकीय महत्त्वाचीं आहेत. ते स्वतः असेंब्लीचे सभासद व राजकीय पुढारी असल्यामुळें त्याना गुप्त वाटाघाटी, पक्षोपपक्षांतील वादविवाद यांची खास माहिती मिळे म्हणून तीं पत्रें वाचून

जनतेला असेंब्लींतील राजकारणाचें अंतरंग समजे. असेंब्लींत व कौंसिलांत आज महाराष्ट्रीय सभासद आहेत. पण ते व्यवसायी लेखक असतील तरच पत्रें लिहितील कीं नाहीं ? रा. श्रीपादराव टिकेकर यांनीं धाडसानें इराण, इराक वगैरे परदेशांत जाऊन केसरी, महाराष्ट्र यांना पत्रें पाठविली. तीं प्रवासवर्णनें या दृष्टीनें सरस होत. पण म्हणून त्यांना राजकारणी महत्त्व कसें येईल ? परदेशांत किंवा स्वदेशांत काय, जोंपर्यंत हिंदी मनुष्य परतंत्र आहे तोंपर्यंत त्याच्या पत्रांना, राजकारणांत प्रवेश नसल्यामुळें, राजकीय योग्यता प्राप्त व्हावयाची नाहीं.

**अभिप्राय**

पुस्तकावरील अभिप्राय हें वर्तमानपत्रांतील मजेदार सदर होय. वर्तमानपत्रांत अभिप्राय आला म्हणजे पुस्तकाचा परिचय जनतेला होऊन पुस्तक चांगलें असल्यास त्याचा खप वाढतो. म्हणून लेखक आपलीं पुस्तकें वर्तमानपत्राकडे मुद्दाम पाठवितात. वर्तमानपत्राच्या संपादकवर्गाला तीं अनायासें वाचावयास मिळून त्यांच्या ज्ञानांत भर पडते व नित्याच्या वाचनाहून निराळें वाचन झाल्यानें सहलीस गेल्याचें सुख अनुभवावयास सांपडतें. जसा वाचनाचा तसा अभिप्राय लिहिण्याचाहि आनंद. परंतु ज्यांच्या वाचनापासून आल्हाद वाटावा अशीं अभिप्रायासाठीं आलेल्या पुस्तकांत फार थोडीं पुस्तकें असतात. कादंबऱ्या, नाटकें, लघुकथा, कविता या ललित वाङ्मयांत उपवनविहाराची मजा संपादकाच्या वांट्यास यावयाची. तथापि त्यांतहि ठराविक कथानकें, ठराविक उपमा, ठराविक विषय यांचेंच भारूड बहुधा असल्यामुळें ललित वाङ्मयवाचनहि शाळेंतील विद्यार्थ्याला बेचा पाढा दहादां लिहून काढावयास सांगण्यासारखेंच जिकीरीचें होतें. याहिपेक्षां इतर नीरस विषयांवरचीं भाराभर पुस्तकें अभिप्रायाला येतात. तें काम अधिकच त्रासदायक. अगदीं माळावरचें उन्हांतलें फिरणें. इतिहास, अर्थशास्त्र, चरित्र, प्रवासवृत्त, या जातीचीं पुस्तकें अभिप्राय

लिहिणाराला उत्साहदायक वाटतात. अभिप्राय केवढे व कोणत्या पुस्तकावर द्यावे ही संपादकाच्या मर्जीची गोष्ट होय. वाचकांना मात्र विविध विषयांवरील अभिप्राय एक दोन रकान्यांत एकत्र दिसले म्हणजे मराठींतील वाङ्मयवृद्धीची योग्य कल्पना येऊन संग्राह्य पुस्तकांची खरेदीकरितां निवड करणें सोपें जातें. अभिप्राय देणें संपादकाच्या मर्जीवर तसें ते छापणेंहि मजकुराच्या सोयीवर अवलंबून असतें. म्हणून वर्तमानपत्राच्या दर अंकांत अभिप्राय न येतां चार दोन अंक टाकून ते प्रसिद्ध होतात. कांहीं वर्तमानपत्रें तो आपला विषय-विशेष समजून नेमलेल्या वारीं प्रसिद्ध करतात. ज्ञानप्रकाश पत्रानें ही प्रथा सुरू केली आहे. सकाळ पत्र अभिप्रायाबरोबर पुस्तककर्त्याचा मुखवटाहि कधीं कधीं छापून अभिप्रायाच्या सदराकडे वाचकांचें लक्ष वेधवितें. ग्रंथांतील एखादें निवडक प्रकरण छापूनहि ग्रंथाला प्रसिद्धि देण्याची वहिवाट पडत आहे. अभिप्रायापेक्षांहि हा उपक्रम केव्हां केव्हां परिणामकारक असल्यामुळें अनुकरणीय होय.

---

# प्रकरण अकरावें

# संपादकाचे अनुभव

संपादक वर्तमानपत्र चालवीत असतो व त्याचे ग्राहक सदर पत्र वाचीत असतात. पत्रांना कालाच्या गतीबरोबर एक परंपरा उत्पन्न होते व त्याच्या धोरणालाहि विशिष्ट वळण लागतें. तें माहीत असलेले वाचक परंपरा व धोरण यांजकडे लक्षपूर्वक पहातात व पत्र त्यास धरून चाललें आहे कीं नाहीं याची आपल्या मनाशीं चिकित्सा करतात. विशेषतः एक संपादक जाऊन दुसरा आला म्हणजे वाचकांचें लक्ष या बाजूकडे विशेष वेधतें. त्यांना आणखी एक कुतूहल असतें तें हें कीं नवा संपादक पूर्व-संपादकापेक्षां कमी पडत नाहीं ना ? या प्रकारचे मनोव्यापार बहुतेक वाचकांचे ठिकाणीं चालत असले तरी त्यांपैकीं स्वतः पत्र लिहून संपादकास कळविणारे वाचक आपल्या देशांत विरळा आढळतात. कारण ज्यांत आपला साक्षात् हितसंबंध नाहीं त्यासंबंधीं पत्र लिहिण्याकरितां वेळ मोडणारे व पदरचा खर्च करणारे लोक सहाजिकच थोडे. प्रस्तुत लेखकाकडे केसरीचें मुख्य संपादकत्व सन १९३२ व १९३३ या सालीं सुमारें १॥ वर्षे होतें. त्या काळांत हिंदुस्थानांत व इंग्लंडांत चिरपरिणामी व दूरगामी वृत्त घडत होतें. हिंदुस्थानांत कायदेभंगाची द्वितीयावृत्ति निघाली असून वृद्ध, तरुण राष्ट्रसभा-भक्त निर्वाणीच्या धैर्यानें कारागृहवास ओढवून घेत होते. सरकार दडपशाही कायद्यांनीं वर्तमानपत्रांना हूं कीं चूं करूं देत नव्हतें. जनता अतिशय उद्विग्न होती. हिंदुस्थानास द्यावयाच्या राजकीय हक्कांचा खल गोलमेज परिषद इंग्लंडांत भरून करीत होती. हिंदु,

मुसलमान आणि हिंदूंतील स्पृश्यास्पृश्य यांजमध्यें आगामी राजकीय हक्कांच्या वांटणीचें भांडण जुंपलें असून विधिमंडळांतील जागांच्या हिस्सेरशीसंबंधानें त्यांच्यांत एकवाक्यता होण्याची आशा संपली होती. म्हणून इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. राम्से मॅक्डोनाल्ड यांनीं ब्रिटिश मंत्रिमंडळाचा एतद्विषयक निर्णय देऊन टाकला होता. तो निर्णय म. गांधी यांना पसंत न पडून त्यापैकीं हिंदूंतील स्पृश्य व अस्पृश्य यांस उद्देशून असलेला भाग बदलून घेण्याकरितां त्यांनीं अन्नत्याग केला होता. त्या योगानें स्पृश्यास्पृश्य पुढाऱ्यांनीं पुण्यास एकत्र जमून सदर निर्णय गांधीजींस हवा तसा बदलल्यावर अस्पृश्यांना स्पृश्य हिंदूंच्या बरोबरीनें सार्वजनिक व खासगी जागांतहि वागविण्याची चळवळ गांधीजींनीं सुरू केली. त्यामुळें देशभर हलकल्लोळ माजून जनतेचीं मनें हवालदिल व क्षुब्ध झालीं. अशा या धामधुमीच्या काळांत केसरींतील लेखाकडे व मताकडे महाराष्ट्रीय जनतेनें टक लावून पहावें हें अगदीं स्वाभाविक होय.

केसरीकडे निरनिराळे लोक निरनिराळ्या दृष्टीनें पहात होते. निर्भिडपणा व स्पष्टोक्ति यांची कित्येकांना अपेक्षा होती. वाचकांत मताची एकवाक्यता नसून कांहींना गांधींची विचारसरणी ग्राह्य वाटत होती; तर कांहीं त्यांजवर एक एक डोळा वाघाएवढा करीत होते. अशी मतामतांची झुंज लागली असतां केसरीकडे द्विविध मतांचीं पत्रें यावीं यांत नवल नाहीं. त्यांतील कांहीं पत्रांचे मासले येथें देत आहें. बहुतेक पत्र-लेखकांचीं नांवें मजपाशीं पत्रावर आहेत; पण तीं प्रसिद्ध करणें शिष्टाचारास सोडून असल्यामुळें मुद्दाम टाळलें आहे

म. गांधींनीं सन १९३२ च्या सप्टेंबर महिन्यांत अस्पृश्यांकरितां प्रायोपवेशन सुरू केलें. त्या वेळीं केसरींत म. गांधी, डॉ. आंबेडकर यांसंबंधानें लागोपाठ तीन-चार अग्रलेख आले. सदर लेखांविषयीं वाचकांनीं

अनुकूल अभिप्राय पाठविले. त्यांतील कांहीं अभिप्राय पुढीलप्रमाणें—

**पत्र पहिलें**

धुळें, ता. २–१०–३२

केसरींतील गेले तीन चार अग्रलेख फारच अप्रतिम येत आहेत. हट्टच धरला तर अस्पृश्यांसच किती त्रास होईल याबद्दल आपण केलेलें विवेचन फारच मार्मिक आहे व खेडेगांवांतील लोकांस विचारतां तें त्यांस तंतोतंत पटलें आहे. हळूहळू व प्रेमानेंच या गोष्टी साध्य झाल्या तर होणार हेंच शेवटीं खरें.

‘ पापाचें फळ ’ हा लेख फारच बहारीचा आहे. त्यांतील विचार-सरणी अत्यंत योग्य आणि रास्त आहे. भीड धरण्यास तरी मर्यादा आहे कीं नाहीं ? महात्मा गांधींचा हा उपवास पाहून हातांतून अगर पोटांतून सुरी खुपसून रक्त काढून पैसे उकळणाऱ्या भिकाऱ्याची मला आठवण झाली. त्याचा त्याग व धर्म देणाराचें दान ही दोन्हीं सात्विक नव्हेत तर तामस स्वरूपाचीं होत. आपण या प्रश्नास तोंड पाडलें हें फार चांगलें झालें.

आपला

× × ×

पत्रांतील शेवटचा उल्लेख गांधींनीं उपोषणाचा नेट लावून मॅक्डोनाल्ड यांचा निर्णय बदलून घेतला या प्रसंगास उद्देशून आहे.

**पत्र दुसरें**

श्री

टिळकरोड पुणें ता. ३०-९-३२

सा. न. वि. वि.

आजचें आर्टिकल वाचून अत्यंत हर्ष झाला. याचें नांव केसरी.

कळावें हे विनंति.

आपला

×××

( हें पत्र 'हें पापाचें फळ कीं चुकीचें प्रायश्चित्त?' या लेखास अनुलक्षून आहे. सदर लेख गांधीजींनीं मॅक्डोनाल्ड यांचा करार अस्पृश्याचे बाबतींत बदलून घेतला त्यासंबंधीं होता. )

## पत्र तिसरें

श्री

इचलकरंजी, ता. १५-१०-३२

सा. नमस्कार विनंति विशेष—

केसरींतील लेख चागले असतातच. विशेषेकरून गांधींनीं उपोषण सुरू केल्यावर डॉ. आंबेडकरांवर लिहिलेला लेख मला फार आवडला.

आपला

×××

गांधींनीं मॅक्डोनाल्ड यांचा निर्णय बदलून घेतल्यावर अस्पृश्यता-निवारणाची चळवळ हातीं घेतली. सदर चळवळींत व्यावहारिक भाग किती आहे याचें विवेचन केसरींत तीन-चार अग्रलेख लिहून केलें होतें; त्यासंबंधीं खालील पत्र आलें.

## पत्र चवथें

श्री.

मुंबई, गिरगांव, ता. ३०-१०-३२

कृतानेक सा. नमस्कार वि. वि.—

ता. २५ ऑक्टोबरच्या केसरींतील अग्रलेख वाचून जें वाटलें

त्याजबद्दल चार शब्द लिहून पाठविले आहेत. माझ्या नोकरीपैकीं सुमारें दीड तप मुंबईस गेलें आहे. या अवधींत येथें राहून सर्व परिस्थितीचा विचार करून माझें मत झालें आहे तें कळवीत आहें. आपण तर फारच उत्तम तऱ्हेनें सर्व बाजूंनीं विचार करून उत्तम लिहिलें आहे यांत शंका नाहीं.

आपला

× × ×

जुन्या पत्राचा कोणी नवा संपादक झाला म्हणजे त्याच्या पात्रते-विषयीं वाचकवर्ग प्रारंभीं संशय घेतो. पत्रानें पुष्कळ वर्षांच्या सेवेनें मिळविलेल्या नांवामुळें पत्राविषयीं वाचकांना अभिमान वाटत असून, अतिप्रेमानें त्यांचें मन पापशंकी होतें. जुन्या कीर्तिमान पत्रावर अगदीं कोरा करकरीत संपादक सहसा नेमला जात नाहीं. ज्यानें बरींच वर्षें त्या किंवा कदाचित् इतर पत्रांत काम केलें आहे अशाच मनुष्याला संपादक नेमण्यांत येतें. अर्थात् तो पत्राचा लौकिक संभाळील अशी पत्राच्या मालकांची अनुभवानें खात्री झालेली असते म्हणूनच ही व्यवस्था अमलांत येते हें उघड आहे. तथापि मनुष्यस्वभाव असा आहे कीं वाचक वर्गाला तितकी खात्री वाटूं नये व मनांतून त्यानें साशंक रहावें. इतकेंच नव्हे तर वर्तमानपत्रांत जे चांगले लेख येतील ते नवीन संपादकाचे नसून जुन्या सुपरिचित व लौकिकवान् संपादकाचें असावे असाहि तर्क काढण्यास त्यांनीं कमी करूं नये. हे तर्क अगदीं अनोळखी माणसानें काढले तर त्यांत फारसें नवल नाहीं. पण ओळखी-चीं माणसेंहि त्याच घोटाळ्यांत पडलेलीं पाहिलीं म्हणजे मनुष्याच्या मनोघटनेचें गूढ सकृद्दर्शनीं उकलेनासें होतें. तथापि याचाहि उलगडा एका तऱ्हेनें करतां येतो. नवा संपादक हा चांगला लेखक असल्याविषयीं त्याच्या पूर्वचरित्रावरून बोध झाला असला तरी वर्तमानपत्र म्हटलें कीं

त्याची जबाबदारी वेगळी आहे, ती पार पाडण्यास नुसतें लेखनपटुत्व अपुरें आहे, पत्राला अनेक धाग्यादोऱ्यांवर दृष्टि ठेवून व्यवहारकुशलतेनें, राजनीतिनैपुण्यानें व दूरदृष्टीनें वागावयाचें असतें असें गृहीत मानून वाचकवर्ग त्याजकडे पहात असल्यामुळें त्याच्या मनाची खात्री लवकर पटत नाहीं.

पत्रांत कांहीं चांगलें आलें तें जुना गाजलेला संपादक दृष्टीसमोर असल्यास त्याचें, हा समज निर्मूल होण्यास दीर्घकाल वाट पहात बसलें पाहिजे किंवा कांहीं काल जुन्या संपादकाचें लेखनांत अंग नाहीं असें सिद्ध करणारा पुरावा तरी दिसत असला पाहिजे. माझ्या बाबतींत असें घडण्याची यदृच्छेनें पाळी आली. रा. नरसिंह चिंतामण केळकर हे सन १९३२ च्या आक्टोबर महिन्यांत तिसऱ्या गोलमेज परिषदेस हजर रहाण्याकरितां विलायतेस रवाना झाले. ते विलायतेस गेले असतां हिंदुस्थानांतील रोजच्या घडामोडीवर तारेनें लेख पाठवूं शकत नाहींत; येथेंच ते लिहावे लागतात असें सर्वांना मानावेंच लागलें व त्याचा प्रत्ययहि पुढीलप्रमाणें आला.

## पत्र पांचवें

श्री.

जबलपूर, ता. २४-११-३२

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि.—

व्यक्तिशः ओळख नसतांना पत्र पाठवीत आहें याबद्दल माफी असावी. श्रीयुत तात्यासाहेब केळकरांचे गैरहजेरींत केसरीचें संपादकत्व आपण यशस्वी रीतीनें चालवीत आहांत याबद्दल आनंद वाटतो. अशीच केसरीची सेवा आपल्या हातानें घडावी अशी इच्छा आहे. कळावें लोभ असावा हे विनंति.

आपला

× × ×

बरींच वर्षें विशिष्ट शिस्तींत वाढलेल्या पत्रांत लांकडा-सारखा कडकपणा येतो. पण काल व भोंवतालचे लोक बदलत असतात व त्यांच्या आवडीहि पालटतात. अशा वेळीं पत्र मागें पडूं न देण्याकरितां त्याची वेषभूषा रूपांतरण्याची आवश्यकता वाटूं लागते. रा. केळकर यांची नाविन्यप्रियता प्रसिद्ध आहे. तिला अनुसरून विलायतेहून परत आल्यावर त्यांनीं केसरीच्या सजावटींत महत्त्वाचे फेरफार करण्याचें ठरविलें. केसरीचा अग्रलेख तीन स्तंभी सामान्यतः भरे व स्फुट सूचनांनीं सात स्तंभांपैकीं चारपाच स्तंभ तरी व्यापून टाकलेले असत. पण आठवड्यांतून दोनदां निघूं लागलेल्या केसरींत ते बोजड दिसत. यासाठीं एक अग्रलेख दोन स्तंभी, दुसरा एक स्तंभी, स्फुट सूचना दोन स्तंभी आणि उरलेल्या पांच स्तंभात 'ओझरती नजर' एकस्तंभी व इतर आकर्षक मजकूर एकस्तंभी अशी सजावट करण्यात आली. ती कित्येक वाचकांना पसंत पडली. त्याचा ठोकताळा आलाहि.

## पत्र सहावें

श्री.

धुळें, ता. १०-७-३३

केसरींत दोन अग्रलेख घालण्याची व ' ओझरती नजर ' हें सदर घालण्याची योजना फार चांगली असून त्याबद्दल लोकमत चांगलें झालें आहे. ' ओझरती नजर ' या सदरांतील मजकूर वाचनीय असतो यांत शंका नाहीं. कायदेभंग—तहकूबीचे टीकाकार, पैसा नाकाराल तर पै पत्कराल, तदेकं वद निश्चित्य, कायदेभंगाच्या चर्चेची प्रस्तावना, तहाच्या मार्गांतील अडचणी वगैरे अग्रलेख तर फारच चांगले आहेत. या सर्व स्तुत्य योजनेबद्दल आपलें अभिनंदन करीत आहें.

आपला

× × ×

'पापाचें फळ कीं चुकीचें प्रायश्चित्त' हा लेख केसरीच्या बऱ्याच वाचकांना पसंत पडला याची कल्पना वरील प्रारंभाच्या पत्रावरून आलीच असेल. परंतु म. गांधी आपल्या साधुतुल्य वर्तनानें व त्यागानें बहुजन समाजास फार प्रिय झालेले. त्यांनीं सरकाराविरुद्ध केवळ राजकीय चळवळ चालविली होती तोंपर्यंत सर्व समाजाचा त्यांस पाठिंबा होता. किंबहुना धोरणासंबंधीं मतभेद असला तरी समाजाला त्या विरुद्ध तक्रार करण्यास जागा नव्हती. पण राजकारणावरचा मोर्चा धर्माकडे वळून जेव्हां त्यांनीं धार्मिक आचारविचारांत ढवळाढवळ करणाऱ्या चळवळी हातीं घेतल्या तेव्हां तोच समाज त्यांजवर उलटून विरोधास प्रवृत्त झाला. अशा आणीबाणीच्या वेळीं केसरीने लोंढ्याबरोबर वाहून जाऊं नये व आपलें ब्रीद सोडून कोकरूं बनूं नये असें सुचविणारीं कांहीं पत्रें केसरीकडे आली. हा प्रसंग मॅक्डोनाल्ड-करार बदलून घेण्याकरितां गांधींनीं प्रायोपवेशन केलें तेव्हांचा. प्रायोपवेशन सुरू असतां केसरीनें गांधींच्या बलिदानाची मुक्तकंठानें स्तुतीच केली होती. तीहि कित्येक वाचकांना न रुचून त्यांनीं केसरीला दूषणें दिलीं.

## पत्र सातवें

सोलापूर, ता. २५-५-१९३२

मी हें पत्र केसरीवर टीका करण्यासाठीं लिहीत नाहीं. मित्र म्हणून लिहीत आहें. मी केसरीचा फार जुना ग्राहक आहें......व अनुयायी आहें......केसरीचें धोरण पूर्वी विभूतिपूजनाचें नसून तत्त्वनिष्ठेचें असे. ६ एप्रिल १९३० ला मिठाच्या सत्याग्रहास गांधी निघाले तेव्हांपासून केसरी माझ्या दृष्टीला विभूतिपूजक दिसूं लागला. गांधींच्या प्रत्येक गोष्टीची स्तुतीच करावयाची, स्तुतीला अगदीं बारीक सारीक आधार मिळाला तरी घ्यावयाचा व निंद्य भाग निंदा न करतां सोडावयाचा असा केसरीचा चालू आयुष्यक्रम आहे.

...उपवासाचा समेट म्हणून एक समेट झाल्याचें आज वर्तमानपत्रांत वृत्त आलें आहे व सर्व पत्रें त्या समेटाची स्तुति करीत आहेत. हा समेट म्हणजे खरोखरच गांधींचा जय असेल तर गोष्ट निराळी. जय नसेल तर तसें निदान केसरीनें तरी लिहावें. त्या समेटाची आज वाहवा होत आहे. त्यांतहि जर गांधींची स्तुतीच आपण केली तर राष्ट्राची स्वतंत्र विचारशक्ति मरून जाईल, व्यक्तिपूजा, उपास, तपश्चरण, जीव देणें, विहिरींत उडी टाकणें हींच राजकीय शस्त्रें होतील, स्वराज्य कल्पनातीत दुरावेल. जर केसरीस उपवास अयोग्य व जय काल्पनिक वाटत असेल तर त्यानें तसें स्पष्ट लिहावें. सध्यां वर्तमानपत्रें लोकमतानुवर्ती झालीं आहेत. त्याचे ऐवजीं तीं मार्गदर्शक व्हावींत......टिळकांचा केसरी हा खरा केसरी असावा, कोंकरूं होऊं नये अशा इच्छेनें हें पत्र लिहिलें आहे.

आपला

×××

म. गांधींनीं प्रायोपवेशनानंतर अस्पृश्यतानिवारणाची मोहीम सुरू केली. स्पृश्यांनीं अस्पृश्यांना सामाजिक व धार्मिक कृत्यांत बरोबरीनें वागवावें असा गांधींचा निकराचा आग्रह होता. केसरीला अस्पृश्यता-निवारणास मिळणारें हें वळण घायकुतीचें वाटलें. त्यापासून खरें अस्पृश्यतानिवारण बाजूस राहून स्पृश्यांचीं मनें दुखविलीं गेल्यामुळें स्पृश्य समाज पूर्वीपेक्षांहि भीतीनें सकारण अधिक विरोध करील असा केसरीचा अजमास होता. त्यानें 'अस्पृश्यांचा देवालयप्रवेश', 'देवालय, जलाशय व अस्पृश्य वर्ग' 'अस्पृश्यता निवारणावर अस्पृश्योद्धार हाच उपाय' व 'विटाळाच्या उठकळेस काळाची अनुकूलता' हे अग्रलेख लिहून चळवळीच्या युक्तायुक्ततेविषयीं चर्चा केली. पहिल्या लेखांत स्पृश्यास्पृश्यांचा संबंध परस्परांशीं स्नेहभावाचा राहून स्पृश्यांनीं त्यांची देवदर्शनाची मागणी पुरवावी असें म्हटलें होतें. केसरींतील हा

लेख वाचून पंढरपूरच्या एका गृहस्थानें केसरीस ममत्वपूर्वक एक सावधगिरीचा इषारा दिला.

### पत्र आठवें

पंढरपूर ता. १५-१०-३२

सा. न. वि. विशेष —

ता. १४-१०-३२ च्या केसरींत 'अस्पृश्यांचा देवालयप्रवेश' हा अग्रलेख आलेला आहे. त्यांत श्री विठ्ठलाचे मंदिरांत अस्पृश्यांनीं जावें असे कांहीं सूचक प्रश्न आहेत. सदरहू प्रश्न हल्लींच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थितींत योग्य आहेत. त्याबद्दल कोणत्यांहि सुजाण माणसाचा मतभेद होणें शक्य नाहीं. पण येथील कट्टर सनातनी लोकांना वरील अग्रलेख थोडासा झोंबला आहे. केसरीसारख्या राजकीय मतप्रसाराच्या पत्राला ही नाजूक कामगिरी करणें मोठें कठिण आहे. पण त्याबरोबर ती केलीहि पाहिजे हेंहि तितकेंच खरें आहे. आतांशी कुठे म्हणजे म. गांधींच्या उपवासापासून किंवा 'हें चुकीचें प्रायश्चित्त कां पापाचें फळ' या अग्रलेखापासून सनातनी व दुसरे कांहीं लोक केसरीकडे थोडेसे आपलेपणाच्या भावनेनें पाहूं लागले. गांधींचे कट्टर अनुयायी सोडून राजकारणांत स्वतंत्र दृष्टीनें जे विचार करणारे आहेत ते केसरीकडे नेहमीं आपलेपणाच्या भावनेनें पहातात याबद्दल वादच नाहीं. असो.

तेव्हां वरील प्रश्न म्हणजे 'अस्पृश्यांचा देवालयप्रवेश' हा जरा थोडा निराळ्या दृष्टीनें सोडविला पाहिजे. आमच्यासारख्या माणसांना वरील प्रश्न अग्रलेखांत आला तरी चालेल आणि तो यावा असेंच म्हणणारे आम्ही आहोंत. (पण इतर दृष्टीनें पहातां) वरील विचार श्री. माटे यांच्यासारख्याच्या नांवावर प्रसिद्ध होणें बरें असें माझ्या अल्प बुद्धीस वाटतें.

आपला

× × ×

तात्पर्य हें कीं असलीं धार्मिक सुधारणेचीं मतें केसरीनें स्वतःच्या जबाबदारीवर प्रसिद्ध केल्यानें बहुजन समाजाचीं मनें दुखावलीं जात असल्यामुळें तीं अन्य मार्गानें बाहेर आणावीं.

अस्पृश्य वर्गास अस्पृश्य लेखण्याचीं जीं कित्येक कारणें आहेत त्यांपैकीं त्यांची अमंगळ रहाणी हें प्रमुख कारण होय. यासाठीं तें प्रयत्नांनीं समूळ नष्ट केल्यावांचून स्पृश्य समाज अस्पृश्यांना केवळ सामाजिक व्यवहारांतहि जवळ करणार नाहीं याविषयीं शंका नाहीं. याचा अर्थ असा कीं, आधीं अस्पृश्योद्धार झाला पाहिजे तरच अस्पृश्यतानिवारण सुकर आहे. त्या आशयाचा लेख २५ ऑक्टोबरच्या केसरींत आला. सदर लेख वाचून खालील आशयाचें पत्र मुंबईहून आलें.

**पत्र नववें**

श्री.

मुंबई ( तारीख नाहीं )

सा. न. वि. वि.—ता. २५ च्या केसरींतील अग्रलेख 'अस्पृश्यता निवारणावर अस्पृश्योद्धार हाच उपाय' वाचून परम समाधान वाटलें. विवेचनांत समतोल बुद्धि सहसा रहात नाहीं. आणि कांहीं प्रश्नांसंबंधीं वातावरण इतकें एककल्लीपणाच्या विचारानें दूषित होतें कीं, त्यावेळीं सारासार विचारहि पुष्कळांस रहात नाहीं......लोकमत बनविणें हें वर्तमानपत्रांचें काम; पण त्याऐवजीं प्रबळ लोकमत दिसेल तेंच लिहावयाचें अशी पद्धत पत्रकारानीं पाडलेली दिसते. यास कारण पत्रकारांची आर्थिक दृष्टि......सर्व प्रश्नांचा साधकबाधक विचार होऊन योग्य तो मार्ग सुचविण्याचें काम ज्यांचें आहे त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. आपण ती ओळखून सर्व लेख लिहितां हें खरोखर भूषणावह आहे.

आपला

× × ×

गांधींच्या अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीनें बहुजन समाजाचीं मनें अगदीं संतप्त झालीं होतीं. त्यानंतर त्यांचा पुत्र देवीदास व रा. राजगोपाळाचारींची कन्या लक्ष्मी यां उभयतांचा मिश्र विवाह पुण्यास कै. सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या ' पर्णकुटि ' नामक प्रासादतुल्य बंगल्यांत लावण्यांत आला. या कृत्यानें जनतेचीं मनें अधिकच खवळलीं. ही मनोवृत्ति वर्तमानपत्रांतून प्रकट झाली; त्यापेक्षां खासगी पत्रांतून अधिकच खुलेपणानें दिसली. त्यासंबंधीं वाचकांनीं अनेक पत्रें पाठविलीं; त्यांपैकीं खालील पत्र विशेष नमुनेदार आहे. लेखक स्वतःस ' अस्सल ' मराठा म्हणवितो. त्याचें पत्र बरेंच लांबलचक आहे म्हणून सबंध न देतां त्यांतील शेलकीं तेवढींच वाक्यें येथें उद्धरलीं आहेत. लक्ष्मी-देवीदास विवाह ता. १६-६-१९३३ रोजीं लागला व पुण्यास टिळक मंदिरांत पुढाऱ्यांची परिषद ता. १२-७-१९३३ रोजीं म्हणजे सरासरी एक महिन्यानें भरली. त्या दोन्ही वृत्तांवर पत्राचा रोख आहे. महाराष्ट्रीय मनाचें तें एक प्रतिबिंबच आहे.

### पत्र दहावें

( स्थळ, तारीख नाहीं )

सप्रेम नमस्कार वि. वि.

जो जातिवंत हिंदु आहे, ज्यास आपल्या धर्माचा व राष्ट्राचा स्वाभिमान आहे, अशा प्रत्येक हिंदूचें रक्त आज आपल्या समाजाचा असा चारी बाजूनें कोंडमारा होत असतां सळसळल्याशिवाय राहील काय ?......आज एकाच मातेच्या पोटीं जन्मलेले, एकाच रक्ताचे आमचे पुढारी म्हणवून घेणारे आमचेच बंधु पुढारीपणा मिळाल्यामुळें नंगानाच घालूं लागले आहेत. अशा वेळीं कोणता अस्सल हिंदु आपल्या बंधूंना सोडविण्यासाठीं जरी स्वतःच्या हृदयाचें कुर्बान करून घालावयाची पाळी आली तरी मागें पाहील ? शक्य नाहीं. आमचे राज्यकर्ते आम्हांस

आज त्रास देत नाहींत तर आज आमचे म्हणवून घेणारे. पुढारी असले म्हणून काय झालें ? आमचे म्हणावयास लाज वाटते. घाण ती घाणच. स्वतःची प्रसिद्धि होण्याकरितां नाना नवीन मतें, निरनिराळ्या चळवळी काढून आम्हालाच सांगतात 'मी तुझा भाऊ तुला सांगत आहें; का, कोणी परका का आहे ? ऐकलेंच पाहिजे. ऐकतोस का देऊं प्राण. आली ! आली ! अंतःप्रेरणा आली. देऊं प्राण? करूं उपवास ? लिंबाजीबुवा होऊं का, होऊं का !' होऊन बघा. कोणी देखील या दबकावणीला भ्यावयाचें नाहीं. राष्ट्राचे व धर्माचे अभिमानी पुढारी म्हणवून घेणारे असले समाजकंटक समाजांतून निघून गेले तर फार बरें होईल. वीज एखादे वेळीं चमकली तर लोक तिचें कौतुक करतात, पण एकसारखी जर कडाडत राहिली तर भीति वाटून लोकांना ती नकोशी होते. ......राजकारण तरी करा, नाहींतर धर्मकारण तरी करा. एक धड ना भाराभर चिंध्या करून उगीच गोधडेबुवाच्या शिष्यांत भर कशाला घालतां ?......काय दिमाख ! 'मी चातुर्वर्ण्याचा अभिमानी, मी गीतेचा पुरस्कर्ता !' आज देशाला अन्नान्न दशेला कोणी मिळविलें असेल तर यानेंच. किती घरें उजाड केलींत याचा तर पत्ताच नाहीं......धर्माचा तिसरा दिवस करून डोक्याला राख फांसून आपल्या पोराचा लग्नसोहाळा केला. कुठे तुझें पोरगें व कुठे तो तानाजीचा शूर बच्चा रायबा...

केसरीकार ! माझी आग्रहाची हीच विनंति आहे कीं केसरी हें आम्हां महाराष्ट्रीयांचें मुख्य वृत्तपत्र आहे. केसरी हें आमच्या पुण्यपुरुष टिळकांनीं काढलेलें पत्र आहे. तेव्हां आज अशा तऱ्हेनें सर्व समाजांत ज्या गोष्टीमुळें खळबळ उडून राहिली आहे त्या गोष्टीकडे लक्ष पुरवा. अशा तऱ्हेनें धर्मावर घाला आला असतां तो पुण्यपुरुष नाहीं हें आमचें दुर्भाग्य. मी जातीचा क्षत्रिय आहे, शिवाजीच्या वंशाचा आहे.....आमच्या शीलाचें रक्षण करण्याकरितां क्षत्रियाला

साजेसेंच कृत्य करण्यास आम्हां क्षत्रियास भाग पडेल......केसरीकार! गांधींस स्पेशल तारेनें कळवा कीं १२ तारखेस भरणाऱ्या पुढाऱ्यांच्या सभेस हजर राहूं नये व संदेशहि देऊं नका.

आपला

×××

वरील पत्रें सारासार विचार करणाऱ्या व खंबीर मनाच्या वाचकांचीं होत. तें गांधींच्या उपवासानें गडबडून न जाता समाजाची विचारशक्ति कायम राखण्याचे उपाय सुचवीत होते. त्यांना गांधींचा मार्ग आततायीपणाचा व चुकीचा वाटला. त्यांच्या घायकुतामुळें सामाजिक क्रांति तर होणार नाहींच, पण जनतेच्या मनाची किंचित्काल स्वस्थता मोडेल इतकेंच त्यांचें मत. तथापि कांहीं वाचक असे आढळले कीं त्यांच्या तोंडचें उपोषणाच्या बातमीनें पाणीच पळालें. त्यांपैकींच खालील गृहस्थ होत. सदर गृहस्थ गांधींप्रमाणेंच उपोषणास लागले. पण त्यांना उपोषण धकेना. त्यांचें हें पत्र अशुद्धाकडे लक्ष न देतां मुद्दाम जसेंच्या तसेंच छापलें आहे.

## पत्र अकरावें

श्रीरामसमर्थ

धरणगांव, ( तारीख नाहीं. )

"आम्ही केसरी हमेशा वाचतो. परंतु या दोनतीन तारखेच्या केसरीने फार वाईट वाटले. कारन की गांधीनी प्रायोपवेशन सुरू केले अस अक्षर मी वाचले. तोच एकदम मला थरकाप सुटला. त्याचे कारण मला काहीच समजले नाही. मी एकदम विचारात पडलो. मी फार शोध करत करत फार दूरचा विचार करून परमेश्वराकडे तोंड करून विनंती केली. गांधी दुसऱ्याकरिता व भारताकरिता किती संकट भोगतात. मी इतकी विनंति केली की परमेश्वरा हे मीराके प्रभु गीरधरनागर तुमच्याशी

इतकीच विनंति कीं गांधींना यश येवो; हेच मनांत अगदी वाटते. इतके बोलून मीं शपथ वाहीली कीं ३ दिवस मीहि प्रायोपवेशन करीन. ता. २०।२१।२२ ला दुपारपर्यंत धीर धरवला. परंतु फारच गलांडी आली. तेव्हा मी २॥ दिवसांत फक्त चार केळे खाल्ले. बाकी पानीवर राहिलो. तरी आंता माझी तबीयत ठीक आहे. कळावे.

आपला

× × ×

पत्रलेखक आडाणी दिसतो. त्याला धड शुद्ध मराठी लिहितांहि येत नाहीं. पण किती भाविक बिचारा. गांधींनीं उपवास सुरू केला म्हणून आपणहि उपवासास लागला. वर्तमानपत्रकार हा मित्र; यासाठीं त्यानें आपलें कुशल क्षेम अगत्यानें त्यास कळविलें. वर्तमानपत्रकर्त्यांकडे लोक कोणकोणत्या दृष्टींनीं पहातात त्याचें हें एक प्रत्यंतरच आहे. कित्येक वाचकांना स्वराज्याविषयीं इतकें गाढ अज्ञान असतें कीं ते स्वराज्य म्हणजे मंडईतली भाजी समजतात. खालील लेखक त्यांपैकीं दिसतात. त्यांचें मूळ पत्र इंग्रजी असून, येथें भाषांतररूपानें दिलें आहे.

## पत्र बारावें

मुंबई, २५-९-१९३२

“ येरवडा मंदिरांत जाऊन महात्माजींस भेटा व त्यांना स्वराज्य किंवा पूर्ण स्वातंत्र्य मी ११ डिसेंबर रोजीं खास मिळवून देतों म्हणून सांगा असें मी तुम्हांस लिहिलेलें पत्र पूर्वी पोंचलेंच असेल. मात्र त्यांनीं आपला उपवास थांबविला पाहिजे व स्वराज्याखालील हिंदुस्थानांत आणखी वीस वर्षेपर्यंत जगण्याचें कबूल केल पाहिजे. आमचे देह भिन्न असले तरी आत्मा एकच आहे हें आम्हांस ठाऊक नसल्यामुळेंच स्वराज्यांतील लढाईत आपला पराभव झाला हीहि गोष्ट त्यांस सांगा. राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांत आमच्या प्राचीन धर्माचा अल्पसा अंश जर आम्हीं

आमला असता तर दहा वर्षांमागेंच आम्हांस स्वराज्य मिळूनहि गेलें असतें. पण सध्यांच्या काळांत प्रत्येकाला कीर्ति व धन पाहिजे. देवाची गरज कोणासच नाहीं.

महात्माजींनीं आपलें उपोषण एकदम थांबविल्यावांचून मी स्वराज्याच्या धार्मिक व राजकीय चळवळीस सुरुवात करणार नाहीं असेंहि त्यांस सांगा "

वरील पत्रावर सही कोणाची ? तर, मोहनदास करमचंद गांधी यांची ! पत्राचें अक्षर वळणदार व मोठें असून इंग्रजी भाषाहि शुद्ध आहे. यावरून शहाण्यासुर्त्या या माणसाचें डोकें गांधींच्या प्रायोपवेशानानें ठिकाणावर राहिलें नाहीं असेंच वाटतें.

गांधींच्या उपदेशानें गेल्या एकोणीस-वीस वर्षांत अहिंसायुक्त मार्गांनीं स्वराज्य संपादण्याच्या मताचा प्रसार देशभर बराच झाला आहे. त्या मतानें ज्या कित्येकांचीं मनें भारलीं आहेत त्या कोटींतीलच खालील पत्रलेखक दिसतात. त्यांचा प्रकार गगनाला गवसणी घालण्यापैकींच होय. जगांत सर्वत्र शांतता राखावयाची कोणी ? तर, बलाढ्य राष्ट्रांनीं व राजेरजवाड्यांनीं. त्यासाठीं त्यांजकडे अर्ज जावयाचा कोणाचा ? तर, हिमालयाजवळील डेहराडून जिल्ह्यांत हृषीकेशापाशीं मुनीकीरेती या गांवीं वास करणाऱ्या एका महाराष्ट्रीय ब्राह्मणाचा. आणि तो प्रसिद्ध व्हावयाचा कशांत ? तर, पुण्यांतील केसरी पत्रांत. कशाचा कशाशीं संबंध ! पत्र जसेंच्या तसेंच दिलें आहे.

## पत्र तेरावें

चक्रवर्ती

शनिवार, मुक्काम मुनीकीरेती.

"विनंति अर्ज समस्त जगांतील लोकांस व राजे व सम्राट राजे यास विनंति अर्ज करतो कीं—या पुढें जगात लढाई कायमची बंद करणे

इस्ट आहे. कारण आज लाखो वर्षे लढाईमुळें मनुष्यांचे जीवन दुःखमय झाले आहे. म्हणून मनुष्याचे ज्ञानरक्षणासाठी व कल्याणासाठी ही पशु-तुल्य लढाई कायमची कायद्याने बंद झाली पाहिजे. जोपर्यंत या जगांत हजारो राजे आहेत तोपर्यंत ही लढाई कायम रहाणार. म्हणून लढाई कायमची बंद करण्याकरिता सर्व जगाचा एक राजा ऊर्फ चक्रवर्ती प्रेसि-डेंट असणे योग्य आहे. जो पर्यंत सर्व जगाचा एक राजा नेमला जाणार नाहीं तो पर्यंत जगांत केव्हांहि शांति येणार नाहीं. म्हणून सर्वच मनुष्य लोकास प्रार्थना करतो कीं शक्य तितुके लवकर एक राजा नेमण्याची व्यवस्था करावी. असें झालें असता जगांतील सर्वत्र मनुष्यांचे कायम कल्याण होईल. आकाशांत सूर्य एक तसे भूमीचा मालक एक चक्रवर्ती असणे योग्य आहे. तेव्हां हें कार्य जगकल्याण करणाऱ्यांनी तावडतोब हाती घ्यावे अशी प्रार्थना आहे.

"महात्मा गांधींनें हें कार्य हातीं घ्यावे किंवा शांतितत्वाचे जे भोक्ते असतील त्यांनी हे कार्य हाती घ्यावें."

सदर लेखक जगांत एकछत्री राज्य स्थापन झाल्यापासून होणारे फायदेहि सांगण्यास विसरला नाहीं. तो ते पुढीलप्रमाणें सांगतो.

"१ सर्व जगांत बंधुप्रेम वास करूं लागेल.
२ मनुष्य प्राणी बरोबर शंभर वर्षे जगूं लागेल.
३ धर्माधर्माची लढाई होणार नाहीं.
४ सर्वत्रांस कायदा एकच राहील.
५ मनुष्यजातीचा उद्धार होईल.
६ सर्व जग अहिंसक बनेल.
७ धनधान्याची स्वस्ताई होईल.
८ दूधदहीं विपुल मिळेल.
९ स्वराज्य एका क्षणांत मिळेल.

१० महारांचा विटाळ तत्काळ निघून जाईल.

११ सर्वांचे धर्म योग्य तऱ्हेनें चालतील.

१२ विमानमार्ग जगभर सुरू होईल.

१३ कोणी कोणाचे धर्मांत जाऊं नये व कोणी कोणास घेऊं नये हें कायद्यानें होईल.

१४ सर्व धर्मांतील राक्षसी चाली राजकायद्यानें बंद पडतील. प्रेमाचा पूर लोटेल. परमेश्वर आश्चर्य करूं लागेल व सर्वत्रांस आशीर्वाद देईल. असे हजारों फायदे मनुष्य जातीला होणारे आहेत.

पुढें सवडीनें दुसरा अध्याय लिहीन. कळावें लोभ करावा हे विनंति."

आपला

× × ×

हिमालयाच्या पायथ्याशीं, गंगेच्या पवित्र तटाकीं व हृषिकेशा-सारख्या रमणीय स्थळीं शांतिसुखाचा आस्वाद घेत असतां पत्रलेखकास वरील विशाल स्वप्न पडलें आहे. त्यांत स्वप्नांतल्याप्रमाणेंच किती तरी विसंगत व परस्परविरुद्ध विधानें आलीं आहेत.

म. गांधी येरवड्याच्या तुरुंगांत असतां श्वेतपत्रिका प्रसिद्ध झाली. ती गांधींना तुरुंगांत वाचावयास मिळणार नाहीं व हिंदुस्थानाला ब्रिटिश सरकारनें देऊं केलेले नवीन राजकीय हक्क गांधींना कळणें इष्ट आहे, म्हणून सदर पत्रिका मिळण्याकरितां गांधींतर्फे कोणी तरी अर्ज करण्याची आवश्यकता असल्याचें गांधींच्या एका भक्तास सांगण्यांत आल्यावरून नव्या दिल्लीस हिंदुस्थान सरकारच्या गृहमंत्र्याकडे त्यानें तो अर्ज पाठविला. त्याची बातमी केसरीसारख्या पत्रांत न आली तर जगांत अपेक्षित लौकिक व्हावयाचा नाहीं अशा

संशयानें त्या अर्जाची नक्कल केसरीकडे भक्तानें रवाना केली. तिच्यांतील इंग्रजी मजकुराचा तुर्जुमा येणेंप्रमाणें.

### पत्र चौदावें

असोदें ता. जळगांव पूर्व खानदेश, ता. २८ मार्च १९३३

नामदार साहेबांस—

रा. गांधी येरवड्याच्या तुरुंगांत आहेत. त्यांना श्वेतपत्रिकेवर विचार करणें जरूर असल्यामुळें त्यांजकडे तिची एक प्रत पाठविण्यास मी एक नागरिक या नात्यानें आपणास विनंति करीत आहें. अशा प्रकारचा अर्ज आपणाकडे आल्यावांचून आपण प्रत पाठविणार नसल्यानें हा अर्ज केला आहे.

आपला

× × ×

बहुधा कोणत्याहि प्रश्नाला दोन बाजू असतात हें लक्षांत ठेवल्यास आणीबाणीच्या प्रसंगीं संपादकानें विशिष्ट मत प्रतिपादन केल्याबद्दल एका पक्षाकडून जशा ओव्या गाइल्या जातात त्याचप्रमाणें प्रतिपक्षीयाकडून येणारा दोषहि पत्करावा लागतो. येरवड्याच्या स्पृश्यास्पृश्य करारानंतर केसरीनें 'पापाचें फळ कीं चुकीचें प्रायश्चित्त' हा लेख लिहिला. तो ज्यांना पसंत पडला नाहीं त्यांचीं पत्रें आलीं त्यांपैकीं टीकेचा मासला म्हणून नमुन्यादाखल दोन पत्रें देत आहें.

### पत्र पंधरावें

वणी, जि. यवतमाळ

ता. ३-१०-१९३२

कृ. सा. न. वि. वि.—आपला गेल्या शुक्रवारचा अंक शनिवार ता. १ ला हातीं पडल्यापासून आतांपर्यंत ज्या अनेक स्नेह्यासोबत्यांच्या गांठी पडल्या त्या सान्यांच्या तोंडून त्या दिवशींच्या केसरीच्या अग्र-

लेखासंबंधानें अत्यंत असमाधानकारक अभिप्राय ऐकण्यांत आले. मीहि तो लेख वाचतांच माझाहि अभिप्राय कांहींसा अप्रियतेकडेच झुकला होता. परंतु त्याबद्दल विशेष चिकित्सा करण्यासारखी माझी प्रकृति नव्हती. पुढें लोकांचे उद्गार ऐकल्यावर पुनः लेख वाचून पाहिला. त्यावर समजून आलें कीं केसरींतील अग्रलेख 'पापाचें फळ कीं चुकीचें प्रायश्चित्त' हा अत्यंत अप्रस्तुत व अत्यंत अनुचित खरोखरच आहे. कारण त्यांत वादग्राह्य विधानें केलीं आहेत.—१ महात्माजींस लहरी म्हटलें आहे. २ महात्माजींवर एक प्रकारचा झांकीव सत्यापलापाचा आरोप केला आहे. ३ नवीन कराराच्या जबाबदारीचा महात्माजींवर विनाकारण अधिक्षेप केला आहे. ४ स्पृश्य हिंदु समाजाची नागवण होण्यास महात्माजींची चूक कारण म्हटलें आहे. ५ अस्पृश्य हिंदूंच्या दैन्याबद्दल स्पृश्य हिंदु समाज जबाबदार नाहीं अशी अंगझाड केली आहे.

या सर्व गोष्टी खऱ्या नाहींत.

आपला

×××

कित्येक वाचक महत्त्वाच्या प्रसंगीं वर्तमानपत्रांतील लेखांतून मुद्यांची निवड काढून कसा कीस पाडतात याची कल्पना या एकाच दाखल्यावरून येणारी आहे.

आणखी एक पत्र त्याच धर्तीचें व त्याच लेखावरचें आहे. पण त्यांतील कांहीं मुद्दे वाचकांच्या लक्षांत सहज येण्याजोगे नसल्यामुळें ते वगळून बाकीचा भाग उतरून घेतला आहे.

**पत्र सोळावें**

मोडनिंब (जि. सोलापूर)

ता. ६–१०–१९३२

गांधीजी साधू आहेत असें म्हणून त्यांस व्यवहार कळत नाहीं

असें भासविणें म्हणजे त्यांस मूर्खांत अगर वेड्यांत काढणें नव्हे काय ? शुद्ध दृष्टीनें केसरीकार विचार करतील तर त्यांस गोष्टी निराळ्या स्वरूपांत दिसल्याशिवाय रहाणार नाहींत.

आपला

× × ×

वर्तमानपत्राची निंदा करण्यास कित्येकदां निराळ्या कारणांनींचें प्रेरणा मिळालेली असते. कोल्हापुरास साहित्य संमेलन सन १९३२ सालच्या डिसेंबर महिन्यांत झालें; त्यावर जानेवारीच्या पहिल्या अंकांत केसरींत अग्रलेख आला. त्यांत कै. छत्रपती शाहूमहाराज व विद्यमान राजाराम महाराज यांच्या कारकिर्दीची तुलना करून राजाराम महाराजांची कारकिर्द एकंदरीनें बरी असें म्हटलें होतें. अर्थात् राजाराम महाराजांना बरें म्हणण्यानें शाहूमहाराजांकडे दोष आलाच. शाहूमहाराज हे तर ब्राह्मणेतरांचे-मराठ्यांचे उद्धारकर्ते. तेव्हां कोल्हापूरच्या कांहीं उपद्व्यापी मराठ्यांना ही तुलना कशी रुचावी ? म्हणून त्यांनीं केसरीच्या निषेधाची जाहीर सभा भरविण्याचें ठरविलें. त्या सभेचीं हस्तपत्रकें कोल्हापुरांत जिकडे तिकडे वांटली गेलीं. पत्रकावर चोवीस वकील-डॉक्टरांच्या सह्या घेतल्यावर सभा भरण्यापूर्वींच तिला 'जंगी जाहीर सभा' या विशेषणांनीं उठाव आणण्यांत आला. पत्रकांत पुढील मजकूर होता :

'पुण्याच्या केसरी पत्रानें ता. ३ जानेवारीच्या अंकांत 'साहित्य संमेलनाचें पर्यालोचन' या मथळ्याखालीं अग्रलेख लिहून करवीरस्थ जनतेची, नगर वाचन मांदिराची व कै. राजर्षि शाहूमहाराजांची जी निष्कारण बदनामी केली आहे त्याबद्दल त्याचा जाहीर निषेध करण्याकरितां आज रोजीं सायंकाळीं ६ वाजतां येथील महालक्ष्मीचे आवारांतील रामाचे पारावर सभा भरणार आहे. तरी सर्व नगरवासीयांनीं या सभेस अगत्यपूर्वक येणेंचें करावें. कळावें. ता. १०-१-३३'.

पत्रकावरील सह्या मनापासून नव्हत्या हें सभास्थळीं सभेची दैना दृष्टीस पडली तेव्हां कळून आलें. आधीं वेळेवर लोक आले नाहींत. लोक उशिरां आले ते अगदींच थोडे होते. व त्यांत सह्या करणारांपैकीं फारच कमी होते. अशा रीतीनें तिचा बोजवारा उडाला.

वर्तमानपत्रावरील बरेचसे टीकाकार मत्सरग्रस्त असतात. मत्सर अनेक कारणांनीं उद्भवतो. जातिमत्सर हें एक महत्त्वाचें कारण आहे. विशिष्ट पत्र अमूक एका जातीच्या लोकांनीं चालविलें आहे, एवढेंच निमित्त त्याचा द्वेष करण्यास कित्येक क्षुद्र व संकुचित दृष्टीच्या लोकांना पुरतें. ब्राह्मण पत्रकर्त्याचा द्वेष ब्राह्मणेतर जातींतल्या व्यक्तींनीं करावा व चित्पावन ब्राह्मणांना देशस्थ वगैरे पोटजातींतल्या इसमांनीं पाण्यांत पहावें असें वारंवार घडतें. या द्वेषानें मनांत ते नेहमींच जळतात, पण तो व्यक्त मात्र प्रसंगानेंच केला जातो. आतां शिक्षणप्रसारानें व अनुभवाच्या फटकाऱ्यांनीं द्वेष कमी होत चालला आहे हें वेगळें. जातिमत्सराचें एक उदाहरण वर दाखविलेंच आहे. खालीं तसलेंच दाखले देत आहें.

सारस्वत ब्राम्हण जातींतील रा. नारायणराव देसाई, प्रसिद्ध टोपीवाले व्यापारी, यांच्या सन्मानाची हकीकत सन १९३३ सालीं केसरींत प्रसिद्ध झाली होती. त्या समारंभास हजर असणारांत सावंतवाडी संस्थानाचे माजी कारभारी ( ॲडमिनिस्ट्रेटर ) दिवाणबहादुर राणे होते. त्यांचें नांव केसरींत आलेंच होतें; परंतु त्यांच्या नांवामागें श्री. हें उपपद होतें, ' दि. ब. ' नव्हतें. वर्तमानपत्रकार हा कांहीं पदव्यांचा नोंदणीकामगार नव्हे कीं त्याला प्रत्येक व्यक्तीस मिळालेल्या पदवीची बित्तंबातमी असावी. ज्यांचीं नांवें वारंवार सार्वजनिक कार्यामुळें वर्तमानपत्रांतून आढळतात, त्यांच्या पदव्या पत्रकारांच्या लक्षांत सहज रहातात. पण ज्यांचें नांव चुकून वर्तमानपत्रांत यावयाचें व तेंहि नुसती हजेरी लावणारांत, त्यांची पदवी पत्रकर्त्याला माहीत नसली तर सदर

गृहस्थ स्वतःचा ज्ञातभाई नाहीं म्हणून तिजकडे त्यानें बुद्ध्या दुर्लक्ष केलें असें कोणी न्यायी मनुष्य मानील काय ?

## पत्र तरावें

मुंबई, २६-९-१९२२

वि. वि.—तुम्हांस चित्पावनेतर ज्ञातींतील मोठ्या लोकांविषयीं अक्षम्य अज्ञान असतें, असें म्हणतात आणि या आरोपाचा तुम्हांस विषाद वाटतो. परंतु तो आरोप किती योग्य आहे याचा पुरावा केसरीच्या आजच्या अंकांत आहे. तुम्ही श्री. नारायणराव टोपीवाले यांच्या सन्मानाची जी हकीकत दिली आहे तींत सदरहू समारंभास हजर असणाऱ्यांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांत सावंतवाडी संस्थानचे पूर्वीचे ॲडमिनिस्ट्रेटर ‘ श्री. राणे ’ असें म्हटलेलें आहे. सदरहू गृहस्थ ‘ दिवाण बहादुर ’ आहेत याची तुमच्यासारख्या मराठींतील प्रमुख पत्रकाराला माहिती नसावी हें आश्चर्य आहे. ज्या पत्रकाराला स्वजातींतील आहिताग्नि आणि निहिताग्नि कोनाकोंपऱ्यांत असले तरी दिसतात त्याला इतर जातींतील मोठे लोक दिसावेत कसे ? माझा आणि दि. ब. राण्यांचा ज्ञातीचा किंवा कसलाच संबंध नाहीं. परंतु To give one one's due म्हणून पत्र लिहिलें. कळावें.

या पत्राच्या शेवटीं दिलेला निर्वाळा खोंचदार आहे. हें सर्व लिहिणें जर निष्पक्षपाती तर पत्राच्या शेवटीं आपलें नांव व सही घालण्याचें सदर टीकाकारानें कसें टाळलें ? असलें तर नीतिधैर्य ! पुढील पत्र देशस्थ ब्राह्मणाचें आहे. हे गृहस्थ एका पोटज्ञातिविशिष्ट संस्थेंत अधिकाराच्या जागीं होते. त्यांत कित्येक देशस्थांना चित्पावनांविषयीं वाटणारा द्वेष व्यक्त झाला आहे.

## पत्र अठरावें

श्री.

कसबा, पुणें. तां. २०-७-१९३३

सा. न. वि. वि.

ता. २१ च्या म्हणजें आजच्या केसरीच्यां अंकांत 'ब्राह्मण पोटं-जाति संस्था' असणें हें ब्राह्मण जातीच्या दृष्टीनें घातुक आहे व त्याबद्दल 'देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था' जबाबदार आहे असें विधान केलें आहे. वरील विधानावरून असें म्हणणें भाग आहे कीं आपण एक तर आज-पर्यंतच्या परिस्थितीचा ( अर्थात् ब्राह्मण जातीच्या फक्त ) विचारच केलेला दिसत नाहीं; किंवा 'देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था' निघाल्यापासून आपले मनांत मत्सर उप्तन्न झालेला आहे असें म्हणणें भाग पडतें. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था ही पूर्ण विचारानें व सर्व योग्य अशा दे. ऋ. ब्राह्मणांचा सल्ला घेऊनच कांढलेली आहे. वास्तविक अशी संस्था असणें मलासुद्धां पसंत नाहीं. परंतु चित्पावन ब्राह्मणांचें देशस्थ ब्राह्मणांशीं होणारें वर्तनच या संस्थेच्या स्थापनेला जबाबदार आहें अधिकारावर असलेल्या चित्पावन ब्राह्मणांनीं जागा रिकामी झाल्यास कोंकणांतील चित्पावनाला बोलावणें करणें, धर्मार्थ असणाऱ्या संस्थांमध्यें चित्पावनांचाच फक्त शिरकाव करणें, आनंदाश्रम, केसरी-मराठा सारख्या संस्था फक्त चित्पावनाकरितां राखून ठेवणें, चार चित्पावन ब्राम्हण एके ठिकाणीं गप्पा मारीत बसले असतां देशस्थ ब्राम्हणांची अवास्तव निंदा करणें, खुद्द आपल्याविषयीं म्हणावयाचें तर एखादा फासका फुसका चित्पावन ब्राम्हण एखाद्या परीक्षेंत पास झाला तर त्याचा गाजावाजा करणें, फोटो देणें, पण एखादा देशस्थ जरा अवघड अशा परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिला आला तरी त्याचा नामनिर्देशहि न करणें, मग फोटो देणें तर बाजूलाच राहिलें. खुद्द नरसो-पंत केळकर यांजविषयीं बोलावयाचें तर त्यांचे अंगांत जातिभेद इतका

भरलेला आहे कीं एक वेळ ज्वलज्जहाल चित्पावन ब्राम्हण परवडेल. याचें उदाहरण द्यावयाचें तर डॉ. लोहकरे व नगरचे पटवर्धन यांचें देतां येईल. पहिल्या असेंब्लीच्या निवडणुकीच्या वेळेस नरसोपंतांनीं वास्तविक डॉ. लोहकरे यांना मदत करावयास पाहिजे होती. कारण दोघेहि एकाच पक्षाचे होते. असें न करतां हरिभाऊ पटवर्धन हे चित्पावन असल्यामुळें केळ-करांनीं त्यांना गुप्त मदत केली व डॉ. लोहकरे यांच्याविरुद्ध लोकमत बन-विण्याचा प्रयत्न केला,' असा त्या वेळेस पुणें शहरांत बोभाटा झाला होता. असें असूनसुद्धा लोहकरे निवडून आलेच ! आपला

×××

वरील पत्राला उत्तर देण्याची तशी जरुरी नाहीं. कारण वाचक आपल्या ठिकाणीं निवाडा करूं शकतील. रा. केळकर यांनीं ब्राह्मणांतील पोटजातींच्या एकीकरणासाठीं केलेले सक्रिय प्रयत्न आणि त्यांचीं सामाजिक धार्मिक मतें ज्यांना माहीत आहेत त्यांना देशस्थ—कोंकणस्थ या संकुचित मनोवृत्तीनें प्रेरित होऊन केळकरांनीं डॉ. लोहकरे यांच्या निवडणुकीस विरोध केला असेल हें स्वप्नींहि खरें वाटणार नाहीं. त्यांतून गुप्त विरोधाचें विधान असें आहे कीं, त्याला तर्काशिवाय आधारच नाहीं. असलें विधान कोणी कोणाहिविरुद्ध करावें.

वर्तमानपत्राचा कारभार हें एक गौडबंगाल आहे. त्यांतील कोणता मजकूर कोण लिहितो याचा थांग बाहेरच्या जगास लागावयाचा नाहीं. म्हणून संपादकानें लिहिलेल्या एखाद्या लेखाचें श्रेय जसें स्वतःस धूर्त समजणारा वाचक भलत्याच जणाच्या पदरांत टाकण्याची चूक करतो तशीच चूक दुसऱ्याच्या लेखणींतून उतरलेला लेख संपादकाच्या नांवावर मोडण्यांत होते. तीच अवस्था वरील कांहीं लेखांचे बाबतींत झाली. कारण त्यांतील कायदेभंग-तहकुबीवरील लेख संपादकाचे नव्हते. या प्रकारच्या फसगमतीचा एक मासला येथें देतों.

## पत्र एकोणिसावें

श्री.

नासिक, ता. २५-६-३३.

सा. न. वि. वि.

हल्लीं केसरींत दोन लहान अग्रलेख व ' ओझरती नजर ' देण्याचा उपक्रम चांगला आहे. कविता व तीन अंकी नाटक इत्यादि मजकुरामुळें चांगली विविधता आली आहे. तात्यासाहेब स्वतः लिहीत आहेत असें या नव्या प्रकारच्या लेखांवरून दिसतें.

आपला

× × ×

पत्रीं लिहिल्याप्रमाणें नवीन उपक्रम तात्यासाहेब केळकरांनीं सुरू केला असला तरी सर्व लेख साहजिकच त्यांचे नसत व तीन अंकीं नाटकहि त्यांचें नव्हतें.

इतर पत्रांशीं तुलना करतां केसरींतील टीकात्मक लेख बहुधा विशेष सणसणीत असतात. लो. टिळकांच्या वेळेपासून केसरीचा हा ठळक गुण समजला जात असून, त्यावर केसरीचें वजन बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. अर्थात् अशा प्रकारचे लेख प्रसंगपरत्वेंच यावयाचे हें उघड आहे. हैदराबाद संस्थानांत सोलापुरापासून कांहीं कोस अंतरावर आळंद नामक गांव आहे. त्या गावचे जहागीरदार कल्याणराव यांजवर मुसलमानांनीं पूर्वरात्रीं अचानकपणें छापा घालून तलवारीच्या भयंकर जखमा केल्या. त्या जखमांनीं ते प्राणासच मुकावयाचे, परंतु त्यांच्या आप्तेष्टांनीं दक्षतापूर्वक त्यांस सोलापुरास दवाखान्यांत पोंचविलें म्हणूनच त्यांचें प्राणरक्षण झालें. तथापि गुन्हेगारांना पकडून त्यांचें पारिपत्य करण्याच्या बाबतींत पोलिसांनीं दिरंगाई चालविली होती. त्यास उद्देशून केसरींतील अग्रलेख होता! त्या संबंधानें खालील मजकुराचें पत्र आलें.

## पत्र विसावें

श्री

नासिक, ता. २८-७-३३

सा. न. वि. वि.

आजचे अंकांतील हैदराबाद संस्थानांतील आळंदच्या अत्याचारावरील लेख फार सणसणीत व केसरीस साजेसा आहे.

आपला

× × ×

कांहीं वाचकांना लिहिण्यांचा सराव मुळींच नसतो. कॉलेजात असतांना मिळालेल्या शिक्षणावरच ते स्वतःला विद्वान् समजतात. या मानीव विद्वत्तेबरोबरच लेखनकौशल्य आलेंच अशा घमेंडींत त्यांनीं आपणाकडून लेख पाठविला व तो संपादकानें परत केला कीं रागावून ते संपादकास अद्वातद्वा दूषणें देत सुटतात. जणूं काय त्यांनीं जें कांहीं लिहिलें तें वेदवाक्य कल्पून संपादकानें छापलेंच पाहिंजे. खालील पत्र यांच मासल्याचें आहे. तें वाचून संपादक स्वतःशीं तत्त्ववेत्त्याप्रमाणें हंसतो व उलट न रागावतां गंभीरपणानें टाकून देतो.

## पत्र एकविसावें ( इंग्रजी )

जुन्नर. ता. ३-११-१९३३

मी सद्यःस्थितीवर लिहिलेले स्वैर चुटके आपण ताबडतोब कृपाळूपणें परत पाठविले याबद्दल फार आभारी आहें. माझ्या लिहिण्यांतील खुबीदार व गूढ विनोद हिंदु मनालाच कळण्याजोगा होता. तो ज्याला कळेल तोच त्याची चहा करील. पण सध्यां केसरीची गोष्ट अगदीं वेगळी आहे. जाहिरातीवर पैसे मिळवून चैन करणाऱ्या व सार्वजनिक सभांमधून गळ्यांत हार घालून घेणाऱ्या लोकांच्या हातीं केसरी गेला आहे.

आपला

× × ×

या लिहिण्याचा भावार्थ हा कीं केसरीच्या संपादक-मंडळास आमच्यासारख्या कलमबहाद्दरांचा गुण समजण्याचीच अक्कल नाहीं. अशी परीक्षा कोणी करावी, तर ज्यांनीं मराठींत लिहिलेला लेख हुडकून काढण्यास संशोधकच नेमला पाहिजे अशा प्रसिद्ध गृहस्थांनीं !

वर्तमानपत्राच्या वाचकांत कोणकोणत्या प्रकारचे लोक असतील याची कल्पनाहि करणें कठिण आहे. कोणी टवाळ तर कोणी भोळसर असतात. त्यांना चिथावणारा भेटला असतां टवाळीकरितां त्यांचा पाय पुढें पडतो त्याचप्रमाणें संभावित हितचिंतकानें डोळ्यांत अंजन घालतांच त्यांना शुद्धीवर येण्यालाहि वेळ लागत नाहीं.

## पत्र बाविसावें

श्रीगजानन प्रसन्न

पुणें, पेठ शनिवार, ता. २-७-१९३३

शि. सा. न. वि. विशेष—

कांहीं दिवसांपूर्वी मित्रांच्या सांगण्यावरून आपणास एक चिठी लिहिली होती व त्यानंतर तशाच मजकुराचें एक पत्र विविधवृत्तकर्ते यांचेकडे पाठविलें होतें. माझी मुख्य विचारसरणी अग्रलेखावरील सिंहाचे चित्रासंबंधीं होती. परंतु वृत्तकारांनीं पुढील मजकूर आपले पदरचा घातला आहे. "सर्व विषयावर नजर जावी यासाठीं नवीनच एक 'ओझरती नजर' मात्र निर्माण करण्यांत आली." हा मजकूर माझा नाहीं हेंहि मी त्यांस तावडतोब पत्रद्वारें कळविलें होतें. असो...... माझ्या हातून मोठाच अपराध झाला आहे असें वाटतें......एक प्रकारच्या मोहाला बळी पडून माझ्या हातून आपल्याविषयीं थोडासा गैरसमज उत्पन्न केला गेला याबद्दल मी आपली क्षमा मागत आहें व यापुढें

केव्हांहि आपल्यासारख्या थोरासंबंधीं एक ब्र देखील काढणार नाहीं अशी ईश्वरसाक्षपूर्वक शपथ घेत आहें.

आपला

×××

वर्तमानपत्रांत मथळे अनेक असतात व त्यांतून कांहीं दर अंकांत हटकून येतात. यांपैकीं ‘ इहवृत्त ’ हा मथळा होय. सदर मथळ्याखालीं पुढील तीनचार दिवसांत घडणाऱ्या चळवळींची सूचना मिळते. परंतु मथळ्याचा अर्थ माहीत नसल्यामुळें चुका घडतात त्या अशा—

## पत्र तेविसावें

पुणें, ता. १५-६-२३

कृ. सा. न. वि. वि.

सोबतच्या मजकुरास आपण कृपा करून येत्या केसरी पत्राच्या अंकांत ‘ इहलोक ’ या सदराखालीं अवश्य स्थल द्यावें अशी आपणास नम्र विनंति आहे.

आ. नम्र

× ××

जणूं काय इहलोकच्या बातम्यांप्रमाणेंच संपादकाला परलोकच्याहि बातम्या लागतात !

---

# प्रकरण बारावें

# वृत्तपत्रांचा प्रभाव

वृत्तपत्रांचें सामर्थ्य अगाध आहे. त्याची सर शांततेच्या काळांत इतर कोणत्याहि साधनाला येणार नाहीं. इंग्लंडांत तर वर्तमानपत्रांना लॉर्डस् स्पिरिच्युअल, लॉर्डस् टेंपरल व कॉमन्स या क्रमानें चौथी राजसत्ता समजण्यांत येत असे. प्रत्यक्ष राज्यक्रांतीपासून तों एकाचा निरोप दुसऱ्याला सांगण्यापर्यंत मनुष्याच्या जीवनांत जेवढ्या म्हणून घडामोडी होतात त्या सर्वांशीं वृत्तपत्रांचा अगदीं निकट संबंध पोंचतो. यासाठीं महान् बलाढ्य राज्यकर्तेहि वृत्तपत्रांना भिऊन वागतात. एकच मनुष्य घेतला तरी त्याच्या डोक्यांत अनेक कल्पना घोळतात व विचार सुचतात. पण ते जर दुसऱ्याला न कळले तर जागच्या जागीं जिरून जातात व मानवजात त्यापासून होणाऱ्या लाभाला मुकते. समाजांत सामर्थ्यवान् माणसें नेहमींच जन्मतात. तथापि त्यांना समाजाचा पाठिंबा न मिळाल्यास त्यांच्यांत व दुर्बलांत म्हणण्यासारखा फरक उरणार नाहीं. पण त्यांपैकीं एखादा मनुष्य लेखक असला तर आपल्या प्रभावशाली लेखणीनें तो लाखों, नव्हे कोट्यवधि लोकांचीं मनें आकर्षून घेऊन विलक्षण कृत्यें घडवून आणील. फक्त त्याच्या हातीं वर्तमानपत्राचें संपादकत्व पाहिजे. वर्तमानपत्राच्या एका अंकाची किंमत एका पैशापासून एक, दीड आण्यापर्यंत असते. त्याच्या प्रती दर तासाला ब्याण्णव हजारापर्यंतहि निघूं शकतात व त्याचा खप अमेरिकेसारख्या देशांत चाळीस-पन्नास लाखापर्यंत सहज होतो. त्याचे साथीदार

आगगाडी, मोटार, टपाल हीं प्रामुख्यानें समजलीं जातात. त्यांत विमानें व आगबोटी यांनाहि गोवण्यास हरकत नाहीं. टपाल खात्याच्या मार्फत वर्तमानपत्रांच्या प्रती आगगाडींत व मोटारींत बसून शेंकडों मैलांचा प्रवास करतात व संध्याकाळीं देशाच्या एका टोंकाहून त्या सुटल्या कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं चारशें-पांचशें मैलांवरील आपल्या घरीं चहापान करीत आरामखुर्चीवर स्वस्थ मनानें बसलेल्या वाचकांच्या मनोवृत्ति प्रक्षुब्ध वा प्रमुदित करून सोडतात. एकच सूर्य पण त्याच्यापासून जसे लाखों, कोट्यवधि किंवा अगणित किरण पृथ्वीवर पडून ही सारी पृथ्वी उजळतात त्यासारखेंच संपादकाचेंहि होतें. संपादकास आपल्या खोलींत अग्रलेखांचें चिंतन करीत इकडून तिकडे व तिकडून इकडे येरझारा घालतांना एखादा विचार सुचतो काय व तो दुसरा दिवस मावळण्याच्या आंत सात-आठशें मैलांवरील लाखों वाचकांना समजतो काय! वर्तमानपत्रांत एवढें अजब सामर्थ्य असल्यामुळेंच जगांतील अत्यंत बुद्धिमान्, कर्तृत्ववान्, सामर्थ्यवान् व तेजस्वी लोकांनीं आपलीं आयुष्येंचीं आयुष्यें या धंद्यांत घालविलीं आहेत.

वर्तमानपत्र हा मानवजातीस एक मोठा अनुग्रहच मिळाला आहे. तो किती स्वस्त पण किती बहुमोल आहे! टाइम्स ऑफ इंडियासारखें पत्र फक्त एक आण्याला मिळतें. एकच आणा टाकला कीं हें एवढें मोठें जग पत्ररूपानें एका चिमटींत सांपडतें व लहानशा खिशांतहि मावतें. ती जगांतील सर्व सुखदुःखें, सर्व आनंदविषाद, सर्व ज्ञानविज्ञान, सर्व चेष्टाकुचेष्टा व साऱ्या करमणुकी यांची गुप्त मंजुषाच असते. वर्तमानपत्र उघडतांच चित्रपट खोलल्याप्रमाणें वाचकाच्या नजरेसमोर जगाचें स्थूल व विस्तीर्ण स्वरूप उभें रहातें. त्यांत आकाशांत उड्डाण करणारीं विमानें पहावीं, समुद्रावर तुफानांत सांपडलेल्या नौका पहाव्या व हिमालयाचें अत्युच्च शिखर चढूं चहाणारे धाडसी युरोपीय प्रवासी पहावे. त्यांत भूकंपानें विदारलेला बिहार प्रांत व क्वेटा शहर दिसतें, स्पेनमधील बंडांत दंगेखोरांनीं आग लावलेलीं मंदिरें

जळतांना दिसतात व फेंकलेल्या बाँबगोळ्यांत सांपडून लोक मरतांना दिसतात. त्यांतील सिनेमा-नटीचें सस्मित वदन हृदयाला आनंद देतें व इटालीचा सर्वाधिकारी सिनोर मुसलोनी यानें वळविलेल्या मुठी थरकांप करून सोडतात. एका स्तंभामधलें बंगाल्यांतील जलप्रलयाचें वर्णन वाचून मेघराजाच्या उधळपट्टीचा राग येतो व त्याच्या शेजारच्या स्तंभामध्यें त्याच मेघराजानें कंजुषपणानें महाराष्ट्रावर आणिलेल्या अवर्षणाबद्दल त्याचा धिक्कार करावासा वाटतो. पैशाच्या आशेनें त्यांतील कोड्यांच्या जाहिरातींवर उड्या पडतात व त्या पलीकडचाच एखादा चुटका मटकावून गंभीर गालावरची सुरकुती मोडते. अग्रलेखांतील परराष्ट्रीय राजकारणाची गुंतागुंत मानवी संस्कृतीच्या भावी संहाराच्या भयाण कल्पनेनें अक्कल गुंगविते व त्यावरून काढलेली नजर ताज्या तारांकडे रोखली म्हणजे ऑलिंपिक सामन्यांत हिंदी खेळाडूंनीं हॉकीच्या खेळांत मिळविलेल्या विजयानें डोकें डुलावयास लागतें; आणि या सर्व उलाढाली व घडामोडी त्रेतायुगांतल्या नसून काल–परवांच्या, अगदीं ताज्या.

आधुनिक काळांत वर्तमानपत्रांची इतकी विलक्षण प्रगति झाली असल्यामुळें वर्तमानपत्र ही चीज लहानापासून थोरापर्यंत प्रत्येकाची अगदीं प्यारी बनली आहे. धीरगंभीर वृत्तीचा निरिच्छ तत्त्ववेत्ताहि वर्तमानपत्रांत डोकें घालतो व थिल्लर वृत्तीचा अल्लड तरुणहि त्यांतील रकाने धुंडीत हिंडतो. इंग्लंडांत वर्तमानपत्रांचा प्रसार इतका झाला आहे कीं दर शंभर कुटुंबांत दररोज सरासरीनें १५२॥ दैनिकें व दर आठवड्याला १३० साप्ताहिकें खपतात असा अंदाज करण्यांत आला आहे. यावरून तिकडील एकच कुटुंब एकदोन दैनिकें व एकदोन साप्ताहिकें विकत घेतें असें सिद्ध होतें. वर्तमानपत्रांच्या प्रसाराचें व प्रगतीचें हें एक गमक झालें. पण त्याहिपेक्षां इतर रीतीनेंहि प्रगति पाहतां येते. सर्व जातीचा मजकूर एकाच पत्रांत भरल्यानें सामान्य वाचकाची सोय होत असली तरी विशिष्ट

आगगाडी, मोटार, टपाल हीं प्रामुख्यानें समजलीं जातात. त्यांत विमानें व आगबोटी यांनाहि गोवण्यास हरकत नाहीं. टपाल खात्याच्या मार्फत वर्तमानपत्रांच्या प्रती आगगाडींत व मोटारींत बसून शेंकडों मैलांचा प्रवास करतात व संध्याकाळीं देशाच्या एका टोंकाहून त्या सुटल्या कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं चारशें-पांचशें मैलांवरील आपल्या घरीं चहापान करीत आरामखुर्चीवर स्वस्थ मनानें बसलेल्या वाचकांच्या मनोवृत्ति प्रक्षुब्ध वा प्रमुदित करून सोडतात. एकच सूर्य पण त्याच्यापासून जसे लाखों, कोट्यवधि किंवा अगणित किरण पृथ्वीवर पडून ही सारी पृथ्वी उजळतात त्यासारखेंच संपादकाचेंहि होतें. संपादकास आपल्या खोलींत अग्रलेखांचें चिंतन करीत इकडून तिकडे व तिकडून इकडे येरझारा घालतांना एखादा विचार सुचतो काय व तो दुसरा दिवस मावळण्याच्या आंत सात-आठशें मैलांवरील लाखों वाचकांना समजतो काय! वर्तमानपत्रांत एवढें अजब सामर्थ्य असल्यामुळेंच जगांतील अत्यंत बुद्धिमान्, कर्तृत्ववान्, सामर्थ्यवान् व तेजस्वी लोकांनीं आपलीं आयुष्येंचीं आयुष्यें या धंद्यांत घालविलीं आहेत.

वर्तमानपत्र हा मानवजातीस एक मोठा अनुग्रहच मिळाला आहे. तो किती स्वस्त पण किती बहुमोल आहे! टाइम्स ऑफ इंडियासारखें पत्र फक्त एक आण्याला मिळतें. एकच आणा टाकला कीं हें एवढें मोठें जग पत्ररूपानें एका चिमटींत सांपडतें व लहानशा खिशांतहि मावतें. तीं जगांतील सर्व सुखदुःखें, सर्व आनंदविषाद, सर्व ज्ञानविज्ञान, सर्व चेष्टाकुचेष्टा व साऱ्या करमणुकी यांची गुप्त मंजुषाच असते. वर्तमानपत्र उघडतांच चित्रपट खोलल्याप्रमाणें वाचकाच्या नजरेसमोर जगाचें स्थूल व विस्तीर्ण स्वरूप उभें रहातें. त्यांत आकाशांत उड्डाण करणारीं विमानें पहावीं, समुद्रावर तुफानांत सांपडलेल्या नौका पहाव्या व हिमालयाचें अत्युच्च शिखर चढूं चहाणारे धाडसी युरोपीय प्रवासी पहावे. त्यांत भूकंपानें विदारलेला बिहार प्रांत व क्वेटा शहर दिसतें, स्पेनमधील बंडांत दंगेखोरांनीं आग लावलेलीं मंदिरें

जळतांना दिसतात व फेंकलेल्या बॉंबगोळ्यांत सांपडून लोक मरतांना दिसतात. त्यांतील सिनेमा-नटीचें सस्मित वदन हृदयाला आनंद देतें व इटालीचा सर्वाधिकारी सिनोर मुसलोनी यानें वळविलेल्या मुठी थरकांप करून सोडतात. एका स्तंभामधलें बंगाल्यांतील जलप्रलयाचें वर्णन वाचून मेघराजाच्या उधळपट्टीचा राग येतो व त्याच्या शेजारच्या स्तंभामध्यें त्याच मेघराजानें कंजुषपणानें महाराष्ट्रावर आणिलेल्या अवर्षणाबद्दल त्याचा धिक्कार करावासा वाटतो. पैशाच्या आशेनें त्यांतील कोड्यांच्या जाहिरातीवर उड्या पडतात व त्या पलीकडचाच एखादा चुटका मटकावून गंभीर गालावरची सुरकुती मोडते. अग्रलेखांतील परराष्ट्रीय राजकारणाची गुंतागुंत मानवी संस्कृतीच्या भावी संहाराच्या भयाण कल्पनेनें अक्कल गुंगविते व त्यावरून काढलेली नजर ताज्या तारांकडे रोखली म्हणजे ऑलिंपिक सामन्यांत हिंदी खेळाडूंनीं हॉकीच्या खेळांत मिळविलेल्या विजयानें डोकें डुलावयास लागतें; आणि या सर्व उलाढाली व घडामोडी त्रेतायुगांतल्या नसून काल-परवांच्या, अगदीं ताज्या.

आधुनिक काळांत वर्तमानपत्रांची इतकी विलक्षण प्रगति झाली असल्यामुळें वर्तमानपत्र ही चीज लहानापासून थोरापर्यंत प्रत्येकाची अगदीं प्यारी बनली आहे. धीरगंभीर वृत्तीचा निरिच्छ तत्त्ववेत्ताहि वर्तमानपत्रांत डोकें घालतो व थिल्लर वृत्तीचा अल्लड तरुणहि त्यांतील रकाने धुंडीत हिंडतो. इंग्लंडांत वर्तमानपत्रांचा प्रसार इतका झाला आहे कीं दर शंभर कुटुंबांत दररोज सरासरीनें १५२॥ दैनिकें व दर आठवड्याला १३० साप्ताहिकें खपतात असा अंदाज करण्यांत आला आहे. यावरून तिकडील एकच कुटुंब एकदोन दैनिकें व एकदोन साप्ताहिकें विकत घेतें असें सिद्ध होतें. वर्तमानपत्रांच्या प्रसाराचें व प्रगतीचें हें एक गमक झालें. पण त्याहिपेक्षां इतर रीतीनेंहि प्रगति पाहतां येते. सर्व जातीचा मजकूर एकाच पत्रांत भरल्यानें सामान्य वाचकाची सोय होत असली तरी विशिष्ट

धंद्यांतील वाचक तशानें तृप्ति पावणार नाहींत. म्हणून त्या त्या धंद्यांतील लोकांकरितां वेगवेगळीं वर्तमानपत्रें युरोपांत निघालीं आहेत. एक लंडन शहर घेतलें तरी या प्रकारच्या वर्तमानपत्रांची कल्पना येईल. तेथें न्हावी, शिंपी, चांभार, हलवाई, वाणी, माळी इत्यादिकांकारितांहि वर्तमानपत्रें आहेत. त्यांचीं नांवे हेअरड्रेसर्स वुइकली जर्नल, ड्रेपर्स रेकॉर्ड, श्यू अँड लेदर रेकॉर्ड, कन्फेक्शनरी जर्नल, ग्रोसर, अमॅच्यूर गार्डनिंग, एरोप्लेन, पंच, टिट्बिट्स इ.

विशिष्ट वर्तमानपत्रांचा हा विशिष्ट उपयोग झाला. पण राष्ट्रीय दृष्ट्या राजकीय वर्तमानपत्रांचें वजन व कार्य मोठें. परतंत्र राष्ट्रांना तीं स्वातंत्र्याच्या मार्गावर नेतात आणि स्वतंत्र राष्ट्रांना त्यांचें स्वातंत्र्य व वैभव टिकविण्याचा धडा देतात. स्वतंत्र राष्ट्रांना स्वतंत्र असतांहि वाईट दिवस येतात, त्यावेळीं त्यांची हिंमत खचूं न देण्याची कामगिरी वर्तमानपत्रें करतात आणि राष्ट्राचें हित कशांत आहे हें सांगून तीं जनतेला योग्य दिशा दाखवितात. इंग्लंड, अमेरिका यासारख्या राष्ट्रांवरील संकटें हिंदुस्थाना-च्या मानानें कांहींच नव्हेत. त्यांना व्यापाराची मंदी, बोल्शेव्हिझमचा प्रसार, प्रतिस्पर्धी देशाची युद्धाची तयारी, यांचीच काय ती चिंता. मंदीमुळें इंग्लंडची व्यापारांत व उद्योगधंद्यांत पिछेहाट होऊं लागतांच तेथील वर्तमानपत्रांनीं खुल्या व्यापारपद्धतीचें तत्त्व झुगारून संरक्षक व्यापाराचें तत्त्व स्वीकारलें व त्याचीच उपयुक्तता समाजाला सांगण्यास सुरुवात केली. पण असल्या चिंताजनक प्रसंगां-पेक्षां अभिमानाचे, उत्साहाचे व गौरवाचे प्रसंगच त्यांना फार. इंग्लंडचें स्वातंत्र्य आज सातशें-आठशें वर्षें टिकून आहे. त्यामुळें देशाच्या प्रग-तीस व भरभराटीस राज्यकर्त्यांकडून प्रत्यक्ष वा परोक्षरीत्या इतकें उत्तेजन मिळत गेलें आहे कीं, त्यामुळें इंग्लंडांत श्रेष्ठ प्रतीचे शास्त्रीय शोधक, ग्रंथकार, कवि, समाजसेवक, दानशूर व्यक्ति शेंकडों उत्पन्न होऊन त्यांचे उत्सव साजरे करण्याचे सुयोग दरसाल कैक लाभतात. सन १९३२ हें

एकच साल घेतलें तरी त्या सालीं सर ख्रिस्तोफर रेन या वास्तुशास्त्रज्ञाचा त्रिशत सांवत्सरिक उत्सव इंग्लंडानें केला. सर रोनाल्ड रास यानें मलेरियाची उत्पत्ति डांसापासून होत असल्याचा शोध लावला, त्याचा मृत्यु याच वर्षी झाला. या दोनहि पुरुषांवर इंग्लंडमधील वर्तमानपत्रांनीं लेख लिहून त्यांचे गुण गाइले. इंग्लंडांत वृत्तपत्र संस्था फार जुनी आहे. त्यामुळें दोन-अडीचशें वर्षें चाललेलीं वर्तमानपत्रें तेथें आहेत. अशाच पत्रांपैकीं 'डर्बी मर्क्यूरी' हें एक पत्र होय. त्या पत्राला दोनशें वर्षें लागल्याबद्दल त्याचा उत्सव साजरा झाला. डर्बी मर्क्यूरीला दोनशावें वर्ष लागलें तर 'रीडिंग मर्क्यूरी'ला दोनशें दहावें वर्ष लागलें. त्याच आनंदांत इंग्रजी पत्रें १९३२ सालीं दंग होतीं. अर्थात् अशा प्रसंगावर वर्तमानपत्रांत प्रशंसापर लेख प्रसिद्ध झाले म्हणजे हुरूप, आशा व अभिमान इत्यादि भावनांनीं जनतेचीं मनें प्रमुदित होतात.

स्वतंत्र राष्ट्रांचें स्वातंत्र्य टिकविण्याची जबाबदारी वर्तमानपत्रांवर असते, त्यापेक्षां परतंत्र राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवावयास लावण्याची त्या राष्ट्रांतील वर्तमानपत्रांवरील जबाबदारी फार बिकट यांत शंका नाहीं. त्यांच्या संपादकांत धाडस हवेंच, पण धाडसाबरोबर सावधगिरी व धूर्तता नसेल तर ते फुकट प्राणाला मुकावयाचे. फ्रान्समधील राज्यक्रांतींत वर्तमानपत्रांना तारेवरील कसरत करावी लागत होती. अशा वर्तमानपत्रकारांचा लिंग्वे हा पुढारी होता. तो स्वतः बासिलच्या तुरुंगांत कांहीं दिवस कैदी असल्यामुळें त्याला कैद्यांची स्थिति पूर्णपणें माहीत होती. त्यानें तुरुंगांतून सुटल्यावर क्रांतीचा उपदेश न करतां फक्त तुरुंगांतील हकीकती प्रसिद्ध करून सरकाराविषयीं असंतोष फैलावला. त्यानें छापलेल्या हकीकती वाचण्याकरितां लोकांच्या उड्या पडाव्या. पान कोक यानें निराळीच खुबी केली. त्यानें एक वर्तमानपत्र राजपक्षाचें व दुसरें प्रजापक्षाचें काढून आणि त्यांच्यांत झुंज लावून वाचकांना राजकारणाचें अंतरंग शिकविलें. प्रूढोम हा

कट्टा लोकपक्षीय संपादक असून त्यानें १७८७ ते १७८९ पर्यंत पंधराशें लेख छापून वांटले. लूस्तालो या तरुण संपादकानें 'क्रांतिकारक पॅरिस' या नांवाचें साप्ताहिक काढलें, त्याच्या दोन लाख प्रती खपत असत. या सर्वांनीं आपल्या लेखांनीं लोकमत राज्यक्रांतिप्रवण केलें ही त्यांची केवढी कामगिरी!

हिंदुस्थान हा देश सर्वस्वीं परतंत्र आहे. त्यांतील बहुजनसमाज अशिक्षित व आधुनिक पद्धतीच्या राजकारणांत गैरमाहितगार आहे आणि त्यावरील परकीय राज्यकर्ते लोकशाही व्यवहारांत पूर्ण वाकबगार आहेत. त्यांना हिंदुस्थानांत कोणतीहि सुधारणा करावयाची झाली तर त्या बाबतींतील लोकमत ते प्रथम पहातात. अशा राज्यकर्त्यांशीं सवाशें, दीडशें वर्षांपूर्वी हिंदी लोकांची गांठ पडली तेव्हां हिंदी लोकांची त्यांजपाशीं वकिली करण्यास वर्तमानपत्राशिवाय अन्य साधन नव्हतें. पहिलीं पत्रें बाल्यावस्थेंत होतीं. परंतु सन १८७० ते १८८० पर्यंतच्या काळांत बहुतेक प्रांतांत लोकांचा कैवार घेणारें एखादें दुसरें तरी पत्र निघालें. त्या पत्रावर दुहेरी कामगिरी पडली. एक लोकमत बनविण्याची व दुसरी तें राज्यकर्त्यांपुढें मांडण्याची. वर्तमानपत्रकार हे एका अर्थानें जनतेचे शिक्षक होते व दुसऱ्या अर्थानें सेनापति होते. त्यांना जनतेस केवळ राजकीय शिक्षणच द्यावयाचें नसून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, औद्योगिक या सर्व बाबतींत त्यांच्या समजुती बदलावयाच्या किंवा सुधारावयाच्या होत्या.

वर्तमानपत्र हें हत्यारच असें आहे कीं त्याचें कार्य सतत चालू असतें; त्याला खंड असा नसतोच. सभा झाल्या तरी त्या केव्हां तरी व कोठें तरी भरतील, त्यांत एखाद्या विषयाचा अल्पकाळ खल होईल व त्यामधून प्रकटलेलें लोकमत ठराव रूपानें सरकारच्या कानावर घालण्यांत येईल. परंतु वर्तमानपत्रांचें तसें नाहीं. तीं प्रत्येक विषयाचा

पिंजून कीस काढतात, लहानशा पोलीस शिपायापासून तों भारतमंत्र्या-पर्यंत सर्वांच्या कृतीवर व उक्तीवर डोळ्यांत तेल घातल्याप्रमाणें नजर ठेवून त्यांचे दोष व चुका उघडकीला आणतात आणि त्यांजवर सडकून टीका करून त्यांचा नक्षा उतरतात. त्यांचा हा उद्योग कानगोष्टीसारखा नसतो. त्यांचे वाचक हजारों असून त्यांजपुढें अधिकाऱ्यांच्या अवगुणांची टिमकी वाजविल्यामुळें अधिकाऱ्यांची छीः थू साऱ्या देशभर होते. सत्तेच्या तोऱ्यांत असणाऱ्या अधिकाऱ्यालाहि जनतेंत व्हावयाच्या बेअब्रूसाठीं वर्तमानपत्रापुढें वचकूनच रहावें लागतें.

राष्ट्रीय सभा स्थापन होण्यापूर्वी व झाल्यानंतर हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांत एखादें तरी निर्भीड पत्र निघालेंच. महाराष्ट्रांत केसरी, बंगाल्यांत अमृत-बझार पत्रिका व बंगाली, मद्रासेंत हिंदू व स्वदेशमित्रम्, पंजाबांत ट्रिब्यून व पंजाबी इत्यादि पत्रें सुरू झालीं. ही वर्तमानपत्रें चालविण्यास बाळ गंगाधर टिळक, शिशिरकुमार घोष, मोतीलाल घोष, सुरेंद्रनाथ बानर्जी, सुब्रम्हण्य अय्यर इत्यादि संपादक लाभले. त्यांच्यामागून संपादकांची दुसरी पिढी उदय पावून तींत बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष, रंगस्वामी आयंगार, लाला लजपतराय प्रभृति संपादक चमकले आणि तिसऱ्या पिढींत ॲनी बेझंट, मोहनदास गांधी व बी. जी. हॉर्निमन यांनीं मोठी कामगिरी बजा-विली. या तीनहि पिढ्यांतील वर्तमानपत्रांनीं केलेली देशसेवा हिंदु-स्थानाच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहील. किंबहुना त्यांनीं भावी स्वातंत्र्याचा पाया भरला असें म्हटलें तरी चालेल. त्यांच्या काम-गिरीचा क्रम पुढीलप्रमाणें सांगतां येईल—त्यांनीं इंग्रजी राज्यपद्धतीचें स्वरूप सांगितलें, लोकांना जागें करून विचार करावयास लावलें, स्वतः कारागृहांतील किंवा इतर कष्ट सोसून चळवळीची दिशा दाखविली व शेवटीं लोकांना कष्ट सोसावयास लावून त्यांजकडून चळवळ करविली.

इंग्रज सरकारचा प्रभावशाली प्रतिस्पर्धी पत्रकर्ता सुरुवाती-

पासून त्याच्या कसा अगदीं हात धुवून पाठीस लागला आहे! प्रजाजन हीं सेना व पत्रकर्ता हा सेनापति म्हणून प्रजाजन पाठीशीं घेऊन पत्रकर्ता अंगावर चालून येतो तेव्हां त्याला पकडण्याकरितां सरकारानें त्याजवर चौफेर शस्त्रें धरलेलीं असतात. त्यापैकीं इं. पि. कोड १२४ अ हें अमोघ शस्त्र, दुसरें १५३ अ कलम, तिसरी कोर्टाची बदनामी व चौथी अब्रूनुकसानी. हीं चार शस्त्रें चौफेर चमकत असतां त्यांतूनच जातिवंत संपादक आपला मार्ग धैर्यानें आक्रमतो, येतील तीं दुःखें सोसतो व जनतेच्या बहुमानास पात्र होतो. सरकार आपली हुकमत साऱ्या देशभर अधिकाऱ्यांमार्फत चालवितें व संपादक ती आपल्या पत्रामार्फत चालवितो. तो पत्रांतून वाचकांना माहिती पुरवितो, समजूत पटवितो व युक्तिवाद शिकवितो. त्यानें एक ध्वनि काढला कीं त्याचा प्रतिध्वनि साऱ्या देशभर उठतो संपादकाचाच युक्तिवाद घेऊन ठिकठिकाणचे वाचक त्या त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यास कुंठित करावयास उभे रहातात.

मुंबई सरकारानें या इलाख्यांत प्लेगप्रतिबंधक उपाय योजले. त्यांतील जुलमीपणा सर्वांच्या प्रत्ययास आणून टिळकांनीं लोकमत सरकाराच्या विरुद्ध बनविलें व प्लेगची लस अंगांत घातल्यानें लोक जायबंदी होतात हें सोदाहरण दाखवून सरकारास त्या बाबतींतील आपलें धोरण बदलावयास लावलें. प्लेगच्या दिवसांत लोकांना हालअपेष्टेंत ठेवणें, प्लेगनें लागलेल्या रोग्यांची आबाळ करणें, त्यांना आप्तेष्टांपासून दूर ओढून नेणें आणि घरांची व घरांतील सामानाची 'सर्च पार्टी'कडून नासधूस मांडणें यावर टिळकांनीं इतकी कडक रीतीनें लेखणी चालविली कीं त्यांच्याच लेखांनीं चिथावल्यावरून चाफेकर बंधूंना पुण्यांतील जुलमी अधिकारी रँड याचा खून करण्याइतकी चीड आली असें सरकाराच्या डोक्यानें घेऊन टिळकांना दीड वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली. कोठें महाराष्ट्र व कोठें बंगाल! या दोन प्रांतांत एक हजार मैलांचें

अंतर. तरीहि बंगाल्यांत वंगभंगाविरुद्ध चळवळीची लाट उसळतांच तिची साथ महाराष्ट्रांत करून टिळकांनीं स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य यांची चतुःसूत्री महाराष्ट्रांतील खेड्यापाड्यांत घुमविली. बाबू बंकिमचंद्र यांचें वंदे मातरम् गीत बंगाल्यांत प्रिय झालेलें; त्याचीं वंदे मातरम् हीं आद्याक्षरें बंगालपासून पांचशें कोसावरील महाराष्ट्राच्या गांवांतील शाळेंत शिकणाऱ्या मुलांनीं घरांच्या दारांवर खडूनें लिहून ठेवलीं.

महाराष्ट्रांत जर वंगभंगाच्या चळवळीनें घरन् घर हाललें तर खुद्द बंगाल प्रांताविषयीं बोलावयासच नको. वंगभंगानें बंगाल प्रांताचीं दोन शकलें उडाल्यानें बंगाल प्रांताचें राजकीय व राष्ट्रीय सामर्थ्य कसें दुभंगलें जाणार आहे हें प्रथम बंगाल्यांतील वर्तमानपत्रकर्त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं बंगाली लोकांना सावध केलें व त्या प्रदीप्त झालेल्या भावनें-तूनच सुप्रसिद्ध वंदेमातरम् पत्र बाहेर आलें. वंदेमातरम्, युगांतर, संध्या हीं नवीं पत्रें पाठीस पाठ लावून जन्मलीं व त्यांच्या संपादकांनीं तुरुंगांत एकामागून एक उड्या टाकल्या. वर्तमानपत्रांतील लेख, लेखानंतर सभांतील भाषणें व भाषणांतील क्रोधाच्या ज्वाला यायोगें तरुणांच्या मनोवृत्तींना खेंचीत संपादकांनीं त्यांना अत्याचाराच्या कड्याशीं उभें केलें व तेव्हां-पासून क्रांतिकारकांचें हत्याकांड भडकलें तें अद्यापिहि विझलें नाहीं. वंगभंग रद्द करून घेण्याच्या चळवळीस बंगाली वर्तमानपत्रांनीं प्रारंभ केला, तिला हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतील पत्रांनीं पाठिंबा दिला व हा असंतोष शमत नाहीं असें पाहून व शेंकडों तरुणांच्या आहुति घेऊन हिंदुस्थान सर-कारास आठ वर्षांनंतर दुभंगलेला बंगाल अभंग करावाच लागला.

त्यानंतरचें मोठें आंदोलन १९१७ सालांतील होमरूलच्या चळ-वळीचें. त्याला सुरुवात महाराष्ट्रांत केसरी व मद्रास इलाख्यांत न्यू इंडिया या दोन पत्रांनींच केली व तिचें फळ अल्पशा प्रमाणांत मांटेग्यू-चेम्सफर्ड

सुधारणांच्या रूपानें १९२० सालीं मिळालें. पण १९०६ व १९१७ या दोन सालांच्या आंदोलनाहूनहि प्रचंड आंदोलन म. गांधी यांनीं आपल्या 'यंग इंडिया' पत्रामार्फत १९२० त प्रवर्तित केलें. त्यांचें तेजस्वी पत्र आसेतुहिमाचल पसरलें व त्यांतील सामर्थ्यवान् विचारांनीं लाखों तरुणांच्या अन्तःकरणांना हालवून सोडलें. त्या विचारांनीं बेभान झालेल्या विद्यार्थ्यांनीं शाळा-पाठशाळा सोडल्या, वकिलांनीं द्रव्यप्राप्तीला लाथ मारली, सरकारी नोकरांनीं रुपेरी बेड्या तोडल्या व कायदेभंगांत स्वतःच्या घरांचा उन्हाळा करून हजारों हिंदी लोकांनीं कारागृहाचा रस्ता आनंदानें सुधारला. यंग इंडियाच्या एका मशालीवर शेंकडों संपादकांनीं आपल्या मशाली पेटविल्या व वर्तमानपत्रांचा पराक्रम किती अगाध असतो याचा प्रत्यय सर्वांना ढळढळीतपणानें आणून दिला. हें सर्व हिंदी वर्तमानपत्रकारांनीं १२४ अ कलमाच्या पाशांना न जुमानतां केलें

लो. टिळक, म. गांधी, अरविंद घोष, शिवराम महादेव परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर, भूपेंद्रनाथ दत्त, जसवंतराय, आठवले, भास्कर विष्णु फडके, रामचंद्र नारायण मंडलीक हे व आणखीहि किती म्हणून सांगावे, त्या सर्वांचे बळी १२४ अ कलमानें घेतले आहेत. त्या दृष्टीनें हिंदी वर्तमानपत्रकार हे हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक असल्याचें कोणासहि कबूल करावें लागेल. हिंदी जनतेला या आत्मयज्ञाचें महत्त्व कळत होतें म्हणूनच त्यांचा सन्मानहि तिजकडून स्पृहणीय झाला. लाहोरच्या पंजाबी पत्रावरील खटल्याचा निकाल ऐकण्यास लाहोरास कोर्टापाशीं हजारों लोक जमले. संपादक जसवंतसिंग व आठवले यांना पोलीस गार्डींत घालून तुरुंगाकडे नेत असतां त्यांजवर रस्त्यावरील घरांतून फुलांचा वर्षाव झाला. त्यानंतर १९०८ सालीं टिळकांवरील दुसऱ्या खटल्यांत सरकारानें चौकशीच्या काळांत त्यांना तुरुंगांत न ठेवतां

लोकांच्या भयानें हायकोर्टाच्या खोलीचाच त्यांजकरितां तुरुंग बनविला आणि त्यांच्या खटल्याचा निकाल रात्रीं सांगण्यांत आला. तरी सरकाराची हीं भीति साधार ठरून मुंबईच्या दुकानदारांनीं हरताळ पाडला, मजुरांनीं संप व दंगे केले आणि दंग्यांत गोळीबार होऊन ७५ इसम मेले अगर जखमी झाले.

दुसरें हत्यार १५३ अ कलमाचें. बादशहाच्या प्रजाजनांतील जाती-जातींत द्वेष उत्पन्न करण्याच्या गुन्ह्यासंबंधाचें हें कलम आहे. हिंदुस्थानांत हिंदु व मुसलमान या दोन मोठाल्या जाती आहेत. त्यांजमध्यें वारंवार दंगे उद्भवतात. इंग्रज सरकाराची भेदनीति प्रसिद्धच आहे. तिचा अवलंब करून सरकार मुसलमानांविषयीं आपलेपणा बाळगतें व त्यांचें हिंदूंशीं भांडण लावून या दोन समाजांतील दुही कायम ठेवतें असा सर्वसाधारण समज आहे. हिंदु लोक राष्ट्रीय वृत्तीचे व राजकारणांत सरकारास नेहमीं सतावणारे असल्यामुळें त्यांना कमजोर करण्याकरितां कायदेमंडळांतहि मुसलमानांचा सवता सुभा सरकारानें निर्मिलेला पाहूनहि वरील समज दृढ झाला आहे. हिंदु-मुसलमानांचे दंगे मुंबई, दिल्ली, लाहोर, कानपूर इत्यादि शहरीं जेव्हां होत तेव्हां याच समजामुळें हिंदूंनीं चालविलेलीं वर्तमानपत्रें सरकारास कधीं कधीं मुसलमानांचें पक्षपाती ठरवीत. तशा प्रकारचा लेख सन १९२९ मध्यें मुंबईंतील दंग्याच्या वेळीं लिहिल्याबद्दल नवाकाळ पत्राचे संपादक रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांजवर खटला भरून त्यांस सरकारानें एक वर्षाची शिक्षा फर्माविली. तुरुंगांत जातांना त्यांचें वजन १२५ पौंड होतें तें सुटतांना १०५ पौंड उरलें.

तिसरें हत्यार कोर्टाच्या बदनामीचें. हें हत्यार वर्तमानपत्राच्या अगदीं पांचवीला पुजलेलें आहे. सरकार व जनता यांच्या हितविरोधांत कोर्टानें एखाद्या खटल्यांत जनतेविरुद्ध निकाल दिला व त्यांत अन्याय झाल्या-

विषयीं वर्तमानपत्रकर्त्याची मनोदेवता त्याला सांगत असली म्हणजे तो कोर्टाच्या निकालावर टीका करणें आपलें कर्तव्य समजतो व त्या उद्योगांत कधीं कधीं कायद्याच्या खोड्यांत सांपडून भरडला जातो. बंगालचे विख्यात पुढारी व बंगाली पत्राचे प्रसिद्ध संपादक बाबू सुरेन्द्रनाथ बानर्जी यांजवर सन १८८३ सालीं असेंच किटाळ आलें होतें. त्यावेळीं एका खटल्यांत कलकत्ता हायकोर्टांतील एक तरुण न्यायाधीश मि. मॉरिस यानें एका हिंदु पत्रकारास आपल्या देव्हाऱ्यांतील शाळीग्राम कोर्टांत आणावयास लावलें, अशी बातमी 'ब्रम्हो पब्लिक ओपीनियन' या पत्रांत प्रसिद्ध झाली, ती आधाराला घेऊन सुरेंद्रनाथांनीं बंगालींतून न्यायाधीशाला झोडून काढलें व हिंदूंनाहि त्यांच्या नेभळेपणाबद्दल दोष देऊन चिडविलें. त्यांत त्यांचा उद्देश हिंदूंचा स्वाभिमान जागृत करण्याचाच होता. टीकेंत त्यांनीं न्यायाधीशाची तुलना जेफ्रेजबरोबर केली. न्यायाधीशावरील टीकेनें गोऱ्या न्यायाधीशाची खोडकी जिरविल्याबद्दल हिंदूंना गुदगुल्या झाल्या पण हायकोर्टाला ती टीका आक्षेपार्ह वाटून सुरेन्द्रनाथांवर खटला भरण्यांत आला. कलकत्ता हायकोर्टाच्या फुलबेंचापुढें खटला चालून जज्जांनीं बहुमतानें बानर्जींस दोन महिन्यांची शिक्षा दिली. फुलबेंचांतील एक न्यायाधीश रमेशचंद्र दत्त यांचें मत आरोपीस फक्त दंड करावा असें पडलें. खटल्याचा निकाल ऐकण्यास हायकोर्टांत अतिशय गर्दी झाली होती. निकाल ऐकतांच निषेधाच्या सभा बंगाल्यांतील प्रत्येक शहरांत भरल्या. शिक्षेमुळें बंगाली लोक घाबरले नाहींतच पण त्यांस नवीन पत्रें काढण्यास एक प्रकारचें उत्तेजनच मिळून बाबू जोगेंद्रनाथ बोस यांनीं एक पैसा किंमतीचें बंगवासी व बाबू क्रिस्तोकुमार मितर यांनीं संजीवनी पत्र कसें सुरू केलें हें पूर्वी एका प्रकरणांत दाखविलेंच आहे.

टिळकांवरील १९०८ सालच्या खटल्याच्या निकालानंतर मराठा

पत्राचे संपादक रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं न्यायमूर्ती दावर यांच्या विरुद्ध लेख लिहिला. तो बदनामीकारक ठरून केळकरांना माफी मागेपर्यंत हायकोर्टानें शिक्षा सुनावली. ही शिक्षा अगदींच विचित्र. कोर्टाची बदनामी केल्याबद्दल केसरीवर सन १९२४ सालीं खटला होऊन केसरीचे संपादक रा. नरसिंह चिंतामण केळकर यांस मुंबई हायकोर्टातील न्यायाधीश मि. मार्टिन यांनीं पांच हजार रुपये दंडाची जबर शिक्षा दिली. हा खटला राजकीय स्वरूपाचा असून ता. ६ मे १९२४ च्या केसरींत प्रसिद्ध झालेल्या स्फुट सूचनेंतून उद्भवला. त्याची हकीकत येणें-प्रमाणें—सन १९२३ सालीं नोव्हेंबर महिन्यांत कांहीं युरोपियन सोल्जर पुण्याजवळच्या लोहगांव या खेड्यांत शिकारीकरितां गेले होते. त्यांची व गांवकऱ्यांची कांहीं कारणावरून बोलाचाली झाली. त्या वेळीं सोल्जर वॉकर याच्या बंदुकींतून गोळी उडून तिनें एक गांवकरी मरण पावला. सदर गुन्ह्याबद्दल वॉकर याजवरील खटला पुण्याचे सेशन्सजज्ज मि. वाइल्ड यांजपुढें चालला. खटला ऐकणाऱ्या युरोपियन ज्यूरीनें आरोपीस निर्दोषी ठरविलें; पण मि. वाइल्ड यांना ज्यूरीचें मत मान्य न होऊन त्यांनीं खटला हायकोर्टाकडे पाठविला. हायकोर्टाचे सर न्यायाधीश व दुसरे न्यायाधीश मि. फॉसेट यांनीं ज्यूरीसारखेंच मत देऊन आरोपीस दोषमुक्त केलें. या हकीकतीवर केसरींत टीका अशी आली—"न्यायाचे हे फार्स नवीन नाहींत. वॉरन हेस्टिंग्जच्या वेळेपासून असेंच चालत आलें आहे. तरी आमच्यांत इंग्रज लोकांच्या न्यायाचे गोडवे गाणारे कांहीं शहाणे आहेतच. या खटल्यांतील न्यायाचीं दोन्ही पारडीं सारखीं नव्हतीं. पांढरें पारडें काळ्यापेक्षां जड भरलें. जे मनूला अन्यायी ठरवून त्याची स्मृति जाळावी म्हणतात त्यांनीं लोहगांव प्रकरणांतील न्यायाच्या स्मरणार्थ स्तंभ उभारून त्यावर खटल्याची इत्थंभूत हकीकत लिहून ठेवावी." केसरीस हायकोर्टानें पक्षपात केला असें प्रामाणिकपणानें वाटून त्यानें

लोहगांवच्या गरीब मनुष्याच्या कैवारानें लिहिलें. पण तें मतस्वातंत्र्य हायकोर्टानें त्यास लाभूं न देऊन पांच हजार रुपयांच्या खाड्यांत संपादकास आणिलें.

व्यक्तीची अब्रूनुकसानी हें वर्तमानपत्रावर उगारलेलें चौथें हत्यार. व्यक्ति या सदरांत सरकारी अधिकारी व खासगी माणसेंहि येतात व उभयतांच्या तावडींत वर्तमानपत्रकार कित्येकदां कर्तव्य करीत असतां व कित्येकदां न कळतांहि सांपडतो. दैनिक पत्रांत तारेनें येणाऱ्या बातम्या व इतर पत्रांत क्वचित् बातमीपत्रेंहि पत्रकाराला धोक्यांत आणितात. पत्रकारानें छापली ती बातमी चुकीची ठरली कीं गुन्हा होतोच; मग तिच्या आधारें दोन बरेवाईट शब्द लिहिले कीं बोलावयासच नको. लो. टिळक व प्रि. आगरकर यांना १८८१ सालीं कोल्हापूर प्रकरणांत डोंगरीचा तुरुंग यासाठींच पहावा लागला. त्यांच्या मराठा व केसरी पत्रांतून कोल्हापूरचे कारभारी रा. बर्वे हे शिवाजी महाराजांचा छळ करतात अशीं पत्रें आलीं. पत्रांच्या आधारानें टीकात्मक लेखहि लिहिले गेले. पण मूळ पत्रांतील मजकूरच निराधार ठरल्यामुळें त्या उभयतांना शिक्षा भोगाव्या लागल्या. श्रीशिवछत्रपतींच्या घराण्यांतील एका मोठ्या संस्थानिकाचा अभिमानपूर्वक कैवार घेतल्याचें हें प्रायश्चित्त !

त्यानंतर सरकारी अधिकाऱ्यावरील टीकेचा मागें दिलेला मासला. कानपुरास परदेशांत पाठवावयाच्या मजुरांची भरती करणारा मि. वी. ई. हॉफ नांवाचा अधिकारी होता. सन १९०१त तो व त्याचे दोघे साथीदार यांनीं मारवाडीण रामप्यारी हिला सात आठ दिवसपर्यंत अटकेंत ठेवून तिच्या अंगावरचे दागिने काढून घेतल्याचा खटला अलाहाबादेस चालू झाला. त्याची हकीकत पत्रिकेच्या बातमीदारानें तिजकडे तारेनें पाठविली. ती थोडीशी चुकीची असून तिच्या आधारें पत्रिकेनें खटल्यांतील पंच (ज्यूरी) व आरोपी यावर आपल्या पद्धतीनें टीका केली. म्हणून

आरोपी हॉप यानें पत्रिकेचे संपादक मोतीलाल घोष व मुद्रक अशुतोष डे यांजवर दावा आणिला. त्यापूर्वी पत्रिकेचा बातमीदार आरोपीची माफी मागून व पांचशें रुपये दंड भरून मोकळा झालाच होता. तरी पत्रिके-विरुद्ध दावा आलाच. दाव्याचा निकाल मॅजिस्ट्रेटानें लावून मोतीलाल यांस इं. पि. को. कलम ५०० खालीं एक हजार रुपये दंडाची शिक्षा फर्मावली, पण अपिलांत ते दोषमुक्त ठरले.

नागपूरचे डॉक्टर व मध्यप्रांताचे माजी मुख्य मंत्री रा. नारायण भास्कर खरे यांनीं सन १९३४ सालीं केसरी पत्रावर अब्रूनुकसानीचा आणिलेला दावा चांगलाच गाजला. त्याची बाब म्हटली तर अगदींच क्षुद्र; म्हणजे मध्यप्रांतांतून आलेल्या बातमीपत्रांतला मजकूर. त्या सालीं म. गांधींनीं अस्पृश्योद्धाराकरितां नागपूर जिल्ह्यांत दौरा काढला होता. दौऱ्याची व्यवस्था नागपूरच्या हरिजन सेवा संघानें ठेवली होती. संघाचे अध्यक्ष डॉ. खरे होते. डॉ. खरे स्वतःस असहकारितावादी समजणारे; असें असतां नागपूरचे डेप्यूटी कमिशनर मि. ग्रिगसन यांस दौऱ्यांतील एका प्रसंगीं हजर रहाण्यास डॉ. खरे यांनीं अध्यक्ष या नात्यानें निमंत्रण दिलें व तें ग्रिगसन यांनीं स्वीकारलें, त्यामुळें हरिजन सेवा संघाच्या कार्यकर्त्यांस आनंद झाला,' अशा आशयाचा मजकूर केस-रींत आला. डॉ. खरे यांची तक्रार कीं, 'आपण असहकारितावादी अस-ल्यानें मि. ग्रिगसन यांस निमंत्रणच केलें नाहीं व आम्हां कार्यकर्त्यांना त्यांच्या आगमनानें आनंदहि होण्याचें कारण नाहीं. असहकारितावादी मनुष्यानें ग्रिगसनसारख्या सरकारी अधिकाऱ्याशीं सहकारिता केली या विधानानें लोकांत आपली बेअब्रू झाली.' त्यांनीं प्रसिद्ध झालेला मजकूर चुकीचा असल्याचें केसरीकडे कळविलें व केसरीचे संपादक रा. ज. स. करंदीकर यांनीं 'सदर मजकूर ॲडव्होकेट खरे यांस उद्देशून होता, डॉ. खरे यांस उद्देशून नव्हता, 'ॲ'च्या ठिकाणी 'डॉ.' चुकीनें पडला' असें

पत्रानें डॉ. खरे यांस कळविलें; केसरींत चुकीची दुरुस्ती प्रसिद्ध केली व गैरसमज पसरल्याबद्दल दिलगिरीहि प्रदर्शित केली. परंतु तेवढ्यानें खरे यांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं करंदीकर यांस माफी मागण्यास व छापलेला सर्व मजकूर परत घेण्यास वकिलामार्फत सूचना दिली. पण करंदीकरांनीं माफी मागण्याचें नाकारल्यामुळें त्यांजविरुद्ध खटला भरण्यांत आला. खटल्याचें काम दीड, दोन वर्षें चाललें. मॅजिस्ट्रेट रा. डी. लक्ष्मीनारायण यांनीं त्यांस १००० रु. दंडहि केला. पण त्यावर करंदीकर यांनीं अपील केलें तेव्हां ते दोषमुक्त झाले.

बऱ्याच हिंदी संस्थानांत वर्तमानपत्रें काढण्याची परवानगी नाहीं व ज्यांत परवानगी आहे त्यांत संस्थानिकावर व संस्थानी राज्यकारभारावर टीका करण्यास ब्रिटिश हद्दींतल्या इतकेंहि स्वातंत्र्य नाहीं. यास्तव ब्रिटिश हद्दींतील वर्तमानपत्रकारांवरच संस्थानी प्रजेच्या हितसंरक्षणाची व त्यांच्या राजकीय हक्कासाठीं भांडण्याची जबाबदारी पडते. त्या जबाबदारीस जागून खालसामधील वर्तमानपत्रें आपलें कर्तव्य बजावीत आहेत. हिंदी वर्तमानपत्रकार हिंदी संस्थानिकांना परकीय मानीत नाहींत किंवा त्यांचा द्वेषहि करीत नाहींत. किंबहुना त्यांची ऐतिहासिक कामगिरी लक्षांत घेऊन त्यांजविषयीं अभिमानच बाळगतात. म्हणून त्यांजवर ब्रिटिश सरकारची गैरमर्जी झाल्यास किंवा त्यांच्या अधिकाराचें आक्रमण त्यांजकडून होत असल्यास त्यांस तीं सांवरून धरतात व शक्य तेव्हां त्यांच्या वतीनेंहि भांडतात. पण उलटपक्षीं बहुतेक संस्थानिकांना मात्र त्यांच्या कामगिरीविषयीं कृतज्ञता वाटत नाहीं; इतकेंच नव्हे तर ब्रिटिश सरकारापेक्षांहि अधिक ऐट आणून आपल्या कारभारावर झालेली टीका पाहून ते चिडतात. अशाच संस्थानिकांचे लाड पुरविण्यासाठीं सरकारानें संस्थानिकांच्या संरक्षणाचा कायदा केला आहे. परंतु त्या कायद्यास न जुमानतांहि संस्थानी प्रजेचा कैवार घेणारीं वर्तमानपत्रें बरींच आहेत. कांहीं पत्रें तर

संस्थानी राजकारणासच वाहिलेलीं आहेत. अशाच पत्रांपैकीं मद्रासचें 'फेडरेटेड इंडिया', दिल्लीचें 'रियासत' व पुण्याचें 'संस्थानी स्वराज्य' हीं होत. रियासतीचे संपादक सरदार दिवाणसिंग मफतून यांनीं आपल्या पत्रांत भोपाळ संस्थानांतील राज्यकारभारावर टीका करणारा एक लेख लिहिला होता. त्यावरून दिवाणसिंग यांजविरुद्ध हुशंगाबादेच्या मॅजिस्ट्रेटाच्या कोर्टीत खटला भरण्यांत आला. सदर खटल्यांत आरोपीस हिशेबाचे कागदपत्र कोर्टापुढें येण्याची जरुरी भासून भोपाळ संस्थानांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या साक्षी आरोपीनें काढल्या. परंतु कोर्टानें त्याच्या साक्षी रद्द केल्यामुळें दिवाणसिंग यांनीं आपल्यातर्फे पुरावा देण्याचेंच नाकारलें. शेवटीं मॅजिस्ट्रेटानें जून १९३५ मध्यें खटल्याचा निकाल सांगून दिवाणसिंग यांस नऊ महिने सक्त मजुरीची शिक्षा सुनावली.

आतांपर्यंत सरकारानें वर्तमानपत्रकारांच्या मानेभोंवतीं जीं हत्यारें परजून ठेवलीं आहेत त्यांनीं केलेल्या संहाराचें वर्णन झालें. परंतु वरील सर्व कायदे असे आहेत कीं त्यांच्या आधारें वर्तमानपत्रकारावर आणिलेल्या आरोपांची चौकशी न्यायमंदिरांत होते, त्याला स्वतःच्या बचावासाठीं वकील व पुरावा देतां येतो आणि सरकाराला सदर आरोप साधार शाबीत करावे लागतात. पण त्याशिवाय मध्यंतरी राजकीय चळवळींत बनविलेला प्रेस ॲक्ट हा एक यमदंडच निर्माण झाला आहे. तो ज्यावर पडला त्याचा चुराडाच उडतो. प्रेस ॲक्टान्वयें सरकार जामीन मागून दरसाल हजारों रुपये गरीब वर्तमानपत्रकार व छापखानदार यांजपासून उकळतें आणि ही जामीनाची वाढती रक्कम एकीमागून एक जप्त करीत अखेर वर्तमानपत्र व छापखानाहि ताब्यांत घेतें. अशा प्रकारचें अत्यंत भयप्रद उदाहरण 'फ्री प्रेस जर्नल' या मुंबईतील पत्राचें. सदर पत्र रा. सदानंद यांनीं सन १९३० सालीं कायदेभंगाच्या चळवळींत सुरू केलें.

तें काँग्रेस पक्षाचें असल्यामुळेंच त्यांत काँग्रेसच्या धोरणास अनुकूल मजकूर येत असे. त्याजपासून अवघ्या पांच वर्षांत आठ जामिनक्या मागण्यांत आल्या. त्यांतील सहावी जामीनकी दहा हजारांची होती. ती १९३२ सालीं जप्त झाल्यावर सातवी जामीनकी ता. २७ आक्टोबर १९३२ रोजीं मालक व प्रकाशक यांजपासून प्रत्येकीं दहा हजारांची मुंबई सरकारानें मागितली. तीहि १९३५ च्या जून महिन्यांत जप्त करण्यांत आली. अशा रीतीनें फ्री प्रेस पत्र जामीनकीच्या पायीं एकंदरीनें ४६ हजार रुपयांना मुकलें. यांत पत्रकर्त्यांच्या विलक्षण धाडसाची तारीफ करावयाची कीं सरकारच्या निष्ठुरपणाविषयीं संताप व्यक्त करावयाचा हेंच समजत नाहीं. इतकें झाल्यावर फ्री प्रेस कर्ता आपलें पत्र न बंद करून सांगतो कोणाला ? या शेवटच्या जामीनजप्तीस कारण काय झालें, तर क्वेट्याच्या भूकंपांतील संकटग्रस्त व निराधार लोकांच्या मदतीस जाण्याची काँग्रेसच्या पुढाऱ्यांची इच्छा असतां त्यांस हिंदुस्थान सरकारानें बंदी केली, तिजविरुद्ध संपादकानें लिहिलेला लेख सरकारास आक्षेपार्ह वाटला !

सरकारी कायद्याचे वार कधीं चुकवीत तर कधीं सोशीत हिंदी वर्तमानपत्रकर्त्यांनीं गेलें अर्धे-पाऊण शतक संग्राम चालविला आहे. हा संग्राम करीत असतां कित्येक वीर धारातीर्थी पतन पावले आणि स्वातंत्र्य-प्राप्तीपर्यंत आणखी कित्येक पडतील व घायाळहि होतील. वर्तमानपत्र-कार बिनीचे योद्धे असून त्यांना हिंदी लोकांच्या जीवनक्रमांतील प्रत्येक क्षेत्रांत राज्यकर्त्यांशीं व त्यांच्या जातभाईंशीं लढावें लागलें आहे. परतंत्र राष्ट्राचा तेजोवध पावलोंपावलीं होत असतो. त्याच्या सद्गुणांचें संवर्धन राज्यकर्त्यांकडून करण्यांत येत नाहींच, उलट दुःखी व कुढ्या मनाला डागण्या बसण्याच प्रसंग नित्याचे. त्यावेळीं उत्तरास प्रत्युत्तर देऊन जशास तसें या नात्यानें उद्दाम व गर्विष्ठ अधिकाऱ्यांचीं बोटें

त्यांच्याच डोळ्यांत न घातलीं तर प्रजेची हिंमत अधिकच खचावयाची. हीं कामगिरी वर्तमानपत्रकाराशिवाय दुसऱ्या कोणासहि वक्तशीर करतां येणार नाहीं व साधणारहि नाहीं. कलकत्त्यास अमृतबझार पत्रिकेनें या बाबतींत केव्हां केव्हां महत्त्वाची देशसेवा केली आहे. लॉर्ड कर्झन यांच्यासारखा मदांध गव्हर्नर जनरल हिंदुस्थानांत दुसरा झाला नाहीं. त्यांनीं ता. ११ फेब्रुवारी १९०५ रोजीं कलकत्ता विद्यापीठाचे कुलपति ( चॅन्सेलर ) या नात्यानें भाषण केलें. त्यांत त्यांनीं पूर्वेकडील लोकांना—त्यांत हिंदी लोक आलेच—पश्चिमेकडील लोकांइतकी सत्याची चाड नाहीं, असे उपमर्दकारक उद्गार काढले. त्याविरुद्ध देशांतील सर्व हिंदी वर्तमानपत्रकारांनीं हांकाटी केली. पण त्या वरवरच्या हांकाटीपेक्षां खुद्द कर्झनसाहेब हेच एकदां खोटें बोलले असल्याचें माप त्यांच्या पदरांत बांधलें म्हणजे त्यासारखें मर्मावर नेमका घाव घालणारें दुसरें उत्तर कोणतें आहे? पत्रिकेच्या संपादकांनीं लॉर्ड कर्झन यांनीं हिंदुस्थानाचे व्हाईसरॉय होण्यापूर्वी लिहिलेलें ‘ प्रॉब्लेम्स ऑफ दी ईस्ट ’ हें पुस्तक मोठ्या खटपटीनें बाहेर काढून त्यांचें बेंड फोडलें. त्यांनीं पूर्वेकडील देशांत प्रवास करून त्यावर वरील पुस्तक लिहिलें होतें. प्रवासांत त्यांनीं कोरियाच्या परराष्ट्रीय कचेरीच्या अध्यक्षाची भेट घेतली. तिजविषयीं कर्झन लिहितात: “ कोरियांत तेहत्तीस वर्षांच्या आंतील मनुष्याला मान नाहीं हें मला माहीत असल्यामुळें मी त्याला चाळीस वर्षांचा असल्याचें सांगितलें. तें अध्यक्षास खरें वाटेना म्हणून तो म्हणाला ‘ वयाच्या मानानें तुम्ही लहान दिसतां. ’ मी म्हटलें ‘ हा तुमच्या देशांतील उत्कृष्ट हवेचा गुण आहे. ’ त्यानें विचारलें ‘ तुम्ही व्हिक्टोरिया राणीचे जवळचे आप्त आहांत काय? ’ मी ‘ नाहीं ’ म्हटलें. त्याबरोबर मी त्याच्या मनांतून उतरल्याचा संशय मला आल्यावरून तावडतोब सांगितलें ‘ माझें अद्यापि लग्न व्हावयाचें आहे. ” या उत्तराचा अर्थ असा कीं, कर्झन यांचें लग्न राणीच्या आप्तवर्गांत

कोणा स्त्रीशीं होण्याचा अजून संभव आहे. त्यांनीं दिलेल्या उत्तराचा अनुकूल परिणाम झाला.

वरील उतारा लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तींत गाळला होता. पत्रिकेनें उतारा छापतांच तिची हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेरहि सर्वत्र वाहवा होऊन कर्झनसाहेबांची इतकी फजिती झाली कीं त्यांना तोंडहि दाखविण्यास लाज वाटूं लागली असेल. पत्रिकेनें शोधपूर्वक बजावलेल्या कामगिरीनें पारतंत्र्यानें आधींच खचलेल्या हिंदी लोकांच्या मनाला केवढा तरी हुरूप चढला.

परतंत्रतेंतहि देशोन्नतीचीं कार्यें जर कोणी सर्वांत अधिक करण्यास समर्थ असतील तर ते वर्तमापत्रकारच होत. त्यांच्या शब्दाला हिंदुस्थानांत अद्यापिहि स्वाभाविकच बराच मान व वजन आहे. हा मान व वजन हीं स्वतःचें शील, दानत, आस्था, उद्योग, विद्वत्ता, कर्तृत्व, कल्पकता, दूरदृष्टि व धाडस यांच्या जोरावर हवीं तेवढीं वाढविण्यास त्यांस वाव आहे. वर्तमान-पत्रकार पुढारी आहेतच, पण एका अर्थानें आपल्या वाचक वर्गापुरते राजेहि आहेत. ते वाचक वर्गामार्फत लहान मोठीं शेंकडों कामें करून घेतात. लो. टिळक वर्तमानपत्रकाराच्या पेशांतूनच पुढारीपणाच्या पदावर चढले व त्या पदावर बसून त्यांनीं महाराष्ट्रांत किंबहुना साऱ्या हिंदुस्थानांत राजासारखी हुकमत गाजविली. त्यांनीं शिवाजीचा उत्सव सुरू करून महाराष्ट्रीयांत राजकीय स्वातंत्र्याची, मर्दुमकीची, धाडसाची गोडी उत्पन्न केली व त्यांच्यांतील अठरा पगड जातींत राजकीय ऐक्य घडवून आणिलें. त्यामुळें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं नवे आखाडे निघाले, शिक्षित तरुण दांडपट्टा, कुस्ती, हुतूतू, आट्यापाट्या, मलखांब इत्यादि देशी पद्धतीचा व्यायाम अभिमानपूर्वक करण्यांत भूषण मानूं लागले. त्यांनीं जुन्या गणे-शोत्सवाला नवीन सार्वजनिक स्वरूप देऊन व हिंदु समाजांत हिंदुत्वाचा, हिंदु धर्माचा, देवतांचा नवीन काळास साजेसा अभिमान उत्पन्न करून हिंदूंतील

सर्व जातींस समान भूमिकेवर आणिलें, धार्मिक व सामाजिक विषयांची चर्चा करण्यास संधी दिली आणि परतंत्र लोकांत सहसा न दिसणाऱ्या उत्साहाची सर्व महाराष्ट्रभर वर्षांतून दहा दिवसपर्यंत एक नवी लाटच पसरविली. गेलीं चाळीस वर्षें महाराष्ट्रांतील सर्व लहान मोठ्या गांवीं व शहरीं हा उत्सव सामुदायिक पद्धतीनें थाटांत साजरा होतोच, पण महाराष्ट्राबाहेरहि जेथें जेथें महाराष्ट्रीयांची वस्ती आहे तेथें तेथें तो हौसेनें साजरा करण्यांत येतो.

देशांत नवे नवे उद्योगधंदे काढण्यास वर्तमानपत्रांइतकें कोणाचेंच साहाय्य झालें नसेल. टिळकांनीं स्वदेशी चळवळींत स्वदेशी उद्योगांची राष्ट्रीय जीवनास व उत्कर्षास कशी आवश्यकता आहे याविषयीं महाराष्ट्रीय जनतेची प्रथम समजूत घातली व मागाहून असे धंदे काढणारास भांडवल व गिऱ्हाईक हीं दोन्ही मिळवून दिलीं; इतकेंच नव्हे तर औद्योगिक शिक्षणाचीहि सोय केली. महाराष्ट्रांत छत्र्या, चाकू, कात्र्या, कांच, कागद, साखर, कापड, टोप्या इत्यादिकांचे लहान मोठे कारखाने निघाले व त्यांपैकीं कित्येक चांगल्या स्थितींत चालूहि आहेत. त्याचें श्रेय टिळक, त्यांचें केसरी पत्र व इतर पत्रें यांनाच आहे. टिळकांनीं ज्यापाशीं लाखों रुपयांचा निधि आज आहे असा पैसाफंड पैसा पैसा करून लोकांकडून जमविला व त्यांतून तळेगांवास कांचशाळा स्थापून औद्योगिक शिक्षणाची कांहीं सोयहि केली.

वर्तमानपत्रकार स्वतः गरीब असतात; ते इतकें कीं त्यांच्यावर खटला झाला तर त्यांच्यातर्फें वकील वगैरे देण्याकरितां लोकांना निधि जमवावा लागतो. इतके दरिद्री पत्रकार एखाद्या कार्याप्रीत्यर्थ लाखों रुपये स्वतः गोळा करूं शकतात. टिळकांनीं पैसाफंडाकरितां केसरीतर्फें लक्षावधि रुपये गोळा केले. शिवाय रूसो-जपानी युद्धांत गुंतलेल्या जपानासारख्या परराष्ट्रास हजारों रुपये पाठविले. जसा रयतेचा पैसा

एका अर्थानें राजाचा तसा देशबांधवांचा पैसा वर्तमानपत्रकारांचा. फरक इतकाच कीं राजा रयतेपासून सक्तीच्या खुषीनें पैसा काढतो व वर्तमानपत्रकार खुषीच्या सक्तीनें तो काढतो. मात्र जनतेला पान्हविण्याची असली प्रतिभा पत्रकारांत पाहिजे.

खऱ्या राष्ट्रीय पत्रकर्त्यांचा निःश्वास हेंच राष्ट्राचें जीवन होय. तो दुष्टांना कर्दनकाळासारखा व सुष्टांना देवासारखा वाटतो. त्याच्या केवळ हुंकारानें देशांतील संस्कृति व कलाकौशल्य वाढीस लागतें. त्याची लेखणी ही जादूची कांडी आहे. ती कांडी तो जशी फिरवील तशी भोंवतालीं घडामोड सुरू होते. त्यानें उत्तम चित्रकाराचीं चित्रें छापलीं, एखाद्या कलावंताविषयीं दोन अनुकूल शब्द लिहिले कीं त्यांचें नांव देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत गाजून त्यांना लोकाश्रयाचा मार्ग सोपा होतो. प्रसिद्ध नट नारायणराव राजहंस यांच्या मधुर कंठनादानें आनंदलेल्या टिळकांच्या तोंडून 'बालगंधर्व' या नांवाचा उच्चार झाल्याबरोबर ती राजहंसांची जन्माची स्पृहणीय पदवीच होऊन बसली. लेखक वर्गाचे वर्तमानपत्रकार हे सम्राटच मानण्यांत येतात. नवे होतकरू लेखक मांडलिकाप्रमाणें त्यांच्या छत्राखालीं गोळा होतात. मराठींत इतिहासकार, चरित्रकार, निबंधलेखक, संशोधक या भिन्नभिन्न नात्यांनीं जे गृहस्थ योग्यतेस चढले त्यांपैकीं बहुतेकांनीं केसरीचाच आश्रय केला. त्यांना लेख लिहिण्याबद्दल टिळकांनीं बहुधा द्रव्य तर दिलें नाहींच व लेखकांनींहि द्रव्याची अपेक्षा केली नाहीं. उलटपक्षीं प्रारंभीं त्यांपैकीं कित्येकजण आपला लेख प्रसिद्ध होण्याच्या आशेनें त्यांच्या मागें लागले असतील. कारण आपला गुण प्रकट झाल्यापासून केसरीच्या हजारों वाचकांच्या निदर्शनास चोवीस–अठ्ठेचाळीस तासांच्या अत्यंत अल्पावधींत येऊन त्याची परीक्षा व स्तुति व्हावी यासारखें सात्विक समाधान गुणी किंवा विद्वान् मनुष्याला दुसरें कोणतें आहे? कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, लक्ष्मण रामचंद्र

पांगारकर, त्र्यंबक गुरुनाथ काळे, जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर, श्रीपाद महादेव माटे, महादेवशास्त्री दिवेकर इत्यादिकांची प्रारंभीं तरी प्रसिद्धि केसरीप्रभृति पत्रांतूनच झाली.

स्वभाषेची सेवा वर्तमानपत्रकाराइतकी कोणालाच साधली नाहीं. थोर पत्रकर्त्याला आपल्या लेखाकरितां प्रौढ, भारदस्त, चित्तवेधक अशी वाक्यरचना व शब्दयोजना करावी लागते. नित्याच्या परिपाठानें त्याची लेखनशक्ति प्रगल्भता पावते व भाषा कमावते. त्याला राजनैतिक, आर्थिक, परराष्ट्रीय व शास्त्रीय विषयांची चर्चा करतांना नव्या शब्दांची टांकसाळ चालू ठेवणें भाग पडतें. अशा रीतीनें ज्याची लेखणी तयार आहे आणि ज्याच्या विचारांना व कल्पनांना टाईपरायटरच्या कागदावर उमटणाऱ्या अक्षराप्रमाणें क्षणार्धांत शब्दस्वरूप धारण करण्याची संवय आहे असे वर्तमानपत्रकारासारखे जलदकलमी लेखक अत्यंत दुर्मिळ यांत शंका नाहीं. त्यांच्या हातांतील प्रसाराचें साधन तर त्याहूनहि दुर्मिळ. या कारणानें स्वभाषेच्या उत्कर्षाची कामगिरी पत्रकर्त्याइतकी कोणीच केली नाहीं. वर्तमानपत्रें शहरापासून खेड्यापर्यंत व विद्वानापासून अविद्वानापर्यंत सर्वत्र संचरतात. या कारणानें जी भाषा संपादकाची तीच देशांतील पुरुषांची, स्त्रियांची, मुलांची, मुलींची, ब्राह्मणांची, मराठ्यांची, स्पृश्यांची व अस्पृश्यांची होत चालली आहे. पुण्यांतला 'नक्की' हा शब्द बेळगांवच्या वकिलाच्या तोंडीं आढळेल, वऱ्हाडांतील 'कारवाई' धारवाडांत चालेल व म. गांधींचा 'हरिजन' धुळ्यांत पहावयास सांपडेल. नागपुरापासून धारवाडापर्यंत व हैद्राबादेपासून ग्वाल्हेरीपर्यंत जेवढे म्हणून मराठी बोलणारे शिक्षित लोक आहेत त्या सर्वांची भाषा वरच्या पातळीवर चढविण्याची व तिला एकसूत्रता आणण्याची कोशीस वर्तमानपत्रकर्त्यांचीच होय, यांत शंका नाहीं.

वर्तमानपत्रकारांच्या बहुविध सेवेबद्दल जनतेकडून त्यांचा सन्मान

होतो. इंग्रज सरकार व त्यांचे अधिकारी त्यांची संभावना कशी करतात याची कल्पना त्यांजकरितां जे कायदेशीर गळफांस सरकारानें करून ठेवले आहेत त्यावरून वाचकांस आलीच असेल. तरीहि इंग्रज सरकार मुद्रणस्वातंत्र्याची उपयुक्तता ओळखतें हें सिद्ध करण्यास त्यांनीं थोड्या प्रमाणांत कां होईना, जें स्वातंत्र्य पत्रकर्त्यांना ठेविलें आहे तें पुरेसें आहे. त्यांना, त्यांच्या अधिकाऱ्यांना व मुत्सद्यांना हिंदी लोकमत अजमावण्याचें वर्तमानपत्राइतकें ढळढळीत साधन अन्य नसल्यामुळें ते हिंदी वर्तमान-पत्रांतील मजकूर बारकाईनें वाचतात व आपल्या धोरणांत त्यास धरून बदलहि करतात. इनाक्यूलेशनपासून अपाय होत असल्याचें केसरीनें दाखवून देतांच मुंबई सरकारानें इनाक्यूलेशनची सक्ती थांबविली आणि प्लेगच्या लशींत सुधारणा केल्यावर वर्तमानपत्रांची अनुकूलता मिळविण्या-करितां तत्कालीन मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर सिडेनहॅम क्लार्क यांनीं परेळच्या लॅबोरेटरींत टिळकप्रभृति पत्रकर्त्यांना बोलावून घेऊन केलेली सुधारणा त्यांच्या निदर्शनास आणिली.

बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर सर ॲश्ले यांनीं अमृतबझार पत्रिकेचे संपादक बाबू शिशिरकुमार घोष यांच्या टीकेला वचकून त्यांना लांचहि देऊं केला; पण त्यांनीं तो झिडकारला हें वेगळें. माजी बादशहा पांचवे जॉर्ज हिंदुस्थानांत युवराज या नात्यानें आले असतां पत्रिका नियमानें वाचीत असत, यापेक्षां वर्तमानपत्रांच्या वजनदारीचें बलवत्तर प्रमाण दुसरें कोणतें पाहिजे ? कलकत्त्यास युवराजांनीं पत्रिकेचे संपादक बाबू मोतीलाल यांची समक्ष भेट घेऊन त्यांचें मत लक्षपूर्वक ऐकिलें. जॉर्ज बादशहांनीं म. गांधींस दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या वेळीं लंडनांत भेटीस बोलाविलें होतें हें प्रसिद्धच आहे. वर्तमानपत्रांचा सरकारच्या राज्य-पद्धतीवरील भडिमार सतत ऐकून इंग्लंडमधील मुत्सद्यांना व राजकारणी पुरुषांना इकडील राजकीय परिस्थिति चांगलीच अवगत झालेली असते

व त्या ज्ञानाचा परिणाम जितका व्हावयाचा तितका होतोहि.

मजूर पक्षाचे माजी पुढारी व इंग्लंडचे मुख्य प्रधान परलोकवासी राम्से मॅक्डोनाल्ड यांनीं उपरोधिक शब्दांनीं इकडील वर्तमानपत्रांचें मार्मिक वर्णन केलें आहे. ते एकदां हिंदुस्थानांत आले होते तेव्हां त्यांनीं देशी पत्रकर्त्यांच्या मुद्दाम गांठी घेतल्या होत्या. फिरत फिरत कलकत्त्यास गेले असतां अमृतबझार पत्रिकेच्या कचेरींत ते आले होते. संपादकास भेटून गेल्यावर त्यांनीं म्हटलें "I had an interview with one of an India's troublesome editors" ("मी हिंदुस्थानांत पीडा देणाऱ्या एका संपादकाची भेट घेतली.") वर्तमान-पत्रकर्त्यांच्या कृतींची याहून यथार्थ स्तुति ती कोणती!

# प्रकरण तेरावें

# दोन संस्मरणीय खटले

**लो. टिळकांवरील राजद्रोहाचा खटला**

केसरीचे संपादक लो. टिळक यांजवर १८९७ सालीं पहिला राजद्रोहाचा खटला झाला. त्यानंतर दुसरा खटला १९०८ मध्यें करण्यांत आला. सुरतेस भरलेली राष्ट्रीय सभा मोडून राष्ट्रीय पक्ष व नेमस्त पक्ष यांजमध्यें उघडपणें फूट पडल्यानंतर राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांना उचलून त्या पक्षाची राजकीय चळवळ चिरडून टाकावयाची असें सरकारच्या मनानें पक्कें घेतलें. त्यांतच बंगाल्यांत घडलेल्या खुनानें आगींत तेल ओतल्याप्रमाणें झालें. त्या वेळीं मुंबई इलाख्यावर सर जॉर्ज सिडेनहॅम क्लार्क हे गव्हर्नर होते व भारतमंत्रिपदावर लॉर्ड मोर्ले अधिष्ठित होते. मोर्ले यांना टिळकांवर खटला भरण्याची कल्पना तितकीशी रुचली नाहीं; परंतु त्या बाबतींत खरा दुराग्रह गव्हर्नराचाच असल्यामुळें मोर्ले यांना त्याच्या इच्छेच्या आड येणें राजकीय दृष्ट्या मुत्सद्दीपणाचें न वाटून त्यांनीं खटल्याला संमति दिली. ता. २३ जून १९०८ रोजीं मुंबई सरकारानें टिळकांवर खटला भरण्यास मंजुरी दिली. मुंबई शहराचे डेप्यूटी पोलीस सुपरिंटेंडेंट यांनीं दुसऱ्याच दिवशीं चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. ऑस्टन यांजकडे फिर्याद दाखल केली. फिर्यादींत मजकूर पुढील प्रमाणें होता:—'केसरीच्या ता. १२ मेच्या अंकांत टिळकांनीं 'देशाचें दुर्दैव' या मथळ्याखालीं अग्रलेख लिहिला आणि त्या योगें सरकाराविषयीं द्वेष व अवमानबुद्धि लोकांत उत्पन्न केली. निदान ती उत्पन्न करण्याचा त्यांनीं

प्रयत्न केला. अर्थात् हा गुन्हा राजद्रोहाचा होय. तरी इंडियन पिनल कोड कलम १२४ अ व १५३ अ याखालीं टिळकांचा इन्साफ होऊन योग्य ती शिक्षा व्हावी.' यावरून मॅजिस्ट्रेटांनीं टिळकांना अटक करण्याविषयीं वॉरंट काढलें व त्याच दिवशीं सायंकाळीं त्यांना सरदारगृहांत पकडण्यांत आलें. तसेंच दुसरें एक वॉरंट काढून मॅजिस्ट्रेट यांनीं केसरी पत्राच्या फायली व इतर मुद्देमाल कोर्टापुढें हजर करण्याविषयीं पोलिसांस अधिकार दिला. त्याप्रमाणें केसरीकचेरीची झडती झाली व झडतीच्या दुसऱ्याच दिवशीं मुंबई सरकारानें टिळकांवर आणखी एक खटला भरला. ता. ९ जूनच्या केसरींत 'हे उपाय टिकाऊ नाहींत' या मथळ्याखाली जो अग्रलेख आला होता तो या खटल्यास आधारभूत होता. ता. २५रोजीं निघालेल्या वॉरंटावरून टिळक तुरुंगांत होतेच. तेथेंच ता. २९ रोजीं त्यांजवर दुसऱ्या खटल्याचें वॉरंट बजावण्यांत आलें. त्या तारखेस मॅजिस्ट्रेटपुढें असिस्टंट ओरिएंटल ट्रान्सलेटर रा. भास्कर विष्णु जोशी यांची साक्ष झाली. केसरीचे मुंबईतील एजंट रा. नारायणराव दातार यांची जबानी होऊन त्यांनीं मुंबईंत केसरी वांटला जातो याविषयीं माहिती सांगितली. लगेच टिळकांची जबानी घेतली. तींत त्यांनीं आपणास काय सांगावयाचें तें सेशन कोर्टांत सांगेन असें म्हटलें. तेव्हां मॅजिस्ट्रेट मि. ऑस्टन यांनीं ता. १२ मे व ता. ९ जून या दोन केसरीच्या अंकांतील लेखाबद्दल कलम १२४ अ व कलम १५३ अ या अन्वयें आरोप ठेवून खटला सेशनकमिट केला. ता. २५ जून रोजीं बॅरिस्टर दावर (धाकटे) व हायकोर्ट वकील रा. महादेव राजाराम बोडस यांनीं मॅजिस्ट्रेटापुढें टिळकांना जामिनीवर सोडण्याचा अर्ज केला; पण तो नामंजूर झाला. खटला सेशनकमिट झाल्यावर फिरून ता. २ जुलई रोजीं न्यायमूर्ती दावर यांजपुढें तसलाच अर्ज करण्यांत आला, पण त्याची वाट पहिल्या अर्जाप्रमाणेंच लागली. निकाल देतांना न्या. दावर

म्हणाले ‘ टिळकांना जामिनावर खुलें करणें हें शहाणपणाचें होणार नाहीं. इतकेंच नव्हे तर मी असें कां करतों याचीं कारणेंहि न सांगणें शहाण-पणाचें होईल.’

ता. २ जुलई रोजीं टिळकांच्या इन्साफाकरितां खास ज्युरी नेम-ण्यांत यावी असा सरकारातर्फे अर्ज झाला. त्याला टिळकांतर्फे बॅरिस्टर जाप्टिस्टा यांनीं हरकत घेतली पण तिचा उपयोग झाला नाहीं. खटल्याला सुरुवात सोमवार ता. १३ जुलै रोजीं सेशनांत झाली. सरकारातर्फे काम चालविण्यास ॲडव्होकेट जनरल बॅरिस्टर ब्रॅन्सन हे असून बॅ. इन्व्हेरॅरिटी व बॅ. बिनिंग हे त्यांस मदत करीत होते. टिळकांतर्फे काम टिळक स्वतःच चालवीत होते. ज्यूरींत सात युरोपियन व दोन पार्शी होते. प्रत्येक लेखां-बद्दल दोन दोन कलमें लावून टिळकांवर एकंदर चार आरोप ठेवण्यांत आले. प्रथम सरकारी साक्षीपुरावा झाल्यानंतर टिळकांनीं लेखी जबाब दिला. मग टिळकांचें न्यायाधीशासमोर बचावाचें भाषण झालें. त्यांचें भाषण पांच दिवस चालून ता. २२ जुलई रोजीं संपलें. शेवटीं ज्यूरीला उद्देशून ते म्हणाले, ‘ व्यक्तिशः माझें वय लक्षांत घेतलें तर मी आणखी किती दिवस जगणार ? पण माझ्या देशाचें आयुष्य कांहीं संपत ओल नाहीं. माझे विचार बरोबर आहेत असें म्हणणारा निदान एक गृहस्थ या ज्यूरींत मला मिळाला तरी मला समाधान वाटेल. मी बोललों तें स्पष्ट बोललों. माझी भाषा ढोबळ व सडेतोड होती. एखादी गोष्ट मनाला पटली तरी ती बोलून दाखविण्यास धैर्य लागतें आणि हें धैर्य ईश्वरानें तुम्हांला द्यावें अशी माझी प्रार्थना आहे. ’

टिळकांमागून ॲडव्होकेट जनरल मि. ब्रॅन्सन यांचें भाषण झालें. ते म्हणाले, ‘ टिळकांना बाँब करावयाचे नसतील पण त्यांचें वर्णन करून सरकाराला दहशत घालावयाची होती. ज्याला बाँब-गोळे पसंत नाहींत तो त्यांचें वर्णन ‘ती एक जादू आहे, तो एक मंतरलेला

ताईत आहे' असें कसें करील ? त्यांनीं पावलोपावलीं सरकाराला 'परकी' हा शब्द लावला आहे.' न्यायमूर्ती दावर यांनीं ज्यूरींला खटला समजावून दिल्यानंतर ज्यूरीचे लोक आठ वाजून तीन मिनिटांनीं एकत्र विचार करण्याकरितां आपल्या खोलींत गेले व नऊ वाजून वीस मिनिटांनीं परत आले. सरकारानें चार आरोपांपैकीं एक आरोप कमी केला असल्यानें ज्यूरींतील सात जणांनीं टिळक तिन्ही आरोपाखालीं दोषी असल्याचें व दोघांनीं दोषी नसल्याचें सांगितलें. न्यायमूर्ती शिक्षा सांगतांना टिळकांना म्हणाले, 'तुम्हांला शिक्षा सांगणें हें आतां माझें कर्तव्य आहे. तें करतांना मला फार दुःख होतें. किती तें सांगतां येत नाहीं. तुम्ही अत्यंत बुद्धिवान् आहां, सामर्थ्यवान् आहां, लोकांवर तुमचें फार वजन आहे. सरकाराविषयींचा तुमचा द्वेष गेल्या दहा वर्षांत नाहींसा झाला नाहीं. दर आठवड्याला तुम्ही अत्त्याचाराला उत्तेजन मिळेल असे लेख लिहीत आलां आहां. तुमच्यासारखे वर्तमानपत्रकर्ते हा ईश्वरानें या भूमीला दिलेला शापच होय. तुम्हांला दोनहि गुन्ह्यांबद्दल सहा वर्षांची काळेपाण्याची शिक्षा देतों व तिसऱ्या आरोपाबद्दल फक्त एक हजार रुपये दंड करतों.'

न्यायमूर्तींनीं शिक्षा सुनावण्यापूर्वी टिळक म्हणाले होते, 'मी गुन्हेगार नाहीं. लौकिक गोष्टींचें नियंत्रण करणारी अशीहि एक शक्ति न्यायपीठाहून वरिष्ठ आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच अशी असेल कीं, मला शिक्षा व्हावी व मी शिक्षा भोगल्यामुळेंच मी अंगिकारलेल्या कार्याची प्रगति व्हावी.'

टिळकांच्या शिक्षेची बातमी मुंबई शहरांत पसरतांच सहानुभूतिदर्शक दंगे मुंबईत झाले म्हणूनच कीं काय गव्हर्नरांनीं आपल्या अधिकारांत काळेपाण्याची शिक्षा साधी केली व त्यांना अंदमानांत न पाठवितां ब्रम्हदेशांत पाठविलें.

**न्यायमंदिराच्या बदनामीचा खटला**

मि. लायोनेल हेविट कोलसन, स्पेशल सुपरिंटेंडेंट गुप्त पोलीस खातें, यांनीं ता. १२ मे १९१३ रोजीं बारिसाल येथील ॲडिशनल मॅजिस्ट्रेटाच्या कोर्टांत अमृतबझार पत्रिकेवर फिर्याद केली. ती इं. पि. कोड कलम १२१ अ खालीं गिरींद्र मोहनदास व ४३ इसम यांनीं गुन्हा केला त्यासंबंधाची होती. मॅजिस्ट्रेट मि.नेल्सन यांनीं फिर्यादीची तपासणी शपथेवर घेतली व कांहीं वॉरंटें काढण्याचा हुकूम दिला. दरम्यान ता. १९ व २० मे रोजीं अमृतबझार पत्रिकेंत पोलिसांच्या कृत्यावर कांहीं टीका आली. त्याशिवाय नरेंद्र मोहन सेन हा आरोपी कच्च्या कैदेंत असतां त्याचा घेतलेला फोटो व इतरहि मजकूर होता. पत्रिकेनें या प्रकरणावर कांहीं अग्रलेख लिहिले त्यांतील एक अग्रलेख पुढीलप्रमाणें होताः

" बारिसाल कटाच्या खटल्याची बातमी तीन आठवड्यांपूर्वी एका बड्या अधिकाऱ्यापासून आम्हांला समजली. त्याला ती ऐकीवच होती परंतु खरी असल्याविषयीं त्याची खात्री होती. त्यानें आम्हांला विचारलें, तुम्हांला यांतील कांहीं माहीत आहे काय ? आम्ही कानांवर हात ठेवले. लॉर्ड कारमायकेलसारखा गव्हर्नर जोंपर्यंत बंगाल प्रांतावर आहे तोंपर्यंत असली गोष्ट होणार नाहीं; कारण बंगालमध्यें त्यांनीं मोठ्या चतुराईनें शांतता प्रस्थापित केली असल्यामुळें ते तिच्यांत बिघाड होऊं देणार नाहींत असें आम्ही त्याजपाशीं म्हटलें. पण आमचा अंदाज खोटा ठरला हा खटला अखेर झालेला पाहून आमची निराशा किती झाली हें सांगतां पुरवत नाहीं.

"गुप्तखात्यानें लोकांना भिवविण्याकरितां काय केलें याची कल्पना करा पाहूं. पकडलेल्या आरोपींपैकीं बरेच जण लपून नसून प्रामाणिक लोकांप्रमाणें समाजांत वावरत होते. एकजण हायस्कुलचा हेडमास्तर

असून सुट्टीचा आपल्या घरीं जात असतां आगगाडींत त्याला पकडलें. दुसरा एक जण शाळेंत शास्त्री होता. तो आपल्या दुखणाईत आप्ताची शुश्रूषा करीत असतां पकडला गेला. सीताकुंड शाळेंत दुसऱ्या इयत्तेंत शिकणारा मुलगा आरोपींत आहे. दुसरा एक मुलगा कँबेल मेडिकल स्कूलमधील असून कलकत्त्यास सर्पेंटाइन गल्लींत रहातो. हे लोक व मुलगे एखाद्या भयंकर कटांत असते तर ती बातमी फुटल्याशिवाय राहिली नसती; त्यांना शाळाधिकाऱ्यांनीं शाळेंत कामावर ठेवलें नसतें. त्यांच्याविरुद्ध पोलिसांपाशीं काय पुरावा आहे हें त्यांना अगर त्यांच्या आप्तांना कळूं न देतां त्यांना कां पकडण्यांत आलें? असल्या प्रकारानें जनतेचीं मनें अस्वस्थ होतील.

"गुप्त पोलीस खात्यास तारतम्य व सारासार विचार किती आहे पहा. आरोपी म्हणजे थोडे बिनहत्यारी बंगाली. ते सगळे पोलिसांच्या बंदोबस्तांत. पण त्यांपैकीं प्रत्येक जण सशस्त्र गुरख्यांच्या वेगवेगळ्या टोळींनें वेढलेला. हें लष्करी प्रदर्शन अगदीं निरर्थक व हास्यास्पद नव्हे काय? कांहीं आरोपींना चितगांग, नवखाली इत्यादि गांवांहून बारिसाल येथें हातकड्या घालून व मागच्या अंगानें काढण्यांनीं बांधून आणिलें असल्याचें समजतें. हा निर्दयपणा कां करण्यांत आला? इंग्लंडांत सफ्रीजेट कटवाल्यांना असेंच वागवितात का? यांचा हेतु लोकांच्या छातींत धडकी भरविण्याचा असेल. पण त्यास निर्दयपणें वागविण्यानें जनतेच्या मनांत राज्यकारभाराविषयीं प्रेम उत्पन्न होणार नाहीं.

"आरोपींपैकीं एक दुसऱ्या इयत्तेंतला पोरगा, त्याच्यावर आरोप काय म्हणे राजाशीं युद्ध करण्याचा. ते फोर्ट विल्यमवर मॅक्झिम बंदुका व गॅटलिंग्ज (Gatlings) यानिशीं हल्ला करणार होते काय?

"हा कटहि किती लांबपर्यंत पसरला आहे पहा! चितगांगपासून कलकत्त्यापर्यंत. बकरगंज, डाका, चितगांग, नवखाली व कलकत्ता येथील

घरांच्या झडत्या घेतल्या आहेत व इतर जिल्ह्यानाहि ही पीडा पोंचेल याविषयीं आम्हांला शंका नाहीं; आणि सबंध राष्ट्र जरी न म्हटलें तरी फार लोक या खटल्यांत गोवले जातील व सारा देश उलथापालथा केला जाईल कीं काय कोण जाणें !

" धंदेवाईक दरवडेखोरांपेक्षां भद्र लोक ( सुशिक्षित ) आरोपींना निराळ्या रीतीनें कां वागविण्यांत यावें हेंच समजत नाहीं. दरवडेखोर तो दरवडेखोर; मग तो प्रतिष्ठित वर्गांतला असो कीं गुन्हेगार जातींतला असो. सामान्य दरवडेखोरांना पोलीस पकडून नेतात तेव्हां लष्करी फौजेची धामधूम व घरांच्या झडत्याचें सत्र यांनीं देशांत गडबड उडवून दिली जात नाहीं किंवा त्यांची चौकशी स्पेशल मॅजिस्ट्रेटाकडूनहि करण्यांत येत नाहीं. मग तीच पद्धति भद्र लोकांच्या बाबतींत कां लागू करूं नये ? एखाद्या आरोपीची चौकशी होण्यापूर्वीं व त्याला शिक्षा ठोठावण्यापूर्वीं त्याला अत्यंत वाईट बदमाषाप्रमाणें वागविण्यांत यावें हें अन्यायाचें व गैरवाजवी नव्हे काय ? ज्या आरोपींविरुद्ध प्रत्यक्ष पुरावा नाहीं अशा आरोपींना तरी निदान हातकड्या कां घालण्यांत याव्या ? जामीन कां नाकारण्यांत यावा ? व गुन्हा शाबीत होण्यापूर्वीं तुरुंगांत कुजत कां ठेवण्यांत यावें ?

" लॉर्ड कारमायकेल यांना आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं खटल्याचे कागद स्वतः पहावे व त्यांत स्वतः लक्ष घालावें. त्यांजवर या बाबतींत खरोखरच मोठी जबाबदारी आहे. त्यांची स्वतःची खात्री झाली तर आरोपींवरील खटला चालू करावा. पण तेव्हांहि स्वतःच्या बचावाकरितां त्यांना हरतऱ्हेची सवलत मिळावी. कारण त्यांना प्रतिकूलता फार. फिर्यादी पक्षाला सरकारी सर्व साधनें अनुकूल आहेत. पण बिचाऱ्या आरोपींना मित्रांची किंवा पैशाची मदत नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यांचें स्वातंत्र्यहि शिल्लक नाहीं. अशा रीतीनें झगडा विषम आहे. आरोपी निर्दोषी असतील तर त्यांना आपली अब्रू साफ करण्यास योग्य ती संधी

सरकारनें दिली पाहिजे. आमची माहिती अशी कीं, खरी कीं खोटी कोण जाणें, इंग्लंडांत तेथील सरकार निराधार आरोपींना वकिलांची मदत देतें. मग आमच्या सरकारनेंहि विलायत सरकाराचें अनुकरण कां करूं नये? तसें केल्यानें त्यांचाहि लोकांत बोलबाला होईल."

पत्रिकेच्या या लेखाचा लोकांवर फार परिणाम झाला. लोक क्षुब्ध झाले. अँग्लो इंडियन पत्रें पत्रिकेवर खवळलीं. कोर्टापुढील खटल्यासंबंधानें पत्रिकेनें लिहून न्यायाच्या कामाला हरकत आणिली अशी त्यांनीं ओरड चालविली व पोलिसांच्या कृत्याची तरफदारी केली. सरकारी अधिकाऱ्यांनाहि आतां झोंप घेणें अशक्य झालें. नरेंद्रनाथ सेनचा फोटो घेतल्याची बातमी खोटी असल्याचें बंगाल सरकाराच्या चीफ सेक्रेटरीनें पत्रिकेस कळविलें व तें पत्र ता. २४ मे च्या पत्रिकेंत प्रसिद्ध झालें. त्यानंतर पंधरा दिवसात म्हणजे ता. ६ जून १९१३ रोजीं बंगालचे ॲडव्होकेट जनरल मि. केनरिक यांनीं हायकोर्टाकडे पत्रिकेविरुद्ध अर्ज केला. कलकत्ता हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश सुप्रसिद्ध सर लॉरेन्स जेन्किन्स हे होते. सदर कामीं जेन्किन्स व ॲडव्होकेट जनरल मि. केनरिक यांजमध्यें झालेला संवाद वाचनीय आहे.

जेन्किन्स—मी खटल्यांतील कागदपत्र पाहिले. पण त्यांत बाबू मोतीलाल हे पत्राचे संपादक असल्याचा कायदेशीर पुरावा मला आढळला नाहीं.

ॲडव्होकेट जनरल—आमची ॲफिडेव्हिट (कैफीयत) वाचली म्हणजे तें लक्षांत येईल. आम्ही मोतीलाल आहेत का म्हणून चौकशी करण्यासाठीं पत्रिकेच्या कचेरींत गेलों तेव्हां उपसंपादक म्हणाले, 'होय संपादक व व्यवस्थापक दार्जिलिंग येथें आहेत.'

जेन्किन्स—पण तेवढ्यानें भागणार नाहीं. ही फार विचाराची गोष्ट आहे. मी फिर्याद-अर्ज वाचला आहे; पण त्याजवरून मोतीलाल

घोष संपादक व व्यवस्थापक असल्याचें सिद्ध होत नाहीं. कारण तसें लीगल रिमेंब्रन्सरनें शपथेवर म्हटलेलें नाहीं.

ॲ. ज.—तसें नसेल, पण तशी त्यांना माहिती मिळाली असेल.

जेन्किन्स—पण फौजदारी खटल्यांत तशानें भागणार नाहीं.

ॲ. ज.—बाबू मोतीलाल हे जी कंपनी पत्रिका चालवितें तिचे एक डायरेक्टर आहेत.

जेन्किन्स—पण त्यावरून मोतीलाल संपादक व व्यवस्थापक आहेत असें कसें समजावयाचें ?

ॲ. ज.—मोतीलाल यांजवर कोर्टांत पूर्वीं असलेंच काम चाललें होतें, तेव्हां त्यांनीं आपण मॅनेजर असल्याचें नाकबूल केलें नव्हतें.

जेन्किन्स—पण मूळ मुद्दा सिद्ध करण्यास तो पुरावा पुरेसा नाहीं.

ॲ. ज.—पण उपसंपादकानें तसें सांगितलेंच आहे.

जेन्किन्स—पण फौजदारी खटल्यांत तिऱ्हाइताची माहिती काय कामाची ?

ॲ. ज.—आपण म्हणतां तें मला मान्य आहे.

अशा रीतीनें मोतीलाल हे पत्राचे संपादक व व्यवस्थापक असल्याचें नाशाबीद झाल्यावरून न्यायमूर्तींनीं त्यांजवरील खटला खर्चासुद्धां काढून टाकला. मुद्रक व प्रकाशक यांजवरील खटला पुढें चालू राहिला तरी तोहि मागाहून न्यायमूर्तींनीं खर्चासुद्धां काढून टाकला. अशा रीतीनें कोर्टाच्या बेअदबीचें प्रकरण अनपेक्षितपणें संपलें.

# प्रकरण चौदावें

# वर्तमानपत्रांची छपाई

छापखान्याच्या सर्वसामान्य कामाहून वर्तमानपत्रांचें काम अगदीं वेगळ्या पद्धतीचें असतें. वर्तमानपत्रांत किती मजकूर छापावयाचा हें जसें ठरलेलें असतें तसेंच तो अमुक एका ठराविक वेळांत छापून झालाच पाहिजे असाहि त्यावर निर्बंध असतो. याकरितां जेथें दैनिक वर्तमानपत्रांचें, अर्धसाप्ताहिकांचें किंवा मोठ्या साप्ताहिकांचें काम चालतें तेथें छापखान्याकडे जो मजकूर जुळण्यासाठीं पाठवावयाचा तो सर्व एकाच माणसाच्या हातून पाठविला जातो. संपादकाचें काम हेंच होय. असें करण्यानें तोच मजकूर दुबार जाणें किंवा एकाद्या विषयाला तितकें प्राधान्य नसल्यास तो कमीअधिक करणें या गोष्टी व्यवस्थितपणें होऊं शकतात.

वर्तमानपत्र मोठें असलें म्हणजे कोणत्या पानावर कोणता मजकूर सामान्यतः द्यावयाचा या बाबतींत कांहीं विशिष्ट विषयांपुरतें तरी धोरण ठरलेलें असतें. येवढ्याकरितां ठसेदाराकडे ( कंपॉझिटर ) मजकूर पाठवितांना अमुक एक मजकूर अमुक पानावर अमुक ठिकाणीं यावयाचा याची त्यास प्रथमपासूनच माहिती दिली पाहिजे. मजकुराच्या हस्तलिखितावर पानांचे जे क्रमांक घातले जातात त्यांतच कांहीं पद्धतशीर धोरण ठेविलें म्हणजे ठसेदाराचें जोडणीचें काम फार सोपें होतें. समजा कीं, आठ पानांचें वर्तमानपत्र आहे व त्यावर प्रत्येक पानांत कांहीं विशिष्ट मजकूर छापावयाचा

आहे. तर अशा ठिकाणीं जो मजकूर ज्या पानावर छापावयाचा असेल त्या मजकुरास वेगवेगळे क्रमांक घालावे. उदाहरणार्थ, दुसऱ्या पानावरील मजकुरास २०१ पासून सुरुवात करावी, तिसऱ्या पानावरील मजकुरास ३०१ पासून सुरुवात करावी इत्यादि. असें केल्यानें कोणता मजकूर कोठें घालावयाचा आहे याची अगोदरपासूनच ठसेदारास कल्पना होते.

कांहीं मजकूर असा असतो कीं जो कोठेंहि घातला तरी चालतो. अशा मजकुराची, विशेषतः मांडणी करतांना वर्तमानपत्रास फार गरज असते. अशा मजकुरासहि एकादा स्वतंत्र क्रमांक घालावा.

संपादक व ठसेदार यांच्यामधील दुवा म्हणजे छापतपासनीस (प्रुफरीडर) हा होय. जुळलेल्या मजकुरांतील चुका दुरुस्त करून दुरुस्त मुद्रितें किंवा छाप ( प्रुफें ) संपादकाकडे पाठविले जातात. या छापांवरहि मजकुराच्या प्रतीचा क्रमांक घातलेला असला म्हणजे संदर्भ लक्षांत येण्यास त्याचा उपयोग होतो. हे दुरुस्त छाप दोन दोन काढण्यांत येतात. एक तो मजकूर लिहिणाराकडे व दुसरा संपादकाकडे पाठविला जातो. मूळ हस्तलिखित हें संपादकाकडेच पाठविलें जातें. त्या मजकुरांत कांहीं दोष राहिले असल्यास ते दुरुस्त करून तो मजकूर छाप-तपासनीस हा संपादकाकडे पाठवून देतो व अखेरचा म्हणून परत छापखान्याकडे दुरुस्तीस जातो. अशा रीतीनें मूळ मजकुराचे सर्व छाप तयार केले जातात.

मजकुराची जुळणी ( कंपोजिंग ) ही हातानें जशी केली जाते तशीच ती यंत्रानेंहि केली जाते. ही जुळणी करण्याचीं सध्यां फार प्रचलित असलेलीं यंत्रें तीन आहेत—१ लायनोटाईप २ इंटरटाईप व ३ मोनोटाईप. लायनोटाईप व इंटरटाईप हे दोनहि एकाच जातीचे होत. या यंत्रांच्या साहाय्यानें मजकुराच्या अखंड ओळींच्या ओळी तयार होतात. परंतु जर त्या ओळींत कांहीं चुका झाल्या तर त्या दुरुस्त करण्यासाठीं मूळ ओळींतील अक्षरें वेगळीं काढतां येत नाहींत म्हणून तीं

ओळच काढून टाकून दुसरी नवीनच ओळ तेथें घालावी लागते. असें करतांना पुष्कळदां आणखी नव्या चुकाहि होण्याचा संभव असतो. याकरितां लायनोटाईप किंवा इंटरटाईप या यंत्रांवरील दुरुस्त्या पुष्कळदां अधिक वेळां कराव्या लागतात. मोनोटाईप यंत्राचें तसें नाहीं. त्या यंत्राच्या साह्यानें होणारी जुळणी, सुट्यासुट्या टाईपांची असल्यामुळें चुकलेलें अक्षर तेवढेंच दुरुस्त करतां येतें.

मजकूर जुळवून झाल्यानंतर पुढच्या मांडणीच्या कामांत (arrangement) हातानें जुळविलेल्या किंवा मोनोटाइपावर जुळविलेल्या सुट्या ठशाच्या जुळणीपेक्षां लायनोटाईप व इंटरटाईप यावरील अखंड ओळींची जुळणी फार सोपी असते. याचें कारण तेथें पडझड होण्याचा संभव नसतो. बचकभर ओळी सहज इकडून तिकडे फिरवितां येतात व हें रचाईचें कामहि फार लवकर होतें. वर्तमानपत्राच्या रकान्याची रुंदी फार मोठी नसल्यामुळें या यंत्रावर मजकूर जुळवितांना जरी थोड्या फार चुका झाल्या असल्या तरी त्यांची दुरुस्तीहि चटकन् करतां येते व म्हणून मोठमोठ्या इंग्रजी वर्तमानपत्रांच्या छापखान्यांतून लायनोटाईप किंवा इंटरटाईप या यंत्रांचा प्रसार अधिक दिसून येतो. मराठी जुळणीसाठीं अद्याप या यंत्रांचा उपयोग फारसा कोठें होत नाहीं. तथापि चांगल्या कोऱ्या ठशाच्या छपाईची आवड समाजांत दिवसेंदिवस वाढत असल्यामुळें याहि यंत्राचा मराठी जुळणीच्या कामीं पुढेंमागें उपयोग सुरू झाल्याशिवाय रहाणार नाहीं. इंग्रजीमध्यें एक मनुष्य सामान्यतः एका तासांत दीड ते दोन रकाने मजकूर लायनोटाईप यंत्रावर जुळवूं शकतो. उलट येवढें काम हातानें करावयास एका माणसास सबंध दिवस लागतो.

मजकुराची जुळणी हातानें करावयाची असली म्हणजे तें काम अनेक ठसेदारांस वांटून देतात व सर्वांनीं मिळून एकएक रकाना मजकूर उभा करावयाचा असतो. याकरितां प्रत्येक ठसेदारास एकएक स्टिक म्हणजे

साधारणपणें दहा ओळी जुळवितां येतील एवढ्या मजकुराची प्रत दिली जाते. पांचसहा ठसेदार असले म्हणजे सुमारें अर्ध्या तासांत ते एक रकाना मजकूर उभा करूं शकतात व छाप तपासण्याचें काम सुरू होऊं शकतें. असें करतांना पुष्कळदां मजकुराची प्रत फार मोठी असेल तर तिचे तुकडे तुकडे करून ती ठसेदाराकडे दिली जाते किंवा सरठसेदार (फोरमन) तें काम करतो. असें केल्यामुळें एक स्टिक म्हणजे सुमारें दहा ओळी मजकूर जुळवून झाला म्हणजे त्या ठसेदाराची शेवटची ओळ जेवढी अपुरी राहिली असेल तेवढी फट त्या ओळीमध्यें पडलेली असते. अशा फटी पुष्कळदां पडतात व त्यामुळें एका ओळींत वास्तविक सहासात शब्द असावयाच्या ऐवजीं दोनतीनच शब्द दिसतात. सारख्या भरणीच्या ( स्पेसिंगच्या ) दृष्टीनें वास्तविक ही चूक आहे. परंतु वर्तमानपत्रांत हें सारें चालतें करून घ्यावें लागतें. पुष्कळदां अशा ह्या ओळींमधून एकाद दुसरा नवीन शब्द घालून ती फट भरून काढण्यांत येतें; परंतु हें इष्ट असलें तरी नेहेमींच शक्य असतें असें नाहीं.

मजकुराचे सर्व छाप तयार झाले म्हणजे मांडणीच्या ( अरेंजमेंट ) कामास सुरुवात होते. ही मांडणी करतांना पानाच्या उठावदारपणाकडे (get up) फार लक्ष पुरवावें लागतें. कोणत्या मजकुरास अधिक महत्त्व द्यावयाचें, कोणतीं चित्रें घालावयाचीं, कोणता मजकूर विशिष्ट ठिकाणींच आला पाहिजे हें प्रथम लक्षांत घेऊन मांडणी केली पाहिजे. कांहीं पानें मजकुराचीं असतात तर कांहीं जाहिरातींचीं असतात. मजकुराचे पानांत भरतीसाठीं जेथें जाहिराती घातल्या जातात, तेथें मजकुरास प्राधान्य दिलें पाहिजे. अशा पानांत जाहिराती कडेकडेला व खालींखालीं अशा रचून मजकुरास मध्यस्थान दिलें जातें. पुष्कळदां फोटो अगर चित्र, तसेंच मोठमोठ्या ठशांतील मथळे हे कागदाच्या मध्यावर घालण्यांत येतात; परंतु रकान्याचा मध्य हा गणितानें येणाऱ्या मध्यापेक्षां

जरा वरच्या बाजूस येतो. याची माहिती मांडणी करणाऱ्या माणसाला जशी हवी तशीच ती छापतपासनिसास व संपादकास हवी. सहा रकानी पानांच्या वर्तमानपत्रांत समपृष्ठावरील चौथा रकाना व विषम पानावरील तिसरा रकाना हा मध्य मानला जातो. याचें कारण मनुष्य वर्तमानपत्र पहातांना एकच पान डोळ्यापुढें न ठेवतां दोन पानांकडे एकदम पहात असतो.

वर्तमानपत्रांत ब्लॉक (ठोकळे), कार्टून ( व्यंग्यचित्रें ) घालण्यांत येतात. जेव्हां स्क्रीन ब्लॉक असतात तेव्हां त्यांची उंची ठशापेक्षां तीन सहस्रांश इंचाहून जास्त असावी. लाइन ब्लॉकच्या बाबतींत ती जास्त असण्याचें कारण नाहीं. मजकुराची मांडणी करतांना ब्लॉकची उंची आधींच तपासून घेतलेली बरी. उंची कमी किंवा जास्त असल्यास ती वाढवून किंवा घांसून बरोबर करण्यांत यावी. यासाठीं ब्लॉकच्या उंचीचें माप प्रत्येक छापखान्यांत ठरलेलें असतें.

मजकुराची मांडणी झाल्यानंतर त्याचे पुन्हां छाप पाडण्यांत येतात. हा तिसरा छाप ( प्रुफ ) होय. या वेळीं मांडणीचें काम सांगितल्याप्रमाणें झालेलें आहे किंवा नाहीं व तें करतांना कांहीं चुका झाल्या आहेत कीं काय हेंच मुख्यतः पहावयाचें असतें. मुद्रणदोषहि आढळल्यास तेहि याचवेळीं दुरुस्त केले जातात. हे तिसरे छाप प्रत्येक रकान्याचे स्वतंत्र काढण्यांत येतात किंवा सबंध पानाचेहि एकत्र काढले जातात. मांडणी करतांना एका रकान्यावरील मजकूर दुसऱ्या रकान्यावर घेतांना पहिल्या रकान्याच्या शेवटीं व पुढच्या रकान्याच्या सुरुवातीच्या आरंभीं पानाचा व रकान्याचा संदर्भ घालतात. विशेषतः उरलेला मजकूर दूर अंतरावर किंवा पाठीमागें रचला गेला तरच हा संदर्भ घालण्यांत येतो. एरवीं जेथें रकान्यापुढें रकाना वाचण्याची पद्धत आहे, तेथें हा संदर्भ घालीत नाहींत. रचाईचें काम बरोबर झालें व शेवटच्या छापांत दिलेल्या चुका दुरुस्त झाल्या म्हणजे

छापतपासनिसाचें काम संपलें. त्याचप्रमाणें संपादकाचेंहि काम येथें संपतें. यानंतर यंत्रावरील छाप संपादकाकडे पाहण्यासाठीं येतो व त्यांत कांहीं फारच ढोबळ चूक राहिलेली आढळली तरच ती यंत्र थावबून दुरुस्त केली जाते.

पुष्कळदां वर्तमानपत्रांत स्टॉप प्रेस (बंद छाप) असा मथळा घालून ताजी बातमी दिली जाते. ती देतांना ती जशी आली असेल तशीच देतात. पुष्कळ ठिकाणीं या बातमीसाठीं इतर मजकुराची हालवा-हलव होऊं नये म्हणून छापतानांच कोरी जागा सोडून देतात व ताजी अशी बातमी आलीच तर तेवढीच ती जुळवून छापतां छापतांच यंत्र थोडा वेळ थांबवून कोऱ्या जागेंत घातली जाते. पुष्कळदां मराठी वर्तमान-पत्रांतून पुष्कळ आधीं आलेली बातमी 'महत्त्वाची बातमी' या सदराखालीं घातली जाते. त्याचें कारण लोकांचें तिकडे लक्ष आकर्षिलें जावें हें होय.

छापण्याचें काम सुरू झाल्यानंतर शाई सर्वत्र सारखी व बरोबर लागली आहे कीं नाहीं हें पहाण्याचें काम छापखान्याचें आहे. जेथें स्टीरिओ करून छापलें जातें तेथें स्टीरिओ बरोबर झाला आहे कीं नाहीं व त्याच्या कांहीं भागाचे कागदावर डाग उठतात कीं काय हें पहाणें त्या खात्याचें काम असतें. यंत्र जसें कमीअधिक गतीचें असेल त्या मानानें छापकाम होत असतें व हें छापकाम झाल्यावर विशेषतः दैनिक वर्तमानपत्रांत मजकुरांत बदल करण्यांत येतो. याला इडिशन (आवृत्ति) म्हणतात. ज्या वेळेला जी आवृत्ति काढावयाची असेल त्या वेळेपर्यंत येणारी ताजी बातमी त्या आवृत्तींत पुन्हां अधिक घालण्यांत येते व जुनी बातमी काढून टाकण्यांत येते. जितक्या आवृत्त्या असतील तितक्या वेळां हा मजकूर बदलावा लागतो. याचें कारण ज्या त्या गांवीं उजाडल्यापासून शक्य तितक्या लवकर त्याच तारखेचा अंक अधिकांत अधिक बातमी घालून पाठवितां यावा हें आहे. पुण्यासारख्या ठिकाणीं निघणारें दैनिक वर्त-

मानपत्र तीन किंवा चार आवृत्त्या काढतें. त्यांच्या वेळा आगगाडीच्या वेळापत्रकाप्रमाणें मागें पुढें बदलत असतात. ज्या गांवीं जो मजकूर एकदां गेला त्या गांवीं तो मजकूर पुन्हां न जाण्यासाठीं फार खबरदारी घ्यावी लागते. यांत चूक होऊं नये म्हणून प्रत्येक आवृत्तीला दोन दोन आवृत्त्यांचे अंक खोडून दिले जातात. यास ' खोडलेला अंक ' असेंहि म्हणण्याचा प्रघात आहे. जो मजकूर एका गांवीं एकदां येऊन गेला तो मजकूर पुढच्या आवृत्त्यांमधून सर्व छापला जात जात त्या गांवच्या पुढच्या आवृत्तीपर्यंत शिल्लक रहातो व त्या आवृत्तीच्यावेळीं गळून पडतो. हें खोडण्यासाठीं वेगवेगळ्या रंगाच्या किंवा शाईच्या खुणा केल्या जातात व प्रत्येक कचेरी-मध्यें या खुणांचा अर्थ समजण्याची ठराविक पद्धत असते.

अशा रीतीनें महाराष्ट्रांत वर्तमानपत्रांच्या छपाईचें काम चालतें. दैनिकें किंवा अर्धसाप्ताहिकें यांचा प्रसार पुण्यामुंबईसारख्या मोठ्या शहरांतूनच असल्यामुळें तेथें हें काम मोठ्या प्रमाणावर व पद्धतशीर चालतें. गेल्या दहा वर्षांत वर्तमानपत्रांची निपजहि वाढली असून त्यांचा खपहि मोठ्या प्रमाणावर वाढला आहे हें शिक्षणाच्या वाढत्या प्रसाराचें लक्षण होय.

# प्रकरण पंधरावें

# वृत्तपत्रांतील जाहिराती

जाहिराती ही वर्तमानपत्रांची चंदी किंबहुना खुराक आहे. वर्गणीदार वर्तमानपत्राला चारा पुरवितात व जाहिरातदार चंदी पुरवितात. वर्तमानपत्रांना मनमुराद जाहिराती मिळाल्या म्हणजेच तीं पुष्ट राहून आपली कामगिरी जिवापाड बजावतात. जाहिरातीची चंदी तुटेल तर वर्तमानपत्रें एकदम रोडावतील. हल्लीं टाइम्ससारखीं वीस वीस, चोवीस चोवीस पानांचीं पत्रें किरकोळ एक आण्याला विकलीं जातात. त्यांना जाहिराती नसतील तर इतक्या अल्प किंमतींत पत्र विकल्यानें मालकाचें दिवाळेंच निघेल. बहुधा कोणाला खरेंहि वाटणार नाहीं कीं वर्गणीदारापेक्षांहि वर्तमानपत्रांना अधिक मिळकत जाहिरातदारापासूनच होते. वर्गणीदार व जाहिरातदार यांचें एकमेकांस माहीत नसतां किंवा तसें ठरलें नसतांहि नातें जडलेलें असतें. लोकप्रियतेमुळें वर्तमानपत्राचा खप वाढला कीं त्यावर जाहिरातदार उड्या घालतात. जागेपेक्षां जाहिराती जास्ती येऊं लागल्या म्हणजे वर्तमानपत्राचा मालक अधिक पानें घालून जाहिरातींकरितां जागा करून देतो व जाहिरातींमुळें पत्राचीं पानें व मजकूर यांत भर पडल्यानें पत्राच्या उपयुक्ततेंत व लोकप्रियतेंतहि भर पडून वर्गणीदारांची संख्या फुगत जाते. म्हणजे मोठालीं पत्रें वाचकांना पानें अधिक देतात तीं वाचकावर उपकार करण्याकरितां नसून जाहिरातदाराची अर्थात् स्वतःची सोय पहाण्याकरितां.

खेड्यांतील वाचकांना मोकळा वेळ विपुल असतो. पुष्कळ फुरसतीच्या मानानें त्यांना वाचावयालाच थोडें मिळतें. खेड्यांत वर्तमानपत्र

येईल तेंच त्यांचें सर्व कांहीं. लहान मुलाच्या हातीं पडलेल्या खाऊच्या पुड्यांतला कण न् कण तें मूल जसें खाऊन फस्त करतें तसेंच खेडे-गांवांत गेलेल्या वर्तमानपत्राचें होतें. आधीं त्यांतली सगळी माहिती व बातमी ताजी असते, त्यामुळें ती कधीं वाचूं असें त्यांना होऊन जातें. परंतु बातम्या वाचण्यानें होणारें समाधान वरवरचें. वर्तमानपत्र हा खेडु-तांना गुरु, खुषमस्कऱ्या व जासूद असतो, तसाच तो त्यांस वैद्य, डॉक्टर, अन्नदाता व गुमास्ताहि वाटतो. म्हणून टपालवाल्यानें वर्तमानपत्र हातांत दिल्यावर तें एकानें फोडलें कीं कोणी त्यांतील बातम्या वाचतो, कोणी अग्रलेखावर नजर टाकतो, कुणाचें लक्ष 'पाहिजे' या जाहिरातीकडे जातें, तर कोणी औषधाच्या बाटलीकडे आशातुर दृष्टीनें पहातो. अशा रीतीनें कोणास कांहीं, कोणास कांहीं घेऊन आलेलें पत्र प्रत्येकाच्या कुतुहलाचा विषय होऊन बसतें.

स्टेशनरीच्या दुकानांतल्या मालाप्रमाणें वर्तमानपत्रांत जिकडे तिकडे जाहिरातीच जाहिराती दिसतात. इतक्या सगळ्यांतून आपल्याच जाहिरातीकडे वाचकांचें लक्ष पोंचावें असें जर जाहिरातदारास वाटत असेल तर ती जाहिरात चटकन् डोळ्यांत भरण्याजोगी तिची सजावट व्हावयास पाहिजे. ज्याचा माल आहे त्याला जाहिरातीचें कसब साधावयाचें नाहीं, तसेंच कोणत्या पत्रांत कोणत्या मालाची जाहिरात द्यावी हेंहि त्याला कळावयाचें नाहीं. म्हणूनच जाहिराती देणारांचा एक स्वतंत्र धंदाच उपस्थित होतो. पाश्चिमात्त्य देशांत हा धंदा करणाऱ्या मोठमोठ्या संस्था आहेत. त्यांना मेहनताना दिला म्हणजे त्या जाहिराती तयार करून देतात व त्या कोणत्या पत्रांत द्याव्या हें सांगतात.

जाहिरात कशी रचावी याचीं कांहीं तत्त्वें सांगतां येतील. जाहि-रातींत ज्या महत्त्वाच्या बाबी असतील त्यांचा क्रम लावण्यास प्रथम शिकलें पाहिजे. मोठाल्या वजनदार पत्रांतील जाहिराती पाहिल्यानें हें

लक्षांत येतें. जाहिरातींत जी मुख्य बाब असेल तिजकडे वाचकाचें लक्ष चटकन् वेधलें जावें. अलीकडे अक्षरांना चित्रांची चांगली जोड मिळाली असल्यामुळें जाहिरातीचें काम चित्रें चोख बजावतात. जाहिरातीवरील 'बालामृत' या मथळ्यानें मुलांकरितां पौष्टिक औषधाचा बोध होतोच, पण त्याच्या शेजारीं बसलेल्या गुटगुटीत व हंसऱ्या चेहऱ्याच्या मुलाकडे पाहून बालामृताचे सुपरिणाम समग्र किंवा मुळींच जाहिरात न वाचतांहि समजतात. 'घरचा वकील' पहाताक्षणींच 'बरी वकिलाचे उंबरठे झिजविण्याची कटकट वांचली', या विचारानें मन आनंदून गरजू मनुष्य इतर हातचें काम टाकून भरभर जाहिरात वाचतो. 'कामीनिया ऑइल' या धेडगुजरी नांवाचा अर्थ शुद्ध मराठी मनुष्याला क्वचित् न समजला तरी सडक केंस सोडून त्यावर फणी फिरवीत बसलेल्या तरुणीवरून केंसांच्या सुगंधी तेलाची खात्री पटते.

चित्रें जशीं सूचक असतात तसा जाहिरातींतील मजकूरहि सूचक असावा लागतो. तो वाचून अधिक माहिती मिळविण्याची उत्सुकता उत्पन्न व्हावी. जाहिरातींतील मजकुराप्रमाणेंच तिच्या घाटाकडे पहावयास पाहिजे. जाहिरातींतील तांबड्या किंवा दुसऱ्या भडक रंगानेंहि मन ओढतें. तिच्या आकृतीमुळेंहि अनुकूल ग्रह होतो. जाहिरातीकरितां जेवढी जागा दिलेली असते तेवढी सारी मजकुरानें गजबजून सोडल्यानें जाहिरात बटबटीत दिसते. यासाठीं आंखीव चौकटीच्या आंत आजूबाजूस व मध्येंहि पांढरी जागा मोकळी टाकून अधून मधून मजकूर भरला असतां जाहिरात चांगली खुलते. जाहिरातदारानें तिच्याकरितां खर्चावयाच्या द्रव्याचा आंकडा आपल्या धंद्याचा विचार करून नक्की ठरवावा. जाहिरात देऊन माल विशेष खपण्यासारखा नसला व नुसती प्रसिद्धीच मिळणार असली तर फार पैशाचा व्यय तिजकडे करूं नये. कोणत्या मालाची जाहिरात कोणत्या पत्रांत दिल्यानें खप चांगला होतो याची अटकळ जाहिरातदारांना नसते.

जाहिरात देण्यापूर्वी पत्राचे वाचक माहीत असावे. पत्राचा खप वीस, पंचवीस हजार आहे, पण त्याचे वाचक मध्यम स्थितींतील आहेत तर त्यांत 'खाशा मोटारी'ची (टूरिंग कार) जाहिरात लाभदायक होणार नाहीं; पण त्याऐवजीं दुसरें पत्र शेटसावकार व सुखवस्तू लोक यांजकरितां असून त्याचा खपहि अल्प असला तरी त्यांत दिलेली वरील तऱ्हेची जाहिरात फायदेशीर ठरेल. वाचकवर्गाची जात व धर्महि लक्षांत घ्यावा लागेल. शीख लोकांसाठीं निघालेल्या गुरुमुखी लिपींतील पत्रांत 'सेफ्टी रेझर'च्या किंवा सिगारेटच्या जाहिराती व्यर्थ होत.

इंग्रजी जाहिरातींची घडण इंग्रज वाचक डोळ्यापुढें ठेवून केलेली असते. त्यांचें भाषांतर मराठी वाचकांचा दर्जा व भाषेची मोडणी लक्षांत न घेतां केल्यास हेंगाडें दिसेल व असला प्रकार कधींकधीं होतोहि. याचा एक मासला प्रसिद्ध मराठी पत्रांत आढळला. जाहिरात अग्निमांद्यावर होती. त्यांतील खालील वाक्य वाचून त्याचा अर्थ उकलतांना साधारण मराठी जाणणाराला भटांचें 'ब्रेन टॉनिक'च घ्यावें लागेल !

'समुद्रोत्पन्न केंद्रीकृत खनिजयुक्त ह्या विकेल्प वड्यांनीं शरीरस्थ तक्रारी दूर होऊन शरीरप्रकृति भक्कम स्नायुसंवर्धित आणि असामान्य शक्तियुक्त होते. ह्या खनिजांत अंगीं लागणारें आयोडिन खाद्य आणि शरिरास चेतना देणारीं अत्यंत समृद्ध द्रव्यें असतात.'

या वाक्यांतील कित्येक शब्द जाहिरातीकरितां मुद्दाम मराठी बनविलेले दिसतात व वाक्यरचना तर अस्सल इंग्रजीच आहे. मुख्य जाहिरात औषधाची असल्यामुळें तिचा मतलब वाचकांना समजेल. ती लहान आकाराची असती तर तिनें व्यापलेल्या दोन रकान्यांच्या जागेचें काम अवघ्या पाव रकान्यांत भागून जाहिरात-दाराचा तीनचतुर्थांश पैसा वांचला असता; आणि हें नुकसान सरळ व सुबोध मराठींतून जाहिरात न दिल्यानेंच झालें. परदेशी कंपन्यांचे लाखों

रुपये जाहिरातीपायीं वांया जातात ते असे. यासाठीं चांगल्या मराठी लेखकास कांहीं मोबदला देऊन जाहिरातीचें भाषांतर करविणें हा एकच पैसा वांचविण्याचा उपाय आहे.

. गरीब हिंदुस्थानाला युरोपियन लोकांनीं वापरून फेंकून दिलेल्या कपड्यांनीं आपलीं अंगें झांकण्याची पाळी दुर्दैवानें आली आहे. पंजाब व सरहद्दप्रांत यांत थंडी फार पडते व तेथील लाखों दरिद्री कुटुंबांना नवे ऊबदार कापड घेऊन वस्त्रें शिवण्याची ऐपत नसते. अशा कुटुंबांतील पुरुषांना युरोपियन पुरुषांचे कोटच काय पण स्त्रियांचे झगेहि चालतात. तिकडील जाडजूड पठाण आपला विशाल देह स्त्रियांनीं टाकून दिलेल्या जुन्या झग्यांनीं लपेटून घेऊन हिंडतात. त्यांना त्याचें कांहींच वाटत नाहीं, पण मार्मिक पहाणाराला मात्र गंमत वाटते. ह्या अंगउतार कपड्यांचीं वर्णनें देशी वर्तमानपत्रांतील जाहिरातीवरूनच कर्णोपकर्णी पठाणांपर्यंत पोंचलेलीं असतात.

वर्तमानपत्राशिवाय जाहिराती देण्याच्या सोयी अनेक झाल्या आहेत. शहरांतील भिंती या घरांनाच नव्हे तर आपल्याएवढ्या मोठ्या जाहिरातींनाहि आश्रय देतात. आगगाडींत बसून जाणाऱ्या प्रवाश्यांना स्टेशनावर लटकविलेल्या रंगीबेरंगी चित्रांच्या सुंदर जाहिराती प्लॅटफार्मवरून गाडी मंद गतीनें चालत असतां नजरेपुढून ओझरत्या सरकतांना आढळतात. स्टेशनावरच्या जाहिराती ठाम उभ्या असतात, तर ट्रामगाड्यांवरच्या जाहिराती प्रवाश्यांबरोबरच धांवून त्यांचा पाठलाग करतात. पण ट्रामगाडींतील प्रवाश्यापेक्षां रस्त्यानें ट्रामगाडीकडे मधून मधून दृष्टि फेंकीत मंद गतीने पावलें टाकणारालाच त्या वाचण्याला थोडीशी तरी फुरसत सांपडते. चलच्चित्रपटावरील जाहिराती दिसल्या न दिसल्या कीं मावळतात. याखेरीज हस्तपत्रकें, कॅलेंडरें, रोजनिशा, टिपकागद, कागद-वजनें, पेन्सिली यांवरहि तऱ्हेतऱ्हेनें जाहिराती देण्यांत येतात. त्यांचें दर्शन लोकांना थोडें

बहुत घडत असलें तरी वर्तमानपत्रांतील जाहिरातींची सर त्यांना येणार नाहीं. वर्तमानपत्रद्वारां त्यांची प्रसिद्धि सहज व परिपूर्ण होते. म्हणूनच लंडनमधील 'डेली मेल' सारखीं पत्रें सबंध पानाची एक जाहिरात एका वेळेस छापण्याकरितां १६०० पौंड आकारतात. याचें कारण असें कीं त्या पत्रांचा खपच दांडगा असतो. डेली मेल, डेली एक्सप्रेस, डेली हेरल्ड यांचा रोजचा खप प्रत्येकीं वीस लाखांवर आहे.

वर्तमानपत्रांतील जाहिरातींचें क्षेत्र सर्वांपेक्षां अमर्याद व विस्तृत असतें. तीं शहरें, खेडीं, गरीब, श्रीमंत, स्त्री, पुरुष, वृद्ध, तरुण या बहुतेकांच्या वाचनांत येतात. वृत्तपत्रांत जाहिरात छापण्यास आज सकाळीं दिली कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं हजारों घरीं जाते; कित्येक वजनदार पत्रें दोन-तीन दिवस वाचलीं जात असल्यामुळें तितक्या वेळां व तितक्या व्यक्तीं-पुढें जाहिरात घोळते. वर्तमानपत्राच्या फायली जतन करून ठेवणारेहि आहेत; त्या योगानें एकच जाहिरात महिन्या महिन्यानीं व वर्षा वर्षानीं लोकांना पुनः दृष्टीस पडण्याचा संभव असतो. जाहिरात एकदां देऊन भागत नाहीं. ती वरचेवर दिली तरच लक्षांत राहून इष्ट परिणाम घडून येतो; मग ती लहान असो कीं मोठी असो.

जाहिरातींत एक गुण विशेष असतो. कापडाच्या किंवा किराणा मालाच्या दुकानांत अगर फळवाल्याकडे गिऱ्हाइक एकच जिन्नस घेण्याचें ठरवून आलें असलें तरी दुकानदार आपल्या रसवंतीनें व मनुष्यस्वभावाच्या ज्ञानानें त्याला भाळवून त्याच्या पदरांत एकाच्या जागीं दहा जिन्नस बांधतो. तसाच कांहींसा प्रकार जाहिरातीनेंहि होतो. जो जिन्नस घेण्याची जरुरी आधीं भासत नव्हती तो घेण्याची जरुरी कधीं कधीं जाहिरात पाहून भासूं लागते. चहाच्या कंपन्यांनीं जाहिरातींची एक नवीन टूम काढली आहे. तिचे व्यवस्थापक आपल्या दुकानाच्या मखरांत चहाचा पेला तो जाणारा येणारास दिसेल असा ठेवतात. पेल्यांत चहाच्या मळ्याचा देखावा

असतो. त्या देखाव्याची उघडझांप सारखी सुरू असल्यामुळें लोक तो पहाण्याकरितां जमतात व चहाची विक्री वाढते. कांहीं दिवसांपूर्वी पुण्यांत एका फेरीवाल्यानें आपल्या गाडीवर जिन्नस विकण्यास व पैसे घेण्यास माकड बसविलें होतें. अशा लटांबरानिशीं गाडी चाललेली पहावयास गाडीभोंवतीं लोकांचा मोठा घोळका जुळत असे. जितकी जाहिरात मोठी तितकी ती लवकर दृष्टीस पडते. लंडन शहरांतील व इतर शहरांतील वर्तमानपत्रांतून एकाच कंपनीच्या जाहिरातीची चार पानांची पुरवणी छापण्यांत येऊं लागली असून ती बरीच लोकप्रिय झाली आहे.

जाहिरातीकरितां जागा किती दिली यापेक्षां ती कशी भरली हें महत्त्वाचें होय. उत्कृष्ट बनविलेल्या जाहिरातीसारखें विक्रीचें साधन दुसरें नाहीं; तशीच वाईट जाहिरातीसारखी पैशाची उधळपट्टीहि दुसरी नाहीं. चांगल्या जाहिरातीचे तीन भाग पडतात. माशाला पकडण्यासाठीं पाण्यांत जसा गळ टाकावा तसेंच जाहिरातीचेंहि आहे. तिचा पहिला भाग आमिषासारखा, त्याच्या पुढचा भाग दोरीसारखा व शेवटचा भाग गळासारखा. पहिल्या भागांत वस्तूचें नांव, दुसऱ्यांत तिचें माहात्म्य व तिसऱ्यांत ती मिळण्याचा पत्ता. प्रारंभीं चित्र किंवा वचन असलेलें श्रेयस्कर.

# प्रकरण सोळावें

# खेड्यांतील वाचकवर्ग

वर्तमानपत्रांतील मजकुरासंबंधानें खेड्यांत रहाणाऱ्या वाचकांच्या अपेक्षा लेखकांना माहीत असण्याची आवश्यकता केव्हांहि आहेच. त्याविषयीं 'केसरीचे वाचक' या मथळ्याखालीं विनोदी लेखक रा. गोविंद मोरेश्वर सोमण. बी. ए. यांनीं 'खेड्यांतील स्वभावचित्रें' या नांवाच्या पुस्तकांत एक प्रसंग रंगविला आहे. तो प्रसंग काल्पनिक पण वस्तुस्थितिनिदर्शक असल्यामुळें अगदीं थोडया फरकानें येथें उध्दृत केला आहे.

"आज शहरांतून मुख्य मुख्य रस्त्यांवर वर्तमानपत्रांची व मासिकांची पखरण पसरलेली असते. पण त्या पत्रांची गंधवार्ताहि या लोकांना नसते; मग त्यांतील आनंद लुटण्याचें बाजूलाच राहो. नाहीं म्हणावयाला केसरी पत्र बहुधा प्रत्येक खेड्यांत दिसून येतें. प्रत्येक गांवांत बहुधा चार दोन केसरी येतातच. कांहींजण केसरी घेणें हें श्रीमंतीचें लक्षण समजतात, पण त्यांतील ज्ञानाच्या श्रीमंतीचा मालकी हक्क घेण्याला तयार नसतात. कोणाला अतिशयोक्ति वाटेल; पण त्यांच्या घरीं केसरी मागावयाला कोणी गेला तर टपालानें आलेल्या केसरीचा दोरा सुद्धां तोडलेला नसतो. मग त्याच्या देखत ओशाळून "आज फार काम होतं, त्यामुळें वाचायला वेळच झाला नाहीं; तुम्ही वाचून झाल्यावर रात्रीं परत करा", असें म्हणावयाचें.

खेडेगांवांत सबंध केसरी वाचणारे हाताच्या बोटांइतकेच मिळतील. त्यांतील राजकारण व शब्दांच्या खाचाखोंचा ओळखणारा एखादाच

आढळेल. पुष्कळ ठिकाणीं चार दोन मंडळी एकत्र बसून केसरी वाचतात. मजकूर वाचतांना मध्येंच एखाद्या गोष्टीवर ते जी चर्चा करतात ती मोठी पहाण्यासारखी असते.

आबा—हं, करा सुरुवात आतां वाचायला.

आण्णा—थांबा हो, जरा विडी तर ओढूं द्या. आतां केसरी आपल्या हातांतच आहे. तो कुठे पळतो आहे थोडाच!

सदोबा—पहिल्यानं जाहिराती वाचा पाहूं.

आण्णा—साठे यांचें कफसीरप, सतत २० वर्षें लोकांनीं वाखाणलेलें.

सदोबा—विसूभाऊ, अरे तूं मागवून तरी पहा. रोज ठेठे करतोस, जाऊं दे पैसे गेले तरी.

विसोबा—आपल्याजवळ बुवा पैसा नाहीं. मी आपला कोरफडीचा रस घेतों हळदगूळ घालून.

आण्णा—तूं असाच खोकून मरायचास.

आबा—अरे केसरी जाहिरात छापतो ती उगीचच? औषधांत गुण असल्याशिवाय केसरी कशा जाहिराती छापील? खोटया जाहिराती छापून केसरी लोकांना फसवील कसा?

आण्णा—वा! खूप केलीत. केसरीच्या संपादकांना खोकला आहे असं का तुम्हांला वाटतं?

विसोबा—हो, हो, केळकरांना खोकला आहे. मी एकदां पुण्यास त्यांचं व्याख्यान ऐकलं होतं. ते बोलतांना सारखे खोकतात.

सदोबा—पण हल्लीं केसरीचे संपादक केळकर नाहींत.

आबा—मग केसरींत जाहिराती फुकट छापतात होय?

आण्णा—अगदीं बरोबर बोललात. ऐका—जाहिरातींचे दर. या इंग्रजी जाहिराती आपणाला नाहीं येत वाचतां. आंधळे आहों ह्या बाबतींत आपण.

विसोबा—आण्णा, मला एक युक्ति सुचते. आपण केसरीकडे

तक्रार करूं या. केसरी हें मराठी पत्र ना ? आणि म्हणूनच आपण घेतों ना?

आण्णा—होय.

विसोबा—मग त्याच्यांत सर्व मजकूर मराठी नको का यायला ?

सर्वजण—अलबत.

विसोबा—मग या इंग्रजी जाहिराती कां ? या जाहिराती केसरीची थोडी का जागा दरवर्षी अडवतात ? तेवढा मजकूर आपला कमी नाहीं का होत ? आपण संपादकाकडे एक अर्ज करूं या—" ज्या अर्थी केसरी हें मराठी पत्र म्हणून आम्ही घेतों त्या अर्थी त्यांत इंग्रजी जाहिराती काय म्हणून ? आपणास केसरींत इंग्रजी जाहिराती छापावयाच्या असल्या तर त्याबद्दल आम्हां खेड्यांतील वर्गणीदारांकडून टपालखर्च आकारण्यांत येऊं नये; कारण त्या जाहिरातींबद्दल आपणास मोबदला मिळतोच. असें होत नसल्यास इंग्रजी जाहिराती छापण्याचें बंद करण्यांत यावें " असं त्यांना लिहावें.

आबा—शाबास, काय अकल आहे विसुभाऊंची !

आण्णा—आम्ही म्हणतों तें उगीच नाहीं. तो इंग्रजी शिकला नाहीं म्हणून खेड्यांत पडला. त्याच्या अकलेचं मोल नाहीं. अगदीं नाना फडणिसासारखं त्याचं डोकं आहे.

जाहिराती संपल्यावर आण्णांनीं आंतील पान उघडलें.

आबा—अनुक्रमणिका वाचा. आज अग्रलेख कशावर आहे ?

आण्णा—'भ्रमाचा भोपळा फुटला!' बहुतेक झोक असा दिसतोय् कीं हा नवीन सुधारणांवर असावा.

विसोबा—हातच्या काकणाला आरसा नको. वाचून तर पाहा.

आण्णा—एक संस्कृत श्लोक आहे अग्रलेखाखाली. आपल्याला बुवा तो कांहीं वाचतां येत नाहीं.

सदोबा—चला सोडून द्या. इथे कुणाचं अडतंय् !

विसोबा—मला राहून राहून आश्चर्य वाटतं. सगळ्यांनाच का संस्कृत येत आहे! श्लोकाचा अर्थ मराठींत द्यायला काय झालं? मालाकार चिपळूणकरांचं या बाबतींत उदाहरण घेण्यासारखं आहे. बरें, पुढं वाचा.

आण्णा—ऑ. इं. कॉं. क. म्हणजे रे काय?

आबा—समजलों. पुढे वाचा.

आण्णा—नाहीं पण, कोण हा चिक्कूपणा! सगळा लिहिला असता तर?

विसोबा—( हंसून ) ऑ. इं. कॉं. क. म्हणजे ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी.

आण्णा—ग. ज. हातीं सत्ता हा ग ज कोण?

आबा—हत्ती असेल नाहीं तर लोखंडी गज असेल.

विसोबा—अहो, तो गव्हर्नर जनरल.

सदोबा—छे, फार कठिण दिसतोय् विषय.पुरे करा आजचा अग्रलेख.

आण्णा—काय अग्रलेखाची भाषा आहे? मोठीच माणसं तीं. पक्कीं मुरलेलीं आपल्या विषयांत. या लोकांना विचार करायला सवडच कुठे आहे? काय तयारी असेल त्यांची! एकटाकी सर्व मजकूर लिहितात.

विसोबा—अहो, आपल्याला एक साधा अर्ज लिहायचा असला तर दहा जणांचा सल्ला घ्यावा लागतो. दहा वेळां लिहितांना थांबतों. शब्द बरोबर पडत नाहींत म्हणून डोकं खाजवीत बसतों.

सदोबा—तुम्ही कांहीं म्हणा, केळकरांची सर नाहीं कोणाला. त्यांच्या लेखणींत मोठी जादू. कोणचाहि अवघड विषय खुलवून लिहावा असा त्यांनींच.

आबा—आणि त्यांचं अक्षर किती वळणदार होतं. जसे कांहीं मोत्यांचे दाणे. हल्लीच्या संपादकांचं अक्षर मोठं दिसतंय्.

विसोबा—( हंसून ) खूप केलीत सदोबा. अहो, हें त्यांचं स्वतःचें

अक्षर नाहीं. हें छापलं आहे; आणि हल्ली अग्रलेखाचा टाइप बदलला आहे. किती जगाच्या मागं आहांत. उगीच्च कां इंग्रज आपणावर राज्य करीत आहेत ?

आण्णा—( ताजी बातमी वाचतांना ) सोन्याचा भाव सारखा वाढत आहे. कालचा ३२ रु. ३ आ. ५ पै आहे. पण आपल्याला काय होय ?

सदोबा—आम्ही केव्हांच उजवून बसलों आहोंत. गेलीं दोन वर्षं सोनं विकूनच सरकार 'देणें' भरलं. यंदा विकायला काय आहे ? मोठ्या फिकीरींत आहें मी.

विसोबा—आपण सर्व जण एका नावेंत बसलों आहोंत.

आण्णा—( गृह्यसंस्कार वाचतात ) माझी सुशील पत्नी सौ. इंदिराबाई वयाच्या अठराव्या वर्षीं मंगळवारीं रात्रीं १०॥ वाजतां विषम ज्वरानें एकाएकीं इहलोक सोडून गेली. ईश्वर मृताचे आत्म्यास शांति देवो.

डॉ. ग. बा. चितळे ( धुळें )

विसोबा—ह्या 'गृह्यसंस्कारा'वर मला एक कल्पना सुचलीय्. मला वाटतं गृह्यसंस्कार या नांवाखालीं एक जाहिरातच देण्यांत येते. मुलींच्या बापांच्या यादींत एक नवं स्थळ पाहण्याची ही एक अजब युक्ति आहे. शिवाय यांत मुलाचा हुद्दा व पत्ताहि कळतो. ( सर्वजण खो खो हंसतात )

आण्णा—पण ठिकाण थोडं हिणकसच. कारण नवरदेव बिजवर असतो.

विसोबा—आतां हेंच पहाना. यांत मुलीचं वयसुद्धां दिलेलं आहे. तें किती तर अठरा. यावरून याचं नुकतंच लग्न झालेलं असावं. म्हणजे याच्यावर बिजवराचा आळ आला आहे म्हणाना ?

सदोबा—तुमचा तर्क बरोबर आहे. कसा धागा जुळवतां !

विसुभाऊ—तुम्ही मुनसफच व्हायच्या योग्यतेचे.

आण्णा—( मोठ्यानें हंसत ) हा पहा दुसरा गृह्यसंस्कार.

विसोबा—वाचा अगोदर वाचा. काय ग्यानबाची मेख आहे बघूं तरी द्या.

आण्णा—माझी सुस्वरूप अर्धांगी सौ. कुमुदिनीबाई वयाच्या २१ व्या वर्षी इहलोक सोडून गेली. तिनें आपल्यामागें एका फोटोशिवाय कोणचीच आठवण ठेवली नाहीं.

वासुदेव गणेश गोखले ( चांदा )

विसोबा—( भिंवया चढवीत ) हुः हुः अरे बाबा, वकील तो वकील ! दोनच ओळी पण किती खुबीने लिहिल्या आहेत. काय सदोबा खाजवा डोकं.

सदोबा—आहो तीं डोकीं निराळींच. आम्हांला काय सुचायचंय् डोकं? उलट केस मात्र गळायचे! तुम्ही सांगाल त्याचं आम्ही कौतुक करूं.

विसोबा—तिनं आपल्या पाठीमागं फोटोशिवाय आठवण ठेवली नाहीं, याचा अर्थ मुलांचा पाठीमागं लबेदा नाहीं असा नाहीं का होत?

आण्णा—शिवाय फोटो काढला आहे त्या अर्थी हौशी दिसतोय् प्राणी. आमच्या नथोबांना सुचवलं पाहिजे ठिकाण.

आबा—त्याला झेपलं पाहिजे ना? वकील आहे तो. थोडा का हुंडा घेईल !

आण्णा—नाहीं म्हटलं बिजवर आहे, नाहीं घ्यायचा कदाचित्.

सदोबा—ते आपल्या वेळचे दिवस गेले. पाहिजे तर तात्यांना सुचवा.

विसोबा—छे हो, त्यांची उडी मोठी आहे. त्यांना प्रथमवर पाहिजे. बरं आता वर्तमानसार वाचून करा बंद.

आण्णा—तुम्हीच वाचा विसूभाऊ. मी एक विडी ओढतों.

विसोबा—( सभा-संमेलनें हें सदर वाचतात )

आण्णा—जिकडे तिकडे सभा-संमेलनें चालू आहेत. आणतात तरी कोठले हे पैसे ! इकडून तिकडे खेपा घालतांना थोडा का रेल्वेच्या डोंबल्यावर पैसा जात असेल.

सदोबा—आणि अशा सभा करून मिळवतात तरी काय हे लोक ?

आण्णा—वा, नांव होतं ना. झीज सोसावी तेव्हां नांव होतं.

आबा—काय वेडे आहेत हे लोक. 'न देवाय न धर्माय' असा निष्कारण इकडे तिकडे पैसा घालवतात त्यापेक्षां काशीयात्रा कां नाहीं करीत ? पुण्य तरी लागेल. आमच्याजवळ पैसा नाहीं म्हणून आम्ही स्वस्थ बसलों आहोंत. हं, दांत नाहींत तिथं चणे आहेत आणि चणे आहेत तिथं दांत नाहींत हेंच खरं !

विसोबा—( पुढें वाचतात ) अस्पृश्योद्धार.

आबा—( कपाळाला आंठ्या घालून ) मुळींच वाचूं नका तें. अहो, उगीच डोक्याला त्रास होतो. 'अमक्या ठिकाणीं सत्यनारायण झाला आणि तेथें महाराच्या हातचा सर्व लोकांनीं प्रसाद घेतला' असं असेल, दुसरं काय ? या लोकांनीं अगदीं ताळ सोडलाय्.

विसोबा—कलकत्ता कार्पोरेशनचे माजी अध्यक्ष डॉ. बी. सी. रॉय यांच्या मोटारीस ता. २१ रोजीं ट्रामचा धक्का लागून मोटार उलटल्यामुळें डॉ. रॉय यांच्या पायाचें हाड मोडलें. 'क्ष' किरणाच्या साह्यानें फोटो घेतला.

आण्णा—का हो 'क्ष' किरण ही काय चीज आहे ?

सदोबा—कोणास ठाऊक ! आपल्याला तेवढी शिकरण माहित्ती आहे.

विसोबा—'दंगे-अत्याचार'—कानपूर येथें ता. १ रोजीं हिंदु-मुसलमानांत मारामारी होऊन सात इसम जखमी झाले.

आबा—हं: जिकडे तिकडे चालले आहेत दंगे. आपल्या गावात मुसलमानाचं घर नाहीं ही परमेश्वरी कृपा समजा.

विसोबा—'आत्महत्येची सांथ'—एम्. बी. बी. एस्. च्या शेवटच्या परीक्षेंत नापास झाल्यामुळें मुंबईस एका विद्यार्थ्यानें आत्महत्त्या केली.

आण्णा—पाहिलंत ? पोरें अशीं बापाच्या नांवाला काळोखी फासतात. आमचा बग्या नापास झाला तरी मी फारसा बोलत नाहीं, याचं कारण हेंच. कांहीं कमी जास्ती करून घ्यायचा.

विसोबा—परदेश—( १ ) यापुढें सोव्हिएटला जपानची भीति आहे. कारण जपान आपल्या लष्कराची जोरानें तयारी करीत आहे. ( २ ) रुमानियांत तेथील मुख्य प्रधानाचा खून झाल्यामुळें बुखारेस्त वगैरे शहरांतून व सरहद्दीवरील भागांतून लष्करी अंमल सुरू करण्यांत आलेला आहे. ( ३ ) हर हिटलर व हर व्हॉन न्यूराथ यांनीं फ्रेंच वकिलाची बर्लिन येथें नुकतीच मुलाखत घेतली. फ्रेंच वकील मि. पॉन्सेट यांनीं फ्रेंच सरकारचा खलिता उभयतांच्या स्वाधीन केला. खलित्यामध्यें जर्मनीनें किती खडें सैन्य उभें करावें याचा विचार करण्यांत आल्याचें समजतें.

सदोबा—कांहीं तरी धुमसतंय् खास. चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं.

आण्णा—केव्हां लढाई होईल, याचा नेम नाहीं.

आबा—होऊं द्या. आपल्याला हवीच आहे. म्हणजे तरी चांगले दिवस येतील.

*　　　*　　　*

रस्त्यांतून जातांना कोणाच्या हातांत केसरी दिसला तर वाटेंत भेटणारे इसम कसे प्रश्न विचारतात तें पहा. कारण केसरी कधींहि न

वाचणाऱ्या इसमाला केसरी वाचणारा माणूस मोठा आहे असें वाटतें.

कुशाबा—भारी बुवा तुम्हांला केसरी वाचण्याचा नाद.

सदोबा—हं, वाचतों झालं. केसरी वाचला नाहीं तर आम्हांला करमत नाहीं.

कुशाबा—काय हो, यांना येवढ्या बातम्या रोज कुठून मिळतात, आणि त्या छापतात कशा? आश्चर्य आहे! तुम्ही सगळा वाचता का हो? तुम्हांला त्यांतील राजकारणाची सांखळी बरोबर लागते?

विठोबा—काय, केसरी काय बोलत्येय्? आज काय नवल विशेष आहे?

सदोबा—विशेष कांहीं नाहीं. ठीक आहे.

विठोबा—दोन शब्दांत सर्व समजावून सांगा पाहूं?

सदोबा—दोन शब्दांत सांगायला तो का हिशेब आहे? रुमानियांत प्रधानाचा खून झालेला आहे, मुंबईस एका मुलानें आत्महत्त्या केली.

विठोबा—अस्सं, बरं लढाई कोठपर्यंत आली आहे? अजून संपली नाहीं? काय हो, सगळं खरं, हें युद्ध संपल्यावर राजा कोण होणार?

असो. यावरून खेड्यांतील बहुतेक लोकांना केसरींतील महत्त्वाचा मजकूर कोणता वाटतो हें कळेल. त्यांचा मुख्य भर वर्तमानसारावरच असतो आणि चार मंडळींना विशेष सांगावयाचें असलें तर ते आपली भिस्त वर्तमानसारावरच ठेवतात. सारांश, खेड्यांतील बहुतेक लोकांना कोणतें राजकारण प्रिय असतें तें वरील संवाद वाचून लक्षांत येईल.”

# प्रकरण सतरावें

# नियतकालिकें

दैनिक, साप्ताहिक व पाक्षिक वाङ्मयास वर्तमानपत्र ही संज्ञा प्रचलित आहे. त्याहून अधिक मुदतीच्या वाङ्मयास नियतकालिक म्हणतात. नियतकालिकांत महिन्यानें, तीन महिन्यांनीं व सहा महिन्यांनीं प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाची गणना करण्यांत येते. त्या सर्वांत मासिकांचाच प्रघात अधिक आढळतो. कालदृष्ट्या साप्ताहिक व मासिक हीं फार अंतरानें उत्पन्न झालीं नाहींत. साप्ताहिकाचें मासिक पुस्तक हें परिणत स्वरूप आहे. दैनिक ही साप्ताहिकाची एका अंगानें प्रगति व मासिक ही दुसऱ्या अंगानें प्रगति. साप्ताहिकाच्या संपादकाला नियोजित विषयाची माहिती मिळविण्यास व विचार करण्यास फार तर सातच दिवसांची फुरसत सांपडते. अर्थात् तेवढ्या अल्पकाळांत विषयांची सांगोपांग चर्चा होत नाहीं व विचारांनाहि परिपक्वता येत नाहीं. फक्त त्यांचें स्थूल स्वरूपच मांडून वाचकांना संपादक पुढचा मार्ग दाखवूं शकतो. त्याला मतप्रचार करावयाचा असल्यास तो आपले मुद्दे राखून राखून दर अंकांत देतो व विषय कांहीं आठवड्यांनीं संपवितो.

वर्तमानपत्राच्या संपादकाहून एका अर्थानें मासिकाच्या संपादकाचा दर्जा वरचा. त्याचे वाचकहि वरिष्ठ दर्जाचेच संभवतात. अशा विचारशील व प्रौढ वाचकांपुढें विषय मांडणारा संपादकहि चांगला विद्वान्, अनुभाविक व विचारशील पाहिजे. प्रथम तरी मासिकांचें उद्दिष्ट प्राधान्येंकरून नैतिक, सामाजिक, धार्मिक व वाङ्मयिक विषयांचा ऊहापोह करण्याचेंच होतें. पण

मागाहून हळूहळू त्यांत इतर विषयांचाहि समावेश करण्यांत येऊं लागला. प्रचलित राजकारण मासिकाच्या कक्षेंत वृत्तपत्राइतकें वसत नसल्यामुळें तात्त्विक स्वरूपाच्या राजकारणास सर्वांबरोबर मासिकांत जी जागा प्रारंभीं मिळाली ती मिळाली. आज मात्र देशस्थितीप्रमाणें राजकारण कोठें पुढें आलें आहे तर कोठें मागें आहे. इंग्लंडांत राजकारणाला वाहिलेलींच कित्येक मासिकें आहेत; तर हिंदुस्थानांतील मासिकांत नीति, साहित्य व धर्म यांजबरोबर राजकारणाचा समावेश होतो. इंग्लंड देश स्वतंत्र आहे व त्याचें साम्राज्यहि मोठें आहे. सर्व जगाच्या राजकारणांत उलाढाल करणाऱ्या इंग्रज लोकांना कितीतरी वादग्रस्त व भानगडीच्या विषयांचा उलगडा हवा असतो. या कारणानें त्यांचीं मासिकें त्याच विषयांनीं व्यापलेलीं आढळतात. पण हिंदुस्थानाची स्थिति अगदीं वेगळी आहे. त्याचें राजकारण परतंत्र म्हणून लहान व राजकारणावर अवलंबून असणारें अर्थकारणहि लहान व परिमित. यास्तव पारतंत्र्यामुळें हिंदी लोकांचा धर्म, नीति, तत्त्वज्ञान व वाङ्मय यावर परकीय संसर्गापासून जे आघात होत आहेत त्याकडेच देशहितचिंतकांचें लक्ष हरघडी वेधत असल्यानें तसल्याच विषयांचें मंथन मराठी नियतकालिकांत चालू रहातें. कांहीं नियतकालिकें धर्म व तत्त्वज्ञान सर्व झूट समजून जी वर्तणूक आजच्या व्यवहाराला व व्यक्तिमात्राच्या विषयसुखांना अनुकूल वाटते तिचें समर्थन करतात आणि कांहीं सनातन धर्माचें रहस्य व आर्यांचें श्रेष्ठ तत्त्वज्ञान यांस उचलून धरून त्यांना चिकटून रहाण्यास सांगतात. धर्म व तत्त्वज्ञान यांच्या पाठोपाठ नवमतवादी मासिककार आतां नीतीच्याहि मागें लागले असून समाजाचा पायाच पोंखरीत आहेत. आजकाल महाराष्ट्रांतील बहुतेक मासिकांतून जर कोणता वाद माजत असेल तर तो या संबंधाचा होय. हाताच्या बोटावर मोजण्याइतकीं चार-दोन मासिकें सोडल्यास राजकारण, अर्थशास्त्र

असल्या गंभीर विषयांचा आमच्या मासिकांतून मागमूसहि लागत नाहीं.

वृत्तपत्र व्यवसायापेक्षां नियतकालिक व्यवसायास महाराष्ट्रांत विद्वान्, रसिक, गुणी व विचारी माणसं पूर्वीं अधिक प्रमाणांत लाभलीं. याचें कारण असें कीं वर्तमानपत्राच्या धंद्यासारखा मासिकाचा व्यवसाय राजकीयदृष्ट्या धकाधकीचा नाहीं. इतकेंच नव्हे तर कांहीं अंशीं सोवळाहि आहे. सरकारी नोकरींत राहून अगर विद्यालय-महाविद्यालयांत अध्यापकाचें काम करूनहि मासिक चालवितां येतें. खेरीज त्यांत वेळहि वर्तमानपत्रांतल्या इतका मोडत नाहीं. आठवड्यांतून नियमितपणानें कांहीं तास राखून ठेवल्यास महिनाअखेर-पर्यंत मासिकाची संजुगणा होते. विद्वान्, बहुश्रुत व व्यासंगी माणसामागें लेखनाचा लकडा असेल तरच त्याचें वाचन व चिंतन अखंड व टव-टवीत राहूं शकते. यासाठींहि कित्येक विद्वानांनीं प्राप्तीची अपेक्षा न करतां किंबहुना पदरमोड करून वर्षानुवर्षें मासिकें चालविलीं आहेत. प्रायः मासिकाचा धंदा आंतबट्याचाच समजून चाललें पाहिजे. यामुळेंहि वर्त-मानपत्रांइतकें मासिकांना दीर्घायुष्य लाभलेलें महाराष्ट्रांत आढळत नाहीं. मासिक हौसेनें व थोड्या काल्पनिक आशेनें सुरू करावें व कांहीं वर्षांनीं त्याकरितां उडवावयाचा पैसा संपला कीं बंद करावें, असेंच बहुशः घडलेलें आहे.

तरीहि विविध कारणांसाठीं नियतकालिकाच्या प्रतिष्ठित धंद्याची मोहिनी महाराष्ट्रांतील भिन्न भिन्न प्रवृत्तीच्या व ध्येयाच्या लोकांवर पडली, व त्यामुळें या व्यवसायांत कवि व कीर्तनकार, नट व नाटककार, गुणी व गुणज्ञ, ग्रंथकार व ग्रंथसंग्राहक, ज्योतिषी व भविष्यवादी, कादं-बरीकार व निबंधकार, व्यायामी व व्यायामप्रेमी, संशोधक व संगीतज्ञ, अधिकारी व अनधिकारी अशा अनेक व्यक्ती चमकून गेल्यानें सुमारें शंभर वर्षांच्या लहानशा काळांत हें क्षेत्र चांगलेंच मशागतून व पेरून निघालें आहे. त्या क्षेत्रांत राबल्या नाहींत अशा प्रसिद्ध व्यक्ती शीघ्र-साहित्य-व्यवसायाबाहेर उरल्या नाहींत असें म्हणण्यांत अतिशयोक्ति

नाहीं. नियतकालिकें चालविण्यांत मुंबई व पुणें या दोन शहरांनींच अग्रपूजेचा मान सहाजिकच मिळविला आहे. मनोरंजनापेक्षां वाचक वर्गाच्या ज्ञानांत, माहितींत व विचारांत भर घालून समाजाच्या धारणेस, पोषणास, स्थैर्यास व प्रगतीस मदत करण्याचीच टोंचणी बहुतेक संपादकांत आढळून आली. देशसेवेच्या व देशोन्नतीच्या भावनेनेंच बरेचसे संपादक नटलेले दिसले.

मराठींतील पहिलें मासिक सन १८४४ सालीं निघाल्याचा माग लागतो. त्याचें नांव 'उपदेशचंद्रिका'. नांवावरूनच संपादकाचें उदात्त ध्येय समजून येतें. हें मासिक थोडी मजल चालूनच विराम पावलें असावें. त्यानंतर संपादकाच्या लौकिकाखातर ज्याचा उल्लेख करावासा वाटतो असें मासिक 'विचारलहरी'. त्याचे संपादक पुण्यांतील प्रख्यात पंडित व रसिक ग्रंथकार कृष्णशास्त्री चिपळूणकर. विचारलहरी १८५२ मध्यें पुण्यास उसळूं लागल्या व थोड्याच काळांत उसळावयाच्या थांबल्या. ज्यांच्या कर्त्यांची कीर्ति मोठी व कामगिरी अलौकिक असें मासिक 'निबंधमाला' व त्याचे संपादक कृष्णशास्त्रींचे पुत्र विष्णुशास्त्री. यांनीं आपल्या मालेनें मराठी भाषेच्या क्षेत्रांत नवा बगीचा लावला व मराठीच्या माळरानांत गद्याच्या बाबतींत रमणीयता व वैभव आणिलें. मराठीची थोरवी व श्रीमंती त्यांनींच प्रथम आंग्लविभूषितांना दाखवून त्यांना तिच्या भजनीं लावण्याचा अद्वितीय मान पटकावला. निबंधमालेचें हेंच जीवितकार्य होतें. तें संपल्यासारखें तिच्या कर्त्याला वाटतांच त्यानें अवघ्या सातच वर्षांत तिची गुंफण थांबवून ती महाराष्ट्रवाग्देवतेच्या कंठीं घातली. निबंधमाला १८७४ त सुरू झाली व १८८१ त संपली.

निबंधमालेपेक्षां आधीं कांहीं पावसाळे पाहिलेला व दीर्घकाल आयुर्मान लाभलेला 'विविधज्ञानविस्तार' महाराष्ट्र मासिकांच्या उद्यानांत उंच व विशाळ वृक्षाप्रमाणें विलसत होता. तो १८६८ त

जन्मास आला व थोड्या दिवसांमागें बंद पडला. रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे त्याच्या पितृस्थानीं होते. वृद्धपणांत त्याची बरोबरी करणारें मराठींत एकहि मासिक नव्हतें. भारदस्तपणांतहि त्याच्या शेजारीं बसण्याजोगीं मासिकें क्वचितच सांपडतील.पण नियमितपणांत मात्र कदाचित् सर्वजणच त्याला मागें टाकतील. तथापि काठी टेंकीत हळूहळू पाय उचलणाऱ्या आजोबांना धूम मारून पोरासोरांनीं मागें टाकलें तर त्यांत नवलहि नाहीं. तितकें जुनें नसलें तरी बरेंच जुनें 'लोकमित्र' (१८९१) कर्नाटकाच्या एका कोपऱ्यांत खानापूर येथें गेलीं ४५ वर्षें अव्याहत निघत आहे. तें तीन तपाहून अधिक काळ चालू आहे यापेक्षां त्यास नांव ठेवण्यासारखें किंवा नांव घेण्यासारखें कांहीं नाहीं. त्यांतल्या त्यांत जुन्या व दोनहि अर्थांनीं प्रौढ अशा चित्रमयजगतास कोण विसरेल ! चित्रशाळेचे मालक रा. वासुदेवराव जोशी यांची स्वतःची चिकाटी त्यांच्या मासिकानेंहि उचलली आहे. चित्रें हेंच एकट्या चित्रमयजगताचें एक वेळ वैशिष्ट्य होतें. पण अलीकडे बरीच मासिकें चित्रें देऊं लागल्यामुळें चित्रमयजगतानें एखाद्या महत्त्वाच्या विषयास वाहिलेला विशेष अंक अधूनमधून काढण्याची प्रथा पाडली आहे.

'निबंधमाले'ची ख्याति उत्कृष्ट निबंधांसाठीं, तर 'ग्रंथमाले'ची ख्याति उपयुक्त ग्रंथांसाठीं. ग्रंथमालाकार प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर हे मराठी भाषाभिमानांत त्यांच्याच नांवाचे विष्णु कृष्ण चिपळूणकर यांचे एकनिष्ठ अनुयायी. त्यांनीं कोल्हापुरास राजाराम कॉलेजांतील अध्यापकाचें काम संभाळून ग्रंथमाला अनेक विद्वानांच्या सहाय्यानें सन १८९४ पासून एक तप गुंफली. केवळ ग्रंथोत्पादन हेंच ज्याचें जीवितकार्य असें एवढें एकच मराठींतील मासिक.

लोकशिक्षणाचा ( सन १९१२ ) असाच एका कारणासाठीं उल्लेख करावासा वाटतो. त्याचे कर्ते जनार्दन विनायक ओक. शिक्षण हाच त्यांचा

जीवितहेतु होता. प्रथम पुण्याचें फर्ग्यूसन कॉलेज, मागाहून नागपूरचें नील सिटी स्कूल व शेवटीं तळेगांवचें सुप्रसिद्ध समर्थ विद्यालय यांत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचें पवित्र व्रत आचरिल्यावर त्यांनीं लोकशिक्षणामार्फत लोकांना शिकविण्याचें कार्य आरंभिलें. त्यांनीं उच्च ध्येय डोळ्यापुढें ठेवून आपलें मासिक चालविल्यामुळें तें लवकरच वरच्या दर्जास चढून मान्यता पावलें. ओकांच्या अकालमृत्यूनें त्यांच्या मासिकालाहि अपमृत्यु आला. परंतु पुरुषप्रयत्नानें लोकशिक्षणाचा पुनर्जन्म झाला; तसा ओकांचा मात्र पुनर्जन्म कोणी करूं शकलें नाहीं.

आतां कांहीं मासिकांचें वर्णन न करतां नांवेंच देतों म्हणजे महाराष्ट्रीयास कोणी कोणता जीवनरस पुरविला हें त्यांचें तींच सांगतील.— अबलामित्र ( अलीबाग १८७६ ), कादंबरी कलाप ( पुणें १८८४ ), काव्येतिहाससंग्रह ( पुणें १८७८ ), न्यायाश्रय ( पुणें १८६६ ), लोकहितवादी ( पुणें १८७२ ), वेदोक्त सद्धर्मविचार ( मुंबई १८७५ ), शेतकरी (उमरावती १८८३) संगीत मीमांसक (पुणें १८८४ ), हिंदु धर्म विवेचन (मुंबई १८८५), महाराष्ट्र कवि (ठाणें १९०३), मराठी रंगभूमि ( पुणें १९०८ ), व्यायाम ( बडोदें १९१४ ), कुंडली विज्ञान ( मुंबई १९०२ ), आयुर्वेद ( मुंबई १९१४ ), श्रुतिबोध ( मुंबई १९१० ), रामदास आणि रामदासी (धुळें १९१५), इतिहास व ऐतिहासिक(धुळें), ऐतिहासिक लेखसंग्रह (मिरज), इतिहाससंग्रह (मुंबई), तत्त्वज्ञानमंदिर (अमळनेर), उद्यम (नागपूर), आनंद (पुणें), काव्यरत्नावली (जळगांव), मनोरंजन ( मुंबई ). धर्म, तत्त्वज्ञान, नीति, कृषि, उद्योगधंदे, इतिहास, व्यायाम, वैद्यक, ज्योतिष, काव्य, संगीत, नाट्य, इत्यादि विविध अंगांनीं राष्ट्रपुरुषाचें मन, बुद्धि व आत्मा यांचें पोषण व संवर्धन होत असतें. त्या दृष्टीनें बालापासून वृद्धापर्यंत, स्त्रीपासून पुरुषापर्यंत, शेतकऱ्यापासून व्यापाऱ्यापर्यंत, नटापासून वेदान्त्यापर्यंत व रसिकापासून तत्त्वज्ञापर्यंत

सर्वांना तोषवील अशा प्रकारची कामगिरी वरील मासिकांनीं बजाविली असून त्यांच्या संपादकांत रावबहादूर गोपाळ हरि देशमूख, विष्णुबुवा ब्रह्मचारी, जनार्दन बाळाजी मोडक, गोविंद बल्लाळ देवल, राजाराम रामकृष्ण भागवत, शंकर बापूजी मुजुमदार, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, दत्तात्रेय बळवंत पारसनीस, वासुदेव वामनशास्त्री खरे, विनायक लक्ष्मण भावे, कृष्णाजी नारायण आठल्ये, काशीनाथ रघुनाथ मित्र, विष्णु गोपाळ नवाथे इत्यादि विभिन्न दर्जांचे, अधिकारांचे, मताचे व अभिरुचींचे गृहस्थ होते. त्यांची ही नामावळीच मराठी मासिकांच्या वैभवशाली परंपरेची योग्यता पटविण्यास पुरेशी असून ती वाचून कोणा महाराष्ट्रीयास अभिमान व भूषण वाटणार नाहीं ?

वरील मासिकांपैकीं बरींच मासिकें बंद पडण्यास त्यांच्या अवतारकार्याच्या समाप्तीपेक्षांहि लोकाश्रयाचा अभाव हेंच निमित्त सांगावें लागेल. विशिष्ट विषयास वाहून घेतलेल्या मासिकांना पुरेसा आश्रय त्या शाखेच्या वाचक वर्गाकडून मिळण्याचा काळ अद्यापि आलेला नाहीं; म्हणून जीं मासिकें सर्वसामान्य वाचकास सर्वसामान्य ज्ञान पोंचवितात तींच त्यांतल्या त्यांत दीर्घकाल जिवंत राहिलेलीं दिसतात. परंतु लहानशा विशिष्ट वर्गाकरितां काढलेलीं मासिकें लवकरच बंद पडतात. नव्या दमाच्या व अननुभवी संपादकाच्या लक्षांत ही गोम न आल्यामुळें नवे संपादक तसल्याच मासिकांच्या मोहाला गुंततात व दिव्यावर उड्या टाकणाऱ्या पतंगाप्रमाणें नाश पावतात. कांहीं मासिकें भरपूर आश्रयाच्या अभावींहि बरींच टिकून रहातात. याचें रहस्य थोडक्यांत असें सांगतां येतें. (१) ज्यांचा छापखाना मोठा व चांगला किफायतशीर आहे असले मालक झीज सोसूनहि मासिक सुरू ठेवणें आपलें कर्तव्य समजतात. (२) कांहीं संपादक स्वतःला द्रव्यप्राप्ति न झाली तरी चरितार्थास अन्य साधन असल्यामुळें हौसेखातर मासिकांचा संसार करतात. (३) कित्येक मालक अगर संपादक इभ्रतीला बळी

पडून मासिकाचे अंक मागासले तरी कसे बसे काढीत असतात. (४) क्वचित् एखाद्या मासिकाचें नुकसान भागीदारीच्या पद्धतीनें संपादकाचा मित्रवर्ग आपसांत वांटून घेतो.

एक वेळ लोकप्रिय व चांगलीं किफायतशीर ठरलेलीं मासिकेंहि बरींच वर्षें सुरू राहून बंद पडल्याचीं उदाहरणें आहेत. ज्यानें मासिक आपल्या कर्तबगारीनें भरभराटीस आणिलें तो मरून गेला व मालकानें कोणी बाहेरचा संपादक नेमला तर त्या मासिकाची पुण्याई संपत संपत तें दिवंगत होतें. वाचकांची अभिरुचि बदलल्यामुळेंहि लोकप्रिय मासिक अप्रिय होऊन मरतें.

मासिकांना सुरुवात महाराष्ट्रांत 'उपदेशचंद्रिका' हिनें सन १८४४ सालीं केली, त्यास ९५ वर्षें झाली. या काळांत १९२० सालापर्यंतचे टप्पे विविधज्ञानविस्तार ( १८६८ ), निबंधमाला ( १८७४ ), ग्रंथमाला (१८९४), मासिक मनोरंजन (१८९५) ते चित्रमयजगत् (१९११) असे प्रसिद्ध मासिकांच्या नांवावरून पडतात. या चारहि मासिकांतून महाराष्ट्रीयांच्या मतांची व ज्ञानप्राप्तीच्या आकांक्षेची प्रगति इष्ट दिशेनें झाली असल्याचेंच दिसून येतें. राष्ट्र या नात्यानें महाराष्ट्रीय लोकांचे विचार व आचार यांना इष्ट वळण लागण्याच्या दृष्टीनें त्यांना ज्ञानाचीं साधनें पुरविणें हें मासिक--पुस्तककर्ते आपलें कर्तव्य समजत. त्यांना समाज मानसिक, शारीरिक व आध्यात्मिक बाबतींत उन्नतावस्थेस यावा अशी तळमळ होती. मासिककार विद्वान् असून कर्तव्याचें महत्त्व ओळखून स्वार्थत्यागपूर्वक मासिक चालविण्यांत धन्यता मानणारे होते. वरील मासिकांत चित्रमयजगत् हें शेवटचें मासिक. त्यानें फरक केला तो बाह्यांगांत, सजावटींत व चित्रांची प्रथा पाडण्यांत. त्याच्या अंतरंगाचें धोरण पूर्वमासिकांना सोडून नव्हतें.

पण १९२० सालापासून मासिकें चालविण्याच्या पद्धतींत

-लथापालथ झाली. महाराष्ट्रीय समाजांत शिक्षित वर्ग त्वरेनें वाढला. महाराष्ट्र व पश्चिमेकडील देश यांजमध्यें दळणवळण अधिक होऊं लागलें. महायुद्धानंतर तिकडील विचार व आचार बदलून त्यांनीं इकडील आचारविचारांत ढवळाढवळ सुरू केली. रशियांत नवी राज्यपद्धति व नवी समाजरचना झाली व त्यांनीं निर्माण केलेलीं तत्त्वें महाराष्ट्रांत शिरलीं. मासिकें हा धंदा मानला जात नव्हता, तो आता धंदा मानला जाऊन बेकार लोक त्यांत गर्दी करावयास आले. मासिकांचे संपादक विद्वान् असत, त्या ऐवजीं स्वतः एकहि अक्षर न लिहिणारे धनिक लोक साधारण चुणचुणीत व झकपक तरुणास हाताशीं धरून त्याजमार्फत आपलीं मासिकें चालवूं लागले किंवा चुणचुणीत व झकपक तरुण ज्ञानाची पुरेशी पुंजी नसतांहि केवळ चुणचुणीतपणाच्या जोरावर स्वतःचीं मासिकें काढण्यास पुढें आले. धंदा म्हणून मासिकांत पैसा घातल्यावर तो धंदा या दृष्टीनें किफायतशीर करण्याकरितां जेणेंकरून लोकाश्रय वाढेल असलें धोरण मासिककारांनीं स्वीकारलें. जो माल खपेल तो विकावयाचा असें ठरल्यावर बहुजन समाजाच्या अभिरुचीस प्राधान्य मिळून ध्येय-निष्ठा मागें पडली. मासिककार गुरुपदावरून ढांसळला व वाचकवर्गाचा दास बनला. मासिककारांनीं बहुजन समाजांत सहज आढळून येणारी हीन अभिरुची बदलावयाची त्या ऐवजीं द्रव्याच्या व लोकप्रियतेच्या आशेनें मासिककार हा हॉटेलवाल्याच्या कनिष्ठ दर्जाला जात चालला.

धंदेवाईक मासिककारांनीं आपल्या धंद्याला बरकत देणारे चुणचु-णीत व खुशामते लेखक धुंडाळून काढले व लेखकहि अल्पस्वल्प प्राप्तीसाठीं धन्याच्या नजरेला नजर भिडवून धन्याच्या तब्येतीचें वळण आपल्या लेखणीला देण्यांत तरबेज झाले. लैंगिक सुखाकडे मनुष्याची प्रवृत्ति निसर्गसिद्ध आहे. पुरुषाला स्त्री हवी व स्त्रीला पुरुष हवा. विवाह-संस्था लैंगिक सुखासाठींच एका अर्थानें निर्माण झाली आहे. परंतु

विवाहानें पुरुषावर कुटुंबपोषणाची जबाबदारी पडते. ती जबाबदारी पडूं नये, पण सुख मात्र मिळावें अशी स्थिति महायुद्धानंतरच्या हलाखींत युरोप खंडास आली व कल्पक युरोपियनांनीं आपली अक्कल लढवून संततिनियमनासारख्या युक्त्या काढल्याच; शिवाय अविवाहितावस्थेंत संभोग घडला किंबहुना संततिहि निपजली तरी त्यांत असभ्य, अहितकारक, अनर्थावह व निंद्य कांहीं नाहीं असें समर्थनहि सुरू केलें. रशियांतील कम्युनिस्ट या सर्वांचे गुरु. त्यांनीं या पायावरच रशियन समाज उभारल्यामुळें हिंदुस्थानांतील अविचारी, अदूरदृष्टि, अप्रबुद्ध व उथळ लेखकांना तो एक बडा शास्त्राधारच मिळाला आणि त्या विचारांचा लोंढा त्यांनीं इकडील निरागस, अजाण, अर्धशिक्षित तरुणतरुणींवर सोडला. शिक्षणप्रसार व आर्थिक दुःस्थिति या दोन प्रबल कारणांनीं अविवाहितावस्थेंत बऱ्याच प्रौढ वयापर्यंत रहाण्याची पाळी आलेल्या तरुणतरुणींना हें स्वल्प किंमतीचें मनोरंजनाचें साधन हातीं आलें. लैंगिक सुखाला मनुष्य प्राणी स्वाभाविकच लालचावलेला असतो. तें सुख नेमस्त व नियमित ठेवण्याचाच प्रयत्न धर्मशास्त्रकारांनीं आजवर केला आहे. तमाशे, नाटकें व कादंबऱ्या यांजवरच बहुजन समाजाच्या उड्या पडतात हें मानवी प्रवृत्तीचें गमक होय. विवाहित स्त्रीपुरुषांना या करमणुकी सामान्यतः प्रिय असतात. म्हणून ज्यांना अविवाहित रहाण्याची यदृच्छेनें सक्ती अनुभवावी लागत आहे त्या तरुणतरुणींनीं व विधुर-विधवांनीं त्या करमणुकींकरितां तडफडावें यांत नवल तें कसलें? सन १९२० सालानंतरच्या काळांत तमाशे, नाटकें व कादंबऱ्या यांच्या कार्यास हातभार लावण्यास संभावित समजलीं गेलेलीं मासिकें पुढें आलीं. कामोद्दीपक व शृंगारपर कथा, लघुकथा व कादंबऱ्या मासिकांतून प्रसिद्ध होऊं लागल्या. या वाङ्मयांतील कांहीं किंबहुना बहुतेक नायक-नायिका अविवाहित स्थितींतच एकमेकांच्या संगतींत राहणाऱ्या व अंशतः संभोग सुखें घेणाऱ्या दाखविल्या जातात.

जें श्रवणसुख रुपया, दोन रुपये खर्चून व नाटकगृहांत जाग्रणें करून मिळावयाचें तें दर महिन्याला चार-दोन आण्यांत मासिकांतून सवंग मिळूं लागलें तर असल्या मासिकांचा खप कां वाढणार नाहीं? वाचक वर्गाचें हें मानसशास्त्र बऱ्याच मासिककर्त्यांनीं ओळखलें असून, ते आपल्या प्रत्येक अंकांत या जातीच्या एक-दोन कथा-लघुकथा घालून मासिकाची लोकप्रियता वाढवितात, निदान कायम ठेवतात.

वरील प्रकारच्या मासिकांनीं महाराष्ट्रावर सध्यां गहजब करून सोडला आहे. त्यांची त्रिनी किर्लोस्करवाडींतून बाहेर पडणाऱ्या किर्लोस्कर, स्त्री व मनोहर या तीन मासिकांकडे आहे. किर्लोस्करांच्या संपन्न लोखंडी मालाच्या कारखान्याकडे मासिकांची मालकी असल्यामुळें भांडवल, यंत्र-सामुग्री व अन्य साधनें यांची चंगळ त्यांजपाशी आहे. त्यांच्या जोरावर स्वल्प किंमतींत व आकर्षक स्वरूपांत वाचकांस मिळणाऱ्या या मासिकाइतका मराठींतील कोणत्याहि मासिकांचा खप नाहीं, असें अभिमानपूर्वक सांगण्यांत येत आहे. त्यांनीं आपणांस हवे तसे लेखक वेचून त्यांना आपल्या कार्यास जुंपलें असून त्यांच्या मोहक लेखनशैलीचा फांसा वाचकांच्या मानेला घालून व तरुणतरुणींच्या धरपकड चित्रांनीं त्यांना धुंदवून कामोद्दीपक गुटिका पाजण्याचें अधम कार्य मोठ्या आवेशानें व धडाडीनें चालविलें आहे. त्याच्याबरोबरच धर्म, नीति या पवित्र विषयावरहि आग पाखडली जात आहे. छापखाना हा शांतियुद्धांतील तोफखानाच आहे. त्यांतून एकसारखी गोलंदाजी चालू झाल्यावर तिच्या दाहक धक्क्यांनीं सारा महाराष्ट्रीय समाज निर्वीर्य, दुर्बल, पागल, बेहोष, कुचकामाचा व मेषपात्र न बनला तरच आश्चर्य. याशिवाय 'समाजस्वास्थ्य', 'ज्ञानमंदिर', 'साहित्यसेवक', 'यशवंत' इत्यादि मासिकें नवीन निघालीं आहेत. त्यांपैकीं समाजस्वास्थ्य या मासिकानें केवळ लैंगिक विषयांची तेवढीच तळी उचलून अनाचारप्रसारक कार्य अखंड चालविलें आहे. बाकीचीं

मासिकें किर्लोस्करांचा गुण अधून मधून उचलून खप वाढविण्यास यथाशक्ति झटत असलीं तरी त्यांची आकांक्षा किर्लोस्करांच्या पंक्तीस बसण्याची नाहीं. याशिवाय आणखीहि कांहीं मासिकें आहेत. त्यांच्याहि नैतिक कल्पना शिथिल असून त्या सर्वांवर किर्लोस्करांच्या त्रिकुटाचा अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं.

नवीन निघालेल्या बऱ्याच मासिकांनीं फाल्गुन मास बारा मास चालविला असतां त्यांच्यांतून अब्रू संभाळून मार्ग काढूं पहाणारीं मासिकें म्हणजे चित्रमयजगत्, पुरुषार्थ, लोकशिक्षण, सह्याद्रि इत्यादि होत. तें भावी संकटांतून महाराष्ट्रीय समाजास वांचविण्याची खटपट करीत असून त्यांपैकीं बहुतेकांना भांडवल, लेखक व छापखाना या साधनांची मुळींच कमतरता नाहीं. स्वीकृत कार्यांत यश येऊन महाराष्ट्राचा माथा उजळ ठेवण्याचें श्रेय तीं घेतील अशी आशा वाटते. आनंद, शालापत्रक प्रभृति मासिकें बालबालिकांना उत्कृष्ट वळण लावण्यास झटत आहेत ही समाधानाची गोष्ट होय. त्यांचीं ध्येयें उच्च आहेत व तींच त्याना तारण्यास समर्थ आहेत.

---

# प्रकरण अठरावें

# नियतकालिकांचें संपादकत्व

नियतकालिकांचा प्रारंभ महाराष्ट्रांत होऊन शंभर वर्षें भरत आलीं. शंभर वर्षांत त्यांचें रूप पुष्कळच पालटलें. नुसत्या विद्वान् लोकांच्या हातीं नियतकालिकें होतीं तोंपर्यंत त्यांची प्रगति फक्त विचार व ज्ञानदान यांतच झाली. त्यांचें बाह्यांग साधें व अंतरंग गंभीर विषयांनींच प्रायः भरलेलें असे. पण नियतकालिकांचे पहिले चालक व संपादक धंदेवाईक नसत. नियतकालिकांत आयुष्याचा सगळा काळ घालवून तें धंद्याच्या दृष्टीनें हळूहळू किफायतशीर करावयाचें या हेतूनें नवीन धाडसी लोक त्याकडे वळले. ते आपल्याबरोबर कांहीं नवीन कल्पनाहि घेऊन आले. त्यांचे नायक रा. काशिनाथ रघुनाथ मित्र होत. त्यांनीं 'मनोरंजन' नांवाचें मासिक मुंबईस १८९५ सालीं सुरू केलें. नियतकालिकांचें अन्तर्बाह्य स्वरूप त्यांनींच प्रथम पालटून टाकलें. मासिकाच्या मुखपृष्ठावर तरुणीचा सुंदर चेहेरा मनोरंजनांतच प्रथम प्रकटला. स्त्री-पुरुषांचें परस्पराविषयीं आकर्षकत्व लक्षांत घेऊन त्यांनीं पुरुषवर्गाची नेमकी नस दाबली. तें चित्र पाहातांच पुरुषांना मनोरंजन हें मासिक जवळ घ्यावेंसें वाटावें व स्त्रियांना त्यांजविषयीं अभिमान उत्पन्न व्हावा. बाह्यांगाप्रमाणें त्यांनीं आपला कुंचला अन्तरंगांतूनहि फिरविला. मासिकाचें मनोरंजन नांवच त्याचा हेतु दर्शवितें. मनोरंजनाचीच ज्यांना मातबरी अशा शिक्षित-विद्वान नव्हे—स्त्रीपुरुष वाचकांकरितांच तें निघालें. मासिक उघडतांच पहिल्या पानावर एखाद्या उदयोन्मुख कवीची लौकिक विषयावरची रुचिर कविता सुबक कोंदणांत बसविलेली

दृष्टीस पडूं लागली, लेखक वर्गांत पुरुषांच्या शेजारीं स्त्रिया चमकूं लागल्या व विषयांतहि खास स्त्रियांकरितां स्वयंपाकगृहांतील स्वादिष्ट पदार्थांचा दरवळ सुटला. इतकें करून तरुणतरुणींचीं ज्यावर स्वाभाविकच दृष्टि वळावी अशी सामाजिक कादंबरी प्रत्येक अंकांत क्रमशः छापली जाऊं लागली. हें विषयवैचित्र्य प्रयत्नावांचून कसें साध्य होणार !

पूर्वीचे संपादक स्वतःच्या विद्वत्तेवर व लेखनपटुत्वावर भिस्त ठेवून मासिक चालवीत; बाहेरच्या लेखकांचीं आवर्जून आर्जवें करीत नसत. मनोरंजनाचे संपादक रा. मित्र यांनीं याहि दिशेनें नवा प्रघात पाडला. ते स्वतः विद्वान् नसले तरी चांगले लेखक होते. मुंबईसारख्या अफाट शहरांत तेथील विद्वान् स्त्रीपुरुषांपासून ते अपेक्षित विषयांवर लेख मिळवीत व मासिकाला विविधता आणीत. मासिकाचा संपादक आपली खुर्ची सोडून लेखाकरितां बाहेर हिंडूं लागला कीं त्याचा व्याप वाढला. मित्रांनीं आपला व्याप वाढवून व मासिक लोकप्रिय करून अल्पावधींत चांगलेंच किफायतशीर केलें. या दृष्टीनें मित्रांना महाराष्ट्रांतील पहिले यशस्वी संपादक म्हणण्यास हरकत नाहीं.

मासिक मनोरंजनानंतर सोळा वर्षांनीं (सन १९११) पुण्यांत 'चित्रमयजगत्' या मासिकास सुरुवात झाली. मनोरंजन सुधारकी थाटाचें तर चित्रमयजगत् राष्ट्रीय बाण्याचें. त्याचे मालक रा. वासुदेव गणेश जोशी स्वतः चिकित्सक व कल्पक पण लेखक नसल्यामुळें त्यांना आपल्या कल्पना अमलांत आणण्याकरितां वेगळा पगारी संपादक नेमावा लागला. चित्रशाळेसारखा समृद्ध व साधनसंपन्न छापखाना हातीं असलेल्या वासूकाकांना संपादकाच्या पगाराचा लहानसा भार मासिक पुस्तकाऐवजीं छापखान्यावर टाकणें प्रारंभीं मुळींच कठिण नव्हतें. घरच्या चित्रशाळेतून चित्रमयजगत्‌ला चित्रांचा पुरवठा त्यांनीं अनायासें केला. पुण्यांतील नामांकित लेखकांकडून त्यांनीं स्वतःच्या वजनानें व भिडेनें लेख मिळवावे

व त्यांना मोबदलाहि बरा द्यावा. लेखांप्रमाणें चित्रांमुळेंहि मासिक लोकप्रिय करतां येतें हें रा. जोशी यांनींच प्रथम महाराष्ट्रीय मासिककारांच्या नजरेस आणिलें. मासिकाचा प्रचार बराच झाल्यावर त्याचा खर्च परभारें भागून त्यांतून कांहीं बचतहि होऊं लागली. मासिकाचा लौकिक व प्रसार वाढतांच होतकरू लेखकांकडून चित्रमयजगताकडे पुष्कळ लेख येण्यास सुरुवात झाली व त्यांचें परीक्षण आणि निवड हें नवें कामच होऊन बसलें. सदर काम स्वतः मालक व संपादक यांनीं आपसांत वांटून घेऊन संपवावें.

चित्रमयजगत्मधील चित्रें बटबटीत असत, सुंदर व मोहक नसत. ती उणीव मुंबईतील मासिककारांनीं व तशीच किर्लोस्करवाडीनें पुढें भरून काढली. चित्रमयजगत्पासून मासिक खाजगी व्यक्तींनीं चालविण्यापेक्षां छापखानदारांनींच चालविलें तरच किफायतशीर होतें असें सिद्ध झालें व छापखानदारांच्या मासिकांत संपादक पगारी नेमण्याची वहिवाटच पडली. कट खाण्याची ताकद जितकी छापखानदाराला असते तितकी बिनभांडवली संपादकाला नसते, पण मासिकास पुरेसे वर्गणीदार मिळेपर्यंत तें तोट्यांत चालविणें त्यास भाग पडतें. शिवाय छापखानदाराच्या मालकीचें मासिक असलें म्हणजे वर्गणीदारालाहि आपण भरलेली वर्गणी मासिक मध्येंच बंद पडून बुडणार नाहीं अशी खात्री येते. या सर्व कारणांनीं जेवढीं म्हणून मासिकें यशस्वी झालीं आहेत त्यांपैकीं बहुतेक छापखानदारांच्याच मालकीचीं आहेत. त्यांत किर्लोस्करांच्या कारखान्यामार्फत चाललेलीं 'किर्लोस्कर', 'मनोहर' व 'स्त्री', दामोदर सावळाराम आणि मंडळी यांचें 'ज्ञानमंदिर', गणेश महादेव आणि कंपनीचा 'यशवंत' आणि चित्रशाळेचें 'चित्रमयजगत्', 'शालापत्रक' व 'ध्रुव' यांचा प्रामुख्यानें निर्देश करावा लागेल. या सर्वांचे संपादक मालकाशिवाय वेगळे आहेत. कांहीं मासिकें एका संपादकाच्या आटोक्याबाहेर गेल्यामुळें उपसंपादकहि नेमण्यांत आले आहेत. अशा स्थितींत त्यांच्या संपादकांना

वर्तमानपत्रांच्या संपादकाइतकें पुष्कळ काम नियमितपणें दररोज करावें लागतें. स्वतः लेख लिहिणें, दुसरीं मासिकें व वर्तमानपत्रें वाचून त्यांतील मजकुराचा आपल्या मासिकाकडे उपयोग करणें, बाहेरून आलेले अनाहुत लेख तपासणें व कित्येक नामवंत लेखकांना लिहून त्यांचे लेख मुद्दाम मागविणें इत्यादि कामें त्यांजवर पडतात.

हल्लींच्या मासिकांचा सांचा पुढीलप्रमाणें सांगतां येईल. मुखपृष्ठावर एक सुंदर चित्र—स्त्रीचें, क्वचित् इतरांचें. पहिल्या पानांत एक कविता—सृष्टिसौंदर्यविषयक किंवा स्त्रीविषयक. एक दोन किंवा अधिकहि कथा-लघुकथा, प्रवासवर्णन, विद्यमान व्यक्तीचें एक चरित्र, संगीतावर अथवा दुसऱ्या एखाद्या ललित विषयावर लेख आणि त्याखेरीज सामाजिक, धार्मिक विषयांची चर्चा. तें वाचतांना सुख, आनंद व्हावा, डोक्याला लवमात्रहि शीण पडूं नये अशीच विषयांची निवड केलेली असते. कांहीं मासिकें पानागणिक चित्रें देतात तीं केवळ कलात्मक व मनाला रिझविणारीं असतात; पण किर्लोस्कर यांच्या मासिकांत गोष्टींतील कथांना अनुलक्षून मुद्दाम नेमलेल्या चित्रकाराकडून रेखाटलेलीं चित्रें गोष्टींत इतस्ततः गुंतविण्यांत येतात. हें सर्व फार कुशलतेनें व मेहनतीनें होतें. पूर्वीं मासिकांचे संपादक काम करतां करतां अनुभवानें तयार होत व मासिकाची सजावट स्वतःच्या कल्पनेनें सुधारीत. पण अलीकडे इंग्लंड, अमेरिका इत्यादि पाश्चिमात्य देशांत या व्यवसायांत झालेल्या प्रगतीचा अभ्यास करून कांहीं संपादक व मालक आले असल्यानें त्यांनीं मासिकांच्या नेपथ्यांत आमूलाग्र फरक केला आहे. या कामीं किर्लोस्करांनीं चालविलेलीं तीन मासिकें अग्रेसर समजलीं पाहिजेत.

किर्लोस्कर मासिकानें आपला २०० वा अंक खास म्हणून काढला. त्यांत सदर मासिकाच्या संपादक वर्गानें कामाची पद्धत विस्तारानें लिहिली आहे, तीच संक्षेपानें येथें देतों: “ किर्लोस्कराकडे

आलेले लेख बारनिशीला प्रथम बार होतात. बार करतांना बारनिशी संपादक प्रत्येक लेख सहज चाळून पहातो. पहिल्या चाळणींतच तो नापसंत ठरल्यास लेखकाकडे परत होतो व बारनिशीला तसा शेरा मारण्यांत येतो. उरलेल्या लेखासोबत बारनिशी-संपादक आपले शेरे लिहितो व लेख वरच्या संपादकाकडें पुढील तजविजीसाठीं पाठवितो. वरचे संपादक रा. ताम्हनकर आपला अनुभव असा सांगतात, 'लेखाचें हस्तलिखित सुवाच्य व नीटनेटकें असलें तर त्यासंबंधीं अनुकूल ग्रह होतो. दुर्वाच्य लिखाणाची गत त्याच्या अगदीं उलट. शिक्षा समजून तें वाचावें व कांहीं तसाच चांगुलपणा आढळला तर ठेवून घ्यावें. प्रत्यक्ष लेखाची कसोटी वेगळीच—( १ ) लेख मासिकाच्या धोरणाशीं सुसंगत आहे काय ? ( २ ) तो सुबोध आहे कीं नाहीं ? ( ३ ) तो आटोपशीर आहे कीं पाल्हाळिक आहे ? ( ४ ) तो हृद्य आहे काय ? ( Full of human interest ) (५) त्यांत नवें काय आहे? (६) लेख वाचकांचें मन गुंतवून ठेवण्यासारखा चटकदार आहे काय ? (७) लेखकानें आपलें म्हणणें निःसंदिग्धपणें मांडलें आहे काय ? '

"वाचकाची अपेक्षा अशी कीं वाचनापासून आपणास नवें कांहींतरी मिळावयास हवें. विषय जुना असला तरी लेखक त्यांत नवें काय सांगतो हें वाचक पहात असतो. लेखक आपलीं मतें स्पष्टपणें मांडीत असेल तरच वाचक त्यास चहातो. वाचकाला न आवडणारी गोष्ट म्हणजे पाल्हाळ. कांहीं लेखक बरेंच बारीकसारीक वर्णन करण्यांत लेखाचा विस्तार फार वाढवितात. पण असें करतांना वाचकाच्या मनाला किती ताण सहन होईल याचा त्यास विसर पडतो. लेख सुबोध असावा. कठिण संस्कृतप्रचुर व अलंकारिक भाषा सामान्य शिक्षित वाचकांना कळत नाहीं. वरचा संपादक अशी चाळणी लावून बरेच लेख ज्याचे त्यास परत पाठवितो व योग्य वाटतील ते लेख मुख्य संपादकाकडे देतो. मुख्य

संपादक त्याहि लेखास आपल्या चाळणींत घालतो, स्वतःस पसंत पडतील ते लेख सहसंपादकाशीं चर्चा करून ठेवून घेतो व उरलेले परत करतो.

"लेखांच्या निवडीप्रमाणें मुख्य संपादकास आणखी एक काम करावें लागतें. त्यास बाहेरच्या नामवंत लेखकांना पत्रें लिहून त्यांचे लेख मागवावयाचे असतात. त्याकरितां पत्रें लिहावीं लागतात. शिवाय मुख्य संपादक सहसंपादकाशीं चर्चा करून विशिष्ट विषयावर लेख लिहावयास त्यांना सुचवितो.

"बाहेरच्या लेखकाचा लेख स्वीकारला व छापला म्हणजे लेखक धन्यवाद देईलच; तसेंच लेख परत केला असतां निंदाहि केल्याशिवाय रहाणार नाहीं. नव्या लेखकांना आपला लेख कदाचित् माघारा येईल अशी धास्ती असते. सदर लेखक संपादकास मधाचें बोट कसें लावतात. याचा किर्लोस्कराचे सहसंपादक रा. ताम्हनकर यांनीं नमूद केलेला अनुभव विचारणीय आहे. लेखक लेखाबरोबर कळवितो 'हा लेख प्रसिद्ध झाल्याबरोबर मी आपल्या मासिकाचा वर्गणीदार होणार आहें.' कवि आश्वासतो 'कविता प्रसिद्ध होईल त्या अंकाच्या बारा प्रती माझ्याकडे व्ही. पी. नें पाठवाव्या.' लेखक इतके निमित्ताला टेकलेले असतास कीं लिहिलेल्या उत्तरांत चुकून एखादा तिखट शब्द गेला तर तो ते नेमका वेचून काढतात. म्हणून संपादकाचा भाषेंत किंवा कृतींत आपला तोल सुटतां कामा नये; ही संपादकीय यशाची गुरुकिल्ली असल्याचें ताम्हनकर सांगतात.

"मुख्य संपादकाकडे निवडक लेख आल्यानंतर त्यांतून पुढच्या अंकाकरितां कोणते लेख प्रथम घ्यावयाचे हें मुख्य संपादक सहसंपादकांच्या विचारानें ठरवितो. या कार्यांत लेखाचा प्रासंगिकपणा याचा विचार प्रधान असतो. पुढील अंकांतील लेखांचा क्रम ठरवितांना मासिकाचें धोरण व लेखांचें महत्त्व याकडे संपादक लक्ष देतो. भिन्न रुचीच्या वाचकांना

आवडेल, मानवेल व त्यांच्या विचारांना चालना देईल असें विविध साहित्य दर अंकांत परिश्रमपूर्वक संग्रहीत केलें जातें.

"किर्लोस्करांच्या मासिकांत चित्रांचा फार गर्दी असते. तीं चित्रेंहि निवळ शोभेकरितां किंवा कलेकरितां नसून लेखांत व लघुकथांत अनुस्यूत असतात. म्हणून मासिकाच्या चित्रसंपादकाकडे चित्रें तयार करण्याचें काम देतात. त्यानें तीं चित्रें कोणत्या तारखेला तयार ठेवलीं पाहिजेत याचें टिपण एक सहसंपादक करतो.

"लेख स्वीकारल्यावरहि त्याच्यांत पुढीलप्रमाणें सुधारणा कराव्या लागतात—' वैयक्तिक टीकेला सौम्यपणा आणणें, पाल्हाळ कमी करणें, द्विरुक्ति टाळणें, बोधपूर्ण व महत्त्वाच्या वाक्याखालीं रेघा देणें, धोरणास सोडून असणाऱ्या कांहीं मजकुराकरितां संबंध लेख पुनः लिहून काढणें इत्यादि'.

"लेख जुळावयास देण्यापूर्वी व दिल्यानंतर पानें बांधण्यापूर्वी खालील गोष्टींचा प्रामुख्यानें विचार व व्यवस्था होते. ( १ ) लेखाचा मथळा ( २ ) पोटमथळा ( ३ ) चित्रें किती व कोणतीं ( ४ ) लेखासोबतच्या जाहिराती ( ५ ) लेखांतील महत्त्वाच्या मजकुराची मांडणी ( ६ ) पुढील अंकांतील कांहीं महत्त्वाच्या लेखांच्या आगाऊ प्रसिद्धीसाठीं करावयाची घोषणा. यांचा पूर्ण विचार झाल्यावर सहसंपादक मासिकाच्या आकाराचीं कोरीं पानें घेऊन खोकें बनवितो, त्यांतील प्रत्येक पानावर आराखडा काढतो आणि शीर्षक कसें व कोणत्या ठशाचें घालावयाचें, चित्र कसें घालावयाचें, उपशीर्षकाची मांडणी कोणत्या ठशांत करावयाची, जाहिराती कोणच्या पानावर कशा पद्धतीनें घालावयाच्या, लेखांतील महत्त्वाचे विचार कशा आकर्षक पद्धतीनें मांडावयाचे हें रेखाटतो. या प्रकारचा आराखडा मुख्य ठसेदाराकडे ( कंपॉझिटर ) दिल्यावर त्याप्रमाणें तो मासिकाचीं पानें बांधतो. पानें बांधून झाल्यानंतर फिरून एकवार वाचलीं जातात व नंतर छपाईसाठीं

यंत्रावर नेण्यांत येतात. यंत्रावर एका वेळीं आठ पानें छापून होतात. प्रत्यक्ष छपाई सुरू होण्यापूर्वी यंत्रावरील छापलेला पहिला कागद संपादकाकडे जातो. त्यानें त्यांत केलेल्या शेवटच्या ज़ुजबी सुधारणा अमलांत आल्यावर खऱ्या छपाईस सुरुवात होते."

किर्लोस्करांचीं मासिकें बहुजनसमाजाकरितां आहेत. सामान्य शिक्षित वर्गास समजतील, आवडतील व त्याचें मनोरंजन करतील असे विषय त्यांत येतात. त्याहून ज्यांना सुशिक्षित, बहुश्रुत व विद्वान् म्हणतां येईल अशा लोकांचा एक वर्ग आहे. त्यांना नवे विचार, नवें ज्ञान देणारीं, वादग्रस्त प्रश्नांचें निराकरण करणारीं, कांहीं कूट प्रश्न सोडविणारीं, वर्तमानपत्रात येऊन गेलेला व अंशतः चर्चिलेला विषय सविस्तर व सांगोपांग मांडणारीं मासिकें आवश्यक होत. तेच देशाचे ज्ञानदीप असून त्यांजवरून देशाचा बौद्धिक दर्जा ठरविला जातो. या दृष्टीनें फार दिवस चाललेलें मासिक 'विविधज्ञानविस्तार'. पण तें गळाठलेलें आढळतांच आणखी एका ताज्या उत्साहानें चालविल्या जाणाऱ्या मराठी मासिकाची वाण भासूं लागली. ती 'सह्याद्रि' मासिकानें पुष्कळ अंशीं भरून काढली आहे. स्वतःच्या मालकीचा संपन्न छापखाना हें महाराष्ट्रांत तरी कोणत्याहि चांगल्या मासिकाचें एक गमकच समजावें लागतें. त्यांतल्या त्यांत ज्या भारदस्त मासिकांचे वर्गणीदार परिमित त्यांना याची निकड अपरिहार्य. सह्याद्रीस केसरीचा छापखाना, नांवलौकिक व साधनसंपत्ति पाठीशीं आहे. आणि महाराष्ट्रांतील श्रेष्ठ साहित्यिक रा. नरसिंह चिंतामण केळकर त्याचे संचालक आहेत व त्याशिवाय इतर संपादकहि आहेतच. त्यामुळें लेखक व वाचक वर्गास सह्याद्रीविषयीं विश्वास वाटत आहे

मासिक ज्या दर्जाचें व धर्तीचें असेल त्या दर्जाचा व धर्तीचा लेखक व वाचक वर्ग त्यास लाभतो. ललित विषयावरील लेखक महाराष्ट्रांत बरेच झाले आहेत व त्यांचें प्रमाण व कसहि वाढत आहे. परंतु

तसें विद्वान् लेखकांचें नाहीं. जे विद्वान् आहेत ते आपआपल्या व्यवसायांत मग्न आहेत. ललित विषयावरील लेखकांना जितकी द्रव्यप्राप्तीची तीव्र अपेक्षा आहे तितकी यांना नाहीं व त्यांना तितक्या प्राप्तीचा संभवहि नाहीं. म्हणून कसलेले व प्रतिभावान् लेखक महाराष्ट्रीय विद्वानांत अत्यल्प आहेत. आतां कांहीं लोक स्वेच्छेनें लिहिलेले लेख भारदस्त मासिकाकडे आपण होऊन पाठवितात. पण त्यांत स्वीकारण्यासारखे फार थोडे असतात. तरी त्यांतून चांगले लेख निवडून काढण्याकरितां येतील ते लेख संपादकास वाचणें भाग पडतेंच. या लेखांचें आवकजावक सारखें चालतें व एका अंकांत जागेच्या मर्यादेप्रमाणें त्यांतील दोनचार लेख काढून घेतल्यानंतर बाकीचे पसंत लेख पुढील अनेक अंकांसाठीं जिम्मेदार संपादक क्रमवार लावून ठेवतो.

मासिकाचा काय किंवा वर्तमानपत्राचा काय, संपादक म्हटला कीं त्याला आपलें कार्य यशस्वी करावयाचें तर प्रत्यक्ष लेख लिहिण्यापेक्षां व्यवस्थेकडेच अधिक लक्ष पुरविलें पाहिजे. आपल्या मासिकाला चांगले लेख, कविता, कथा, लघुकथा यांचा पुरवठा सतत कसा होत राहील यावर दृष्टि ठेवून त्यानें होतकरू लेखकांना प्रोत्साहन देत आणि तयार व गुणी लेखकांना लगामीं लावीत राहिलें पाहिजे. हें घडवून आणण्याचे मार्ग अनेक आहेत. संपादकानें होतकरू लेखकास वाचनीय ग्रंथांचें साहित्य पुरवावें, त्यांना मार्गदर्शक सूचना कराव्या, लिहिलेले लेख तपासून त्यांतील गुणदोष दाखवावे. संपादक पुण्यासारख्या केंद्रस्थानीं असल्यास त्यानें असल्या लेखकांचा एक मेळाच बनवावा. तसेंच परगांवाहून विद्वान् लोक व नामांकित लेखक सुटींत पुण्यास येतात, त्यांस चहास किंवा अल्पोपहारास बोलावून त्यांजबरोबर स्नेह जोडावा. पुष्कळदां स्नेहानें जें कार्य होतें तें पैसे देऊनहि होत नाहीं, इतका स्नेहसंबंध जिव्हाळ्याचा असतो. त्या स्नेहसंबंधास वेतनाची जोड मिळाली म्हणजे सोन्याहून पिवळें झालें.

विद्वान् व नामांकित लेखक मासिकाचा वोज व लौकिक वाढवितात. असले लेखक हरप्रयत्नानें हस्तगत करण्यास संपादकाचे अंगीं चातुर्य, मनमिळाऊपणा, गोडवेपणा हे गुण अवश्य असावे लागतात. त्याशिवाय संपादक स्वतः विद्वान् व नाणावलेला लेखक पाहिजे; तरच त्याचें वजन बाहेरच्या लेखक वर्गावर पडतें. त्याच्या अभावीं बाहेरचा लेखक वर्ग डोईजड बनून संपादकाला तुच्छ लेखील.

मासिकाकडे जसे लेख, तशाच कविता व लघुकथाहि येतात. मासिक भारदस्त असलें तरी वाचकांच्या रुचिवैचित्र्याकडे लक्ष देऊन त्यांत कविता, लघुकथा, प्रवासवर्णनें इत्यादि सदरें ठेवावींच लागतात. सह्याद्रि मासिकानें 'कविता व लघुकथा' यांच्या परीक्षणाकरितां केसरीच्या संपादकांतून एक मंडळच नेमलें आहे. त्यांजकडे कविता व लघुकथा प्रत्येक खेपेला आठदहा अशा चार, आठ दिवसानीं पाठविण्यांत येतात. मंडळांतील सभासद त्यांजसंबंधीं वेगळ्या कागदावर व्यक्तिशः शेरे देतात व ते जबाबदार संपादकाकडे पाठवितात. आलेल्या कवितांतून व लघुकथांतून दहापैकीं एखादीच कविता व लघुकथा मासिकांत घेण्याच्या लायकीची आढळते. बहुतेक कवितांचे विषय शिळे, निर्जीव असून कवि पोरसौदा, प्रतिभाशून्य व संस्कारहीन असतो. लघुकथांची स्थिति तशीच. त्या भाषांतरित व चोरलेल्या दिसतात. पण अंकाची सजावट व होतकरूस उत्तेजन यावर नजर देऊन चांगल्या लेखांच्या पुण्याईवर खपून जातील अशा बेतानें त्यांची स्थापना करण्यांत येते.

कांहीं मासिकांतून महिन्यांतील राजकीय, सामाजिक, धार्मिक घडामोडीवर संपादकीय स्फुट विचार येतात. विविधज्ञानविस्तार व केरळ-कोकीळ यांची प्रसिद्धि ग्रंथपरीक्षणाबद्दल विशेष होती. हें सदर सर्व मासिकाचा व्याप किती वाढवावा यावर अवलंबून रहातें. त्याहि बाबतींत, रात्र

थोडीं व सोंगें फार असेंच घडतें. कारण मासिकाची वर्गणी ग्राहकांच्या आटोक्यांत रहाण्याकरितां पृष्ठसंख्या मर्यादित ठेवावी लागते व पृष्ठसंख्या मर्यादित ठेवली कीं मासिकाचा व्याप मर्यादित झालाच. तरीहि कित्येक मासिकें विशेषांक काढून आर्थिकदृष्ट्या धाडस करतातच. आक्टोबर १९३६ चा अंक सह्याद्रीनें शास्त्रीय म्हणून काढला. त्यांत महाराष्ट्रीय थोर शास्त्रज्ञांचे लेख नानाविध विषयांवर आले आहेत. त्यांत बनारस हिंदु युनिव्हार्सिटींतील गणिताचे मुख्याध्यापक व प्रसिद्ध रँगलर रा. वि. वा. नारळीकर यांचाहि लेख आहे. अशा अंकांनीं वाचकांना गहन विषयांची गोडी लागते व मासिकाची कीर्ति होते हाच फायदा. मासिकाचा व्याप वाढविलाच तर किती वाढतो याचें ठळक उदाहरण कलकत्त्याच्या 'मॉडर्न रिव्ह्यू'चें. मॉडर्न रिव्ह्यूच्या तोडीचें एकहि मासिक हिंदुस्थानांत नाहींच, पण पाश्चिमात्य देशांतहि फारच थोडीं सांपडतील. त्याची कीर्ति साऱ्या हिंदुस्थानांत तशी युरोप–अमेरिकेंतहि झाली आहे. त्याच्या लेखक वर्गांत हिंदुस्थानांतील प्रसिद्ध लेखक आहेत तसे युरोप-अमेरिकेंतीलहि आहेत. चांगल्या लेखकांना त्यांत आपला लेख प्रसिद्ध होण्यांत भूषण वाटतें. कारण तो लेख जगामधील हजारों निवडक व उच्च दर्जाच्या वाचकांच्या नजरेखालून जाऊन लेखकाच्या कीर्तींत भर पडते. हे लेख कांहीं लोक आपखुषीनें पाठवीत, पण इतर लेख लेखकांचा पिच्छा पुरवून व भीड घालून मिळवावे लागतात. दर अंकांत जगप्रसिद्ध व्यक्तींचे दोन–तीन तरी लेख आलेच पाहिजेत असा मॉडर्न रिव्ह्यूचे संपादक बाबू रामानंद चतर्जी यांचा पणच दिसतो. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मागें कामाचा लकडा किती असतो हें काय सांगावयास पाहिजे! परंतु राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष म्हणून आगगाडींतून सिंधच्या प्रवासास ते गेले असतां 'इन ए ट्रेन' (आगगाडींतून) या विषयावर आगगाडींत लिहिलेला लेखच त्यांनीं ता. १७ जुलै रोजीं कराची मेलमधून कलकत्त्यास पाठविला व तो ताबडतोब ऑगस्ट-

च्या अंकांत प्रसिद्ध झाला. कविवर्य रविंद्रनाथ टागोर यांचा इंग्रजी लेख किंवा त्यांनीं कधींकाळीं लिहिलेल्या बंगाली लेखाचें भाषांतर यापैकीं कांहींतरी प्रत्येक अंकांत द्यावयाचेंच. मासिकाची लोकप्रियता वाढविण्याची ही एक युक्ति आहे. त्याच्या लेखक वर्गांत इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स यांतील युरोपियन व अमेरिकन आहेत, तसेंच परदेशस्थ हिंदी गृहस्थ आहेत. त्यांचा ऑगस्ट १९३६ चा एकच अंक नमुन्याकरितां घेतला तर त्यांत प्रोफेसर सुलिव्हन लेव्ही यांचें चरित्र, कैलासपर्वताची यात्रा, अमेरिकेंतील वर्तमानपत्रें, पार्शी जातीचें संरक्षण, जातीय निर्णय ( रविंद्रनाथ टागोर यांनीं लिहिलेला ), हिंदुस्थान व जपान यांचा व्यापारी करार इत्यादि लेख प्रसिद्ध झाले आहेत व त्यांतील बहुतेक सर्व लेख अधिकारी लेखकांचे आहेत.

मॉडर्न रिव्ह्यूमधील अभिप्रायांची किंमत फार समजली जाते. त्याजकडे इंग्रजी, बंगाली, गुजराथी, मराठी, कानडी इत्यादि भाषातील ग्रंथ अभिप्रायाकरितां येतात व त्यांजवर त्या त्या भाषा जाणणाऱ्यांचे अभिप्राय मुद्दाम मागविण्यांत येतात. याचें कारण असें कीं मॉडर्न रिव्ह्यू इंग्रजी मासिक असल्यामुळें तें अखिल ब्रिटिश साम्राज्य, हिंदुस्थान, अमेरिका यांत फार मोठ्या प्रमाणांत प्रसार पावून त्यांतील अभिप्राय लाखों जणांच्या नजरेस पडतात. परदेशीय मासिकांतील व हिंदी मासिकांतील उतारे या सदराखालची माहिती अगदीं निवडक व फार उपयुक्त असते. मासिककर्त्याच्या स्फुट सूचना मोठ्या मार्मिक, खुबीदार व व्यापक असतात. ह्यांत जगांतील सर्व देशांच्या घडामोडींचा परामर्श घेण्यांत येतो. कित्येक लेखांचीं भाषांतरें देशी पत्रकारांनीं छापावीं किंवा त्यांच्या आधारावर स्वतंत्र लेख लिहावे इतकी त्यातील माहिती विश्वसनीय व नाविन्यपूर्ण वाटते. कित्येक स्फुट सूचनांमधीलें माहिती जशीच्या तशी इतरांनीं प्रसिद्ध केली तरी चालते.

बंगाली चित्रकला, बंगाली साहित्य यांची प्रसिद्धी इंग्रजींतून करणें व त्यास उत्तेजन देणें हें मॉडर्न रिव्ह्यूचें ब्रीदच आहे. जगांत जेथें युद्ध चालू असेल किंवा महत्त्वाचा प्रसंग घडला असेल तेथील देखावे इतर मासिकांतून शोधपूर्वक काढून किंवा तेथून आणवून मॉडर्न रिव्ह्यू प्रसिद्ध करतो. हें सर्व कार्य अत्यंत परिश्रमाचें, जिकिरीचें व प्रत्यहीं उरकण्याचें आहे. अशा मजकुरानें भरलेलीं सुमारें सवाशें पानें मॉडर्न रिव्ह्यू दर अंकाला आपल्या वाचकांना पुरवितो. हा उद्योग मुख्य संपादक बाबू रामानंद चतर्जी यांच्या मदतीस पांच–सहा उपसंपादक असल्यावांचून पार पडावयाचा नाहीं.

मॉडर्न रिव्ह्यू झाला तरी हिंदुस्थानांत हिंदी लोकांनीं चालविलेला. जगाचें राजकारण, समाजकारण, धर्मकारण व उद्यमकारण युरोप व अमेरिका येथें शिजतें व त्यांचे पूर पूर्वेकडे वहात येतात. त्याचें ज्ञान ज्यांना आजतागायत आहे असे लोक युरोपांतच सांपडावयाचे व त्यांचा लाभ तिकडील मासिकांना व इतर नियतकालिकांनाच व्हावयाचा. यामुळें पाश्चिमात्य मासिकांवर हिंदी वाचकांच्या उड्या पडतात व त्यांतूनच त्यांना पश्चिमेकडील हालचालींचें मर्म समजतें. पाश्चिमात्य मासिकांचे संपादकहि त्याजवर जनतेनें टाकलेल्या विश्वासास पात्र राहून आपलें काम चोख व वक्तशीर बजावतात. त्यांतील लेखक त्या त्या विषयांत मुरलेले विद्वान् व पूर्ण माहितगार असल्यामुळें ते आपल्या विषयाचा व्यापक रीतीनें व खोल विचार करून सदर विषय वाचकांपुढें मांडतात. या दृष्टीनें राउंड टेबल, काँटेंपररी रिव्ह्यू, करंट हिस्टरी, पोलिटिकल सायन्स, फॉरिन अफेअर्स इत्यादि नियतकालिकें प्रमाणभूत मानलीं जातात. तीं वाचलीं म्हणजे युरोपच्या राजकारणाची तळची माहिती हिंदी वर्तमानपत्रकारांना व मासिककारांना समजते. त्यांचा आधार लेखांना मिळतो व त्यावरून मतेंहि बनवितां येतात. वर्तमानपत्राप्रमाणें मासिकांतहि भारदस्त व रंगेल, स्त्रियांचे व मुलांचे,

हरहुन्नरीचे व उद्योगधंद्यांचे असे कितीतरी वर्ग पडतात व तशीं मासिकें पाश्चिमात्य देशांत जितक्या प्रमाणांत आहेत त्यापेक्षां कमी प्रमाणांत महाराष्ट्रांतहि आहेत. त्यांपैकीं भारदस्त मासिकांविषयीं बोलावयाचें तर भारदस्त वर्तमानपत्राचा संपादक जनतेचा गुरु किंवा मार्गदर्शक म्हटल्यास मासिकाचा संपादक गुरूंचा गुरु किंवा मार्गदर्शकांचा मार्गदर्शक समजण्यांत अवास्तविक असें कांहीं नाहीं. म्हणून मासिकाच्या संपादकांत वर्तमानपत्रकाराचे कांहीं गुण पाहिजेतच, पण त्याहिपेक्षां आणखी कित्येक गुण पाहिजेत. त्याला शिक्षण चांगलें मिळालेलें पाहिजेच, पण खेरीज, तीक्ष्ण अवलोकन, भोंवतालीं घडणाऱ्या कृत्यांची व हालचालींची ओळख, वाङ्मयात्मक व कलात्मक कौशल्य, भिन्न भिन्न क्षेत्रांत लायक लेखक व कलावंत निवडून काढण्याचें सामर्थ्य, समयज्ञता, तारतम्य आणि जगाचा सर्वसामान्य परिचय याची जोड त्यास अवश्य हवी. यालाच इंग्रजींत Flair म्हणतात. संपादक या दृष्टीनें विशिष्ट शास्त्राची तज्ज्ञता ही पात्रता नव्हे; केवळ वाङ्मयाचें ज्ञान, कलेचें ज्ञान किंवा समाजाचें ज्ञान हाहि गुण नव्हे. त्यानें केवळ चालू अंकाचा विचार न करतां पुढील महिन्यांचे अंक नजरेपुढें ठेऊन त्या अंकांना जे विषय उचित ठरतील, मग ते गंभीर असोत, रंगेल असोत वा उपदेशपर असोत, त्यांवरील लेख चांगल्या लेखकांकडून संपादन करण्याच्या तजविजीस आगाऊ लागावें.

मासिकाचा संपादक व मासिकांतील बाहेरचे लेखक यांच्या लेखांचें तेज केवळ वेठ वळण्यानें केव्हांहि पडणार नाहीं. त्यांनीं विषय आत्मसात् करून आपल्या खऱ्या भावना व खरीं मतेंच त्यांत प्रतिपादावीं. विशिष्ट प्रकारच्या विचारांत रंगल्यावरच लेखकास कांहीं नवीन विचार सुचतात व नवे अनुभव येतात. ते जगास सांगण्याकरितां लिहिणें याचेंच नांव जिवंत वाङ्मय. लेख, लेखक व वाचक हीं परस्परावलंबी

होत. केवळ लेख लिहून त्यावर लेखकानें आपलें नांव घातलें म्हणून लेखकाला सत्कीर्ति लाभत नाहीं. सत्कीर्ति लाभण्याला लेखकापाशीं व्यक्तित्व पाहिजे. तो स्वतः कोणीतरी असला पाहिजे. लेख तर्कप्रतिष्ठित असावा व त्यांतून कांहीं अनुमानें निघावीं. तो मनोरंजक केलेला असावा व मनोरंजनाकरितां गोष्टीचाहि आश्रय करण्यास हरकत नाहीं. लेखकाची आकांक्षा, लेखरूपानें, कांहीं बाहेर काढण्याची, शोध लावण्याची असावी.

# प्रकरण एकोणिसावें

# कायद्यांचीं बंधनें

वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकें व तीं ज्यांत छापावयाचीं ते छापखाने यांना खालील कायद्यांचें ज्ञान अगदीं आवश्यक आहे. अथवा तो कायदा त्यांच्या पांचवीलाच पुजला, असेंहि म्हंटलें असतां चालेल.

**छापखाना व पुस्तकें नोंदण्याचा कायदा**

( दि प्रेस अँड रेजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट सन १८६७ ता. १ जुलई १९२२ पर्यंत केलेल्या दुरुस्तीसह. )

३ ब्रिटिश हिंदुस्थानांत छापलेल्या प्रत्येक पुस्तकावर व वर्तमानपत्रावर मुद्रक, मुद्रणस्थान, प्रकाशक व प्रकाशनस्थान यांचीं नांवें असावीं.

४ ज्या मॅजिस्ट्रेटाच्या हद्दींत छापखाना काढावयाचा असेल त्या मॅजिस्ट्रेटापुढें छापखाना बाळगणारानें पुढीलप्रमाणें प्रतिज्ञा ( डिक्लेरेशन ) केली पाहिजे.

"मी 'क्ष' असें जाहीर करतों कीं माझा छापखाना अमूक ठिकाणीं आहे."

ज्या ठिकाणीं छापखाना असेल त्या ठिकाणाचें बरोबर वर्णन दिलें पाहिजे.

५ ब्रिटिश हिंदुस्थानांत प्रकाशित करावयाच्या वर्तमानपत्रानें खालील नियम पाळले पाहिजेत.

( १ ) वर्तमानपत्राच्या प्रत्येक प्रतीवर संपादकाचें नांव पाहिजे.

( २ ) प्रत्येक नियतकालिकाचा प्रकाशक व संपादक यानें तो ज्याच्या हद्दींत नियतकालिक काढणार असेल त्या जिल्हा, प्रेसिडेन्सी अगर सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेटापुढें हजर राहून खालील प्रकारें प्रतिज्ञा ( डिक्लेरेशन ) केली पाहिजे; त्या प्रतिज्ञेच्या दोन प्रती असाव्या.

" मी......जाहीर करतों कीं मी (वर्तमानपत्राचा) मुद्रक ( किंवा प्रकाशक किंवा मुद्रक व प्रकाशक ) असून त्याचें नांव......आहे व तें ( वर्तमानपत्र )......ठिकाणीं छापलें ( किंवा प्रकाशित केलें किंवा छापलें व प्रकाशित केलें ). ज्या जागीं वर्तमानपत्र छापलें व प्रकाशित केलें असेल त्या जागेचें बिनचूक व पूर्ण वर्णन द्यावें.

( ३ ) छापण्याचें अगर प्रकाशनाचें स्थळ जेव्हां जेव्हां बदलेल तेव्हां तेव्हा नवी प्रतिज्ञा करावी लागेल.

( ४ ) मुद्रक अगर प्रकाशक ब्रिटिश हिंदुस्थान सोडून जेव्हां जेव्हां जाईल तेव्हां तेव्हां दुसऱ्या मुद्रकानें अगर प्रकाशकानें प्रतिज्ञा केली पाहिजे.

(जो इसम वयात आला नाहीं त्याला प्रतिज्ञा करतां येणार नाहीं.)

६ प्रत्येक प्रतिज्ञेच्या दोन प्रती असून ज्या मॅजिस्ट्रेटापुढें प्रतिज्ञा केली असेल त्यानें त्या प्रत्येक प्रतीवर सही केली पाहिजे.

त्या दोन प्रतींपैकीं एक प्रत मॅजिस्ट्रेटापाशीं रहावी व दुसरी हाय-कोर्टाच्या दप्तरीं रहावी.

ती प्रत एक रुपया फी दिली असतां कोणासहि पहावयास मिळेल व दोन रुपये फी भरली असतां तिची नक्कलहि मिळेल.

७ मुद्रक अगर प्रकाशक यांचे बाबतींत कांहीं कायदेशीर इलाज करावयाचा असेल तेव्हां प्रतिज्ञापत्राची नक्कल हा पुरावा पुरेसा आहे.

८ ज्या मनुष्यानें मुद्रक अगर प्रकाशक म्हणून मॅजिस्ट्रेटापुढें प्रतिज्ञा ( डिक्लेरेशन ) केली असेल त्यानें कोणाहि मॅजिस्टेटापुढें खालील प्रतिज्ञा करावी.

"मी 'क्ष' जाहीर करतों कीं मी......वर्तमानपत्राचा मुद्रक ( किंवा प्रकाशक किंवा मुद्रक व प्रकाशक ) आतां नाहीं."

या प्रतिज्ञेच्या दोन प्रती असून त्या प्रत्येकीवर मॅजिस्टेटानें सही-शिका करावा.

हेंहि प्रतिज्ञापत्र कोणास पहावयाचें असल्यास किंवा त्याची नक्कल करून घ्यावयाची असल्यास त्यांस तें सर्व कलम ६व७ यांत सांगितल्या-प्रमाणें करतां येईल.

९ छापील पुस्तकाच्या प्रती, त्यांत नकाशे असतील तर त्यासुद्धां, मुद्रकानें स्थानिक सरकारानें गॅझेटांत ज्याकडे द्यावयास सांगितलें असेल त्यास खालीलप्रमाणें मोफत द्याव्या.

( अ ) पुस्तक प्रसिद्ध केल्यापासून एका महिन्यांच्या आंत एक प्रत पाठवावी.

( ब ) पुस्तक प्रसिद्ध केल्यापासून एक वर्षाच्या आंत स्थानिक सरकारास जरूर वाटल्यावरून स्थानिक सरकारचें लिहून आल्या-नंतर एक महिन्याच्या आंत दोहोंहून अधिक नाहींत इतक्या प्रती मुद्रकानें अधिकाऱ्याकडे पाठवाव्या. स्थानिक सरकारानें एक सांगितली असली तर एक, दोन सांगितल्या असल्या तर दोन पाठवाव्या.

या प्रती इतर प्रतीइतक्याच चांगल्या व चांगल्या कागदावर छापलेल्या असाव्या.

वरील पुस्तकाची नवी आवृत्ति मूळच्या मजकुरांत कांहींहि फेरबदल न करतां काढल्यास तिला व कायद्याचें कलम ५ प्रमाणें प्रका-शित केलेल्या वर्तमानपत्रास प्रस्तुत कलमांतील वरील भाग लागू नाहीं.

१० ज्या अधिकाऱ्याकडे पुस्तकाची प्रत दिली असेल त्यानें मुद्रकास पावती द्यावी.

११ कलम ९ मधील पहिल्या परिच्छेदांत सांगितल्याप्रमाणें जी प्रत देण्यांत आली असेल तिची स्थानिक सरकार सांगेल तशी व्यवस्था लावण्यांत यावी. कलम ९ मधील 'ब' भागांत उल्लेखलेली प्रत अगर प्रती ब्रिटिश म्यूझियम अगर भारतमंत्री यांजकडे अगर दोघांकडे पाठविण्यांत येतील.

११ अ—ब्रिटिश इंडियांतील प्रत्येक वर्तमानपत्राच्या मुद्रकानें स्थानिक सरकार गॅझेटांत प्रसिद्ध करील त्या अधिकाऱ्याकडे आपल्या पत्राच्या प्रत्येक अंकाच्या दोन प्रती त्या प्रसिद्ध होतांच तावडतोब मोफत पाठविल्या पाहिजेत.

## शासन

१२ या कायद्याच्या ३ ऱ्या कलमांत सांगितलें आहे त्यास अनुसरून न वागतां जर कोणी एखादें पुस्तक अगर वर्तमानपत्र छापील अगर प्रसिद्ध करील तर त्याजविरुद्ध मॅजिस्ट्रेटापुढें काम चालून तसें सिद्ध झाल्यास त्याला दोन हजार रुपयांहून जास्त नाहीं इतका दंड किंवा सहा महिन्यांहून अधिक नाहीं इतका साधा तुरुंगवास किंवा दोनहि अशी शिक्षा होईल.

१३ या कायद्याच्या ४ थ्या कलमांत सांगितलें आहे त्यास अनुसरून न वागतां जर कोणी एखादा छापखाना ठेवील तर त्याजवर मॅजिस्ट्रेटापुढें काम चालून तसें सिद्ध झाल्यास त्याला दोन हजार रुपयांहून जास्त नाहीं इतका दंड किंवा सहा महिन्यांहून अधिक नाहीं इतका साधा तुरुंगवास किंवा दोनहि अशी शिक्षा होईल.

१४ जो कोणी या कायद्याप्रमाणें मॅजिस्ट्रेटापुढें प्रतिज्ञा करीत असतां जी खोटी आहे किंवा जी खोटी असल्याचें ज्ञान अगर विश्वास आहे अशी माहिती देईल त्याजवर मॅजिस्ट्रेटापुढें काम चालून तसें सिद्ध झाल्यास

त्याला होन हजार रुपयांहून अधिक नाहीं इतका दंड किंवा सहा महिन्यांहून अधिक नाहीं इतका तुरुंगवास अशी शिक्षा होईल.

१५ या कायद्यांत सांगितलें आहे त्या नियमास अनुसरून न वागतां जो कोणी एखादें वर्तमानपत्र ( संपादील ) छापील किंवा प्रकाशित करील किंवा दुसऱ्याकडून संपादन करवील, छापवील किंवा प्रसिद्ध करवील, त्याजवर मॅजिस्ट्रेटापुढें काम चालून तसें सिद्ध झाल्यास त्याला दोन हजारांहून अधिक नाहीं इतका दंड किंवा सहा महिन्यांहूनहि अधिक नाहीं इतका तुरुंगवास किंवा दोनहि अशी शिक्षा होईल.

१६ या कायद्याच्या ९ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें एखादा मुद्रक आपल्या पुस्तकाच्या प्रती ठरलेल्या अधिकाऱ्याकडे पाठविण्यास चुकेल तर अशा प्रत्येक चुकीबद्दल त्याला ५० रुपयांहून अधिक नाहीं इतका दंड, सदर अधिकाऱ्याकडून त्या हद्दीवरच्या मॅजिस्ट्रेटाकडे लिहून आलें असतां करण्याची अखत्यारी आहे. त्याशिवाय प्रत्येक प्रतीची किंमतहि मॅजिस्ट्रेट मुद्रकाला द्यावयास सांगेल.

हाच नियम नकाशे वगैरे इतर छापील वाङ्मयासहि लागू आहे. या कायद्याच्या ११ अ कलमाप्रमाणें वागण्यास जो वर्तमानपत्राचा मुद्रक चुकेल त्यालाहि हा नियम लागू आहे.

१७ दंडाची रक्कम वसूल करण्याची व्यवस्था मॅजिस्ट्रेटानें क्रि. प्रो. कोडप्रमाणें करावी. हे दंड वसूल केल्यानंतर त्यांची विल्हेवाट स्थानिक सरकार वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें लावावी.

---

वर्तमानपत्रकर्त्यांच्या डोक्यावर जे कायदे लटकत ठेवले आहेत व ज्यांच्याकडे पाहून त्यांनीं आपलें कर्तव्य बजावलें पाहिजे त्यांपैकीं कांहीं कायद्यांचीं कलमें येथें दिलीं आहेत.

## राजद्रोहाचा कायदा

इं. पि. को. कलम १२४ अ—जो कोणी लेखांतील अगर भाषणां-

तील शब्दांनीं किंवा चिन्हानीं किंवा दृश्य कृतींनीं ( Representations ) किंवा इतर रीतीनें बादशहाविरुद्ध अगर ब्रिटिश हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या सरकाराविरुद्ध द्वेष किंवा तिटकारा उत्पन्न करील किंवा अप्रीति उत्पन्न करील किंवा अप्रीति उत्पन्न करण्याचा प्रयत्न करील त्याला जन्मठेप काळेपाणी किंवा त्यापेक्षां कमी मुदतीचें काळेपाणी व दंड किंवा तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास व दंड होईल.

खुलासा १—अप्रीति या शब्दांत अराजनिष्ठा व शत्रुत्वभाव यांचा समावेश होतो.

खुलासा २—सरकारी उपाययोजनेंत कायदेशीर साधनांनीं फेरफार घडवून आणण्याच्या उद्देशानें जर सरकारी कृत्यावर नापसंतीदर्शक टीका करण्यांत येईल व त्या टीकेपासून द्वेष, तिटकारा अगर अप्रीति उत्पन्न होणार नसेल तर ती टीका वरील कलमाखालीं गुन्ह्याच्या स्वरूपाची समजली जाणार नाहीं.

खुलासा ३—सरकारच्या राज्यकारभारविषयक अगर दुसऱ्या एखाद्या कृत्याविषयीं नापसंतीदर्शक ( Disapprobation ) टीका केली असेल व त्या टीकेपासून सरकाराविषयीं द्वेष, तिटकारा अगर अप्रीति उद्भवणार नसेल तर सदर टीका वरील कलमाखालीं गुन्ह्याच्या स्वरूपाची समजली जाणार नाहीं.

कलम १५३ अ—जो कोणी लेखांतील अगर भाषणांतील शब्दांनीं, किंवा चिन्हांनीं किंवा दृश्य कृतींनीं ( Representations) किंवा इतर रीतीनें बादशहाच्या प्रजाजनांपैकीं भिन्न भिन्न वर्गांत शत्रुत्वाचे किंवा द्वेषाचे विकार वाढवील ( Promotes ) किंवा वाढविण्याचा प्रयत्न करील त्याला दोन वर्षांपर्यंत तुरुंगवासाची किंवा दंडाची किंवा दोनहि प्रकारची शिक्षा होईल.

## कोर्टांच्या बदनामीचा कायदा

( १ ) हायकोर्टाच्या ताब्यांत जीं खालचीं कोर्टें आहेत त्या कोर्टांची बदनामी कोणी केल्यास, स्वतःची बदनामी केली असतां शासन करण्याचा जो अधिकार हायकोर्टांना आहे तोच अधिकार या कायद्यानें हायकोर्टांना देण्यांत आला आहे.

हायकोर्टाप्रमाणें चीफ कोर्टांनाहि सदर अधिकार देण्यांत आला आहे.

इंडियन पीनल कोडान्वयें ज्या गुन्ह्याबद्दल शासन करण्याचा अधिकार खालच्या कोर्टांना आहे त्या गुन्ह्याच्या बाबतींत हायकोर्ट लक्ष घालणार नाहीं.

## हिंदी संस्थानांसंबंधाचा कायदा

हिंदी संस्थानांचें अप्रीतीपासून संरक्षण करण्यासाठीं हा कायदा करण्यांत आला आहे.

३ कलम ( १ ) जो कोणी एखादा मजकूर संपादन करील ( Edit ), छापील अगर प्रकाशित करील अगर पुस्तकाचा, वर्तमानपत्राचा अगर दुसऱ्या एखाद्या दस्तऐवजाचा ( Document ) कर्ता असेल व त्यापासून हिंदुस्थानांतील कोणी राजा, किंवा संस्थानिक किंवा त्याचें सरकार किंवा त्याचा राज्यकारभार याविषयीं द्वेष, किंवा तिरस्कार उत्पन्न करण्याचा हेतु असेल किंवा अप्रीति उत्पन्न होणार असेल किंवा अप्रीति उत्पन्न करण्याचा हेतु असेल तर असा मनुष्य पांच वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही भोगण्यास पात्र होईल.

( २ ) परंतु सदर मनुष्याचा हेतु पुस्तक, वर्तमानपत्र अगर दस्तऐवज यांच्या बाबतींत राजा, संस्थानिक, त्याचें सरकार किंवा राज्यकारभार याविषयीं नापसंती दर्शविण्याचा असला, पण त्या बरोबरच कायदे-

शीर उपायांनीं त्यांत बदल करण्याचा असला तर तो या कलमाखालीं गुन्हा होणार नाहीं.

## अब्रूनुकसानीचा कायदा

इं. पि. को. कलम ४९९—जो कोणी तोंडानें उच्चारलेल्या शब्दांनीं किंवा वाचण्याकरितां लिहिलेल्या शब्दांनीं किंवा चिन्हांनीं किंवा दृश्य कृतींनीं ( Representations ) एखाद्या व्यक्तीला दुखविण्याकरितां विधान करतो किंवा एखाद्या व्यक्तीच्या लौकिकाला कमीपणा येईल हें माहीत असून विधान करतो त्यानें सदर व्यक्तीची अब्रूनुकसानी केली असें समजावें.

खुलासा १—एखादा मनुष्य जिवंत असतां त्याच्या संबंधानें केलेल्या ज्या विधानानें ( Imputation ) त्याची अब्रूनुकसानी झाली असती तें विधान तो मेल्यानंतर केलें तरी त्याची अब्रूनुकसानी झाली असें समजावें. तसेंच सदर विधान मृताच्या कुटुंबांतील माणसाचीं अगर इतर आप्तवर्गाचीं मनें दुखविण्याच्या उद्देशानें केलें असलें तरी त्यामुळें अब्रूनुकसानीचा गुन्हा घडला असें समजावें.

खुलासा २—अशा प्रकारचें विधान एखादी मंडळी ( Company ) अगर संस्था ( Association ) अगर व्यक्तिसमूह यांच्या संबंधानें केलें असलें तरी तो अब्रूनुकसानीचाच गुन्हा समजावा.

खुलासा ३—अशा प्रकारचें विधान निराळ्या रीतीनें केलें असलें किंवा उपरोधिक असलें तरी तें अब्रूनुकसानकारकच समजावें.

खुलासा ४—जें विधान इतर लोकांच्या दृष्टीनें प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें सदर मनुष्याची किंमत नैतिक अगर बौद्धिक दृष्ट्या कमी करणारें नसेल, त्याच्या जातीच्या अगर धंद्याच्या लोकांत त्या मनुष्याच्या चारित्र्यास कमीपणा आणणारें नसेल अगर त्या मनुष्याचें शरीर दूषित स्थितींत ( Loathsome state ) किंवा लाजिरवाण्या

स्थितींत ( Disgraccful ) असल्याविषयीं समज करून देणारें नसेल तर त्यामुळें अब्रूनुकसानीचा गुन्हा होणार नाहीं.

**दि इंडियन प्रेस ( इमर्जन्सी पॉवर्स ) ॲक्ट**

कलम ३—( १ ) सन १८६७ सालीं प्रेस ॲंड रेजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट झाला. त्या कायद्याच्या चौथ्या कलमान्वयें मनुष्याला आपण छापखान्याबद्दल जबाबदार आहों असें मॅजिस्ट्रेटपुढें लेखी कळवावें लागतें. तसें ज्यानें कळविलें आहे त्याजपासून मॅजिस्ट्रेट हा कळविल्यानंतर दहा दिवसांच्या आंत त्या मनुष्याला अनामत रक्कम ठेवण्यास भाग पाडील व त्याबद्दल कारणेंहि देईल. ही रक्कम एक हजार रुपयांहून जास्ती असणार नाहीं. ही रक्कम त्यानें रोख ठेवावी किंवा त्याऐवजीं हिंदुस्थान सरकारच्या प्रॉमिसरी नोटा ( सिक्यूरिटीज ) ठेवाव्या.

पूर्वीं छापखानदारापासून ( कीपरपासून ) जर तिसऱ्या पोट-कलमान्वयें अनामत रक्कम घेतली असेल तर आतां तीन हजारापर्यंतहि जामीन रक्कम मागतां येईल.

( २ ) पोटकलम १ प्रमाणें जामीन रक्कम ठेवून तीन महिने झाल्यावर स्थानिक सरकाराकडून या बाबतींत कांहीं हुकूम आला नसेल तर छापखानदारानें अर्ज केला असतां त्याची अनामत रक्कम त्यास परत मिळेल.

( ३ ) एखाद्या छापखान्यापासून अनामत रक्कम घेतली नसेल किंवा घेतलेली रक्कम तीन महिन्यांनीं परत केली असेल तर सदर छाप-खान्यांत छापलेल्या वर्तमानपत्रांत, पुस्तकांत अगर दस्तऐवजांत आक्षे-पार्ह मजकूर प्रसिद्ध झाल्यास त्याजपासून पांचशें ते तीन हजार रुपया-पर्यंत स्थानिक सरकार जामीन मागेल.

( ४ ) जामीनाबद्दलची समज दिल्यापासून दहा दिवसांच्या आंत अनामत रक्कम भरावी लागेल.

कलम ४—( १ ) ज्या छापखान्यापासून जामीन घेतला आहे त्या छापखान्यांतून प्रसिद्ध झालेल्या वर्तमानपत्रांत, पुस्तकांत अगर दस्त-ऐवजांत ( अ ) खून अगर अत्याचारासारखा कॉग्निझेबल गुन्हा यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष फूस अगर उत्तेजन देणारा किंवा उत्तेजन देण्या-सारखा मजकूर आला असेल, ( ब ) अशा गुन्ह्याबद्दल प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष पसंती दर्शविली असेल किंवा प्रशंसा केली असेल, ( क ) अंम-लदार, सैनिक, खलाशी, लष्करी, नाविक किंवा हवाई खात्यांतील विमान-वाला यांना प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें फितविण्याचा प्रयत्न केला असेल, ( ड ) बादशहा, सरकार, सरकाराचें न्यायखातें, इंग्रज सरकारा-च्या प्रजाजनांपैकीं एखादा वर्ग यांजविषयीं द्वेष वा तिरस्कार उत्पन्न कर-ण्याचा प्रयत्न केला असेल, ( इ ) एखाद्या मनुष्याला भीति घालून किंवा त्रास देऊन त्याला आपल्याजवळचा जिन्नस दुसऱ्यास देण्यास बेकायदे-शीर रीतीनें भाग पाडलें असेल किंवा जें कृत्य कायदेशीर रीतीनें त्यास करतां येण्यासारखें आहे तें न करण्यास लावलें असेल, ( फ ) राज्य-कारभारविषयक गोष्टींत एखाद्या मनुष्यास ढवळाढवळ करण्यास, गुन्हा करण्यास, सरकारी जमीनमहसूल, कर किंवा दुसरें सरकारी अगर स्थानिक स्वराज्याचें देणें न देण्यास किंवा देण्याचें लांबणीवर टाकण्यास उत्तेजन दिलें असेल, ( ग ) सरकारी अगर स्थानिक स्वराज्याच्या नोकरास आपलें काम न करण्यास, अगर करण्याचें लांबणीवर टाकण्यास किंवा कामाचा राजीनामा देण्यास मन वळाविलें असेल, ( ह ) ब्रिटिश सरकार-च्या प्रजाजनांपैकीं भिन्न भिन्न वर्गांत द्वेष अगर शत्रुत्व याची भावना वाढ-विली असेल, ( क्ष ) ब्रिटिश सरकारच्या फौजेंतील अगर पोलिस खात्यांतील नोकरी धरण्यास जाणाऱ्या मनुष्याचें मन बिघडविलें असेल, तर स्थानिक सरकारानें छापखानदाराला लेखी समज देऊन कोणत्या शब्दांनीं, चिन्हांनीं अगर दृश्य कृत्यांनीं वरीलपैकीं गोष्ट त्याजकडून

घडली असेल हें कळवावें व ठेवलेली अनामत रक्कम जप्त झाल्याचें जाहीर करावें. आणि अनामत रक्कम ठेवली नसल्यास छापखाना जप्त झाल्याचें, तसेंच वर्तमानपत्राच्या, पुस्तकाच्या किंवा दस्तऐवजाच्या सर्व प्रती जप्त झाल्याचें जाहीर करावें.

( २ ) पोटकलम १ खालील समज दिल्यापासून दहा दिवसांची मुदत संपल्यावर १८६७ च्या कायद्याप्रमाणें केलेलें प्रातिज्ञापत्र (डिक्लेरेशन) रद्द झालें असें समजण्यांत येईल.

कलम ५—( १ ) कलम ४ अगर ६ अन्वयें छापखान्यानें ठेवलेली अनामत रक्कम जप्त झाल्याचें जाहीर करण्यांत आल्यावर सदर छापखान्यासंबंधानें जो कोणी १८६७ च्या कायद्याप्रमाणें नवीन प्रतिज्ञापत्र करील त्याला १ ते १० हजारापर्यंत रक्कम अनामत ठेवण्यास मॅजिस्ट्रेट सांगेल.

( २ ) पूर्वीच्या अनामत रकमेपैकीं जर कांहीं रक्कम जप्त करण्यांत आली नसेल तर ती नवीन अनामत ठेवण्याच्या रकमेंत समाविष्ट करतां येईल.

कलम ६—( १ ) कलम ५ प्रमाणें नवी अनामत रक्कम ठेवल्यावर सदर छापखान्याकडून पूर्वीसारखाच गुन्हा घडला तर नवी रक्कम व वर्तमानपत्र, पुस्तक अगर इतर दस्तऐवज सरकारजमा केल्याचें स्थानिक सरकारानें जाहीर करावें.

( २ ) वरील समज (नोटीस) देऊन दहा दिवस झाल्यावर नवें प्रतिज्ञापत्र ( डिक्लेरेशन ) रद्द होईल.

कलम ७—( १ ) कोणाहि वर्तमानपत्राच्या प्रकाशकाला १८६७ च्या कायद्याप्रमाणें आपण प्रकाशक असल्याचें मॅजिस्ट्रेटापुढें जाहीर करावें लागेल. त्यावेळीं मॅजिस्ट्रेटानें जरूर वाटल्यास कारणें नमूद करून

सदर प्रकाशकास एक हजाराहून अधिक नाहीं इतकी रक्कम अनामत ठेवण्यास फर्मावावें व त्यास दहा दिवसांची मुदत द्यावी.

( २ ) पोट कलम २ प्रमाणें पूर्वी जामीन घेतला असेल तर नवा जामीन तीन हजार रुपयांपर्यंत घेण्यास हरकत नाहीं. वरील प्रमाणें अनामत रक्कम ठेवल्यावर तीन महिन्यांत स्थानिक सरकाराकडून कांहीं हुकूम न आल्यास अनामत रक्कम प्रकाशकानें अर्ज करून परत घ्यावी.

( ३ ) ज्या वर्तमानपत्राच्या प्रकाशकाकडून अनामत रक्कम घेतली नसेल किंवा घेतलेली परत केली असेल त्याजपासून, स्थानिक सरकारानें जरूर वाटल्यास, आक्षेपार्ह मजकुराबद्दल पांचशें ते तीन हजार रुपयांपर्यंत अनामत रक्कम मागावी.

( अ ) ती भरण्यास दहा दिवसांची मुदत द्यावी.

कलम ८—कलम ७ प्रमाणें ज्या वर्तमानपत्रापासून जामीन घेतला असेल त्या वर्तमानपत्रांत आक्षेपार्ह मजकूर आल्यास ती जामीन-रक्कम जप्त केल्याचें सरकारानें जाहीर करावें व त्या वर्तमानपत्राच्या प्रती जप्त कराव्या.

जामीन-रक्कम जप्त केल्याची समज ( नोटीस ) दिल्यापासून दहा दिवस झाल्यावर सन १८६७ च्या रेजिस्ट्रेशन ॲक्टाप्रमाणें प्रकाशकानें केलेलें प्रातिज्ञापत्र ( डिक्लेरेशन ) रद्द करण्यांत यावें.

कलम ९—कलम ८ अन्वयें जामीन-रक्कम जप्त केल्यावर जो कोणी प्रकाशक नवें प्रतिज्ञापत्र (डिक्लेरेशन) त्या पत्रासंबंधानें किंवा त्याच धर्तीच्या दुसऱ्या पत्राचें प्रतिज्ञापत्र (डिक्लेरेशन) करावयास येईल तर त्याजपासून एक हजारापासून दहा हजारापर्यंतचा जामीन मॅजिस्ट्रेटानें मागावा.

( २ ) पूर्वीच्या जामिनकीपैकीं कांहीं रक्कम जप्त केलेली नसल्यास ती रक्कम नव्या रकमेंत भरतीला धरून घेण्यांत येईल.

कलम १०—कलम ९ अन्वयें वर्तमानपत्राकडून जामीन-रक्कम

घेतल्यावर स्थानिक सरकारास आक्षेपार्ह मजकुरावरून पूर्वींची सर्व जामीन-रक्कम किंवा त्या रकमेचा भाग जप्त करतां येईल.

( २ ) त्या वर्तमानपत्राचें प्रतिज्ञापत्र ( डिक्लेरेशन ) रद्द होईल व नवीन प्रतिज्ञापत्र ( डिक्लेरेशन ) स्थानिक सरकारच्या परवानगीवांचून प्रकाशकाला करतां येणार नाहीं.

कलम ११—( १ ) स्थानिक सरकार अगर मॅजिस्ट्रेट यांनीं जामीन रक्कम मागितली असतां जो कोणी ती रक्कम न भरतां पुस्तकें अगर वर्तमानपत्रें छापण्याकरितां आपला छापखाना ठेवील तो प्रतिज्ञापत्र ( डिक्लेरेशन ) न केल्याचा १८६७ च्या कायद्यान्वयें जो गुन्हा घडतो त्या गुन्ह्यास पात्र होईल.

( २ ) जो कोणी ७ अगर ९ कलमाखालीं जामीन-रक्कम मागितली असून ती न भरतां वर्तमानपत्र प्रकाशित करील तोहि वरील गुन्ह्यास पात्र होईल.

कलम १२—(१) कलम ३ अन्वयें ज्या छापखानदारापासून जामीन मागितला असेल त्यानें जामीन-रक्कम न भरल्यास त्याला आपला छापखाना, वर्तमानपत्र, पुस्तक किंवा इतर दस्तऐवज छापण्यासाठीं वापरतां येणार नाहीं. तसेंच कलम ५ अन्वयें छापखानदारापासून ( Keeper ) जामीन मागितला असून त्यानें जामीन-रक्कम भरली नसल्यास त्यालाहि छापखान्याचा उपयोग करतां येणार नाहीं.

( २ ) पोट कलम १ चा भंग करून म्हणजे जामीन-रक्कम न भरतां जो कोणी छापखाना चालवील त्याचा छापखाना जप्त करण्यांत येईल.

( ३ ) जो प्रकाशक दिलेल्या मुदतींत जामीन-रक्कम भरणार नाहीं त्याचें प्रतिज्ञापत्र रद्द होईल.

कलम १३—या कायद्यान्वयें ज्या मनुष्यानें जामीन-रक्कम भरली असेल त्यानें सदर छापखाना बाळगण्याचें बंद केल्यास, किंवा तो प्रका-

शक असेल तर प्रेस अँड रेजिस्ट्रेशन ऑफ बुक्सच्या १८६७ च्या कायद्याच्या आठव्या कलमान्वयें त्यानें प्रतिज्ञापत्र केल्यास त्यानें मॅजिस्ट्रेटाकडे जामीन रक्कम परत मिळण्यासाठीं अर्ज करावा व मॅजिस्ट्रेटानें त्या बाबतींत आपलें समाधान करून घेऊन ती रक्कम त्यास परत द्यावी.

कलम १४—कलम ४, कलम ६, कलम ८, कलम १० अगर कलम १२ अन्वयें छापखाना किंवा वर्तमानपत्राचे अंक, किंवा पुस्तक, किंवा दस्तऐवज जप्त केल्याचें सरकारानें जाहीर केल्यावर स्थानिक सरकारानें मॅजिस्ट्रेटास कळवून त्याजकडून सब इन्स्पेक्टर किंवा त्याहून कमी योग्यतेचा नाहीं असा पोलीस अधिकारी यास वॉरंट द्यावें. त्या अधिकाऱ्यास त्या वॉरंटाअन्वयें जेथें वरील जिनसा असतील तेथें जाऊन त्याबद्दल झडती घेण्याचा व त्या ताब्यांत घेण्याचा अधिकार आहे.

कलम १५—(१) मॅजिस्ट्रेटानें त्यास योग्य वाटतील त्या अटी घालून कोणाहि मनुष्यास एक बातमीपत्रक (News sheet) अगर अनेक बातमीपत्रें प्रसिद्ध करण्याचा लेखी हुकुमानें अधिकार द्यावा.

(२) पोटकलम १ अन्वयें मॅजिस्ट्रेटास हुकुमाची नक्कल सदर इसमास देतां येईल.

(३) मॅजिस्ट्रेटानें पोटकलम १ अन्वयें दिलेला हुकूम त्यास परत घेतां येईल.

कलम १६—(१) स्थानिक सरकारानें ज्या पोलीस अधिकाऱ्यास किंवा इतर कोणास अधिकार दिला असेल त्यानें परवानगीवांचून काढलेलें बातमीपत्रक (News sheet) अथवा वर्तमानपत्र जेथें सांपडेल तेथें जप्त करावें.

(२) प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेट किंवा पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट, यांस पोलीस सबइन्स्पेक्टराच्या दर्जाहून कमी नाहीं अशा पोलीस अधिकाऱ्यास अनधिकृत बातमीपत्रक

( News sheet ) अगर अनधिकृत वर्तमानपत्र यांच्या शोधाकरितां कोणत्याहि इमारतींत शिरण्यास व कागदपत्र जप्त करण्यास वॉरंट देतां येईल.

( ३ ) पोटकलम १ प्रमाणें जप्त केलेले कागद प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेट अगर पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यांजपुढें हजर करण्यांत यावे व पोटकलम २ अन्वयें जप्त केलेले कागद ज्या मॅजिस्ट्रेटानें वॉरंट काढलें असेल त्याच्या कोर्टांत हजर करण्यांत यावे.

( ४ ) जप्त करून आणलेले कागद अनधिकृत आहेत असें मॅजिस्ट्रेट अगर कोर्ट यांचें मत झाल्यास त्यानें त्यांचा नाश करवावा. ते अनधिकृत नाहींत असें आढळल्यास त्यांची क्रि. प्रो. कोड ( सन १८९८ ) च्या ५२३, ५२४, ५२५ कलमान्वयें व्यवस्था करावी.

कलम १७—( १ ) आपल्या हद्दींत ज्याचें प्रतिज्ञापत्र केलें नाहीं अशा छापखान्यांतून अनधिकृत बातमीपत्रक अगर अनधिकृत वर्तमानपत्र निघत असल्याचें मानण्यास कारण घडलें असेल तर तो छापखाना प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट अगर सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेट यानें सब-इन्स्पेक्टराहून कमी दर्जाचा नाहीं अशा पोलीस अधिकाऱ्यास वॉरंट देऊन शोध करण्याचा आणि छापखाना व पत्रें ताब्यांत घेण्याचा अधिकार द्यावा.

( २ ) ज्या कोर्टानें वरील बाबतींत वॉरंट काढलें असेल त्यापुढें पोलीस अधिकाऱ्यानें जप्त केलेला माल ताबडतोब हजर करावा.

छापखाना ताबडतोब हलविण्याजोगा नसल्यास त्याचे योग्य ते भाग पोलिस अधिकाऱ्यानें कोर्टापुढें हजर करावे.

( ३ ) तो छापखाना प्रतिज्ञापत्र (डिक्लेरेशन) न केलेला असल्याचें कोर्टास आढळून आल्यास कोर्टानें तो जप्त करावा. पण कोर्टाचें

मत तसें न झाल्यास त्याची कलम ५२३, ५२४, ५२५ क्रि. प्रो. कोड ( सन १८९८ ) प्रमाणें योग्य ती विल्हेवाट लावावी.

( ४ ) १६ व्या कलमाचें पोटकलम ४ अन्वयें कोर्टानें त्याजपुढें हजर केलेल्या कागदपत्रांची विल्हेवाट करावी.

कलम १८—( १ ) जो कोणी अनधिकृत बातमीपत्रक ( News sheet ) अगर वर्तमानपत्र विकील, वांटील, प्रसिद्ध करील, लोकांना दाखवील, अगर विक्रीकरितां, वांटण्याकरितां, प्रसिद्धीकरितां ठेवील त्याला सहा महिनेपर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही भोगावीं लागतील.

( २ ) १८९८ सालचे क्रि. प्रो. कोडांत कांहींहि सांगितलें असलें तरी पोटकलम १ खालीं ज्यास शिक्षा सांगितली आहे असला गुन्हा किंवा त्यास मदत केल्याचा गुन्हा कॉग्निझेबल समजला जाईल.

कलम १९—स्थानिक सरकारास ज्या वर्तमानपत्रांत, पुस्तकांत अगर दुसऱ्या एखाद्या दस्तऐवजांत कलम ४ पोटकलम १ प्रमाणें आक्षेपार्ह मजकूर आहे असें वाटेल त्याची प्रत्येक प्रत जप्त केल्याचें त्यांनीं गॅझेटांत जाहीर करावें; त्याप्रमाणें जाहीर झाल्यावर कोणाहि पोलीस अधिकाऱ्यानें त्या प्रती जप्त कराव्या व त्यांच्या शोधार्थ इमारतींत किंवा जागेंत शिरण्याचा अधिकार सबइन्स्पेक्टराहून कमी दर्जाचा नाहीं अशा पोलीस अंमलदारास कोणाहि मॅजिस्ट्रेटानें वॉरंटानें द्यावा.

कलम २०—कलम ४ पोटकलम १ अन्वयें ज्या वर्तमानपत्रांत, पुस्तकांत अगर दस्तऐवजांत आक्षेपार्ह मजकूर आहे असें स्थानिक सरकारास वाटेल त्यास सदर वर्तमानपत्रें, पुस्तकें अगर दस्तऐवज खुष्कीनें, समुद्रांतून अगर विमानमार्गें ब्रिटिश हिंदुस्थानांत येतांना थांबवून धरण्यास चीफ कस्टम ऑफिसराला अगर दुसऱ्या कोणा अंमलदाराला अधिकार देतां येतो. त्या अंमलदारानें सदर माल जप्त करून ज्या अधिकाऱ्याकडे पाठविण्यास स्थानिक सरकारानें फर्मावलें असेल त्याजकडे पाठवावा व

त्या अधिकाऱ्यानें त्याची व्यवस्था त्यास स्थानिक सरकारानें सांगितलें असेल त्याप्रमाणें लावावी.

कलम २१—अनधिकृत बातमीपत्रक ( News sheet ) अगर वर्तमानपत्र टपालानें पाठविण्यास बंदी आहे.

कलम २२—कलम १ पोटकलम ४ अन्वयें जें वर्तमानपत्र, पुस्तक अगर इतर दस्तऐवज आक्षेपार्ह ठरला असेल किंवा जें अनधिकृत बातमीपत्रक अगर अनधिकृत वर्तमानपत्र असेल तें टपालांत आहे असा पोस्टांतील अधिकाऱ्यांस अगर पोस्टमास्तर जनरलनें ज्यास अधिकार दिला आहे त्यास संशय आल्यास त्यानें तें स्थानिक सरकारानें ज्यास अधिकार दिला आहे अशा अंमलदाराच्या ताब्यांत द्यावें.

## हायकोर्टाचे अधिकार

कलम २३—( १ ) कलम ३ पोटकलम ३ अन्वयें ज्या छापखानदारास अनामत रक्कम ठेवण्याचा हुकूम झाला असेल, किंवा कलम ७ पोटकलम ३ अन्वयें वर्तमानपत्राच्या ज्या प्रकाशकास अनामत रक्कम ठेवण्याचा हुकूम झाला असेल, किंवा कलम ४, कलम ६, कलम ८, कलम १० अगर कलम १९ अन्वयें ज्या कोणाचा जप्त व्हावयाच्या मिळकतींत हक्कसंबंध असेल त्यानें तसा हुकूम झाल्यापासून दोन महिन्यांच्या आंत तो हुकूम रद्द होण्याबद्दल हायकोर्टाकडे अपील करावें आणि हायकोर्टानें त्या बाबतींत योग्य तो न्याय द्यावा.

( २ ) कलम १२ चें पोटकलम १ याविरुद्ध वागल्याबद्दल कलम १२ पोटकलम २ अंन्वयें ज्याचा छापखाना जप्त करण्याचा हुकूम झाला असेल त्या छापखानदारास त्या बाबतींत हायकोर्टाकडे अपील करून दाद मागतां येईल.

कलम २४—या प्रकारचें प्रत्येक अपील हायकोर्टाचें स्पेशल बेंच

ऐकेल. बेंचांत तीन जज्ज बसतील. हायकोर्टाचे जज्ज तीनाहून कमी असल्यास सगळे जज्ज बसतील.

कलम २५—( १ ) कलम २३ पोटकलम १ अन्वयें केलेल्या अर्जावरून हायकोर्टाला कलम ४ पोटकलम १ अन्वयें गुन्हा घडला नाहीं असें वाटेल तर हायकोर्ट जप्तीचा हुकूम रद्द करील.

( २ ) कलम २३ पोटकलम २ अन्वयें केलेल्या अपीलावरून कलम १२ पोटकलम १ विरुद्ध छापखान्याचा उपयोग केला नाहीं असें हायकोर्टाला वाटेल तर हायकोर्टानें जप्तीचा हुकूम रद्द करावा.

( ३ ) स्पेशल बेंचांतील जज्जांत मतभेद झाल्यास बहुमत ज्या बाजूला असेल तो निर्णय समजावा.

( ४ ) बहुमत जप्तीचा हुकूम रद्द करण्यास अनुकूल नसेल तर हुकूम कायम राहील.

कलम २६—वर्तमानपत्राच्या बाबतींत कलम २३ पोटकलम १ अन्वयें हायकोर्टाकडे अर्ज केल्यावर त्याच्या सुनावणीच्या वेळीं त्या वर्तमानपत्राची, सदर कायद्याच्या सुरुवातीनंतरची कोणतीही प्रत पुराव्या-दाखल देतां येईल.

कलम २७—अशा प्रकारचे अर्ज हायकोर्टाकडे आल्यानंतर त्यांचें काम कसें चालवावें, तसेंच खर्चाची रक्कम, हुकुमाची अंमलबजावणी या बाबतींत हायकोर्टानें नियम करावे. ते नियम होईपर्यंत कोर्टाच्या मामुली पद्धतीप्रमाणें वागण्यांत यावें.

समाप्त

# शब्दसूचि


| शब्द | पृष्ठ |
|---|---|
| **अ** | |
| ॲडव्हान्स | ३६ |
| ॲडिसन | २० |
| ॲडव्होकेट ऑफ इंडिया | ७५ |
| ॲडाम जॉन | ३० |
| ॲसोसिएटेड प्रेस अमेरिका | २६ |
| ॲसोसिएटेड प्रेस इंडिया | ८९ |
| अग्रलेख | १८२ |
| अर्थ | ९६ |
| अब्रुनुकसानी | ३३४ |
| अभिप्राय | २१२ |
| अमृतप्रवाहिनी | ३९ |
| अमृतबझार पत्रिका | ३५, २६२, २६७, २७२ |
| अरनॉट | ३१ |
| अरुणोदय | ७२ |
| अय्यर सुब्रम्हण्य | २६, ५७—५८ |
| **आ** | |
| आगरकर, प्रो. ग. | ९६, १०३, १०८, १७४, १८२ |
| आचार्य | ९६ |
| आठवले | २७, ६० |
| आनंद | २११ |
| आपटे, ह. ना. | ९६, ११०—११४ |
| आंबेडकर | २१५ |
| आयंगार कस्तुरी रंगा | ३६ |
| आर्यभूषण | ७४ |
| आवृत्ति, दैनिक | २८२ |
| **इ** | |
| इंग्लिशमन | २९ |
| इंटर टाईप | २७८ |
| इंटरनॅशनल हिअर्स | २६ |
| इंडियन असोसिएशन | ४९ |
| इंडियन ओपीनियन | ६६ |
| इंडियन गॅझेट | २८ |
| इंडियन डेलीन्यूज | २८, ८७ |
| इंडियन प्रेस (इमर्जेन्सी पॉवर्स ॲक्ट) | ३३५ |
| इंदुप्रकाश | ७१, ८२, ९१ |
| **ई** | |
| ईडन, सर ॲश्ले | ४० |
| **उ** | |
| उपदेशचंद्रिका | २०३, २०७ |

ए

एक्झॅमिनर १९

ऐ

ऐक्य ९५

ओ

ओक ज. वि. ३०४

ओगले गो. १७६

क

कॅनिंग, लॉर्ड ३२

कर्झन, लॉर्ड २६१

कपटा ( टॅब्लॉइड ) २७

कर्मयोगिन् ५६

करंदीकर वि. र. ३७

करंदीकर ज. स. १३९

करमणूक ८६,९६

कप्तान ९६

कलकत्ता मंथली ३१

कलकत्ता जर्नल ३१

कायद्यांचीं बंधनें ३२७-३४४

कोर्टाची बदनामी ३३३

काळ ८३,८६

क्रांति ९६

क्रांतिकारक पॅरिस २४८

किर्लोस्कर ३१०,३१५

किस्तोदास ३२

किंग्जफोर्ड ५५

कुलाबा समाचार ८,९५

केरळकोकिळ ३२१

केसरी ७४,८६,९३,९५,१६८, २१४,२२२,२६८

केळकर न. चिं. ८६,११४-११७, १७१,२११,२१९,२३७,२५५, ३१९

कोठारी वा. रा. १७१

कोल्हटकर अ. व. ८५,९४, १२२-१२६,१८१

कोल्हापूर ७७

ख

खटले, प्रसिद्ध २५०,२६९

खरे ल. ग. ३७

खरे डॉ. ना. भा. २५७

खाडिलकर कृ. प्र. ८६,९१, १२०-१२२,१७९,२५३

ग

गॅझेट ऑफ इंडिया ७०

गलिव्हरचा प्रवास २०

गणपत कृष्णाजी ६९

ग्रंथमाला ३०४

ग्रंथसंग्रह १७७

गायकवाड सयाजीराव ५४

गांधी मो. क. ३६,३७,६५-६८, ९०,२१५

गोखले गो. कृ. ६०,८२

गोखले दा. वि. १७१

गोखले बाबा ७१

गोरक्षण ९६

**घ**

घोष अरविंद ३५,५२,५३-५७
घोष विरेंद्रकुमार ५६
घोष मोतिलाल ३५,३८-४४, १७६,२७५
घोष वसंतकुमार ३९
घोष शिशिरकुमार ३५,३८-४४
घोष हेमंतकुमार ३५,३८-४४

**च**

चतर्जी बच्चाराम ३५
चतर्जी रामानंद ३२२
चतर्जी शंभुचंद्र ३१
चतर्जी शितलचंद्र ४९
चाफेकर ८१,२५०
चिंतामणी ३७,१७६
चित्रमयजगत् ३०४, ३१३
चित्रा ९५
चिपळूणकर वि. कृ. ७४,९९-१०३
चिरोल, सर व्हॅलेंटाईन २१०
चूष ११,२०१

**छ**

छापखाना नोंदणें ३२७

**ज**

जगन्मित्र ७२
जनता ९६
जॉन्सन, डॉ. २१
जॉनबुल इन दी ईस्ट २९
जागरूक ९६
जामिनकी २५६
जामे जमशेट ७[illegible]
जांभेकर बाळशास्त्री ७१
जाहिरात ३,२८४,२८९
जोशी वासुदेवराव ३०४

**ट**

टॅटलर २०
टाइम्स ऑफ इंडिया १५,२९,७०, ८८,२११,२४४
टागोर ३२३
टिकेकर श्रीपादराव २१२
टिळक बा. गं. ५३,६१,७६,७९, ८४,९०,१०८-११०,१७४, १७९,१८२,२६८.
ट्रिब्यून ३७

**ठ**

ठसेदार २४,२७७

**ड**

डर्बी मर्क्युरी २४७
डे, आशुतोष ४२
डेली टेलिग्राफ २५
डेली मेल २८९

**त**

तपासनीस, छाप २७८
ताम्हनकर ३१६
तेलंग ३७

**द**

दत्त, रमेशचंद्र ४८,५०

दर्पण ७१
दयाळसिंग ४९
दास, चित्तरंजन ५६
दक्षिण महाराष्ट्र ९५
दीनबंधु ९६
देवधर गो. कृ. १७१
देशसेवक ८३,१८१
देसाई, नारायणराव २३५

**ध**

धनुर्धारी ९५
धर्म ९६

**न**

नवाकाळ ९१
नवशक्ति ९१
नारळीकर, रँग्लर ३२२
नॉर्थक्लिफ २५,१७२
निर्णयसागर ७०
निबंधमाला ३०३
निवेदन १९५
नेहरू, जवाहरलाल ३२२
नेटिव्ह ओपीनियन ७२
न्यू इंडिया ३५,३७,५१
न्यू. इं. स्कूल ७९

**प**

पटवर्धन २३८
परांजपे शि.म. ८४,८६,११८-११९
परीक्षण २०४
परुळेकर ना. भि. ९३
पंचम जॉर्ज ४३
पंजाबी ३७,६०,२५२
पंडित वि. प. ७१
प्रबोध ९५
प्रभाकर ७१
प्रभात ९१
प्रूढोम २४७
पाल क्रिस्तोदास ३२
पाल बिपिनचंद्र ३५,५०-५३
पायोनियर २९,८८
पीपल ६२
पुरुषार्थ २११

**फ**

फॉरवर्ड ३६
फ्री प्रेस जर्नल ९१,२५९

**ब**

बकिंगहॅम ३०
बलवंत ९५
बर्वे माधवराव ७७
बंगाल सरकार २८
बंगाली ४५,४८,७५
ब्रम्ही पब्लिक ओपीनियन ४७
बातमी १९०
बातमी ताजी २८२
बातमीदार १९४,२०३,२०६
बातमीपत्रे १९३
बानर्जी तारापद ४९
बानर्जी सुरेंद्रनाथ ३४,४४-५०

बंगाला गॅझेट २९
बाँबे कुरियर २९
बाँबे क्रॉनिकल ८७
बाँबे गॅझेट २९
बाँबे समाचार ७१
बाँबे हेरल्ड २९
ब्राईस, डॉ. ३०
बेझंट ॲनी ६१,६३-६४,८७
बेळगांव समाचार ७२
बेंगॉल गॅझेट २८
ब्रेलवी अब्दुल्ला ३७
बोस जोगेंद्रनाथ ४८
बोस्टन न्यूज २२

भ

भट्टाचार्य गंगाधर ३०
भाला ८३

म

मथळा १३,२४२
मर्क्यूरियस ब्रिटानिकस १९
मद्रास टाईम्स २९
मद्रास मेल ८८
मंडलिक रा. ना. १७१
मनोरंजन ३१२
मनोहर ३१०
मफतून दिवाणसिंग २५९
मॅक्डोनाल्ड राम्से २१५,२६७
मराठा ७४
महाजन, भाऊ ७१
महाराष्ट्र ९५,१६८,१७६
महाराष्ट्र मित्र ७२
मॉर्निंग क्रॉनिकल २१,२१
मॉर्निंग पोस्ट २५
मॉरिस ४७
मितर क्रिस्तोकुमार ४८
मित्र का. र. ३१२
मित्र रामकृष्ण ४०
मुखवटे ५,२८१
मुद्रणकला १८
मुलाखत १९६
मुसोलिनी २४५
मेथा फिरोजशहा ७५,८७
मोनोटाईप २७८
मौज ९५

य

यशवंत ३१४
यंग इंडिया ३७,२५२
याज्ञिक इंदुलाल ६६
युगांतर २५,५५
युनायटेड प्रेस १९२

र

रईस आणि रयत ३२
रॅम्बलर २१
राइट ३९
राजद्रोह ३३१
राजवाडे शं. रा. १७१
राजहंस नारायणराव २६४

राजा राम मोहन राय ३०
रानडे कृ. त्र्यं. ७१
रानडे म. गो. ७१,८२
रास, रोनॉल्ड २४७
राष्ट्रीय सभा ७५,२४९
राष्ट्रमत ८४
राष्ट्रवीर ९६
रॉदरमियर २५
रॉय कालिनाथ ३७
रिचर्ड एम्. हो. २३
रिपन ५८
रीडींग मर्क्यूरी २४७
रूटर कंपनी ८८
रेनविक जॉर्ज २१०
रेन खिस्तोपर २४७
रंगाचारियर ३६

ल

लजपतराय ५९-६२
लायनोटाईप २७८
लिंग्वे २४७
लिबर्टी ३६
लीडर ३७
लूस्तालो २४८
लेव्हिन माल्कन ३१
लोकमान्य ९१
लोकसंग्रह ९०
लोकमित्र ३०४
लोकशिक्षण ३११,३०४
लोहकरे २३८
लंडन गॅझेट १९
लंडन टाईम्स १८,१६५-१६७

व

व्यंग्यचित्रे १२,२८१
वऱ्हाड समाचार ७२
वॉल्टर, जॉन २१
विचारलहरी ३०२
विजापूरकर वि. गो. ३०४
विजयी मराठा ९६
विविधवृत्त ९५
विविधज्ञानविस्तार ३०२,३१९
विहारी ८३
वंगदर्शन ३५
वंगवासी ४८
वंदे मातरम् ३५,५२

श

शुभसूचक ७२
शालापत्रक ३११

स

सकाळ ९२, २१३
सदानंद ३७,९१
समर्थ ९५
समाचार हिंदुस्थानी ३२
समाचार दर्पण ३०
समाजस्वास्थ्य ३१०
सह्याद्रि ३११,३१९,३२२
सापकर ७२

सिटी न्यूज अ‍ॅसोसिएशन २६
सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट २९
सीगर, जॉन २१०
सुधारक ७९
सूर्योदय ७२
सेन केशवचंद्र ५०
सोमण गो. मो. २९१
संदेश ८५
संध्या ३६
संपादक १२७,१५१-१७०,१७९
संवाद कौमुदी ३०
संस्थानी स्वराज्य ९६,२५९
स्टील २०
स्टेट्समन् २९,५६
स्पेक्टेटर २०
स्वदेशमित्रम् ३६,५८
स्वराज्य ५२,८३,८६
स्विफ्ट, जोनाथन १९

ह

हरिकिशोर ८३
हॉफ ४२
हॉर्निमन बेन्जामिन ८७
हिंदी संस्थानें २३३
हिंदु ३६,७५
हिंदु पेट्रिअट ३२
हिंदु पंच ८३
हिंदु रिफॉर्मर ७२
हिंदुस्थान टाईम्स ३७
हिंदुस्थान स्टँडर्ड ३६
व्हॅनगार्ड ३६

ज्ञ

ज्ञानचक्षू ७२
ज्ञानप्रकाश ७१,८२,९२,२१३
ज्ञानमंदिर २१४
ज्ञानोदय ७१

REFBK-0005860

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२२ | २१ | बोधसुधाकर | महाराष्ट्रमित्र |
| ३० | ११ | समाचारदर्पण | संसारदर्पण |

# प्रस्तुत ग्रंथकर्त्यांचीं इतर पुस्तकें

१ तुर्कांचें साम्राज्य रु. २—०—०

२ खरा देशभक्त

( राजकीय व सामाजिक कादंबरी ) रु. १—८—०

३ पेशवेकालीन महाराष्ट्र रु ३—०—०

४ प्रीतिविवाह

( सामाजिक नाटक ) रु. १—८—०